१९३६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५०७

# सरस्वतीचे लाडके पुत्र

लेखक—

द. मो. दामले, B. A., B. T.
(केशवसुतांचा पुतण्या)

*

REFBK-0015222

किंमत १२ रुपये

४१३११
१८/५८०
निबंध
१८०१

# सरस्वतीचे लाडके पुत्र

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

लेखक–

द. मो. दामले, B. A., B. T.
(केशवसुतांचा पुतण्या)

REFBK-0015222

किंमत १२ रुपये

मुद्रक

**प्रभाकर देगांवकर**

श्री शारदा मुद्रणालय, सोलापूर.

प्रकाशक

**द. मो. दामले,** बी. ए. बी. टी.

सोलापूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... वि: ....................
क्रमांक .......................... नों: दि: ....................

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 14222

नेटका संसार करणारे आणि
सरस्वतींच्या लाडक्या पुत्रास जन्म देणारे

ती. केसो विठ्ठल दामले
व
सौ. अन्नपूर्णाबाई केशव दामले
यांस सादर अर्पण

— त्यांचाच नातू "दत्तू"

# - प्रास्ताविक हितगुज -

**ग्रंथाची कल्पना व पाठपुरावा–**

श्रीमती लक्ष्मीबाई टिळक यांच्या "स्मृतिचित्रें" या ग्रंथानें प्रभावित होवून मी १९४५ मध्यें "केशवपुत्रांच्या सहवासांत" या नांवाचें एक सुमारें १५० पृष्ठांचें आत्मचरित्र दुसऱ्या एका "लक्ष्मीबाई"नींच जणूंकाय लिहिलें आहे अशा परिवेषांत लिहिलें होतें. या लक्ष्मीबाई दांडेकर म्हणजे माझ्या आत्याबाई; आणि त्यांस दुर्दैवानें फार लहान वयांत वैधव्य आल्यानें त्यांस त्यांच्या भावांच्या आश्रयास यावें लागलें. हे भाऊ म्हणजे मुख्यत: दोघे - एक माझे वडील मोरो केशव दामले, व दुसरे सीताराम केशव दामले. तेव्हां या आत्मचरित्रांत त्यांचें स्वत:चें आयुष्य (लक्ष्मीबाईंच्या जन्मापासून वैधव्य दशेंतील काल हा प्रास्ताविक २५-३० पृष्ठांचा,) व नंतर या दोन बंधूंच्या सहवासांतील त्यांचे आयुष्य हा अंदाजे १२५ पृष्ठांचा भाग, व शेवटच्या एका १५-२० पृष्ठांमध्यें तदनंतरचा त्यांचा काळ असा अंदाजानें दीडशें पृष्ठांचा तो छोटा ग्रंथ होता. पण प्रकाशक मिळण्याच्या बाबतींत माझा कमनशिबीपणा त्याच काय माझ्या सर्वच लेखनाच्या आड आलेला आहे. माझें आजपर्यंत कोठलेंच लेखन किरकोळ २।३ लेख अपवाद म्हणून सोडले तर माझ्या शिवाय अन्य कोणीच प्रकाशित केलेले नाहींत !

१९६० च्या अखेर अखेर अखेर ज्यावेळीं प्रा अ. म. जोशी एम् ए. ग्वाल्हेर, यांचा " वडीलांचे सेवेशीं " हा कै. प्रा. महादेव मल्हार, मजूर पुढारी कै. नारायण मल्हार आणि प्रा. व साहित्य सेवक वामन मल्हार जोशी या त्रिवर्ग बंधूंचीं चरित्रें असणारा ग्रंथ प्रसिद्ध झाला, तेव्हां त्यानंतर थोडचा दिवसानीं तो विजयादशमी १९६० साल या दिवशीं प्रसिद्ध झाला. ) मला एक पत्र आलें. पत्र लेखिका होत्या (आतां कैलासवासी) प्रिन्सिपॉल कमलाबाई देशपांडे. जोशी घराण्याशीं

त्यांचा जसा चांगला परिचय होता तसा माझ्याशीं थोडा परिचय होता पण माझ्या घराण्याबद्दल त्यांस अभिमान होता, त्यांचे वडील कै. दे. भ. तात्यासाहेब केळकर यांचा व मोरो केशव व सीताराम केशव यांचा चांगला संबंध होता. म्हणून त्यांनीं मला मी माझ्या कुटुंबातील त्रिवर्ग बंधु- कृष्णाजी केशव (कवि केशवसुत), व पूर्वोक्त दोन बंधु अशा या त्रिवर्ग बंधूंचीं चरित्रें (प्रा. अ. म. जोशी यांचा ग्रंथ वाचला नसल्यास वाचावा व त्यासारखा एक ग्रंथ) मी लिहावींत अशी त्यानीं त्या पत्रांत मला विनंती केली होती. ही विनंती करणाऱ्या श्री. कमला काकी हा ग्रंथ पहावयास हयात नाहींत, आज, याबद्दल वाईट वाटतें.

श्री. कमलाकाकींचे धाकटे बंधु व इतिहास संशोधक श्री. यशवंतराव ऊर्फ अण्णासाहेब केळकर यांनींही त्यानंतर व त्या नंतरच्या काळांत मी अशासारखें पुस्तक लिहावें ही सूचना केली. त्या काळांत मला ही कल्पना तेवढीशी आवडली नसावी, नाहींतर मी माझ्या स्वभावाप्रमाणें त्याही काळांत मिळणाऱ्या एप्रिल–मे व दिवाळी या सुट्टयांमध्यें लेखनाचा खटाटोप आरंभला असता .... एका प्रकारें झालें तें बरेंच झालें म्हणावयाचें. असल्याच कोणत्या तरी एका सुट्टींत मात्र अंदाजाने १०–११ वर्षांपूर्वी मी एक छोटीसी पुस्तिका लेख– "केशवसुतांची भांवडें व त्यांचा परिवार"– हीं लिहिली व ती ७ नोव्हेंबर १९६५ रोजीं प्रसिद्ध केली. १९६४ च्या मे अखेर मी माझ्या शिक्षकाच्या पेशामधून निवृत्त झालों. आणि त्यानंतर थोडीं विश्रांति घेत बसलों, पुण्यांत. त्याचकाळांत कै. श्री. चिंतामणराव वैद्य, महाभारताचार्य, यांचे चिरंजीव श्री. धुंडीराजपंत किंवा दादासाहेब मला जुलैमध्यें भेटले. ते त्यांचें चरित्र–एक छोटेसें आत्मचरित्र– ( तेंच विस्तार करण्यास मोठें चरित्र करण्यास, त्यांचेच एक तरूण स्नेही व कल्याणमधील उत्साही शिक्षक श्री. सन्त हे त्यानीं निवडलेले लेखक होते. ) छापण्याच्या विचारांत होते. तेव्हां मीही माझ्या कांही भारताचार्य विषयींच्या त्यांचे खाजगी जीवनांतल्या आठवणी सुमारें ३० पृष्ठें होतील, छापून, एवढा मजकूर त्यांस लिहून दिला. या काळांत माझी व माझे मित्र यशवंतराव केळकर यांची व त्यांचेच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



बि:
अनुक्रम
क्रमांक ...... नों. दि:

थोरले बंधु काशिनाथ किंवा बापूराव यांचीही गाठ पडे मधून मधून. त्या दोघांनींही मी आतां सेवानिवृत्त झाल्यामुळें ग्रंथ लिहावयास घ्यावा अशी विनंति केली. त्याप्रमाणें एक कच्चा आराखडा तयार करून माझे वडीलांच्या चरित्रापासून सुरुवात करावयाचें ठरवून त्या कामास ऑगस्ट १९६४ मध्यें मी मुहूर्त केला म्हणावयाचा. पण कामाची तेवढी निकड मनास वाटत नव्हती, ··· प्रकृति देखील पुरेशी चांगली नव्हती. त्याच सुमारास एक चुलत चुलत बंधु श्री. दत्तात्रेय गणेश हे पुण्यास कॅन्सरच्या विकारानें वारले. ··· मी स्वतःही जास्त जास्त अशक्त होत गेलों. म्हणून सोलापूरास घरीं गेल्यावर डॉक्टरी तपासणी होवून मला अखेर Ulcer पोटांतील अल्सर झाला आहे, व शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे असें कळल्यावरून ती शस्त्रक्रिया करण्यांत आली. अशा प्रकारें तें साल तसेंच गेलें.

**लेखकाची लायकी–**

आतां प्रस्तुत ग्रंथ लिहावयाची माझी लायकी, पात्रता काय असा प्रश्न विद्वान् लोक जरूर करतोल. कदाचित् माझेच चुलत बंधु कै. प. चिं. दामले हेही याबद्दल आक्षेप घेतील ! त्यांचे मतानें कवि केशवसुत यांचें चरित्र लिहिण्याची लायकी कै. हरीकाका दामले, ज्यांचे घरीं कवि मरण पावले ते, आणि प. चिं. दामले यांचे वडील ती. चिंतो केशव दामले यांचीच. कै. ती. सीतारामकेशवही त्यांचे मतानें पुरेसे लायक नव्हते ! (पहा केशवसुत स्मृति ग्रंथ पृ. २२०-२१) ते स्वतः थोडेसे लायक होते; कारण काय तर फैजपूर येथें १९०३ ते १९०४ मार्च एप्रिल फार तर मे पर्यंत ते कवि केशवसुतांजवळ शिकावयास राहिले होते! पण त्यावेळीं त्यांचे स्वतःचें (प. चिं दा. याचें) वय तरी किती होतें ? दहा अकरा वर्षें; कारण त्यांचा जन्म १८९३ सालचा. तेव्हां सी. के. दा. यांची लायकी नाहीं, आणि पूर्वोक्त हरी सदाशिव व चिंतोपंत यांची सर्वांत जास्त लायकी, व त्याचे खालोखाल स्वतः प चिं. दा. यांची बरें. हरी सदाशिव व चिंतो केशव आणि केशवसुत तरी असे किती वर्षें जवळ जवळ राहिले होते हा प्रश्नच आहे? आतां

हरी सदाशिव व चितो केशव याचें शिक्षण, इंग्रजी शिक्षण, (ज्या शिक्षणाचाच मुख्यत: परिणाम केशवसुतांवर झाला होता, आणि त्यावर त्यांचें काव्य आधारलेलें होतें तें इंग्रजी शिक्षण) तरी किती झालेलें होतें? मुळींच नाहीं . अशा प्रकारचीं मतें आमचेच कुटुंबीय प. चि. दा. व्यक्त करतात, आणि विद्वानांच्या हातीं असें एखादें कोलीत देतात ! अशा परिस्थितींत माझी लायकी तर काय? क: पदार्थच! सी. के. दा. आणि प. चि. दा. व त्यांचे वडील चितो केशव, यांचे संबंध कसे होते या हकीगतींचा विस्तार सी. के. दामले यांचे चरित्रांत पुढें पहावयास मिळेल. प. चि. दा. यांचे, सी. के. दा. यांच्या केशवसुत चरित्र लिहिण्याच्या लायकीबद्दलच्या विधानांस, किती किंमत द्यावयाची तें सूज्ञ वाचक जाणूं शकतील.

पण पुष्कळशा विद्वानांस आणि केशवसुत-काव्याचे अभ्यासकांसही माझ्या लायकीबद्दल रास्त जबरदस्त शंका यावी. त्याबद्दल मी एवढेंच सांगतों कीं, माझ्यापेक्षां जास्त लायकी असणारी व्यक्ति ( एक माझी धाकटी बहीण श्री. रत्नप्रभा घारपुरे M. A. B. T., Rtd Inspectress of Govt. Schools, Nagpur Region यांचा अपवाद वगळला तर आज दुसरी कोणतींच जिवंत नाहीं. (आणि श्री. घारपुरे यांस लिहिण्याची एवढी आवड व सवय नाहीं असें त्यानीं मला सांगितलें असल्यामुळें त्या देखील लायकी असून बाजूस पडतात.) म्हणून कोणी कांहीं म्हटलें तरी माझी अल्प स्वल्प लायकी ( हिचा थोडा विस्तार याच प्रस्तावनेंत पुढे केला आहे) हीच मानून हा ग्रंथ लिहिण्यास मी प्रवृत्त झालों. व तो ग्रंथ लिहिला.

**ग्रंथाचे नांव व सुरुवातीचें लेखन, जन्मतारीखेचा वाद.**

आतां ग्रंथास नांव काय द्यावें हा प्रश्न मनापुढें आला आणि एकाएकीं महामहोपाध्याय गु. दत्तो वामन पोतदार यांनीं ती. सीताराम पंतांचे मृत्युनंतर मला दुखवटा म्हणून जें पत्र लिहिलें होतें त्यांतील मजकूराची आठवण झाली. आणि ग्रंथाचें नांव मनांत पक्कें झालें-सरस्वतीचे लाडके पुत्र! - त्यांचा मूळ मजकूर असा आहे – " मोरोपंत

काय, सीतारामपंत काय, किंवा कृष्णाजीपंत काय, सर्व सरस्वतीचे लाडके पुत्र होते. दामले घराणें या त्रिवर्ग बंधूंनीं अजरामर केलें. –" अशा प्रकारें नांव सांपडलें जानेवारी फेब्रुवारी १९६५ त; पण लेखन खोळंबून राहिलेंच! त्याचे आधीं मोरोपंतांविषयीं अंदाजें ३०-४० पृष्ठें फारतर, छापील एवढाच मजकूर लिहून तयार होता. आणि त्याच काळांत मी प्रवासांत असतांना वैजापूर (औरंगाबाद जवळ) मला दैनिक "मराठा" चा १५ मार्च १९६५ चा अंक वाचावयास २० चे सुमारास मिळाला! त्यांत केशवसुतांवर एक सुरेख अग्रलेख होता, व १५ मार्च ही त्यांची जन्मतिथी असून १५ मार्च १९६६ रोजीं त्यांचा त्यांचे योग्यतेस साजेल असा जन्मशताब्द उत्सव साजरा व्हावा अशी इच्छा जोरदारपणानें मांडलेली होती... हा एक मला धक्काच बसला. कारण माझा समज, त्यांचा जन्म दिवस पुढें कुठेंतरी पावसाळ्यांत आहे असा होता! सुदैवाने त्यावेळीं मी माझे चुलत पुतण्ये श्री. रघुनाथ परशुराम दामले सिव्हिल जज्ज वैजापूर यांचे घरींच होतों. त्यानीं व मी केशवसुतांचा काव्यसंग्रह व त्यांत दिलेली जन्म– तिथी पाहिली, ती रविवार भाद्रपद वद्य १४ शके १७८८ ही आढळली. तेव्हां आश्चर्य वाटलें, या १५ मार्चच्या जन्मतारखेच्या नव्या शोधाबद्दल! पुढें नागपुरास गेलों; आणि एप्रिलांत प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांची ओळख झाली; त्यांचा ग्रथ भेट म्हणून त्यांचेकडूनच मिळाला. आणि १५ मार्च या जन्मतारखेचें कोडें उलगडलें! ती तारीख त्यांचे संशोधनाचें फळ होतें असें माझ्या दृष्टोत्पत्तिस आलें. त्याबद्दलचे पुरावेही मला श्री. पंडीत यानींच मोकळे मनानें दाखवले.. तेव्हां मला भीति उत्पन्न झाली, कीं, माझा चरित्रात्मक ग्रंथ १५ मार्चला आतां कसा प्रसिद्ध होणार? त्या दृष्टीनें जन्मतिथी-निश्चय करणें, व चरित्रांचा ग्रंथ लिहावयास घेणें निकडीचें वाटू लागलें... आणि एप्रिल–मे अखेर तिथीच बरोबर अहे; १५ मार्च ही तारीख चुकली असावी असे सूर कानी पडू लागले. आणि त्याच सुमारास जूनमध्यें मी सीतारामपंत यांचे चरित्रलेखनास सुरुवात केली.... पुढें तिथि निश्चयाच्या धडपडींत हळुहळू पत्रिका व तिथीच बरोबर आहे; १५ मार्च ही तारीख चुकीची आहे अशी उपलब्ध

होत असलेल्या माहितीवरून खात्री वाटूं लागली, आणि लेखनाचें काम ही प्रगत होवूं लागलें. विजयादशमी १९६५ या दिवसापर्यंत मोरोपंतांचें चरित्र (अर्धवट राहिलेलेंच, अंदाजे ४५-५० पृष्ठें; सीतारामपंत यांचें चरित्र अर्धवट राहिलेलेंच, अंदाजे ५०-६० पृष्ठें) व चिंतोपंत चरित्र (पूर्ण; अंदाजें २० पृष्ठें )असा निम्मा ग्रंथ तयार झाला होता. उरलेला कांहीं भाग, म्हणजे केशवसुतांचे स्वतःचें चरित्र, प्रवास करून म्हणजे उज्जयिनी, व फैजपूर भडगांव ही शहरें, आणि धारवाड हुबळी व रत्नागिरी जिल्ह्यांतील मालगुंड, कोळंबें, रत्नागिरी,खेड, वळणें आदि गावें पाहून, मग लिहावयास घ्यावें असा विचार मनांत पक्का झाला. मोठ्या ग्रंथाची नांदी म्हणून "केशवसुतांची भावंडें व त्यांचा परिवार" ही पुस्तिका ७ नोव्हेंबर १९६५ रोजीं छापून प्रसिद्ध केली, त्यांच्याच ६० व्या पुण्यतिथीच्या निमित्तानें, आणि १९६६ मध्यें ७ ऑक्टोबर रोजीं मोठा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची मराठी वाचकांस जाहीर ग्वाही देखील त्या पुस्तिकेच्या प्रस्तावनेंत देऊन बसलों!

**चरित्रांचीं साधनें जमवण्याचा यत्न, प्रवास–**

प्रवासास सुरुवात केली. उज्जयिनी गाळलें आणि भडगांव फैजपूर करून परत पुण्यास आल्यावर चांगलाच आजारी पडलों! जानेवारी महिना पूर्ण, आजारांत गेला. फेब्रुवारी ताकद मिळवण्यांत गेला! याच दोन महिन्यांत, थोडा काळ आधींपासूनच म्हणजे १५ डिसेंबरचे सुरुवाती पासूनच जन्मतिथीचे वादामध्यें भाग घेणें, तिथी निश्चित करण्याच प्रयत्न करणें हे उद्योग चालविले होते. अखेर मार्चच्या ४ तारखेच्या केसरींत महाराष्ट्र सरकारचा या बाबतींतला निर्णय वाचला, आनंद झाला. त्याचदिवशीं "आम्ही कोण" या All India Radio पुणे स्टेशन वरून दि. १४ मार्चच्या रात्रीं ९॥ ते १० पर्यंत प्रसारित करण्यांत आलेल्या कार्यक्रमांतील माझा भाग म्हणून १४ मिनिटांचीं प्रश्नोत्तरें Tape-record करून घेण्यांत आली होतीं! त्यांतील अंदाजें ३ मिनिटांचा भाग प्रत्यक्ष कार्यक्रमांत ऐकावयास मिळाला.–आणि आतां चरित्रें लिहिण्याचा कार्यक्रम, पुढील प्रवासाचा कार्यक्रम वगैरे गोष्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ विः ........

काय, सीतारामपंत काय, किंवा कृष्णाजीपंत काय, सर्व सरस्वतीचे लाडके पुत्र होते. दामले घराणें या त्रिवर्ग बंधूंनीं अजरामर केलें. –" अशा प्रकारें नांव सांपडलें जानेवारी फेब्रुवारी १९६५ त; पण लेखन खोळंबून राहिलेंच! त्याचे आधीं मोरोपंतांविषयीं अंदाजें ३०-४० पृष्ठें फारतर, छापील एवढाच मजकूर लिहून तयार होता. आणि त्याच काळांत मी प्रवासांत असतांना वैजापूर (औरंगाबाद जवळ) मला दैनिक "मराठा" चा १५ मार्च १९६५ चा अंक वाचावयास २० चे सुमारास मिळाला! त्यांत केशवसुतांवर एक सुरेख अग्रलेख होता, व १५ मार्च ही त्यांची जन्मतिथी असून १५ मार्च १९६६ रोजीं त्यांचा त्यांचे योग्यतेस साजेल असा जन्मशताब्द उत्सव साजरा व्हावा अशी इच्छा जोरदारपणानें मांडलेली होती... हा एक मला धक्काच बसला. कारण माझा समज, त्यांचा जन्म दिवस पुढें कुठेंतरी पावसाळ्यांत आहे असा होता! सुदैवाने त्यावेळीं मी माझे चुलत पुतण्ये श्री. रघुनाथ परशुराम दामले सिव्हिल जज्ज वैजापूर यांचे घरींच होतों. त्यानीं व मी केशवसुतांचा काव्यसंग्रह व त्यांत दिलेली जन्म– तिथी पाहिली, ती रविवार भाद्रपद वद्य १४ शके १७८८ ही आढळली. तेव्हां आश्चर्य वाटलें, या १५ मार्चच्या जन्मतारखेच्या नव्या शोधाबद्दल! पुढें नागपुरास गेलों; आणि एप्रिलांत प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांची ओळख झाली; त्यांचा ग्रथ भेट म्हणून त्यांचेकडूनच मिळाला. आणि १५ मार्च या जन्मतारखेचें कोडें उलगडलें! ती तारीख त्यांचे संशोधनाचें फळ होतें असें माझ्या दृष्टोत्पत्तिस आलें. त्याबद्दलचे पुरावेही मला श्री. पंडीत यानींच मोकळे मनानें दाखवले.. तेव्हां मला भीति उत्पन्न झाली, कीं, माझा चरित्रात्मक ग्रंथ १५ मार्चला आतां कसा प्रसिद्ध होणार? त्या दृष्टीनें जन्मतिथी–निश्चय करणें, व चरित्रांचा ग्रंथ लिहावयास घेणें निकडीचें वाटू लागलें... आणि एप्रिल–मे अखेर तिथीच बरोबर अहे; १५ मार्च ही तारीख चुकली असावी असे सूर कानी पडू लागले. आणि त्याच सुमारास जूनमध्यें मी सीतारामपंत यांचे चरित्रलेखनास सुरुवात केली.... पुढें तिथि निश्चयाच्या धडपडींत हळुहळू पत्रिका व तिथीच बरोबर आहे; १५ मार्च ही तारीख चुकीची आहे अशी उपलब्ध

होत असलेल्या माहितीवरून खात्री वाटूं लागली, आणि लेखनाचें काम ही प्रगत होवूं लागलें. विजयादशमी १९६५ या दिवसापर्यंत मोरोपंतांचें चरित्र (अर्धवट राहिलेलेंच, अंदाजे ४५-५० पृष्ठें, सीतारामपंत यांचें चरित्र अर्धवट राहिलेलेंच, अंदाजे ५०-६० पृष्ठें) व चिंतोपंत चरित्र (पूर्ण; अंदाजें २० पृष्ठें )असा निम्मा ग्रंथ तयार झाला होता. उरलेला कांहीं भाग, म्हणजे केशवसुतांचे स्वतःचें चरित्र, प्रवास करून म्हणजे उज्ययिनी, व फैजपूर भडगांव ही शहरें, आणि धारवाड हुबळी व रत्नागिरी जिल्ह्यांतील मालगुंड, कोळंबें, रत्नागिरी,खेड, वळणें आदि गावें पाहून, मग लिहावयास घ्यावें असा विचार मनांत पक्का झाला. मोठ्या ग्रंथाची नांदी म्हणून "केशवसुतांची भावंडें व त्यांचा परिवार" ही पुस्तिका ७ नोव्हेंबर १९६५ रोजीं छापून प्रसिद्ध केली, त्यांच्याच ६० व्या पुण्यतिथीच्या निमित्तानें, आणि १९६६ मध्यें ७ ऑक्टोबर रोजीं मोठा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची मराठी वाचकांस जाहीर ग्वाही देखील त्या पुस्तिकेच्या प्रस्तावनेंत देऊन बसलों!

**चरित्रांचीं साधनें जमवण्याचा यत्न, प्रवास–**

प्रवासास सुरुवात केली. उज्जयिनी गाळलें आणि भडगांव फैजपूर करून परत पुण्यास आल्यावर चांगलाच आजारी पडलों! जानेवारी महिना पूर्ण, आजारांत गेला. फेब्रुवारी ताकद मिळवण्यांत गेला! याच दोन महिन्यांत, थोडा काळ आधींपासूनच म्हणजे १५ डिसेंबरचे सुरुवाती पासूनच जन्मतिथीचे वादामध्यें भाग घेणें, तिथी निश्चित करण्याच प्रयत्न करणें हे उद्योग चालविले होते. अखेर मार्चच्या ४ तारखेच्या केसरींत महाराष्ट्र सरकारचा या बाबतींतला निर्णय वाचला, आनंद झाला. त्याचदिवशीं "आम्ही कोण" या All India Radio पुणे स्टेशन वरून दि. १४ मार्चच्या रात्रीं ९॥ ते १० पर्यंत प्रसारित करण्यांत आलेल्या कार्यक्रमांतील माझा भाग म्हणून १४ मिनिटांचीं प्रश्नोत्तरें Tape-record करून घेण्यांत आली होतीं! त्यांतील अंदाजें ३ मिनिटांचा भाग प्रत्यक्ष कार्यक्रमांत ऐकावयास मिळाला.–आणि आतां चरित्रें लिहिण्याचा कार्यक्रम, पुढील प्रवासाचा कार्यक्रम वगैरे गोष्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
बि: .................. सहा –
अनुक्रम ..................
क्रमांक .................. नों० दि० ..................

काय, सीतारामपंत काय, किंवा कृष्णाजीपंत काय, सर्व सरस्वतीचे लाडके पुत्र होते. दामले घराणें या त्रिवर्ग बंधूंनीं अजरामर केलें. –" अशा प्रकारें नांव सांपडलें जानेवारी फेब्रुवारी १९६५ त; पण लेखन खोळंबून राहिलेंच! त्याचे आधीं मोरोपंतांविषयीं अंदाजें ३०-४० पृष्ठें फारतर, छापील एवढाच मजकूर लिहून तयार होता. आणि त्याच काळांत मी प्रवासांत असतांना वैजापूर (औरंगाबाद जवळ) मला दैनिक "मराठा" चा १५ मार्च १९६५ चा अंक वाचावयास २० चे सुमारास मिळाला! त्यांत केशवसुतांवर एक सुरेख अग्रलेख होता, व १५ मार्च ही त्यांची जन्मतिथी असून १५ मार्च १९६६ रोजीं त्यांचा त्यांचे योग्यतेस साजेल असा जन्मशताब्द उत्सव साजरा व्हावा अशी इच्छा जोरदारपणानें मांडलेली होती... हा एक मला धक्काच बसला. कारण माझा समज, त्यांचा जन्म दिवस पुढें कुठेंतरी पावसाळ्यांत आहे असा होता! सुदैवाने त्यावेळीं मी माझे चुलत पुतण्ये श्री. रघुनाथ परशुराम दामले सिव्हिल जज्ज वैजापूर यांचे घरींच होतों. त्यानीं व मी केशवसुतांचा काव्यसंग्रह व त्यांत दिलेली जन्म– तिथी पाहिली, ती रविवार भाद्रपद वद्य १४ शके १७८८ ही आढळली. तेव्हां आश्चर्य वाटलें, या १५ मार्चच्या जन्मतारखेच्या नव्या शोधाबद्दल! पुढें नागपुरास गेलों; आणि एप्रिलांत प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांची ओळख झाली; त्यांचा ग्रंथ भेट म्हणून त्यांचेकडूनच मिळाला. आणि १५ मार्च या जन्मतारखेचें कोडें उलगडलें! ती तारीख त्यांचे संशोधनाचें फळ होतें असें माझ्या दृष्टोत्पत्तिस आलें. त्याबद्दलचे पुरावेही मला श्री. पंडीत यानींच मोकळे मनानें दाखवले.. तेव्हां मला भीति उत्पन्न झाली, कीं, माझा चरित्रात्मक ग्रंथ १५ मार्चला आतां कसा प्रसिद्ध होणार? त्या दृष्टीनें जन्मतिथी-निश्चय करणें, व चरित्रांचा ग्रंथ लिहावयास घेणें निकडीचें वाटू लागलें... आणि एप्रिल–मे अखेर तिथीच बरोबर अहा; १५ मार्च ही तारीख चुकली असावी असे सूर कानी पडू लागले. आणि त्याच सुमारास जूनमध्यें मी सीतारामपंत यांचे चरित्रलेखनास सुरुवात केली.... पुढें तिथि निश्चयाच्या धडपडींत हळुहळू पत्रिका व तिथीच बरोबर आहे; १५ मार्च ही तारीख चुकीची आहे अशी उपलब्ध

होत असलेल्या माहितीवरून खात्री वाटूं लागली, आणि लेखनाचें काम ही प्रगत होवूं लागलें. विजयादशमी १९६५ या दिवसापर्यंत मोरोपंतांचें चरित्र (अर्धवट राहिलेलेंच, अंदाजे ४५-५० पृष्ठें, सीतारामपंत यांचें चरित्र अर्धवट राहिलेलेंच, अंदाजे ५०-६० पृष्ठें) व चिंतोपंत चरित्र (पूर्ण; अंदाजें २० पृष्ठें )असा निम्मा ग्रंथ तयार झाला होता. उरलेला कांहीं भाग, म्हणजे केशवसुतांचे स्वतःचें चरित्र, प्रवास करून म्हणजे उज्ययिनी, व फैजपूर भडगांव ही शहरें, आणि धारवाड हुबळी व रत्नागिरी जिल्ह्यांतील मालगुंड, कोळंबें, रत्नागिरी,खेड, वळणें आदि गावें पाहून, मग लिहावयास घ्यावें असा विचार मनांत पक्का झाला. मोठ्या ग्रंथाची नांदी म्हणून "केशवसुतांची भावंडें व त्यांचा परिवार" ही पुस्तिका ७ नोव्हेंबर १९६५ रोजीं छापून प्रसिद्ध केली, त्यांच्याच ६० व्या पुण्यतिथीच्या निमित्तानें, आणि १९६६ मध्यें ७ ऑक्टोबर रोजीं मोठा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची मराठी वाचकांस जाहीर ग्वाही देखील त्या पुस्तिकेच्या प्रस्तावनेंत देऊन बसलों!

**चरित्रांचीं साधनें जमवण्याचा यत्न, प्रवास–**

प्रवासास सुरुवात केली. उज्जयिनी गाळलें आणि भडगांव फैजपूर करून परत पुण्यास आल्यावर चांगलाच आजारी पडलों! जानेवारी महिना पूर्ण, आजारांत गेला. फेब्रुवारी ताकद मिळवण्यांत गेला! याच दोन महिन्यांत, थोडा काळ आधींपासूनच म्हणजे १५ डिसेंबरचे सुरुवाती पासूनच जन्मतिथीचे वादामध्यें भाग घेणें, तिथी निश्चित करण्याच प्रयत्न करणें हे उद्योग चालविले होते. अखेर मार्चच्या ४ तारखेच्या केसरींत महाराष्ट्र सरकारचा या बाबतींतला निर्णय वाचला, आनंद झाला. त्याचदिवशीं "आम्ही कोण" या All India Radio पुणे स्टेशन वरून दि. १४ मार्चच्या रात्रीं ९॥ ते १० पर्यंत प्रसारित करण्यांत आलेल्या कार्यक्रमांतील माझा भाग म्हणून १४ मिनिटांचीं प्रश्नोत्तरें Tape-record करून घेण्यांत आली होतीं! त्यांतील अंदाजें ३ मिनिटांचा भाग प्रत्यक्ष कार्यक्रमांत ऐकावयास मिळाला.–आणि आतां चरित्रें लिहिण्याचा कार्यक्रम, पुढील प्रवासाचा कार्यक्रम वगैरे गोष्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
दि: ..................
अनुक्रम ..................
क्रमांक .................. नों दि ..................

आकार घेऊं लागल्या. आणि उशीरांत उशीरां मे अखेर ग्रंथ लिहून पूरा करावयाचा, व छपाई जून ते सप्टेंबर पर्यंत आणि सोलापूरांत स्वखर्चानें करावयाची असे निर्णय मनांत पक्के झाले !

चरित्रग्रंथ लिहावयास साधनें काय? जवळ जवळ नाहींत हें त्याचें उत्तर. पांच भावांपैकीं २ भाऊ जन्मांत कधींही न पाहिलेले. प्रत्यक्ष वडील १० वर्षांचा असतांना निवर्तलेले, एकटे सीतारामपंत यांचा निकटचा सहवास; तोही त्यांचे उत्तरआयुष्यांतला ते ३६ ते ५० वर्षांचे असतानांचा किंवा १९१३ ते १९२७ या काळांतला. चिंतोपंत यांचें एकूण महत्व फार कमी; पण त्यांस मात्र १९११-१९१२ पासून त्यांचे मृत्युपर्यंत (१९३०) अधूनमधून पाहिलेलें; १।२ वेळां त्यांचे जवळ महिना दीड महिना राहण्याचाही योग आलेला. श्रीधरपंत तर मोरोपंतांच्याच लहानपणीं निवर्तले! केशवसुत–किंवा कृष्णाजीपंत यांस पाहण्याचा योग न आलेला; आणि आला असता तरी २ वर्ष व ७ महिने वयाच्या मुलाला समज तरी काय असणार ! (माझा जन्म ३० मार्च १९०३ चा तर कृष्णाजीपंताचा मृत्यु ७ नोव्हेंबर १९०५ चा.) ··· पण सीतारामपंत जरा बोलक्या स्वभावाचे होते. जेंवतांना व अन्यवेळींही बऱ्याच गप्पा–गोष्टी ते मोकळेपणानें करीत असत. त्यामुळें ज्या गोष्टी स्मरणांत राहिल्या त्याच काय त्या आधार. नाहींतर इतर लेखक व मी यांत फारसा फरक उरला नसता. पण आज जो फरक आहे तोही बराच मोलाचा व मोठा आहे. याचें उदाहरण देतों म्हणजे माझें म्हणणें स्पष्ट होईल–

"तुतारी" या काव्याच्या तळाशीं २८ मार्च १८९३ ही तारीख आहे, तर "झपूर्झा" चे खालीं २ जुलै १८९३ आहे, या तीन महिन्यांत केशवसुतांच्या जीवनांत महदंतर निर्माण झालें. "तुतारी" चे वेळी त्यांचे-पाठीशीं त्यांचे वडील (रागीट का होईना) हयात होते, त्यांचा त्यांस आधार होता, म्हणून ही जोरदार रचना होवूं शकली. पण तोच आधार या दरम्यानच्या काळांत गेला होता ! त्यांस बायकोस घेऊन मुंबईस

बिऱ्हाड करणें, आणि स्व. कुटुंबाचा भार उचलणें भाग पडलें होतें.··· असा एकदम मोठा फरक पडला होता. त्यामुळें तें काव्य निराळें झालें. या पुढच्याच काव्यांत "थकलेल्या भटकणाऱ्याचें गाणें" यांत काव्य देवी मला भेटेंल का? असा आर्त प्रश्न कवि विचारतात. पण १८९० मध्यें मॅट्रिक पास झाल्यावरच्या आणि सर्वांत धाकटचा बहिणीचा विवाह खेड येथें झाल्यानंतर "दिव्य ठिणगी" या काव्यांत जग, जन जरी त्यांचे काव्याचे वेडाबद्दल त्यांचा धिक्कार करीत असले तरी त्यानीं स्वत:आकाशांतून "दिव्य ठिणगी" यानांत बसून जावून झेललेली होती, हृदयांत स्थापन केली होती, व तिचे करितां स्वत:चा बळिसुद्धां देत होते, व "ज्याला मी मुकलों, विषाद मजला त्याचा मुळींही नसे" असा आनंददायक, आशादायक, वीरपुरुषास शोभतील असे उद्गार काढतात!

असा त्यांचे काव्यांचा अन्वयार्थ लावून त्यांचे चरित्र उलगडून घ्यावें लागतें, किंवा उलट चरित्राचे आधारानें काव्य समजून घ्यावें लागतें. त्या महान् कोडयाचा, व्यूहाचा भेद करावा लागतो. उपमाच द्यावयाची झाली तर केशवसुत चरित्र म्हणजे द्रोणाचार्यांनीं रचलेला "चक्रव्यह" होय, व तों भेदण्याचें मर्म सुभद्रेच्या पोटांत असलेल्या अभिमन्यूस भगवान् श्रीकृष्णांकडून कळलें होतें, तसें मला थोडें त्यांचा पुतण्या म्हणून कळलेलें आहे; म्हणून मी तो प्रयत्न करूं धजतों! होय धजतोंच; यशाची कांहींच खात्री नाहीं.

**आदर्श ग्रंथ–**

आतां ग्रंथ लिहितांना माझेसमोर आदर्श म्हणून कांहीं होतें काय त्याची थोडी माहिती देतो. आदर्श म्हणून कांहीं ग्रंथ नजरेसमोर पण मनांतच होते. ते म्हणजे पूर्वोक्त लक्ष्मीबाई टिळकांचा "स्मृतिचित्रें" व प्रा. जोशी यांचा "वडीलांचे सेवेशी" हे दोन ग्रंथ होत. शिवाय प्रि गं. नी. गोखले यांचा "माझे जीवनाचा चित्रपट" हा ग्रंथ ही होता मनासमोर. यापेक्षां जास्त कांहीं ग्रंथ डोळयासमोर किंवा मनांतही नव्हते. माझें

आकार घेऊं लागल्या. आणि उशीरांत उशीरां मे अखेर ग्रंथ लिहून पूरा करावयाचा, व छपाई जून ते सप्टेंबर पर्यंत आणि सोलापूरांत स्वखर्चानें करावयाची असे निर्णय मनांत पक्के झाले !

चरित्रग्रंथ लिहावयास साधनें काय? जवळ जवळ नाहींत हें त्याचें उत्तर. पांच भावांपैकीं २ भाऊ जन्मांत कधींही न पाहिलेले. प्रत्यक्ष वडील १० वर्षांचा असतांना निवर्तलेले, एकटे सीतारामपंत यांचा निकटचा सहवास; तोही त्यांचे उत्तरआयुष्यांतला ते ३६ ते ५० वर्षांचे असतानांचा किंवा १९१३ ते १९२७ या काळांतला. चिंतोपंत यांचें एकूण महत्व फार कमी; पण त्यांस मात्र १९११-१९१२ पासून त्यांचे मृत्युपर्यंत (१९३०)अधूनमधून पाहिलेलें; १।२ वेळां त्यांचे जवळ महिना दीड महिना राहण्याचाही योग आलेला. श्रीधरपंत तर मोरोपंतांच्याच लहानपणीं निवर्तले! केशवसुत–किंवा कृष्णाजीपंत यांस पाहण्याचा योग न आलेला; आणि आला असता तरी २ वर्ष व ७ महिने वयाच्या मुलाला समज तरी काय असणार ! (माझा जन्म ३० मार्च १९०३ चा तर कृष्णाजीपंताचा मृत्यु ७ नोव्हेंबर १९०५ चा.)··· पण सीतारामपंत जरा बोलक्या स्वभावाचे होते. जेंवतांना व अन्यवेळींही बऱ्याच गप्पा–गोष्टी ते मोकळेपणानें करीत असत. त्यामुळें ज्या गोष्टी स्मरणांत राहिल्या त्याच काय त्या आधार. नाहींतर इतर लेखक व मी यांत फारसा फरक उरला नसता. पण आज जो फरक आहे तोही बराच मोलाचा व मोठा आहे. याचें उदाहरण देतों म्हणजे माझें म्हणणें स्पष्ट होईल–

"तुतारी" या काव्याच्या तळाशीं २८ मार्च १८९३ ही तारीख आहे, तर "झपूर्झा" चे खालीं २ जुलै १८९३ आहे, या तीन महिन्यांत केशवसुतांच्या जीवनांत महदंतर निर्माण झालें. "तुतारी" चे वेळी त्यांचे-पाठीशीं त्यांचे वडील (रागीट का होईना) हयात होते, त्यांचा त्यांस आधार होता, म्हणून ही जोरदार रचना होवूं शकली. पण तोच आधार या दरम्यानच्या काळांत गेला होता ! त्यांस बायकोस घेऊन मुंबईस

बिऱ्हाड करणें, आणि स्व. कुटुंबाचा भार उचलणें भाग पडलें होतें.… असा एकदम मोठा फरक पडला होता. त्यामुळें तें काव्य निराळें झालें. या पुढच्याच काव्यांत "थकलेल्या भटकणाऱ्याचें गाणें" यांत काव्य देवी मला भेटेल का? असा आर्त प्रश्न कवि विचारतात. पण १८९० मध्यें मॅट्रिक पास झाल्यावरच्या आणि सर्वांत धाकटचा बहिणीचा विवाह खेड येथें झाल्यानंतर "दिव्य ठिणगी" या काव्यांत जग, जन जरी त्यांचे काव्याचे वेडाबद्दल त्यांचा धिक्कार करीत असले तरी त्यानीं स्वत: आकाशांतून "दिव्य ठिणगी" यानांत बसून जावून झेललेली होती, हृदयांत स्थापन केली होती, व तिचे करितां स्वत:चा बळिसुद्धां देत होते, व "ज्याला मी मुकलों, विषाद मजला त्याचा मुळींही नसे" असा आनंददायक, आशादायक, वीरपुरुषास शोभतील असे उद्गार काढतात!

असा त्यांचे काव्यांचा अन्वयार्थ लावून त्यांचे चरित्र उलगडून घ्यावें लागतें, किंवा उलट चरित्राचे आधारानें काव्य समजून घ्यावें लागतें. त्या महान् कोडयाचा, व्यूहाचा भेद करावा लागतो. उपमाच द्यावयाची झाली तर केशवसुत चरित्र म्हणजे द्रोणाचार्यांनीं रचलेला "चक्रव्यह" होय, व तो भेदण्याचें मर्म सुभद्रेच्या पोटांत असलेल्या अभिमन्यूस भगवान् श्रीकृष्णांकडून कळलें होतें, तसें मला थोडें त्यांचा पुतण्या म्हणून कळलेलें आहे; म्हणून मी तो प्रयत्न करूं धजतों! होय धजतोंच; यशाची कांहींच खात्री नाहीं.

**आदर्श ग्रंथ–**

आतां ग्रंथ लिहितांना माझेसमोर आदर्श म्हणून कांहीं होतें काय त्याची थोडी माहिती देतो. आदर्श म्हणून कांहीं ग्रंथ नजरेसमोर पण मनांतच होते. ते म्हणजे पूर्वोक्त लक्ष्मीबाई टिळकांचा "स्मृतिचित्रें" व प्रा. जोशी यांचा "वडीलांचे सेवेशी" हे दोन ग्रंथ होत. शिवाय प्रि ग. नी. गोखले यांचा "माझे जीवनाचा चित्रपट" हा ग्रंथ ही होता मनासमोर. यापेक्षां जास्त कांहीं ग्रंथ डोळयासमोर किंवा मनांतही नव्हते. माझें

स्वतःचेंच जुने हस्तलिखित " केशवपुत्रांच्या सहवासांत " हें ही मी कधीं उघडून पाहिलें नाहीं. पुष्कळ उशीरानें " यांत्रिकाची यात्रा " हा शं. वा. कि. यांचा ग्रंथ वाचण्यांत आला. श्री. गं. दे. खानोलकर यांचा " वालचंद हिराचंद " व " रविंद्रनाथ ठाकूर " ग्रंथ वाचण्यांत आले. पण प्रत्यक्ष कोणत्याच एका ग्रंथाची लेखनपद्धति मी अवलंबिलेली नाहीं. किंबहुना चिंतोपंत व श्रीधर केशव यांचीं लघु-चरित्रें सोडल्यास उरलेल्या त्रिवर्गबंधूंचीं चरित्रे तीन निराळ्याच तऱ्हांनीं लिहिलेलीं आढळतील! मी कोणतीच एक तऱ्हा किंवा Style उचलली नाहीं; उचलूं शकलों नाहीं. माझ्याच स्वतंत्र Styles झाल्या आहे या लेखनांत!

**प्रकाशना संबंधीची धडपड व तळमळ–**

माझी छोटी पुस्तिका अनेक वाग्भटांकडे भेट म्हणून पाठविली. त्याचप्रमाणें प्रवासांतही अनेक ओळखी झाल्या त्यांस पुस्तिका भेट दिली. सर्वत्र नव्या ग्रंथाबद्दल उत्सुकता आढळली. कांहीं लोकांनीं उदा. प्राध्यापक श्रीनिवासराव बनहट्टी, यांचे सारख्यानीं माझ्या कामाच्या कठीणपणाची (प्रा. अ. म. जोशी यांची स्थिति माझ्यापेक्षां पुष्कळच चांगली होती, आहे. त्यानीं त्यांचे सर्व चरित्रनायक जाणतेपणीं पाहिलेले होते) जाणीव करून दिली. मलाही ती होतीच. त्याचप्रमाणें पुस्तक प्रकाशन करण्याची प्रसिद्ध करण्याची भीति मनापुढें उभी राहूं लागली. विजयादशमी १९६५ पासून मी निरनिराळ्या प्रख्यात दहा प्रकाशकांकडे पत्रें लिहून, ग्रंथाची कल्पना देऊन, प्रकाशक मिळवण्याची धडपड करीत राहिलों. १९६६ च्या मार्च-एप्रिलपर्यंत कोणीही प्रकाशक मिळत नाहीं असें दिसूं लागलें! ...तरी ही अंधुक आशा दिसत होती. ग्रंथ तयार होत असतांना आमचे सोलापूरचे ज्येष्ठ साहित्यिक कवि कुंजविहारी अधून मधून घरीं येत, नवा लिहून झालेला भाग ऐकत प्रोत्साहन देत. त्यांचा मी आभारी आहे. ७ नोव्हेंबर रोजीं छोटया पुस्तिकेच्या प्रकाशनाचेवेळीं सोलापूर येथील साहित्यिकांस त्यावेळीं तयार असलेल्या भागांपैकीं तीनही बंधूंच्या चरित्रांतली तीन प्रकरणें वाचून दाखवलीं, ती सर्वांस आवडलीं; आणि ग्रंथाबद्दल औत्सुक्य निश्चितपणानें वाटतें अशी भाषा ऐकली ... हीच

ती आशा, व हाच तो अगाध अंधकारांत दुरून दिसणारा प्रकाश किरण. आणि यांत एका गोष्टीचा अवश्य व आवर्जून उल्लेख करण्यासारखा प्रसंग घडला तो पुढें देतों–

नागपुरास नोव्हेंबर अखेर, डिसेंबर सुरुवात (१९६५) घडलेला हा प्रसंग आहे. श्री स. ना. कुलकर्णी, एम्.ए., एल्.टी. सेवानिवृत्त मुख्याध्यापक, व एक शिक्षणक्षेत्रांत थोर कामगिरी केलेले व सध्यांही करीत असलेले, मोरो केशव यांचे शिष्य. यांची भेट झाली (श्री. कुलकर्णी व त्यांचे मित्र कै. भावे यानीं मिळून शैक्षणिक व्याकरण ग्रंथ, व अन्य ग्रंथ जोडीनें लिहिलेले, प्रसिद्ध केलेले आहेत.) त्यानी स्वतः व आपल्या मित्रांच्या वतीनें माझा ग्रंथ छापण्यास सुरुवात झाल्याबरोबर मी त्यांस कळवावें म्हणजे ते नुसती शाब्दिकच नव्हे तर आर्थिक मदत, सहानुभूति चेकचे रूपानें द्यावयास सिद्ध झाले. पुढें श्री. भावे यांचे चिरंजीवांशी मुंबईस सेक्रेटारियटमध्यें पत्रव्यवहार केल्यावर तेही आपल्या वडिलांचे गुरु ऋण अल्पांशानें फेडण्यास तयार दिसले*! ही खरी हिंदुसंस्कृति; जी अलीकडे नाहींशी होत चालली आहे, व तिच्याबद्दल वाईट वाटतें. या आश्वासनामुळें माझ्या मनांतील माझ्या मागच्या पिढींतील या थोर लोकांबद्दलची माझी कर्तव्यभावना बळकट झाली. जर दोन शिष्य, आपण होवून आर्थिक झीज सोसण्यास तयार होतात, तर मींच माघार काय म्हणून घ्यावयाची ? या विचारानें या आर्थिक तंगीच्या काळांतही रुपये चार हजारांची, जास्तच, रक्कम, ग्रंथ प्रकाशनांत गुंतवावयाचा धाडशी विचार पक्का केला; आणि ग्रंथ लेखनाबरोबर रक्कम जमा करणें हेंही कार्य सुरू केलें! (आणि याच काळांत एकमोठ्या झालेल्या मुलीचा विवाह करावयाचा आहे, तोही खर्च पेलण्याची अवघड कामगिरी शिरावर आहेच.) म्हणून सर्वच प्रकारें अवघड जोखीम स्वीकारलें. आणि तें पार पाडीत आणलें आतां ग्रंथ प्रकाशित होईल.

*तळटीप-कुलकर्णी व श्री. भावे यांचेकडून अजूनपर्यंत चेक, मदत मिळालेली नाहीं. पण सद्भावना आहेच. दि. २५–९–६६

ही सर्व "गुजगोष्ट" विस्तारानें कथन केली आतां आभार व ग्रंथ या बद्दल थोडें लिहून प्रदीर्घ हितगुज संपवीन.

## आभार प्रदर्शन–

प्रथमच कांहीं आभार मानतों. केशवसुत यांची जन्मतिथी निश्चित करण्याचे संबंधांत "मराठा"कार व पुढें "महाराष्ट्र-टाइम्स" कार यानीं माझ्या पत्रांस प्रसिद्धी दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानतों. श्री. साने, श्री. बोरकर आदि जोतिषांनीं पत्रें लिहून माहिती दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानतों. भडगांव व फैजपूर येथें गेलों असतां माहिती पुरवणारे अनेक गृहस्थ त्यांत श्री. कुलकर्णी, श्री. चौधरी (फैजपूर) श्री. पूर्णपात्रे (भडगांव), श्री. चितळे वकील (चाळीसगांव) यांचा मी आभारी आहे. धारवाड हुबळी भागांत माहिती मिळवण्यास गेलों असतां कविवर्य प्रा द. रा. बेंद्रे, आणि श्री. अशोक जठार, (धारवाड), प्रा. पंडीत आवळीकर (धारवाड), डॉ गोरे, डॉ. जोशी, श्री. बिवलकर, श्री. सीताबाई तबीब (हुबळी), श्री. मराठे, प्रा. अनंत मनोहर आणि प्रा. निकुंब व सौ. निर्मला काळे (बेळगांव), यांचा मी आभारी आहे. रत्नागिरी टापूमध्यें सौ. गंगू सुर्वे व प्रि. सुर्वे, श्री.फडके (रत्नागिरी) श्री. श्री. न. साठे,हेडमास्तर परकर हायस्कूल (मालगुंड), श्री. महेश्वरपंत आगाशे व श्री. शंकरराव दामले (कोळंबे) इत्यादि मंडळींचा मी आभारी आहे. अनेकांशी पत्रव्यवहार केला. माहिती मिळाली. ॲडव्होकेट जठार शं. भा., मुंबई, यानीं धारवाडची केशवसुत विषयक माहिती पुरवली म्हणून मी त्यांचा आभारी आहे. त्र्यंबकेश्वरचे घैसास उपाध्याय यांची मदत वंशवृक्षाचे बाबतींत झाली, त्यांचेही आभार मानावयास हवेत. गोव्याचे लेफ्टनंट गव्हर्नर नामदार श्री. का. र. दामले यांचेपाशीं निमित्तानिमित्तानें पत्रव्यवहार झाला. त्यांचें उत्तेजन मिळालें म्हणून मी त्यांचाही आभारी आहे.

श्रीधर केशव यांचे संबंधांत कांहीं माहिती पुरवण्याचे कामी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. पु. शि. रेगे, व त्यांची कचेरी,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. दि: ....................
क्रमांक ...................... नोंद दि: ..............

त्याच कॉलेजचे प्रा. म. वि. धोंड, प्रा. राजाध्यक्ष, व प्रा. सौ. विजयाबाई राजाध्यक्ष यांची मदत झाली. त्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतों.

पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचे प्रमुख श्री. मो. रा. वाळंबे यानीं केशवसुतांसंबंधीं शाळेचा दाखला, प्रत, पुरवली याबद्दल त्यांचा आभारी आहे.

हा ग्रंथ प्रकाशित होण्याचे संबंधांत मुंबई मराठी साहित्य संघाचे सन्मान्य कार्यवाह, आणि केशवसुत जन्मशताब्द उत्सव समितीचे अध्यक्ष मान्यवर श्री. मधुकरराव चौधरी. शिक्षण मंत्रि, महाराष्ट्र राज्य यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

ज्या कोणा व्यक्ती किंवा संस्था यांची मदत होवूनही तो उल्लेख विस्मरणानें मी केला नसेल तर त्या व्यक्तींनीं व संस्थानीं क्षमा करावी अशी मी विनंति करतों.

अनेक स्नेही व ऋणानुबंधी लोकांच्या सदिच्छा कार्याच्या पाठीशीं आहेत, त्या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी असून कृतज्ञ आहे.

सोलापूरच्या म.सा. परिषद शाखेच्या अधिकाऱ्यांचे (विशेषतः श्री शंकरराव पटवर्धन व डॉ.लेले यांचे जवळ असलेल्या एका लहानशा ट्रस्ट मधून ग्रंथ छपाईस मदत देण्याची इच्छा ७ नोव्हेंबर १९६५ रोजीं "केशवसुतांची भावंडें" या पुस्तिकेच्या प्रकाशन समारंभाचे वेळीं त्यांनीं प्रकट केली होती ) मुद्दाम उल्लेख करून त्या स्नेह्यांचे. (पण ही मदत मी घेतली नाहीं.) मी आभार मानतो. ]

ग्रंथ छपाई सुरू असतां प्रि. र. भा. चि ळे यानीं कांहीं सूचना केल्या, मदत केली, त्यांचे आभार मानतों. प्रि. चितळे यांस गुरुवार दि.८-९-६६रोजीं अगदीं एकाएकीं देवाज्ञा झाली त्यांची इच्छा ग्रंथ ऐकण्याची होती; पण ती व तो प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहण्याचीही अतृप्त राहिली! सोलापूरच्या "शारदा मुद्रणालयाचे" तरुण मालक श्री. बाळासाहेब देगांवकर यांनीं ग्रंथ सुबक आणि वेळेवर छापून देण्याचें कबूल करून

आजपर्यंत वाचलेलेंही नाही त्यापेक्षां खात्रीनेंच कांही वेगळें व चांगलें या ग्रंथांत आढळेल असा मात्र मला विश्वास वाटतो.

ग्रंथाची छपाई, बात्ह्यांग शक्य तितकें चांगलें केलें आहे. चांगली धंदेवाईक प्रकाशन संस्था लाभली असती तर ग्रंथ जास्त सुंदर, जास्त निर्दोष निघूं शकला असता. कांहीं फोटोही द्यावयाची कल्पना मनांत होती. पण तो तशीच राहिली आहे. केशवसुतांचें एक दुर्मिळ कल्पना-चित्रच मात्र देण्याचा प्रयत्न करीत आहे. ब्लॉक वेळेवर यावा, अशी आशा आहे. आणि तो आल्यास तें चित्र या ग्रंथांत सर्व प्रतींत वाचकांस दिसेल. या ग्रंथास चांगला आश्रय मिळाला तरच माझ्या पुढच्या उड्या; व तो मिळावा अशी महाराष्ट्रीय वाचकरूपी परमेश्वराची व माझे वडील मोरोपंत यांचें आराध्यदैवत श्री दत्तात्रेय यांची प्रार्थना करून ही दीर्घ प्रस्ताविक गुजगोष्ट आवरतों.

सोलापूर; अनंत चतुर्दशी,
दि. २८, सप्टेंबर १९६६

द. मो. दामले

ग्रंथ संग्रहालय: ठाणे. स्थळप्रत.

# दामले घराण्याची "वंशवेल" किंवा "वंशावळ" म्हणजेच वंशवृक्ष

(टीप:– "वंशवेल" व "वंशावळ" हे शद्ब कै. ती. सीतारामपंत यानीं डायरी (१९२६ ची) मध्यें वापरले असून, त्या डायरीवरून ही वेल किंवा वृक्ष दिला आहे. त्यांत अर्थात् अलीकडवी भर आहे. शिवाय नेहमींच्या पद्धतिपेक्षां या वेलीत निराळा प्रकार दिसेल. ती खालून वर आली आहे आज हयात व्यक्ति आहेत त्यांचीं नांवें अधोरेखित आढळतील )




मूळ पुरुष (माहीत असलेला) इ. स. १७५० च्या सुमारास
हा खात्रीनें जिवंत असावा.

…ाठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................



साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे !
नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा आंधळे !
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणे,
कोठें स्वर्गसमक्षता प्रगटते हें सर्वदा पाहणें.

कृ० के० दाम

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२२२

# “‘कोणीही पुसणार नाहिं ‘कवि तो होता कसा आननीं ?’ । ”

१८८६ सालीं ‘ दुर्मुखलेला ’ या काव्यांत केशवसुतांनीं ही शेवटची ओळ जरी लिहिलेली आहे, आणि जरी एका प्रकारें शरीरानें, चेहऱ्यानें, पुढच्या पिढयांस, जनतेस, ते अज्ञातच रहावे अशी त्यांची स्वतःची इच्छा असली तरीही त्यांच्या मृत्युनंतर लौकरच म्हणजे १०–१५ वर्षांचे आंतच त्यांचें चित्र, फोटो, मिळावा, तो प्रसिद्ध व्हावा अशी इच्छा महाराष्ट्रीय रसिक जनतेस होऊं लागली; तेव्हां या रसिकांच्या इच्छेच्या इतिहासापासूनच केशवसुत चरित्रास सुरुवात करतों.

माझा जन्म १९०३मधील,तर केशवसुतांचा मृत्यु १९०५ चा. मी जन्मापासून १९०८पर्यंत होतो उज्जयिनींत; तर,कृष्णाजीपंत- केशवसुत होते फैजपूर, धारवाड येथें! माझ्या जन्माचे आधीं थोडेच महिने, नोव्हेंबर १९०२ मध्यें ते माझ्या आजीचे मृत्युनंतर उज्जयिनीस आले होते. त्यावेळीं त्यांचा फोटो निघण्याचा संभव होता. घरांत फोटोग्राफर घरचाच, माझा मामा (आजचे प्रख्यात कादंबरीकार व लेखक श्री. गो. नी. दांडेकर यांचे वडील नीलकंठराव) होता; फोटोग्राफीचें सर्व साहित्यही घरीं होतें. पण त्यांनीं आपला फोटो काढू दिला नाही!

केशवसुतांच्या हुबळी येथे झालेल्या निधनानंतर आणि त्यांची पत्नी रखुमाबाई यांचेही निधन त्यांचे पाठोपाठच झाल्यावर(त्यांचे १०वे दिवशींच झाल्यामुळें )त्यांचे सामानाची आवरासावर त्यांचे मेहुणे श्री. चितळे, त्यांचे चुलत चुलते कै. हरीकाका दामले, आणि बहुधा त्यांचे वडील बंधु व माझे चुलते कै. चिंतोपंत यांनी मिळून केली. मृत्यूनंतर त्यांचें संसाराचें सामान कुठेकुठे गेलें.. त्यांच्या काव्यांच्या एकूण तीन वह्या नागपुरास माझे वडील कै. मोरो केशव, व्याकरणकार यांचेकडे गेल्या. आणि अलीकडे सुमारें १९५५ पासून त्या निराळ्या स्वरूपांत



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
दि: ..................

मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांत आहेत. १९१४ चे सुमारास सुरुवातीस कै. हरीभाऊ आपटे यांनी केशवसुतांची समग्र कविता छापण्याची जाहीरात 'करमणुकीं'त दिली... आणि तेव्हापासूनच त्यांचा फोटो मिळवण्याची धडपड सुरू झाली...

त्यांच्या फोटोबद्दल खालीं देत असलेली माहिती मी १९२० – २१ सालीं प्रत्यक्ष ऐकलेली आहे, एक चित्र प्रत्यक्ष पाहिलें आहे. या चित्राचे संबंधांत आज जास्त माहिती कवि अज्ञातवासी किंवा दि. गं. केळकर पुणे हे देवूं शकतील. श्री. केळकरांचे सांगण्याप्रमाणे व माझ्या आठवणीप्रमाणें भडगाव या खानदेशांतल्या केशवसुतांच्या राहत्या घराची मालकी त्यांचे घराण्याची होती. त्यामुळें श्री. केळकर यांस केशवसुतांविषयीं विशेष प्रेम वाटे. त्यांनी त्यांचा फोटो मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला; ते धारवाडास गेले होते. भडगांव, फैजपुरासही त्यानीं शोध घेतला होता तो अयशस्वी झाला. धारवाडांतील शाळेंत एका समूहाच्या फोटोंत (ग्रूप Group) ते बसलेले असे होते. त्यांतील केशवसुत, अलग काढून तो फोटो मुंबईच्या मासिक मनोरंजनांत छापावा म्हणून तो ग्रप फोटो त्या कचेरीकडे गेला होता अशी माहिती आहे. १९१७–१८ सालांत केव्हातरी श्री काशिनाथ रघुनाथ मित्र, संपादक, मालक, मासिक मनोरंजन, (आणि केशवसुत यांचे स्नेही) यांनी आपले कचेरीचें बिऱ्हाड हलवलें, कागदपत्र, चीजवस्त हलवली, आणि दुसरीकडे नेली. या बिऱ्हाड बदलण्याचे धांदलीत तो फोटो गहाळ झाला तो गहाळच झाला ! आणि तेव्हांपासून "केशवसुतांचा फोटो" मिळण्याची आशा नष्ट झाली. तो फोटो खरोखरच श्री. काशिनाथपंत मित्र यांस मिळाला होता काय, याबद्दल मला शंका वाटते; कारण श्री. मित्र हे केशवसुतांचे विषयीं प्रेम व आदर बाळगणारे, त्यांचे मित्र, त्यांचे काव्यांचे प्रकाशक होते. आणि ते असली बहुमोल वस्तु इकडे तिकडे निष्काळजीपणानें टाकतील यावर माझा तेवढा विश्वास बसत नाहीं.

कै. काशिनाथपंत मित्र त्यांच्या बंधूंची कन्या अंधेरीच्या एका मुलींच्या हायस्कुलांत अंदाजे ६।७ वर्षापूर्वी मला भेटल्या होत्या. त्या शाळेच्या प्रिन्सिपल, श्रीमती बंटवाल यांच्या ओळखीमुळें मी शाळेत गेलो होतों. एक मराठीचा पाठ, एका वर्गावर घेतला होता; आणि नंतर शाळेंतील कांहीं शिक्षकांबरोबर चहा, ओळख झाली. त्याप्रसंगी कु. मित्र असें कळल्यानंतर मी त्यांचेपाशीं सहज त्यांचा व कै. काशिनाथपंत यांचा संबंध काय, त्यांचे वेळचे कागद, वस्तु, वगैरे मिळण्यासारखे कांहीं आहे काय वगैरे चौकशी केली होती. त्यांनी केशवसुतांच्या "फोटो" विषयीं आशा नसल्याबद्दल सांगितले होतें. मरीन ड्राइव्ह जवळचा त्यांचा पत्ता

मला दिला होता, घरीं बोलावले होतें. त्यावेळीं मीं नोकरींत होतों; आणि जरी ५५ चे सुमाराचा होतों, तरी स्त्रियांचे संबंधांत थोडा बुजराच होतों. म्हणून त्यांचे घरी गेलों नाहीं. तेव्हां केशवसुतांच्या फोटोबद्दल, छायाचित्राबद्दलचा उपलब्ध, ऐकींव व म्हणून विश्वसनीय असा हाच शेवटचा इतिहास आहे. यापेक्षां जास्त प्रकाश या प्रकरणीं पडेल असें मला वाटत नाही.

आतां आठवणींवरून निरनिराळ्या चित्रकारांनीं काढलेलीं त्यांचीं चित्रें यांचा इतिहास पाहूं. असें पहिलें चित्र आतां कोणाच्या पाहण्यांत ही नसेल. त्याची माहिती देखील, कोणास, अभ्यासूंसही नाहीं असें दिसतें. तें चित्र कवि अज्ञातवासी यांनीं धारवाडच्या श्री. मणेरीकर नांवाच्या एका समकालीन चित्रकला शिक्षकांकडून (ज्यानीं केशवसुतांस अनेकवार पाहिलें होतें, व ज्यांचें स्मरण त्यांचे स्वतःचे मतानें ताजें होतें) काढवून घेतलेलें चित्र होय. तें त्यांनीं त्यावेळीं आमचे घरीं कै. सीतारामपंत यांस ओळखण्यास म्हणून आणले होतें. त्यावेळीं तें त्यानीं, त्यांची बहीण श्री. काशीताई, आणि कै. परशुरामपंत – केशवसुतांचे पुतणे– यानीं सर्वांनींच नाकारले होतें. म्हणजे केशवसुतांची आठवण पुरी पुरी आठवण, फोटोप्रमाणें आठवण, तें चित्र देऊं शकत नाहीं, ते फेटा बांधत असत, कधी कधीं तसा फेटा आहे, चेहऱ्यांत थोडें साम्य आहे वगैरे मत पडलें.पण खरा Like-ness तोचतोपणा-नाहीं, असा शेरा त्या चित्रानें जरी मिळवला, तरी अज्ञातवासीनीं उत्साहानें त्याकाळीं नवीनच सुरू झालेल्या "अरविन्द" नांवाच्या मासिकांत ५ व्या अकांत तें चित्र छापलें, "केशवसुतांचें चित्र" म्हणून. त्याकाळीं मुंबईत मनोरंजना-प्रमाणें "नवयुग" आणि "अरविन्द" ही दोन नवीं मासिकें निघत असत, "अरविन्द" अल्पायुषी ठरलें, "नवयुग" चें आयुष्य "अरविन्द" पेक्षा जास्त होतें... ही झाली पहिल्या चित्राची कथा. माझ्या मतानें पुढे निघालेल्या दोन चित्रांपेक्षां असल्यास हेंच चित्र त्यांच्या मूळ चेहऱ्याशीं जास्त जुळतें असेल; कारण तें केशवसुतांच्या मृत्युनंतर १५–१६ वर्षांनीं प्रसिद्ध झालेलें आणि त्याचे आधी १।२ वर्षें आठवणीनें काढलेलें आहे.माणसांच्या आठवणी अस्पष्ट होत जात असतात, कालान्तरानें. उदाहरणार्थ माझी स्वतःचीच गोष्ट घ्याना; मला माझ्या चर्म चक्षूंपुढें माझ्या आईची प्रतिकृति जवळजवळ मुळीच उभी करता येत नाहीं. वडी-लांशी संबध जास्त येई, त्यांची कांहींतरी उभी रहाते. त्यांचेपेक्षां कांहीं जास्त कै. सीतारामपंतांची!

केशवसुतांचें दुसरें चित्र प्रसिद्ध केलें, कै. परशुराम चिंतामण दामले यांनीं. तें काढले गेले १९५४ चे सुमारास, श्री. सुंदरराव भास्कर वैद्य यांचेकडून. म्हणजे केशवसुतांच्या मृत्युनंतर तें सुमारें ५० वर्षांनीं काढलें गेलें. त्यांतील चेहरा

मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांत आहेत. १९१४ चे सुमारास सुरुवातीस कै. हरीभाऊ आपटे यांनी केशवसुतांची समग्र कविता छापण्याची जाहीरात 'करमणुकीं'त दिली... आणि तेव्हापासूनच त्यांचा फोटो मिळवण्याची धडपड सुरूं झाली...

त्यांच्या फोटोबद्दल खालीं देत असलेली माहिती मी १९२० – २१ सालीं प्रत्यक्ष ऐकलेली आहे, एक चित्र प्रत्यक्ष पाहिलें आहे. या चित्राचे संबंधांत आज जास्त माहिती कवि अज्ञातवासी किंवा दि. गं. केळकर पुणे हे देवूं शकतील. श्री. केळकरांचे सांगण्याप्रमाणे व माझ्या आठवणीप्रमाणें भडगाव या खानदेशांतल्या केशवसुतांच्या राहत्या घराची मालकी त्यांचे घराण्याची होती. त्यामुळें श्री. केळकर यांस केशवसुतांविषयीं विशेष प्रेम वाटे. त्यांनी त्यांचा फोटो मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला; ते धारवाडास गेले होते. भडगांव, फैजपुरासही त्यानीं शोध घेतला होता तो अयशस्वी झाला. धारवाडांतील शाळेंत एका समूहाच्या फोटोंत (ग्रूप Group) ते बसलेले असे होते. त्यांतील केशवसुत, अलग काढून तो फोटो मुंबईच्या मासिक मनोरंजनांत छापावा म्हणून तो ग्रप फोटो त्या कचेरीकडे गेला होता अशी माहिती आहे. १९१७–१८ सालांत केव्हातरी श्री काशिनाथ रघुनाथ मित्र, संपादक, मालक, मासिक मनोरंजन, (आणि केशवसुत यांचे स्नेही) यांनी आपले कचेरीचें बिऱ्हाड हलवलें, कागदपत्र, चीजवस्त हलवली, आणि दुसरीकडे नेली. या बिऱ्हाड बदलण्याचे धांदलीत तो फोटो गहाळ झाला तो गहाळच झाला! आणि तेव्हांपासून "केशवसुतांचा **फोटो**" मिळण्याची आशा नष्ट झाली. तो फोटो खरोखरच श्री. काशिनाथपंत मित्र यांस मिळाला होता काय, याबद्दल मला शंका वाटते; कारण श्री. मित्र हे केशवसुतांचे विषयीं प्रेम व आदर बाळगणारे, त्यांचे मित्र, त्यांचे काव्यांचे प्रकाशक होते. आणि ते असली बहुमोल वस्तु इकडे तिकडे निष्काळजीपणानें टाकतील यावर माझा तेवढा विश्वास बसत नाहीं.

कै. काशिनाथपंत मित्र त्यांच्या बंधूंची कन्या अंधेरीच्या एका मुलींच्या हायस्कुलांत अंदाजे ६।७ वर्षापूर्वी मला भेटल्या होत्या. त्या शाळेच्या प्रिन्सिपल, श्रीमती बंटवाल यांच्या ओळखीमुळें मी शाळेत गेलो होतों. एक मराठीचा पाठ, एका वर्गावर घेतला होता; आणि नंतर शाळेंतील कांहीं शिक्षकांबरोबर चहा, ओळख झाली. त्याप्रसंगी कु. मित्र असें कळल्यानंतर मी त्यांचेपाशीं सहज त्यांचा व कै. काशिनाथपंत यांचा संबंध काय, त्यांचे वेळचे कागद, वस्तु, वगैरे मिळण्यासारखे कांहीं आहे काय वगैरे चौकशी केली होती. त्यांनी केशवसुतांच्या "फोटो" विषयीं आशा नसल्याबद्दल सांगितले होतें. मरीन ड्राइव्ह जवळचा त्यांचा पत्ता

मला दिला होता, घरीं बोलावले होतें. त्यावेळीं मीं नोकरींत होतों; आणि जरी ५५ चे सुमाराचा होतों, तरी स्त्रियांचे संबंधांत थोडा बुजराच होतों. म्हणून त्यांचे घरी गेलों नाहीं. तेव्हां केशवसुतांच्या फोटोबद्दल, छायाचित्राबद्दलचा उपलब्ध, ऐकींव व म्हणून विश्वसनीय असा हाच शेवटचा इतिहास आहे. यापेक्षां जास्त प्रकाश या प्रकरणीं पडेल असें मला वाटत नाही.

आतां आठवणींवरून निरनिराळ्या चित्रकारांनीं काढलेलीं त्यांचीं चित्रें यांचा इतिहास पाहूं. असें पहिलें चित्र आतां कोणाच्या पाहण्यांत ही नसेल. त्याची माहिती देखील, कोणास, अभ्यासूंसही नाहीं असें दिसतें. तें चित्र कवि अज्ञातवासी यांनीं धारवाडच्या श्री. मणेरीकर नांवाच्या एका समकालीन चित्रकला शिक्षकांकडून ( ज्यानीं केशवसुतांस अनेकवार पाहिलें होतें, व ज्यांचें स्मरण त्यांचे स्वतःचे मतानें ताजें होतें ) काढवून घेतलेलें चित्र होय. तें त्यांनीं त्यावेळीं आमचे घरीं कै. सीतारामपंत यांस ओळखण्यास म्हणून आणले होतें. त्यावेळीं तें त्यानीं, त्यांची बहीण श्री. काशीताई, आणि कै. परशुरामपंत – केशवसुतांचे पुतणे– यानीं सर्वांनींच नाकारले होतें. म्हणजे केशवसुतांची आठवण पुरी पुरी आठवण, फोटोप्रमाणें आठवण, तें चित्र देऊं शकत नाहीं, ते फेटा बांधत असत, कधी कधीं तसा फेटा आहे, चेहऱ्यांत थोडें साम्य आहे वगैरे मत पडलें.पण खरा Like-ness तोचतोपणा-नाहीं, असा शेरा त्या चित्रानें जरी मिळवला, तरी अज्ञातवासीनीं उत्साहानें त्याकाळीं नवीनच सुरू झालेल्या "अरविन्द" नांवाच्या मासिकांत ५ व्या अकांत तें चित्र छापलें, "केशवसुतांचें चित्र" म्हणून. त्याकाळीं मुंबईत मनोरंजना-प्रमाणें "नवयुग" आणि "अरविन्द" ही दोन नवीं मासिकें निघत असत, "अरविन्द" अल्पायुषी ठरलें, "नवयुग" चें आयुष्य "अरविन्द" पेक्षा जास्त होतें... हो झाली पहिल्या चित्राची कथा. माझ्या मतानें पुढे निघालेल्या दोन चित्रांपेक्षां असल्यास हेंच चित्र त्यांच्या मूळ चेहऱ्याशीं जास्त जुळतें असेल; कारण तें केशवसुतांच्या मृत्युनंतर १५–१६ वर्षांनीं प्रसिद्ध झालेलें आणि त्याचे आधी १।२ वर्षें आठवणीनें काढलेलें आहे.माणसांच्या आठवणी अस्पष्ट होत जात असतात, कालान्तरानें. उदाहरणार्थ माझी स्वतःचीच गोष्ट घ्याना; मला माझ्या चर्म चक्षूंपुढें माझ्या आईची प्रतिकृति जवळजवळ मुळीच उभी करता येत नाहीं. वडी-लांशी संबध जास्त येई, त्यांची कांहींतरी उभी रहाते. त्यांचेपेक्षां कांहीं जास्त कै. सीतारामपंतांची!

केशवसुतांचें दुसरें चित्र प्रसिद्ध केलें,कै.परशुराम चिंतामण दामले यांनीं.तें काढले गेले १९५४ चे सुमारास, श्री. सुंदरराव भास्कर वैद्य यांचेकडून. म्हणजे केशवसुतांच्या मृत्युनंतर तें सुमारें ५० वर्षांनीं काढलें गेलें. त्यांतील चेहेरा

केशवसुतांच्याबद्दल त्यांच्या चेहऱ्याबद्दल, स्मृति-ग्रंथांत ज्या आठवणी आहेत, त्यांचेशी जुळत नाही. त्याचप्रमाणें श्री काशीताई या एकटयाच केशवसुतांच्या बहिणीनें चित्र जुळणारें नाहीं असा त्याबद्दलचा अभिप्राय दिलेला होता, आहे.

त्यांचे तिसरें चित्र " झपूर्झा " नांवाचें " केशवसुतांच्या " निवडक काव्यांचें एक पाठ्यपुस्तक तयार करणाऱ्या प्रो. वि. म. कुलकर्णी व त्यांचे सहकारी दुसरे एक प्राध्यापक यांनीं श्री. केतकर यांचेकडून काढवून घेतलेलें आहे. यांत " फेटा " नसून " पगडी " आहे. " केशवसुत " पगडी वापरीत असत, फेटयाप्रमाणेंच! तेव्हां यापेक्षां या चित्राबद्दल अन्य अभिप्राय पूर्वीच्या चित्रांप्रमाणेंच आहेत. या सर्व चित्रांत श्री. मणेरीकरांचे चित्र जास्त चांगलें असावें.

यामुळें या तीनही उपलब्ध चित्रांचा असा निकाल लागतो, आणि छाया चित्र किंवा फोटो तर उपलब्ध होण्याची आतां सुतराम् आशा नाहीं. अशा परिस्थितिमध्यें आजच्या व पुढील काळच्या केशवसुतांच्या अभिमानी वाचकांची त्यांच्या चेहऱ्यासंबंधींची जिज्ञासा पूर्णपणें अतृप्तच राहणार आहे, आणि केशवसुतांची स्वतःची अज्ञात राहण्याची इच्छा पूर्ण होणार आहे ! पण त्यांच्या अभिमान्यांच्या मनांतील हळहळ मात्र कायमच राहील. आपणा सर्वांची इच्छा आहे पुष्कळ; पण ईश्वरी इच्छा, नियति, आहे निराळाच!

आतां वरील सर्व खरें असले तरी कांहीं कांहीं व्यक्तींनीं जशीं त्यांचीं चित्रें काढून दिलीं, त्याप्रमाणें ते कसे दिसत असत, पोषाख कोणता करीत वगैरे माहिती दिली आहे, ती तरी आपण पाहूं या; आणि त्या माहितीवरून ते कसे दिसत असतील याचें कल्पना चित्र मनापुढें आणण्याचा यत्न करूं या. या प्रकारची माहिती " केशवसुत-स्मृति ग्रंथ " या ग्रंथांत निरनिराळ्या व्यक्ति देतात, तिचें संकलन करुं या :-

१) केशवसुतांचे बंधु कै. सीताराम केशव या संबंधांत कांहींच लिहीत नाहींत.

२) त्यांचे पुतण्ये कै. परशुराम चिंतामण लिहितात:- (पृ. २२४ पहा) "पोशाखाचे बाबतींत ते जुन्याच वळणाचे होते. अंगांत लोकमान्य टिळक घालीत असत तसा अंगरखा, डोक्याला काळी पगडी, व शुभ्र कांठाचें उपरणें- असा त्यांचा नेहमींचा साधा पोशाख असे. केव्हां केव्हां ते पांढरा रुमालही घालीत." पुढें पृ. २२६ वर ते लिहितात:- "ते मध्यम उंचीचे असून वर्णानेंही मध्यम असत. डोळे

मात्र पाणीदार व तेजस्वी असून दृष्टि अंतर्मुख असे. ते दिसण्यांत साधारणपणें त्यांचे बंधु चिंतोपंत यांजसारखे होते. चिंतोपंतांचा फोटो याच पुस्तकांत आहे, त्यावरून केशवसुतांसंबंधानें थोडीफार कल्पना येऊं शकेल."

३) कै. वा. वा. गद्रे लिहितातः– (पृ. २३२) "१९०१ मध्यें त्यांचे वय ३५ होतें. त्यांची उंची पांच फुटावर होती. चेहेरा वाटोळा, सी. के. दामले यांचे सारखा. वर्ण गोरा, कपाळ मोठें, चेहेऱ्यावर तेज, नेत्रांत हृदयभेदक दृष्टीची धार होती. चेहऱ्यांत हृदय आकर्षण करुन घेण्याची शक्ति होती, हें वर्णन सत्य आहे. त्यांचा पोशाख फैजपुरांत हेडमास्तर असतां काळी निळी पगडी, लांब कोट, धोतर, उपरणे, पायांत पुणेरी जोडा, प्रवासांत पांढरा फेटा, काचा व वाहणा, वापरीत"

४) श्री द. वें. केतकर, विजापूर लिहितात– (पृ. २३९) "ते फार मितभाषी, कामापुरतेंच बोलत असत. सदैव गंभीर चर्या, प्रसन्न मुद्रा आम्हांला कधींच दिसली नाहीं. दांत आवळून भाषण, आवाज खालचा, सारा व्यवहार अगतिक वृत्तीचा. टप्पोरे डोळे. श्री. दामले यांचा पोशाख मात्र अगदींच साधा, त्यांचे दोन पारशीवजा कोट होते. कापड निळसर, व पांढऱ्या रेघांच्या चौकटी, दोन पैरणी, तांबडी पगडी, धारवाडच्या मातीमुळें तांबूस धोतरें, व अगदी साधीं दोन उपरणीं, लोकमान्यांप्रमाणें उजव्या खांद्यावरुन डाव्या खांद्यावर टाकलेले उपरणें असे. पायांत आगरकरी जोडा. उंची मध्यम, रंग गव्हाचा, उभे गंध, कपाळ मोठें, चेहरा नीरस, डोळ्यांत चाणाक्षपणा असे."

५) कै. डॉ. भी. गु. चिक्केरूर, M. B. B. S., जळगांव– (पृ. २४१) लिहितात– "माझें वय त्यावेळीं ९-१० वर्षांचें होतें. त्यामुळें केशवसुतांची चेहरेपट्टी आज स्मरणानेंही मी कांहींच सांगू शकत नाहीं. मला आठवतें तें एवढेंच कीं, केशवसुत– उंच, गोरे, व लांब मिशांचे असावेत. अंगकाठी सडपातळ होती, ते उपरणें नेहमीं घेत असत.

६) श्री. वि. श्री. करंदीकर, रि. शिक्षक न्यू इं. स्कूल, पुणे (पृ. २४३वर) लिहितात– "केशवसुत पर्शियन कोट घालीत असत. डोक्यास फेटा बांधीत असत. त्यांची रुमाल बांधण्याची पद्धति इतकी आकर्षक होती कीं, त्याकडे पहात रहावें असें वाटत असे. त्यांचा पोशाख व राहणी अगदीं साधी असे. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे एका प्रकारची भीति, दरारा वाटत असे. त्यांचा चेहरा अगदीं ऊग्र होता, व ते कोणाशींही विशेष बोलत नसत. ते नेहमी अंतर्मुख असत."

हीं वर्णनें जरा बारकाईनें तपासून पाहिलीं तर त्यांत संगति पेक्षां विसंगतीच आढळेल ! तेव्हां या सर्व वर्णनांचा विचार करून व मी जे कांहीं ऐकलेले आहे तें जमेस धरून त्यांचे व्यक्तिचित्र मी माझ्या शद्बांत पुढें मांडतों. पण तें कितपत वास्तव, खरें असेल, याबद्दल मी कोणतीच खात्री देत नाहीं.

त्यांची उंची मध्यम, पाच फूट ३ ते ४ इंच अशी होती ते काळे नव्हते पण गोरेही नव्हते, त्यांचा तोंडवळा पुष्कळसा सी. के. दामले यांचे तोंडवळ्याशीं जळता होता. ते पर्शियन लाँग कोट वापरीत, उपरणें पांढरें शुभ्र लो. टिळक यांचेप्रमाणें घेत. पगडी किंवा फेटाही वापरीत. क्वचित् धोतर नेसत असत. कपाळ रुंद व मोठे होतें. नाक सरळ, डोळे टप्पोरे मोठे, पाणीदार, भीति उत्पन्न करणारे, दरारा उत्पन्न करणारे. सी. के. दामले यांचे हे अवयव असेच होते. कपाळास उभे गंध, मोरोपंतांप्रमाणें लावीत असत. धोतराचा काचा घालीत नसावेत, (सीतारामपंत काचा घालीत व स्लीपर वापरीत, मोरोपंत काचा घालीत नसत पुणेरो जोडा वापरीत.) आणि बहुधा पुणेरी जोडा किंवा वाहणा वापरीत असावेत. चेहेऱ्यावर आनंद, हास्य, फारसें नसेल, नेहमीं गंभीरच चेहरा व वृत्ति असावी. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वास "आकर्षक, छाप, दरारा उत्पन्न करणारें" (Attractlve & awe inspiring) असें जरी वर्णन लागू पडलें नाहीं तरी तें परिणामकारक Impressive होतें असें म्हणतां येईल. नेभळटपणा, बावळेपणा हे दोष त्यांच्यांत निश्चितच नव्हते. मनानें, वृत्तीनें सुधारक असले तरी ते केस राखीत नसत, हजामत करीत; पण त्यांस टक्कल पडलेलेंही नव्हतें. सीतारामपंत यांस टक्कल होतें. शरीरानें ते सडपातळच होते. संध्या, देवपूजा ते नियमानें करीत नसत ·· मोरोपंत, सीतारामपंत हेही वयाचे ३०-३५ वयापर्यंत या गोष्टी करीत नसत. पुढें ते या गोष्टी करूं लागले. त्याचप्रमाणें केशवसुतांच्या काव्यांचा मागोवा घेतला तर ते ही जास्त जगते तर या मार्गानें गेले असते असें समजावयास जागा आहे.

त्यांची पत्नी व मुलें दिसावयास देखणीं नव्हतीं, सामान्यच होतीं. पण त्यांचें त्या सर्वांवर भरपूर प्रेम होतें.

स्वभाव नादी होता. विशेषतः आपल्याच काव्यतंद्रीत ते असत. व त्यामुळें नित्याचीं जेवणें देखील वेळेवर जेवीत नसत ! नोकरीमध्यें शाळेंत मात्र अनेकदां न जेवतांही पण वेळेवर जात असत. श्री. गद्रे यांचे वर्णनांत क्वचित् ते शेजाऱ्यांबरोबर पत्तेही खेळत असत (पृ. २३३ केशवसुत स्मृति -ग्रंथ) असा मजकूर आहे. ऐहिक सुखांकडे त्यांनी एकूण पाठ फिरविली होती.

# कोकण, कोकणस्थ (चित्तपावन - चित्पावन)
# [ आणि दामले कुटुंब ]

ज्यास कोकण हा मुलुख संबोधतात तो भाग सह्याद्रिच्या पश्चिमेस दक्षिणोत्तर पसरलेला असा बराच विस्तृत भू-भाग आहे. दक्षिणेस सावंतवाडी मालवण, वेंगुर्लें पासून उत्तरेस वसई, डहाणू भागापर्यंत सुमारें ३५० मैल लांबीची ही किनाऱ्याला चिकटून असणारी चिंचोळी पट्टी असून (कोणी कोणी दक्षिणेकडे हा भाग अंकोला, कारवार, कुमठा येथपर्यंत आणखी सुमारे ५० मैल लांब व उत्तरेकडे आणखी बलसाड, नवसारीपर्यंत सुमारें ३०–४० मैल सरकवूं इच्छितात) तिची रुंदी कमी जास्त आहे. जर सह्याद्रि किनाऱ्यापासून दूर गेला असेल तर ती पट्टी रुंद होते, व जर तो लगत असेल तर ती पट्टी किनाऱ्याजवळ येते. सामान्यतः दक्षिणेकडे ती कमी रुंद आहे; व तिची मर्यादा अंदाजानें ३०–४० मैल आहे तर उत्तरेकडे तिची मर्यादा ६०–७५ मैल पर्यंतही आहे. या भागांत दक्षिणेकडून उत्तरेकडे गेल्यास कारवार किंवा उत्तर कानडा जिल्हा, रत्नागिरी, कुलाबा, व ठाणे असे जिल्हे मोडतात, कारवार किंवा उत्तर कानडा जिल्ह्यांत जंगलें फार आहेत. त्यांचें प्रमाण उत्तरेकडे जातांना कमी कमी होत जातें. साधारणतः चिपळूण पर्यंत आल्यावर तें बरेंच कमी होते. कानडा आणि रत्नागिरीचा दक्षिणार्ध जास्त डोंगराळ, रत्नागिरीचा उत्तरार्ध व कुलाबा कमी डोंगराळ, तर ठाणे फार कमी डोंगराळ, असें स्थूल मानानें म्हणतां येईल.

कोकण म्हणजे समुद्रकिनारा असें एक समीकरण माझ्या मनांत मी कोंकण पहाण्यापूर्वी होतें. कोकणच्या कोणत्याही गांवी आपणास समुद्र, मुंबईच्या बॅक बे (चौपाटी) किंवा दादर सारखा समुद्र पहावयास मिळेल अशी समजूत, मी जन्मतः कोकणस्थ असलेल्या (माझा जन्म उज्जयिनी येथें, कोंकणापासून फार दूर झाला आहे.) माणसाप्रमाणें ज्यानीं कधींच कोंकण पाहिलेलें नाहीं अशा सर्वांचीच असते. पण माझाच अनुभव सांगतों, अगदीं अलीकडचा, एप्रिल १९६६ मधला.

हीं वर्णनें जरा बारकाईनें तपासून पाहिलीं तर त्यांत संगति पेक्षां विसंगतीच आढळेल ! तेव्हां या सर्व वर्णनांचा विचार करून व मी जे कांहीं ऐकलेले आहे तें जमेस धरून त्यांचे व्यक्तिचित्र मी माझ्या शब्दांत पुढें मांडतों. पण तें कितपत वास्तव, खरें असेल, याबद्दल मी कोणतीच खात्री देत नाहीं.

त्यांची उंची मध्यम, पाच फूट ३ ते ४ इंच अशी होती ते काळे नव्हते पण गोरेही नव्हते, त्यांचा तोंडवळा पुष्कळसा सी. के. दामले यांचे तोंडवळ्याशीं जळता होता. ते पर्शियन लाँग कोट वापरीत,उपरणें पांढरें शुभ्र लो.टिळक यांचेप्रमाणें घेत. पगडी किंवा फेटाही वापरीत. क्वचित् धोतर नेसत अन्त.कपाळ रुंद व मोठे होतें.नाक सरळ, डोळे टप्पोरे मोठे, पाणीदार, भीति उत्पन्न करणारे, दरारा उत्पन्न करणारे. सी. के. दामले यांचे हे अवयव असेच होते. कपाळास उभे गंध, मोरोपंतांप्रमाणें लावीत असत. धोतराचा काचा घालीत नसावेत, (सीतारामपंत काचा घालीत व स्लीपर वापरीत, मोरोपंत काचा घालीत नसत पुणेरी जोडा वापरीत.) आणि बहुधा पुणेरी जोडा किंवा वाहणा वापरीत असावेत. चेहेऱ्यावर आनंद, हास्य, फारसें नसेल, नेहमीं गंभीरच चेहरा व वृत्ति असावी. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वास "आकर्षक, छाप, दरारा उत्पन्न करणारें" (Attractive & awe inspiring) असें जरी वर्णन लागू पडलें नाहीं तरी तें परिणामकारक Impressive होतें असें म्हणतां येईल. नेभळटपणा, बावळेपणा हे दोष त्यांच्यांत निश्चितच नव्हते. मनानें, वृत्तीनें सुधारक असले तरी ते केस राखीत नसत, हजामत करीत; पण त्यांस टक्कल पडलेलेंही नव्हतें. सीतारामपंत यांस टक्कल होतें. शरीरानें ते सडपातळच होते. संध्या, देवपूजा ते नियमानें करीत नसत " मोरोपंत, सीतारामपंत हेही वयाचे ३०-३५ वयापर्यंत या गोष्टी करीत नसत. पुढें ते या गोष्टी करूं लागले. त्याचप्रमाणें केशवसुतांच्या काव्यांचा मागोवा घेतला तर ते ही जास्त जगते तर या मार्गानें गेले असते असें समजावयास जागा आहे.

त्यांची पत्नी व मुलें दिसावयास देखणीं नव्हतीं, सामान्यच होतीं. पण त्यांचें त्या सर्वांवर भरपूर प्रेम होतें.

स्वभाव नादी होता. विशेषतः आपल्याच काव्यतंद्रीत ते असत. व त्यामुळें नित्याचीं जेवणें देखील वेळेवर जेवीत नसत ! नोकरीमध्यें शाळेंत मात्र अनेकदां न जेवतांही पण वेळेवर जात असत. श्री. गद्रे यांचे वर्णनांत क्वचित् ते शेजाऱ्यांबरोबर पत्तेही खेळत असत (पृ. २३३ केशवसुत स्मृति -ग्रंथ) असा मजकूर आहे. ऐहिक सुखांकडे त्यांनी एकूण पाठ फिरविली होती.

# कोकण, कोकणस्थ (चित्तपावन - चित्पावन)
# [ आणि दामले कुटुंब ]

ज्यास कोकण हा मुलुख संबोधतात तो भाग सह्याद्रिच्या पश्चिमेस दक्षिणोत्तर पसरलेला असा बराच विस्तृत भू-भाग आहे. दक्षिणेस सावंतवाडी मालवण, वेंगुर्लें पासून उत्तरेस वसई, डहाणू भागापर्यंत सुमारें ३५० मैल लांबीची ही किनाऱ्याला चिकटून असणारी चिंचोळी पट्टी असून (कोणी कोणी दक्षिणेकडे हा भाग अंकोला, कारवार, कुमठा येथपर्यंत आणखी सुमारे ५० मैल लांब व उत्तरेकडे आणखी बलसाड, नवसारीपर्यंत सुमारें ३०–४० मैल सरकवूं इच्छितात) तिची रुंदी कमी जास्त आहे. जर सह्याद्रि किनाऱ्यापासून दूर गेला असेल तर ती पट्टी रुंद होते, व जर तो लगत असेल तर ती पट्टी किनाऱ्याजवळ येते. सामान्यत: दक्षिणेकडे ती कमी रुंद आहे; व तिची मर्यादा अंदाजानें ३०–४० मैल आहे तर उत्तरेकडे तिची मर्यादा ६०–७५ मैल पर्यंतही आहे. या भागांत दक्षिणेकडून उत्तरेकडे गेल्यास कारवार किंवा उत्तर कानडा जिल्हा, रत्नागिरी, कुलाबा, व ठाणे असे जिल्हे मोडतात, कारवार किंवा उत्तर कानडा जिल्ह्यांत जंगलें फार आहेत. त्यांचें प्रमाण उत्तरेकडे जातांना कमी कमी होत जातें. साधारणत: चिपळूण पर्यंत आल्यावर तें बरेंच कमी होते. कानडा आणि रत्नागिरीचा दक्षिणार्ध जास्त डोंगराळ, रत्नागिरीचा उत्तरार्ध व कुलाबा कमी डोंगराळ, तर ठाणे फार कमी डोंगराळ, असें स्थूल मानानें म्हणतां येईल.

कोकण म्हणजे समुद्रकिनारा असें एक समीकरण माझ्या मनांत मी कोंकण पहाण्यापूर्वीं होतें. कोकणच्या कोणत्याही गांवी आपणास समुद्र, मुंबईच्या बॅक बे (चौपाटी) किंवा दादर सारखा समुद्र पहावयास मिळेल अशी समजूत, मी जन्मत: कोकणस्थ असलेल्या (माझा जन्म उज्जयिनी येथें, कोंकणापासून फार दूर झाला आहे.) माणसाप्रमणें ज्यानीं कधींच कोंकण पाहिलेलें नाहीं अशा सर्वांचीच असते. पण माझाच अनुभव सांगतों, अगदीं अलीकडचा, एप्रिल १९६६ मधला.

मी कोल्हापूरहून रत्नागिरीस जात असतांना त्या शहराच्या S. T. स्टँडवर उतरलों, आणि माझे त्या गांवाचे स्नेही प्रि. सुर्वे यांच्या सड्यावरच्या बंगल्यांत जाईपर्यंत मला समुद्रदर्शन झालेंच नाहीं ! माझी विद्यार्थिनी सौ. गंगूबाई सुर्वे यांनीं संध्याकाळी सहज फिरावयास म्हणून नेलें. त्यांच्या बंगल्यापासून जवळ जवळ एक मैल दूर अशा थिबा पॉइंटवर गेलों. तेव्हां खालीं दरींत जवळ-जवळ दीडशें-दोनशें फूट खोलीवर समुद्राच्या लाटा फेसाळत फेसाळत किनाऱ्यावर फुटत असलेल्या दिसल्या. तो पर्यंत मला रत्नागिरी बंदर कसे काय आहे हा प्रश्नच पडला होता.! त्यांचे, (सौ.सुर्वे,) यांच्या सांगण्याप्रमाणें रत्नागिरीसही महाबळेश्वरा-प्रमाणें कांहीं पॉइंटस् आहेत, सृष्टि सौंदर्य दाखवणारे; व त्यांतला एक "थिबा" पॉइंट आम्ही "खुर्ची"वर बसून पाहिला. वेळ होती दिवे लागणीची. त्या ठिकाणाहून खालच्या बाजूच्या रत्नागिरीचें दर्शन होत होतें. खूप झाडी, मधून मधून काजव्या प्रमाणें झाडींत लुकलुकणारे विजेचे दिवे आणि दूरून रत्नागिरीच्या बंदरांतील "कुलाब्याच्या दांडी" - Light House मधील फिरता प्रकाश झोत कांहीं ठराविक वेळानें (मिनिटांतून दोन वेळा) आमचे झोत पर्यंत येत होता. कांहींतरी बहुधा एक लक्ष मेणबत्त्यांची, किंवा जास्त प्रकाश शक्ति असणारा हा प्रकाश झोत पश्चिम किनाऱ्यावरील अशा ठिकाणापैकीं तिसऱ्या क्रमांकाचा शक्तिमान प्रकाश-झोत आहे असें कळलें. हा झोत पश्चिम सागरावर जवळ जवळ ३०–४० मैलांपर्यंत आपला प्रकाश फेकतो असें ऐकलें. रात्रीं सुर्वे यांच्या बंगल्यातील पश्चिमेकडच्या खोलींत मी निजलो असतां मला ठराविक वेळांत पण वरचेवर त्याचा प्रकाश दिसत होता ! असें हें कोंकण आहे !

कोकणाची माझी कल्पना ( मी आतांपर्यंत ३ वेळां तें पाहिलें. पहिल्या प्रथम ४॥–५ वर्षांचा असतां आई, आत्याबाई यांचे बरोबर; नंतर २८ सालीं २५ वर्षांचा असतांना चिपळूणच्या उत्तरेकडचा टापू--चिपळूण दाभोळ, कापदापोली, खेड वगैरे भाग, आणि आतां एप्रिल १९६६ मध्यें रत्नागिरी व त्याचे आसपासचा भाग) देखील फार अपुरीच आहे. पण ती कोंकणविषयक कादंबऱ्या लिहिणाऱ्या कादंबरीकारांच्यापेक्षा पुष्कळ सुंदर व चांगली आहे. त्यांस कोंकणांतली सामाजिक घाण, गटारें आढळलीं, व त्यांचें त्यांनीं चित्रण केलें आहे. ( पण ही घाण-गटारें पृथ्वीवरच्या कोठल्याही देशांत व कोठेही पहावयास मिळते-मिळतात; कोंकण कांहीं त्यांचे खास स्थान नव्हे ! ) पण मला मात्र कोकणात निसर्ग-सौंदर्य, कोकणांतील लोकांचा आतिथ्यशील स्वभाव, असे अनेक गुण आढळले ! माझ्यावर हे कोकणचे माहीतगार लेखक टीका करून म्हणतील, दामल्यास " दुरून डोंगर साजरे " – कोकण सुंदर दिसलें. त्यांनीं तें जवळून पहावयास हवें ! असो; मला वाद करा-

वयाचा - घालावयाचा नाहीं. मी वाचकांस सांगेन " चक्षु र्वै सत्यम् " या न्यायानें तुम्ही स्वतःच जरूर तुमच्या कोकणच्या गांवी कोकणस्थ असाल तर, आणि नसाल तर रत्नागिरी जवळ पुळें येथील, पाली येथील श्री गणपतीचें स्थान किंवा चिपळूण जवळचें श्री परशुराम क्षेत्र पहावयास, अवश्य जा. निदान "गोवे" पहावयास जातां तसे कोकणही पहा एकदां, अशी मी शिफारस करतों.

अगदीं अलीकडचाच अनुभव सांगावयाचा माझा, तर सांगतो. मी कोल्हापूरहून रत्नागिरीकडे जातांना मलकापूर म्हणून एक गांव देश व कोकण या सीमेवर लागला, आणि पुढें साखरपें हा गांव कोंकणकडचा पहिला मोठा गांव लागला. या साखरपें गावांत रत्नागिरीपासून जवळ जवळ३० मैल दूर, समुद्र अजिबात दिसत नाहीं, लाटांचा आवाज ऐकण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. मार्गातल्या आंबा किंवा अम्बा घाटांत उत्पन्न झालेल्या कोणत्यातरी नदी कांठचा हा गांव आहे. सह्याद्रिमध्यें पाऊस कोसळत असतो सारखा, जवळ जवळ ३-३॥ महिने. आणि त्याचे माथ्यावर पडणारा हा पाऊस असंख्य दऱ्यांमधून ओहोळांतून पाणी या रूपानें वहात वहात पुढे पुढें जातें. सिंहगड, पानसेत, वगैरे नांवे पुण्याच्या लोकांस परिचित आहेत. त्या भागांतील पाणी मुठा नदीच्या रूपानें पुण्यास पहावयास मिळतें; पण ती " मुठा " नदी होईपर्यंत साधारण मोठ्या अशा ५।६ नद्या - ओहोळांचें पाणी तिला मिळालेलें आहे. रत्नागिरीस अशीच " काजळी " नदी आंबा किंवा अंबा घाटात उगम पावून सुमारें ३० मैल वहात येऊन समुद्रास मिळाली आहे, " कर्ला किंवा कर्ले " या उपनगराजवळ. या काजळीनदीच्या दोन्ही तीरांवर जी वस्ती आहे तें कोंकण ! अशा शेकडों नद्या, व त्यांवरील गांवें म्हणजे कोकण. याचा अर्थ कोकणांतील १/१० गांवें डोंगर माथ्यावर असून त्यानां समुद्र किंवा खाडी कांहींच दिसत नाहीं; ८/१० गावांना खाडी दिसते, व १/१० गावें समुद्र पण तोही मुंबईसारखा नव्हेच; ठाणेकल्याण, दाभोळ, रत्नागिरी, वगैरे ठिकाणांसारखा समुद्र (खाडी सुमद्रास मिळते तो भाग) दिसतो.

आतां कोकण हें नांव त्या भागास कसें मिळालें त्याची गम्मतीदार ऐकींव माहिती देतों. या भागांतच विशेषत्वानें होणारें एक प्रख्यात झाड, रातांबा किंवा "कोकम" या झाडामुळें या भागास "कोकम" चे अपभ्रष्टरूप "कोकण" हें नांव पडलें. हें झाड जगांतील अन्य कोणत्याही भागांत होत नाही; याच भागांत रुजतें, उगवते, वाढतें. झाड आहे मध्यम आकाराचें, त्यास लहानसें, चिक्कूच्या आकाराचें पण गोलाकार फळ येतें, आंत बिया असतात, गर थोडाच असतो. त्या फळाच्या साली काढून, कांहीं पुटें चढवून त्यांस ' आमसूल ' हें रूप आणतात. आणि आंवट वरण

मी कोल्हापूरहून रत्नागिरीस जात असतांना त्या शहराच्या S. T. स्टँडवर उतरलों, आणि माझे त्या गांवाचे स्नेही प्रि. सुर्वे यांच्या सड्यावरच्या बंगल्यांत जाईपर्यंत मला समुद्रदर्शन झालेंच नाहीं ! माझी विद्यार्थिनी सौ. गंगूबाई सुर्वे यांनीं संध्याकाळी सहज फिरावयास म्हणून नेलें. त्यांच्या बंगल्यापासून जवळ जवळ एक मैल दूर अशा थिबा पॉइंटवर गेलों. तेव्हां खालीं दरींत जवळ-जवळ दीडशें-दोनशें फूट खोलीवर समुद्राच्या लाटा फेसाळत फेसाळत किनाऱ्यावर फुटत असलेल्या दिसल्या. तो पर्यंत मला रत्नागिरी बंदर कसे काय आहे हा प्रश्नच पडला होता.! त्यांचे, (सौ.सुर्वे,) यांच्या सांगण्याप्रमाणें रत्नागिरीसही महाबळेश्वरा-प्रमाणें कांहीं पॉइंटस् आहेत, सृष्टि सौंदर्य दाखवणारे; व त्यांतला एक "थिबा" पॉइंट आम्ही "खुर्ची"वर बसून पाहिला.वेळ होती दिवे लागणीची.त्या ठिकाणाहून खालच्या बाजूच्या रत्नागिरीचें दर्शन होत होतें. खूप झाडी, मधून मधून काजव्या प्रमाणें झाडींत लुकलुकणारे विजेचे दिवे आणि दूरून रत्नागिरीच्या बंदरांतील "कुलाब्याच्या दांडी" - Light House मधील फिरता प्रकाश झोत कांहीं ठराविक वेळानें (मिनिटांतून दोन वेळा) आमचे झोत पर्यंत येत होता.कांहींतरी बहुधा एक लक्ष मेणबत्त्यांची, किंवा जास्त प्रकाश शक्ति असणारा हा प्रकाश झोत पश्चिम किनाऱ्यावरील अशा ठिकाणापैकीं तिसऱ्या क्रमांकाचा शक्तिमान प्रकाश-झोत आहे असें कळलें. हा झोत पश्चिम सागरावर जवळ जवळ ३०–४० मैलांपर्यंत आपला प्रकाश फेकतो असें ऐकलें. रात्रीं सुर्वे यांच्या बंगल्यातील पश्चिमेकडच्या खोलींत मी निजलो असतां मला ठराविक वेळांत पण वरचेवर त्याचा प्रकाश दिसत होता ! असें हें कोंकण आहे !

कोंकणाची माझी कल्पना ( मी आतांपर्यंत ३ वेळां तें पाहिलें. पहिल्या प्रथम ४॥–५ वर्षांचा असतां आई, आत्याबाई यांचे बरोबर; नंतर २८ सालीं २५ वर्षांचा असतांना चिपळूणच्या उत्तरेकडचा टापू–चिपळूण दाभोळ, कापदापोली, खेड वगैरे भाग, आणि आतां एप्रिल १९६६ मध्यें रत्नागिरी व त्याचे आसपासचा भाग) देखील फार अपुरीच आहे. पण ती कोंकणविषयक कादंबऱ्या लिहिणाऱ्या कादंबरीकारांच्यापेक्षा पुष्कळ सुंदर व चांगली आहे. त्यांस कोंकणांतली सामाजिक घाण, गटारें आढळलीं, व त्यांचें त्यांनीं चित्रण केलें आहे. ( पण ही घाण-गटारें पृथ्वीवरच्या कोठल्याही देशांत व कोठेही पहावयास मिळते-मिळतात; कोंकण कांहीं त्यांचे खास स्थान नव्हे ! ) पण मला मात्र कोकणात निसर्ग-सौंदर्य, कोकणांतील लोकांचा आतिथ्यशील स्वभाव, असे अनेक गुण आढळले ! माझ्यावर हे कोंकणचे माहीतगार लेखक टीका करून म्हणतील, दामल्यास " दुरून डोंगर साजरे " – कोंकण सुंदर दिसलें. त्यांनीं तें जवळून पहावयास हवें ! असो; मला वाद करा-

वयाचा - घालावयाचा नाहीं. मी वाचकांस सांगेन " चक्षु वैं सत्यम् " या न्यायानें तुम्ही स्वतःच जरूर तुमच्या कोकणच्या गांवी कोकणस्थ असाल तर, आणि नसाल तर रत्नागिरी जवळ पुळें येथील, पाली येथील श्री गणपतीचें स्थान किंवा चिपळूण जवळचें श्री परशुराम क्षेत्र पहावयास, अवश्य जा. निदान "गोवे" पहावयास जातां तसे कोकणही पहा एकदां, अशी मी शिफारस करतों.

अगदीं अलीकडचाच अनुभव सांगावयाचा माझा, तर सांगतो. मी कोल्हापूरहून रत्नागिरीकडे जातांना मलकापूर म्हणून एक गांव देश व कोकण या सीमेवर लागला, आणि पुढें साखरपें हा गांव कोंकणकडचा पहिला मोठा गांव लागला. या साखरपें गावांत रत्नागिरीपासून जवळ जवळ ३० मैल दूर, समुद्र अजिबात दिसत नाहीं, लाटांचा आवाज ऐकण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. मार्गातल्या आंबा किंवा अम्बा घाटांत उत्पन्न झालेल्या कोणत्यातरी नदी कांठचा हा गांव आहे. सह्याद्रिमध्यें पाऊस कोसळत असतो सारखा, जवळ जवळ ३–३॥ महिने. आणि त्याचे माथ्यावर पडणारा हा पाऊस असंख्य दऱ्यांमधून ओहोळांतून पाणी या रूपानें वहात वहात पुढे पुढें जातें. सिंहगड, पानसेत, वगैरे नांवे पुण्याच्या लोकांस परिचित आहेत. त्या भागांतील पाणी मुठा नदीच्या रूपानें पुण्यास पहावयास मिळतें; पण ती " मुठा " नदी होईपर्यंत साधारण मोठ्या अशा ५।६ नद्या - ओहोळांचें पाणी तिला मिळालेलें आहे. रत्नागिरीस अशीच " काजळी " नदी आंबा किंवा अंबा घाटात उगम पावून सुमारें ३० मैल वहात येऊन समुद्रास मिळाली आहे, " कर्ला किंवा कर्ले " या उपनगराजवळ. या काजळीनदीच्या दोन्ही तीरांवर जी वस्ती आहे तें कोंकण ! अशा शेकडों नद्या, व त्यांवरील गांवें म्हणजे कोकण. याचा अर्थ कोकणांतील १/१० गांवें डोंगर माथ्यावर असून त्यानां समुद्र किंवा खाडी कांहींच दिसत नाहीं; ८/१० गावांना खाडी दिसते, व १/१० गावें समुद्र पण तोही मुंबईसारखा नव्हेच; ठाणेकल्याण, दाभोळ, रत्नागिरी, वगैरे ठिकाणांसारखा समुद्र (खाडी सुमद्रास मिळते तो भाग) दिसतो.

आतां कोकण हें नांव त्या भागास कसें मिळालें त्याची गम्मतीदार ऐकींव माहिती देतों. या भागांतच विशेषत्त्वानें होणारें एक प्रख्यात झाड, रातांबा किंवा "कोकम" या झाडामुळें या भागास "कोकम" चे अपभ्रष्टरूप "कोकण" हें नांव पडलें. हें झाड जगांतील अन्य कोणत्याही भागांत होत नाही; याच भागांत रुजतें, उगवते, वाढतें. झाड आहे मध्यम आकाराचें, त्यास लहानसें, चिक्कूच्या आकाराचें पण गोलाकार फळ येतें, आंत बिया असतात, गर थोडाच असतो. त्या फळाच्या साली काढून, कांहीं पुटें चढवून त्यांस ' आमसूल ' हें रूप आणतात. आणि आंवट वरण

करतांना, कढी करतांना, सार करतांना देशावर ज्याप्रमाणें चिंच, किंवा जबलपूर-कडच्या भागांत कच्च्या आंब्याच्या कैऱ्यांच्यां वाळलेल्या फोडी घालतात, त्याप्रमाणें कोकणांत किंवा आजाऱ्याकरितां करावयाच्या असल्या पदार्थांत "आमसुलें" घालतात. या साधारण पक्व झालेल्या कोकम किंवा "रातांबा" याचें पन्हें किंवा एक थंड पेय फार रूचकर होतें; व तें पाहुण्यास कोकण भागांत आतिथ्य करतांना पिण्यास देण्याचा रिवाज आहे. मुंबईत कांहीं हॉटेलवाल्यांनीं या पेयास "अमृत कोकम्" असें मनोहर नांव दिलें असून तें ग्राहकांस विकण्यांत येतें. पण हें फळ १५ एप्रिलच्या पुढें पिकत असावें. माझ्या या तिसऱ्या कोकणच्या प्रवासांत मालगुंड या केशवसुतांच्या जन्मग्रामीं एकदांच या पेयाचा आस्वाद मला घेतां आला !

कोकणांत राहणारे ब्राह्मण, चित्तपावन, किंवा चित्पावन ब्राह्मण, यांच्या उत्पत्तिबद्दलच्या कथा आतां थोडक्यांत सांगतो. चित्तपावन या शब्दाचा अर्थ ज्यांचें चित्त पावन पवित्र झालें आहे असे लोक असा होवूं शकतो. पण हा अर्थ भलताच चांगला आहे. तो सर्वस्वी खरा धरण्याचें कारण नाहीं. पण दुसऱ्या दोन तीन कथा सांगण्यांत येतात त्यांत कांहीं अर्थ असावा. चितेपासून पवित्र झालेले ते चित्पावन् असा एक अर्थ सांगितला जातो. चिपळूण गांवाजवळ सागरतीरावर १४ प्रेतें मिळालीं; त्यांस पवित्र करून कोकणस्थांचा देव श्री परशुराम यानें जीवदान देऊन त्यांस वपती करण्यास जागा दिली. तेच कोकणस्थ ब्राह्मणांचे मूळ १४ गोत्रांचे १४ पुरुष होत अशी एक आख्यायिका सांगतात. हीं प्रेतें इराणच्या अखाताकडून वाहत वाहत आलीं व सागरतीराला लागलीं. कदाचित् प्राचीन इराणी लोक, पारशी, व कोकणस्थ ब्राह्मण यांचेमध्यें विद्वानांस कांहीं साम्यभाव दिसला असेल म्हणून ही व्युत्पत्ति लावली गेली. श्री. परशुराम याने निःक्षत्रिय पृथ्वी केल्यावर सागरास बाण मारून मागें हटवून १४ गोत्रज ब्राह्मणांस वस्ती करण्यास सागर जिंकून जागा दिली अशीही एक माहिती सांगतात. पण चिपळूणगांव व चित्पावन लोक यांच्या व्युत्पत्ति संबधीं आणखी एक हकीगत सांगतात. "पुलिन" ( पुळीण, पुळण ही आजची अपभ्रष्ट रूपें होत, या शब्दाचीं) म्हणजे सागर तीरावरचा ओलसर वाळवंटाचा भाग किंवा वाळू. या पुलिनावर १४ प्रेतें किंवा चिता आढळल्या म्हणून ज्या भू-भागावर त्या आढळल्या त्यास "चित्त-पोलनाहा" असा, पुलिनावरच्या चिता, अशासारखा अर्थ बसण्यांत येऊन त्या स्थळास "चिपळूण" गांव हे नांव व त्या १४ ब्राह्मणांच्या पुढील वंशजांस "चित्पावन" ब्राह्मण असें नांव पडलें. असा हा मुलुख, व असे हे लोक! त्यांचें नांवाबद्दलची ही सर्व ऐकीव व कांहीं कांहीं ग्रंथांतून आलेली माहिती होय. उदाहरणार्थ चित्तपोलनाहा वगैरे, १४ प्रेतें पुलिनावर लागलीं वगैरे माहिती प्रसिद्ध इतिहासाचार्य कै. विसूभाऊ राजवाडे यानीं कोकण-

स्थांबद्दल जी माहिती दिलेली आहे तिचा आधार घेऊन गोखले घराण्या ा इतिहास (१९२५ चे सुमारास कोकणस्थ घराण्यांपैकीं गोखले घराण्याचा प्रसिद्ध झालेला पहिला इतिहास ग्रंथ) या ग्रंथामधील ही माहिती मी स्मरणानें दिली आहे. मजजवळ आज हा ग्रंथ नाहीं. पण या भूमिबद्दल व तेथें राहणाऱ्या लोकांबद्दल ही माहिती अजून अपुरीच आहे. तेव्हां त्याचें वर्णन करणें प्राप्त आहे.

मी डॉ. केतकरांचा ज्ञानकोश "चित्पावन" "चित्तपावन" "कोकणस्थ" कोकण" या सदराखालीं चाळून पाहिला, त्याबद्दल विशेष माहिती मिळाली नाहीं. ती. सीताराम केशव यांच्या १९२५ च्या डायरीमध्यें त्यांचे मनांत कोकणस्थांबद्दल एकादा मोठा प्रबंध लिहावयाचा बेत दिसतो. त्याबद्दल टाचणें दिसतात, त्यांत १२३ आडनांवाची यादी आहे. कोकणस्थ, चित्तपावन या शब्दांच्या व्युत्पत्तीबद्दल माहिती आहे, ती पुढें देतों.

" कोकणास्थांचा कुलस्वामी पर्शुराम किंवा भार्गवराम. भृगुचा वंशज. तो भार्गव Phrygian फ्रिजिअन यांचे भृगुवन् भार्गवन् भार्गव असें रूपांतर होत होत त्याच्यापुढें हिंदुस्थानांतील लोकप्रिय "राम" हें नांव जोडण्यांत आले असा एक तर्क आहे Egyptian जिप्शन–चित्पन–चित्पावन. शिवपुलीन–चिपुलीन चित्पावन.

सह्याद्रि खंड, they say, gives some mythological origin of the कोकणस्थाs. The Late Rao Saheb Mandlik also mentioned a theory that the कोकणस्थाs were believed to have come originally from Egypt or Persia. Etonensis or Mr. S. M Edwardes in a contribution published in the Times of India, says that a ship from far off Scandinavia i.e.Norway was ship wrecked and drifted to the Konkan coast, and 14 Viking sailors from that ship, who were more dead than alive, were washed off on the coast. These were somehow restored to life by the kind inhabitants of the Konkan, prominent among whom must have been पर्शुराम. Finding the strangers fair skinned & intelligent, they were admitted to the Bramhan fold & asked to settle in and around परशुराम hill.

Theories of the origin of the कोकणस्थाs

१) परशुरामानें १४ प्रेतें किनाऱ्यावर लागलेली उठविली व त्यांना ब्राह्मण केलें. हे Perseus किंवा Brigans म्हणजे पर्सीअस किंवा ब्रिगेन्स यांचे वंशज होते किंवा Phrygians होते.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक .................... नोंद दिः ....................

२) शिवनदी व शिवपुलीन चिपळूण या ठिकाणच्या जवळपास रहाणारे म्हणून चित्पावन.

३) मलबारांत परशुराम शक आहे, त्याचा आरंभ (शालिवाहन?) शकापूर्वी जवळ जवळ १५५० वर्षे होतो. तेव्हां त्या सुमारातच पर्शुरामाने १४ चित्पावनांची वसाहत पर्शुराम क्षेत्राजवळ करून दिली.

त्यांना बायका जोगाईच्या आंब्याकडील ब्राह्मणांच्या मुली करून दिल्या.

Egyptian लोकांपासून चवदा चित्पावन झाले. चवदा मुडदे किंवा बेशुद्ध झालेले खलाशी एजिप्शन होत; एजिप्शनचे जिप्शन, चितपावन असें विकृत रूप पुढें झालें.

चितेवर ठेऊन शुद्ध केलें म्हणून चितापावन, चित्पावन. चित्तपावन ज्यांचे आहे असे ते चित्पावन.

अशा प्रकारची पुष्कळशी माहिती सीतारामपंतांनीं गोळा केलेली आहे. त्यांच्या या प्रबंधासंबंधींचा आराखडा, किंवा प्रयत्न करावयाची पद्धति कशी होती तिचा plan पहा :–

Method of Investigation & Arranging Information

नांव. मूळगांव (कोकणातलें) कुलस्वामी or स्वामिनी.

मूळगांवाहून बाहेर कोण केव्हां कोठें गेले ?

महाराष्ट्रांतील निरनिराळ्या कोणकोणत्या ठिकाणीं या आडनांवाची घराणीं स्थायिक झालीं आहेत त्याचा तपशील. घराण्यांत झालेले कर्तृत्ववान पुरुष– १) योद्धे or वीर पुरुष. २) मुत्सद्दी. ३) तपस्वी, ४) पंडित, विद्वान, लेखक, ग्रंथकार वक्ते, कवी, वगैरे. ५) सावकार, धनाढ्य जहागिरदार, कारखानदार, जमीनजुमलेवाले, व्यापारी, ६) वकील, डॉक्टर, बडे सरकारी अमलदार, वगैरे. ७) साहसी, धाडशी, परदेश गमन करून परदेशांत द्रव्य संपादन केलेले किंवा यश संपादन केलेले. ८) नट, चित्रकलाभिज्ञ व गवयी.

ती. सीताराम पंतांच्या डायरीमधील हा सर्व मजकूर विस्तारानें देण्याचें कारण हा मजकूर वाचून कोणा तरुणास स्फूर्ति मिळावी, व या स्वरुपाचे कार्य कोणीतरी करावें हें होय.

कोकण या भूभागाचे दोन प्रमुख विभाग करावे लागतात. अगदीं समुद्रसपाटी-जवळ फार तर तेथून शे, सवाशें फूट उंची पर्यंत वसलेलीं गांवें हा पहिला; आणि दुसरा विभाग म्हणजे डोंगर उतारावर वसलेलीं किंवा डोंगरावरच्या सपाटीवर-पठारावर वसलेलीं गांवें. रत्नागिरी गांव (जिल्ह्याच्या राजधानीचें शहर) याचे दोन भाग आहेत म्हणून याशहरांत दोन्ही विभाग गुण्यागोविंदानें एकत्र नांदत असलेले दिसतात! पण दाभोळ, मालगुंड, अलिबाग जिल्ह्यांतील नांगाव, किहीम, सुद्द ठाणे, कल्याण अलिबाग वगैरे गांवें (ठाणे, कल्याण थोडे अपवाद आहेत) रम्य आहेत. नारळी, पोफळी, आंबे, कलमें, वगैरे झाडांच्या गर्द राया, आणि त्यांत वसलेलीं घरें; मोठ-मोठ्या व खोल विहिरी त्यांवर मोठें चाक, चाकावरून लहान लहान मातीच्या लोटच्यांची माळ टाकलेली, किंवा लोखंडी लहान पोहऱ्यांची माळ टाकलेली, त्या रहाटांचा येणारा आवाज (कधीं कधीं ते पाय मारून माणसें "लाटतात"– फिरवतात; कधीं कधीं थोडीशी यांत्रिक रचना–दात्यांत दाते अडकवलेलीं चाकें, व वरती एक मोठा लाकडी दांडा, ज्यास बैल किंवा रेडा जोडावयाचा आणि त्यास वाटोळे फिरावयास लावावयाचें. देशावर उसाचें गुऱ्हाळ बैलावर चालणारें असतें तशा प्रकारची कांहींशी रचना असते.) आणि पाण्याचे वाहते पाट, घरांवर मंगलोरी कौलें क्वचित् पन्हाळी पत्रेही; घरांपुढें व क्वचित् आजबाजूसही चोपून स्वच्छ केलेलीं सुरेख आंगणीं, त्यांवर घातलेले लहान मोठे मांडव, मांडवांवरील गवताचें छप्पर, असें दृश्य मनापुढें आणल्यास कोकणांतील एखादें घर डोळ्यांपुढें उभे रहावें. कोकणांतील घरें, लहान-मोठीं, यांचा एक ठरीव साचा किंवा प्लॅन आहे.

घर लहान मोठें जसा मालक श्रीमान-गरीब असेल किंवा कुटुंब लहान-मोठें असेल तसें असूं शकेल. त्याप्रमाणांत ओटी लहान मोठी राहील. समोरचे अंगास पडवी असेलच; कधीं कधीं मागीलदारींही असेल. आणि उजव्या डाव्या बाजूसही पडव्या असतील, कदाचित्. त्यांचा उपयोग विविध प्रकारानें होतो. धान्य सांठवणें, दुभतें जनावर, आवडते बैल, वगैरे बांधणें,–अशा विविध प्रकारानें त्यांचा उपयोग होत असतो. त्यानंतर आंगणीं प्रत्येक घरास पुढील दारीं हे आंगण असणारच. उरलेल्या तीनही दिशांस ती असतील अगर नसतील. आतां आंगण हें जरा उंच-सभोवतालच्या प्रदेशापेक्षां-असतें. तें दिवाळी नंतर तयार होतें, आणि शेणानें वारंवार सारवून अगदीं स्वच्छ केलेलें असतें. त्यातून १।२ पायऱ्या चढून आपण पडवींत जातों. या पडव्यांमधून बसावयास पलंग किंवा खाट, किंवा कांहींच नसेल तर चांगले स्वच्छ जाड "कांबळे" किंवा घोंगडी टाकतात व पाहुण्यास बसावयास सांगतात. क्वचित् पडवीमध्यें झोपाळा टांगलेला असतो. कधीं कधीं तो वरच्या ओटीवर असतो. ओटीवर जावयास

पडवीवरून पुन: २ते४-५ ही पायऱ्या चढून जावे लागतें. भिंती उत्तम प्रकारें सारवलेल्याव स्वस्छ असतात. क्वचित् चुना दिलेल्या पांढऱ्या; पण लहान मुलांस निजववयाची झोळी अडकवलेली असते वरच्या कडीपाटांत बसवलेल्या हलग्यांत, दोरांच्या सहाय्यानें. ओटीवरून मुख्य घरांत जावयाचे दाराचे वरचे अंगांस तुम्ही दिवाळीचे सुमारास जात असाल तर एक धान्याचें तोरण (भाताच्या कणीसांचें तोरण लावलेलें आढळेल. तें तोरण आपल्याकडच्या कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशीं लावतात. तिकडे त्या पौर्णिमेस "नव्या" ची पौर्णिमा म्हणतात. नव्या भाताच्या कणसांचें तोरण त्या दिवशीं दारावर लावावयाचा संकेत आहे. या पडवीच्या दोन्ही बाजूस घराचा भाग असतो पण त्या भागांत पडवीमधून प्रवेश नाही. आत गेल्यावर कदाचित् सर्व एकच दालन आढळेल, क्वचित् खोल्या आढळतील. त्यांत मुख्यत: माजधर हे मध्यें, व दोन कडांस स्वयंपाकघर व बाळंतिणीची खोली राहील. दोन्ही खोल्यांत सांडपाण्याच्या मोऱ्या असतील व तें पाणी घराबाहेर किंवा त्या दिशांकड असणाऱ्या पडव्यांत तें पाणी पडण्याची व तेथून अगदीं बाहेर नेण्याची व्यवस्था असते. मुख्य घराबाहेर क्वचित् न्हाणी घर तट्टयाचें असतें. सर्व सांडपाणी व्यवस्थित रीतीनें काढून नेले जातें; आणि त्या पाण्यावर आळवाची खाच (खड्डा), किंवा केळी, किंवा तोंडलीचे वेल, किंवा अन्य अशीच झाडें, फुलझाडें–कण्हेरी वगैरे जगवतात, वाढवतात, त्यामुळें घरच्या घरीं थोडी भाजी होवूं शकते, पिकूं शकते. क्वचित् कोठें "नागवेल" विड्याच्या पानांचा वेलही जगवलेला, वाढवलेला आढळतो.

कोकणच्या शेतीबद्दल आतां थोडी माहिती घेऊं या. या भागांत सपाट जमीन मिळणें मुष्कील आहे. डोंगरांचे उतारावर जमीनीचे लहान लहान बांध घातलेले तुकडे म्हणजे शेतें. देशावर अलीकडे बंडिंग काम दिसतें, तसे बांध कोकणांत फार पूर्वींपासूनच होते. शेतें फार लहान असतात. फारच फार मोठें शेत म्हटले तर ५०–६० फूट रुंद आणि १०० फूट लांब ठरेल. अशा शेतांत ट्रॅक्टर फिरणेंच अशक्य. मोठे ४बैलाचे नांगर फिरणें ही अशक्य. हलके लोखंडी किंवा लाकडी नांगर उपयोगांत येतात. आणि कांहीं ठिकाणीं तर हातानेच जमीन खणावी लागते! सर्वत्र खडकावर फार तर ५।६ इंच जाडीचा मातीचा थर असावयाचा व त्यांत काय रुजेल पिकेल तें खरें! मार्च–एप्रिल मध्यें जंगलांत हिवाळ्यांत गळून पडलेली व वाळलेलीं पानें, पाला पाचोळा इतस्तत: भरपूर पडलेला असतो, तो डालग्यांतून (जवळ जवळ ४फूट व्यासाचे मोठे टोपले, हलकें व दूरदूर वीण असलेलें) डोक्यावरून वाहून शेतांत आणून पसरावयाचा, त्यावर थोडा बारीक असा मातीचा थर टाकावयाचा, असल्यास शेणखत टाकावयाचें, नंतर तें सर्व पेटवून द्यावयाचें. माती अशाकरिता पसरावयाची

कीं आग मंदपणाने हळुहळू पेटावी पसरावी, व जमीन चांगली भाजून निघावी. इतक्या परिश्रमानें जमीनीची मशागत झाल्यावर नर्सरीजमधील (लहान लहान तुकड्यातील) भाताची रोपटीं पाऊस २।४ वेळा पडल्यावर, शेतें) पाण्यांनी तुडुंब भरल्यावर अंतरा अंतरावर तीं रोपटीं लावावयाची. ही लावणी, पाऊस मुसळधारपणाने पडत असताना देखील डोक्यावर इरलें किंवा कांबळ्याची खोळ घेऊन करावयाची. ५० वर्षापूर्वीची ऐकलेली हकीगत आहे. या पावसाळ्यांत पावसापाण्यांत दिवस दिवस काम केल्यावर संध्याकाळीं ताडी-माडी प्यायली तरच अंगात पुरेशी ऊब यावयाची अशी स्थिती असे. आणि ज्या कोणास तीं विकत घेण्याची ताकद नसे त्यांनी तर लोखंडाच्या सळया विस्तवांत तापवून आंगावर चटके मारून घेऊन असल्या कृत्रिम व अघोरी उपायांनीं आंगांत ऊब आणावयाची ! पावसाळाभर शेतांत कांहींना कांहीं काम करावयाचेंच. आणि जर तो पाऊस नीट झाला तर भात नाचणी वरई वगैरे नीट पीकते, व पिकें हातीं येतात. नाहीं तर हाकाहाकच ! जंगलांतून, आंबे, काजू, कोकमची झाडें, फणस, आणि जांभळें, करवंदे, तोरणें अननस, बागांतून पपनस, केळी, नारळी पोफळी (म्हणजे सुपाऱ्या) शिवाय करंदें, कणगर आदि कंदमुळें (रताळ्याप्रमाणें) सांपडतील तीं खाऊन गुजारा करावयाची लोकांची रीत आहे. फणस व आंबे जर सपाटून झाले तर गरीबांचीही विवंचना दूर होते. असली ही शेती पुष्कळशी जपानी शेतीसारखी आहे. भूगोलाच्या पुस्तकांतून मुलें जपानी शेतीबद्दल व शेतकऱ्यांच्या हालांबद्दल कष्टांबद्दल कौतुक करीत असतात. पण कोकणांतील हाल रतिभरही कमी नाहींत.

जपानांत ज्याप्रमाणें चहास दूध मिळावयाचें नाहीं, कारण दुभती जनावरेंच कमी, त्याप्रमाणें कोकणांत जरी चहास दूध मिळालें तरी एकंदरीत दूध दुभतें कमीच. तेथील माणसे, गुरें सर्व लहान शरीराचीं. कारण त्यांस सारखी डोंगरांची चढ उतार करावयाची असते ! त्यामुळें तीं पुष्ट होणें, फोपशी होणें केवळ अशक्य. कोकणची गाय, म्हैस वेळेस फार तर २ तांबे भर दूध देणार, एवढें दूध देणारें जनावर म्हणजे चांगलें, उत्तम जनावर समजलें जातें. घोडीं फारशीं नाहींतच. १९२० पूर्वी प्रवासाचें मुख्य साधन म्हणजे पायीं प्रवास करणें होतें. क्वचितच रस्ते असल्यास बैलगाड्यातून, व खाडीचा प्रवास होड्यातून होई. आणि बायकामुलें यांचेकरिता डोली नावाचें वाहन असे. डोली म्हणजे पालखीसारखेंच दोन माणसांनी खांद्यावरून वाहून न्यावयाचें पाळण्यासारखें एक साधन. मी ५ वर्षांचा असतांना एकदा माझ्या काशीआत्यांबरोबर एकवेळ डोलींतून प्रवास केला होता असे आठवतें. अगदीं आज पाहिलें तरी रत्नागिरी या शहरांत एप्रिलच्या १० तारखेचे सुमारास (सन १९६६) मी S. T. स्टँडवर उतरलों, आणि प्रि. सुर्वे

यांचे घराकडे जावयास टांग्यांची चौकशी करूं लागलों, तेव्हां मला एकही टांगा मिळाला नाहीं. रत्नागिरी शहरामध्यें टांगे नाहींत ! (टॅक्सी आहेत, फार थोडया, खाजगी मोटारी आहेत, सायकली आहेत, बैलगाडया आहेत! अशा परिस्थितींत मला हमालाच्या डोक्यावर माझें सामान देऊन जवळ जवळ मैल दीड मैल चालत माझ्या इष्ट ठिकाणी जावें लागलें.

होडयांचे प्रकार कितीतरी असतात. पण मी मुख्य २।३ प्रकारच सांगतों. '' पडाव '' हे बरेच रुंद तळ असलेले सामानाची ने-आण वाहतूक करणारें महत्वाचें साधन (Flat bottomed vessels). यांची रुंदी ५–६ फुटापासून १० १२ फुटांपर्यंतही कधी कधी असते. त्यांस शिडांची सोय असते. वल्ही मारण्याचीहीं असते. '' उलडी '' या होडया मुख्यतः माणसांची ने-आण करणाऱ्या व त्यांतच किरकोळ सामान वाहून नेणाऱ्या या होडया असतात. देशांत नद्यांतून जशा होडया असतात, दिसतात, पंढरपूरच्या वाळवंटात नांगरून पडलेल्या किंवा पाण्यांत ये – जा करीत असलेल्या जशा होडया असतात तशाच्च या असतात. पण त्यांत एक महत्वाचा फरक असतो. या होडयांना शिडें असतातच. पण एका बाजूला सुमारे ६।७ फूट मध्यें अंतर ठेऊन जवळ जवळ तेवढयाच लांबीचीं दोन सारखीच लाकडे होडीस लांबीच्या एका बाजूस काटकोन करून जोडलेलीं असतात.आणि या दोन जोडलेल्या लाकडांच्या दुसऱ्या टोकांस एक जरा जड, जाड असें लाकूड होडीस समांतर असें आणि पाण्यांत टेकेल अशा उंचीवर राहीलसें जोडलेलें असते. या योजनेमुळें या होडया उलटया होऊन पाण्यांत खाडींत सहसा बुडत नाहींत असें सांगतात. उलडी मधून१०।१२ माणसांचा प्रवास होवूं शकतो. आतां तिसरा प्रकार म्हणजे '' तर '' होडी. ही फार अरूंद फार तर तीन फूट रुंद आणि १२–१५ फूट लांब असते. हिच्यांत माणसास फार जपून बसावें लागते किंवा उभेंच रहावे लागतें. मासेमारी नांवा पुष्कळच प्रकारच्या, वर वर्णन केलेल्या तीन प्रकाराचा किरकोळ बदल केलेल्या, लहान-मोठया असतात. बहुधा सर्वच नावाडी, मुसलमान असतात. येत्या एप्रिलांत कोळंब्यास जातां येतांना एकवेळ '' आदम '' मिय्यांच्या तर एक वेळ '' कादर '' मिय्यांच्या उलडीमधून मी प्रवास केला. हा प्रवास भरती ओहोटीच्या वेळा लक्षांत घेऊन ( ताणावर ) करतात. मी प्रवास केला त्यावेळी खलाशास अक्षरशः घाम गाळावा लागण्यासारखे श्रम करावे लागले. वारा नव्हता, एक वेळ उलटा होता, म्हणून शिडांचा उपयोग केला नाहीं. पण खलाशानें नांवाडयानें ८।१० फूट लांबीचा बांबू पाण्यांत रोवावयाचा आणि तो लोटीत पुढें होडीच्याकाठावर चालत जावयाचें ! म्हणजे बांबूच्या लांबी इतकी होडी पाण्यांत विरुद्ध दिसेनें पुढें जावयाची. पुनः बांबू

रोवावयाचा, पुनः तो रेटीत पुढें जावयाचें, असा हा प्रवासाचा प्रकार आहे! माझा जातानांचा प्रवास अगदीं सूर्योदयाआधीं कांहीं वेळ सुरू झाला तर येतानांचा प्रवास सकाळी ८ चे सुमारास सुरू झाला. दोन्ही वेळ जवळ जवळ सव्वा तास वेळ लागला. पाणी चढत होतें, संथ होतें वर लाटा फेमाळत नव्हत्या. दोन्ही अंगास मनोरम डोंगर होते. डोंगरावर पायापासून माथ्यापर्यंत झाडीच झाडीच, हिरवीगार पर्णराजी दिसत होती. त्यामुळें नयनसुख वाटत होतें, प्रवास सुंदर वाटला, ऊन नसल्यानें. १९२८ त मी कोकणांत हा असला प्रवास उत्तर कोकणांत- रत्नागिरी जिल्ह्यांत केशवसुतांच्या जावयाच्या गांवापासून- गांग्रई माझ्या आजोळच्या गावापर्यंत - गुडघें, रात्रीचेवेळीं केला. त्यावेळीं केशवसुतांचे मामा ती.महेश्वर मामा करंदीकर माझे सह- प्रवासी, वाटाडचे होते. पण चांदणें असलें तरी आकाशांत चंद्र दिसत नव्हता, मला पोहता येत नसल्यानें मी त्या प्रवासाच्या सुरुवातीस थोडा काळोखही भरीस असल्यानें, भ्यायलो होतों. पण चांदण्यांत, चंद्रप्रकाशांत असला प्रवास आल्हादकारक होत असेल, खात्रीनें ! तो प्रवास मी एप्रिल अखेर-अखेर मे चे सुरुवातीस असा केला होता. त्या वासिष्ठी नदीच्या काठच्या डोंगरावर झाडी कमी आहे होती, पुष्कळच; पण वेळ थंड आणि रात्रीची, म्हणून तोही प्रवास चांगला झाला.

या अलीकडच्या गोष्टी झाल्या. केसोपंतांच्या माझ्या आजोबांच्या काळांत म्हणजे १८६० ते १८९० पर्यंतच्या काळांत मुख्यतः हीच परिस्थिती असली पाहिजे. मोटारीचें नांवही त्या काळांत माहीत नव्हतें. आगगाडी पाहिलेलीं माणसेंही दुर्मिळच असत, असा तो कष्टदायक प्रवासाचा काळ होता. म्हणूनच बहुधा, त्या काळांत लोक प्रवास फार कमी करीत, ठराविक पंचक्रोशींतच जीवन कंठावें लागत असे.

रत्नागिरी जिल्ह्यांतल्या प्रवासाच्या गैरसोयी -सोयींबद्दल डॉ. रँग्लर रघुनाथराव ऊर्फ आप्पासाहेब परांजपे स्वतः च्या **"नाबाद८९"** या आत्मचरित्रांत पृ १५१-२ वर फार गम्मतीची व मनोरंजक माहिती देतातः- " · १८८८ सालीं मी पहिल्यानें मुंबईस जावयास निघालों. तेव्हां माझी लागोपाठ दोनदां परत पाठवणी झाली." कारण, या वाक्याआधींच ते लिहितात, " ·· धक्का नसल्यामुळें बोटीवर चढणें (पहाटे तीन वाजतां) म्हणजे एक सर्कशीतला खेळच होता. आधीं अपरात्रीं पाण्यांतून चालत वारक्या होडींत चढावयाचें, मग तींतून मचव्यांत, मचव्यांतून दूर उभी असलेली बोट गांठावयाची; बोट हालत असली तर वर चढणें म्हणजे जिवावरच बेतायचें. येथपर्यंत मजल गाठल्यावर जागा नाही म्हणून प्रवासी

कितीतरी वेळेला परत गेलेले आहेत···" ते जेव्हां केंब्रिजला १८९६ सालीं जाव-यास निघाले तेव्हां पावसाळ्याचे दिवस असल्यानें मंबई ते मुर्डी या प्रवासास त्यांस तब्बल चार दिवस लागले !

डॉ. परांजपे पुढें लिहितात (पृ. १५२)– "गेल्या वीस वर्षांत मोटारबस मुळें हा प्रवास बराचसा सोयीचा झाला आहे. रस्ते मात्र फारसे चांगले नाहींत. बराचसा पैसा खर्च केल्याशिवाय रत्नागिरी जिल्ह्याची सुधारणा होणार नाहीं. रत्नागिरी हा महाराष्ट्रांतला एक उपेक्षित जिल्हा आहे."

प्रख्यात कादंबरीकार कै. वा. म. जोशी यांच्या "नलिनी" या उपे–क्षित कादंबरीमध्यें आगबोटीच्या प्रवासाचें बोटीच्या डोलण्यामुळें, बोटीवरच्या सामानाच्या घरंगळत जाण्याचें, लोकांस बोट लागल्यामुळें होणाऱ्या ओकाबोकीचें वगैरे फार बारकाव्याचें सुरेख वर्णन वाचकांस आढळेल; व त्या प्रवासाची अल्पशी कल्पना येईल.

१९२३ सालच्या फेब्रुवारीमध्यें अगदीं मुंबई जवळच्या रेवस बंदरातून (तेथून कणकेश्वराच्या पायथ्याशीं असलेल्या बहिरोळें या गांवी मी गेलों असतां) मुंबईकडे जाता येताना बोट, मचवा, होडी, व शेवटी पाण्यांत पाय बुडवून प्रवास केल्याचें मला चांगलें आठवतें.

डॉ. परांजपे यानीं फार तळमळीनें त्यांचे चारित्रांतील हें "ग्रामसुधा-रणा" प्रकरण लिहिलें आहे. आणि एकूण सर्वच त्यांचे चरित्र, फार वाचनीय आहे. पहाः– "अंदमान हें छोटेसें हिंदुस्थानच होईल. तेथें एक संबंध आरमार तळ देऊं शकेल. भारत सरकारनें त्या बेटांकडे विशेष लक्ष द्यावें" शेवटीं ते लिहितात– "मी माझ्या उभ्या आयुष्यांत या बेटांतल्यापेक्षां अधिक आल्हाददायक सुट्टी घाल-विली नाहीं असेंच म्हणेन."

हे असले होडीचे प्रवास करीत असतांना, त्यांच्या आठवणी मनांत येत असतांना आंग्ल किंवा यूरोपीय लोकांच्या जीवनांत काव्य कसें उत्पन्न होत असेल तें पटतें; स्कॉटलंडमधील लॉकस् ( Lochs) मधून किंवा नॉर्वेच्या फिओर्ड ( Fiord ) मधून आपण होडींतून प्रवास करीत आहोंत काय, असें रम्य कल्पना-चित्र डोळ्यां-पुढें उभें राहतें. तिकडचे सुंदर संदर देखावे, (चित्रें अगर चित्रपटांत पाहिलेले

देखावे) आठवतात; थोडा सानंद अभिमान वाटतो.

त्याकाळांत (निदान १९२८ची गोष्ट अनुभवानें) सांगतों. "जिवाणूं" चीं सरपटणारे सापादि जनावरें यांची फार भीति असे. मी त्यावेळीं चिपळूणास देशावरच्याप्रमाणें संध्याकाळीं वावरत असे, तेव्हां कोकणातले माझे स्नेही मला इशारा देवून सावध करीत असत ... पण त्या संकटास तोंड द्यावयास घरांतल्या बायकाही तयार झालेल्या असत; आणि काठीनें असल्या जनावरांचा प्राण घेणें त्यांच्या सवगीचें असे.

रानांतली जनावरेंही या भागांत त्रास देतातच. अगदीं अलीकडची एप्रिल, ६६ मध्यें कोळंबे येथें मिळालेली माहितीच देतों. रानडुकरें यांचा शेतांत नेहमींच उपद्रव असतो. वाघही त्रास देतात. जनावरें मारून नेतात. अशा एका (नाक तें शेपटाचें टोक) ७ फूट लांब अशा मध्यम आकाराच्या मारलेल्या वाघाचें कातडें मी स्वतः पाहिलें, एवढेंच नव्हे तर त्या वाघाची बंदुकीने शिकार करणाऱ्या श्री. महेश्वरपंत आगाशे यांचे कृपेनें त्या कातड्यावर दुपारची वामकुक्षीही केली! वळणें या गांवीं केसोपंत १८८४-८५ सालीं राहत असतांना पडवीतलें एक जनावर एकदां वाघानें चढाई करून पळवून नेल्याची कथा ऐकली आहे. त्यानंतर श्रीमान् मंडलीकांच्या त्या घराच्या पडवीस उभे मजबूत गज लावून ती सुरक्षित करण्यांत आली. आणि गुरांकरितां एक स्वतंत्र असा मोठा बंदिस्त गोठा बांधून घेण्यांत आला. वाघास पळवून लावण्यास बहुधा गाडीच्या बैलांच्या गळचांत घुंगरें किंवा घंटा बांधलेल्या असतात; आणि पायीं जाणारे देखील रात्रीचे वेळीं घुंगरू लावलेल्या काठचा घुंगरू वाजवत, काठचा रस्त्यावर आपटत चालतात.

आतापर्यंत थोड्याफार चिकाटीनेंच वाचत आलेले वाचक विचारतील, "काय हो, हें सर्व कोंकण, कोकणची रहाणी, कोकणचीं, घरें कोकणचीं, प्रवासाचीं साधनें, वगैरे केशवसुतांच्या चरित्राशीं असंबद्ध असा मजकूर पानेंच्या पानें देण्यांत तुम्ही काय साधत आहांत? आमच्या तर सहनशीलतेला हा ताण आतां सहन होत नाहींसा झाला आहे..." त्यावर मी माझ्या स्वतःचें असें उत्तर न देतां अलीकडचें भूगोल शास्त्रीय उत्तर देतों. अलीकडचें भूगोल--शास्त्र सांगतें, सर्व प्रथम भूपृष्ठ रचना, व भूगोलावरील एखाद्या प्रदेशाचें स्थान यास मानवी जीवनांत सर्व प्रथम स्थान! त्या प्रदेशाच्या विशिष्ट ठेवणीचा, त्या स्थानाचा, तेथील हवामानावर व वनस्पति सृष्टिवर परिणाम; त्या सृष्टिला अनुकूल अशीच पशु-पक्षी सृष्टि व मानवी जीवन असतें! मानवी जीवन घडलें जातें तें अशा सृष्टि-

रचनेमध्यें. जपानी लोकांस म्हणे मृत्युचें भयच वाटत नाहीं, ते सदा गंभीर, व स्त्रिया तर नेहमींच कृत्रिम हास्य तोंडावर धारण करून असतात. कारण उघड आहे. तेथें वारंवार भूकंप होतात, सृष्टिरचना खडतर; तेव्हां जीवन म्हणजे एकप्रकारचा संग्रामच. पण आतिथ्यशील स्वभाव म्हणून जपानी स्त्रिया फार प्रसिद्ध आहेत. जपानी लोकांची हुषारी, कार्यकुशलता, उद्योगशीलता, कष्टांस संकटांस तोंड देणें, धैर्य आदि गुण कोकणच्या मुलुखांत व लोकांतही समान परिथितीमुळें आढळतात. जपानांतील घाणच कधी कधीं कांहीं लोक दाखवतात, आणि "गैशा" म्हणजे जपान, असें त्या देशाचें विकृत चित्र पुढें करतात; त्याचप्रमाणें अलीकडे द्रव्यैक-दृष्टि कादंबरीकार कोकणांतील जुन्या काळचे (आतां ती पद्धति नष्ट झाली आहे,) खोत म्हणजे एकप्रकारचे गुंड व भ्रष्ट लोक, आणि स्त्रियांस भ्रष्टवणारेही, अशी कांहींतरी विकृत चित्रें काढतात. तें खोटें कोकण होय, खरें कोकण निराळेंच आहे. ज्या कोकणातून पेशवे, लो. टिळक, केशवसुत आदि नररत्नें निर्माण झालीं, त्याच कोकणांतून त्याच रत्नाच्या गिरी मधून पुढे मार्ग देखील रत्नें बाहेर पडतील अशी माझी श्रद्धा व खात्री आहे.

मला वाटतें हें एवढें समर्थन पुरे आहे. आतां ज्या दामले कुटुंबातील "सरस्वतीच्या लाडक्या पुत्रां" बद्दल हा ग्रंथ लिहावयाचा ह्या दामले कुलाची व त्यांच्या मूळगांवची माहिती सांगणें क्रमप्राप्त होईल.

दामले कुळाचा वंश वृक्ष जो मिळाला तो स्वतंत्रपणानें ग्रंथारंभीं छापलेला आढळेल. त्यावरून आम्हांस माहीत असलेला पुरुष केशव हा साधारणपणाने पानपताच्या सुमारास किंवा आधींहीं हयात असावा. तो बहुधा दामल्यांचें मूळगांव, रत्नागिरीपासून काजळी नदीच्या पात्रामधून किंवा भाट्याच्या खाडीमधून देशा-कडे होडींतून प्रवास करीत गेल्यास ४।६ मैलांवर आणि नदीच्या दोन्हीं तीरांवर वसलेलें असें जें कोळंबें गाव, तेथें रहात होता. रत्नागिरीकडून जातांना उजव्या तीरावर बराच मोठा भाग आहे, गांवचा, देवस्थानें ही आहेत याच बाजूस, पण डाव्या तीरावरही कांहीं वस्ती आहेच. त्या डाव्या तीरावरच्या वस्तीस "खालचा वठार" म्हणतात. "वठार" हा विभाग या अर्थानें वापरला जाणारा शब्द होय. उजव्या तीरावर "मधला वठार" व "वरचा वठार" असे दोन भाग आहेत. प्रत्येक वठारावर ब्राम्हण वस्ती प्रमाणेंच कुळवाडी, वगैरे इतर वस्ती ही आहे. एकूण अंदाजें २५–३० ब्राम्हणांचीं घरें, कुटुंबें असून बाकीची इतर वस्ती होय, सर्व वस्ती. अंदाजें दीड हजार आहे. गांवास ग्रामपंचायत आहे, पण ती एप्रिल १९६६ त सरकारजमा झाली होती. १५-१६ दामल्यांचीं घरें, ४ आगाशांचीं घरें, भिक्षुक

म्हणून आणलेलीं, केळकरांचीं ४ घरें, आणि शिवाय फडके यांचे, जोशी, व देवळ यांचीं प्रत्येकीं एक एक अशीं घरें, नांदतीं आहेत. कांहीं कांहीं घरांचे केवळ चौथरेच आढळतात.

ग्रामदेवता, ' त्रिमुखी ' हिचें देवालय मोठ्या विभागाकडे आणि डोंगरावर आहे. तें " वरचा " व " मधला " वठार यांचेमध्यें आहे. त्या शिवाय गंगेश्वर व नागेश्वर अशीं दोन शंकराचीं चांगलीं देवळें मला दाखविण्यांत आलीं. मुख्य गावाकडे जातांना चांगला ५।६ फूट रुंदीचा दगडांनीं बांधून काढलेला रस्ता आहे. हा पेशव्यांनीं बांधून दिला. नागेश्वराचें देऊळ मुख्यतः आगाशे कुटुंबीयांचें असून त्या देवळाकडे जावयास दगडी पायऱ्या आहेत, सुरुवातीसच एक दगडी कमान आहे. देवालयाचा प्राकार दगडांनीं फरशी केलेला आहे. ६ दीपमाळा आहेत, आजूबाजूस १२ दगडांनीं बांधलेले असे पिंपळपार आहेत, (अर्थात् वृक्ष आहेतच.) म्हणून हें देवस्थान स्वयंभू असावें, व नंतर तेथें देवालय बांधण्यांत आलें असा तर्क करतात. तें बरेंच जीर्ण झालें होतें. अलीकडे बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचे संचालक कै. श्री. चंद्रशेखर आगाशे तेथें गेले असतां ग्रामस्थांच्या विनंतीवरून त्या देवळाच्या जीर्णोद्धारास मोठा हातभार लावण्याचें त्यानीं आश्वासन दिलें. पण त्यांचा लवकरच जरीं कैलासवास झाला तरी त्यांचे चिरंजीवांनीं तें आश्वासन पाळलें, व त्या देवस्थानचा त्यांचेमुळें व ग्रामस्थ व अन्य आगाशांच्या खटपटीनें जीर्णोद्धार झाला. गंगेश्वर या देवालयाचाही अलीकडे जीर्णोद्धार झाला, पण त्या कामीं समस्त गांवकऱ्यांनीं हातभार लावला.

कोळंबें गाव निसर्गरम्य आहे. मधल्या वठाराकडून ( त्यांतच आगाशे बाग – आगाशे कुटुंबीयांचा भाग-आहे ) वरच्या वठाराकडे जातांना एक लहान नदी आहे. तिच्यावर कोयना डॅम - भिंत-आहे, तशीच म्हणजे त्या आकाराची भिंत अलीकडेच बांधलेली असून वरचे अंगास नदीचे पाणी अडवून धरलेलें आहे. हा बांध किंवा भिंत जवळ जवळ शंभर फूट लांब असून वरच्या अंगास ६–७ फूट रुंद, पण खालच्या अंगास निदान २०–२५ फूट रुंद असावी. या धरणामुळें गांवच्या पाणीपुरठ्याचा प्रश्न सुटल्यासारखा दिसतो. एप्रिलांत (१९६६) देखील मी वरच्या अंगास पुष्कळ पाणी पाहिलें. त्या बांधावरूनच मी ग्रामदेवता त्रिमुखीचें देऊळ पहावयास गेलों.

गांव Garden - Village आहे. प्रत्येक घराभोवतीं बाग आहे, निरनिराळ्या फळझाडांची. चाकांचे, लोटच्यांचे रहाट फिरत आहेत कांहीं घरांत, विहिरींवर. झाडी आहे पुष्कळ, त्यामुळें अगदीं शांत शांत, रम्य वाटतें. मी ज्या घरांत

राहिलों त्या आगाशे यांचेकडे बॅटरीवर चालणारा रेडिओ असल्यामुळें (गावांत सध्या वीज नाहीं; पण लौकरच येईल) आपण जगापासून दूर नाहीं याची खात्री पटली. टपाल रोज मिळतें, गांव थोडाफार सधन असावा, कारण या एकाच गावांतून दरसाल निदान ५० हजार आफूस (किंवा हापूस)च्या आंब्यांची कलमें करून महाराष्ट्रांत सर्वत्र पाठविलीं जातात. कांहीं कुटुंबीयांचा कलमें बांधणें व तीं पाठवणें हा प्रमुख धंदा आहे. त्याचप्रमाणें या गांवचा कलमी आंबा, रत्नागिरी आफूस या सर्वमान्य जातींत श्रेष्ठदर्जाचा आंबा असून या गावांतून कांहीं हजार आंब्यांच्या पेट्या दरसाल परगांवीं जातात अशी माहिती कळली. मोटार रस्ता झाला, किंवा दळणवळणाची जास्त चांगली सोय झाली तर हा गांव आणखी सधन होण्याचा संभव आहे. पण त्याच बरोबर कूळ कायदा, ब्राम्हण द्वेष, वगैरे अनिष्ट गोष्टींचा ही सर्व ठिकाणांप्रमाणें या गावांत प्रसार झाल्यानें भविष्य काळाबद्दल साशंकता वाटते, पण तेथील तरुण ब्राम्हण मात्र कष्टाळ, उद्योगी, असून प्राप्त परिस्थितीस यशस्वीपणानें तोंड देत असलेले, आशावादी दिसले. ग्रामस्थ दामले मंडळींनी मला सहकुटुंब व चांगली फुरसद घेऊन गांव पहावयास या म्हणून आमंत्रण दिलें. पण हें कांहींच नाहीं; दामले कुटुंबीय असेंही म्हणाले, "तुमचा चौथरा, जोतें, जर गावांत मिळालें तर उत्तमच, या व त्यावर लहानसें घर बांधून रहा; नाहींतर आम्ही मंडळी तुम्हास थोडी जागा देऊं त्यावर घर करा"! कोकणस्थांची महान् चिक्कू लोक, आदरातिथ्यशून्य लोक, तुटक स्वभावाचे म्हणून कीर्ती आहे. आतां माझा वरचा प्रत्यक्ष अनुभव व ही ऐकीव कीर्ति यांची सांगड वाचकांनीं आपापल्या अनुभवांप्रमाणें घालावी.

या कोळंबें गावाची वसाहत जुनी आहे. पण पेशवाईच्या अस्तानंतर सर्वत्र महाराष्ट्रभर एका प्रकारचें अराजक माजलें, त्याची झळ यागावासही लागली. पेंढारी लोक किंवा असेच गुंड लोक दरसाल कांहीं एक "गुंड"कर, मोठी रक्कम गांवकऱ्यांकडून वसूल करूं लागले. पण त्यांची भूक तेवढ्यानें शमली नाहीं. त्यानीं पुढें गांवच लुटण्यास,बुडवण्यास सुरवात केली! तेव्हां सर्व ब्राम्हण कुटुंबें भीतीनें गाव सोडून गेलीं. पण १५-२० वर्षांनंतर त्यांतील पुष्कळशीं कुटुंबें पुनः परत आलीं, व त्यानीं आपापलीं घरें ताब्यांत घेतलीं, दुरुस्त केलीं, यथाकाल यथाशक्ति वाढवलीं. पण फार पूर्वीं सुमारें २५० वर्षांपूर्वी या गांवांत जीं दोन प्रमुख कुटुंबें,दामले व आगाशे आलीं तीं मूळ गुहागर या गावामधून येथें आली ! आणि त्यानंतर हा गांव दामल्यांचा, प्रमुखतः झाला. पेंढाऱ्यांच्या किंवा गुंडांच्या उपद्रवामुळें जीं कांहीं कुटुंबें गांव सोडून गेलीं, व कधीच परत आलीं नाहींत, त्यांतील आमचें, तसेंच गोव्याचे लेफ्टनंट गव्हर्नर श्री. के. आर.दामले यांचें कुटुंब असावें; गांव सोडून गेलेला

आमचा पुरुष वल्लाळ (किंवा जास्त संभवनीयता मोरेश्वर या पुरुषाची वाटते) असावा. आमचें कुटुंब नंतर चिपळूण जवळपास राहिलें, व ले. गव्हर्नर दामले यांचें कुटुंब साखरपें येथें राहिलें.

केशव हा मूळ पुरुष कोळंब्यांत राहिला. त्याचा मुलगा बल्लाळ (किंवा नातू मोरेश्वरही असेल) हा पुरुष आंधळा किंवा पांगळा झाला होता; आणि श्री आमणेश्वर या देवस्थानीं देवाची सेवा केल्यामुळें त्याचें व्यंग नष्ट होऊन तो पुरुष पुनः निर्व्यंग झाला. या मोरेश्वराचा भाऊ सखाराम असें नांव आढळतें. पण त्यांचा वंशवृक्ष मिळाला नाहीं. दामले कुटुंबातला एक पुरुष सुभेदार होता. त्यानें कांहीं सैन्यांत पराक्रम केला होता, आणि त्यामुळें पेशव्यांनीं त्याचेवर खूष होऊन गावांत जाण्यास-येण्यास दगडी रस्ता बांधून दिला अशी माहिती कळली. आमच्याच कुटुंबांतली एक मुलगी पुण्याच्या जोगेश्वरीच्या बोळांतल्या एका घराण्यांत दिलेली होती असें एका जुन्या (हातीं लिहिलेल्या, पण आतां नष्ट झालेल्या) कागदावर वाचलेलें आठवतें. रावसाहेब मंडलीक यांचे चरित्रांत त्यांची एक बहीण दाभोळची "दामली" असा उल्लेख असणारी, पण तिची परिस्थिति त्यांचे मानानें खराब असलेली आढळते. ● तिला त्यानीं पुढें मदत केलेली आहे. या स्त्रीचा व आमच्या घराण्याचा कांहीं संबंध होता किंवा काय हें कळत नाहीं. श्री हवालदार या लेखकांनी फार परिश्रमपूर्वक लिहिलेलें रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक या थोर गृहस्थांचें चरित्र मी मुद्दाम वाचलें, पाहिलें. त्यांत माझे आजोबा व ते स्वतः यांचे मित्रप्रेमाच्या हकीगती आढळतील अशी मोठी आशा वाटत होती. पण त्या ग्रंथांत केसोपंत यांचे चिरंजीव चिंतोपंत दामले यांचे एक पत्राचा व त्यास पाठलेल्या सोनगांवच्या व्यवस्थेबद्दल एका जमिनीच्या सरहद्दीबद्दलच्या तंटयाबद्दल, तो तंटा तडजोडीनें, गुण्यागोविंदानें सोडवावा, कटकटी वाढवू नयेत असा मजकूर असलेल्या

---

● तळ टीप नं. १ :– रावसाहेब मंडलीक चरित्र, पृ. १३ पहा. त्याचप्रमाणें तेंच चरित्र पृ. ४४९–५० पहा. त्यावर रावसाहेब व त्यांच्या मातोश्री यांचा संवाद दिला असून त्याचा समारोप म्हणून "तथापि हा मातोश्रींचा शब्द रावसाहेबांनीं खाली पडू दिला नाहीं. सौ. माईस एक घर वाडी ठिकाण विकत घेऊन बक्षीस करुन दिलें." असा मजकूर आहे.)

उत्तराची ⊛पत्राचीच फक्त नोंद, माहिती आढळली! पण ऐकीव माहिती अशी कीं राव-साहेब व केसोपंत हे बाळपणींचे मित्र, व त्यांचें मित्रप्रेम यास श्रीकृष्ण-सुदामा यांची उपमा देतां यावी असें. ∵ यावरून माझी " कृष्ण-सुदामा " ही उपमा चुकीची ठरते. रावसाहेबांचे प्राथमिक शिक्षण " मुरुडास शाळेत झाले " (त्यांचें स्वतःचें गांव). येथें झाल्याचा त्यांचें चरित्र पृ. १७ वर उल्लेख आहे.

हें सर्व जरी श्री. हवालदार यांच्या रावसाहेब मंडलीक चरित्राचे आधारानें खरें असलें, तरी जी ऐकींव माहिती लहानपणापासूनची-मोरोपंत, सीतारामपंत, चिंतोपंत, परशरामपंत, यांचे तोंडची ऐकलेली माहिती ती जमेस धरतां केसोपंत- रावसाहेब यांचे संबंध जवळचे घनिष्ट होते यांत शंका नाहीं.

या शिवाय आणखी एक पुरावा पहा. मी मोरोपंत चरित्र यांत त्यांचें एक १८९३मधील पत्र दिलें आहे. त्यामध्यें दाभोळच्या श्री. रानभाऊ दामले यांचा उल्लेख आहे. हे रावसाहेबांचे मेहुणे-माई दामलीचे यजमान किंवा दीर किंवा जवळचे नात-लग असावेत असा माझा तर्क आहे. माझे आजोबा चरित्रनायकांचे वडील केसोपंत यांचा जन्म, शिक्षण, बाल्य वगैरे चिपळूणच्यां आसपास सोनगांवीं गेलेलें असावें. त्यांचें शिक्षण त्या काळच्या मानानें चांगलें झालेलें असेल. मराठी ७ वी ची परीक्षा त्याकाळीं होती कीं नव्हती तें माहीत नाहीं. तसेंच शाळा होत्या किंवा नव्हत्या हें ही माहीत नाहीं. पण त्यांचा लौकिक, शिक्षक या नात्यानें त्यांचा लौकिक, व रत्नागिरी जिल्ह्यांतील स्थान, फार उंच, लो टिळक यांचे वडील कै. श्री. गंगाधर-शास्त्री टिळक यांच्यासारखें उंच व मोठें होतें.

---

⊛ तळ टीप नं. २ :– रावसाहेब मंडलीक चरित्र, भाग २ रा. पृष्ठ ९५५ पहा. " – तंटा वाढविण्याचा नाहीं हा पहिला व्यावहारिक युक्लिडचा सिद्धांत पोटांत ठेवावा. "

∵ तळ टीप नं.३:–रावसाहेब मंडलीक चरित्राप्रमाणें त्यांचा जन्म सन१८३३ चा आहे (पृष्ठ १२पहा.), आणि त्यांचाच मृत्यु १८८९सालीं ९ मे रोजीं झाला.

# केसो विठ्ठल दामले

केसोपंत हा पुरुषच आमच्या शाखेंतलें पहिलें रत्न समजावयास हरकत नाहीं. त्यांची पिढी किंवा त्यांच्या वरच्या पिढींतील अन्य माणसांची जी मला थोडीफार माहिती आहे ती त्यांचे एक चुलत भाऊ हरी सदाशिव किंवा हरीकाका आणि त्यांचे पुतण्ये गणेश गोविंद किंवा गणू बाबा यांचीच. पैकीं हरीकाका यांस १९२३ च्या फेब्रुवारी-मार्च मध्यें मी पाहिलेलें आहें, त्यांचेपाशी थोडें बोललों देखील आहे. त्याचप्रमाणें १९२८ मध्यें ही त्यांस एकवार पाहिले असावें. ते साधारणपणानें चिंतोपंतांच्या ( माझे चुलते व कवि केशवसुत यांचे थोरले बंधु ) बरोबरीचे किंवा फार तर १।२ वर्षांनीं मोठे. आणि गणूबाबा हे देखील साधारण त्याच वयाचे; पण त्यांस मी कधींच पाहिलेलें नाहीं, त्यांचे बद्दल ऐकलें आहे मात्र थोडें फार. हरीकाका काय किंवा गणू बाबा काय, केसोपंतांच्या मुलांसारखेच असावेत. यापेक्षां अन्य कोणाही व्यक्तींबद्दल मी ऐकलेलें देखील नाहीं.

केसोपंत हे १८९३ मध्यें ६६–६७ वर्षांचे होवून खेड येथें निवर्तले. याचा स्वाभाविक अर्थ त्यांचा जन्म १८२६-२७ सालचा धरावयास हरकत नाहीं. त्यांचें बालपण व शिक्षण रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांचे सन्निध्यांत झाले असावें; व त्यावेळीं त्यांचा विशेष प्रकारचा स्नेह जुळलेला असावा. तो केसोपंतांचे मृत्युपर्यंत कायम होता. एवढेच काय पण त्यांचे मृत्युनंतर आणि रावसाहेबांचे मृत्यूनंतरही त्याच्या खालच्या पिढीनें, केसोपंताचा शिकूं न शकलेला मुलगा चिंतोपंत यांचेकडे त्यांच्या वळणें व सोनगांव या दोन दापोलीजवळच्या खोतीगांवची व्यवस्था जवळ जवळ १९१० पर्यंत ठेवलेली होती. असा हा त्यांचा स्नेह होता. केसोपंतांचे व्यक्तिमत्वाबद्दल मला ऐकीव माहिती आहे. ते गोरे, साडेपांच फूट उंच शरीरानें स्थूल ही नाहींत, किरकोळही नाहींत असे, मुद्रेवर जरा रागीटच, पाणीदार डोळ्यांचे, स्वतंत्र व तीक्ष्ण बुद्धीचे, स्वतःबद्दल दरारा किंवा भीति निर्माण करूं शकतील असे, शिस्तीचे भोक्ते, व त्याकाळचे मानानें विद्वान

गृहस्थ होते. त्यांच्या गरीबीमुळें असेल, त्यांचा विवाह माझे कल्पनेप्रमाणें आणि त्या काळच्या मानानें जरा उशीरा असा १८४२ चे सुमारास झाला असावा. त्यांची पत्नी मालदोलींच्या श्री. गणपतराव करंदीकर या श्रीमान् खोतांची एकुलती एक कन्या होती. तिचें सासरचें नांव अन्नपूर्णाबाई होतें. विवाहाचे वेळीं बहुधा केसोपंत हे नोकरीस लागले नसावेत; पण लौकरच त्यांस शाळा खात्यांत नौकरी मिळाली असावी. कदाचित् ही नौकरी उमेदवारीची असेल, खाजगी असेल. पण सरकारी लोकलबोर्डाच्या शाळांतून त्यांनीं पूरी ३० वर्षे किंवा वयाची ५५ वर्षें व्हावयाला १।२ वर्षे कमी मुदतीची नोकरी केली असें मी ऐकलेलें आहे. बहुतेक १८८१–८२ मध्यें म्हणजे त्यांचे थोरले चिरंजीव श्रीधरपंत B A. होण्याचे सुमारास ते सेवानिवृत्त झाले आणि त्या दृष्टीनें पहातां त्यांनी सरकारी शाळा खात्यांत नोकरीस सुरुवात १८५० नंतर १।२ वर्षांनीं केली असावी असा हिशोब होतो. त्यांची नोकरी रत्नागिरी जिल्ह्यांत उत्तरेस दाभोळ पासून दक्षिणेस मालगुंड पर्यंत दहाबारा ठिकाणीं झाली. पैकीं दाभोळ, खेड, रत्नागिरी व मालगुंड या गांवीं ती निश्चितपणानें झालेली मला माहीत आहे; इतर गावांची माहिती नाहीं. या गावांचे बद्दल, तेथील नोकरींबद्दल यथाक्रम कांहीं हकीगती देईन. त्यांचे ६६–६७ वर्षांचा स्थूल मानाचा आराखडा हा असा आहे.

केसोपंत–अन्नपूर्णाबाई या जोडप्यास पहिला अपत्यलाभ १८५३ मध्यें म्हणजे केसोपंत हे २६-२७ वयाचे आणि अन्नपूर्णाबाई १८-१९ च्या असतांना झाला. ही गोष्ट माझे मतानें केसोपंतांच्या स्वभावावर चांगला प्रकाश टाकणारी आहे. त्या काळच्या मानानें पहातां त्यांस ४।५ वर्षे आधींच, निदान, ३।४ वर्षे आधींच हा लाभ घडावयास हरकत नव्हती, स्वावलंबी, आपले व होणाऱ्या पोराबाळांचें आपण योग्य प्रकारें पालनपोषण करण्यास समर्थ झाल्यावरच शक्यतर अपत्य प्राप्ती व्हावी असा दंडक त्या जोडप्यानें पाळलेला असावा. तरुणपणांतील निदान ३।४ वर्षें त्यांनीं नैष्ठिक ब्रम्हचर्याचें पालन केलें असलें पाहिजे असा साधार तर्क करावा लागतो. तरच या घटनेचा उलगडा होईल. त्यांच्या या अपत्याचें नांव बाळकृष्ण ठेवलें होतें. त्या बालकाचा जन्म कोठे झाला तें माहीत नाहीं. त्यावेळपर्यंत केसोपंतांचा पगार कदाचित् ५।६ रुपयांपर्यंत चढलेला असावा; कारण त्यांस सुरुवातीस केवळ दरमहा रुपये तीन पगार मिळत असे अशी माहिती आहे. पण त्याकाळीं तीन रुपयांची किंमत फार होती १८५५ त त्यांस आणखी एक मुलगा झाला. पण तो अल्पायुषी होता अशी माहिती आहे. त्यानंतरचें अपत्य १८५७ च्या बंडाच्या किंवा स्वातंत्र्य युद्धाच्या

धामधुमीच्या काळांतील श्रीधरपंत होत. हे श्रीधरपंत केसोपंतांच्या आयुष्यांतच काय पण महाराष्ट्राच्या जीवनांतही कवि केशवसुतांप्रमाणेंच महान भर टाकणारे ठरले असते, तसें Promise तशा आकांक्षा त्यांस जाणणारी मंडळी त्यांचे बद्दल देत होते. पण याबद्दल ग्रंथाचे अखेरीस जें त्यांचे चरित्र लिहिलें जाईल त्यावेळेस जास्त माहिती देईन. यांचे पाठीवर यमुना किंवा आक्का ही मुलगी १८५९।६० त जन्मली. तिचे पाठीवर १८६२।६३ मध्यें चिंतोपंत यांचा जन्म झाला असावा. हे चिंतोपंत लहान, एक वर्षांच्यापेक्षां लहान, असतांना एकदा केसोपंत कुटुंब होडीतून प्रवास करीत असतांना होडी उलटली, आणि त्यावेळीं अंदाजें १० वर्षाचा पोहणें येणारा मुलगा बाळकृष्ण मृत्यु पावला ! इतर बहुतेक सर्व मंडळींस वाचवण्यांत आलें, चिंतोपंत बुडत असतांना त्यांचे आईचे दृष्टीस यांचा एक पाय दिसला व तिनें तो ओढून त्यास वाचवलें! अशाप्रकारें चिमुकला चिंतु वाचला; पण पोहणें येणाराही, थोडा बळकट, बाळू मात्र जीवास मुकला! असा हा अपघात केसोपंतांच्या आयुष्यातील पहिली दुःखपूर्ण घटना (किंवा २ री म्हणूं या, कारण यापूर्वीं एका अल्पवयीन मुलाचा मृत्यु घडलेला होता) ठरली.

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील आमचे घराण्याचे उपाध्याय श्री. गजानन उर्फ रामचंद्र गोविंद भट घैसास यांचे मला आलेलें पत्र दि.६।५।६६ चें,या पत्रावरुन केसोपंतांनीं शके १७७४ म्हणजे इ.स. १८५२ मध्यें त्र्यंबकची यात्रा केली असावी. यात्रेचें कारण कळत नाहीं. त्यांचे पत्रांतील खालील उतारा पहा :-

> शके १७७४–केशव विठ्ठल,अजे मोरेश्वर बल्लाळ,चुलते पांडुरंग, सदाशिव बंधु गोविंद, उपनांव दामले ,गांव कोळिंबें, हल्लीं सोनगांव, नजीक परशुराम, तालुके सुवर्णदुर्ग.

या उताऱ्यावरून ते १८५२ मध्यें चिपळूण जवळच असणाऱ्या श्रीमान मंडलीकांच्या खोती गांवीं सोनगांवीं रहात होते. त्यांस नोकरी लागलेली नसावी. रावसाहेबांचा जन्म १८३३ चा आहे. ते श्रीमान्, रावसाहेब व्हावयाचे होते.

नोकरीच्या पहिल्या काळांतच केव्हांतरी केसोपंत हे दाभोळ या बंदरगांवीं जरा मोठ्या व बागाईतीच्या गांवीं शिक्षक होते.त्यावेळची त्यांचेबद्दलची आख्यायिका ऐकून त्याकाळच्या शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचे स्वभावाबद्दलचें एक गमतीदार दर्शन घडतें. एक मुलगा केसोपंतांच्या कडक शिस्तीस भीत होता. कदाचित् तो गुंड असेल,व त्यास केसोपंतांनीं चांगला चोपलाही असेल. पण तो वारंवार वर्गांत म्हणत असे, " गुरुजी मी जीव देईन. " एकवेळ केसोपंत म्हणाले असतील,

"कोणास बरें तूं ही धमकी देतोस, मी जीव देईन? बघतोंच कसा जीव देतोस तें." एकदां असाच कांहीं प्रसंग घडल्यावर केसोपंत खरोखरच त्या मुलास एका विहीरीवर घेऊन गेले. ते मुलास म्हणाले " तुला जीव द्यायचा आहे ना? तर मार उडी विहीरींत! तूं मारीत नसलास तर मी टाकतो तुला विहीरींत; दे,जीव दे !" आणि खरोखरच त्यांनीं त्या मुलास विहिरीत फेकून दिला! लौकरच तो आंतून ओरडूं लागला, " नको गुरुजी, नाहीं गुरुजी. मल वर काढा, वर काढा." त्याच्या नाका तोंडात पाणी शिरल्यावर व तो पाण्यास, मरणास,भ्यायल्यावर स्वाभाविकपणानेंच केसोपंतांनीं स्वत: पाण्यांत उडी मारून त्यास वर आणलें; त्याचा जीव वांचवला! या प्रकारामुळें गावांत कोणतीही खळबळ उडाली नाहीं. कोणाही पालकानें, हेडमास्तरांनी, अन्य कोणी केसोपंतास जाब विचारला नाहीं. उलट केसोपंतांचा दरारा वाढला, त्यांस लोक भिऊं लागले, त्यांचा सन्मानच झाला! आजकालच्या दिवसांत असली घटना स्वप्नांत देखील कोणास खरी वाटणार नाहीं. ही हकीगत १८६०–६२ च्या सुमाराची असावी.

१८६६ च्या रविवार भाद्रपद वद्य १४ शके १७८८ या दिवशी * कवि केशवसुत यांचा जन्म मालगुंड येथें झाला. त्याचप्रमाणें त्यांचे पाठचे बंधु, माझे वडील, मोरो केशव यांचाजन्म कार्तिक वद्य ७ शके १७९०या दिवशीं म्हणजे १८६८ सालीं नोव्हेंबर महिन्यांत मालगुंड येथें झाला. तेव्हां या दोन तारखांच्या आधीं व पाठीमागून कांहीं महिने तरी, माझ्या अंदाजाने जवळ जवळ १८६५ च्या सुरुवातीपासून १८६९ अखेरपर्यंत अंदाजें ५ वर्षें तरी केसोपंत हे मालगुंड या रत्नागिरी जिल्ह्यांतील जरा मोठ्या गांवीं, हेडमास्तर असावेत. ते मालगुंडच्या शाळेचे हेडमास्तर होते, ही माहिती मला अगदीं अलीकडे (एप्रिल ६६ मध्यें) मी मालगुंड येथें गेलों असतां तेथें मिळाली. एका प्रकारें मालगुंड गांवाला केशवसुतांच्या जन्मामुळें महत्व आलें आहे, आज, ही गोष्ट खरी आहे. हा गांव सध्यां S. T. नें रत्नागिरीपासून ३० मैल असून रस्ता क्वचित् अडचणीचा, कठीण, आहे. आडमार्गानें ते ठिकाण केवळ १३ मैल दूर आहे. केसोपंतांचे काळीं हा तेरा मैलांचाच खुष्कीचा मार्ग प्रवासयोग्य असावा. त्याशिवाय सागर मार्ग आहे, असेलच. कारण मालगुंड, व दक्षिणेतील व उत्तर पेशवाईतील पराक्रमी सरदार व इंग्रजीशाहींतील पटवर्धन संस्थानिक यांस प्रिय असलेलें श्री गणपति किंवा गजानन यांचें एक क्षेत्रस्थान, गणपति पुळें हें क्षेत्र, या दोन गावांमध्यें खाडी आहे. श्रीगणपति,

---

* या जन्मतारखेच्या वादाचे संबंधात या प्रकरणानंतर एक छोटेसें स्वतंत्र प्रकरणच पहावें.

पुळें या देवस्थानाच्या इमारतीच्या लगतच्या भागांस सागर-लाटा स्पर्श करतात. भरतो ओहोटीच्या वेळीं, देवळामधून फेसाळत फुटत असलेल्या लाटांचा सुंदर देखावा मी १४ एप्रिल, ( डॉ. आंबेडकर जयंति ) या दिवशीं सकाळीं १० चे सुमारास पाहिला तेंव्हां मालगुंड येथें केसोपंतांचे काळीं उलडी होड्यांमधून रत्नागिरीपासून दळण वळण होत असावेंच. या गावांत त्याकाळीही पोष्ट ऑफिस असेल आणि प्राथमिक शाळा ही मोठी, सात इयत्तांची होती अशी माहिती कळली. सध्यांच्या प्राथमिक शाळेची इमारत पुष्कळशी जुन्याच जागेवर उभी आहे अशी माहिती कळली. या शाळेपासून केशवसुतांचें जन्म स्थळ, श्री. फडके यांचें घर जवळ जवळ अर्धा-पाऊण मैल दूर आहे. त्या घराबद्दल थोड्या वेळानें लिहितों. पण प्रथम शाळेबद्दलची माझी आठवण सांगतो

मी त्या शाळेंत ती शाळा पहावी या हेतूनें ८॥-९ चे सुमारास माझे स्नेही "बळीराम परकर" हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. श्री. न. साठे यांचे बरोबर गेलों. त्यावेळीं शाळेंत डॉ. आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम सुरू होता. हेडमास्तर साहेब बाहेर आले; आणि त्यांस माझी ओळख व त्या गांवी जाण्याचा हेतु सांगण्यांत आला. त्यानीं मला डॉ. आंबेडकरांविषयीं दोन शब्द मुलांस सांगण्याची विनंती केली. मी ती आनंदानें मान्य केली. माझी मुलांना ओळख करून देण्यांत आली. ज्या शाळेंत माझे आजोबा शंभर वर्षांपूर्वी हेडमास्तर होते, त्याच शाळेंत मला एक छोटेंसें भाषण करण्याची संधि मिळाली हें मी माझें भाग्य समजतों. त्या भाषणाचे नंतर थोड्या वेळांत मला केशवसुतांच्याच "अंत्यज्याचे मुलाचा एक प्रश्न" ही सप्टें, १८८८ मध्यें लिहिलेली कविता आठवली, पण दुर्दैवानें तिचा उपयोग करतां आला नाहीं आणखी एक चूक मी केली . बाबासाहेबांच्या हुषारीचें वर्णन करतांना ते मॅट्रिकपासून B. A. पर्यंत संस्कृतचे मोठे स्कॉलर होते ही थोडी चुकीची माहिती कथन केली. त्या माझ्या प्रमादाबद्दल जर परलोकांतून ती. केसोपंत व त्यांचे सुपुत्र कृष्णाजीपंत, (केशवसुत) आणि माझे वडील मोरोपंत या सर्वांनीं हा प्रसंग पाहिला असेल तर ते मला खात्रीनें क्षमा करणार नाहींत. म्हणून माझी ही चूक मी जाहीर पणानें सांगून टाकून त्यांची क्षमा मागतों.

मालगुंडचे जें श्री. फडके यांचें घर केशवसुतांचें जन्मस्थळ म्हणून आज दाखवण्यांत येतें तें जरा अलग, गावाच्या एका बाजूलाच आहे. घराच्या पश्चिमेच्या बाजूस कांहीं एकर जागा-बाग - असून पलीकडे लगेच समुद्र असावा. कारण मी सायंकाळचे वेळीं तें ठिकाण पहावयास गेलों असतां समुद्राचा धीरगंभीर

आवाज अस्पष्टसा ऐकूं येत होता. घर आहे लहानसेंच. त्याचा चौथरा ३०'×६०' असा आज उभा असून त्यावर पडव्यांची जागा सोडून लहान घर मंगलोरी कौलांचें उभें आहे. समोरचे अंगास, उत्तरेस, थोड्या अंतरावर एक दगडी बांधलेली विहीर आहे. एप्रिलांतही पाणी १॥–२ पुरुषांवर म्हणजे अंदाजे १० फुटांवरच आहे. आवारांत आंबे, नारळ यांचे वृक्ष आहेत. आवार चांगलें प्रशस्त आहे. घरांत दोन लाकडी देव्हारे दोन लाकडी चौरंगांवर अर्धवट उभे, कलंडलेले आढळले. एका देव्हाऱ्यांत एक तुटलेली रुद्राक्षांची माळ आढळली. तो देव्हारा जरा आतल्या अंगाला होता. दुसऱ्या देव्हाऱ्यांत दोन शंख, एक अडणी दिसली. त्यांतील एक शंख थोडासा फुटला, तुटला, होता. देव्हारा व चौरंग यांचेमध्यें फटीमध्यें गंध उगाळण्याची मोठी दगडी सहाण आढळली. देव्हारे व चौरंग पुष्कळच चांगल्या अवस्थेंत आहेत. या वस्तूंशिवाय अन्य असें फारसें कांहीं घरांत आढळलें नाहीं. या वस्तू, देव, आमचे निश्चतपणानें नाहींत एवढें मी सांगू शकतों. ते त्या घरांत केसोपंतांचे नंतर जे कोणी कोणी राहत असतील त्यांचे उपेक्षित देव असावेत.

मालगुंड गांव हा कोकणांतल्या कांहीं चांगल्या सुंदर गांवांपैकीं एक गांव आहे. घरें भोवताली बागा असणारीं आहेत. हें एक Garden Township म्हणता येईल असें गांव असून तेथें आज एक चांगले, सुसज्ज असें हायस्कूल आहे. पण कवि केशवसुत यांचे जीवनांत या गावास फारसें महत्व नाहीं, हें येथें स्पष्टपणानें सांगून टाकतों. त्यांच्या सर्व काव्यांत "जन्मस्थान मदीय सुंदर असे त्या माल्यकूटांतल्या" वगैरे या नैऋत्येकडील वारा (१८९७-८) या काव्यांतील ८ वें कडवें सोडलें तर "मालगुंड" या गांवाचे नांवाचा उल्लेख याखेरीज अन्यत्र कोठेंही नाहीं. त्याचप्रमाणें त्या गांवाजवळच्या श्रीक्षेत्र पुळें येथील गणपतीचा ही उल्लेख कोठेंही नाहीं. यामुळें तर माझा असा तर्क आहे कीं "मालगुंड" बद्दल कवि केशवसुत यांचे मनांत नांवापेक्षां जास्त कांहींही आठवण नसावी, ते कधींही जन्मांत, त्या गावीं पुनः गेले नाहींत. अशा परिस्थितीमध्यें **त्यांचें केवळ जन्मस्थान** या पलीकडे मालगुंड गावास महत्व नाहीं पण गैर माहितीनें किंवा गैरसमजामुळें विद्वान् लोक त्या गावास आज फार महान् दर्जाचें महत्त्व देत आहेत! द्यावयाचेंच झालें तर दापोली जवळच्या वळणें या अति लहान, श्रीमान मंडलींकांच्या गांवास त्यांच्या जीवनांत महत्व देतां येईल, कारण त्या गांवीं ते बरेचवेळां गेलेले, राहिलेले आहेत. त्या गांवींही निसर्ग शोभा भरपूर होती-आहे. तिचा त्यांचे काव्यांत उल्लेख आलेलाही आहे.

१८७२ ते १८७५ या काळांत केसोपंत खेड येथें (रत्नागिरी जिल्ह्यांतील तालुक्याचा गांव) हेडमास्तर होते. त्या काळांत कृष्णाजीपंत यांचें प्राथमिक

शिक्षणाचा, शाळेत जाऊन, प्रारंभ झाला. कारण त्या गांवच्या शाळेंतील रजिस्टरांत त्यांचे नांव नोंदलेलें आढळतें. पण दुर्दैवानें त्यांत जन्मतारीख दाखल केलेली नाहीं! हा खेड गांव मी १९२८ सालीं मे मध्यें कांहीं तासच पाहिला. त्याकाळीं S. T. चा प्रवास नव्हता, पण खाजगी मोटार सर्व्हिसेस असत. काप-दापोली येथून खेडास माझ्या काशीआत्याबाई यांचेबरोबर मी आलों. त्यावेळीं श्री. गणपतराव कार्ले, वकील, यांचे घरीं ११ चे सुमारास उतरलों, जेवणें केलीं आणि ३।४ चे सुमारास महाडकडे जाणाऱ्या मोटारनें माझ्या दुसऱ्या एका आत्याबाईंकडे सौ. भीमाबाई प्रभाकरपंत आपटे यांचेकडे कळमणी बुद्रुक या गांवाकडे गेलों. खेड गांव मला फार रुक्ष वाटला, तसा मोठा गांव वाटला नाहीं. दुपारीं चांगला उकाडा होत होता. त्या गांवीं एका खाडीचा फाटा - तिचे नांव "जगबुडी" आहे, (पण तिला केशव-सुतांनीं काव्यांत "जगदुद्धरा" केलें आहे. ) गांवातून कुठून तरी जातो. पण समुद्रापासून फार दूर असें हें गांव आहे. या गांवाबद्दल सीतारामपंतांचे तोंडून, काशीआत्याचे तोंडून तो रुक्षच आहे असें ऐकलेलें आहे. अलीकडे त्याच गावचे रहिवाशी, वेळगांवचे प्रा. अनंत मनोहर यांचेही सांगण्यावरुन गांव खराच रुक्ष आहे, आजूबाजूस उघडे बोडके डोंगर आहेत, ते तापतात, व गांवास ऊष्णता देतात! अशा या गावीं केसोपंत नोकरी करतांना तर राहिलेच; पण पुढें १८८६-८७ पासून त्यांचे मृत्युपर्यंत १८९३ पर्यंत ही राहिले. कदाचित् त्या गांवांत त्यांच्या चांगल्या ओळखी झाल्या असतील, म्हणून किंवा अन्य कारणांनीं तो गाव त्यांस आवडत असे, असें मी ऐकलें आहे! नागपूरचे मराठीचे विद्वान प्रा. शं. दा. पेंडसे यांचे वडिलांच्या किंवा आजोबांच्या घरांत केसोपंतांचें बिऱ्हाड होतें असें ऐकलें. वर उल्लेख केलेले श्री. गणपतराव कार्ले हे सीतारामपंतांच्या वयाचे. पण त्यांचे वडील रंगोआप्पा हे आणि कोणी एक श्री. कुटुंबे हे केसोपंतांचे स्नेही होते. आणखीही कांहीं मंडळी त्यांची स्नेही होती. पण माझ्या लक्षांत हीं दोन नांवें चांगलीं राहिलीं,अन्य नाहीं. आतां केसोपंतांच्या शेवटच्या वर्षांच्या हकीगतीचे वेळीं खेडबद्दल जास्त कमी लिहीन.

खेड नंतर बहुधा केसोपंतांची बदली १८७५चे सुमारास रत्नागिरी या जिल्ह्याचे गांवीं झाली असावी. कारण त्यांचा ज्येष्ठ मुलगा श्रीधर हा १८७८ मध्यें रत्नागिरी हायस्कूल मधून मुंबई विश्वविद्यालयाची मॅट्रिक परीक्षा चांगल्या प्रकारें पास झाला. तो रत्नागिरीसच इंग्रजी शिकला, आणि अन्य कोणाकडे त्यास शिकावयास ठेवल्याचें ऐकीवांत नाहीं. तेव्हां तेच रत्नागिरीस असावेत असा तर्क होतो. त्याच काळांत केव्हांतरी त्यांचा दुसरा मुलगा चिंतोपंत हा, याचा जन्म ६४ चा, मराठी सातवीची परीक्षा पहिल्या क्रमांकानें पास

झाला. पण त्यास पुढें शिक्षणाची संधि मिळाली नाहीं. नाहींतर या मुलांनेही पुढें चांगलें नांव काढलें असतें. रत्नागिरीस केसोपंतांचा पगार दरमहा रुपये २५ चे वर व त्यांची एकूण स्थिति बरी असावी. तेथेंच केव्हांतरी चिंतोपंतांचा व त्यांचे आधींच श्रीधरपंतांचा विवाह झाला असला पाहिजे, त्या काळच्या वहिवाटीप्रमाणें. रत्नागिरीस आज B.Ed. चें ट्रेनिंग कॉलेज, किंवा बेसिक ट्रेनिंग कॉलेज आहे (S. T. स्टॅन्डच्या समोर) तेथेंच रत्नागिरी हायस्कूल, शाळा त्याकाळी होतें,अशी माहिती कळली आणि प्राथमिक शाळेबद्दल नक्की जागा कळली नाहीं. मला त्या ठिकाणांबद्दल उत्सुकता असण्याचें कारण उघडच आहे. हायस्कूलमधून श्रीधरपंत यांनीं ७८ सालीं मॅट्रिक परीक्षेंत १ ली नगन्नाथ शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ति मिळवली, म्हणून त्या शाळेच्या इमारतीबद्दल आकर्षण; व प्राथमिक शाळेंत केसोपंत शिक्षक असल्यायुळें त्या शाळेबद्दलही आकर्षण. केसोपंतांचे रत्नागिरीच्या वसतिस्थानाबद्दलही आकर्षण आहे, होतेंच. पण तो गांव त्यावेळीं मोठा होता. प्राथमिक शाळाही २।३ असतीलच, आणि शिक्षक पुष्कळ; त्यामुळें शोध लावण्यास, घेण्यास कांहींच आधार नाहीं.

आज रत्नागिरीस महत्त्वाचीं व पहाण्यासारखीं अशीं पुष्कळच ठिकाणें आहेत. लो. टिळक यांचे जन्मस्थान, कै. दे. भ स्वातंत्र्यवीर सावरकरांचें नजरकैदेचे घर, भागोजी विठोबा कीर यांनीं बांधलेलें–भागेश्वर–, डोंगरावरचा किल्ला आणि "भगवती"चें देऊळ, ब्रम्हदेशचा पदच्युत राजा थोबा यास अटकेंत ठेवलेला राजवाडा, पतितपावन मंदीर, वगैरे अनेक स्थळें पहाण्यासारखीं आहेत, व मी तीं सर्व पाहिलीं देखील. पण त्याकाळीं थोबा राजाचा 'राजवाडा' एका टोकास, व गावापासून फार दूर असा होता. शिवाय त्या काळांत तो पहाण्याची, सामान्य लोकांस पाहण्याची सोय नसावी! आज त्या राजवाड्यांत सरकारी पॉलिटेक्निक ही तंत्रज्ञ शाळा आहे. मी तें ठिकाण बाहेरूनच पाहिलें.

इंग्रज सरकारची एकाप्रकारें गम्मत वाटते. त्यांनी ब्रम्हदेशाच्या थोबा राजास रत्नागिरीस आणून नजर कैदेंत ठेवलें, तर महाराष्ट्राच्या राजास, रत्नागिरीस जन्मलेल्या लोकमान्य टिळकांस, ब्रम्हदेशांत मंडालेस डांबून टाकलें ! पण त्यास होता राजवाडा दिलेला; आणि यास होती बंदीशाळा.

रत्नागिरीस पूर्वींही बंदर होतें, आणि त्यावेळच्या लहान बोटी बंदराला लागत असतीलही.आतां नवीन व मोठें चांगलें बंदर बांधण्याचे काम सुरु आहे; तें ३।४ वर्षांनीं पुरें व्हावें. रत्नागिरी गांव एकूण बरा आहे. पण स्वाभाविकपणानें तें मोठें शहर असल्यामुळें जुनें गांव जास्त गजबजलेलें आहे.त्या मानाने मला अलिबाग जास्त

आवडलें. अलिबागचा कुलाबा किल्ला (रुपाटीवरच आहे) ओहोटीचे वेळीं पायीं जाऊनही पहातां येतो. पण रत्नागिरीचा किल्ला डोंगरावर उंच जागीं बांधलेला असून तेथें जाणें सोपें नाहीं, सहज शक्य नाहीं. रत्नागिरी हें नांव ज्यानीं कोणी त्या गांवास व त्यामुळें त्या जिल्ह्यास दिलें असेल तें असो, पण पेशवे कुटुंब, आंग्रे कुटुंब, लो. टिळक, केशवसुत आदि नररत्नें त्या गिरीमय प्रदेशांतून बाहेर पडलीं हें मात्र खास. आणि मला विश्वास वाटतो कीं हा भूभाग यापुढेंही आपली परंपरा राखील, असा भरवसा वाटण्यासारखी गोष्ट मी एप्रिल ६६ मध्यें ऐकली. सडचावर (रत्नागिरी येथील पठारावरची नवी वस्ती ) एक अमेरिकन विदुषी रत्नागिरी जिल्ह्यांतील कोकणस्थ ब्राम्हणांचाच विशेष अभ्यास करण्याकरितां येऊन राहिली असून ती एका अमेरिकन विद्यापीठांत या विषयावर एक प्रबंध सादर करणार आहे. मला ती विदुषी दुरून दाखविण्यांतही आली.

दाभोळ, मालगुंड, खेड, रत्नागिरी व संगमेश्वर या गांवांशिवाय अन्य कोणकोणत्या गांवीं केसोपंतांस नोकरी करावी लागली त्याची माहिती नाहीं, तर्क चालत नाहीं; पण १८८१–८२ च्या सुमारास म्हणजे श्रीधरपंतांना बडोद्यास नोकरी लागल्यावर त्यांनी पेन्शन घेतलेलें दिसतें. त्यांस अखेरच्या रुपये ३० दरमहा पगारावर रुपये १०।१२ पर्यंत तरी दरमहा, पेन्शन असावें; आणि पेन्शन घेतल्यावर ते रावसाहेबमंडलीक यांच्या वळणें गांवीं जाऊन राहिले. १८८६ मध्यें केशवसुतांबद्दलच्या न्यू इंग्लिश स्कूल, पुणेच्या रजिस्टरांत ज्या नोंदी आहेत त्यांत केसोपंत यांचें वार्षिक उत्पन्न रुपये १०० दाखविलेलें आहे. तें बहुधा रावसाहेब मंडलीकांकडून त्यांस मिळत असलेला पगार असावें, शिवाय बहुधा कुटुंबास लागणारें भात गांवच्या उत्पन्ना-मधून त्यांस मिळत असावें.

दापोली ( Camp ) किंवा कांप, या गांवापासून दाभोळकडे जी सडक जाते त्या सडकेनें Alfred Gadney हायस्कूल सोडून, ओलांडून, पुढें गेल्यावर जवळ जवळ एक मैलावर जालगांव म्हणून एक गांव लागतें. त्या गांवी मुख्यत: बर्वे व अलीकडे दांडेकर या कुटुंबांची वस्ती आहे. याच दांडेकरांकडे माझ्या सध्यां हयात असलेल्या आत्याबाई दिल्या होत्या, आहेत. हा जालगांव ओलांडून आणखी एक मैल गेल्यावर वळणें गांवाकडे जावयाचा फाटा डावीकडे वळतो. तो रस्ता एकेकाळीं, केसोपंतांच्या काळांत गर्द झाडीचा होता. पण बैलगाडीची वाट केलेली होती, रावसाहेबांचे सोयीसाठीं. त्या रस्त्यानें आंत जवळ जवळ अर्धा मैल गेल्यावर रस्ता जरा उजवीकडे वळतो व थोडा खोलांत जातो, तो रस्ता श्रीमान मंडली-कांच्या घरासमोर थांबतो. रस्ता वळतो तेथेंच जरा उंचावर गुरांचा गोठा बांध-


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलांतर
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

लेला आहे, वळणें गावांत ब्राम्हणाचें असें हें एकच फार मोठें प्रशस्त घर आहे. पुढच्या अंगास अर्थात् आंगण व आंगणांत ( मी १९२८ त तें घर पाहिलें तेव्हां अगदीं रिकामे असल्यानें, तेथें कोणीच रहात नसल्यानें ) मांडव नव्हता. पडवी चांगली १० फूट रुंद व जवळ जवळ ५० फूट लांब आहे. वरच्या बाजूस ३।४ पायऱ्या चढून गेल्यावर ओटी, आंत मोठें माजघर, स्वयंपाकघर, देवघर व व इतर १।२ खोल्या, पलीकडे पुनः पडवी. मागच्या दारीं मोठी दगडी बांधणीची विहीर, एक दगडी दोणी, पाणी सांठवण्याचें रांजणासारखें भांडें, त्या भागांतच एक चांगलें ३।४ फूट उंच दगडी बांधलेलें असें तुळशी वृंदावन होतें. मागच्या बाजूस बकुळीचें झाड व त्याचीं नाजूक, लहान, सुवासिक फुलें पडलेलीं होती. १९२८ मध्यें या घरीं मी काशीआत्याबाई किंवा श्री. लक्ष्मीबाई दांडेकर यांच्याच बरोबर जालगांवहून तें गांव पाहण्यास गेलों होतों. ओटीला चांगले भक्कम जाड, गज, लाकडी बसवलेले होते. घरापुढील आंगण प्रशस्त व खूप मोठें होतें. आणि समोरच्या अंगास जमीन उतरत गेलेली होती. उतार चांगला ८–१० फुटांचा असून आंगणांतून चांगले फर्लांग ४०।५० फूट अंतरावर खोलातून नदी वहात आहे. या नदीच्या काठीं व पलीकडे कुळवाड्यांची वस्ती, महारांची वस्ती आहे. आम्ही गेल्यावर कोणी कुळवाडी हाका मारून बोलावून पाहिले; ३।४ माणसें आलीं. पण त्या कोणासच केसोपंत माहीत नव्हते. चिंतोपंत किंवा चिंतूआपांस ओळणारी, नावानें ओळखणारी माणसें भेटलीं !

हा वळणें गांव, येथील घर, येथील निसर्ग, झाडें, या दृश्यांचा मोठा परिणाम केशवसुतांवर व त्यांचे काव्यावर पडलेला आहे. या घरीं आणि गावीं १८८०–८२ पासून तो केसोपंतांच्या मृत्युपर्यंत ते अनेकवार तेथें गेले, राहिले; पण त्यांच्या मृत्युनंतरही चिंतोपंतांचें वास्तव्य त्या घरीं १९०८–१० सालापर्यंत असल्यानें ते तेथें नंतरही बरेचवेळां गेले असावे. तेव्हां केशवसुतभक्तांना जर कोकणांतील कोणतें तरी एक स्थान त्यांचे स्मारक करण्यास म्हणून निवडावयाचें असेल तर माझे मतानें ते वळणेंच सर्वथा योग्य आहे. पण आज तें घर व आजूबाजूची शेती, मंडलीक कुटुंबानें दापोली एज्यूकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेस दान दिलेली असून त्या संस्थेच्या मल्टीपर्पज् हायस्कूलचा शेती विभाग त्या घरांत व आजूबाजूच्या शेतांतून–जमीनीतून पसरलेला असल्यानें तेथें त्याचें स्मारक करता येणें जवळ जवळ अशक्य झालेलें आहे!

१८८२ सालापर्यंत केसोपंतांनीं नक्कीच पेन्शन घेतलेलें होतें. त्याचे आधींच कृष्णाजीपंत व मोरोपंत यांचे विवाह झालेले होते. आणि श्रीधरपंत यांस बडोद्यास प्रोफेसरी मिळून त्यांस दर महा सुमारें दीडशे दोनशें रुपयांची प्राप्ती झाल्यामुळें

श्रीधरपंतांबरोबर त्यांची बायको आणि कुशा व मोरू हे दोघे भाऊ शिक्षणाकरितां बडोद्यास गेले; एकाप्रकारें केसोपंतांस थोडें हायसें वाटलें. पण १८८३ त श्रीधरपंतांचा एकाएकीं मृत्यु झाल्यानें त्यांस जबर धक्का बसला ! त्यानंतर ते १८८६–७ पर्यंत वळण्यास कसेतरी राहिले; पण त्यांस बहुधा तेथें चैन पडेना. दरम्यानचे काळांत श्रीधरपंतांची मुलगी, अल्पवयीन अशी, आणि त्यांची पत्नी देखील, कैलासवासी झाल्यानें ते खेडास रहावयास गेले.

खेड येथें त्यांनी थोडा सावकारी व्यवहार केला, त्यांत त्यांस थोडीबहुत प्राप्ती होई, तो आणि त्यांचें पेन्शन, यावर ते कुटुंबाचा चरितार्थ चालवीत. लहानसें एक घरही त्यांस गहाणाचे व्यवहारांत मिळालें होतें आणि त्या घरांत ते पुढें राहिले असें ऐकलें आहे. खेड गांवीं त्यांचे बरोबरीचे लोक असावेत. त्यांचा व केसोपंतांचा स्नेह असावा. सीतारामपंतांचे तोंडून त्यांचा बाळमित्र गणू किंवा गणपति कार्लें हें नांव ऐकलें होतें, श्री. कार्ले एकदां १९२० चे सुमारास पुण्यास आमचेकडे आलेलेही होते, व मी १९२८ सालीं काशीआत्याबाईंबरोबर त्यांचे घरीं कांहीं तास राहिलों, दुपारचें जेवण घेतलें आहे. गणू कार्लें यांचे वडील रंगोआप्पा केसोपंतांचे स्नेही; तसेंच श्री. कुटुंबे हे नांव लक्षांत आहे. पुढें वाई येथें प्रसिद्धीस आलेल्या श्रीमान बाळासाहेब साठे यांचे वडील (शिसवेरचे साठे) यांचेपैकीं कोणी साठे, खेडास त्यावेळीं रहात असत. अशी मंडळी केसोपंतांची स्नेही होते. या गावाचे आसपास शेरवली म्हणून एक परांजपे यांचा गांव आहे (प्रसिद्ध गणिती रँग्लर परांजपे, याच गांवचे ) त्या कटुंबांत केसोपंतांनीं एक मुलगी आधींच दिली होती. आतां सर्वांत धाकटी मुलगी भीमा हिला कळमणी बुद्रुकच्या प्रभाकरपंत आपट्यांस त्यानीं दिली. १८९३ पर्यंत, मृत्यु होईपर्यंत केसोपंत खेड येथेंच राहिले.

खेडास त्यांच्या ६।७ वर्षांच्या शेवटच्या काळांत त्यांनी ज्या मोठ्या गोष्टी उरकल्या त्यांत सर्वांत धाकटी मुलगी भीमा हिचा विवाह व सर्वांत धाकटा मुलगा सीताराम यांचे शिक्षणाचा पाया या दोन होत. पैकीं भीमाआत्याबाईचे विवाहाची त्रोटक हकीगत, कांहीं पृष्ठांपूर्वी आढळेल. तरी आतां सीताराम किंवा बापू याचे शिक्षणाची त्यांनीं काय सोय केली होती, तें थोडक्यांत पाहूं. ही हकीगत मी त्यांचेच तोंडून त्यांचे घरीं त्यांचे जवळ पुण्यांत रहात असतांना ऐकलेली असल्यामुळें ती निश्चितपणानें विश्वासार्ह आहे.

केसोपंत हे त्या काळच्या मानानें चांगले बुद्धिमान व (मराठी) विद्वान् होते. त्यांनीं काळाची पाऊलें ओळखून सर्वच मुलांस (एक चिंतोपंत अपवाद) इंग्रजी शिक्षण दिलें. त्यास अनुसरून १८९१–९२ पर्यंत बापू यास इंग्रजी

शिक्षण खेड येथें जेवढें देतां येणें शक्य होतें तेवढें दिलें. त्याकाळीं खेडास इंग्रजी शाळा नव्हती. पण कोणी एक इंग्रजी शिक्षित गृहस्थ इंग्रजी भाषा शिकवण्याचा वर्ग चालवीत असत; त्या वर्गात त्यांनीं बापूस घातलें.तेथें त्याचे इंग्रजी शिक्षणाचा पाया घातला गेला. त्याच काळांत १८९१ अखेर मोरोपंत बी. ए. झाले. त्यांनीं पदवी जानेवारी १८९२ मध्यें घेतली आहे, ती पदवी अजूनही सुस्थितींत मजजवळ आहे. त्यांस फेलोशिप मिळाली होती, डेक्कन कॉलेजांत. पण बी. ए. नंतर ते एक वेळ बरेच आजारी पडले, बहुधा सुट्टींत; आणि खेडासच ते प्रथम आजारी होते. पण केसोपंत मनानें भ्यायले, खचले. त्यांस वाटलें, पहिला बी. ए. झालेला श्रीधर लौकरच गेला,कैलासवासी झाला.आतां हा दुसरा मुलगा बी. ए.झालेला मोरू,आपले म्हातारपणची काठी, हाही बी. ए. झाल्याबरोबर आजारी पडला. तेव्हां देवाचे मनांतून आपणांस बी. ए. झालेला मुलगा लाभूं द्यावयाचाच नाहीं काय? त्यांस आजारी मोरूकडे पहावेना ! म्हणून त्यांनीं त्याचे सासुरवाडचे गांवीं त्यास पाठवला. आणि सर्वांचे सुदैवानें गुडध्यास दांडेकरांचे घरीं मोरू सुधारला, चांगला बरा झाला. त्यानंतर त्याचे उभ्या आयुष्यांत त्यास दुसरा कोणताच आजार झाला नाहीं. तो सुधारल्यावर त्यानें पुण्यांत बिऱ्हाड केलें होतें, व तेथें धाकटा भाऊ बापू यास त्यानें शिक्षणाकरितां पुण्याच्या प्रख्यात न्यू इंग्लीश शाळेंत घातलें. पण त्याचेपूर्वी केसोपंतांनी त्यांचे संस्कृत शिक्षणाचाहि पाया भक्कमसा घातला होता. समासचक्र, धातुरूपावलि, शब्दरूपावलि, अमर व थोडा रघु एवढी तयारी त्यांनीं त्याची करून घेतलेली होती. संध्या, पूजा, रामरक्षा, भगवद्गीता या मामुली गोष्टी त्यांनी त्यास शिकवलेल्या असतीलच. पण एका प्रकारें उच्च शिक्षणाचा पाया म्हणजे इंग्रजीचा पाया, मराठी नवनीत ग्रंथ, आणि संस्कृतचा पाया त्यांनीं भक्कमपणानें घातला होता. त्याचा अर्थात् बापूस चांगला उपयोग झालाच. ही एवढी त्याचे शिक्षणाची हकीकत थोडी विस्ताराने देण्याचा हेतु हा असा शिक्षणाचा पाय, उतारवयांत जसा त्यांनीं शेंडेफळ बापू याचा घातला, तसाच पाया उरलेल्या सर्वच मुलांचे बाबतींत घातलेला असला पाहिजे, कमी–जास्त प्रमाणांत, हें सांगणें हा अ हे. त्यामुळें त्यांचे निदान चार मुलगे विद्वान् व कर्तबगार निपजले !

केसोपंत यानीं आयुष्यांत जे धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चार पुरुषार्थ साधावयाचे असतात ते देशकाल परिस्थितिप्रमाणें खात्रीनेंच साधले असतील. धर्म याचा अर्थ मी कर्तव्यकर्म असा घेतों. रुढ अर्थ - धार्मिकता असा घेतला तरी ब्राम्हण याचा धर्म अध्ययन अध्यापन, तोही त्यांनी उत्कृष्टपणानें साधला. १९२८ पर्यंत, त्यांचे मृत्युनंतरही ३५ वर्षें पर्यंत, त्यांची कीर्ति टिकलेली मी समक्ष पाहिलेली आहे. त्या दृष्टीनें त्यानीं धर्म साधला. अर्थ ही जेवढा त्यांस प्रपंचास

आवश्यक तेवढा त्यांनीं जोडला. त्यांस एकूण १० मोठीं मुलें; पैकीं तीन मुलांचें उच्च शिक्षणही त्यांनी साधलें. ते मुलगे श्रीधर, कृष्णाजी, मोरेश्वर होत. आणि पांच मुलींचे विवाह त्यांस सुस्थळीं देऊन केले. मोठी मुलगी यमुना किंवा आक्का गुडघ्याच्या परसूभाऊ विंझे यांस दिली. दुसरी ताई किंवा दुर्गा ही केशवराव पेठे (मुंबई) यांस दिली होती तिसरीबद्दल ओझरता उल्लेख पूर्वी आला आहे. ती आवडी किंवा माई शेरवलीच्या काशिनाथपंत परांजपे यांस दिली होती. चवथी काशी हिला जालगांवच्या प्रख्यात कीर्तनकार गणेशपंत दांडेकर (काप दापोली जवळ) यांचे जेष्ठ चिरंजीव नारायणराव यांस दिलें होतें; ते कीर्तन व्यवसायांत कीर्तिमान होऊं शकले असते, पण दुर्दैवानें अल्पायुषी ठरले. आणि शेवटच्या भीमा मुलीबद्दल इतक्यांतच सांगितले आहे. अशा प्रकारें पुरेशी अर्थप्राप्ति करून दहा मुलांची योग्य प्रकारें पालनपोषणादि कर्तव्यें त्यांनीं उत्तमप्रकारें पार पाडलीं. काम हा अर्थात् कसा साधला तें आतां स्पष्ट करून सांगण्यास नकोच. हें सर्व करीत असतांना मृत्युसमयीं त्यांची इस्टेट, जिंदगी, जवळ जवळ रुपये १००० ची होती. त्याचीही त्यांनीं व्यवस्था लावली होती. चि. बापूच्या शिक्षणास रु. ३००, त्याचे विवाहास रुपये ३००, व उरलेले शिक्षण न झालेल्या मुलास चिंतू याचेकरितां त्यानीं ठेवले. अशा या थोर पुरुषास माझी खात्री आहे. " मोक्ष " (याची नक्की कल्पना कोणासच नाहीं. ) म्हणून जी एक काल्पनिक गति आहे ती मिळाली असावी; माझी मनोदेवता मला असें सांगते. असा केसोपंतांचा हा जीवनवृत्तांत एका प्रकारच्या पराक्रमांचा भरलेला आहे. त्यांस पूर्वार्जित कांहींच मिळाले नाहीं, सर्व त्यांचे त्यानीं मिळविलें.

त्यांचे सासरे गणूबाबा करंदीकर हे फार दीर्घायुषी होते. मी १९०८ मध्यें त्यांस पाहिलें तेव्हां ते पुष्कळच वाकलेले असत. तरीही आंघोळ करून स्वतः चा धोतरापंचा पिळून झटकून ते वाळत घालीत, त्यावेळीं ते शतायुषी होते. काठी टेकीत चालत होते. पण सर्व अवयव स्वाधीन होते ! त्यानंतर लौकरच ते कैलासवासी झाले. या त्यांचे सासऱ्यांनीं स्वतःचे घराचे खालचे अंगास एक लहानसें घर आपल्या मुलीस, जावयास, बांधून दिले होतें. थोडेसें भात येणारी जमीन ही दिली होती, पण याचा उपभोग केसोपंतानीं घेतला नाहीं ! चिंतोपंत यानीं १९०९, १० सालीं थोड्या आपत्कालीं या योजनेचा फायदा घेतला होता, ते मालदोलीस मंडलीकांची नोकरी सोडून तेथें रहावयास गेले होते.

# केशवसुतांचा जन्मदिवस

केशवसुत यांचा जन्म दिवस १५ मार्च १८६६ रोजीं साजरा करण्याचा महाराष्ट्रांतील नामवंत साहित्यिक, महाराष्ट्र साहित्य परिषद, महाराष्ट्र सरकार या सर्वांचा विचार होता. ऑल इंडिया रेडिओ पुणें केंद्रावरून त्याप्रमाणें तो दिवस साजरा करण्यांत आला. महाराष्ट्रांतील अनेक वर्तमान पत्रांनींहि तो दिवस साजरा केला. पण ही तारीख साफ चुकीची आहे असें मी केशवसुत यांचा पुतण्या जाहीर करूं इच्छितों.

१५ मार्च १८६६ ही जन्म तारीख प्रथम कै. श्री. नरहर शंकर रहाळकर किंवा 'किरात' श्री. सोमण (जे कोणी त्या लेखाचे लेखक ते) यांनीं मासिक मनोरंजन पुस्तक २४ वें, पू. भाग १०१ (जानेवारी १९०६ चा अंक) यांत पृ.४९ वर दिली. तशीच माहिती कै. श्री. गद्रे यांनीं "केशवसुत स्मृति ग्रंथ" पृ. २२८ वर सन १९५६ मध्यें दिली आहे. श्री. भ. श्री. पंडित यांनीं मला पुरवलेल्या माहितीप्रमाणें "काव्य रत्नावलि" च्या 'सालगुदस्त' म्हणून १९०६ मध्यें प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत कै. मोरो केशव दामले (माझे वडील, व केशवसुत यांचे पाठचे बंधु) यांनीं पुरवलेल्या टाचणावरून मार्च १८६६ हा महिना दिलेला आहे. त्या लेखांत तारीख दिलेली नाहीं . ...!

तारीख मृत्युनंतर तात्काळ प्रसिद्ध झालेली आहे, हा मुद्दा जोरानें पुढें केला जातो. (पण वरील माहिती तिऱ्हाईत, इष्टमित्र यानीं पुरवलेली आहे.) केशवसुतांचे कुटुंबीय कै. सी. के. दामले व नंतर त्यांचे पुतणे कै. प. चिं. दामले यांनीं प्रसिद्ध केलेल्या अनेक (४–५) आवृत्तींमध्यें केशवसुत यांची जन्मकुंडली देऊन जन्मतिथी रविवार, भाद्रपद वद्य १४, शके १७८८ ही दिली आहे. त्यांतले त्यांत विद्वानांचा टीकाकारांचा सी. के. दामले यांचेवर अविश्वास आहे; कारण

त्यांनीं मृत्युतिथीचा, तारखेचा गोंधळ केला होता. हट्टानें व स्मरणशक्तिच्या जोरावर ते मृत्युची तारीख २ नोव्हेंबर १९०५ सांगत. पण तात्कालीन पत्रव्यवहारानें आणि प्रसिद्ध झालेल्या लेखांमधूनहि ती तारीख ७ नोव्हेंबर १९०५ ही सिद्ध झाली. यामुळें सीतारामपंत बदनाम झाले असून त्यांचे माहितीवर लोक गैरविश्वास ठेवतात. पण प. चिं. दामले यांनीं पुरवलेल्या माहितीवरून मृत्युतिथी ७ नोव्हेंबर ही मान्य करतात. म्हणजे प. चिं. दामले हे त्यांचे विश्वासास पात्र आहेत. आतां तेच प. चिं. दामले हे स्वतः प्रसिद्ध केलेल्या केशवसुतांच्या काव्यसंग्रहाच्या आवृत्तींमध्यें रविवार, भाद्रपद वद्य १४ शके १७८८ हीच जन्मतिथी प्रसिद्ध करतात. पण त्यावर मात्र हे विद्वान् विश्वास ठेवीत नाहींत. असें त्यांनीं कां करावें? एका बाबतींत त्यांचेवर विश्वास ठेवावयाचा काणि दुसऱ्या सोयीस्कर बाबतींत विश्वास ठेवावयाचा नाहीं असा पक्षपात विद्वानांनीं काय म्हणून करावा?

आतां जी पत्रिका उपलब्ध आहे तिजविषयीं कांहीं विचार तज्ञ ज्योतिषी मंडळीनीं व्यक्त केले, ते विचारणीय, चिंत्य आहेत. दैनिक मराठा मध्यें २८ मे १९६५ च्या अंकांत सुप्रसिद्ध ज्योतिषी इंदुमतीबाई पंडीत, मुंबई (दादर) चे प्रसिद्ध ज्योतिषी बोरकर आणि अन्य ज्योतिषी यांनी भाद्रपदमधील कुंडली केशवसुतांचे जीवनाशीं जुळते. आणि १५ मार्चची मुळींच जुळत नाहीं असें प्रसिद्ध केलें आहे. गुरुवार १५ मार्चची कुंडली श्री. बोरकर. देतात. केशवसुतांच्या कुंडलीचे संबंधांत कै. सी. के. दामले (यांस ज्योतिषशास्त्राचें ज्ञान अत्यंत अल्प होतें.) यानीं लिहिलेल्या, पत्रिकेवरच्या त्यांचे प्रस्तावनेंतील मजकूरावर, विद्वान् हात ठेवतात, आणि असें म्हणतात, बघा सीतारामपंतच ही पत्रिका बरोबर फळ देत नाहीं, त्यांचा जन्मतिथीवर, कुंडलीवर विश्वास नाहीं! म्हणजे सोयीस्कर वाटेल तेव्हां कै. सी. के. दामले हे बरोबर आहेत, असें म्हणावयाचें. आणि सोयीस्कर नसेल तेव्हा ते चुकीचे लिहितात असें दुटप्पीपणानें लिहावयाचें बोलावयाचें हें विद्वानांसच शोभतें!

आतां आणखी एक मुद्दा पत्रिकेबद्दलचा जाहीर करतों. सी. के. दामले यांचे जवळचे बहुतेक सर्व कागदपत्र, फार मोठा ग्रंथसंग्रह आदि साहित्य पुण्याच्या पानशेतच्या पुरामध्यें माझे श्वशुर कै. ती. नरसोपंत जोगळेकर, इंजीनियर, यांचे शनवारपेठ पुणे येथील घरांत नष्ट झाले. त्यांत माझे वडील कै. मोरो केशव यांचा "शास्त्रीय मराठी व्याकरण" हा ग्रंथ, त्याचें संपूर्ण हस्तलिखितही नष्ट झालें! यामुळें मी अस्सल पुरावा प्रकट करण्यास असमर्थ आहे. पण कै. प. चिं. दामले, माझे चुलत बंधु यांचे चिरंजीवांस त्यांचे दप्तरीं केशवसुत यांचे कुंडलीची प्रत

मिळते काय याचा शोध घेण्यास सांगितलें आहे. पाहूं या शोधांत कांहीं निष्पन्न होतें काय. ∵ सर्वच कुंडल्या शेवटी परिशिष्टांत दिल्या आहेत.

मी स्वतः मालगुंड या केशवसुतांच्या जन्मगांवीं मेहरबान मामलेदारसाहेब यांस पत्रें पाठवून व श्री. साठे, हेडमास्तर, मालगंड येथील हायस्कूल, यांसही पत्र पाठवून शोध घेण्याची, पडेल तो खर्च देण्याची, विनंति केली होती. मामलेदार-साहेबांस जोड कार्ड लिहून ही उत्तर देण्यास फुरसत मिळाली नाहीं; आणि हेड मास्तरसाहेब यास लिहिल्यास फार थोडे दिवस झाले होते त्यांचे उत्तराची वाट पाहत होतों. ∵ दरम्यान पुण्याचे न्यू इंग्लिश स्कूल, येथील जुन्या जनरल रजिस्टरमध्यें केशवसुतांबद्दल जन्मस्थळ (Walw) असें गांव ? आणि जन्म तारीखेचा रकाना मोकळा आहे ! जन्मस्थळ या आधारावरून वळणें ठरावें ! नागपूरच्या जुन्या नील सिटी हायस्कूल किंवा आजच्या धनवटे नगर विद्यालयांत जुनें रेकॉर्ड सापडत नाहीं असें कळलें. धारवाडच्या सरकारी हायस्कूलच्या हेडमास्तरांकडून सर्व्हिस बुक त्यांचेकडे नसून तें बहुधा आजच्या महाराष्ट्र राज्याच्या मे. डायरेक्टर ऑफ एज्यूकेशन यांचे कचेरीत मिळेल, असल्यास, असा हवाला मिळाला, मी तो प्रश्न अजूनपर्यंत मे. डायरेक्टर ऑफ एज्यूकेशन, पुणे यांचेकडे नेलेला नाहीं.

जन्मतारखांच्या गम्मती असतात, माझ्या स्वतःच्या जन्मतिथीबद्दलच गम्मतीची माहिती पहा. शाळेंत हायस्कूलांत, कॉलेजांत असलेली आढळणारी माझी जन्मतिथी-तारीख ३, डिसेंबर, १९०२ आढळेल. पण खरी घरांत साजरी होणारी पत्रिकेमधील (पण त्यावर नांव मात्र नाहीं माझें! ) आहे, गुढी पाडवा शके १८२५ म्हणजे ३० मार्च १९०३ आहे. आमच्या घरांत आज तागायत ही तिथी माझा जन्म-दिवस म्हणून पाळण्यांत येत आहे. हा बदल कै. मोरोपंत यांनी बुद्धिपुरस्सर केला याचें कारण त्या काळीं मॅट्रिक परिक्षेस १६ वर्षांचे आंत बसतां येत नसे, आणि मला ती अडचण येऊं नये म्हणून हा बदल त्यांचेकडूनच करण्यांत आला !

पुष्कळ लोक नोकऱ्यांत शिरतांना वयें बदलत असत. ही गोष्ट जग जाहीर आहे. त्यामुळें कांहीं पुरावा एखादेवेळी उपलब्ध ही होईल यापुढें. तरी तो किती विश्वसनीय मानावयाचा तो प्रश्नच उरेल.

---

∵ **तळटीपः—** पुढें मामलेदार साहेबांचें उत्तर मिळालें; त्यांत १८८५ पूर्वीचें रेकॉर्ड मिळत नाहीं असा मजकूर आहे.

अशा एकूण परिस्थितींत विद्वानांना तिऱ्हाईत इष्टमित्रांनीं प्रसिद्ध केलेली जन्माची तारीख मान्य व्हावी,आणि कुटुंबीय प्रसिद्ध करतात ती कुंडली व जन्मतिथी अमान्य व्हावी हें केशवसुत यांचेंच दुर्दैव म्हणावयाचें! किंवा त्यांस जिवंतपणीं ज्याप्रमाणें कवि म्हणून मान्यता मिळाली नाही,एकूण त्यांचे आयुष्य दुर्दैवी ठरलें,त्याप्रमाणें त्यांचे मृत्युतिथीबद्दलही वादविवाद, जन्मतिथीबद्दलही वाद. (कांहीं टीकाकार तर ते कवीच नव्हते! असें विधान करतात.) त्यांच्या जन्मस्थानाबद्दलही-मालगुंड येथील घराबद्दलही वाद! अशाप्रकारें एकूण याबाबतींतही ते दुर्दैवीच दिसतात.

मी स्वतः मात्र त्यांचा जन्मदिवस रविवार भाद्रपद वद्य १४,शके १७८८ किंवा ७ ऑक्टोबर सन १८६६ मानतों. प्रस्तुतचा ग्रंथ ७ ऑक्टोबर १९६६ रोजीं प्रसिद्ध करणार आहें, मग इतर लोक कांहींही करोत. आणि सुदैवाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्र सरकारनें नेमलेल्या "उत्सव समिति"ने आतां ७ऑक्टोबरपासून एक आठवडाभर उत्सव करण्याचें ठरवलें आहे. त्या समितीचे अध्यक्ष मान्यवर श्री. मधुकरराव चौधरी, शिक्षणमंत्रि, महाराष्ट्र राज्य यांचेपाशीं अंदाजे १५ डिसेंबर १९६५ पासून मी जो पत्रव्यवहार केला आणि जी कैफियत मांडली तिचा प्रभाव त्यांचेवर आणि समितींतील विद्वानांवर पडला असावा. त्याचप्रमाणें वर्तमान पत्रांतूनही या विषयावर मार्चपर्यंत साधक बाधक चर्चा झाली, त्याचा निर्णय कोणीच दिला नाहीं, समितीनेंही नाहीं. पण कारण कोणतेही असो, तें समिती व तिचे अध्यक्ष मेहेरबान चौधरीसाहेब जाणोत; व्यवहातः जन्मोत्सव ७ ऑक्टोबर रोजीं व तेव्हांपासून होणार हें ४ मार्च १९६६ च्या केसरीवरून व अन्य वर्तमानपत्रांतील बातम्यांवरून स्पष्ट झालें!

केशवसुतांच्या पाचवीस नाना वादच पुजिलेले दिसतात ! हुबळीस ज्या घरांत ते निधन पावले तीं दोन घरें दाखवलीं जात होतीं; धारवाडास ते जेथें राहिले त्याबद्दल दोन घरें दाखवतात, नक्की ठरत नाहीं ! केशवसुतांची कुंडली पुढें परिशिष्टांत दिली आहे–

गुरुवार फाल्गुन व. १४ शके १७८७ ची कुंडली परिशिष्टांत दिली आहे; ती मला दादरचे श्री. रा. गो. बोरकर ज्योतिषी व पुण्याचे श्री. शंकर विनायक साने यानीं पुरवली. या दोनही ज्योतिषी - विद्वानांचें मत केशवसुतांच्या जीवनाशीं जुळणारी कुंडली भाद्रपदमधीलच.

केशवसुतांच्या जन्मतिथीचा वाद मी उकरून काढला असा विद्वानांचा समज आहे. पहा विजया राजाध्यक्ष "सत्यकथे" च्या मार्च १९६६ चा अंक, प्रथम परिच्छेद!

त्यांचे मतानें १५ मार्च १८६६ ही तारीख सर्व मान्य होती! सुटे सुटे लेख, जुने पुराणे लेख हे सर्वांना माहीत, कीं केशवसुतांचे समग्र काव्यसंग्रह सर्वांना सुपरिचित? कै. हरीभाऊ आपटे यांनीं केशवसुतांच्या काव्यसंग्रहास ते "दामले" हें नांवही जोडलें नाहीं, काव्यांशिवाय एक शब्द ही जोडलेला नाहीं. ती आवृत्ति आज दुर्मिळ आहे.आणि त्या नंतरच्या त्यांच्या काव्यसंग्रहाच्या जेवढ्या आवृत्ति १९५५ पर्यंत निघाल्या त्या सर्व आवृत्तींमध्यें रविवार भाद्रपद वद्य १४ शके १७८८ हीच जन्मतिथी दिलेली आहे. या संदर्भात जेव्हां मार्च १९६५ अखेर, प्रवासांत, "मराठा" या पत्राचा अग्रलेख मला आढळला व त्यांत १५ मार्च ६६ हा दिवस जन्म शताब्द दिवस साजरा व्हावा अशी इच्छा प्रकट झालेली मी पाहिली, त्या काळपर्यंत, मला १५ मार्च ही तारीख पूर्णपणें अज्ञात होती. म्हणून मला या तारखेबद्दल धक्का बसला. त्यानंतर लौकरच श्री. प्रो. भ. श्री. पंडीत यांचे प्रत्यक्ष ओळखीचा लाभ झाला त्यांनीं आपला ग्रंथ मला भेट दिला, त्या ग्रंथांतील माहिती वरून माझ्या डोक्यांत या १५ मार्च तारखेचा प्रथम प्रकाश पडला! नंतर मी त्यांचेचकडे पत्रव्यवहार केला. तेव्हां त्या तिथीचा थोडा इतिहास व हकीगत कळली. "काव्यरत्नावलि" च्या संपादकांस, श्री. फडणीस यांस, माझ्या, वडिलांनींच चरित्र विषयक टाचणें पुरवलीं (अधोरेखन माझें) हे कळलें. यांत त्यानींच महिना व तारीख कळवळी हें स्पष्ट होत नाही. मला ज्या प्रमाणें विद्वानांचें "मूळ पत्रिका पुढें करा, तर आम्ही कुंडली, जन्मतिथी मानतों." असें आव्हान आहे त्याप्रमाणें मी आतां उलट आव्हान करतों. "" काव्य रत्नावली" कारांनां जें मोरोपंतांचें पत्र, टाचण टिपण गेलें तें दाखवा". तें खरोखर आज सापडत असतें तर प्रकाशांत आल्यावाचून या विद्वानांनीं मागें ठेवलें नसतें.– तेव्हां माझें विजयाबाई (बाई हा माझा शब्द) राजाध्यक्ष यांस नम्रपणानें असें सांगणें आहे कीं मी आहे सामान्य वाचक. संशोधक, अभ्यासक, नाहीं मी आडवळणी गावांत सोलापूरांत (शैक्षणिक दृष्टींने मागासलेल्या गावांत) राहतों. मजजवळ जुने ग्रंथ, जुनीं मासिकें, त्यांचे जुने जुने अंक, कांहीं उपलब्ध नाहीं, घरांतीलही जुने पुराणे कागद, ग्रंथ, मासिकें, सी. के. दामल्यांचे स्वतः लिहिलेले कांहीं कांहीं ग्रंथ, कांहीं साधनें नाहींत. उपलब्ध होतीं, सी. के. दा. व प चि. दा. यानीं प्रकाशित केलेल्या केशवसुत काव्यसंग्रहाच्या आवृत्तींची १।१ पुस्तकेंच! आणि जी माझी स्थिति तीच सामान्य वाचकाची. तेव्हां हा जन्मतिथी वादाचा धुरळा जर कोणी उडवला असला तर तो माझ्या मतानें भ. श्री. पंडीत व त्यामुळें "मराठा" कार यानीं. आणि मी सत्यशोधन व्हावें याच हेतूने ' मराठा" मध्येंच या प्रश्नाला तोंड फोडलें. तें पत्र ३० एप्रिल १९६५ रोजीं प्रसिद्ध झालें (जें पत्र मी "मराठा" कडे पाठवलें तेंच पत्र, त्याचवेळीं "केसरी" व "मनोहर" कडे पाठवलें. पण त्यानीं त्या पत्राची दखलही घेतलेली दिसली नाहीं!

या १५ मार्चच्या ( अप्रत्यक्षपणानें ) विरुद्ध असा एक कौटुंबिक पुरावा देतों. १५ मार्च १७८७ म्हणजे गुरुवार फाल्गुन वद्य १४ ( वादांतील तिथी योगायोगानें वद्य १४ च आहे! ) ही तिथी नव्या वर्षाच्या, गुढीपाडवा या आपणा हिंदूस प्रिय अशा महत्वाच्या सणाच्या तिथीजवळचा दिवस. हा दिवस आमच्या कुटुंबात थोडा जास्त महत्वाचा; कारण मोरोपंतांचा मी एकटाच मुलगा, व माझा जन्म गुढीपाडव्याचा. हा सी. के. दा. यांसही चांगला माहीत होता. तेव्हां माझ्या सर्व हयातींत केशवसुतांचा जन्मदिवस ( किंवा दुसऱ्या कोणाही कुटुंबीयाचा जन्म दिवस ) माझ्या जन्मदिनाजवळपासचाच, पाडव्याचे जवळपासचा असता तर नक्कीच कोणीतरी मोठें माणूस केव्हांतरी तसें बोललें असतें, केशवसुतांचा असता तर नक्कीच कोणीतरी माझ्या जन्मदिवसाशीं त्यांचे जन्म दिवसाशीं गाठ घालून दिली असती, स्वाभाविकपणानें; आणि ही गोष्ट माझ्या पक्की लक्षांत राहिली असती. तेव्हां ज्या अर्थी असा काहींही प्रकार माझ्या आयुष्यांत कधींही घडलेला नाहीं त्या अर्थी आम्ही कुटुंबीय केशवसुतांची जन्मतारीख रविवार भाद्रपद वद्य १४ शके १७८८ किंवा ७ ऑक्टोबर १८६६ हीच मानणार.

माझे मतानें आतां हा वाद निरर्थक व शुष्क आहे; आणि त्यांची जन्म तिथी रविवार भाद्रपद वद्य १४ शके १७८८, किंवा इ. स. १८६६ च्या ऑक्टोबर महिन्याची ७ तारीख होय. ज्यांस वाद करावयाचे असतील त्यानीं ते खुशाल करावेत; मी त्या वादांत यापुढें भाग घेऊं इच्छीत नाहीं.

# केशवसुतांचें बालपण, विवाह व शिक्षण

कृष्णाजीपंत किंवा कुशा याचा जन्म मालगुंडास झाला. त्यांचे जन्मतिथी-बद्दचा गोंधळ याचे आधींच्या प्रकरणांत कथन केला आहे. तेव्हांपासून प्राथमिक शाळेतील शिक्षण होईपर्यंत ते मालगुंड व खेड या गांवीं राहिले असावेत त्यानंतर ते रत्नगिरीस गेले असतील, याचा खुलासा किंवा याचेंकारण केसोपंतांच्या चरित्रांत आढळेल.

कुशा लहानपणीं चिरचिऱ्या कुरकुऱ्या स्वभावाचा, प्रकृतिचा असावा असें त्यानींच लिहून ठेवलें आहे. पहा "नैऋत्येकडील वारा" या काव्यांतील शेवटचें कडवें–

देवी सागरिका ! तुम्हीं तर अतां तीं गायनें गाइजे,
त्यांच्या धुंद अफूगुणें किरकिऱ्या बाळास या आणिजे
निद्रा दीर्घ – जिच्यामधीं न कसलीं स्वप्नें कधीं येतिल,
ती निद्रा निजतां न मन्नयन हे ओले मुळीं होतिल !

त्या काळच्या पद्धतीप्रमाणें त्यांस अफू किंवा घुटी देऊनच निजवीत असावेत. आम्हा भावंडाना देखील अफू देत असत हें मी ऐकलेलें आहे. एक तर आम्ही अफूच्याच प्रदेशांत रहात होतों त्यावेळीं ! ( उज्जयिनी, मध्य हिंदुस्थान ) सर्व भावांत श्रीधरपंत व मोरोपंत हे जरा थोराड होते. म्हणजे शरीर बांध्याने उंच ( ५॥ फूट ) व भरलेल्या अंगाचे. इतर भाऊ ठेंगणे व किरकोळ शरीराचे होते. सीतारामपंत यास अपवाद होते. त्यांच्या चांगल्या दिवसांत ते थोडे स्थूल (पोट सुटलेले) होते.

धिंगामस्ती, दांडगाई, व्रात्यपणा हे गुण मला वाटतें, केसोपंतांचे कोणत्याच मुलात नसावेत; कारण ते स्वतः शिस्तप्रिय व थोडे कर्दनकाळ होते. त्यामुळें हे गुण कोणत्याच मुलांत नसावे. केशवसुत व मोरोपंतही थोडेफार एकलकोंडे असावेत. मनुष्यसमाजांत मिसळणें, गप्पा गोष्टी करणें, हास्यविनोद प्रियता, खेळ

खेळणें या गोष्टी त्यांस तितक्या प्रिय नव्हत्या. तरी मोरोपंत कॉलेजांत असतांना व उज्जयिनी येथील पाहिल्या अर्धांत थोडे मनमोकळे व समाजांत थोडे मिसळणारे असतीलही. पण कृष्णाजीपंत हे एकाप्रकारें आयुष्यांत अपयश, ( परीक्षांत अपयश आल्यानें) येत चालल्यामुळें दिवसेंदिवस जास्त जास्त एकलकोंडे बनत चालले असतील. पण हें असें एका प्रकारचें खुरटें जीवन जरी ते जगत असले तरी कोकणातील सृष्टिसौंदर्याचे ठसे, त्यांच्या एकलकोंडच्या भ्रमंतीमुळें मनावर उमटले असतील आणि काव्य करण्याच्या नादामुळें त्यादृष्टीनें त्यांची प्रगतीच झाली असेल; व हा एकलकोंडेपणा त्यांस फायदेशीर झाला असावा. लहानपणीच नवनीत शिकल्यामुळें त्यांस मराठी उत्तम जुन्या काव्याचा परिचय झाला. आणि ते काव्य रचूं लागले असावेत, त्यांचें लहानपणचें काव्य शिल्लक नाहीं; पण कांहीं अलीकडच्या म्हणजे १८७५–८० च्या सुमाराच्या कवींच्या कविता पाहून केसोपंत "यापेक्षां आमचा कुशा देखील जास्त चांगली कविता करतो " असें उद्गारल्याचें प्रसिद्ध आहे. पण या कविता करण्याच्या नादास केसोपंतांनीं प्रारंभी प्रारंभीं उत्तेजनही दिलें नसेल, व त्या गुणाचा निषेध ही केला नसेल. त्यांचें पहिलें प्रसिद्ध काव्य "खिडकीकडे मौज पहावयास " हें नोव्हेंबर १८८५ मध्यें तयार झालेलें दिसतें. तसेंच त्याचे तळाशीं " रघुवंशे श्री कालिदास। " अशीही टीप आहे. तेव्हां १८८५ पर्यंत त्यांचें संस्कृतचें ज्ञान, व त्यावरून श्लोक करण्याची, मराठींत काव्य करण्याची, त्यांची तयारी बऱ्या पैकीं झालेली दिसते.

खेड या गावास सृष्टिसौंदर्य नाहीं; पण कृष्णाजी पंतांचें आजोळ मालदोली हा गांव दाभोळ येथें समुद्रास मिळणाऱ्या वासिष्ठी नदीच्या दाभोळकडून जातांना उजव्या तीरावर आहे, साधारणपणानें १२।१५ मैल आंत; आणि गुडघें गांव आहे ४।५ मैल आंत, पण डाव्यातीरावर तो गांव आहे. गुडघ्यास त्यांचे मेहुणे, परसूभाऊ विंझे राहत असत. तेव्हां या वासिष्ठी खाडीमधून खालीवर असा प्रवास त्यानीं केलेला असेल. १८८० ते ८२ या वर्षांत कदाचित् केसोपंतांचे वास्तव्य या भागांत असावें म्हणून याच भागांतील चिपळूणची एक मुलगी श्री. केशव गंगाधर चितळे यांची कन्या ही कुशास त्यानीं करून घेतली; तर गुडघ्याच्या विठ्ठलपंत दांडेकरांचीं मुलगी ही मोरूस करून घेतली. १८८२ त कुशा–मोरू यांस श्रीधरपंतांबरोबर इंग्रजी शिक्षणाकरितां बडोद्यास पाठवण्यांत आलें.

खेड गांवीं कुशाचे व मोरूचेही प्राथमिक शिक्षणाचा पाया घातला गेला, आणि पुढें रत्नागिरीस जास्त वरचें इयत्ता ७ वी पर्यंतचें शिक्षण रत्नागिरीस झालें असावें, रत्नागिरीस असतांना त्यानीं मालगुंड गांव व मूळगाव कोळंबें ( खेड, मालदोली, चिपळूणपेक्षां निःसंशय जास्त सुंदर) गांवेंहीं पाहिलीं असण्याचा संभव आहे.

मित्र परिवार करण्याचा वाढवण्याचा–त्यांचा स्वभाव नसावा. तशी काहीं माहिती नाहीं. पुढील आयुष्यांतील मित्र देखील बेतासबाताची मैत्री असणारे दिसतात. जिव्हाळ्याचे मित्र त्यांस नसावेत.

पण कुटुंबीय मंडळींवर त्यांचे फार प्रेम दिसतें. सर्वच भावंडांवर, भावांवर, बहिणींवर आणि आईवडील यांचेवर त्यांचे प्रेम विशेष दिसतें. तशी म्हटली तर त्यांची कविता व्यक्तिविषयक उल्लेख टाळणारी आहे. त्या काळचीं माणसेंच तशीं होतीं. याचा प्रत्यय गु. डॉ. अण्णासाहेब कर्वे, डॉ. रँग्लर र. पु. परांजपे यांचीं आत्मचरित्रें पहा; म्हणजे माझ्या या विधानाचा प्रत्यय येईल. फारच थोड्या काव्यांत नातलगांचे उल्लेख आहेत. त्यांत भीमा स्वसा, बापू, भाऊ, (सीतारामपंत, आणि चिंतोपंत) यांचेच स्पष्ट उल्लेख आहेत. इतर कोणाचेही नाहींत. श्रीधरपंत व मोरोपंत यांचेवर त्यांचे निश्चितपणानें प्रेम असेलच. त्यांचे बरोबर आयुष्याचा महत्त्वाचा काळ ते राहिले होते ही, पण त्यांचा नामोल्लेख नाहीं. आजोळच्याबद्दल 'मातुलग्राम' असा मोघम उल्लेख आहे. याबाबतींत त्या काळची चालरीतच तशी असावी असें म्हणावें लागतें. प्रेमी माणसांनीं तें प्रेम प्रकट करावयाचें नाहीं हीच शिष्टसम्मत रीत होती.

विद्यार्थी या नात्यानें ते लहानपणीं किती हुशार होते, याचीं कांहीं माहिती नाहीं. त्याकाळीं इतर हालचाली–चित्रकला परीक्षा, खेळ, नाट्य, इतर विषयांच्या परीक्षा वगैरे कांहीं नसेच. त्यामुळें या बाबतींतली माहितीच नाहीं. गाणें म्हणणें, कोणाच भावास, बहिणीस येत नव्हतें. पण काव्य, कविता स्वतःशीं गुणगुणें आणि नादमाधुर्य अनुभवणें, काव्य निदान तें चालीवर म्हणतां येईल इतकी चाल त्यांत असावी हा दंडक पाळण्यास आवश्यक तेवढें कविता सुरावर म्हणतां येणें, ही सवय व पाठांतर, त्यांचे चांगले असावें. स्मरणशक्ति देखील चांगलीच असेल. सीतारामपंत यांची स्मरणशक्ति फारच दांडगी होती. त्यावरून मी हा अंदाज बांधतों. त्या काळांत कवितांच्या भेंड्या–भेंड्या लावणें हा एक खेळ (?) लोकप्रिय असे; त्यामुळें त्यांचें काव्याचें पाठांतर पुष्कळच असावें.

त्यांच्या विवाहाची हकीगत गमतीची आहे. त्याकाळीं टिपण पहात; त्याचप्रमाणें मुलीचे लोक मुलाचें हस्ताक्षर पहात, व मुलाचें कुटुंब १० माणसांचें आहे कीं नाहीं तें पहात. हेतु असा कीं मुलगा कुठेतरी हिशोब ठेवणें वगैरे कारकुनी तरी करूं शकेल, आणि दहा माणसांच्या कुटुंबांत मुलीला साडीचोळी व दोनवेळ भरपूर जेवण तरी मिळेल, अशी खात्री वाटावी म्हणून या गोष्टी पाहिल्या जात; पण मुलीच्या बाबतींत ७।८ वर्षांची मुलगी नीटस बांध्याची अव्यंग, व नाकी डोळी तरत-

रीत, आणि कूळ एवढें पहात; याव्यतिरिक्त त्या वयाच्या मुलींत पहातां तरी काय यावयाचें असतें ? तेव्हां या दृष्टीनें दोन्ही पक्षांनीं एका तिऱ्हाइत अशा ओळखीच्या गृहस्थांचे शद्बावर विसंबून मुलाच्या कडच्यानीं मुलगी, व मुलीकडच्यांनी मुलगा न पहातांच पसंत करून हा विवाह ठरवला ! त्याप्रमाणें तो बहुधा श्री. चितळे यांचे गांवीं चिपळूणास झाला.

कदाचित् केसोपंतांनीं कुशास एखाद्या गावीं एखाद्या इंग्रजी शिकवणाऱ्या खाजगी शिक्षकांकडे इंग्रजी शिकावयास पाठवलें असल्याचा देखील संभव आहे. पण मोरू दोन वर्षांनीं लहान म्हणून त्याचे इंग्रजी शिक्षणाचा पाया कोंकणांत घातला गेला नसेल, पण १८८२ मध्यें मात्र श्रीधरपंत किंवा तात्यांनीं बडोद्यास जातांना आपल्या पत्नीस जसें नेलें, तसेंच कुशा, मोरू या दोन भावांसही नेलें; आणि या दोन भावांचे शिक्षणाचा खरा प्रारंभ बडोद्यास झाला असें म्हणावयास हरकत नाहीं.

या प्रकरणापर्यंतचा सर्व भाग म्हजजे कोकण, कोकणस्थ दामले कुटुंब केसोपंत, वगैरे जी माहिती थोड्या विस्तारानें लिहिली आहे त्याचें एक प्रयोजन, उल्लेख, भूगोल शास्त्राचा आधार घेऊन पूर्वी एकवार केला आहे. पण त्यामुळें तें पुरेसें स्पष्ट होणारें नाहीं. ही सर्व माहिती एकाप्रकारें सर्वच, पांचही, केशवसुतांस समान आहे. पण ती केशवसुत म्हणजे कृष्णाजीपंत यांस विशेष लागू करण्याचें मुख्य प्रयोजन पुढें देतों. ज्या भूमीमध्यें केशवसुतांचा जन्म झाला, बाळपण गेलें, तेथलें एकूण जीवनच सुखमय नसून एकप्रकारचा **संग्राम** आहे. प्राप्त परिस्थितीशीं केवशसुतांचे वडील केसोपंत यांचें जीवनही एक मोठा यशस्वी लढा किंवा संग्रामच होतें. या संग्रामालाही एक सुंदर अशी-कोकणची वनश्री– शोभादायक पार्श्वभूमि आहे. त्या सुंदर पार्श्वभूमिवरचा संग्राम ही केशवसुतांच्या जीवनाची पूर्वपीठिका व बैठक वाचकांचे लक्षांत यावी म्हणून हा सगळा प्रपंच व या लेखनाचें प्रयोजन, आणि हें लक्षांत बाळगून जर वाचक केशवसुतांचे जीवनाचा पुढचा पल्ला टप्पा, पहातील, तर त्यांस त्यांचे जीवनाचें व काव्याचें खरे दर्शन होण्याचा संभव आहे असें मी स्पष्टपणानें लिहितों. मला देखील त्यांचे जीवनाचें व काव्याचें दर्शन चांगलेसें झालेलें नाहीं. पण मी अलीकडे त्याचा प्रयत्न करीत आहे. त्या प्रयत्नाचें हें चरित्र हें एक फळ आहे. त्यांच्या जीवनाचें खरे दर्शन आतां कोणालाच घडूं शकणार नाहीं. त्यांचे समकालीन, शेजारी राहणारे श्री. वा. वा. गद्रे देखील गमतीच्या चुका करतात, माहिती देतांना. याचा पुरावा देतों. " केशवसुत स्मृति ग्रंथ " या ग्रंथाच्या पृष्ठ २३५ वर ते लिहितात- "धुळचाहून १९०४ साल अखेर मुंबईत आलों" पृष्ठ २३६वर लिहितात "मी मुंबईस गेल्यावर केशवसुत फैजपुराहून धारवाडास गेले. (गेल्यावर चें अधोरेखन माझें आहे. ) याचा अर्थ ते

डिसेंबर १९०४ किंवा जानेवारी १९०५ त धारवाडास गेले असा होईल. पण मघाच्या वाक्याचें पुढचेंच वाक्य पहा; ते लिहितात, "२८ जुलै १९०४ रोजीं धारवाड मुक्कामीं त्यांची "प्रतिभा" कविता बाहेर पडली." पुनः पृष्ठ २२७ वर ते लिहितात "१९०४ साल अखेर केशवसुत धारवाड हायस्कूलांत शिक्षक म्हणून गेले व मी मुंबईस लॉ क्लासांत जाण्याकरितां आलों." ही स्थिति त्यांच्या समकालीनांची! अशा परिस्थितींत एखादे विद्वान् आणि हुशार अभ्यासू टीकाकार माझ्या लेखनांत अनेकच चुका, असंख्य चुका दाखवूं शकतील. आणि या सर्व टीकाकारांच्या टीकेच्या भडीमारामधून सुटण्याकरितांच केवळ नव्हे, पण माझ्या मनानें सत्य कथनास मदत व्हावी म्हणून मी बहुतेक वेळां "असें असावें" "बहुधा असें घडलें असेल" "असा माझा तर्क आहे" या सारखीं "बाकळट" भित्रीं विधानें जागोजाग पेरलीं आहेत. त्याचा माझ्या निकटवर्तीयांस, ज्यानीं हें लेखन चालू असतांना ऐकलेलें आहे त्यांस, राग आला. त्यांनीं यावर फार कठोर टीका केली, माझा निषेध केला. "कोण येतो आहे तुमच्या खरे खोटेपणाची शहानिशा करावयास? खुशाल हें असें झालें असें स्पष्टपणानें लिहा, मोकळे व्हा!" असा ही सल्ला मला देण्यांत आला. माझी प्रकृति थोडी फार बिघडलेली होती. तेव्हां कोकण भाग, धारवाड भाग मी पहावयास जाण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावर आणि जेव्हां प्रत्यक्ष गेलों व परत आलों तेव्हांही "काय, मिळाली माहिती? कांहीं नाहीं ना?" अशा प्रकारें माझ्यावर प्रेम करणारानींच माझा थोडा निषेध केला! पण मी माझें धोरण बदललें नाहीं, बदलावयास तयार झालों नाहीं. या बाबतींत प्रसिद्ध प्रोफेसर व "वडिलांचे सेवेशीं" या ग्रंथाचे लेखक अ. म. जोशी यांचे दि. २४-३-६६ च्या मला आलेल्या पत्रांतील विचार चिन्त्य आहेत. ते लिहितात- "आपण हातीं घेतलेल्या ग्रंथाचें काम कठीण असलें, तरी आनंददायक आहे, लेखकाला आव्हान देणारें आहे." आणि हें आव्हान प्रामाणिकपणानें स्वीकारण्याचा माझा प्रयत्न आहे. माझ्या नंतर केवळ गर्वानें किंवा अभिमानानें नव्हे तर सत्य गोष्ट नमूद व्हावी म्हणूनच येथें पुढील उल्लेख करतों कीं या पुढें त्यांचें, केशवसुतांचें सत्य व खरें चरित्र प्रसिद्ध होणें जवळजवळ अशक्य आहे, साधनांच्या अभावीं. आणि जितका जितका आणखी जास्त काळ लोटेल तितकें तितकें तें काम आणखीच कठीण होणारें आहे. जास्तींत जास्त किंवा संभवनीय "सत्य" कथन हेंच ध्येय डोळ्यांपुढें ठेवल्यामुळें मीं "असें असावें" "असा तर्क करतों" वगैरे बाळवटपणा दाखवणारी विधानें केलीं आहेत. पण अशीं ही विधानें दुसऱ्या कोणासही एकीव माहितीच्याही अभावीं करतां येणारी नाहींत. केशवसुतांच्या काव्याच्या अभ्यासाच्या जोडीला मी कुटुंबीय पुतण्या आहे, या नात्यानें मला कोणत्या तरी आधारावर हीं विधानें, असलीं विधानें, करतां येतात; हाच माझा विशेष होय.

# केशवसुतांचें बडोद्यांतील शिक्षण.

केशवसुत व मोरोपंत हे शिकण्यास म्हणून कोकणच्या मातृभूमिपासून चांगले जवळजवळ ३०० मैल दूर आणि मंबईहून २२५ मैल दूर गेले. त्यानीं कोणत्या शाळेंत १८८२ सालीं प्रवेश घेतला, कोणत्या इयत्तेंत प्रवेश घेतला याचा तपशील नाहीं. १८८२ मध्यें बडोदें आजच्या एवढें गजबजलेलें आणि सुंदर नसेलच. त्यास आजचें वैभव मुख्यतः श्रीमान् सयाजीराव महाराज गायकवाड यांचेमुळें आलें. ते स्वतः बडोद्याचे गादीवर १८७५ सालीं आले, व त्यावेळीं ते फार लहान होते; केवळ १३ वर्षांचे ! १८८१ मध्यें त्यांस सर्वाधिकार प्राप्त झाले होते.

बडोद्यांतील केशवसुतांचे दिवस मात्र चांगले, सुखाचे गेले असतील. त्यांचे बंधु श्रीधरपंत यांस प्रोफेसरीचें काम आणि श्रीमान् सयाजीरावांचे बंधु संपतराव यांची शिकवणी मिळून रुपये दोनशेचे सुमारास दरमहा प्राप्ती होती. त्याकाळीं ही फार चांगली प्राप्ती होती. आणि कुटुंबही माफक, म्हणजे नवरा–बायको, दोन भाऊ व एक लहान मुलगी. त्यामुळें बहुधा रावपुरा भागांत ते सुखानें राहत असतील, एका प्रकारे. आतां शिक्षणाची व एकूण सगळीच ददात गेली अशा आनंदांत ते राहत असतील. त्या काळांतही बडोद्याचा गावांतील राजवाडा, आदि वास्तु होत्याच. मकरपुरा राजवाडा, लक्ष्मी विलास हा राजवाडा, कामाठीबाग– वन्य पशु संग्रहालययुक्त, आणि इतर सुंदर वस्तु, चित्रें आदींनीयुक्त असें पदार्थ संग्रहालय या मागाहूनच्या गोष्टी असतील. पण विश्वामित्री नदी, असेलच. थोडी फार रमणीयता, हत्ती घोडे आदि वैभव असेलच. श्रीमान संपतराव यांची ओळखही, चांगली, झाली असेलच. कदाचित् संस्कृताकडे या दोन्ही मुलांचा ओढा वाढला असेलही; कारण श्रीधरपंत संस्कृतचे व गणिताचे विद्वान् होते. चांगले चांगले संस्कृत श्लोक पाठ म्हणणें, त्यांचा अर्थ सांगणें, त्यांतला रस विषद करून सांगणें या गोष्टी प्रसंगवशात् सीतारामपंत पुण्यांत आम्हांसमोर करीत, त्या आधारावर मी वरील विधान करतों. अशा प्रकारें शाळेंत व घरीं दोन्ही ठिकाणीं या दोन बंधूंचें शिक्षण सुरु असेल, उत्तम प्रकारें. पण दामले कुटुंबावरच अचानकपणानें आकाशींची कुऱ्हाड कोसळावयाची होती असें दिसतें. एप्रिलांतील बडोद्याचा कडक उन्हाळा श्रीधरपंतांस सोसला नसावा. या पूर्वीचें त्यांचें सारें आयुष्य कोकण व मुंबई भागांत गेलेलें. तेव्हां त्यांस विषमज्वराचा झटका आला. आणि त्या आजारानेंच अखेर त्यांस इहलोकांतून ओढून नेलें. आकाशींची वीजच कोसळली त्यांचे पत्नीचे शिरावर, आणि साऱ्या कुटुंबावरच ! आणि या सर्वांस बडोदें येथील त्यांचें सुखी जीवन अल्प काळीन स्वप्नवत् भासलें, झालें. अर्थात् ही सर्व मंडळी कोकणांत अत्यंत शोकाकुल परिस्थितींत एका वर्षाच्या आंतच परतली. जातांना कोणत्या हुरूपानें, कोणत्या उमेदीनें ही मंडळी बडोद्यास गेली असेल, आणि तेथून परत येतांना त्यांची मनःस्थिति कशी झाली असेल तें समजून घेणें हें मी वाचकांच्या कल्पना शक्तीवरच सोपवतों.

# रानोमाळ भटकंती

श्रीधरपंतांचा मृत्यु १८८३ मध्यें उन्हाळ्यांत झाल्यावर कृष्णाजीपंत व मोरोपंत (किंवा कुशा व मोरू) या तरुणांपुढें पुढें काय ? हा प्रश्न उभा राहिला. तो प्रश्न केसोपंतांपुढेंही होताच. श्रीधरपंतांची पत्नी व लहान मुलगी वळण्यास त्यानीं आणली होती. त्यांचे संगोपनाचा, सांभाळ करण्याचाही मोठा प्रश्न होताच. केसोपंतांनीं त्यावेळीं सेवानिवृत्ति स्वीकारलेली होती; आणि बाळपणचे मित्र अण्णासाहेब रावसाहेब, मंडलीक यांचे कृपेमुळें त्यांचेकडे मंडलीकांच्या कोकणच्या वळणें व सोनगांव या दोन गांवच्या खोतीची व्यवस्था पाहण्याचें काम होतें. घर खूप प्रशस्त पण जंगलांतीलच जणू काय, असें होतें रहावयास, आणि धान्य-भात मिळत होतें पुष्कळ; एवढाच काय तो आधार. दुसरा मुलगा चिंतू हा त्यावेळीं जरा मोठा म्हणजे विशीजवळ आलेला, मराठी ७ वी पास झालेला; त्याचाही विवाह झालेला होता. कुशा, मोरू यांचेही विवाह झालेले; काशी, सीताराम, भीमा ही लहान मुलें होतीं. त्या काळच्या मानानें काशी आठ वर्षांची, लग्नाला योग्य झालेली होती . . अशी एकूण कुटंबावर अंधकाराची छाया पसरलेली होती. त्यांत प्रकाश एवढाच दिसला कीं आतां कुशा - मोरू या जोडीनें देश पाहिला होता, इंग्रजी शिक्षणरूप वाघिणीचें दूध प्यावयास सुरुवात केलेली होती; मुलें चुणचुणीत व हुषार वाटत होतीं; कसातरी मार्ग काढतील अशी आशा उत्पन्न करणारी होतीं . आणि या अंधकारांत या जंगलांत लांब, एक दिवा, प्रकाश, आहे असें भासत होतें. पूर्वी बडोदें या उत्तरेकडच्या दिशेस तो प्रकाश होता; आतां पूर्वेकडे, वर्धा येथें तो प्रकाश दिसू लागला ! वर्ध्यास सौ. अन्नपूर्णाबाई चरित्रनायक यांची आई, यांचा भाऊ रामभाऊ वकील होता, त्यास चांगला पैसा मिळत होता. तेव्हां त्याचे आश्रयात या मुलांनी जावें, आणि आपला भाग्योदय पहावा असा विचार या भयाण अंधकारमय परिस्थितींत केसोपंत व अन्नपूर्णाबाई यांचे डोळ्यापुढें आला असल्यास नवल नाहीं. म्हणून त्यांचेकडे आधीं पत्रव्यवहार करून ही गोष्ट ठरली व मुलांस वऱ्हाड नागपूरकडे पाठवण्यांत आलें कीं, उन्हाळा संपल्यावर तसेंच पाठवण्यांत आलें तें नक्की समजावयास साधन नाहीं. पण कुशा मोरू ही जोडी वर्ध्यास शिक्षण पुढें चालू ठेवावें म्हणून गेली हें निश्चित !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 14222

आतां वध्यास त्याकाळीं बहुधा हायस्कूल नसावें, असल्यास Craddock हायस्कूल असेल; पण तें अगदीं बाल्यावस्थेंत असावें. तेव्हां जवळच नागपूरला या मुलांनी जावें, रहावें; व शिक्षण पुढें सुरूं करावें, असा विचार वध्यास मामांबरोबर ठरला असावा. त्याप्रमाणें ही जोडी नागपूरास गेली, व नील सिटी हायस्कूलमध्यें विद्यार्थी म्हणून दाखल झाली. याच काळांत पुढें फर्ग्युसन कॉलेजांतील इंग्रजीचे प्रसिद्ध प्राध्यापक वासुदेव बळवंत पटवर्धन (आणि १९१९–२० चे सुमारास त्याच कॉलेजचे प्रिन्सिपॉल झालेले गृहस्थ) यांचे मैत्रीचा लाभ केशवसुतांस झाला. त्याच प्रमाणें सीताबर्डीवर बुट्टींच्या चाळींत बिऱ्हाड करून रहाणाऱ्या श्री.नारायण वामन टिळक या पुढें कीर्तिमंत झालेल्या कवींचाही त्यांचेशीं परिचय झाला. हा परिचय वाढत जाऊन पत्ररूपानें त्याचें मैत्रींत रुपांतर झालें; व तो सबंध जन्मभर टिकला असेल. "वा. ब. पटवर्धन, मु. नागपूर यांस" या नांवाची एक कविता केशवसुतांनीं सन १८८८ सालीं लिहून पुण्याहून त्यांस धाडलेली प्रसिद्ध आहे.

पण नागपूरचें वास्तव्य या दोन्ही बंधूंस कारणाकारणांनें मानवलें नसावें; कारण कुशा पुढें पुण्यांत न्यू इंग्लिश स्कूलमध्यें दाखल झाला, तर मोरू उमरावतीच्या हायस्कूलमध्ये गेला. मोरू उमरावतीस आकृष्ट होण्याचें कारण बहुधा उमरावतीस त्यावेळीं श्रीधरपंतांचे मित्र पुढें सर झालेले मोरोपंत जोशी, वकील यांजकडून मदत मिळेल ही आशा असावी. आणि त्याप्रमाणें जोशी वकील यानीं या मुलास, तरुणास मदत दिली होती. उमरावती हायस्कूलमध्यें मोरू चमकला, त्यास बक्षिस मिळालेलें एक पुस्तक, ग्रंथ, "A Short History of the English People" लेखक मि. जॉन रिचर्ड ग्रीन या नांवाचें पुस्तक आजही माझ्या जवळ आहे ! तेथें मॅट्रिक होवून मोरू पुढें डेक्कन कॉलेजांत गेला. . . तो थोडाफार स्थिरबुद्धीचा असल्यानें राजमार्गानें डोळ्यासमोर वाट काढीत चालला; पण कुशा ?

त्यास आधींच कविता देवीनें वेडे केलें होतें, आपल्याकडे आकृष्ट केलें होतें. तो पुण्यास गेला. धाकट्या शास्त्रीबुवांनीं स्थापिलेल्या आणि टिळक आगरकर, आपटे आदि तरुणांनी संवर्धिलेल्या न्यू इंग्लिश शाळेंत तो जाऊं लागला. त्याच वेळीं तेथें असलेल्या हरी नारायण आपटे या विद्यार्थ्यापाशीं समानधर्मी म्हणून त्यांचा स्नेहही जुळला असेल; कारण छोट्या हरीनें विष्णुशास्त्री यांचे मृत्युवर "शिष्यजन विलाप" म्हणून एक चांगलें काव्य रचलेलें प्रसिद्ध आहे. यावेळीं त्यास पुण्यांत कोण कोण स्नेही मिळाले तें समजावयास नक्की साधनें नाहीत. पण त्याच काळांत बहुधा श्री आप्पाजी बळवंत दाते यांचेशीं त्यांचा स्नेह जुळला असावा,त्यांचे

विषयीं एक काव्य ही केशवसुतांनी लिहिलें आहे. सन १८८९ मध्यें "गांवीं गेलेल्या मित्राची खोली ( बंद ) पाहून " या काव्यांतील मित्र कोण तो कळत नाहीं. याच काळच्या मित्रांत सीतारामपंत, वर्तक हें एक नाव घेतात; पण त्यांची जास्त माहिती देत नाहींत. (सी. के. दामले यांची आवृति सन १९२१ प्रस्तावना पृ. १०) त्यावेळीं त्यांचें वास्तव्य खासगीवाले यांच्या वाड्यांत (हा मोठा वाडा 'आनंदाश्रम' या आजच्या भव्य वास्तु शेजारीं आणि सध्यां प्रसिद्ध नूतन मराठी विद्यालय या हायस्कूलच्या इमारतीमध्यें पश्चिमेकडून प्रवेश करीत असतां डाव्या हातास म्हणजे उत्तर दिशेकडे होता) आणि पुष्करिणीचे हौदाजवळ समोरचे अंगास दक्षिणे-कडे असलेल्या देशमूखवाड्याचे पलीकडे असणाऱ्या भागवतांचे वाड्यांत होतें-पुष्करिणीचे हौदाचे पश्चिम दिशेस, पुण्याचे रेमार्केट किंवा आतांचें फुले मार्केट, मंडई, ही वास्तु बांधणारे इंजीनियर वासुदेवराव कानिटकर यांचा वाडा आहे. त्यावेळीं त्यांचे चिरंजीव शिकलेले तरुण गोविंदराव कानिटकर व त्यांच्या तरूण सुशिक्षित पत्नी सौ. काशीताई कानिटकर हे तेथें राहत असतील. आणि त्या दंपतीचा आणि केशव-सुतांचा परिचय असला पाहिजे. तो चांगला घनिष्ठ असावा, आणि त्याचा परिणाम, केशवसुतांच्या संस्कारक्षम मनावर (फार मोठा परिणाम) झालेला असावा. आपली स्थिति श्री. गोविंदराव-काशीबाई यांच्या सारखी असती तर, असे विचार वारंवार त्यांचे मनांत आयुष्यभर येत असले पाहिजेव, असा माझा समज आहे. आयुष्यांत कांहीं कमी आहे, असें त्यांस निश्चित वाटत असावें, आणि त्यापैकीं ही एक गोष्ट सुप्त मनांत असावी. गोविंदराव व सीतारामपंत यांचे वयांत अंतर पुष्कळच. पण रावसाहेब गोविंदराव कानिटकर सीतापंतांकडे १९१५ ते १९१८ या काळांत ४।६ वेळां तरी आलेले पाहिल्याचें मला स्मरण आहे. केशवसुतांमुळेंच सीतारामपंत व गोविंदराव यांच्यांत ओळख असावी. सौ. काशीताई यानी लिहिलेलें फार जूनें पुस्तक– " डॉ. आनंदीबाई जोशी चरित्र " आमच्या घरीं होतें, मी तें वाचलें होतें, सुरेख चरित्र. सीतारामपंत, मित्रांमध्यें, सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे हें ही नांव देतात. मेहेंदळे यांची व मोरोपंत यांची डेक्कन कॉलेजांतील ओळख होती ही गोष्ट स्वतः मेहेंदळे यांचेच तोंडून मी ऐकली आहे, १९२३ सालीं.

इतिहासाची पुनरावृत्ति होत असते म्हणतात. निदान साहित्य प्रांतांत ती तशी झालेली दिसते. १८८५–९० या काळाचे सुमारास तरुण, सुविद्य, वाङ्मयप्रेमी असें दांपत्य– (पुढें रावसाहेब झालेले गोविंदराव कानिटकर आणि सौ. काशीबाई) यांचे भोवतीं तरूण लोक वाङ्मयप्रेमी लोक– उदा. हरीभाऊ, व त्यांचे मित्र, त्यांतच कुशा किंवा केशवसुत आलेच- रुंजी घालत असावेत. आणि त्यांचें संगतींत विचारविनिमय करून आपली उन्नति साधीत असावेत. १९२१–२२ सालचे सुमा-

रास त्याच पुण्यांत पण आतां नारायण पेठेंत लो. टिळकांच्या वाड्यांत हें केन्द्र गेलें. कवि. प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे आणि सौ. मनोरमाबाई हें तें केन्द्र होय; आणि 'रविकरण मंडळ' हा त्या तरूणांचा तांडा किंवा रूंजी घालणारा संघ होय.

[ "हरी ... आपटे " ( ले. वेणू ...... पानसे ) हा चरित्रग्रंथ, सुमारें २५ वर्षांनी मी मुद्दाम पुनः वाचला. त्यांत केशवसुतांचा हरीभाऊंचे मित्र म्हणून मला उल्लेख मिळाला नाहीं ! या ग्रंथांत प्रकरण १५ वें "हरीभाऊंचें मित्र-मंडळ" म्हणून एक खास प्रकरण आहे. त्यांचे निरनिराळ्या नात्यांचे निरनिराळे मित्र, मित्र-मंडळें होतीं, अशी माहिती असून त्या प्रकरणांत केशवसुत यांचा अजीबात उल्लेख नाहीं ! ( रावसाहेब ) गोविंदराव कानिटकर व सौ. काशीताई कानिटकर आणि हरीभाऊ यांच्या समान मित्रमंडळांत हो केशवसुत किंवा आप्पा यांचा उल्लेख नाहीं.

हरीभाऊ हे १८८३ मध्येंच मॅट्रिक होवून डेक्कन कॉलेजांत शिकावयास गेले. (पृ. ५८, हरीभाऊ चरित्र, पहा.) आप्पा केशवसुत हे त्यानंतर न्यू इंग्लिश-स्कूल मध्यें दाखल झाले ! पी.इ.नापास झाल्यावर जानेवारी १८८५ मध्यें ते फर्ग्युसन कॉलेजांत गेले. असा उल्लेख पृ. ६५ वर आहे. सौ. काशीताई (बहीण) आणि श्री. गोविंदराव कानिटकर यांचा आणि हरीभाऊंचा संबंध १८८३ पासून आला. याबद्दल कु. पानसे "बहीण-भाऊ व वाङ्मयीन सहकार" या मथळ्याचें क्र. ६ चें एक स्वतंत्र प्रकरणच लिहितात. पृ. ८४ वर, १८८६ च्या जुलै मध्यें श्री. कानिटकरांनीं "मनोरंजन' नावाचें एक मासिक काढलें असा उल्लेख असून त्याचे मुखपृष्ठाचा भाग छापलेला आहे. १८८३ मध्यें कै. विष्णुशास्त्री यांचें स्मारक म्हणून "निबंध चंद्रिका" सुरू झालेलें, पण खालावलेल्या अवस्थेंतील मासिक, आणि "मनोरंजन" यांचें एकीकरण १८८७ मध्यें झालें. ( पृ. ८६ पहा ) हें जोड मासिक १८९२ त बंद पडलें ( पृ. ८७ ). या जोड नांवाच्या मासिकांत आपांच्या कांहीं कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. शिवाय हरीभाऊंच्या "करमणूक" मध्येंही आप्पांच्या पुष्कळ कविता, ते मुंबईस गेल्यावरही छापलेल्या आहेत. त्यांची माहिती कु. वेणूताई पृ. १०१ वर देतात. " ··· 'त्वत्प्रीतीस अपात्र हा जन' 'जायाचें जग कां असेंच ?' 'प्रीतीची भाषा,' 'विकसन' 'कविता आणि प्रीति' यासारख्या केशवसुतांसारख्या प्रतिभाशाली कवीच्या मनोहर कविता ··· " अशी माहिती आढळते.

"पण लक्षांत कोण घेतोच्या कर्त्यास" हें काव्य १९-१०-१८९२ रोजीं आप्पांनीं ( केशवसुतांनी ) लिहिलेलें प्रख्यात आहे. त्या काव्यावरून माझा तर्क

एवढाच होतो कीं त्यांची मैत्री ही वाङ्मयीन मैत्रीच असावी. एकमेकांबद्दल प्रेमापेक्षां आदरच असावा, या तर्कास बळकटी येत आहे माझ्या मनांत. आणि ज्याअर्थी हरीभाऊंनीं केशवसुतांच्या समग्र काव्याची १ ली आवृत्ति त्यांचें नांवही न देतां छापली, ( चरित्र, काव्यविवेचन तर दूरच राहो ) आणि त्याबद्दल हरीभाऊंच्या मित्रांनीं, चरित्रकारांनीं ती तशी छापण्याबद्दल समर्थन केलेलें असलें, कारणें दिलेलीं असलीं, (ते त्यावेळीं रवींद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलिचें भाषांतर करण्यांत गुंतले होते; त्यांची आवडती कन्या त्या सुमारास कैलासवासी झाली होती. ) तरी तें मला फारसें समर्थनीय वाटत नाहीं त्यांचा परस्पर संबंधच वेतावाताचा असावा या तर्कासच बळकटी येते.

या सर्व कारणांमुळें मी आधीं लिहिलेला मजकूर, ( एप्रिल १९६६ ) फारसा खरा नसावा असें वाटतें. पण मी पूर्वीं तो लिहिला याचें कारण प्रा. भ. श्री. पंडित यांचे ग्रंथाचा व इतर ग्रंथांचा अभ्यास हें होय. पंडितांचा "समग्र केशवसुत" ग्रंथ पृ. ३० ते ३४ पहा. आतां हा मजकूर फारसा खरा नसावा असें कां वाटतें त्याचीं कारणें वर दिलीं आहेत.

द. मो. दामले ]

( दि. ५ जून १९६६ )

नुकत्याच पंख फुटलेल्या पाखरानें ज्याप्रमाणें आकाशांत स्वच्छंद भराऱ्या माराव्यात त्याप्रमाणें तरुण कुशानें इंग्रजी भाषारूप पंख उत्पन्न झाल्यामुळें, लाभल्यामुळें इंग्लिश वाङ्मयाकाशांत भराऱ्या मारावयास, फेरफटका करावयास सुरुवात केली असल्यास नवल नाहीं. इंग्लिश भाषेंतील काव्योद्यानांत एखाद्या भृंग्याप्रमाणें दंग होवून गुंऽगुं ··· करीत गुंजारव करावयास केशवसुतांनीं सुरूवात करून त्या उद्यानांतील फुलांतील मध चाखावयास, गोळा करावयास, त्याचा संग्रह करावयास त्यानीं सुरुवात केली असल्यास नवल नाहीं. आणि या पक्षाच्या किंवा भृंग्याचा स्थितींत आपलें कुळ, आप्तेष्ट, आपली परिस्थिति, पत्नीसुद्धां यांचा त्यांस विसर पडला असल्यास नवल वाटण्याचें कारण नाहीं. त्याच काळांत त्यानीं मॅट्रिक परीक्षा देण्याचा प्रयत्न केला. आणि एकवेळ, १८८७ मध्यें इंग्रजी ऐच्छिक हा विषय, जरा कठीणच कर्म,स्त्रीकारून अपयश मिळवलें ; व पुनः १८८८ मध्यें मराठी किंवा इंग्रजीच्या पेपरामध्यें बहुधा इंग्रजी– त्या उताऱ्याचें मराठी काव्यांत भाषांतर करण्याच्या नादानें वेळ गमावून व पेपर पुष्कळसा अपुराच राहिल्यामुळें पुनः एकवार अपयश स्वीकारलें ! आतां मोरूनें (तो त्यावेळीं पुण्यातच डेक्कन कॉलेजांत, पुढें जावून, शिकत होता) त्यांस धोपटमार्गानें जावून, प्रयत्न, करून निदान मॅट्रिक–स्कूल फायनल–परीक्षा संपादावी व वडीलांस मदत करावी असा विचार

त्यांचे मनांत पक्का बिंबवला असावा. म्हणून ते १८८९ मध्यें एकदांचे मॅट्रिक-( व स्कूल फायनल बहुधा) पास झ‌ाले. या संबंधींचा अपुराच इतिहास इंदूरचे श्री. रा. अ. काळेले यानीं दिनांक १४ मार्च १९६६ च्या दैनिक "केसरी" त प्रसिद्ध केला आहे. मी त्यांचे नापास होण्याचीं संभाव्य कारणें जीं ऐकलीं तीं, नवीन माहिती म्हणून दिली आहे. बाकीचा त्यानीं दिलेला तपशील अर्थात् बरोबरच आहे. त्यांनीं १८८९ मध्यें केशवसुतांस मिळालेले गुण दिले आहेत ते असे:-

| विषय | प्राप्त गुण | उत्तीर्ण होण्यास लागणारे किमान गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | ५४ | ५०/१५० |
| (यावेळीं तोंडी नव्हती | | |
| मराठी | ३६ | ३३$\frac{१}{३}$/१०० |
| गणित | ४३ | |
| बीज गणित भूमिति | ३६ | ४३$\frac{३}{४}$/१७५ |
| इतिहास भूगोल | २४ | |
| | ३४ | ३७$\frac{१}{२}$/१५० |
| एकूण | २२७ | ५७५ |

या गुण तक्त्यावरूनही मी वर दिलेली माहिती म्हणजे प्राप्त कर्तव्यही विसरणें, आणि काव्याच्या नादीं लागणें हा "छंद फंद" त्यांस किती तीव्रत्वानें ग्रासीत होता, व त्यामुळेंच ते त्यांचे वडील व इतर नातेवाईक मंडळी यांचे रोषास कां व कसे पात्र होत असतील याचा आपोआप उलगडा होईल. या काळच्या सुमाराच्या त्यांच्या कविता वाचल्यास त्या कवितांवर त्यांचे जीवनाचा प्रकाश पडलेला स्पष्ट दिसेल. २७ ऑगस्ट, १८९० या दिवशीं लिहिलेली "दिव्य ठिणगी" ही कविता यादृष्टीनें फार चिन्त्य, आणि महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणें वळणें येथें ३ मे १८९० या दिवशीं लिहिलेली "सिंहावलोकन" आणि मुंबई येथें ९ ऑगस्ट, १८९० रोजीं "फुकट दडवलेला तास" अशा दोन कविताही कमी प्रमाणांत पण महत्त्वाच्या आहेत "सिंहावलोकन" या काव्यापूर्वीच त्यांची धाकटी बहीण भीमा हिचा म. खेड, जिल्हा रत्नागिरी येथें विवाह झाला असावा. तिला खेड शेजारच्या ४।६ मैल अंतरावर असणाऱ्या कळमणी बुद्रुकच्या श्री. प्रभाकरपंत आपटे या मध्यम स्थितींतील तरुणास दिली होती. आणि विवाहानंतर वळणें येथें सर्व कुटुंबीय मंडळी मोठें घर म्हणून एकत्र जमा झाली होती. त्यावेळीं 'सिंहावलोकन' हें काव्य रचलें गेलें.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. दि: ..................
क्रमांक .................. नों. दि. ..................

पुण्याच्या वास्तव्यांत काळांत त्यानीं एकूण सुमारें ४० कविता केल्या असें आढळेल. काव्य करण्यास पुण्यास येण्यापूर्वी पासूनच त्यानीं सुरुवात केली असावी. पुण्यास ते १८८४ सालच्या सुमारास वयाचे १८ व्या वर्षी आले; पण त्यानीं काव्य करण्यास कोकण सोडून बडोद्यास श्रीधरपंतांकडे शिकावयास ८२/८३ सालीं जाण्यापूर्वीच सुरुवात केलेली असली पाहिजे. पहिल्या पहिल्या कविता नापसत म्हणून त्यानीं फाडून टाकलेल्या असाव्यात त्याचप्रमाणें न जुळलेलीं काव्यें, त्यांचे मनानें अर्धवट राहिलेलीं काव्यें तें फाडून टाकीत असत. एक गमतीदार नमुना येथें देतों, म्हणजे माझें म्हणणें स्पष्ट होईल, आणि फार कष्ट घेऊन, सखोल अभ्यास करणारे चिकित्सक प्रा. भ. श्री. पंडितांसारखें लोकही कसे फसतात तें स्पष्ट होईल. पंडीत लिहितात. ( त्यांचा ग्रंथ पृ. ३४ वर ) कीं " लवाजम्याचे झुलती हत्ती .." वगैरे,"घडयाळ" या नांवाच्या कवितेबद्दल सीतारामपंत चुकीनें पुण्यास ती लिहिली असें सांगतात, पण ती कविता मुंबईस १८९५ सालीं लिहिली. " घडयाळ " या नांवाची कविता ९५ सालीं मुंबईस लिहिली गेलेली आहे. या कवितेच्या तळाशीं (सीतारामपंतांची २१ ची आवृत्ति, पृ. १७७ वर तळटीप आहे श्री. गर्गे यांची. तें काव्य, पहिल्या ह. ना. आपटयांच्या, आवृत्तिमध्यें नाहीं अशी माहिती आहे. ) सीतारामपंत या काव्यासंबंधीं प्रस्तावनेंत ते शीघ्रकविताही करूं शकत असत, याचें उदाहरण म्हणून खालील कविता उद्धृत करतात.

" लवाजम्याचे झुलती हत्ती
लक्ष त्याकडे देतो कोण ?
खिशामध्यें हे घडयाळ बोले
आला क्षण ! गेला क्षण !

( १९२१ ची आवृत्ति पृ. १० पहा ) हें काव्य त्यानीं पुण्यास मित्राला म्हणून दाखवलें, सर्कसचे किंवा संस्थानिकाचे, किंवा शंकराचार्यांचे हत्ती पाहून. पण हें शीघ्र काव्य मुंबईस रचलें गेलें, छत्रे यांची सर्कस पाहून, पुण्यास नाहीं; असें ठाम पणानें श्री. पडित सांगतात, माधवानुजांच्या आठवणीवरून (मासिक मनोरंजन १९०६); व सीतारामपंत यांची चूक दाखवतात. तेव्हां सीतारामपंतही बरोबर व भवानी शंकरही बरोबर हा निष्कर्ष चांगला. असे मानावयास हरकत कोणती? दोघांनीही शीघ्रकाव्य म्हणून त्याच ओळी दिल्या आहेत, एकजण स्थळ मुंबई सांगतात, एक जण पुणें एवढाच क्षुल्लक फरक. कदाचित हा अर्धवट तुकडा पुण्यास रचून सोडून दिला; पुढें मुंबईस पूर्ण काव्य झालें.

आप्पांच्या पुण्याच्या विद्यार्थीदशेंतील मुक्कामांत अल्पकाळ साधारणपणानें एकदोन वर्षेपर्यंत टिकलेली एक फार महत्वाची त्यांचे मनाची अवस्था होती

तिचा आढळ आजपर्यंत झालेला नाहीं. पण त्या त्यांच्या मानसिक अवस्थेस मला आढळलेल्या पुराव्यावरून ती अवस्था माझ्याप्रमाणें इतरांसही पटावी असा विश्वास वाटतो, तिची माहितीच आतां देतों.

"गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे" या काव्यांत त्याचें फार अल्पसें, ओझरतें दर्शन घडतें. त्यांचा धाकटा भाऊ हा वडिलांच्या कडेला निजलेला आहे. तो देशकारण करील काय ? ध्वज उभा करील काय ? स्वातंत्र्यदेव मनानें भजेल काय ? जनांत दिवटी (?) धरील काय ? अशा प्रकारच्या आकांक्षा ते व्यक्त करतात. या सर्व आकांक्षा त्यांच्या स्वतःच्याच सुप्त महत्वाकांक्षा होत. ध्वज म्हणजे राष्ट्रध्वज, स्वातंत्र्य देव भजण्यास शक्य ते उपाय, दिवटी पेटती मशाल यांचा उल्लेख म्हणजे अप्रत्यक्षपणानें क्रान्तिकारक बनणेंच होय. पण हा माझा तर्क एक तर्कटत्र वाटेल कोणास; पण त्यानीं आतां त्या काव्याच्या आधींच्या कवितेकडे – "गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून" ( या मित्राचें नांव ते बुद्धिपुरस्सर दडवून ठेवीत आहेत, कारण तो एक ज्वलज्जहाल देशभक्त, क्रांतिकारक असावा; याच सुमाराच्या इतर कांहीं मित्रांसंबंधींच्या कविता उघडपणानें नावें घेऊन त्यानीं लिहिलेल्या आहेत. (उदा. – "पण लक्षांत कोण घेतो" च्या कर्त्यास, "वा. ब. पटवर्धन मु. नागपूर यांस," "आप्पाजी बळवंत दाते यांस." ) ही कविता बारकाईनें वाचा, खालील ओळी पहा :–

पाशांला जो तोडायला पाही । स्वदेशपाशीं आपणा बांधुनि घेई ।। पुढें
सोडी पत्नीपाशाची तो आस । स्वदेशसेवेकरितां घाली कास ।। पुढें
देशाविषयीं गोष्टी बोलत येथें । बसलों, विसरुनि कितीकदां निद्रेतें ।।
श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हां । अश्रूंमध्यें अश्रु गळाले तेव्हां ।। पुढें
तेव्हां आम्ही म्हटलें – ही ऱ्हासाची । 'रजनी केव्हां जाइल विरुनी साची?' ।।
स्वतंत्रतेची पहांट ती येईल । उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील ? – ।।
"या डोळ्यांनीं पहाट ती बघण्याचें । असेल कां हो नशिबीं दुर्दैव्यांचे ? ।।
किंवा तीतें आणायाचे कांहीं । यत्न आमुच्या होतिल काय करांहीं ? ।।
"इच्छा धरितां मार्ग मिळे अपणाला"। या वचनें मग धीर दिला चित्ताला ।।
कोठें असशिल आतां मित्रा माझे ?–। करीत असशिल काय काय तीं काजें?- ।।
देशासाठीं शरीर झिजवायाला । स्फूर्ती आणित असशिल का कोणाला ? ।।

त्या काळचें पुणें, वासुदेव बळवंतांचा प्रयत्न फसून ते एडनच्या तुरूंगांत गेल्यानंतरचें वरून शांत दिसणारें पुणें, राष्ट्रीय सभा स्थापन झाल्यानंतरचें पुणें, विष्णुशास्त्री, न्यायमूर्ति रानडे, लोकहितवादी, श्रीधर विठ्ठल दाते (काँग्रेसच्याच

मंडपांत सामाजिक परिषद भरूं न देणें या ध्येयाकरितां तो मंडपच जाळूं इच्छिणारी दांडगी व्यक्ति), तरुण बाळ गंगाधर टिळक, आगरकर आदींचे पुणें, या एका प्रकारें जिवंत व जळणाऱ्या पुण्यांत ते रहात होते ही पार्श्वभूमि लक्षांत घेऊन या दोन काव्यांचा विचार करावा वाचकांनीं. आणि नंतर माझ्या मनांत आलेल्या विचारांचा - केशवसुत हे क्रांतिकारकांच्या संगतींत होते, ते त्या मार्गावर जाण्याच्या विचारांत होते हा विचार याचा सखोल अभ्यास करावा.

माझ्या अंदाजास आणखी दोन पुरावे सादर करितों. केशवसुत स्मृतिग्रंथ पृ. २४३ पहा. त्या पानावर श्री. वि. श्री. करंदीकर आठवणी सांगतात. त्यांतली पहिलीच आठवण पहा. त्यांनी केशवसुतांच्या ''भवानी तलवार''या Revolutionary काव्याची माहिती दिलेली आहे. या आठवणीचा काळ फेब्रुवारी १८९९ होय ते Revolutionary, क्रांतिकारक बनले होते; तशा प्रकारची काव्य– रचना करीत होते; पण प्रसिद्ध करण्यास धजत नव्हते असा अर्थ स्पष्ट दिसतो. त्याचप्रमाणें त्यांनी तो मार्ग – क्रांतिकारक बनून देशसेवा करण्याचा मार्ग – सोडून दिलेला होता; एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष देशभक्तिपर कविता रचण्याचेंही सोडून दिल्यासारखें दिसतें.

आतां त्यांच्या "किरातार्जुनीयम् सर्ग १ ला" ही कविता मित्राबद्दलच्या व "गोष्टीं घराकडील" या दोन काव्यांच्या मधील काळांत रचलेली आहे. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांस या कवितेचें एक स्वतंत्र व आगळें महत्व वाटावयास हवें. कसें व कां तें पहा :–

या प्रकरणांतील दुर्योधन व कौरव हे ब्रिटिश राजसत्ता, व त्या सत्तेचे प्रतिनिधि; अरण्यांत अज्ञातवासांत रहाणारा युधिष्ठिर म्हणजे अज्ञातपणानें स्वातंत्र्य संपादनाची इच्छा धरणारे, प्रयत्न करणारे, देशभक्त; किरात, भिल्ल हे त्यांचे सहकारी, असा अन्योक्तीसारखा अर्थ मनांत आणून ही कविता वाचा दुर्योधन - इंग्रज - देशावर राज्य फार उत्तम करीत आहे. प्रजाजन आनंदांत आहेत, सुखी आहेत, तो न्यायानें राज्य करणारा आहे असा भास उत्पन्न करीत असून हें चित्र इंग्रजांच्या हिंदुस्थानवरच्या राज्य कारभाराचें नव्हे काय? त्याच दुर्योधनाचें दुसरें चित्र पहा –

" तुम्हांपासुनि तो पराभव मनीं शंकी, जरी काननीं
तुम्ही राहतसां, सुयोधन जरी बैसे स्वराज्यासनीं;

या लागूनि, दुरोदरीं मिळविली पृथ्वी, अतां इच्छितो
न्यायाने वश ती समग्र करण्या, गांधारिचा सूनु तो."

आणि

कोणी भाषण संगतींत वदतां नामाग्रती तूझिया
चित्तीं आठवुनी विलक्षण अशा शौर्यास पार्थाचिया,
जैसा दुःसह मंत्रशब्द अहि तो ऐकूनि, हाही तसा
खालीं घालुनि आनना व्यथित कीं होतो मनीं फारसा !
यासाठींच तुला अपाय करण्या आहे टपूनी बरें ! –
जें कांहीं करणें असेल तुजला तें तूं पहा सत्वरें !

या ओळींत इंग्रज गव्हर्नर, व्हाइसरॉय असा कोणी तरी श्रेष्ठ म्हणजे सुयोधन, आणि युधिष्ठर, काननी राहणारा, म्हणजे देश स्वतंत्र करूं इच्छिणारे देशभक्त; त्यांस मनांत भिणारा दुर्योधन असें हें चित्र आहे. . ... हें सर्व काव्य या नव्या मी दाखवलेल्या नजरेनें वाचकांनीं वाचावें अभ्यासावें. म्हणजे वाङ्मय प्रांतांत केशवसुतांनीं राष्ट्रभक्ति–देशसेवापर लिखाण लिहिण्याचा एक नवा प्रकार निर्माण केलेला आढळेल. हा प्रकार त्यानीं (कां कोणास कळे, किंवा त्यांचे त्यांसच माहीत) पुढें चालूं ठेवला नाहीं. देशभक्ति करण्याचो, लोकांची सेवा करण्याची निराळीच रीत, रस्ता, ज्यांत प्रत्यक्ष धोका नाहीं अशी रीत किंवा रस्ता, पुढील आयुष्यांत त्यानीं बुद्धिपुरस्सर चोखाळलेला दिसतो. पण त्यांच्या या पद्धतीचाच पुढें दे.भ.शि.म. परांजपे यांनीं "काळ" पत्रांत, व दे. भ. कृ. प्र. खाडिलकर यानीं "भाऊबंकी" ("कीचकवध" वगैरे नाटकांत प्रभावीपणानें उपयोग करून देशभक्ति गाजवली, इंग्रज सरकारास भीति निर्माण केली ! या असल्या वाङ्मय प्रकाराचें हें मूळ "ऋषिचें कूळ" व "नदीचें मूळ" फार लहान, लक्षांत भरण्यासारखें नसतें, अज्ञात असतें, अशी जी एक सर्वसामान्य समजूत आहे त्याप्रमाणेंच) या लहानशा काव्यांत आढळेल. मला असें यत्किंचित् ही सुचवावयाचें नाहीं कीं, हें काव्य पाहून दे. भ. परांजपे व खाडिलकर यांनीं आपली वैशिष्ट्यपूर्ण लेखनपद्धति उचलली. त्या दोन श्रेष्ठ वाङ्मयप्रभूंनी आपल्या स्वतंत्र प्रज्ञेनेंच आपला मार्ग शोधून काढून तो अवलंबिला. पण तो मार्ग लक्षांत भरण्यापूर्वी त्या मार्गासारखी एक पाऊल वाट वाङ्मयाच्या तिसऱ्याच एका प्रांतांत– काव्यप्रांतांत, केशवसुत चालूं लागले होते, पण त्यांवीं तिचा उपयोग करणें ताबडतोब थांबवलें, असें म्हणावयास मला शंका वाटत नाहीं.

अभ्यासकांपुढें, वाचकांपुढें या निमित्ताने या चरित्रलेखनाचे निमित्तानें मी एक नवाच विषय, चिंतनाकरिता ठेवीत आहे. त्याचा अभ्यास व्हावा हीच इच्छा आहे.

या ग्रंथांत केशवसुतांच्या काव्याविषयीं व त्यांच्या टीकाकारांविषयीं लिहिण्याचें कारण नाहीं; प्रयोजन नाहीं. तो स्वतंत्र विषय आहे; आणि त्यावर बराच अभ्यास करून कांहीं वर्षांनंतर लिहिण्याचा विचार आहे. तूर्त सांगण्याचा आशय एवढाच कीं, ते काव्य करावयास पुण्यांत असतां जोरानें लागले होते. या सर्व काळांत इंग्रजी काव्याचा त्यांचा परिचय सुरूं झाला होता, त्या काव्य वाङ्-मयाची त्यांचेवर छाप पडत चालली होती. ते व त्यांची पत्नी हे दूर दूरच राहत. त्यामुळें स्त्रीप्रेम–विषयक भावना उचंबळून येत असत; आणि तशा प्रकारची Romantic काव्यें रचण्याकडे त्यांचे मनाचा ओढा जात चालला होता. काव्याच्या या नादाच्यापायीं त्यांस कौटुंबिक मंडळींची, स्नेहीमंडळींची बोलणीं खावीं लागत होती; तरीहि ते आपला नाद सोडीत नव्हते, आणि काव्य करण्याचेपायीं वेडावून गेले होते. ज्याप्रमाणें संसारांत राहून तुकाराम महाराज देहूच्या देवळांत पायांत चाळ बांधून भजनकीर्तनांत दंग होवून नाचत, देहभान हारपून बसत, संसारांतील कर्तव्यें विसरून जात त्यासारखीच कांहींशी अवस्था केशवसुतांची होती. त्यादृष्टीनें मी वाचकांचे या कालाच्या शेवटीं शेवटीं त्यांनीं दादर येथें २७ ऑगस्ट १८९० रोजीं लिहिलेल्या " दिव्य ठिणगी " या काव्याकडे पुनः एकवार लक्ष वेधतों. माझे मताने हें काव्य त्यांच्या आयुष्यांतलें एक फार महत्त्वाचें काव्य आहे. या काव्याचा सारांश असा–

जिकडे तिकडे काळोखा आहे, भयाणता आहे, स्फूर्तीचे यान (विमान) घेऊन हे आकाशांत गेले. एका वेदीवर ज्वाळा पेटत असलेल्या त्यांनी पाहिल्या. एक ठिणगी त्यांचेकडे त्या ज्वाळेनें फेकली, ती त्यांनीं हृदयांत स्थापन केली, पृथ्वीनेंच त्यांस ती ठिणगी आणण्यास नभांत धाडलें होतें. ती त्यांनीं पृथ्वीवर आणली. त्या ठिणगीस खूपच बलिदान केलें, त्याचें मोजमाप नाहीं, मी जे कांहीं गमावलें त्याबद्दल मला क्षिती नाहीं दुःख नाहीं. पण मी जें पृथ्वीवर आणलें आहे त्याचा जन, जग धिक्कार करीत आहेत, याबद्दल त्यांस दुःख व आश्चर्य वाटतें.

यावरून त्यांचे पूर्वायुष्याची कल्पना तसेंच त्यांचे समकालीनांचे त्यांचे कार्याबद्दलचें मत, त्यांचा स्वतःचा स्वकार्याबद्दल, कर्तव्याबद्दलचा प्रदीर्घ आत्म-विश्वास या सर्वांचें प्रतिबिंब या काव्यांत सुंदरपणानें उतरलें आहे, या काव्यांतील आत्मविश्वास निर्माण होण्यास ते १८८९ अखेर मॅट्रिक परीक्षा पास झाले होते, याबद्दलचा आनंद ही बाब जमेस धरली पाहिजे. १८९० मधील या काव्याआधीं रचिलेल्या ३.४ काव्यांतही या आनंदाचीं छटा चांगली प्रतिबिंबित झालेली आढळते.

"सिंहावलोकन" या मे १८९० मधील काव्यांत केवळ इतिहास आहे. पण त्यानंतरच्या या "दिव्य ठिणगी" मध्यें खूपच जास्त माहिती, त्यांचा दांडगा आत्मविश्वास, त्यांच्या काव्यविषयक आयुष्यांतल्या ध्येयाविषयीं Life's Mission स्पष्ट कल्पना आढळते; आणि तें ध्येय किती उच्च होतें त्याचीही ते सुंदर व स्पष्ट कल्पना देतात.

आतां त्यांचे मुंबईतल्या अंदाजानें चार वर्षांच्या भटकंतीबद्दल माहिती घेऊं या.

१८९० ते जवळजवळ १८९३ अखेरपर्यंतचीं सुमारें चार वर्षे मुंबईत आणि आसपासचे भागांत म्हणजे गिरगांव, दादर (त्या काळीं तें आजच्यासारखें जवळ वाटत नसे), कल्याण, सावंतवाडी इतक्या भागांत ते राहिले. तें कसे राहिले असतील ते एक तेच जाणोत! क्वचित् कांही धागदोरे सांपडतात, त्यांच्या आधाराने त्यांचें या काळांतील जीवनाची कल्पनाच केवळ करावयाची.

पहिली गोष्ट म्हणजे त्यांस स्थिर स्वरूपाची नोकरी नसावी. खाजगी शाळांत, किंवा मिशनच्या शाळांत शिक्षकाची नोकरी ते करीत असावे. त्याचप्रमाणें ते तार मास्तरचें कामही या काळांत केव्हांतरी शिकत होते अशी माहिती मिळते. कारकुनीही त्यानीं केली असावी. या काळांत त्यांचे मित्रवर्गांत श्री. काशिनाथ रघुनाथ (मित्र) आजगांवकर, श्री. गजानन भास्कर वैद्य, श्री. नारायण वामन टिळक हे प्रमुख असावेत. मिशनमधल्या नोकऱ्यांमुळें आंग्ल वाङ्मय आणि विशेषत: Emerson चें काव्य व वाङ्मय त्यांचे वाचनांत आले असावें व त्या लेखकाचा त्यांचे मनावर विशेष पगडा होता असें प्रा. भ. श्री. पंडितांचें मत आहे. पण इंग्रज Romantic poets कीट्स्, शेले बायरन्, सृष्टिवर्णनपर काव्यें रचणारा कवि वर्डस्वर्थ, आणि त्या काळांत राजकवि म्हणून जिवंत असलेला पण १८९२ सालीं मरण पावलेला प्रख्यात कवि टेनिसन, शेक्सपीयर हीं त्यांचीं दैवतें असावींत. जीं निरनिराळीं नांवें सांगण्यांत येतात त्यांत वरच्याशिवाय टॉमसमूर, लाँगफेलो, मिसेस हेमन्स, एडगर ए. पो, बर्न्स, कोलरीज हीं नांवें आढळतात. ब्राउनिंगचें नांव आढळत नसलें तरी त्याचीं काव्यें त्यानीं वाचलीं नसतील असें वाटत नाहीं. मिल्टन व त्यांची सॉनेटस् त्यानीं वाचलीं असलीं पाहिजेत, नाहीं, थोडा अभ्यासही केला असावा.

श्री. काशिनाथ रघुनाथ मित्र किंवा गजानन भास्कर वैद्य या गृहस्थांची व कृष्णाजीपंत यांची ओळख कशी, कुठें, झाली असावी याचा तर्क करितां येत नाहीं. पण ती मुंबईतल्या या मुक्कामांतच हे मात्र नक्की. रे. टिळक हें या काळांत

मुंबईत होते. त्यांचेमुळें ख्रिस्ती मिशन्स, व ख्रिश्चन धर्मोपदेशक यांचेपाशीं त्यांचा संबंध आला असावा. कदाचित् बायबलग्रंथ ही त्यानीं वाचला असावा, थोडा अभ्यासही त्यानीं केला असेल त्या ग्रंथाचा... त्या काळांत धर्मांतर ही करावें असे विचार त्याचे मनांत आले होते असें सीतारामपंत सांगतात. असे विचार एकाएकीं कां आले असतील व ते तसेच एकाएकीं डोक्यांतून अंतर्धानही कां व कसे पावले तें ही कळत नाहीं. श्री. नारायण वामन टिळक यांचा पगडा होता मनावर असें एक संभवनीय कारण देतां येईल, धर्मांतर करावें या बाजूनें. केवळ तर्कच करावयाचा झाल्यास नोकरी नसणें, बेकारी, हें एक कारण असावें... कारण बहुतेक सुशिक्षित, अशिक्षित धर्मांतरित हिंदु हे दारिद्र्यामुळें ख्रिस्ती झाले; आणि तिकडे ख्रिस्ती होऊनही पुन: गरीबच राहिले! ख्रिस्त कदाचित सर्व ख्रिस्ती माणसांना, परमेश्वराच्या लेकरांना, कोकरांना मुक्त करीत असेल, त्यांस मोक्ष मिळवून देत असेल, त्यांचे पातकांचा भार स्वत: सहन करून. पण तो त्यांस इहलोकीं श्रीमंती सुख मिळवून देतोच असा विश्वास, खात्री नाहीं, हे कदाचित् केशवसुतांच्या नजरेस टिळकांबरोबरच्या त्यांच्या मिशनऱ्यांच्या किंवा मिशन्स मधल्या भटकंतीमध्यें आलें असेल! मग आहे तो आपला धर्म कां सोडावयाचा ? आपल्याही धर्मांत भक्तिमुळें, परमेश्वराची अंत:करणपूर्वक भक्ति केल्यास मोक्ष आहेच, भवसागर तरून जाण्याची सोय आहेच. तेव्हां प्रसिद्ध गीतावचन –

स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:

याचा पगडा मनावर बसून ते हिंदूच राहिले असावेत. आणि भक्ति कशी करावी हें त्यांस कळूं लागलेलें होतें. ते थोडेंफार तुकाराम महाराजांच्या जीवनासारखें जीवन, काव्यदेवीच्या नादामुळें निच्यावर करीत असलेल्या भक्तिमुळें, जगावयास लागले होते ही. अशाच काळांत "शद्वांनों मागुते या" मध्यें त्यांचे जवळ शद्व, काव्य करण्याचीं शक्ति होती, ती पळून गेल्यासारखी वाटल्यामुळें तुम्ही (शद्व) परत या माझ्याकडे, अशी आळवणी त्यानीं केली आहे. "आहे जीवित काय?" हा प्रश्न देखील त्यांस पडलेला आहे, मनुष्यजीवन म्हणजे स्वप्न, कीं भास कीं बुडबुडा ? या छोटयाच्या काव्यांत भक्तिचा महिमा वर्णन केलेला आढळतो. आणि या काळांत ते बहुधा खाणावळींतूनच जेवीत असतांना वाढप्यांच्या हातून तुपाच्या भांड्यामधील तुपाची धार कशी व किती पडत असेल, भातावर किंवा पोळीवर (गिरगांवतल्या जुन्या काळांत, १९१०–१५ च्या, बाळाभाऊ भागवत यांची एक जुनी प्रख्यात मोठी खाणावळ मी पाहिलेली आहे, त्यावेळच्या गिरगांव बँकरोडच्या प्रार्थनासमाजाजवळच्या टोकाजवळ. तीच खानावळ कदाचित् आप्पांची असेल. अन्य पुष्कळ खाणावळींत तीच तऱ्हा होती, असते. आणि आतां तूप म्हणजे

डालडा किंवा वनस्पतिच्या बाबतींत !) याचें थोडें विनोदी तर थोडें करुण चित्र या छोटचा " खाणावळींतील घृतधारा " या काव्यांत आढळतें. . !

या काळांत कदाचित् त्यांची श्री. फडणीस, काव्य रत्नावलिकार यांचेपाशींही ओळख झालेली असावी. कारण त्यांचीं काव्यें प्रकाशित करणाऱ्या मित्रांत तेच कदाचित् पहिले असावेत. नंतर श्री. मित्र, व श्री. ह. ना. आपटे... पण त्यांची मैत्री कां कशी झाली, किती दृढ होती वगैरे कांहीं माहिती मिळत नाहीं.

याच काळांत श्री. पंडित, बाबूराव बाळकृष्ण, यांचेपाशी त्यांचा परिचय झालेला असावा.

या प्रकरणांत वर्णन करीत असलेल्या काळांत कृष्णाजीपंतांनीं ज्ञानोदय कचेरींत ही नोकरी केलेली असेल. एकाप्रकारें मॅट्रिक झाल्यामुळें त्याकाळच्या मानाने त्यांस सरकारी व बऱ्या पगाराची नोकरी मिळूं शकली असती. रेव्हेन्यू खात्यांत शिरून हायर लोअर वगैरे परीक्षा देऊन मामलेदारी त्यांस सहज मिळवतां आली असती. त्यादृष्टीनें वडील केसोपंत यांचे विद्यार्थी सरकारी नोकरीत वरिष्ठ जाग्यावर चढलेले असतीलही, त्यावेळीं. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक तर फारच मोठे पेडररोडवर लक्षाधीश, कोटचाधीश यांचे आसपास राहणारे. कदाचित् म्हणूनच एखादेवेळीं वडीलांच्या खास आग्रहास्तव ते मंडलीक यांस भेटावयास गेलेही असतील. पण मंडलीक कितीही मोठे, श्रेष्ठ पदावरचे चांगले सद्गृहस्थ असले, तरी त्यावेळीं (केसोपंत हे त्याच काळांत अप्रत्यक्षपणानें मंडलीकांचे नोकरच होते, ते स्वतः १८८६–८७ पासून खेड येथें राहत, पण त्याचे आधीं ते वळण्यास मंडलीकांचे नोकर होते; आणि १८८६–८७ पासून त्यांचे पुत्र चिंतोपंत हे आतां नोकर होते ) स्वतःच्या नोकराचा मुलगा नोकरी मागावयास, मदत मागावयास आलेला पाहून श्री मंडलीकांनीं आपल्या मोठेपणाच्या तोऱ्यांत केशवसुतांकडे थोडें दुर्लक्ष केलेंच नसेल असें वाटत नाहीं. या कारणामुळें "नको तें मोठ्यांकडे जाणें" असें मनांत ठरवून मानी केशवसुतांनीं त्यांस स्वतःस जें कांहीं जमलें तें केलें. त्यांनीं त्या काळांत कधीं दादरला तर एकवेळ कल्याणला - (२० एप्रिल ९१ सालची 'टिप् फुलें टिप्, फुलांची पखरण झिप्" हें एक नादमधुर काव्य त्या रुक्ष गांवीं रचलेलें दिसतें. कदाचित् त्या काळांत कल्याण आजच्यासारखें गजबजलेलें नसेल. घरांचे आगेमागें आंगणें असतील, थोडीं फुलझाडें असतील; म्हणून हें गाणें तेंथें रचलेलें दिसतें . कदाचित् अनुभव वळणें या गांवचा, पण रचना कल्याण येथील असाही संभव आहे. त्याचे आधीं कांहीं महिने ते दादर येथें रहात होते, व आजच्या जनरल एज्यूकेशन इन्स्टीटचूटच्या "छबिलदास हायस्कूल"

मध्ये शिक्षक होते. डिसेंबर १८९२ व जानेवारी १८९३ मध्यें ते सावंतवाडी येथें शिक्षकाची नोकरी करावयास गेलेले दिसतात. ती नोकरी बहुधा श्री. मित्र यांच्या ओळखीनें मिळालेली दिसते. त्यांस घरापासून दूर गेल्यामुळें शांत रमणीय संध्याकाळीं फिरावयास गेल्यास कसें उदास वाटत आहे याचें कल्पनाचित्र तेथें रचलेल्या "संध्याकाळ" या काव्यांत आढळतें. आणि "स्वप्नामध्यें स्वप्न" या काव्यांत ते म्हणतात–

"सर्व अम्ही जें बघतों करितों वा जें
स्वप्नांतिल तें स्वप्नच सखये माझें!
कल्लोळांच्या क्षोभें गर्जत आहे
त्या सागरतीरीं उभा गडे ! मी आहें"

याच काव्यांत पुढें ते म्हणतात कीं सुवर्ण वालुकाकण आम्हीं हातांत घट्ट पकडून धरण्याचा प्रयत्न करीत आहोंत; पण अहह!

"अहह ! ईश्वरा ! शक्ति न कां राखाया
एकहि कण निघृण लाटेपासुन या ?
बघतों आम्हीं करितों वा जें सारें
स्वप्नांतिल तें स्वप्नच व्हावें का रे ?"

अशा प्रकारें या काव्याचा ते शेवट करतात.

माझा केवळ तर्कच आहे, कीं सावंतवाडी येथील ३।४ महिन्यांचा त्यांचा वेळ बरा गेला असावा, त्यांस तेथील वातावरण, निसर्ग, भोवतालची मंडळी बरी वाटली असेल. माझा असा तर्क होता कीं सावंतवाडीस समुद्रकिनारा असावा, पण तेथें समुद्रकिनारा नाहीं; गांव समुद्रापासून आंतल्या अंगासच आहे, व किनारा १० १२ मैलावरच्या आजरें(?)गावीं आहे. माझा असा दुसरा तर्क आहे कीं संत कवींचीं चरित्रें लिहिणारे श्री. ज. र. आजगांवकर, आणि त्या वाङ्मयाचे एक थोर अभ्यासक हे, श्री. काशिनाथ रघुनाथ मित्र किंवा आजगांवकर यांचे बंधु असावेत आणि त्यांचा व केशवसुतांचा कमी जास्त परिचय त्यांचे सावंतवाडीच्या मुक्कामांत झाला असावा. त्याचप्रमाणें तो त्यांस गोड, आनंददायकही वाटला असावा. त्याच आनंदाच्या जोषांत मुंबईत पुन: एक वेळ आपल्या मुलुखांत, आपल्या मंडळींत आल्यामुळें याच एका प्रकारच्या तृप्त अवस्थेंत त्यानीं "क्षणांत होणारे दिव्य भास" "तुतारी" हीं फार श्रेष्ठ अशीं काव्यें रचिलीं आहेत. त्यापैकीं या माझ्याच युगप्रवर्तक अशा कविच्या अति विख्यात काव्यांत माझ्यासारख्या क्षुद्र माणसालाही एक दोन किरकोळ दोष दिसतात; आणि ते येथें विनम्रपणानें नमूद करण्याचें मी

धाष्टर्य देखील दाखवतों. पहिला दोष "तुतारी" हें वाद्यच मला तेवढेंसें पसंत नाहीं! जो जोर या काव्यामध्यें वर्णिलेला आहे तो जोर तुतारी या वाद्याच्या आवाजामध्यें आहे कीं नाहीं याबद्दल मला शंका वाटते. आणि दुसरा किरकोळच दोष या अमर काव्याच्या तोंडामध्येंच "दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें" यांतील किंकाळी हा शब्द होय! किंकाळी याचा अर्थ एखाद्या स्त्रीचा भीतीनें काढलेला आवाज, मोठा मदत मागणारा आर्तस्वर. असा अर्थ "तुतारी" च्या आवाजांत अभिप्रेत नाहीं. पण "तुतारी" हें नांव आणि "किंकाळी" पेक्षां "आरोळी" हा बरा शब्द आज जर बदलला, किंवा योग्य, अनुरूप शब्द जर त्या ठिकाणीं कोणा मोठ्या प्रतिभावान् कविनें देखील ठेवले तरी, काव्य प्रांतांत एखादें बंड किंवा अराजक माजावें! इतका थोर प्रभाव, इतकें सम्राटाचें वैभव या काव्यास व त्या शब्दांस काव्याचे प्रांतांत आहे! माझ्या या धाष्टर्याबद्दल मला महाराष्ट्रीय जनता क्षमा करणार नाहीं याची जाणीव असूनही, मी त्याच केशवसुतांच्या कुळांतला असल्या-मुळें मला परिणामांकडे दुर्लक्ष करूनही हें धाष्टर्य करण्याची स्फूर्ति तशीच दाबून टाकतां येत नाहीं!

बहुधा १८९३ च्या एप्रिल–मे–जून या काळांत केशवसुतांचे वडील केसोपंत हे रत्नागिरी जिल्ह्यांतीस खेड या गांवी निवर्तले. आणि त्यांचे मुत्यूनंतर एकूण कुटुंबीय बैठकी झाल्यानंतर जीं मोठीं स्थित्यंतरें झालीं त्यांतच कृष्णाजीपंत यांस मुंबईत स्वतंत्र बिऱ्हाड करणें, आपल्या संसाराचें ओझें स्वतःच वाहणें, जीवनांत स्थिरता आणणें, या गोष्टींची तीव्रता जाणवूं लागून त्या गोष्टी त्यानीं प्रत्यक्ष आचरणांत आणल्या असाव्यात. आणि अशा या संक्रमणात्मक, दुःख आणि आनंद अशा संमिश्र भावानांच्या काळांत अशी संमिश्र भावना व्यक्त करणारी दुसरी अमर कविता ,गाणें, "झर्पूझा," जन्म पावलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नोंद दि: ............

# जीवनातील आनंददायक काळ

आतांचा जो काळ मी वर्णन करणार आहे तो साधारणपणानें १८९३ चे शेवटचे कांहीं महिने येथपासून तो १८९६-७ मध्यें मुंबईच्या प्लेगच्या साथीस कंटाळून ते भडगावीं गेले तोंपर्यंतचा काळ होय. वडीलांच्या, केसोपंतांच्या मृत्यु-नंतर त्यानीं मुंबईस कोठेंतरी स्थिर स्वरूपाची बहुधा शिक्षकाचीच नोकरी पत्क-रली होती. आणि आतां आयुष्यांत प्रथमच संसार करावयास ते सुरुवात करीत होते. त्यांची पत्नी आतां त्यांचेजवळ आली होती; आणि खाणावळ सुटली होती. त्यांस आतां घृतधारा नीट अशी मिळत असेल, कदाचित् तुपांत माखलेली पोळी, किंवा लोणी व पटणीची भाकरी मिळत असेल, त्यांस खावयास. एकंदरींत तो काळ त्यांचा खऱ्या आनंदाचा काळ असावा.

यावेळीं त्यांचे वय २७ ते ३० वर्षांचें आणि त्यांची पत्नी अंदाजें २० ते २३ वर्षांची असेल. ती जरी दिसण्यांत सामान्य, चार जणींसारखीच असली तरी मनानें फार प्रेमळ स्वभावाची होती असें ऐकलें आहे. नणंदा-भावजयींचें बहुधा सूत जमत नाहीं असा नियम आहे, म्हणतात; पण केशवसुतांची एक बहीण सौ. दुर्गाताई पेटे या गिरगांवातच आणि त्यांच्या चाळीपासून जवळच्या एका चाळींत राहत असत. त्या पेठे कुटुंबांत व कृष्णाजीपंत कुटुंबांत प्रेमभाव होता. कदाचित् पेठे थोडे सुख-वस्तु, काव्य करणारे होते, म्हणूनही त्यांचेमध्यें प्रेमभाव असावा. पेठे दांपत्याची एकुलती एक मुलगी सौ. लक्ष्मीबाई दीक्षित यांच्या आठवणी ताज्या व आनंददायक आहेत, त्यांचे मामा-मामीं बद्दलच्या. क्वचित् दामल्यांकडे एखादा चांगला, चविष्ट पदार्थ-भाजी, वगैरे झाला असल्यास तो पेठ्यांकडे जाई, किंवा पेठ्यांकडची फणसाची भाजी दामल्यांकडे जाई. एक वेळ केव्हां तरी (१८९६ सालांतील गोष्ट असावी ती) भाची आपल्या मामांकडे गेली असतां चाळींत एकूण गडबड उडालेली दिसली तिला. मामांच्या खोलीजवळ इतर बायका पुरुष जमून चर्चा करीत असतांना दिसत होती, ती मंडळी. सौ. रखुमाबाई किंवा रुक्मिणीबाई दामले नळावर गेल्या असतांना खोलींतून एका चांगल्या लुगड्याची घडी आणि पाळण्यांतल्या मुलीचे अंगावरचें बाळलेणें (कदाचित् हातांतल्या मनगट्या किंवा लहानशा पाटल्या किंवा पायांतील

कांहींतरी वाळा–दागिना) दारावरचा भामटा घरांत येऊन, या वस्तु घेऊन पळवून, पसार झालेला होता. आणि त्या चोरीबद्दलच्या गोष्टी होत्या सगळ्या. सौ. रुक्मिणीबाई हे नांव जरा कठीण असलें तरी मी तेंच पसंत करतों, व तेंच पुढें वापरीन.

[ प्रा. भ. श्री. पंडीत दोन्ही नांवें वापरतात. याबद्दल मी माझ्या आत्याबाईंजवळ थोडी गमतीची चर्चा केली व विचारलें– "रुक्मिणी ही कृष्णाची बायको, व रखुमा ही विठ्ठलाची. कृष्ण आणि विठ्ठल एक नव्हत. पण राम एकच. जो एक पत्नी; तेव्हां उद्यां सीता, व जानकी हीं दोन्ही नात्रें एकाच स्त्रीचीं, एकच; असा हा गम्मतीचा प्रकार व्हावयाचा. पण तो कसा व्हावयाचा ? माझी आई होती सीता, आणि बापूकाका-सीतारामपंत यांची बायको होती जानकी; या तर दोन भिन्न पुरुषांच्या दोन भिन्न स्त्रिया, मग 'रूक्मिणी' व 'रखुमा' एक कशा ?" त्यावर भिन्न संदर्भात अशाच एका प्रश्नास असेंच एक गम्मतोचें उत्तर Robert Southey या कविच्या The Battle of Blenheim" या काव्यांत अखेरीस सांपडते तें उद्धृत करतों–

> " Why, That I cannot tell," said he,
> " But, 'twas a famous victory."

त्या काव्यांतील म्हाताऱ्या Kaspar नें त्याच्या नातू पीटरकिन्‌ला जसें समाधानकारक उत्तर दिलें नाहीं त्याचप्रमाणें माझ्या नव्वद वर्षांच्या आत्याबाई देखील माझें समाधान करूं शकल्या नाहींत. पण मीच माझें असें समाधान करतों कीं नांव ठेवलें असेल, लग्नांत, कृष्णाची ' रुक्मिणी'; पण पुढें हें जरा अवघड, वाटणारें नांव, त्याचेंच मराठीकरण झालेलें (मी म्हणतों अपभ्रष्ट झालेलें) रखुमाई हेंच लोकांच्या तोंडीं पडलें असावें ! या खेरीज या गम्मतीच्या प्रश्नाची सोडवणूक करतां येणार नाहीं. ... मला हा दोन नांवाचा प्रश्न पडण्याचें कारण प्रा. भवानीशकर श्री. पंडीत यांचे ग्रंथांतील "केशवसुत चरित्र" विभाग होय. त्यानीं जर अशीं दोन्ही नांवें केशवसुत यांचे पत्नीचे संबंधांत वापरलीं नसतीं तर हा प्रश्नच उभ्दवला नसता ! मी यापुढें केशवसुतांस 'आप्पा' व त्यांचे पत्नीस 'रुक्मिणी' काकू असें संबोधीन. ]

या नांवाबद्दलचे आगंतुक प्रकरणाचे पूर्वी जी चोरीची हकीगत लिहिली आहे ती आतां पाहूं. त्यावरून आप्पांची सांपत्तिक परिस्थिति लहान मूल झाल्यावर त्याचे अंगावर थोडेसें तरी सोनेंनाणें घालण्याइतपत बरी असावी; आणि तें चोरीस गेल्याबद्दल रुक्मिणीबाईंच्या चर्येवर, बाहेरून आप्पा आल्यावर आपल्यावर गजहब होईल,

कदाचित् आपल्या हलगर्जीपणाबद्दल आपल्याला 'मारतील', (त्याकाळींच काय, १९२० पर्यंतच्या काळांतही सुशिक्षित व प्रसिद्धीस येणारीं माणसेंही प्रसंगवशात आपल्या बायकांस मारीत असत असें ऐकलें-पाहिलेलेंही आहे.) अशी यत्किंचित् ही भीति रुक्मिणी मामींच्या चर्येवर नव्हती; उलट विशेष कांहीं झालें नाहीं अशी एका प्रकारें विदेही माणसाच्या- 'सुख दुःख समे कृत्वा, लाभालाभौ जया जयौ'- स्थितिप्रमाणें त्यांचा चेहरा जणू काय मोठें असें कांहीं झालेंच नाही असा होता, अशी साक्ष त्यांची भाची, लक्ष्मीबाई दीक्षित देतात.

सरकारी नोकरी न करण्याचा त्यांचा निश्चय बहुधा न्यू इंग्लिश स्कूल-मध्यें विद्यार्थी असतांनाच झाला असावा! त्यांचे स्नेही हरी नारायण आपटे रे. टिळक, श्री. का. र. मित्र, काव्यरत्नावलिकार फडणीस, किरात ··· आदि मंडळीही कोणीच सरकारी नोकरींत शिरला नाहीं. आप्पांचे पुढें तर नवीन काव्य करणें, व एकाप्रकारें स्वभाषेची, व स्वदेशीय लोकांची सेवा करावयाची हें एक ध्येय असावें, होतें. हें ध्येय उत्पन्न होण्याचें कारण उघडच होय. त्यांचे नजरे-समोर लो. टिळक, आगरकर, प्रि. आपटे आदि थोर विद्वान् पुरुषांचीं जिवंत उदा-हरणें होती. म्हणूनच त्यांचे विचार मे १८८७ मध्यें लिहिलेल्या "गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून" मध्यें दिल्याप्रमाणें-

"तेव्हां आम्हीं म्हटलें - 'ही ऱ्हासाची
रजनी केव्हां जाइल विरुनी साची?"
स्वतंत्रतेची पहांट ती येईल,
उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील?-
"किंवा तीतें आणायाचे कांहीं
यत्न आमुच्या होतिल काय करांहीं?"

स्वदेश प्रेमाचे, देशसेवेचे विचार करणाऱ्या तरुणाचे दिसतात; त्याच काळांतील २२ जुलै १८८७ रोजीं लिहिलेल्या "गोष्टी घराकडील" या काव्यांत स्वतःच्या धाकटचा लहान भावाबद्दल त्यांची खालील अपेक्षा पहा-

"अज्ञान तो चपलधी परि बाल आहे
त्याचे-विशीं मम मनीं अतिलोभ राहे
बापू! गड्या! ध्वज उभा करशील काय?
तूं देशकारण करूं झटशील काय?"
बापू! जनांत दिवटी धरशील काय?
स्वातंत्र्य -देव मनसा भजशील काय?"

या काव्यांत वर्णन केल्याप्रमाणें देशसेवा, कोणत्यातरी एका प्रकारची देशसेवा करण्याची त्यांच्या आत्म्याची तळमळ स्पष्ट होते. तरुण स्वातंत्र्य – वीर सावरकरांप्रमाणें भगूरच्या देवीच्या देवळींत असिधारा व्रताप्रमाणें 'दिव्य दाहक' असें सतीचें वाण, कठोर व्रत, जरी केशवसुतांनीं घेतलें नसलें तरी काव्यदेवीची भक्ति करणें, स्वत: कवि होणें हें ध्येय त्यानीं निश्चितच स्वीकारलें होतें; व तें त्यानीं आमरण पाळलें. पण त्यांची "कवि"ची कल्पना तुमच्या आमच्या सामान्यांच्या कल्पनेप्रमाणें 'कविता' करणारा एवढीच लहान नसून ती फार विशाल होती. तिचा आविष्कार त्यानीं अनेक काव्यांतून थोडा इथें थोडा तिथें असा केला असून त्या दृष्टीनें तो आविष्कार मुख्यत: "आम्ही कोण" (जानेवारी १९०१) या काव्यांत केला आहे. आणि या "आम्ही"चा अर्थ केवळ कविच नाहींत तर अन्य कलाकारही असा जो कै. कुसुमावतीबाई देशपांडे यानीं "पासंग" या त्यांच्या ग्रंथांतील या काव्यावरच्या रसग्रहणांत केला आहे तो अगदीं बरोबर आहे. तो अर्थ त्यानीं "ओढून ताणून" केला आहे अशी त्यांचे त्या लेखावर केलेली टीकाही माझे पाहण्यांत आली. पण टीकाकारांचें लक्ष मीं या काव्याचे पुष्कळ आधीं लिहिलेल्या "क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास" हें आप्पांचें काव्य व त्यावरील केशवसुतांनीच (आप्पांनीच) दिलेली टीप बारकाईनें वाचावी अशी शिफारस करतों. (हें काव्य मुंबईस २४ जानें. १८९३ रोजीं हिलिलेलें आहे )

१८९४ ते १८९६ या काळांत किंवा १८९३ च्या उत्तरार्धापासूनही ही काल–गणना आपण धरूं या, या काळांत केशवसुतांच्या- आप्पांच्या हातून साधारण १३-१४ च काव्यें रचून झालीं, पण त्या पुढच्या काळांत १९०३ पर्यंत म्हणजे फैज-पूर सोडून जाईपर्यंत जवळ जवळ ३२ काव्यें त्यानीं लिहिलीं. त्यांचा दर्जा वरचा आहे. माझे मतानें. मुंबईतील हा काळ थोडा कमी निर्मितीचा, पण बराच जास्त अभ्यासाचा तयारीचा, चिंतनाचा होता.

आंग्ल कवि शेक्सपीयरचा पगडा विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांवर याचे बरेच पूर्वीपासूनच बसत चालला होता ··· आणि अजूनही तो कोठें सुटला आहे ? तेव्हां आप्पांनीं पुण्यास असतानां जरी एक नाटक ∵ लिहून त्याचें हस्त लिखित-दक्षिणा प्राइज कमिटीकडे पाठवून दिलेलें होतें, तरी शेक्सपीयरच्या नाटय वाङ्म-

---

∴ प्रा. रा. श्री. जोग यांचा ग्रंथ "केशवसुत– काव्यदर्शन" पृष्ठ १३, पहा, नाटकाचें नांव "बलिभद्र" कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजच्या नाटकांच्या चढाओढी मध्यें भाग घेण्यास हें नाटक लिहिलें होतें. तें श्री. रहाळकरांनीं पाहिलें होतें

दक्षिणाप्राइज कमिटीकडे नाटक पाठवल्याबद्दल माहिती, सी. के. दा. व अन्य लोक देतात.

त्याकडे ते तितके प्रभावित झाले नसावेत. शेक्स्पीयरच्या नाटकांतूनही काव्य पुष्कळच भरलेलें आहे. किंबहुना त्याचें स्वतंत्र असें काव्य वाङ्मय फारच कमी असून नाटकांतूनच काव्य भरलेलें आहे. पण केशवसुत हे त्यांतील नाट्यापेक्षां काव्याकडे जास्त आकर्षित झाले हें बरेंच झाले म्हणावयाचें. म्हणून आपणांस, मराठी भाषेस हा युगप्रवर्तक कवि मिळाला. पण १८९२–९४ या काळांत ज्याप्रमाणें मुंबईतच शिकत असतांना दे. भ. खाडिलकर, नाट्याचार्य कोल्हटकर, तात्यासाहेब केळकर हे जसे थोडेफार नाटकांकडे आकर्षित झाले व पहिल्या दोघांनीं पुढें विपुल नाट्यवाङ्मय निर्माणही केलें, अनुकूलता (नाटक कंपन्यांचा ओळख होणें, नाटकें रंगभूमिवर येवूं शकणें ही ) लाभल्यामुळें ते श्रेष्ठ नाटककार झाले, तद्वत आप्पा त्या प्रांताकडे झुकूं शकले नाहींत, हें एकूण बरेंच झालें, म्हणावयाचें. त्यांचा " सच्चा चेला " गोविंदाग्रज" यांची कीर्ती सामान्य मराठी वाचकाचेदृष्टीनें ते कवि होते यापेक्षां ते नाकटकार होते, गडकरी नाटककार होते ही जास्त प्रमाणांत आहे. खुद्द शेक्सपीयर तरी काय, त्यास लंडनमधील नाटककंपन्यांची ओळख झाली नसती तर, जुन्या नाटकांचें नूतनीकरण करण्याची संधि मिळाली नसती तर, तो तरी नाटककार झाला असता काय? असा प्रश्न विचारतां येण्यासारखा आहे. " गोविंदाग्रज " जर, " गडकरी मास्तर " झाले नसते, किर्लोस्कर कंपनीत, तर ते तरी नाटककार, श्रेष्ठ नाटकार झाले असते काय ही शंका वाटते; पण त्याचे आधींच त्यानीं नाट्यप्रांतांत " प्रेम संन्यास ", व " वेड्यांचा बाजार " लिहून प्रवेश केलेला होता... हें सर्व लिहिण्याचा हेतु एवढाच कीं हा काळ एकाप्रकारें आप्पा अभ्यासांत घालवीत होते, आपल्या शक्तीचा अजमास घेऊन ती साठवीत होते. हा त्यांचा काल ( Period of consolidation ) होता, असें म्हणावयास हरकत नाहीं.

या काळांत मुंबईतील जनतेस एका नव्याच साथीनें–प्लेग-छळावयास सुरुवात केली होती. हा रोग नवा, आणि त्वरित फैलावणारा, व माणसांचा काळच जणू होता. त्याचे प्रतिकारात्मक उपचार सापडले नव्हते; म्हणून याची भीति लोकांचे मनाचा थरकांप उडवणारी होती ··· त्या नव्या संकटास कसें तोंड द्यावें हे लोकांस व सरकारासही कळत नव्हतें. म्हणून सरकार अघोरी उपाय योजण्याच्या विचारांत होतें, त्यानें पुढें ते विशेषतः पुण्यांत योजले देखील !

याच काळांत आप्पांस–रुक्मिणीकाकूंस पहिलें अपत्य झालें. बहुधा १८९५-९६ च्या संधिकाळाचे सुमारास त्या बालिकेचा जन्म झाला असावा, तिचें नांव "मनोरमा" ठेवलें होतें; घरांत मनू, मनी म्हणत असत. माझे तोंडी लहानपणीं त्यांच्या मुलींचीं नांवें जीं ऐकलेलीं तीं म्हणजे मनी, वच्छी, अशीं होतीं.

वत्सला हें त्यांचे दुसऱ्या अपत्याचें नांव; आणि या मुलीचा जन्म पुढें भडगांव येथें झाला, बहुधा ९९ मध्यें; तिच्या साधारण बरोबरीची अशी माझी थोरली बहीण शकुतला, व तिचा जन्म मार्च १९०० मधला आहे. अपत्यलाभ हा मानवी-जीवनांतला एक महत्वाचा योग आहे, ज्याप्रमाणें विवाह योग. कारण 'विवाह', 'विवाह' तरी कशाकरितां करावयाचा ? आपलें अस्तित्व सुखाचें जावें, आपणांस सुख मिळावें याकरितां, आणि शिवाय अपत्यप्राप्ति करितांही. पितृऋण फेडण्याचे जे अनेक प्रकार त्यापैकीं आपल्या पाठीमागें आपली जाति टिकून रहावी म्हणून अपत्येंही आवश्यकच आहेत. मानसशास्त्राधारें बोलावयाचें झालें तर मानवाच्या अत्यंत श्रेष्ठ, व अगदीं प्राथमिक मूळ सहज-प्रवृत्ति (Instincts) म्हणजे Self-Preservation, & Self Propogation किंवा स्वसंरक्षण, व स्वजातिसंवर्धन या होत. तेव्हां अपत्य लाभ ही फार महत्त्वाचीच गोष्ट होय. त्याकाळीं मुलगा होणें हें महत्त्वाचें, पुण्याचें, शुभ, मानीत, आणि "कन्या" झाली तर वाईट वाटत असे, दुःख होई. पण आप्पांस–रुक्मिणीकाकूंस बहुधा तें झालें असल्यास, कमीच झालें असावें असें त्यानीं त्या कन्येस ठेवलेल्या "मनोरमा" या नांवानें (मनास रममाण करणारी, आनंद–आल्हाद देणारी) – सूचित होतें. ह्याच कन्येचें बाळलेणें पाळण्यांतून चोरीस गेल्याची आठवण श्री. लक्ष्मीबाई दीक्षित यानीं All India Radio च्या दि. १४ मार्च १९६६ च्या "आम्ही कोण" या कार्यक्रमांत सांगितली आहे. अशाप्रकारें मुंबईचें त्यांचें वैवाहिक जीवन, किंवा संसार एका प्रकारें सुखाचा झाला. आणि या काळांतील त्यांच्या काव्य–रचनेकडे पाहिल्यास सुरुवातीच्या काळांत किंवा तो सुरु होण्याच्या जरा आधींच प्रसिद्ध "झपूर्झा" काव्य तर अखेरीस बहुधा दुसरें अति प्रसिद्ध काव्य "स्फूर्ति" हीं काव्यें रचिलीं गेलीं असावींत. आणि आतां प्लेगोबानें त्यांचे जीवनांत दुसरी क्रान्ति झाली, तिची कथा पुढें पाहूं

आप्पांच्या मुंबईच्या कौटुंबिक जीवनाच्या काळांत व आधींच्याही काळांत त्यांचे जे निरनिराळे मित्र होते त्यांचेबद्दल निरनिराळे ठिकाणीं विविध माहिती मिळते. पैकीं कवि रे. ना. वा. टिळक, श्री. का र. मित्र, श्री. गजानन भास्कर वैद्य, आदींची माहिती जास्त प्रमाणांत आढळते. ते "ज्ञानोदय" या एका ख्रिस्ती नियतकालिकाशीं रे. टिळक यांचेमुळे संबंधित होते. सीतारामपंत यांच्या माहिती-प्रमाणें ते, टिळकांच्या त्यांचेवरील वजनामुळें, ख्रिस्ती होण्याच्या विचारांतही होते. प्रा. भ. श्री. पंडीत यांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांचा अमेरिकन मिशन्स बरोबर संबंध जडला असावा; आणि त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणन इमर्सन या अमेरिकन तत्वज्ञ कवीची छाप त्यांच्या काव्य–लेखनावर फार पडलेली आहे. त्याचप्रमाणें श्री. पंडित आपल्या मोठ्या ग्रंथांत केशवसुतांवर

ज्या कोणा महाराष्ट्रीय कवींचा, व्यक्तींचा परिणाम घडला होता, त्यांचा स्नेह जुळला होता (निदान पंडितांचा असा अभ्यासामुळें समज झालेला आहे) अशांची मोठी यादी देतात; व त्या लोकांचा आणि केशवसुतांचा संबंध विशद करतात. याकामीं त्यानीं पृ. ३८ पासून ४६ पर्यंतचा मजकूर लिहिला असून त्यांत का. र. मित्र आणि भांगले, किरात (सोमण), वैद्य बंधु, काव्य रत्नावलीकार विनायक, रहाळकर, तांबे, गद्रे वा. वा., यांची नावें दिलेलीं आहेत. याशिवाय पृ. २५ पासून पृ. ३६ पर्यंत ना. वा. टिळक, वा ब. पटवर्धन, गो. वा. कानिटकर, ह. ना. आपटे, माधवानुज, यांचे संबंधांचीही माहिती ते देतात.

पण मला जी कांहीं ऐकीव माहिती आहे, किंवा इतर भावांच्या स्वभावांची जी माहिती आहे त्या माहितीप्रमाणें ते स्वभावानें Social, सामाजिक प्रवृत्तिचे नसून, लोकांत मिसळणारे नसून, उलट अबोल, समाजापासून दूरदूर राहण्याची इच्छा असणारे, थोडे एकलकोंडेच होते. त्यांचें विशेष रहस्य असें कोणाशींच नसेल.हरीभाऊ आपटे व रावसाहेब गोविंदराव आणि सौ. काशीताई कानिटकर यांचे व केशवसुतांचे मैत्री संबंधाबद्दलचा फोलपणा "हरीभाऊ आपटे" या कु. वेणूताई पानसे यानीं लिहिलेल्या ३५० पृष्ठांच्या चरित्र ग्रंथावरून निदर्शनास आला आहे, माझ्या याचा थोडा विस्तार पूर्वी केला आहे. आणि इतरही अभ्यासू तो ग्रंथ काळजीपूर्वक वाचतील तर त्यांस माझें हें मत पटावें. हाच न्याय थोडा फार उरलेल्या इतर सर्व व्यक्तींच्या संबंधांत लागू पडावा.

Emerson या अमेरिकन तत्त्वज्ञ कवीचा केशवसुतांचे काव्यावरच्या परिणामांबद्दल श्री. भ. श्री. पंडीताचा दावा हा, त्यांचा स्वतःचा त्या दोघां लेखकांच्या काव्याची आवड व अभ्यास, याचा परिणाम असावा असें मला वाटतें. त्यामुळें त्यांस साम्य स्थळें आढळून येऊं लागलीं व त्यांचें तसें मत बनलें. अशीं मतें अन्य इंग्रजी कवी आणि केशवसुत यांचेबद्दल सखोल अभ्यासानें बनूं शकतील. व त्या त्या टीकाकार-अभ्यासकाच्या आवडी निवडीप्रमाणें तो आपलें मत प्रभावीपणानें मांडूं शकेल. याबाबतींत निश्चितपणानें कांहींच माहिती देतां येत नाहीं.

याबद्दल निश्चित माहिती एवढीच देतां येईल कीं इंग्रज वाङ्मयांतील Romantic poets यांचे काव्यांचा पगडा निश्चयपूर्वक केशवसुतांवर पडला होता. आणि त्यादृष्टीनें वर्डस्वर्थ, कीटस्, बायरन्, शेली किंवा शेले, आदि कवींचीं काव्यें त्यानीं अभ्यासलीं असतील अन्य एका ठिकाणीं मी लिहिल्याप्रमाणें मराठी काव्य-प्रांतांत स्पॅनिश प्रख्यात लेखक Cervantes याच्या Don Quixote च्या कार्या_

प्रमाणें त्यानीं मराठी काव्य-वाङ्मयांत Romantic काव्य, (स्थूलार्थानें स्त्रीप्रेम-विषयक काव्य) प्रथम आणलें. डॉन क्विक्झोट या काल्पनिक व्यक्तिचित्रांत जो लहरीपणा, जी चिकाटी, जी निष्ठा, जो वेडसरपणा होता, आणि या सर्वांच्याच मिश्रणानें त्यास करुणोत्पादक छटाही जी लाभलेली आहे, ती जशीच्या तशी, सर्वच्या सर्व केशवसुतांच्या काव्य जीवनास लावतां येईल अशी माझी कल्पना आहे. Chivalry, ती आचरणांत आणणारे सरदार, Knights या कल्पना किंवा त्यांची थोडीशी छटा त्यानीं कै. ह. ना. आपटे यांस उद्देशून लिहिलेल्या "पण लक्षांत कोण घेतो" च्या कर्त्यांस या काव्याचे पहिल्या दोन कडव्यांत आहे. तेव्हां "स्त्रीदास्य-संकट, विमोचन" करणारे Knight, कादंबरीचे प्रांतांत मित्र ह. ना. आपटे, तर काव्यप्रांतांत Chivalry, प्रथमच आणणारे, त्याचा प्रयत्न करणारे आप्पा, किंवा केशवसुत हे असें मानल्यास त्यांत कांहीं चूक होणार नाहीं. या माझ्या विचारांचा प्रपंच या पुढील प्रकरणांतून थोडा फार केलेला वाचकांस आढळेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .......................... दि: ......................
क्रमांक .......................... नों: दि: ......................

ज्या कोणा महाराष्ट्रीय कवींचा, व्यक्तींचा परिणाम घडला होता, त्यांचा स्नेह जुळला होता (निदान पंडितांचा असा अभ्यासामुळें समज झालेला आहे) अशांची मोठी यादी देतात; व त्या लोकांचा आणि केशवसुतांचा संबंध विशद करतात. याकामीं त्यानीं पृ. ३८ पासून ४६ पर्यंतचा मजकूर लिहिला असून त्यांत का. र. मित्र आणि भांगले, किरात (सोमण), वैद्य बंधु, काव्य रत्नावलीकार विनायक, रहाळकर, तांबे, गद्रे वा. वा., यांची नावें दिलेलीं आहेत. याशिवाय पृ. २५ पासून पृ. ३६ पर्यंत ना. वा. टिळक, वा ब. पटवर्धन, गो. वा. कानिटकर, ह. ना. आपटे, माधवानुज, यांचे संबंधांचीही माहिती ते देतात.

पण मला जी कांहीं ऐकीव माहिती आहे, किंवा इतर भावांच्या स्वभावांची जी माहिती आहे त्या माहितीप्रमाणें ते स्वभावानें Social, सामाजिक प्रवृत्तिचे नसून, लोकांत मिसळणारे नसून, उलट अबोल, समाजापासून दूरदूर राहण्याची इच्छा असणारे, थोडे एकलकोंडेच होते. त्यांचें विशेष रहस्य असें कोणाशींच नसेल.हरीभाऊ आपटे व रावसाहेब गोविंदराव आणि सौ. काशीताई कानिटकर यांचे व केशवसुतांचे मैत्री संबंधाबद्दलचा फोलपणा "हरीभाऊ आपटे" या कु. वेणूताई पानसे यानीं लिहिलेल्या ३५० पृष्ठांच्या चरित्र ग्रंथावरून निदर्शनास आला आहे, माझ्या याचा थोडा विस्तार पूर्वी केला आहे. आणि इतरही अभ्यासू तो ग्रंथ काळजीपूर्वक वाचतील तर त्यांस माझें हें मत पटावें. हाच न्याय थोडा फार उरलेल्या इतर सर्व व्यक्तींच्या संबंधांत लागू पडावा.

Emerson या अमेरिकन तत्त्वज्ञ कवीचा केशवसुतांचे काव्यावरच्या परिणामांबद्दल श्री. भ. श्री. पंडीताचा दावा हा, त्यांचा स्वतःचा त्या दोघां लेखकांच्या काव्याची आवड व अभ्यास, याचा परिणाम असावा असें मला वाटतें. त्यामुळें त्यांस साम्य स्थळें आढळून येऊं लागलीं व त्यांचें तसें मत बनलें. अशीं मतें अन्य इंग्रजी कवी आणि केशवसुत यांचेबद्दल सखोल अभ्यासानें बनूं शकतील. व त्या त्या टीकाकार-अभ्यासकाच्या आवडी निवडीप्रमाणें तो आपलें मत प्रभावीपणानें मांडूं शकेल. याबाबतींत निश्चितपणानें कांहींच माहिती देतां येत नाहीं.

याबद्दल निश्चित माहिती एवढीच देतां येईल कीं इंग्रज वाङ्मयांतील Romantic poets यांचे काव्यांचा पगडा निश्चयपूर्वक केशवसुतांवर पडला होता. आणि त्यादृष्टीनें वर्डस्वर्थ, कीटस्, बायरन्, शेली किंवा शेले, आदि कवींचीं काव्यें त्यानीं अभ्यासलीं असतील. अन्य एका ठिकाणीं मी लिहिल्याप्रमाणें मराठी काव्यप्रांतांत स्पॅनिश प्रख्यात लेखक Cervantes याच्या Don Quixote च्या कार्या-

प्रमाणें त्यानीं मराठी काव्य-वाङ्मयांत Romantic काव्य, (स्थूलार्थानें स्त्रीप्रेम-विषयक काव्य) प्रथम आणलें. डॉन क्विक्झोट या काल्पनिक व्यक्तिचित्रांत जो लहरीपणा, जी चिकाटी, जी निष्ठा, जो वेडसरपणा होता, आणि या सर्वांच्याच मिश्रणानें त्यास करुणोत्पादक छटाही जी लाभलेली आहे, ती जशीच्या तशी, सर्वच्या सर्व केशवसुतांच्या काव्य जीवनास लावतां येईल अशी माझी कल्पना आहे. Chivalry, ती आचरणांत आणणारे सरदार, Knights या कल्पना किंवा त्यांची थोडीशी छटा त्यानीं कै. ह. ना. आपटे यांस उद्देशून लिहिलेल्या "पण लक्षांत कोण घेतो" च्या कर्त्यांस या काव्याचे पहिल्या दोन कडव्यांत आहे. तेव्हां "स्त्रीदास्य-संकट, विमोचन" करणारे Knight, कादंबरीचे प्रांतांत मित्र ह. ना. आपटे, तर काव्यप्रांतांत Chivalry, प्रथमच आणणारे, त्याचा प्रयत्न करणारे आप्पा, किंवा केशवसुत हे असें मानल्यास त्यांत कांहीं चूक होणार नाहीं. या माझ्या विचारांचा प्रपंच या पुढील प्रकरणांतून थोडा फार केलेला वाचकांस आढळेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ...................... वि: ......................
क्रमांक ...................... नों. दि: ......................

# भडगाँवचें वास्तव्य

मुंबई-पुणे यासारख्या शहरांत आप्पा जवळ जवळ १२ वर्षें राहिले होते. आतां त्यांस आगगाडीचा रस्ता सोडून पाचोरा स्टेशनपासून ५।६ मैल टांगा किंवा बैलगाडीनें जातां येणाऱ्या भडगांवीं जावें लागलें. मुंबईंत दर वर्षास प्लेगोबा भेट देऊं लागले. त्यामुळें एकूण जीवन विस्कळित होई, नोकऱ्या सुटत; आतां प्रपंच करावयाचा होता. तेव्हां भडगांव येथें असलेले श्री. केशव गंगाधर चितळे, त्यांचे श्वशुर, यांचा सल्ला त्यांस पसंत करून घेणें भाग होतें. कदाचित् एखादे वर्षी त्यानीं आपल्या पत्नीला वळण्यास वडील बंधु चिंतोपंत उर्फ भाऊ यांचेकडे, प्लेगामुळें पाठविलेंही असेल, पण ते कांहींच मिळवीत नसत; त्यांस श्रीमान् मंडलीकांच्या वळणें व सोनगांव या गांवचीं देखरेख पाहण्याचें काम होतें; त्यावेळपर्यंत त्यांस ४।५ मुलें होतीं. त्यांचा प्रपंच होता. त्यामुळें तेथें पाठवण्यापेक्षां भडगांवीं रुक्मिणीकाकूच्या माहेरीं जाणें तिला स्वतःला जास्त पसंत पडणारें असल्यामुळे स्वाभाविक प्रथम रुक्मिणीबाई गेल्या असतील, भडगांवीं.

भडगांव त्याकाळीं मोठा गांव होता. ६।७ हजारांची वस्ती होती. ब्राह्मण कुटुंबें पुष्कळ व सधन होतीं. खानदेशची जमीन खूप सुपीक; कापूस पिकवणारा मलूख म्हणजे सोन्याचा तुकडाच श्री. कै. दे. भ. नरसिंह चिंतामण केळकर वकीलीची परीक्षा पास झाल्यावर भडगांवीं वकीली करावयास म्हणन कांहीं दिवस तेथें जाऊन राहिले होते. तेथें धंद्यास वाव आहे असें त्यांचें मत झालें होतें. पण पुढें ते साताऱ्यास वकीली सुरु करावयास गेले. पण भडगांवही त्यांचे नजरेसमोर होतें. असा हा गांव. गिरणा नदी पावसाळच्यांत पूर आल्यावर गावास अक्षरशः वळसा घालून बेटाचें स्वरूप आणते; इतर ऋतूंमध्यें तीन बाजूनें वेष्टिते. नदीस घाट आहेत लहान लहान; काठावर लहान देवळें आहेत.; गांवच्या पलीकडच्या बाजूस आजसुद्धां जवळ जवळ ४० झाडें उभी असलेली आंबराई आहे, आणि मध्यें मोकळी जागा आहे. गावचे लोक वनभोजनादि कार्यक्रम तेथें उरकतात. अलीकडे तेथील हायस्कूल त्या जागेचा क्रीडांगण म्हणून उपयोग करूं लागलें आहे. असा हा एका प्रकारें चांगला गांव होता, आहे. नदीमुळें व आंबराईमुळें निसर्गशोभाही आहे थोडी

श्री. केशव गंगाधर चितळे हे त्यावेळीं भडगांवच्या प्राथमिक शाळेचे हेडमास्तर होते. त्यांचा गावांत नांवलौकिक होता, त्यांस वजन होतें. इंग्रजी शिक्षणाची सोय अजीबात नव्हती. ब्राह्मण सुखवस्तु कुटुंबें पुष्कळ, व मुलें पुष्कळ शिकण्यास; त्यांस लहान वयांत परगावीं पाठवणें सर्वांस जमत नसे. आप्पा जर भडगांवीं स्थायिक झाले तर त्यांचे पोटापाण्याचा प्रश्न सुटेल, सौ. रुक्मिणीबाईस

नेहमीं माहेर जवळ असण्याचा आनंदही लाभेल; व गांवचीहीं इंग्रजी शिक्षणाची सोय होईल. म्हणून इंग्रजी शिकवण्याचा वर्ग किंवा इंग्रजी शाळाच म्हणा, आप्पांनीं सुरु करावी असा विचार त्यांचे सासऱ्यांनीं त्यांचे पुढें ठेवला; आणि आप्पांनी तो मानला असावा. पण तो मानतांना त्यांचे मनाची अवस्था "कांटयांवाचून गुलाब नाहीं" या काव्यांत वर्णिलेली आढळेल. जीवन हें सुखदुःख मिश्रित आहे; गुलाब हवा असल्यास कांटे घेतलेच पाहिजेत, असा त्या काव्याचा सारांश आहे. भडगांव पाहिजे ना, प्लेगकरितां मुंबई नको ना ? तर स्वीकारा कुग्रामवास! पुणे-मुंबई येथील शहरी भडकपणा लकाकी, चकाकी, विद्येचा अधिवास, ग्रंथालयें, नाटच व्याख्यानें, विद्वत्सभा आदि कार्यक्रम यांचा भडगात्रीं अभाव. पण हें सर्व सोसलेंच पाहिजे, अगतिक होऊन, अशी त्यांची त्यावेळची मनःस्थिति असावी . फार दूर कशाला.. मी स्वतः १९४२ सालीं जेव्हां पुणे सोडून सोलापूरसारख्या मोठ्या पण जरा दूरच्या शहरीं रहावयास आलों तेव्हां मला काम भरपूर मिळाल्यामुळें मी स्वतः असंतुष्ट नव्हतों, मुळींच; पण ओळखीचे पुण्या-मुंबईचे लोक विचारीत "तुम्हास सोलापुरांत करमतें ? " आणि मी "होय" उत्तर दिल्यावर आश्चर्य व्यक्त करीत! खरोखर पुणे व सोलापूर या ठिकाणांत त्यावेळींच काय आजसुद्धां कांहीं काहीं खुशालचेंडूंस व रिकामटेंकडयांस खूपच अंतर दिसतें! पण तसें पाहिलें तर, अंतर असलेंच तर तें Quantitative आहे Qualitative नाहीं. पुण्यांत सुसंस्कृत समजली जाणारी लोकसंख्या सोलापूरच्या त्या लोकांच्या सहज ८।१० पट आहे; एवढाच फरक. दर्जा तोच! पण मी येथें आलों ३९ वर्षांचा असतानां; म्हणजे जरा जास्तच समज, संसाराचा जास्तच अनुभव आल्यानंतर; आणि आप्पा गेले भडगांवास केवळ ३० वर्षांचे असतांना; व ते गेले मुंबईहून भडगांवांस, पुण्याहून सोलापूरास नव्हे !

आप्पा भडगांवास ४ वर्षांवर आणि अंदाजें ५ वर्षें राहिले. ते कोठें रहात असत तें घर मी एकदां १९५२ च्या सुमारास भडगांवीं गेलों असतां पाहिलें होतें. तें घर आणि १९६५ च्या डिसेंबर मध्यें गेलों असतां जें एक घर मला दाखवण्यांत आलें तें निराळे होतें. पूर्वीं पाहिलेलें घर बरेंच मोडकळीस आले होतें. एका मोठ्या दिंडी दरवाजामधून मागचे अंगास जावयाचें होतें, चौक असणारा तो मोठा वाडा होता. आतां तें घर पार जमीनदोस्त होऊन त्या ठिकाणीं सिमेंटकाँक्रीटची इमारत झाली असें ६५ सालीं कळलें. दुसरें घर केळकरांचें म्हणून दाखवण्यांत आलें. पण ते बरेंच पडके झालेलें. वेळ होती दिवे लागणीची, किल्ली दुसरीकडून आणून घर पाहणें शक्य नसल्याने मी तें पाहिलें नाहीं. पण ज्या त्या घराशेजारच्या घरांत इंग्रजी शाळा भरत असे त्या माडीवर जावून ती माडी पाहिली. पाहण्याचा खास उद्देश होता. माझे चुलत बंधु कै परशुरामपंत यांचे सांगण्यातील गोष्ट होती. माडीवर मोठमोठ्या लाकडी कडीपाटाच्या तुळयांवर आप्पांच्या हातानें खडूनीं लिहिलेलीं

# भडगांवचें वास्तव्य

मुंबई-पुणे यासारख्या शहरांत आप्पा जवळ जवळ १२ वर्षें राहिले होते. आतां त्यांस आगगाडीचा रस्ता सोडून पाचोरा स्टेशनपासून ५।६ मैल टांगा किंवा बैलगाडीनें जातां येणाऱ्या भडगांवीं जावें लागलें. मुंबईंत दर वर्षास प्लेगोबा भेट देऊं लागले. त्यामुळें एकूण जीवन विस्कळित होई, नोकऱ्या सुटत; आतां प्रपंच करावयाचा होता. तेव्हां भडगांव येथें असलेले श्री. केशव गंगाधर चितळे, त्यांचे श्वशुर, यांचा सल्ला त्यांस पसंत करून घेणें भाग होतें. कदाचित् एखादे वर्षी त्यानीं आपल्या पत्नीला वळण्यास वडील बंधु चिंतोपंत उर्फ भाऊ यांचेकडे, प्लेगामुळें पाठविलेंही असेल, पण ते कांहींच मिळवीत नसत; त्यांस श्रीमान् मंडलीकांच्या वळणें व सोनगांव या गांवची देखरेख पाहण्याचें काम होतें; त्यावेळपर्यंत त्यांस ४।५ मुलें होतीं. त्यांचा प्रपंच होता. त्यामुळें तेथें पाठवण्यापेक्षां भडगांवीं रुक्मिणीकाकूच्या माहेरीं जाणें तिला स्वतःला जास्त पसंत पडणारें असल्यामुळे स्वाभाविक प्रथम रुक्मिणीबाई गेल्या असतील, भडगांवीं.

भडगांव त्याकाळीं मोठा गांव होता. ६।७ हजारांची वस्ती होती. ब्राह्मण कुटुंबें पुष्कळ व सधन होतीं. खानदेशची जमीन खूप सुपीक; कापूस पिकवणारा मलूख म्हणजे सोन्याचा तुकडाच श्री. कै. दे. भ. नरसिंह चिंतामण केळकर वकीलीची परीक्षा पास झाल्यावर भडगांवीं वकीली करावयास म्हणन कांहीं दिवस तेथें जाऊन राहिले होते. तेथें धंद्यास वाव आहे असें त्यांचें मत झालें होतें. पण पुढें ते साताऱ्यास वकीली सुरु करावयास गेले. पण भडगांवही त्यांचे नजरेसमोर होतें. असा हा गांव. गिरणा नदी पावसाळ्यांत पूर आल्यावर गावास अक्षरशः वळसा घालून बेटाचें स्वरूप आणते; इतर ऋतूंमध्यें तीन बाजूनें वेष्टिते. नदीस घाट आहेत लहान लहान; काठावर लहान देवळें आहेत.; गांवच्या पलीकडच्या बाजूस आजसुद्धां जवळ जवळ ४० झाडें उभी असलेली आंबराई आहे, आणि मध्यें मोकळी जागा आहे. गावचे लोक वनभोजनादि कार्यक्रम तेथें उरकतात. अलीकडे तेथील हायस्कूल त्या जागेचा क्रीडांगण म्हणून उपयोग करूं लागलें आहे. असा हा एका प्रकारें चांगला गांव होता, आहे. नदीमुळें व आंबराईमुळें निसर्गशोभाही आहे थोडी

श्री. केशव गंगाधर चितळे हे त्यावेळीं भडगांवच्या प्राथमिक शाळेचे हेडमास्तर होते. त्यांचा गावांत नांवलौकिक होता, त्यांस वजन होतें. इंग्रजी शिक्षणाची सोय अजीबात नव्हती. ब्राह्मण सुखवस्तु कुटुंबें पुष्कळ, व मुलें पुष्कळ शिकण्यास; त्यांस लहान वयांत परगावीं पाठवणें सर्वांस जमत नसे. आप्पा जर भडगांवीं स्थायिक झाले तर त्यांचे पोटापाण्याचा प्रश्न सुटेल, सौ. रुक्मिणीबाईस

नेहमीं माहेर जवळ असण्याचा आनंदही लाभेल; व गांवचीहीं इंग्रजी शिक्षणाची सोय होईल. म्हणून इंग्रजी शिकवण्याचा वर्ग किंवा इंग्रजी शाळाच म्हणा, आप्पांनीं सुरु करावी असा विचार त्यांचे सासऱ्यांनीं त्यांचे पुढें ठेवला; आणि आप्पांनी तो मानला असावा. पण तो मानतांना त्यांचे मनाची अवस्था "कांट्यावाचून गुलाब नाहीं" या काव्यांत वर्णिलेली आढळेल. जीवन हें सुखदुःख मिश्रित आहे; गुलाब हवा असल्यास कांटे घेतलेच पाहिजेत, असा त्या काव्याचा सारांश आहे. भडगांव पाहिजे ना, प्लेगकरितां मुंबई नको मा ? तर स्वीकारा कुग्रामवास ! पुणे-मुंबई येथील शहरी भडकपणा लकाकी, चकाकी, विद्येचा अधिवास, ग्रंथालयें, नाटच व्याख्यानें, विद्वत्सभा आदि कार्यक्रम यांचा भडगात्रीं अभाव. पण हें सर्व सोसलेंच पाहिजे, अगतिक होऊन, अशी त्यांची त्यावेळची मनःस्थिति असावी . फार दूर कशाला.. मी स्वतः १९४२ सालीं जेव्हां पुणे सोडून सोलापूरसारख्या मोठ्या पण जरा दूरच्या शहरीं रहावयास आलों तेव्हां मला काम भरपूर मिळाल्यामुळें मी स्वतः असंतुष्ट नव्हतां, मुळींच; पण ओळखीचे पुण्या-मुंबईचे लोक विचारीत "तुम्हास सोलापुरांत करमतें ? " आणि मी "होय" उत्तर दिल्यावर आश्चर्य व्यक्त करीत! खरोखर पुणे व सोलापूर या ठिकाणांत त्यावेळींच काय आजसुद्धां कांहीं काहीं खुशालचेंडूंस व रिकामटेंकड्यांस खूपच अंतर दिसतें! पण तसें पाहिलें तर, अंतर असलेंच तर तें Quantitative आहे Qualitative नाहीं. पुण्यांत सुसंस्कृत समजली जाणारी लोकसंख्या सोलापूरच्या त्या लोकांच्या सहज ८।१० पट आहे; एवढाच फरक. दर्जा तोच! पण मी येथें आलों ३९ वर्षांचा असतानां; म्हणजे जरा जास्तच समज, संसाराचा जास्तच अनुभव आल्यानंतर; आणि आप्पा गेले भडगांवास केवळ ३० वर्षांचे असतांना; व ते गेले मुंबईहून भडगांवांस, पुण्याहून सोलापूरास नव्हे !

आप्पा भडगांवास ४ वर्षांवर आणि अंदाजें ५ वर्षें राहिले. ते कोठें रहात असत तें घर मी एकदां १९५२ च्या सुमारास भडगांवीं गेलों असतां पाहिलें होतें. तें घर आणि १९६५ च्या डिसेंबर मध्यें गेलों असतां जें एक घर मला दाखवण्यांत आलें तें निराळे होतें. पूर्वीं पाहिलेलें घर बरेंच मोडकळीस आले होतें. एका मोठ्या दिंडी दरवाजामधून मागचे अंगास जावयाचें होतें, चौक असणारा तो मोठा वाडा होता. आतां तें घर पार जमीनदोस्त होऊन त्या ठिकाणीं सिमेंटकाँक्रीटची इमारत झाली असें ६५ सालीं कळलें. दुसरें घर केळकरांचें म्हणून दाखवण्यांत आलें. पण ते बरेंच पडके झालेलें. वेळ होती दिवे लागणीची, किल्ली दुसरीकडून आणून घर पाहणें शक्य नसल्याने मी तें पाहिलें नाहीं. पण ज्या त्या घराशेजारच्या घरांत इंग्रजी शाळा भरत असे त्या माडीवर जावून ती माडी पाहिली. पाहण्याचा खास उद्देश होता. माझे चुलत बंधु कै परशुरामपंत यांचे सांगण्यातील गोष्ट होती. माडीवर मोठमोठ्या लाकडी कडीपाटाच्या तुळयांवर आप्पांच्या हातानें खडूनीं लिहिलेलीं

बोधपर वचनें आजपर्यंत तेथील मंडळींनी टिकवून ठेवलेलीं आहेत. माडीवर अनेक ठिकाणीं वचनें आहेत; पण तीं जुनीं व त्यांच्या हातचीं वाटलीं नाहींत. परशुरामपंत एकदां केशवसुत पुण्यतिथीचे निमित्तानें १९४५–५०च्या सुमारास तेथें गेले होते; तेथील हौशी, श्रीमन्त केशवसुनाभिमानी अशा कै. भाऊसाहेब देशपांडे यानीं त्यांस बोलावलें होतें. भाऊसाहेब यानीं एक "केशवसुत मंडळ" स्थापन केलें होतें; व त्यांचे काव्यांचे संबंधांत जें जें प्रसिद्ध होईल तें तें जमा करून सांठवण्याचा त्यांचा छंद होता, अशी माहिती कळलेली होती. म्हणून मी मोठ्या आशेनें भडगावीं २० डिसेंबर १९६५ चे सुमारास गेलों होतों. पण श्री. देशपांडे कैलासवासी झालेले कळलें. पण त्यांचे स्नेही व श्री. मधुकर सदाशिव जकातदार वकील, (B. Sc. LL. B.) भेटले. ते विशेष माहिती देऊं शकले नाहींत श्री. देशपांडे यानीं जमा केलेल्या साहित्याची बरीच वाताहत झाली. कांहीं साहित्य त्यांचे मुलीकडे मिळण्याचा संभव आहे अशी माहिती व मुलीचा पत्ताही कळला पण मी त्या दृष्टीनें पुढें जास्त खटपटी, आजारी पडल्यामुळें करूं शकलों नाहीं, केली नाहीं.

भडगांवी आज केशवसुतांचें स्मारक म्हणून एक वाचनालय स्थापन झालें आहे. त्याची लहान टुमदार स्वतंत्र इमारत आहे. नांव आहे "केशवसुत" गट ग्राम पंचायत वाचनालय. स्थापना झाली १९४९ सालीं. नवी इमारत १९६३ मध्यें बांधून पूरी झाली. त्या इमारतीचे उद्‌घाटक भाऊसाहेब के. एम्. पाटील, अध्यक्ष जळगांव जिल्हापरिषद हे होते तर समारंभाचे अध्यक्ष होते आप्पासाहेब सुपडु भादु पाटील, M L. A. .

मी डिसेंबरांत भडगावीं गेलों असतां मला सहाय्य करणारी मंडळी यांची नांवें पुढें देतो :– श्री. बाळासाहेब मोहरीर पूर्वोक्त श्री. मधुकर सदाशिव जकातदार वकील. पण या दोघांपेक्षाही तरुण शिक्षक श्री. गणेश लक्ष्मण पूर्णपात्री यांनीं जवळ जवळ ३।४ तासपर्यंत मजबरोबर हिंडून फिरून मला निरनिराळीं ठिकाणें दाखवलीं व जी माहिती त्यांस होता ती त्यानीं मला पुरवली. वरील वाचनालय घरें, नदीकांठ, घाट, घाटावरील श्री. महादेवाचें देऊळ, नदीपलीकडची आंबराई, वगैरे भाग त्यानींच हिंडून दाखवला याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. गांवाबद्दलची सामान्य माहिती त्यांचेकडून व पुढें चाळीसगांवचे श्री. आत्मारामपंत चितळे वकील B. A. LL. B. यानीं त्या गावची जास्त माहिती पुरवली. चितळे ( आप्पांचे सासरे) यांचे घराण्याचा वंशवृक्ष व त्या घराण्याची माहिती देखील त्यांनीं पुरवली. हीच माहिती त्यांत किरकोळ दुरुस्ती करून माझे स्नेही श्री. रघुनाथ भास्कर चितळे, (M.A.B.T.) रिटायर्ड, प्रिन्सिपल, आल्फ्रेड गॅडने हायस्कूल, दापोली सध्यां मुक्काम सोलापूर यानीं कायम केली. श्री. चितळे यांचा वंशवृक्ष पहा :–

मूळचे रावतळें, चिपळूणजवळचे राहणारे) केशव गंगाधर चितळे (मृत्यु १९२०.) ( मराठी शाळेचे हेड मास्तर

| रामचंद्र | लक्ष्मण | भास्कर | माई | बयो | द्वारका ऊर्फ जिजी | पुरुषोत्तम |
|---|---|---|---|---|---|---|
| आत्माराम (वकील), गणेश | × | श्रीराम, रघुनाथ | श्रीधरपंत साठे, काठेवाड यांस दिल्या होत्या | (केशव-सुतांच्या पत्नी | चाळिसगांवचे परांजपे यांस दिलेल्या. सध्यांहयात असून ("गणेश भुवन" सर भालचंद्र रोड, रामनारायण रुइया कॉलेजजवळ) स्वत:च्या मुलाजवळ श्री. वामन रामकृष्ण परांजपे यांचेजवळ दादर मुंबई १४ येथे राहतात. | अविवाहित |

आप्पा जरी विशेष शिकले नाहींत, आर्थिक दृष्टीनें जरी त्यांची भरभराट नव्हती, त्यांच्या काव्यांचा रसिकतेनें आस्वाद घेण्याची पात्रताही चितळे घराण्यांतील त्यावेळच्या पुरुष वर्गात जरी नव्हती, तरी, चितळे घराण्यांत त्यांस मान होता, त्यांचेबद्दल त्या लोकांस आदर वाटत असे. ते ही कोकणांत श्वशुरगृहीं चिपळूण येथें जात असत अशी माहिती चितळे कुटुंबीयांकडून कळली. यामुळेंच भडगांवला ते गेले; आणि आयुष्याचा, संसाराचा गाडा त्यानीं तेथें पुढें नेला. पण याच प्रकरणांत अन्यत्र सांगितल्याप्रमाणें त्यांस मुंबई सोडून बाहेर पडावें लागलें याबद्दल वाईट वाटलें असेलच. त्याचीं संभाव्य कारणें– १) इंग्रजी ग्रंथ, काव्यग्रंथ यांची भडगांवीं दुर्मिळता. २) केलेल्या काव्यांस प्रसिद्धी मिळण्याचीं साधनें– श्री. काशिनाथ रघुनाथ मित्र, (मासिक मनोरंजन), श्री. ह. ना. आपटे ( करमणूक, ) काव्यरत्नावली. संपादक श्री. फडणीस यांचा भडगांवहून, संबंध ठेवणें हें फार कठीण होतें. कोणत्याही कलाकारास कलेंत रमून जाणें दंग होणें, देहभान विसरणें जसें आवडतें, तद्वत्‌च आपली कला लोकांपुढें, जनसमुदायापुढें यावी याचीही ओढ असते. भडगांव येथें ती शक्यता दूरावली, [ आणि माझी ही एक कल्पनाच आहे. तिला आधार कांहीं नाहीं ] ३) कोणीतरी एखादी स्त्री व्यक्ति त्यांचे मनांत भरलेली पण त्याचप्रमाणें त्यांस ती सदैव दुष्प्राप्यच वाटणारी, मुंबईस अधून-मधून नजरेस पडणारी असावी. आणि आतां मुंबई कायमची सुटल्यानें ती स्त्री नजरेसही पडण्याची अजीबात शक्यता नाहींशी झाली. ही व्यथा त्यांस बोचत असावी.

हा शेवटचा मुद्दा अगदीं स्वतंत्र व नवा विचार आहे. तेव्हां त्याचा प्रपंच थोडा विस्तारानें करतों. कै. ती. सीतारामपंत व कै. परशुरामपंतही असें नेहमीं सांगत आले कीं त्यांचीं जीं प्रेम काव्यें आहेत तीं सर्व कोणाही स्त्रीला उद्देशून नाहींत. ती स्त्री म्हणजे कवितादेवी, देवी सरस्वती अशी कोणीतरी स्त्री ही त्यांची कल्पना. मला वाटतें एवढी Puritan शुद्ध व सात्त्विक, आणि पवित्र नीतिविषयक कल्पना स्वीकारण्याचें कारण नहीं. अगदीं फार फार प्राचीन काळापासून पुरुषास स्त्रीचें आकर्षण वाटत आलेलें आहे. त्यांत कांहीं अपवित्र, वाईट, असें मानण्याचें कारण मला वाटत नाहीं. ज्या आंग्ल Romantic poets याचें काव्यांचा त्यांचे मनावर एवढा अफाट परिणाम झाला होता, त्यांचे जीवनाची माहिती खात्रीनें त्यांस झालेली असेलच. रवीन्द्रनाथ ठाकूर किंवा टागोर हे तरुणपणांत १८९० चे सुमारास मुंबईत व सोलापूर येथेंही त्यांचे चुलत्यांकडे आलेले होते; ते मुंबईस असतांना एका सुविद्य महाराष्ट्रीय तरुणीच्या प्रेमपाशांत पडले होते अशी साधार शंका ५।७ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली होती. त्या तरुणीचें नांव, फोटोही केसरीत प्रसिद्ध झालेला माझे पाहण्यांत आला होता. नांव मात्र आतां पक्कें आठवत नाहीं; पण कु. 'तर्खड"असावें असें वाटतें. या नव्या माहितीनें त्यांचे (टागोरांचे) मोठेपणांत, काव्याचे श्रेष्टतेमध्यें, जसा कांहींच कमीपणा आला नाहीं, तद्वत् आप्पांच्या, केशवसुतांच्या कीर्तीमध्यें किंवा काव्यसंपदेमध्यें माझ्या या नव्या तर्कामुळें न्यूनत्व येण्याची भीति मला मुळींच वाटत नाहीं.

माझ्या तर्कास आधार पहा - " माझा अन्त " हें काव्य त्यांचे अशा एखाद्या रूपसंपन्न पण दुष्प्राप्य स्त्रीवरचें प्रेम सूचित करीत आहे. ते स्वतः त्या व्यतीच्या प्रेमांत सांपडून स्वतः नष्टच झाले, कृष्णाजी केशव दामले ही व्यक्ती नष्ट झाली; आणि शिल्लक राहिलें ते त्यांचें भूत, यांत शंकाच नाहीं असें ते स्वतःच शेवटच्या चार ओळींत सांगत आहेत-

माझा असा अन्त अहो जहाला ।
"कोठूनिया हा मग येथ आला ! "
ऐसा तुम्हां संशय येतसे का ?
मी भूत हें मम असें, नच यात शंका ! "

हें काव्य त्यानीं ४ जानेवारी १८९० रोजीं म्हणजे ते केवळ २४ वर्षांचे असतां " गद्धे पंचविशींत " च त्यानीं लिहिलेलें आहे. आतां भडगांवीं गेल्याबरोबरच बहुधा त्यांच्या ज्या सुखदुःखासंबंधीं संमिश्र भावना झाल्या त्यांचें प्रतिबिंब "कांटयावाचून गुलाब नाहीं! " या काव्यांत सांपडतें. आणि " त्या " अज्ञात स्त्री विषयीं हुरहूर पुढील ७ पद्यांत आढळते – 'रुष्ट सुंदरीस", "सुंदरी दर्शन",

"कविच्या हृदयीं जसे गुंगती- ", "मनोहारिणी", "प्रणय कथन", "वियोगामुळें", "कोणीकडून ? कोणीकडे?". यांपैकी "रुष्ट सुंदरीस", व "मनोहारिणी", या दोन काव्यांत ती. कै. सीतारामपंत सांगतात तसाही अर्थ निघूं शकतो; पण उरलेल्या पांच काव्यांत तसा अर्थ सहजासहजीं निघूं शकत नाहीं. आणि म्हणून माझी कल्पना जास्त खरी असावी असें मी येथें नम्रपणें सुचवूं इच्छितों.

ह्या माझ्या तर्कास आणखी पुरावा पहा – "त्वत्प्रीतीस अपात्र हा जन" ही कविता माझ्या तर्कास बळकटी आणणारी आहे. हें काव्य १५ डिसेंबर १८९० रोजीं पूर्ण केलेलें आहे. यांतील सुरुवातीच्या खालील ओळी –

त्वत्प्रीतीस अपात्र हा जन तुला कालान्तरीं वाटला,
तोडावा तुजला मदीय जर हा संबंध गे लागला,
" माझी हस्तक जोडुनी तर तुला विज्ञापना ही असे ,
ती तूं मान्य करीं म्हणून तुज हा मी दास याचीतसें :–

आणि अखेरच्या चार ओळी पहा –

कण्ठीं घालुनि हात चुम्बन हळू माझें गडे तूं करीं,
मेरी जान् ! गुलनार ! सांग निघुनी जायास मातें दुरी! –
तेणें त्रास तुला मुळीं न पडणें होईल माझें करें
कां कीं तें तव सांगणें मज गडे वाटेल तेव्हां खरें ! "

त्याचप्रमाणें या काव्याच्याच आगेमागें असलेल्या खालील कविता वाचकांनी अभ्यासाव्यात, पहाव्यात :– "प्रियेला सादर केलेली पुष्पमाला" आणि "प्रीतीची भाषा", या काव्यांवरून माझा तर्क असा आहे कीं ही स्त्री महाराष्ट्रीय ब्राह्मण नसावी; ती त्यांस दुष्प्राप्य असावी. यास कारण वर उद्धृत केलेल्या ओळी व त्यांतील 'मेरी जान् ! गुलनार' हे शब्द चिन्त्य वाटतात. वर सांगितलेल्या काव्यांतील "प्रियेला सादर केलेली पुष्पमाला" दूरान्वयानें माझ्या तर्कास पुष्टि देते तर 'त्वत्प्रीतीस' 'आणि' 'प्रीतीची भाषा' उघडच पुष्टी देतात. केशवसुतांच्या, आप्पांच्या, मनावर इंग्रज Romantic काव्याचा पगडा बसत चाललेला स्पष्ट दिसतो, तेव्हां ते Romantic Spirit जगत होते, आणि त्या धर्तीची काव्य-रचना जरी त्या काळांत ती थोडीफार असभ्य किंवा प्रेमाची, पांचट कविता वाटणारी असली, तरी एकप्रकारच्या धीटपणानें तसलें काव्य लिहून प्रसिद्ध करूं लागले. त्यांचा Romance थोडाफार प्रख्यात स्पॅनिश लेखक Cervantes याच्या Don Quixote सारखा आहे.

हा शेवटचा मुद्दा अगदीं स्वतंत्र व नवा विचार आहे. तेव्हां त्याचा प्रपंच थोडा बिस्तारानें करतों. कै. ती. सीतारामपंत व कै. परशुरामपंतही असें नेहमीं सांगत आले कीं त्यांचीं जीं प्रेम काव्यें आहेत तीं सर्व कोणाही स्त्रीला उद्देशून नाहींत. ती स्त्री म्हणजे कवितादेवी, देवी सरस्वती अशी कोणीतरी स्त्री ही त्यांची कल्पना. मला वाटतें एवढी Puritan शुद्ध व सात्त्विक, आणि पवित्र नीतिविषयक कल्पना स्वीकारण्याचें कारण नाहीं. अगदीं फार फार प्राचीन काळापासून पुरुषास स्त्रीचें आकर्षण वाटत आलेलें आहे. त्यांत कांहीं अपवित्र, वाईट, असें मानण्याचें कारण मला वाटत नाहीं. ज्या आंग्ल Romantic poets याचें काव्यांचा त्यांचे मनावर एवढा अफाट परिणाम झाला होता, त्यांचे जीवनाची माहिती खात्रीनें त्यांस झालेली असेलच. रवीन्द्रनाथ ठाकूर किंवा टागोर हे तरुणपणांत १८९० चे सुमारास मुंबईत व सोलापूर येथेंही त्यांचे चुलत्यांकडे आलेले होते; ते मुंबईस असतांना एका सुविद्य महाराष्ट्रीय तरुणीच्या प्रेमपाशांत पडले होते अशी साधार शंका ५।७ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली होती. त्या तरुणीचें नांव, फोटोही केसरीत प्रसिद्ध झालेला माझे पाहण्यांत आला होता. नांव मात्र आतां पक्कें आठवत नाहीं; पण कु. 'तर्खड" असावें असें वाटतें. या नव्या माहितीनें त्यांचे (टागोरांचे) मोठेपणांत, काव्याचे श्रेष्टतेमध्यें, जसा कांहींच कमीपणा आला नाहीं, तद्वत् आप्पांच्या, केशवसुतांच्या कीर्तीमध्यें किंवा काव्यसंपदेमध्यें माझ्या या नव्या तर्कामुळें न्यूनत्व येण्याची भीति मला मुळींच वाटत नाहीं.

माझ्या तर्कास आधार पहा - "माझा अन्त" हें काव्य त्यांचे अशा एखाद्या रूपसंपन्न पण दुष्प्राप्य स्त्रीवरचें प्रेम सूचित करीत आहे. ते स्वतः त्या व्यतीच्या प्रेमांत सांपडून स्वतः नष्टच झाले, कृष्णाजी केशव दामले ही व्यक्ती नष्ट झाली; आणि शिल्लक राहिलें ते त्यांचें भूत, यांत शंकाच नाहीं असें ते स्वतःच शेवटच्या चार ओळींत सांगत आहेत-

माझा असा अन्त अहो जहाला ।
"कोठूनिया हा मग येथ आला ! "
ऐसा तुम्हां संशय येतसे का ?
मी भूत हें मम असें, नच यात शंका ! "

हें काव्य त्यानीं ४ जानेवारी १८९० रोजीं म्हणजे ते केवळ २४ वर्षांचे असतां " गद्धे पंचविशींत " च त्यानीं लिहिलेलें आहे. आतां भडगांवीं गेल्याबरोबरच बहुधा त्यांच्या ज्या सुखदुःखासंबंधीं संमिश्र भावना झाल्या त्यांचें प्रतिबिंब "कांट्यावाचून गुलाब नाहीं! " या काव्यांत सांपडतें. आणि " त्या " अज्ञात स्त्री विषयीं हुरहूर पुढील ७ पद्यांत आढळते – 'रुष्ट सुंदरीस", "सुंदरी दर्शन",

" कविच्या हृदयीं जसे गुंगती- ", "मनोहारिणी", "प्रणय कथन", "वियोगामुळें", "कोणीकडून ? कोणीकडे?". यांपैकी "रुष्ट सुंदरीस", व "मनोहारिणी", या दोन काव्यांत ती. कै. सीतारामपंत सांगतात तसाही अर्थ निघूं शकतो; पण उरलेल्या पांच काव्यांत तसा अर्थ सहजासहजीं निघूं शकत नाहीं. आणि म्हणून माझी कल्पना जास्त खरी असावी असें मी येथें नम्रपणें सुचवूं इच्छितों.

ह्या माझ्या तर्कास आणखी पुरावा पहा – " त्वत्प्रीतीस अपात्र हा जन " ही कविता माझ्या तर्कास बळकटी आणणारी आहे. हें काव्य १५ डिसेंबर १८९० रोजीं पूर्ण केलेलें आहे. यांतील सुरुवातीच्या खालील ओळी –

त्वत्प्रीतीस अपात्र हा जन तुला कालान्तरीं वाटला,
तोडावा तुजला मदीय जर हा संबंध गे लागला,
" माझी हस्तक जोडुनी तर तुला विज्ञापना ही असे ,
ती तूं मान्य करीं म्हणून तुज हा मी दास याचीतसें :–

आणि अखेरच्या चार ओळी पहा –

कण्ठीं घालुनि हात चुम्बन हळू माझें गडे तूं करीं,
मेरी जान् ! गुलनार ! सांग निघुनी जायास मातें दुरी! –
तेणें त्रास तुला मुळीं न पडणें होईल माझें करें
कां कीं तें तव सांगणें मज गडे वाटेल तेव्हां खरें ! "

त्याचप्रमाणें या काव्याच्याच आगेमागें असलेल्या खालील कविता वाचकांनी अभ्यासाव्यात, पहाव्यात :– " प्रियेला सादर केलेली पुष्पमाला " आणि " प्रीतीची भाषा ", या काव्यांवरून माझा तर्क असा आहे कीं ही स्त्री महाराष्ट्रीय ब्राह्मण नसावी; ती त्यांस दुष्प्राप्य असावी. यास कारण वर उद्धृत केलेल्या ओळी व त्यांतील 'मेरी जान् ! गुलनार' हे शब्द चिन्त्य वाटतात. वर सांगितलेल्या काव्यांतील "प्रियेला सादर केलेली पुष्पमाला " दूरान्वयानें माझ्या तर्कास पुष्टि देते तर 'त्वत्प्रीतीस' 'आणि' 'प्रीतीची भाषा' उघडच पुष्टी देतात. केशवसुतांच्या, आप्पांच्या, मनावर इंग्रज Romantic काव्याचा पगडा बसत चाललेला स्पष्ट दिसतो, तेव्हां ते Romantic Spirit जगत होते, आणि त्या धर्तीची काव्य-रचना जरी त्या काळांत ती थोडीफार असभ्य किंवा प्रेमाची, पांचट कविता वाटणारी असली, तरी एकप्रकारच्या धीटपणानें तसलें काव्य लिहून प्रसिद्ध करूं लागले. त्यांचा Romance थोडाफार प्रख्यात स्पॅनिश लेखक Cervantes याच्या Don Quixote सारखा आहे.

याच तर्कास पुष्टिदायक त्यांची इंग्रजी कविता "An Apology to a Flower" रचना बहुधा १८९३ पहा

"I pluck Thee for my Tara's brow,
With all the tender bloom there shine-"
And sweetly breathe to her my vow–
I'll serve her who is so divine !"

ही इंग्रजी कविता केवळ ८ ओळींची आहे. या किवितेसारखीच गोविंदाग्रजांची कविता "फुलें वेचिलीं पण..." आहे ; ही मोठी कविता आहे. तीं फुलें कोणासाठीं हा प्रश्न गोविंदाग्रजांनीं सोडवला नाहीं, त्याचें उत्तर वाचकांवरच सोपवलें आहे. पण केशवसुतांनीं धिटाईनें तें फूल "तारे" करितां म्हटलें आहे. त्यांच्या काव्यांत "तारा" हें नांव ३।४ वेळां आलें आहे, उदाहरणार्थ "प्रणयकथन" त्यावरून अभ्यासकांस तें नांव त्यांचे पत्नीचें असावें असें वाटतें. पण त्यांच्या पत्नीचें माहेरचें नांव "वयो' व सासरचें नांव "रखुमा, किंवा "रुक्मिणी" होतें, आतां "तारा" हें नांव त्यांनीं पत्नीला खास प्रीतिमुळें खाजगी असें दिलें असावें असा तर्क Puritan लोकांस, त्या विचारसरणीच्या लोकांस प्रिय होईल. पण एखादी खरोखरीच कोणीतरी अज्ञात व्यक्ति "तारा" या काल्पनिक नावाची होती असें धिटाईनें मानण्यास हरकत कोणती ?

शिवाय त्यांची आणखी एक इंग्रजी कविता "The Star of Constant Love" आहे. या कवितेतील शेवटच्या ४ ओळी पहा

Indeed, my Love, we constant are
Whatever the space between ;
For that same star (Polar Star) of Constant Love
Shines on us both serene!

या सर्व विवेचनावरून त्यांचे प्रेम सिद्ध होतें. त्याची जाति शारीरिक, कामुक नव्हती; पण कांहीं निराळी कदाचित् इंग्रज Romantic Poets प्रमाणें Platonic प्रेमाची जाति असावी. तें प्रेम बुद्धिगम्य, भावगम्य, भावनागम्य, असें कांहीं तरी असावें; आणि त्या प्रेमाची मूर्ति होती, त्या बाबतींत ते अमूर्त निराकार व्यक्तीवर प्रेम करीत नसावेत. असें माझें म्हणणें आहे.त्यांनी प्रेमविषयक पुष्कळच काव्यें प्रथम, मराठी आधुनिक काव्याचे काळांत प्रथम, रचिलीं. आतां त्यांत आधुनिकांस तितकी उत्कटता आढळत नाहीं,याचें कारण त्यांचा काळ व त्या त्यांच्या प्रेमाची जाति हेंच आहे,त्यामुळें त्यांस"प्रेमाचे शाहीर"ही पदवी मिळू शकली नाहीं;

त्यांचे सच्च्या चेल्यास "गोविंदाग्रजां"स तो मान मिळाला,पण या काव्य प्रकाराचे बाबतींत ते "जनक" होत यांत शंकाच नाहीं; त्याचप्रमाणें ते केवळ "जनक" च नव्हते, तर त्यानीं कांही खरोखरीच चांगली व कांहीं प्रमाणांत उत्कट ही प्रेमकाव्यें लिहून भरीव कामगिरी केलेली आहे.

हा विषय महत्त्वाचा आहे म्हणून त्याचा दोन तीन ठिकाणीं जास्त प्रपंच केलेला आढळेल.पण यावरून जरकोणी आप्पा प्रेम-निराशेमुळें स्त्रैण कवि होते, दुर्बल होते रडके होते असे निष्कर्ष काढूं लागल्यास मात्र मी त्यांस तीव्र विरोध करीन. हे निष्कर्ष माझ्या मतानें साफ चुकीचे आहेत. कारण मी त्यांच्या प्रेम-काव्यांची जीं जीं उदाहरणें दिलेलीं आहेत त्यांत स्त्रैणत्व व कामुकता आढळणार नाहीं. कामुक प्रेम सफळ न झाल्यास दोष आपोआप उत्पन्न होतात. पण त्यांच्या प्रेमाची जातिच अगदीं निराळी वाटते.

भडगांवच्या आप्पांच्या वास्तव्यांत त्यानीं एकूण २५ वर काव्यें रचिलीं आहेत; आणि त्यांतील फार प्रख्यात काव्यें पुढें देतों– " नैऋत्येकडील वारा " "सतारीचे बोल" "नवा शिपाई" "रांगोळी घालतांना पाहून" "वातचक्र," "दिवाळी" "म्हातारी" "निशाणाची प्रशंसा" हीं विख्यात काव्यें भडगांवची होत. त्यांची काव्य - प्रतिभा एकाप्रकारें भडगांवच्या काळांत पुष्कळ विकास पावलेली होती, असें दिसतें; व त्या काव्य - प्रतिभेस त्या गांवचें थोडें निसर्गरमणीयत्वही कारणीभूत झालेलें असावें.

" सतारीचे बोल ", व " रांगोळी " बद्दल त्या गांवच्या लोकांना अभिमान वाटलेला मला आढळला. मी जेंव्हां डिसेंबर १९६५ मध्यें भडगांवच्या लोकांजवळ बोललों तेव्हां या काव्यांबद्दलचा त्यांचा अभिमान त्यानीं बोलून दाखवला. त्याबरोबरच "दिवाळी"चाही उल्लेख कांहीं जणानीं केला. अर्थात् ती मडळी कोणी विद्वान्, वाङ्मयाभ्यासक नव्हती, त्यांच्या ज्या कांहीं आठवणी होत्या, त्यानीं जे कांहीं ऐकलेलें होतें व जें त्यांस त्यावेळीं आठवत होतें तें ते मला माहिती म्हणून सांगत होते. त्या सर्व आतिथ्यशील लोकांच्या मनांत कसलाही गर्व मला आढळला नाहीं; मला त्या सर्वांनीं फार आत्मीयतेनें वागवलें.

"दिवाळी" १९०० मध्यें लिहिली गेली. ती दिवाळी त्यांना आनंदाची गेलेली असावी असा रसिकांचा तर्क आहे. त्याच वर्षी त्यांचा धाकटा आवडता भाऊ बापू हा B. A. झालेला होता, त्याचा इंग्रजींत पहिला नंबर आलेला होता, त्याचा विवाहही आधींच्या वर्षी झालेला होता. एकूण वडिलांच्या मृत्युनंतर

सर्व ठाकठीक झालेलें त्यानीं पाहिलें होतें. त्यांचा आनंदही मनांत असावा. पण एकूण त्यांचे मनाचा स्थायीभाव या जगांत संसारांत राम नाहीं असाच गेल्या कांहीं वर्षांपासून झालेला दिसतो, त्याची छटा " दिवाळी" च्या शेवटच्या दोन ओळींत आहेच!

"मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीन उन्मन असा वेडयापरी गाउनी !"

माझे मतानें भडगांवची त्यांची शेवटची कविता "म्हातारी" होय दारांतच आपल्या लहान मुलीला कडेवर घेऊन ते उभे होते. ही कन्या वत्सला. हिचा जन्म भडगांवचाच व तो बहुधा १९०० च्या सुरुवातीस किंवा फार तर १८९९ अखेरचा असावा, व नांव वत्सला; पण काव्यांत उल्लेख आहे "वत्सेला" असा –

"चुम्बुनि वत्सेला, वदे मी मग म्हातारीला–"

या काव्याचा विषय किती क्षुद्र आहे. पावसाळ्यानंतर व हिवाळ्याच्या सुरुवातीला कापसाची बोंडे फुटतात व मऊ मऊ कोवळा, हातास ओलसर लागणारा कापूस (कोकणांत अशा 'म्हाताऱ्यांचें' मध्यें एक वाटोळी गोळी असते, तर देशावर एक चपटी बी असते ) सुटा सुटा, आकाशांत उडत उउत जमिनीवर पडतो. लहान मुलें त्या म्हाताऱ्या गोळा करतात, कापूस गोळा करतात. त्या जमिनीवर पडतात, उडतात,.. इकडे तिकडे जातात. पण त्याच दुर्लक्षित, मोठ्या शहाण्या माणसांकडून दुर्लक्षित असणाऱ्या म्हाताऱ्या पाहून, आप्पांस केवढ्या अफाट अचाट बुद्धिप्रभाव दाखवणाऱ्या कल्पना सुचल्या! आणि हें एक भव्य दिव्य, काव्य, अमर काव्य ,जन्मास आलें! ...

"रांगोळी घालतांना पाहून" हें काव्य त्याचे खालीं असलेल्या १८ डिसेंबर १८९६ या तारखेवरून जरी डिसेंबरात लिहिलें गेलें असलें तरी त्याचा आशय चैत्रांतला आहे, माझे मतानें. मी लहाणपणीं माझ्या घरीं चैत्र महिनाभर आंगणांत सडा टाकून सकाळच्यावेळीं रांगोळी घातलेली, काढलेली पाहिली आहे. या प्रकारास "चैत्रांगण" हें नांव ही ऐकलेलें आहे आणि या काव्यांत वर्णन केलेले चंद्र, सूर्य, गोपद्में, तुळस, देव्हारा, व त्यांत एक देव व देवी स्वस्तिक आदि चिन्हें चिमटीमध्यें रांगोळी धरून कुशलतेनें ती जमीनीवर पाडून या विविध आकृति काढलेल्या पाहिलेल्या आहेत. त्याचप्रमाणें त्याच चैत्र महिन्यांत पुण्यांत सायंकाळीं रांगोळें घेऊन दारापुढें सडा शिंपून रांगोळी काढून आपल्या घरांत चैत्रगौरी

प्रीत्यर्थ हळदीकुंकवाचा समारंभ सूचित करावयाची पद्धति ही मी पाहिली आहे. गोविंदाग्रजांनीं आपल्या "रांगोळी घालतांना पाहून" या काव्यांत त्यांना परिचित अशी या चैत्रांतल्या सायंकाळच्या रांगोळीबद्दल काव्य रचलें आहे. गोविंदाग्रजांच्या वाग्बैजयंती मध्यें काव्यांचे शेवटीं रचनाकाल आढळत नाहींत. तेव्हां आप्पांनीं त्यांची "रांगोळी', ही कविता जरी मार्गशीर्षामध्यें लिहिलेली असली तरी हा विषय चैत्रांतल्या " रांगोळा "चाच वाटतो.

याच काळांत शिक्षक या नात्यानें त्यांची कीर्ति पसरूं लागलेली असावी. कारण फैजपूर येथें त्यानंतर लौकरच म्हणजे १९०१ मध्येंच ते गेले. फैजपूर हा त्यावेळीं व आजही म्हणतात, भडगांवपेक्षां मोठा गांव आहे. त्यावेळीं तेथें हायस्कूल होतें. त्यांत नोकरी मिळाली .. आणि पुढें १९०४ च्या सुरुवातीस तर (मध्यंतरीं ते S T. C. सारखी त्यावेळीं जी कोणती शिक्षकांची 'शिक्षक' म्हणून पात्रतेची परीक्षा होती ती ते पास झाल्यामुळें) त्यांस धारवाडच्या श्री. जठार यानीं सरकारी मंजूरी मिळवून स्वतःच्या सरकारी हायस्कूलांत जरा मोठ्या पगारावर नेमून घेतलें! अर्थात् श्री. जठार यांस त्यांची माहिती कशी कळली तें अजून मला कळलेलें नाहीं पण त्याबद्दल माझे कांहीं तर्क आहेत, ते येथें नमूद करतों.

मोरोपंत दामले किंवा माझे वडील अण्णा यांचे एक स्नेही श्री. बापूसाहेब जठार K. C. I. E. वगैरे, सरकार दरबारांत मान्यता पावलेले असे गृहस्थ १९१० - १५ चे सुमारास होते. त्यांचा व अण्णांचा स्नेह बहुधा डेक्कन कॉलेजांतला असावा. त्यांचा व श्री. भास्कर यशवंत जठार यांचा कांहीं नात्याचा जवळचा संबंध असावा श्री. भास्करराव जठार हे धारवाड येथें एकाप्रकारें महाराष्ट्रापासून दूर अशा सरकारी शाळेंत हेडमास्तर होते. त्या भागांत मराठी शिकवणारे, चांगले ट्रेन्ड शिक्षक मिळणें कठीण होतें. तेव्हां श्री. भास्करराव यांस त्या श्रीमान् जठारांचे मार्फत आप्पांचें नांव कळलें असावें, व अशाप्रकारें त्यांस धारवाडास नोकरी मिळाली असावी. धारवाडास ते प्रथम गेले ते श्री. भास्करराव जठार यांचेकडेच उतरले; कांहीं दिवस राहिले, व नंतर त्यानीं आपलें स्वतंत्र बिऱ्हाड स्थापलें!

पण ही भलतीच पुढली हकीगत पुढच्या प्रकरणाच्या शेवटीं, रास्तपणानें येणारी, आतांच सांगून झाली... झाली तर झाली; तेव्हां आतां पुढच्या प्रकरणाकडेच वळतों, आणि त्याचे शेवटीं ही हकीगत पुन: देणार नाहीं. ती खबरदारी घेईन!

# फैजपूर

भडगांवहून फैजपुरास आप्पा कां गेले असतील त्याची माहिती- शिक्षक या नात्याचा त्यांचा लौकिक– थोडक्यांत मागच्या प्रकरणीं दिली आहे. त्या काळीं फैजपूर हें भडगांवहून मोठें गांव होतें; आजही मोठें गांव आहे. भुसावळ, खांडवा, दिल्ली या रेल्वेच्या मोठ्या फाट्यावर भुसावळच्या पुढच्या सावदा या स्टेशन-पासून दोन मैल अंतरावर हा गांव वसलेला आहे. गांव आहे नदी काठीं; पण मी दि. २०।२२ डिसेंबर १९६५ ला तेथें गेलों तेव्हां ती अगदीं कोरडी होती व फारशी रुंदही वाटली नाहीं. मोठा नालाच असा माझा समज आहे. त्याचे काठावर, तीरा-वर असणाऱ्या घरांचे शौचकूप आहेत, नदीला सामोरे ! ... एकूण भडगांवपेक्षां फैजपूर गांव मला कमी दर्जाचें वाटलें. नैसर्गिक शोभा जवळ जवळ नाहीं. पण त्या गांवास फार जुनी, केशवसुत किंवा आप्पांच्या वेळच्या आधीपासूनची म्युनिसि-पालिटी आहे. सध्यांचे हायस्कूल म्युनिसिपालिटी चालवते, व तिच्यामध्यें एक हजार मुलें मुली शिक्षण घेत आहेत. गावांत एक कॉलेजही आहे.. असें एकूण गांवास महत्व आहे. पण कां कोणास कळे, मला मात्र गांव आवडला नाहीं; भडगांव पुष्कळच बरें वाटलें फैजपूरपेक्षां.

पण आप्पांचश फैजपूरच्या अंदाजें ३॥–४ वर्षांच्या वास्तव्याबद्दल माहिती कै. श्री. वा. का. गद्रे यानीं व कै. डॉ चिक्केरूर यानीं केशवसुत स्मारक ग्रंथांत बऱ्या प्रकारची दिलेली आहे. त्यामुळें त्यांच्या तेथल्या जीवनावर कांहीं थोडा प्रकाश पडतो.

फैजपूरला ज्याप्रमाणें केशवसुतांच्या कांहीं काळच्या वास्तव्यामुळें महत्त्व आलें, तसेंच कॉंग्रेसच्या इतिहासांत त्या गांवाला महाराष्ट्राचे पुढारी दे. भ. शंकर-राव देव व खानदेशचे श्री. दास्ताने वकील या पुढाऱ्यांच्यामुळें ग्रामीण अधिवेशन भरविण्यांत त्या गांवाला हिन्दुस्थानांत पहिला मान मिळाला, ह्यामुळेंही महत्व आलें. कॉंग्रेसचें फैजपूर अधिवेशन हें अनेक कारणांनीं गाजलें ! फैजपूरच्या

आप्पांच्या वास्तव्यांत काव्य त्यांस सोडून जात होतें कीं काय, निदान त्या दृष्टीनें काव्यानें निघून जाण्यास प्रस्थान ठेवलें होतें कीं काय अशी शंका येते. या जवळ जवळ ३ वर्षांच्या काळात त्यानीं केवळ ११ काव्येंच रचिलीं. पण त्यांत "आम्ही कोण", "घूबड", व "फिर्याद" याच काय त्या विशेष प्रसिद्ध कविता होत. "कचाप्रत देवयानी", व "राजा शांतनु" या प्रख्यात कविवर्य मोरोपंत यांच्या थाटाच्या आर्या देखील त्यानीं याच काळांत रचलेल्या आहेत. जुन्या काव्याकडे, त्यांची दृष्टी वळलेली दिसते थोडी. कदाचित् ते म्हणत असत कीं त्यांची कवित्व शक्तिच क्षीण होत चालली, त्यांस सोडून गेली ! त्यांचा ओढा एखादें महाकाव्य रचावें असा ही होत गेला असेल. कारण महाकाव्यें या काळांत जवळ जवळ दुर्मिळ होत चालल्यामुळें महाकाव्य रचना करून पाहणें या गोष्टीकडे त्यांचा कल झाला असणें विशेषतः त्यानीं लिहिलेल्या मोरोपंती थाटाच्या दोन प्रकरणांवरून– "कचाप्रत देवयानी" व "राजा शांतनु"– स्वाभाविक वाटतें. आणि यामुळें बहुधा स्फुट नवीन धर्तीची रचना ते कमी कमी करूं लागले असावेत. त्यांस मोरोपंती थाट, चांगलाच साधत होता हें त्या दोन प्रकरणांवरून स्पष्ट दिसून येतें.

त्यांच्या फैजपूरच्या वास्तव्याबद्दल कै. श्री. वा. वा. गद्रे हे "केशवसुत स्मृति ग्रंथांतील" त्यांचे "केशवसुतांच्या सहवासांतील तीन वर्षें" या ११ पृष्ठांच्या लेखांत साधारण ५ पृष्ठांची माहिती देतात. आणि बाकीचीं पृष्ठें त्यांचें पूर्वीचें व नंतरचें चरित्र या विषयावर खर्च करतात; तेव्हां श्री. गद्रे यानीं जी माहिती दिली आहे त्याचा आवश्यक तेवढाच भाग घेऊन मी मला काय लिहावयाचें तें लिहीन.

फैजपूरांत असतांना केशवसुत हे कांहीं काळ शाळेचे हेडमास्तर होते. शाळा अगदीं लहान होती, चार इयत्ता मिळून फार तर ५० मुलें, असा शाळेचा थाट होता. ज्या इमारतींत शाळा भरत असे ती दुमजली इमारत श्री. रूपा आनंद महाजन यांची आज अत्यंत भिकार अवस्थेंत उभी आहे. त्या इमारतीस त्याकाळीं रु. २ महिना भाडें होतें. मी त्या इमारतीमध्यें गेलों होतों; घर मालकांनी माझा आदर सत्कारही डिसेंबर ६५ मध्यें (दि. २० चे आगेमागें) केला. खोल्या फार लहान आहेत. आज त्याच हायस्कूलची इमारत चांगली आहे.

केशवसुत निवास म्हणजे श्री दत्त मंदीर म्हणून ओळखली जाणारी इमारत मला दाखवण्यांत आली. मंदीर आंतल्या अंगास आहे आणि रस्त्यालगतच्या दुमजली इमारतीच्या भागांत– आज तो अगदीं पडका झालेला आहे– मी थोडा भीतभीतच जिन्यानें माडीवर गेलों. अशा या घरांत ते रहात असत. त्याबद्दल बरीच माहिती श्री. गद्रे देतात. त्या घराच्या मागच्याच अंगास एक मोठा वटवृक्ष

आजही आहे. त्या झाडावर घुबडें बसत असत, आणि त्या घटनेमुळें "घुबड" काव्य त्यानीं त्या घरांत व त्या गावांत लिहिलें अशी माहिती श्री. कुलकर्णी यानीं दिली. मी दि. २० डिसेंबर १९६५ चे सुमारास फैजपूर येथें गेलों असतांना तेथील म्युनिसिपल हायस्कूलचे हेडमास्तर श्री. चौधरी भेटले होते. याच चौधरी घराण्यातील पुरुषांचा व केशवसुतांचा बरा संबंध आलेला होता. याशिवाय श्री. विष्णु सोनु कुलकर्णी यांची माझी चांगली ओळख झाली. ते सध्यां श्री समर्थ छापखान्याचे मालक असून ६० वर्षें उलटून गेलेले गांवांतील एक प्रतिष्ठित नागरिक आहेत-यांचेच वडील केशवसुतांच्याच वयाचे, सोनुतात्या कुलकर्णी, त्यांचा जन्म १८६५ मध्यें झाला व मृत्यु १९४७ मध्यें झाला. सोनुतात्या ही त्यावेळीं फार मोठी असामी होती. त्यानींच सध्यांची हायस्कूलची इमारत बांधली.

फैजपूरांत असतांनाच ते त्याकाळीं S. T. C. सारखी शिक्षणशास्त्राची जी कोणती परीक्षा होती ती चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाले. मागच्या प्रकरणाच्या शेवटीं ते धारवाडास कां व कसे गेले याची तर्काचे आधारें जी माहिती दिली आहे तशाच स्वरुपाचा दुसरा तर्क पहा—श्री. गद्रे हे धारवाड येथून बदली होऊन फैजपुरास आले होते. धारवाडचे हेडमास्तर श्री. जठार यांची व त्यांची ओळख असावी, त्या शाळेच्या गरजेमुळें ही गद्रे यांचे मध्यस्तीमुळेंही केशवसुत धारवाडास जाणें जास्त स्वाभाविक दिसतें.

फैजपूरची वस्ती आहे चांगली दहा हजारांचे वरच, कांहीं घरें दुमजली आहेत. गावांस नदीतून ओढयांतून जावें यावें लागतें, त्या ओढयाच्या एका कडेला गांव आहे. पाण्याकरितां गावांत १०–१२ आड असून आज त्यांवर इंजिनें पंप बसवलेले आहेत. टाक्यांमधून पाणी साठवून ठेवतात आणि टाक्यांतून तें लोकांस मिळतें. भडगांवच्या मानानें गांव फार रुक्ष आणि गलिच्छ वाटला; त्याचा परिणामही केशसुतांचें मनावर झालेला, त्यांचे काव्य – रचनेंत आढळतो, मला. पण त्याबद्दल थोडया वेळाने लिहितों.

याच गावांत त्यानीं कांहीं सामाजिक कार्य केल्यासारखें दिसतें. एक सहकारी कापडाचें दुकान, आर्य वाचन मंदिर म्हणून एक वाचनालयच काढणें. हीं कामें त्यानी ग्रामस्थांचे मदतीनें केलेलीं दिसतात. कांहीं ग्रामस्थांबरोबर सावद्यास "सौभद्र" नाटक पहावयास गेल्याचें श्री. गद्रे सांगतात. १९०१ सालानंतर एडवर्ड बादशहा गादीवर आल्यावर भरलेल्या दरबाराकरितां संवाद, पद्यें वगैरे केशवसुतांना बसवून द्यावीं लागलीं !

रविवारीं ते मुलांना घेऊन सोप्यावर गप्पा मारीत बसत; इतर चार मंडळींबरोबर पत्ते खेळत. त्यांचें त्यांच्या सामान्य अशा दिसणाऱ्या पत्नीवर फार प्रेम होतें तें कुटुंब फार सुखानें नांदत होतें अशी माहिती श्री. गद्रे देतात.

तरीही केशवसुत मनानें कष्टीच असतील, असंतुष्टच असतील असें मला निश्चयपूर्वक वाटतें, पुण्या-मुंबईच्या मानानें भडगांव कुग्रामच, आणि फैजपूर तर विशेषच वाईट. अशा गावांत कष्टानें दिवस काढण्यांत त्यांच्या रसिक अशा कवि-मनाला कोणता आनंद होणार? मित्र, रसिक, विद्वान मंडळीचा समागम नाहीं, ग्रंथरूप मित्रही नाहींत, निसर्गाची सोबत नाहीं! लोक एकूण आडाणी, साध्या स्वभावाचे. शाळा ४ इयत्तांची, त्यांतील विद्यार्थ्यांची ताकद काय, आणि शिकवण्याचा आनंद तरी काय लुटावयाचा? अशी एकूण परिस्थिति अत्यंत निराशाजनक असली पाहिजे. तेव्हां या काळांत त्यांनीं फारसें काव्य रचलें नाहीं यांत मला कांहींच नवल वाटत नाहीं. आणि याच पार्श्वभूमिवर त्यांनीं सुरुवातीलाच "आम्ही कोण" हें अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें कवि, चित्रकला, गायक, सामान्यतः कोणताही कलावंत कां कसा जगतो, त्याची शक्ति केवढी मोठी, अतर्क्य व अमर्याद असते तें सांगितलें आहे. या काव्याचें लेखन २९-११-१९०१ रोजीं संपलेलें दिसतें, आणि हें काव्य फार थोर दर्जाचें, एका प्रकारें अमर काव्य आहे. या काव्याचें कै. कुसुमावतीबाई देशपांडे यानीं केलेल्या रसग्रहणावर मी म्हणतों कोणी अरसिक टीकाकारांनीं हल्ला चढवलेला असून आम्हीं म्हणजे सामान्य कलावंत हा अर्थ त्यानीं (कुसुमावती बाईंनीं) ओढून ताणून आणला आहे. बसवला आहे असें त्यांचें म्हणणें. केशवसुतांनीं कवि, सृष्टि, कलावन्त यांच्या जीवनाविषयी ध्येयांविषयीं पुष्कळ उच्च आणि कमीत कमी ३।४ ठिकाणीं स्पष्टपणांनें लिहून ठेवलेलें आहे. या अरसिक टीकाकारांस मी केशवसुतांच्या "क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास" व "आम्हीं कोण" हीं काव्यें बरोबरीनें वाचा, या दुसऱ्या काव्यावरची केशवसुतांनीं स्वतःच लिहिलेली टीप बारकाईनें वाचा, आणि काव्यें समजून घ्या अशी शिफारस करतों. आणि यानंतरही "आम्ही" चा अर्थ त्यांस कळला नाहीं तर मग त्यांची कींवच करणें बरें!

मागें भडगांवच्या आप्पा (केशवसुत) यांच्या जीवनाबद्दल लिहीत असतांना त्यांच्या प्रेमविषयक काव्यांबद्दल मी माझा तर्क विशद केला आहे थोडासा, त्यांत तीं काव्यें केवळ अशरीरी प्रेयसीबद्दल तीं नसतील, त्याचप्रमाणें तीं केवळ काव्यदेवता, शारदा, हिलाच उद्देशून आहेत असा जो एक Puritan–शुद्ध नीतिमत्तादर्शक विचार त्यांचे धाकटे बंधु सीतारामपंत व त्यांचे पुतण्ये परशु-

रामपंत यानीं पुरस्कारलेला आहे त्यांचेहून निराळा जो विचार मांडला, म्हणजे मुंबईत येथल्या जीवनांत केशवसुतांस कोणीतरी एखादी अप्राप्य स्त्री भेटली असेल, दिसली असेल, व तिच्यावर ते दुरूनच प्रेम करीत असावेत असा जो एक विचार मांडला होता ( पहा पृ. ७७ ते ८० वर ) त्याला पुष्टिदायक अशी काव्यरचना या फैजपूरच्या वास्तव्यांत भरपूर प्रमाणांत आढळते. फैजपूरच्या वास्तव्यांतील माझ्या मतानें "आम्ही कोण" ही त्यांची पहिलीच कविता कलावंतांच्या जीवनाचें ध्येय, Mission, जीवित कार्य स्पष्ट करून सांगणारी, त्याचें सामाजिक स्थान या नात्याने असणारी महत्तमता वर्णन करणारी कविता सोडली तर इतर कवितांकडे पहा. "घुबड" मध्यें ही प्रेमनिराशेचीच छटा आढळते. फैजपूरच्या लोकांनी मला तें 'ऐतिहासिक' वडाचें झाड ( घुबडांचें वसतिस्थान ) दाखवलें. पण मूळ काव्यांत कलावन्तांच्या सामान्य नियमाप्रमाणें त्या झाडाचें Photographic वर्णन अगदीं सत्य, यथातथ्य दर्शन न करतां त्यास 'चिंचेचें' झाड बनवलें आहे, ११ व्या ओळींत "दयितानिधन" असा शद्ब प्रयोग त्यानीं केलेला आहे. आणि पुढें तर ते अतिव्यथित अंतःकरणानें काय लिहितात पहा :–

ओढवलें कीं अदृष्ट हाय ?
गुणरूपवती प्रिया निमाली ! झालें सारें निस्सार!

याच काव्यांतलें पाचवें कडवें फारच स्पष्टपणानें माझ्या तर्कास पुष्टी देत आहे; पहा–

"हे अप्रतिमे ! प्रिये, प्रियतमे !
तुजवीण जिणें निर्माल्य गमे !
अहह ! वेढिलें असें मज तमें !
मरून तर मी, जेथ वसे ती दिवंगता दिव्याकार,
तेथ पूजिली सुरांगनांनीं
पाहिन काय न सखी स्वनयनीं?"
"ऊंहूं – ऊंहूं !" बोले निष्ठुर त्या घुबडाचा धूत्कार !

माझ्या प्रियेची आठवण देण्यास जर नरकांतही माझी स्मरण शक्ति समर्थ होणार नसेल तर त्या घुबडास ते त्याची निर्भर्त्सना करून सांगतात–

"डाग न देईं मम दुःखावर,
काळें कर तूं येथुन सत्वर ?"
"घू घू ! ऊं हूं !" दे प्रत्युत्तर त्या अधमाचा धूत्कार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........

आणि शेवटीं ते सांगतात–

"भूतें नाचती भयानकपणें ! – चित्तीं उपजविती घोर !
नैराश्यें मज पुरें घेरिलें।
खिडकी पुढुनी घुबड न हाले।
घू घू ! घू घू ! चाले त्याचा घूघू भीषण घूत्कार !

हें काव्य प्रेमनिराशेचें अगदीं स्पष्ट चित्र असून त्यानीं तें १२ डिसेंबर १९०१ रोजीं पूरें केलेलें दिसतें. त्यांची या काव्यावरची टीप पहा– "एडगर पो याच्या "रेव्हन" या अप्रतिम काव्याची मुख्य कल्पना या चुटक्याच्या आधारास घेतली आहे." मूळ काव्य मी वाचलेलें आहे. आप्पा या काव्यास "चुटका" म्हणतात. आणि मूळ Raven हें काव्य आधार आहे असें सांगतात. माझे मतानें हें काव्य म्हणजे फार मोठा स्वानुभव असून यांतले "घुबड" नुसतेंच अशुभ-दायक घुबड नसून भीषण, प्रतिकूल, परिस्थिति याचें प्रतीक होय.

यानंतर थोड्याच दिवसांत, म्हणजे १५ व १६ डिसेंबर या लागोपाठच्या दोन दिवसांत त्यानीं एकाच विषयावर दोन पाठांतरें असणारीं "वियुक्ताचा उद्-गार" हें शीर्षक आढळणारीं जीं दोन सुनीतें (Sonnets) रचलीं आहेत त्यांत ही हीच हृदयव्यथा सांगितली असून त्यांचे शेवट पहा कसे आहेत ते–

धिक्कारीं मज मीच, ज्यास तुजला कष्टांत या लोटवे!
हीं युग्में बघतां, सखे ! विरह हा दे दुःख मातें दुणें !

आणि

त्यायोगें विरहाग्नि फार भडके ! – होतें नकोसें जिणें;
आतां हाय ! न राहवे तुजविणें, कैसें करूं गे सये!"

पुढच्याच २९ डिसेंबर १९०१ ही तारीख असलेल्या "स्मरण आणि उत्कण्ठा" या सुनीतांतही तीच व्यथा, तोच विषय असून त्या सुनीताचा शेवटही पहा, असाच आहे–

घेई ध्यास तुझा म्हणून मज दे निद्रा गडे सोडुनी,
तेणें दुर्लभ गे तुझें अहह ! तें स्वप्नांतही दर्शन !

जीवनांत ऐहिक सुख मिळत नाहीं, एवढी जीवापाड मेहनत घेऊन रक्त आटवून काव्य रचना करतों त्यास मान्यता नाहीं, प्रसिद्धीही पुरेशी नाहीं, विद्वा-नांत पुरेशी रसिकताही आढळत नाहीं, दैवगतिमुळें, प्लेगमुळें फैजपूर सारख्या भिकारड्या गावांत, भिकार शाळेंत, इंग्रजी ४ थी पर्यंतच्या बिचाऱ्या अज्ञान

मुलांपुढें आपल्या विद्वत्तेचा प्रकाश पाडावयास पुरेशी संधि नाहीं, अशा मन:स्थिती-मध्यें त्यांचें लक्ष मोरोपंतांच्या पंडिती काव्यरचनेकडे, महाकाव्य रचनेकडे लागलें असल्यास नवल वाटत नाहीं. याबाबतींत मला अशा समान मन:स्थितीमध्यें (मित्र मि. हॅलाम याचा मृत्यु) १८३२–३३ सालीं सापडलेल्या लॉर्ड टेनिसन या कवीची आठवण येते. त्यानें ज्याप्रमाणें त्या दु:खद घटनेचा आधार घेऊन १८५० पर्यंत फुटकळ रचना करीत करीत शेवटीं " In Memorium " हा आपला अमर ग्रंथ रचिला, फुटकळ गीतांचे संकलन केलें, त्याप्रमाणें एखाद्या महाकाव्याच्या आकार केशवसुतांच्या मनांत आला असेल, आणि त्यानी " कचाप्रत देवयानी " व " राजा शांतनु " हीं प्रकरणें निवडलीं, चांगल्या सुरेख आर्या रचल्या. पण त्यांचे विरह-व्याकुल मन त्यांस मोकळें थोडेंच सोडतें आहे ! जीं हीं प्रकरणें त्यांचे हातून लिहिलीं गेलीं त्याचा तरी विषय कोणता आहे ? प्रेमभंग, प्रेयसी न मिळणें हाच नाहीं काय! प्रेमभंग, प्रेमनिराशा, किंवा जीवनांतील निराशा हा फैजपूरच्या त्यांच्या वास्तव्यांत त्यांचे मनाचा स्थायी भाव दिसतो.

त्यांच्या " फिर्याद " या कवितेवर एके काळीं ती कविता प्रख्यात आंग्ल कवि Keats याचे La Belle Dame Sans Merci या प्रख्यत कवितेचें रुपांतर आहे असें बोललेलें मी ऐकलें होतें; आणि त्यावर एक निबंध लिहून १९३१ त पुण्यांत प्रसिद्ध होणाऱ्या एका अल्पायुषी मासिकांत (मी आतां त्याचें नांव विसरलों.) प्रो. ज. नी. कर्वे यांचे कृपेमुळें तो छापूनही आला होता. " फिर्याद " चे खालीं " ती " म्हणजे " कविता " देवी या अर्थाची टीप सी. के. दामल्यांनीं दिलेली आहे. हें काव्य लक्षपूर्वक वाचल्यावर ही टीप खरी असेल असा वाचकाचे मनाचा कल होवूं शकतो. या टीपेचा मागोवा घेत १८९८ त लिहिली गेली "मनोहारिणी" कविता वाचल्यास तिची संगती लागते. आणि मी सुचवलेला बिचार, प्रधान विचार धरुन, " मनोहारिणी " हें काव्य काळजीपूर्वक वाचल्यास, तोही खरा असावा असें पटं लागेल, लागतें!

फैजपूरच्या वास्तव्यांतच त्यांची आई त्यांचेवर प्रेम करणारी, व ते जिच्यावर निस्सीम प्रेम, विशेषत: वडिलांच्या मृत्युनंतर १८९३ नंतर जास्तच प्रेम करीत असत, ती आई १९०२ मध्यें दिवाळीचे सुमाराम निवर्तली. त्यावेळीं तिची स्मृति जागृत ठेवणारी अशी जी शोकपर कविता त्यानीं रचिली तिचा साधेपणा आणि तितकीच श्रेष्ठ विव्हलता जाणवेल अशी तिची रचना आहे. या अशा दु:खपूर्ण मनस्थितिमध्यें उज्जयिनी येथें त्यानीं स्वत:चा फोटो काढून घेण्यास नकार कां दिला असेल, त्याची मीमांसा आतां सहृदय वाचकास सहज होवूं शकेल;

निदान मी त्यांची त्याकाळची मनःस्थिति कल्पनेनें जाणूं शकतों, व फोटो न काढण्याचा त्यांचा आग्रह समजूं शकतों. धाकटा भाऊ मोरू तिला अखेरच्या दिवसांत सुखी ठेवूं शकला, तिला त्यानें कांहीं मोठ्या यात्रा घडवल्या, त्यानें मातृऋण थोडें तरी फेडलें, आणि आपण तें कांहींच फेडूं शकलों नाहीं याची तीव्र बोंच पहा –

मदपराध घालुनियां –
पोटीं, नुरलें कोणी प्रेम करायातें !
अन्तरले पाय तुझे हाय हाय माते !

एका प्रकारें फैजपूरचें त्यांचें वास्तव्य श्री. गद्रे यांस जरी समाधानाचें दिसलें असलें तरी माझ्या कल्पनाशक्तीला तें तसें दिसत नाहीं. त्यांचें फैजपुरांतील जीवन पुष्कळसें दुःखपूर्ण, निराशाजनक गेलें असावें. त्यांत समाधान मानण्यासारखी घटना घडली असेल तर ती त्यांची शिक्षक या नात्यानें पास झालेली परीक्षा, व चांगला शिक्षक म्हणून झालेली कीर्ति होय. याच गांवात त्यांस ३ ऱ्या कन्येचा, सुमन हिचा लाभ झाला. त्यानीं आपल्या कन्यांची नांवें मनोरमा, वत्सला व सुमन अशीं ठेवलेलीं दिसतात, त्या काळांत हीं Romantic असतील कदाचित्; निदान त्यांच्या कविमनानें, इतर नातेवाईकांच्या आहारीं जावून मुलींचीं अगदींच गचाळ, नांवें त्यानीं ठेवलेलीं नव्हतीं.

केशवसुतांस, त्यांच्या आत्म्यास, त्यांचे काव्यशक्तीबद्दल एका प्रकारचा आत्मप्रत्यय येत चालला होता. "आम्ही कोण" मध्ये वर्णिलेलें कविचें भव्य ध्येय आपण थोडेंफार गाठत चाललों आहोंत, काव्य देवीनें आपणांस अगदींच उपेक्षित ठेवलेलें नाहीं तर आपल्यास "बन्धु" म्हटलें आहे. व ती देवता आपली भगिनी झाली आहे असा प्रत्यय त्यांस वाटत असावा, नाहीं वाटत होताच. त्यांची "दूर कोठें एकला जावुनीयां" ही दि. २७ ऑगस्ट १९०३ रोजीं पूर्ण झालेली कविता पहा –

अहा! अद्‌भुत तें काय एक झालें –
"धन्य बन्धो!" हे शब्द वरुनि आले !
वरी बघतां तारका उंच आहे,
सदय सस्मित मजकडे वरुनि पाहे !
"कवे ! बन्धो!" ती वदे नभांतून –
"तुझीं गीतें परिसून मी प्रसन्न !
स्वसा आतांपासून समज मातें,
बन्धु माझा तूं –मंगल हें नातें!"

यावर कवींनें जेव्हां " माझिया तर जीवितीं तिमिर सारें " असें म्हटलें तेव्हां तिनें उत्तर दिलें.

" नको ऐसें रे वदूं बन्धुराया ! "
म्हणुनि लागे ती मला आश्वसाया –
" तुझ्या दिव्यत्वापुढें जग भिकारी
कासया ही खिन्नता – दूर सारी ! "

या काव्याचा आणि एकाप्रकारें आपल्या काव्य जीवनाचा त्यानीं केलेला शेवट मोठा हृद्य नव्हे काय ? ते पुढें लिहितात –

अशा भगिनीचा लाभ मला झाला;
खेद गेला, आनंद मनीं आला;
तिचा आभारी दुवा देत तीतें,
समाधानी मी पातलों घरातें।

प्रख्यात आंग्ल कवि R. L. Stevenson च्या Requiem मधील खालील ओळी पहा

Here he lies where he longed to be
Home is the sailor home from the sea
And the hunter home from the hill

या दोन उताऱ्यांतील साम्य अगदीं उघड व स्पष्ट आहे.

एका प्रकारें फैजपूराहून त्यांस धारवाडास जावयाची संधि मिळाली ही माझे मतानें इष्टापत्तिच होय. ते धारवाडास कां व कसे गेले असतील याविषयीं दोन तर्क एक मागच्या प्रकरणाचे शेवटीं शेवटीं, व दुसरा या चालू प्रकरणांत दिला आहे. कोणताही खरा असो ( आतां दुसरा जास्त बरोबर असावा असें वाटतें.) ते धारवाडला १९०४ मध्यें बहुधा जूनमध्यें गेले. आणि जातांना वाटेंत त्यांची भाची त्यावेळची सौ. तापूबाई दीक्षित ( विश्रामबागवाड्या शेजारीं राहणाऱ्या त्यावेळच्या तरुण, श्रीमंत, अनंतराव दीक्षित यांच्या पत्नी ) यांचेकडे सहकुटुंब १।२ दिवस राहिले होते, आणि त्यानंतर ते पुढें धारवाडला गेले. ही माहिती आतां श्री. तापूताई दीक्षित, यानीं अलीकडे मला दिली. मुंबईस असतांना ते ज्या बहिणीच्या शेजारीं, जवळपास, राहत असत म्हणून माहिती दिली आहे. त्या सौ. पेठे यांच्या या कन्या. सौ. पेठे या मोरोपंतांच्या पाठीवर झालेली केसोपंतांची दुसरी मुलगी होय.

# धारवाड व अखेर.

भोवतालच्या परिस्थतीचा मनुष्यजीवनावर, त्याचे मनावर निश्चितपणें बरावाईट परिणाम घडत असतो. मला वाटतें फैजपूर सुटून एकाप्रकारें धारवाडच्या थोडया Hill-station सारखी वस्ती व थंड आणि सुखकारक हवामान या गोष्टींचा आप्पांचे वर कांहींतरी चांगला परिणाम झाला असलाच पाहिजे. धारवाडास ते फार तर १।। वर्षे (२ वर्षांच्या आतच, असा काळ राहिले. त्या अवधीमध्यें त्यांनीं फारच अल्प काव्य रचना केलेली आढळते, "कांहीं स्वकृत वचनें", "प्रतिभा". 'गोफण", ही रचना धारवाडची असून प्रख्यात "हरपलें श्रेय" हें काव्य १९०५च्या मे मध्यें चिपळूणास पूर्ण केलेलें आहे. शेवटचा अभंग "तुझें नाम मुखीं" हा बहुधा धारवाडास सुट्टीनंतर परत आल्यावर रचलेला आहे. या सर्व काव्या-मध्यें "हरपलें श्रेय" व शेवटचा अभंग हीं काव्यें अध्यात्मवादी हिंदु कवीच्या भावना दर्शवतो, असें मी निःशंकपणानें म्हणतों. कारण याच काव्यांचे जोडीस "प्रतिभा" आणि "गोफण" किंवा "गोफण केली छान" या कविता काळजी-पूर्वक वाचल्यास त्यांचा काव्य-शक्तीतील जोम पूरेपूर कायम आहे, टवटवीत आहे, ताजाच आहे, असा प्रत्यय वाचकास यावयास पाहिजे. "प्रतिभा" काव्याचा शेवट

"देवांची जननी (प्रतिभा) प्रसन्न जर का ही शक्ति कोणावर,
नाहीं यांत विशेष, तुच्छ जग हें त्यालागुनी वाटतें !

ही रचना धारवाड येथें २८ जुलै १९०५रोजीं पूर्ण केलेली आहे.याच काव्यरचनेशीं मागच्या प्रकरणाच्या अखेरी-अखेरीस "दूर कोठें एकला जावुनियां" च्या शेवटच्या ओळी दिल्या आहेत. त्या पहा –

तुझ्या दिव्यत्वापुढें जग भिकारी
कासया ही खिन्नता दूर सारी !

अशा प्रकारच्या विलक्षण आशादायक पंक्ति त्यांनी रचलेल्या आहेत. तेव्हां शेवटच्या अभंगातील –

" भिकार या जगीं, इच्छित न मिळे कांहीं
म्हणुनी तुझे पायीं भिक्षांदेहि
केशवसुत म्हणे देवा दीन नाथा
तुझे पायीं माथा वाहियेला! "

हा भाव त्यांचा त्या काळचा स्थायी भाव होता, ते जगास विटले होते, जगण्यांत कांहीच राम नाहीं, आतां आपला अंत झाला तर बरें अशा प्रकारची मनःस्थिति त्यांची झाली असावी असें मला बिलकूल वाटत नाहीं. हरपलें श्रेय गवसत नसलें म्हणून ते जरी मधून मधून जीव पाखडीत असले तरी देखील त्यांची जीवन-श्रद्धा, त्यांचे कविविषयक Mission किंवा ध्येयाविषयीची त्यांची आसक्ति, दिवसेंदिवस स्वतःचे काव्यशक्तिबद्दल आत्मप्रत्यय, आत्मविश्वास वाटत असल्यामुळें वाढतच असावी; आणि त्यांची महत्त्वाकांक्षा पल्लवित झालेली असावी असाच माझा तर्क आहे. १८९३मधला " तुतारी " या शंभर ओळींच्या काव्य रचनेचे वेळचा जोर " गोफण " या १९०४ मधल्या केवळ २८ ओळींच्या काव्यांत मुळींच कमी झालेला नसून तो जोर, तो त्वेष उलट वाढलेला आहे! " तुतारीस " लोक डोक्यावर घेऊन नाचले आहेत पण त्या मानानें उपेक्षित अशा " गोफण" मध्यें "हाणाहाण" करण्याची प्रवृत्ति, माझ्या मतानें तुतारी मधील जोरापेक्षांही जास्त जोरकसच आहे. ही कविता थोडी आटोपशीर, लहान आहे एवढेंच ; पण यांत हीन प्रकारच्या सामाजिक प्रवृत्तींचें वैर करण्याची शक्ति, आणि धोंड्यांची हाणाहाण करुन त्या सामाजिक अपप्रवृत्ति वेस्तनाबूद करण्याची त्यांची उत्कंठा वाखाणण्या सारखी स्पृहणीयच आहे. फैजपूरांत ते कदाचित् जीवनास कंटाळले असतील; पण धारवाडच्या वातावरणामुळें पुनः महत्वाकांक्षी बनले असावेत.

भास्करराव जठार, हेडमास्तर हे त्या काळीं देसाई गल्लीमध्यें (धारवाड) रहात असत. त्याच गल्लींत समोरच्या अंगास सध्यां श्री.लक्ष्मेश्वर वकील राहतात, त्या त्यांच्या ( सध्यां हे मालक आहेत ) घरांत केशवसुत राहत असें कळलें. म्हणून तें घर पाहण्यास मी व सध्यां कर्नाटक कॉलेजांतील मराठीचे विद्वान् प्राध्यापक श्री. पंडीत आवळीकर गेलों होतों. दिवस होते एप्रिल १९६६ च्या सुरुवातींचे. श्री. लक्ष्मेश्वर वकीलांनीं घराचा फक्त पुढचा दर्शनी भाग जुना आहे, आणि आंतला सर्वच भाग बदललेला आहे, अशी माहिती दिली. त्यानीं कांहीं जुने कागदपत्र काढून त्या मोडतोडीस खर्च किती आला, वगैरे बरीच जुनी माहिती देखील काढून वाचून

दाखवली पण ती अप्रस्तुत म्हणून घेतली नाहीं उतरून. दुसरें एक कारण म्हणजे त्याच घरांत आप्पा धारवाडांत असतांना राहत असत ही माहिती पुरेशी खात्रीची नव्हती. श्री. भास्करराव जठार, हेडमास्तर, यांचे चिरंजीव श्री. शंकरराव जठार ॲडव्होकेट, सुप्रीम कोर्ट, मुंबई यांचे माहितीप्रमाणें (हे १९०४–५ सालीं आप्पांच्या वर्गांत शिकत होते ) तेव्हांचे श्री हेर्लेकर वकील यांचे घरासमोरच्या अंगास एका चाळींत त्यांचें बिऱ्हाड होतें. आज हें, श्री हेर्लेकर यांचे घर, पुष्कळ शाबूत असून तेथें श्री. सबनीस वकील, एक वृद्ध गृहस्थ, राहतात. तें घर लाइन बाजार भागांत आहे. श्री. सबनीस यानीं तें श्री. हेर्लेकर यांचेकडून विकत घेतलें. पण त्या भागांतील समोरचे अंगाम असलेली चाळ आज नामशेष झालेली आहे! त्यामुळें केशवसुतांचें धारवाडचें राहतें घर पाहण्याची इच्छा नष्ट झाली; एक संभाव्य घर,त्याचा नुसता पुढचा भाग फक्त, पहावयास मिळाला.

या धारवाडच्या आप्पांच्या जीवनाविषयीं माहिती देखील " केशवसुत स्मृतिग्रंथ" मध्यें श्री दत्तोपंत केतकर यानी थोडीफार दिली असून ते शंकरराव जठारांचे वर्गबंधु होते. श्री. केतकर आज निधन पावलेले आहेत. श्री. शंकरराव आपल्या पत्रात ( दि. २९ मार्च ६६ च्या) लिहितात – " पगार केवळ रु. ३०।३५. अरेरे! गाढ विद्वत्तेची हेळसांड, अनास्था, अवहेलना, यापेक्षां जास्त ती काय असणार? तथापि उकिरड्यांतल्या रत्नाप्रमाणें. या पण अनिष्ट परिस्थितींत केवढें त्याचें तेज चमकत होतें! चेहऱ्यावर जणूं काय रुबाब व विद्वत्तेचें तेजोवलयच चमकत होतें! ... " झपूर्झा " च्या माझ्या पुसट आठवणी पहा. दुपारीं शाळेला १ ते २ सुटी. त्या काळांत हेडमास्तरांखेरीज इतर सर्व मास्तरांचा " टी " क्लब असे. यांत चहा होई. Actually दामले मास्तर चहा घेत कीं नाहीं माहीत नाहीं. बहुतेक घेत नसावेत. तेथें नुकतेच त्यावेळीं प्रसिद्ध झालेल्या "झपूर्झा" काव्याची टिंगल होई. विशेषतः मणेरीकर ड्रॉइंग मास्तर व कट्टी हे चौथीचे मास्तर, परांजपे तालीम मास्तर हे त्यांत प्रामुख्यानें असत. टिंगल झाली तरी त्यांत Malice किंवा द्वेषबुद्धि नसे. खरें म्हणजे तो सर्व प्रकार एकीकडे गाढ विद्वत्ता व दुसरीकडे तितकेंच गाढ अज्ञान यांमधली रस्सीखेंच ! असें असून दामले मास्तर समुद्राप्रमाणें शांत ... " त्यांचे मृत्युविषयीं त्यानीं इंग्रजी वचन उद्धृत केले आंहे- "Whom Gods love die young " हेंच खरे."

धारवाडास भास्करराव.जठार, हेडमास्तर, (१९०५ चे) यांचेच नातू श्री. अशोक जठार यांचेकडे मी २।३ दिवस राहिलों! ते, त्यांचे एक स्नेही श्री. भागवत, कर्नाटक कवि, प्रा. द. रा. बेन्द्रे, ( यांस कोणी " कर्नाटक


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
........................ नों. दि: ..................

टागोर" म्हणतात ) आणि पूर्वी एकदां उल्लेख केलेले प्रो. पंडीत आवळीकर या जुन्या नव्या स्नेह्यांची मला फार मदत झाली. प्रो. बेन्द्रे यानीं मला हुबळीस पाठवलें, आणि तेथें माहिती मिळवण्याची पूर्व तयारी देखील त्यानीं केलेली होती! त्याप्रमाणें मी हुबळीस गेलों. पण ती हकीगत थोडी मागाहून लिहितों.

केशवसुत-स्मृति ग्रंथांत पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल मधील एक सेवानिवृत्त शिक्षक श्री. वि श्री. करंदीकर यानीं थोड्याच आटवणीं पृ. २४३ वर दिल्या आहेत. त्यावरून आप्पांचें एक स्नेही श्री. सदाशिव श्रीधर करंदीकर म्हणून पुण्यास New Preparatory Classes चालवणारे कोणी एक सद्गृहस्थ होते. त्यांच्या म्हणजे श्री. वि. श्री. करंदीकरांच्या आठवणीप्रमाणें आप्पांनी एक "भवानी तलवार " नांवाचें प्रदीर्घ काव्य रचलेलें होतें. तें Revolutionary असल्यामुळें प्रसिद्ध झालें नाहीं, त्यानीं करंदीकरांचे जवळ (मित्राजवळ) सुरक्षित ठेवण्यास दिलें नाहीं, आणि आतां तें उपलब्ध नाहीं. तें मिळालें असतें तर बहार झाली असती. त्यांच्या दुसऱ्या एका आठवणीप्रमाणें त्यांच्या बंधूंच्या मुलांनीं त्यांच्या कांहीं कविता फाडल्या; तेव्हां " जाना दो ", आपण याहून सरस कविता लिहूं " असे उद्गार त्यानीं १८९९ मध्यें काढले होते असें करंदीकर लिहितात. पण जर ही केशवसुतांची व त्यांचे बंधूंची भेट १९०४ मधील,ते धारवाडास जातांना वाटेत पुण्यास गेले असतांनाची असेल, तर या शब्दांस एकदम निराळाच अर्थ प्राप्त होईल. माझे स्वतःचे मतानें त्यांच्या काव्य निर्मितिच्या दृष्टीनें धारवाडचा कालखंड हा सकृद्दर्शनीं जरी निष्क्रिय भासला, तरी तो थोडी विश्रांति घेऊन पुष्कळ भरीव काव्यरचना करण्याचा ठरला असता. मानसशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें तर तो त्यांचा काव्य-रचनेंतील Plateau Period (ते पुढच्या मोठ्या कार्याची तयारी करीत होते. )होता. पण आतां हे नुसते तर्कच करावयाचे.

धारवाडचें त्यांचें जीवन माझ्या मताने थोडें सुखाचें झालें असेल. कारण १९०५ च्या मे मध्यें ते मुद्दाम कोकणांतील चिपळूण पर्यंतचा बहुधा सहकुटुंब सहपरिवार प्रवास करूं शकले होते. पण ही गोष्ट त्याकाळीं त्यांस जे रुपये ४० दरमहा पगार मिळत होता, त्यांत शक्य होती. पुणे–मुंबई रेल्से तिकीट १९१३ मध्यें केवळ दीड रुपया होतें, पोस्टाचें कार्ड १ पैशास होतें, ही वस्तुस्थिती लक्षांत घेतल्यास शक्य दिसेल. आजच्या लोकांस हे दर म्हणजे " इतिहास "च, कल्पितच वाटायचे; पण ही सत्य गोष्ट होय. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे संसारोपयोगी मोठी मोठीं भांडीं, कळशांपैकीं २।३ भांडीं, त्यांचें कृ. के. दा. हीं अद्याक्षरें असलेलीं मी पुण्यास आमच्या बिऱ्हाडीं पाहिलेलीं होतीं. त्यांचा संसार चांगला चालला होता. त्यांस ददात नव्हती; कर्ज तर नव्हतेंच, पण थोडी शिल्लक ही असेल. पण

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
... ...................... नोंद दि: ..................

ती किती काय, तें माहीत नाहीं. तो तपशिल कदाचित् कै. प. चि. दामले यांचेकडील जुन्या कागदांत सांपडावा.

१८९८ मध्यें लिहिलेल्या "फारा दिवसांनीं भेट" या काव्यांतली शेवटच्या ओळींत वर्णन केलेली घटना जवळ येत चालली होती. १९०५ मधील दिवाळी जवळ आली. त्यांचे चलत चुलते श्री. हरी सदाशिव दामले, वयानें त्यांचे साधारण बरोबरीचे किंवा २।४ वर्षांनीं मोठे असे हुबळीस प्राथमिक शाळा शिक्षक होते. त्यानींच त्या गांवीं मुलींची मराठी प्राथमिक शाळा स्थापन केली. त्यांचेकडे दिवाळी करितां ते सहकुटुंब हुबळीस गेले. हुबळीस तसें म्हटलें तर प्लेग जोराचा नसावा. तसें असतें तर हुबळीस शाळांस सुट्टी झाली असती, गांव रिकामा झाला असता, पण दिवाळी नंतर तो थोडा-थोडा सुरु झाला असेल. आणि नेमका आप्पांस व त्यांची पत्नी सौ. रुक्मिणीकाकू यांस झाला असावा. आप्पा यांस दि. ७ नोव्हेंबर रोजीं देवाज्ञा झाली, तर रुक्मिणी काकू दि. १६ नोव्हेंबर रोजीं कालवश झाली ! या तारखा हुबळी म्युनिसिपालिटीच्या रेकॉर्डमधून मला श्री. रा. द. बिवलकर नूतन परिचित स्नेही, यांचे कडून त्यांचे दि १४–४–६६ च्या पत्रावरुन कळल्या. हे मृत्यु गणेशपेठ, विजापूरकर यांचा वाडा, येथें घडले. त्यांचे मृत्यूचे तारखेबद्दल खूप वादविवाद झाले. तो. कै. सी. के. दामले यानी दिनांक २–११–६६ ही तारीख सांगितली, प्रसिद्ध केली, आणि केशवसुत भक्त श्री. गर्गे किंवा "दिवाकर" यानीं पुष्कळ शोध केला, कै. प. चि. दामले यानीं जुनीं पत्रें हुडकलीं, आणि त्यांचे आधारानें, पत्रव्यवहारानें दि. ७ ही तारीख नक्की केली. त्याच काळांत ७ नोव्हेंबर १९२२ रोजीं कै. सी. के. दामले हे मुळशी सत्याग्रहांत शिक्षा भोगून येरवड्याचे कारावासांतून त्याच दिवशी सकाळीं सुटून आले होते. आणि सायंकाळच्या पुण्यतिथीच्या सभेंत त्यानीं पुनः मृत्युतिथी २ नोव्हेंबर ही सांगितली. त्या सभेंत त्या काळचे पुण्याच्या न्यू पूना कॉलेजमधील एक प्रोफेसर व पुण्याच्याच नूतन मराठी विद्यालयाचे प्रमुख श्री. रा. प. सबनीस यांचे वडील परशुरामपत सबनीस यांनीं "माझ्या रोजनिशी वरून त्यांची मृत्युतिथी ७ नोव्हेंबर आहे; कोणासही मी माझी रोजनिशी दाखवीन" अशी गम्मतीची माहिती जाहीर केली. ही त्यांची रोजनिशी पहावयास कोणकोणते केशवसुतभक्त त्यानंतर गेले तें कै. परशुरामपंत सबनीस यांसच माहीत ! मी मात्र जिज्ञासेमुळें त्यानंतर २।४ दिवसांतच गेलो होतों. आणि त्यांचे रोजनिशींत ते त्या दिवशीं म्हणजे ७ नोव्हेंबर १९०५ रोजीं केशवसुतांच्या स्मशानयात्रेस गेले होते असा स्पष्ट उल्लेख वाचला होता. त्या दिवशीं दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कार्तिकी एकादशी ही तिथी होती. मलाही फार मोलाची व महत्वाची माहिति वाटली, कारण कार्तिकी (महा) एकादशीचे दिवशीं निधन म्हणजे पुण्यकृत्य समजलें जातें एवढीच माझ्या आनंदाची, समाधानाची गोष्ट नव्हती; या माहितीचा उपयोग म्हणजे दुसऱ्या एका प्रकारें त्यांची मृत्युतिथी ७ नोव्हेंबर ही सिद्ध झाली हा आनंद होय. ती गम्मतीची हकीगत पहा. १९०६

टागोर" म्हणतात ) आणि पूर्वी एकदां उल्लेख केलेले प्रो. पंडीत आवळीकर या जुन्या नव्या स्नेह्यांची मला फार मदत झाली. प्रो. बेन्द्रे यानीं मला हुबळीस पाठवलें, आणि तेथें माहिती मिळवण्याची पूर्व तयारी देखील त्यानीं केलेली होती! त्याप्रमाणें मी हुबळीस गेलों. पण ती हकीगत थोडी मागाहून लिहितों.

केशवसुत-स्मृति ग्रंथांत पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल मधील एक सेवानिवृत्त शिक्षक श्री. वि श्री. करंदीकर यानीं थोड्याच आटवणीं पृ. २४३ वर दिल्या आहेत. त्यावरून आप्पांचें एक स्नेही श्री. सदाशिव श्रीधर करंदीकर म्हणून पुण्यास New Preparatory Classes चालवणारे कोणी एक सद्गृहस्थ होते. त्यांच्या म्हणजे श्री. वि. श्री. करंदीकरांच्या आठवणीप्रमाणें आप्पांनी एक "भवानी तलवार" नांवाचें प्रदीर्घ काव्य रचलेलें होतें. तें Revolutionary असल्यामुळें प्रसिद्ध झालें नाहीं, त्यानीं करंदीकरांचे जवळ (मित्राजवळ) सुरक्षित ठेवण्यास दिलें नाहीं, आणि आतां तें उपलब्ध नाहीं. तें मिळालें असतें तर बहार झाली असती. त्यांच्या दुसऱ्या एका आठवणीप्रमाणें त्यांच्या बंधूंच्या मुलांनीं त्यांच्या कांहीं कविता फाडल्या; तेव्हां "जाना दो", आपण याहून सरस कविता लिहूं" असे उद्गार त्यानीं १८९९ मध्यें काढले होते असें करंदीकर लिहितात. पण जर ही केशवसुतांची व त्यांचे बंधूंची भेट १९०४ मधील, ते धारवाडास जातांना वाटेत पुण्यास गेले असतांनाची असेल, तर या शब्दांस एकदम निराळाच अर्थ प्राप्त होईल. माझे स्वतःचे मतानें त्यांच्या काव्य निर्मितिच्या दृष्टीनें धारवाडचा कालखंड हा सकृद्दर्शनीं जरी निष्क्रिय भासला, तरी तो थोडी विश्रांति घेऊन पुष्कळ भरीव काव्यरचना करण्याचा ठरला असता. मानसशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें तर तो त्यांचा काव्य-रचनेंतील Plateau Period (ते पुढच्या मोठ्या कार्याची तयारी करीत होते. )होता. पण आतां हे नुसते तर्कच करावयाचे.

धारवाडचें त्यांचें जीवन माझ्या मताने थोडें सुखाचें झालें असेल. कारण १९०५ च्या मे मध्यें ते मुद्दाम कोकणांतील चिपळूण पर्यंतचा बहुधा सहकुटुंब सहपरिवार प्रवास करूं शकले होते. पण ही गोष्ट त्याकाळीं त्यांस जे रुपये ४० दरमहा पगार मिळत होता, त्यांत शक्य होती. पुणे–मुंबई रेल्से तिकीट १९१३ मध्यें केवळ दीड रुपया होतें, पोस्टाचें कार्ड १ पैशास होतें, ही वस्तुस्थिती लक्षांत घेतल्यास शक्य दिसेल. आजच्या लोकांस हे दर म्हणजे "इतिहास"च, कल्पितच वाटायचे; पण ही सत्य गोष्ट होय. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे संसारोपयोगी मोठी मोठीं भांडीं, कळशांपैकीं २।३ भांडीं, त्यांचें कृ. के. दा. हीं अद्याक्षरें असलेलीं मी पुण्यास आमच्या बिऱ्हाडीं पाहिलेलीं होतीं. त्यांचा संसार चांगला चालला होता. त्यांस ददात नव्हती; कर्ज तर नव्हतेंच, पण थोडी शिल्लक ही असेल. पण

श्री ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम................ वि: ..................
क्रमांक .................. नों. दि. ..................

ती किती काय, तें माहीत नाहीं. तो तपशिल कदाचित् कै. प. चिं. दामले यांचे-कडील जुन्या कागदांत सांपडावा.

१८९८ मध्यें लिहिलेल्या "फारा दिवसांनीं भेट" या काव्यांतली शेवटच्या ओळींत वर्णन केलेली घटना जवळ येत चालली होती. १९०५ मधील दिवाळी जवळ आली. त्यांचे चलत चुलते श्री. हरी सदाशिव दामले, वयानें त्यांचे साधारण बरोबरीचे किंवा २।४ वर्षांनीं मोठे असे हुबळीस प्राथमिक शाळा शिक्षक होते. त्यानींच त्या गांवीं मुलींची मराठी प्राथमिक शाळा स्थापन केली. त्यांचेकडे दिवाळी करितां ते सहकुटुंब हुबळीस गेले. हुबळीस तसें म्हटलें तर प्लेग जोराचा नसावा. तसें असतें तर हुबळीस शाळांस सुट्टी झाली असती, गांव रिकामा झाला असता, पण दिवाळी नंतर तो थोडा-थोडा सुरु झाला असेल. आणि नेमका आप्पांस व त्यांची पत्नी सौ. रुक्मिणीकाकू यांस झाला असावा. आप्पा यांस दि. ७ नोव्हेंबर रोजीं देवाज्ञा झाली, तर रुक्मिणी काकू दि. १६ नोव्हेंबर रोजीं कालवश झाली ! या तारखा हुबळी म्युनिसिपालिटीच्या रेकॉर्डमधून मला श्री. रा. द. बिवलकर नूतन परिचित स्नेही, यांचे कडून त्यांचे दि १४-४-६६ च्या पत्रा-वरून कळल्या. हे मृत्यु गणेशपेठ, विजापूरकर यांचा वाडा, येथें घडले. त्यांचे मृत्यूचे तारखेबद्दल खूप वादविवाद झाले. तां. कै. सी. के. दामले यानी दिनांक २-११-६६ ही तारीख सांगितली, प्रसिद्ध केली, आणि केशवसुत भक्त श्री. गर्गे किंवा "दिवाकर" यानीं पुष्कळ शोध केला, कै. प. चिं. दामले यानीं जुनीं पत्रें हुडकलीं, आणि त्यांचे आधारानें, पत्रव्यवहारानें दि. ७ ही तारीख नक्की केली. त्याच काळांत ७ नोव्हेंबर १९२२ रोजीं कै. सी. के. दामले हे मुळशी सत्याग्रहांत शिक्षा भोगून येरवड्याचे कारावासांतून त्याच दिवशी सकाळीं सुटून आले होते. आणि सायंकाळच्या पुण्यतिथीच्या सभेंत त्यानीं पुनः मृत्युतिथी २ नोव्हेंबर ही सांगितली. त्या सभेंत त्या काळचे पुण्याच्या न्यू पूना कॉलेजमधील एक प्रोफेसर व पुण्याच्याच नूतन मराठी विद्यालयाचे प्रमुख श्री. रा. प. सबनीस यांचे वडील परशुरामपत सबनीस यांनीं "माझ्या रोजनिशी वरून त्यांची मृत्युतिथी ७ नोव्हेंबर आहे; कोणासही मी माझी रोजनिशी दाखवीन" अशी गम्मतीची माहिती जाहीर केली. ही त्यांची रोजनिशी पहावयास कोणकोणते केशवसुतभक्त त्यानंतर गेले तें कै. परशुरामपंत सबनीस यांसच माहीत ! मी मात्र जिज्ञासेमुळें त्यानंतर २।४ दिवसांतच गेलो होतों. आणि त्यांचे रोजनिशींत ते त्या दिवशीं म्हणजे ७ नोव्हेंबर १९०५ रोजीं केशवसुतांच्या स्मशानयात्रेस गेले होते असा स्पष्ट उल्लेख वाचला होता. त्या दिवशीं दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कार्तिकी एकादशी ही तिथी होती. मलाही फार मोलाची व महत्वाची माहिती वाटली, कारण कार्तिकी (महा) एकादशीचे दिवशीं निधन म्हणजे पुण्यकृत्य समजलें जातें एवढीच माझ्या आनंदाची, समाधानाची गोष्ट नव्हती; या माहितीचा उपयोग म्हणजे दुसऱ्या एका प्रकारें त्यांची मृत्युतिथी ७ नोव्हेंबर ही सिद्ध झाली हा आनंद होय. ती गम्मतीची हकीगत पहा. १९०६

सालच्या कार्तिकी एकादशीचे दिवशीं उज्जयिनी येथें मोरोपंतांनीं त्यांचे बंधूचें वर्षश्राद्ध केलें, आणि त्याच दिवशीं, श्री. लक्ष्मीबाई दांडेकर किंवा काशी आत्याबाई यांच्या स्मरणाप्रमाणें आणि त्यानीं आम्हांस आमच्या ल्हाणपणींच १९१३-१४ सालांतच केव्हांतरी पुरवलेल्या माहितीप्रमाणें व बहिणीच्या पत्रिकेप्रमाणें, माझी बहीण श्री. रत्नप्रभा घारपुरे हिचा दुपारीं जन्म झाला होता! या गम्मतीदार घटनेच्या सांगडीमुळें दि. ७-११-१९०५ ही त्यांची मृत्युतिथी पक्की झाली होती, माझ्या मनांत... पण आतां तर श्री बिवलकर यांच्या कृपेमुळें हुबळी म्युनिसिपालिटीच्या शिक्याचें सर्टिफिकेटच मला मिळाले आहे! ⁂

मी हुबळीस गेलों तेव्हां डॉ. गोरे, डॉ. जोशी या दोन फार मोठ्या "गण्य" व्यक्तींस मी भेटावें असें मला प्रा. द. रा. बेंद्रे यानीं सांगितलें होतें. ("गण्य" हा श्री बेंद्रे यांचा शब्द.) त्याप्रमाणें मी दोन्ही डॉक्टर साहेबांस भेटलों. श्री. हरीकाका दामले यांचेबद्दल हुबळी गावांत आजही फार आदर आढळला त्यानीं मुलींची मराठी शाळा स्थापल्यामुळें त्या शाळेंत त्यांचे एक Enlargement लावावें अशी लोकांची इच्छा दिसली; व मी त्यांस शक्य तर त्यांचा लहानसा फोटो मिळवून देण्याचें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें त्यांचे नातवास पत्र पाठवून कळवलें देखील. हुबळीची मंडळी दि. ७-११-१९०५ रोजीं कै. हरीकाका दामले कोणत्या घरांत रहात होते या शोधांत होती, या बाबतींतही दोन घरें दाखवलीं जात! पैकीं एकाचे जागीं जुने कांहींच अवशेष नाहींत, दुसऱ्या जागीं कांहीं थोडा भाग आहे. तेव्हां ती जागा निश्चत करण्याकरितां ती मंडळीं म्युनिसिपालिटींत केशवसुतांच्या मृत्युचा दाखला मिळवण्याचे खटपटींत होती त्या दाखल्यांत मृत्युस्थळाची नोंद मिळेल ही मुख्य इच्छा. त्याप्रमाणें आतां माझ्या त्या स्नेह्यांस ती मिळाली आहे; आणि जर ती वास्तु त्या कालाप्रमाणेंच त्याच स्थितींत आज असल्यास त्या वास्तुचा फोटो घेऊन ठेवण्याचा त्यांचा मानस आहे! अशा प्रकारें केशवसुतांच्या जीवनांत अनेक गोष्टींचे प्रश्नच निर्माण होत आहेत. त्यांचे जन्म घराचा जसा वाद मालगुंड येथं सुरु आहे, तसा कांहींसा प्रकार हुबळीस आतां होणार नाहीं; मृत्युचे स्थळ चा नक्की पत्ता जुन्या रेकॉर्डमुळें लागला !

असा हा आमचे आप्पा आणि महाराष्ट्राचे "केशवसुत" यांचे जीवनाचा पट मी रंगवण्याचा यथामति, यथाशक्ति प्रयत्न केला आहे. माझ्या अडचणींचा उल्लेख प्रस्तावनेंत केलेलाच आहे. तेव्हां प्राप्त परिस्थीतींत उभा केलेला हा पट महाराष्ट्रीय रसिकांस आवडो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

---

⁂ तळटीप :– ती. सीतारामपंताबद्दल आत्यंतिक आदर असूनही त्यानीं ७ तारीखवाल्या श्री. हरीकाकांचे वर त्यानीं ४।५ दिवसांचा कृष्णाजीपंतांचा पगार मिळावा म्हणून ही पुढची तारीख सांगितली हा आरोप केला; फार चमत्कारिक व वाईट आहे. तो पटत नाहीं. तो त्यांच्या नेहमींच्या एका प्रकारें थोड्या दिलदारच स्वभावाविरुद्ध होता; हा क्षुद्रमनोवृत्तिचा आरोप अकारणच केल्यासारखा वाटतो. आतां त्या प्रकरणावर शेवटचा पडदा पडावा, असें मी सांगतो.

# केशवसुत व त्याचें काव्य

केशवसुत व त्यांचें काव्य भिन्न नाहींत त्यांचें चरित्र - जीवित आणि त्यांचें काव्य एकमेकांत गुरफटून गेलेलीं आहेत, अगदीं अक्षरशः रक्ताचें पाणी, शाई करून त्यानीं आपलीं काव्यें लिहिलीं आहे. त्यांच्या काव्यांतून माहितगारास त्यांचें जीवन दिसतें; त्यावर चांगला प्रकाश-झोत पडलेला आहे असें आढळतें. इतरांस त्यांचें जीवन व काव्य यांचा अभेद समजावयाचा नाहीं, कळावयाचा नाहीं.

आणि त्यांचीं काव्यें तरी अशीं किती आहेत, संख्येनें ? सारीं सुमारें १२५ ! पृष्ठसंख्या तरी आहे का फार ? तीही १९२१ च्या सी. के. दामल्यांच्या पहिल्या व एकूण दुसऱ्या आवृत्तिप्रमाणें केवळ १९४ ! ते ज्याप्रमाणें समाजापासून एका प्रकारें दूरदूर राहून एका प्रकारें विन्मुख असे होते, त्याप्रमाणें त्यांचें काव्य ही त्यांचे काळांत समाजापासून दूरच होतें. त्यांचें आयुष्य छोटें पण चटका लावून जाणारें, तसें काव्य एकूण थोडें, पण थोर परिणाम करणारें!

प्रस्तुत चरित्रग्रंथ लिहींत असतांना मला त्यांचे काव्यांचा थोडा अभ्यासच करावा लागला. तो करीत असतांना दर एक काव्याचा चरित्रात्मक पार्श्वभूमिवर कांहीं स्वतंत्र असा अर्थ दिसूं लागे. आणि तशीं कांही टिपणें प्रत्यक्ष कागदावर तर मनांतच मी करूं लागलों. आजि तीं देखील मनोरंजक व त्यांचे काव्यांवर निराळाच प्रकाश टाकणारीं होतील असा विश्वास वाटूं लागला. पण प्रस्तुत कार्य आणि हें नवें कार्य यांत फरक आहे असेंही कळलें. त्यामुळें तें काम तसेंच शिल्लक ठवलेलें आहे. सवडीनें त्यांचे काव्यांचा अभ्यास करून तें काम पूरें करावयाचा मानस आहे. आणि पूर्ण झाल्यावर आर्थिक सवडीनुसार तें प्रसिद्ध ही होऊं शकेल, कांहीं वर्षानंतर.

प्रसिद्ध आंग्ल कवि शेक्सपियर बद्दल, त्याचे लेखनाबद्दल, तें त्याच्या जीवनापासून दूर पडलेलें त्याशीं संबंध नसलेलें आहे, असा सार्वत्रिक समज आहे. पण प्रख्यात आंग्ल प्रोफेसर रॅले त्यांच्या English Men of Letters या माले-

तील "शेक्सीपियर" या ग्रंथामध्यें तें उलगडून दाखवण्याचा अल्पसा यत्न करितात. त्या संबंधांत त्यानीं एक सुभाषितवजा वाक्य लिहून त्यानुरोधानें पुढील प्रपंच केला. तें वाक्य असें "No man can walk out of his shadow". तेव्हां हें वाक्य जवळ जवळ सर्वच लेखकांस लागू पडणारें असून विशेषतः जे लेखक आत्म-लक्ष्यी Self - centred असतात त्यांचे विषयीं तर तें विधान फार मोठ्या प्रमाणांत खरें आहे. या दृष्टीनें केशवसुतांस हें विधान बरेंच लागू पडणारें आहे. ते आपले अनुभव, आपले विचार, आपलें जीवितच जणूं शद्बांचेमार्गानें बाहेर फेकतात; आणि म्हणूनच त्यांची काव्यसंख्या मर्यादित राहिली.

या दृष्टीनें " केशवसुत स्मृति–ग्रंथ " या ग्रंथांत त्यांचें एकटें एक धारवाड येथून १९०५ मध्येंच, ( ९ फेब्रु. १९०५ ) श्री. " आनंदीरमण " किंवा श्री. हर्षे यांस लिहिलेलें पत्र छापलेलें आहे तें फार महत्वाचें, फार बोलकें आहे.

श्री. हर्षे यानीं आप्पांकडे स्वतःच्या कांहीं कविता पाठवल्या होत्या. आप्पांनीं त्या वाचावयाच्या, कांहीं सुधारणा, आवश्यक तर, करावयाच्या होत्या. आणि नंतर त्या श्री. का. र. मित्र, मासिक मनोरंजन यांचेकडे छापण्याकरितां [ (थोडा वशिला, स्वतःचा लावून,) हे माझे पदरचे शद्ब, ] पाठवावयाच्या होत्या, सुरुवातीसच आप्पांनीं उशीर झाल्याबद्दल माफी मागितली आहे. यावरून त्यांचा स्वभाव स्पष्ट दिसतो. एक अप्रसिद्ध कवि त्यांचेकडे मार्गदर्शन मागत आहे. प्रसिद्धी करितां मदत मागत आहे. या कार्यास उशीर होत असल्यानें त्या तरुण कवीची हा एकप्रकारें थोडी मान्यता पावलेला, जरा मोठा कवि माफी मागत आहे; यांत त्यांचा 'बाल' भाव ("प्रौढत्वीं निज-शैशवास जपणें, बाणा कवींचा असे" असें जें एक सुभाषित त्यानींच लोकांस सांगितलें, त्याचें परिपालन यांत दिसतें.) स्पष्ट होतो.

" तुमचा नवीन यत्न ध्यानांत घेऊन पाहिलें असतां तुमचे लेख पुष्कळ चांगले आहेत, मी तर प्रथम फारच गचाळ लिहीत असें. तुमच्या इतकें चांगलें लिहिण्याचें मला साधत नसे " नव्या होतकरू लेखकास, कविस, यापेक्षा जास्त उत्तेजन तें काय पाहिजे ? शिवाय यांत स्वतःचा तरुणपणींचा अनुभवही स्पष्ट शद्बांत सांगितलेला आहेच.

यानंतर त्या पत्रांत पद्य छापण्यापूर्वी त्यांत कशा व किती प्रकारच्या सुधारणा करणें आवश्यक असतें याची त्यानीं माहिती दिलेली असून, आनंदीरमण यांस स्वतःच त्या नव्या दृष्टीनें स्वतःच्या काव्यांकडे, एका प्रकारच्या तिऱ्हाईत टीकाकाराच्या दृष्टीनें, पहावयास सुचवलें आहे.

दा. क्र. 14222

"कविता म्हणजे आकाशींची वीज आहे. ती धरूं पहाणारे शेंकडा ९९ आपणांस होरपळून मात्र घेतात. मी अशा ९९ वां पैकींच आहे; म्हणून म्हणतों भ्रमांत असाल तर जागे व्हा." त्याचप्रमाणें "पुष्कळ अशुद्ध पद्यें लिहिण्यापेक्षां मोजकींच शुद्ध पद्यें लिहिणें उत्तम" अशा प्रकारचा ते उपदेश करीत आहेत. पुढें पहा –

"हल्लीं महाराष्ट्रांत वृत्तदर्पण्ये कवि पैशा पासरी झाले आहेत, अशांत आपली गणना करून घेऊं नका. वाणी ही फार मोठी देवता आहे. सामान्य देवतांच्या आराधनास सुद्धां फार जपावें लागतें. मग या देवतेच्या आराधनास किती जपावें लागेल बरें?"

"स्वानंद हें कवीचें उत्तम पारितोषिक होय यांत शंका नाहीं. तो कसा मिळवावयाचा याचा विचार तुम्हींच करा."

"मला या बाता सांगणारा हा खुद्द चुटकेच खरडीत असतो तें कशाकरितां तर ? असा प्रश्न तुमच्या मनांत उद्भवणें साहजिक आहे. लोकांस वाट दाखवूं पहाणारा आंधळा वाटाड्या किंवा लोकांस ब्रम्हज्ञान सांगणारा कोरडा पाषाणच मला समजा. पुढील ठेचा खाणारा मी मागल्या तुम्हांस सावधगिरीची सूचना देत आहें. तेवढी मनावर घ्या म्हणजे झालें..."

या पत्रांतील मला जो भाग महत्वाचा वाटला तो अवतरणांच्या रूपानें वर दिला आहे. यांत स्वानुभव, आपलें त्रोटक चरित्रच आप्पांनीं 'आनंदीरमण' यांस कळवलें आहे.

केशवसुतांचें काव्य रडकें आहे, निराशाजनक आहे, त्यांस जीवनांत सुख किंवा प्रेम दोन्ही न मिळाल्याचा तो परिणाम होय, अशा प्रकारचे तर्क फारच चमत्कारिक व केशवसुतांस अन्याय करणारे आहेत.

ज्या कोकणच्या भूमीमध्यें त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्या गेल्या, ज्या कोकणांत त्यांचे बाळपण गेलें, ज्या जोरकस, सुंदर, सकस व जगांतील उत्कृष्ट असें फळ किंवा फळांचा जो राजाच असा आफूस आंबा ज्या कोळंबें गावांत म्हणजे कोकणांत फार मोठ्या प्रमाणावर होतो त्या भूमिचा व पाण्याचा त्यांचे जीवनावर व काव्यावरही मोठा परिणाम झालेला होता. जपानी भूमि व पराक्रमी जपानी लोक यांचा जसा अभेद आहे, दुसऱ्या महायुद्धाच्या खाईंत, ॲटम्‌बॉम्ब या महाभयंकर अस्त्राचा अगदीं पहिला, अजूनपर्यंतचा पहिलाच दणका सहन करूनही जें राष्ट्र केवळ १५-२० वर्षांत केवढ्या जोरांत पुनः जगांतील प्रभावी राष्ट्र कसें बनलें आहे याचा अनुभव व्यापारी

जगांत व क्रीडाजगांतही या शरीरानें ठेंगू व चिमुकल्या लोकानीं धिप्पाड अशा रशियन व अमेरिकन लोकांशीही झुंज देऊन १९६४ त टोकियो येथें झालेल्या Olympics मध्यें साधार प्रचीति दिली. त्या राष्ट्रास मुळुमुळू रडणें जसें माहितच नाहीं, त्याप्रमाणें कोकणच्या कसदार भूमींत, व केसोपंतांसारख्या एकाप्रकारें पराक्रमी पुरुषाच्या पोटीं कृष्णाजी पंतांनीं जन्म घेऊन जीवनभर काव्य करण्याच्या प्रवृत्तीनिशीं भोवतालच्या परिस्थितिशीं झुंजारपणानें युद्ध केलें, व पराक्रम कला. त्यांचें जीवन हें खरोखरीचें व सततचें युद्ध होतें.

काव्य करण्याचा नाद त्यांस लहानपणींच लागला. आणि तें कांहीं तरी नवें करावें, जुनी चाकोरी सोडून करावें असें त्यांस वाटलें. त्यांची कांही पहिली पहिली काव्यें पत्नीपासून दूर राहिल्यामुळें स्त्रीप्रेम विषयक आहेत. त्यांत जुन्या प्रवृत्ति किंवा आविष्कार नाहींत, शाहिरी प्रवृत्ति किंवा आविष्कार नाहींत, स्वतंत्र नवा आविष्कार आहे. इंग्रजी वाङ्मयाचा, काव्य वाङ्मयाचा त्यांचे जीवनावर व काव्य-जीवनावर मोठा परिणाम झाला. प्रख्यात Romantic कवींप्रमाणें त्यांतही एखाद्या अज्ञात मुंबई – पुण्याच्या स्त्रीवर प्रेम, अज्ञात रीतीनें प्रेम केलें असण्याचा संभव आढळतो काव्य, कविता, कवि त्यांचे परस्पर संबंध या एकाच विषयावर (कारण हा विषय त्यांस फार महत्वाचा वाटत होता) त्यानीं निदान १५ म्हणजे स्वतःच्या एकूण काव्याच्या १।८ भाग खर्ची घातला आहे. प्रेम विषय, स्त्री-पुरुष प्रेमसंबंध हा, विषय एकाप्रकारें संभावित जगाचा-सभ्य लोकांचा विषयत्र नव्हे असा लौकिकी समज असतांना तो दूर करून त्या विषयावरही त्यानीं अशाच जवळ जवळ १/८ म्हणजे सुमारें १५ कविता रचिलेल्या आहेत, काव्य देवतेशीं ती "प्रीत पतंगाची खरी" या नात्यानें त्यानीं प्रीत केली, पण त्या प्रेमांतही ते होरपळले तरी मेले नाहींत मनानें किंवा शरीरानें! १९०३ मध्यें म्हणजे मृत्यूपूर्वी दोन वर्षें त्यानीं लिहिलेल्या "दूर कोठें एकला जाउनीयां" या काव्यांत त्यांचा कवितादेवीच्या सबंधाविषयींचा थोर आत्मप्रत्यय त्यानीं सांगितला आहे! कविता देवीशीं त्यांचे बहीणभाऊ हें प्रेमळ नातें निर्माण झालेलें त्यानीं दाखवलेलें आहे. त्याच कवितेंत "·· कासया जग भिकारी" असे उद्गार काढलेले आहेत. जगाकडेच तुच्छतेनें पहाणारा हा कवि त्यांचे काळच्या जगाला कळलाच नाहीं म्हणून त्यालाही जगापासून फटकूनच, व जगाशीं झुंज घेऊनच जगावें लागलें. त्यांच्या आकस्मिक (प्लेगला बळी पडणें) मृत्यूपूर्वी थोडाच काळ "गोफण" सारखी माझ्या मतानें "तुतारी" हूनही कांहीं बाबतींत श्रेष्ठ व जोरदार काव्य निर्माण करणारा कवि हा शेवटपर्यंत वीरच राहिला, त्यानें वीर उपजवणारी, वीरांना स्फूर्ति देणारी कविता केली. क्वचित त्यांचे ठिकाणीं

हिंदु मताची, जुन्या मराठी संत कवींची भावना, भगवद्भक्ति, आपण मानव कोणीच नव्हे, तो देव सर्वकांहीं आहे, त्यास शरण गेलें पाहिजे ही प्रवृत्तिही आढळते. उदा. "काव्य कोणाचें" या काव्यांत "शारदेनें मंत्र दिला कानीं.." असे शब्द काढून माझें काव्य माझें नव्हे असें त्यानीं सांगितलें आहे, आणि शेवटच्या अभंगांत, उभ्या आयुष्यांत पहिल्यांदाच भीक मागितली आहे, आणि डोकें नम्र केलें आहे; पण तें परमेश्वरापुढें ! ही प्रवृत्ति त्यांच्यांत क्वचित् डोकावत असे; आणि पुनः ते जगातील संसार झुंजारपणानें करूं लागत.

"मराठी काव्याची प्रभात" या एका अमर लेखांत कै. थोर वर्तमानपत्रकार देशभक्त अच्युतराव कोल्हटकर यानीं १९१५-१६ च्या सुमारास जुनें काव्य संस्कृताश्रयी तर नवें काव्य इंग्रजी काव्यावर आश्रय करणारें ठरवून केवळ शाहिरी वाङ्मय हेंच तेवढें अस्सल मराठी काव्य झालें, पोवाडे व लावण्या हेंच काय तें अस्सल मराठी काव्य आहे,असा त्यांचा अभिप्राय त्यानीं व्यक्त केला. त्याच काव्यांत प्रथम मराठी मनाचें चित्र व आविष्कार, त्याचें प्रेम व त्याचें वीर्य शौर्य प्रगट झालें. अन्य कोठेंही हा आविष्कार नाहीं, असा त्यांचा दावा होता. पण ज्या काळांत महाराष्ट्रच काय, पण सर्व हिंदुस्थानच "थंड गोळा" झालेला दिसत होता,हिंदी लोकांच्या हातांत चाकू,कातऱ्या, सुऱ्या हीं शस्त्रें देखील दिसेनाशी झालीं होतीं. अशा काळांत प्रेमाचीं, व वीर्याचीं उदा. "नवा शिपाई" "निशाण" आदि काव्यें लिहिणारा कवि हा त्या शाहीरांचा नवा अवतारच श्री. कोल्हटकरांस दुर्दैवानें दिसला नव्हता

केशवसुतांच्या काव्यांचा अभ्यास पुष्कळ झाला, अजूनही होत आहे. या अभ्यासकांपैकीं एक उदाहरण गमतीचें म्हणून देतों. तें आहे श्री. गजाननराव माडखोलकर यांचें. १९२० च्या आधीं महाराष्ट्र "कवि पंचक" या छोट्या पुस्तकांत त्यानीं केशवसुतांना डोक्यावर घेतलें आहे; पण पुढें अंदाजे १५ वर्षांनीं त्यानीं त्यांस खालीं खेचलें आहे. या संबंधांत व अन्य कांहीं टीकाकारांच्या संबंधांत विद्वान प्राध्यापक कै. रा. कृ. लाग मला लिहिलेल्या एका खाजगी दि.२७-२-१९३९ च्या पत्रांत लिहितात :–

"... डॉ. पटवर्धन (मा. त्रि.) व श्री. माडखोलकर यांचीं मतें मी वाचलीं. पटवर्धन यांच्या मतांत फरक पडलेला नाहीं. पण श्री. माधव गोविंद भिडे यांच्या मताची छाप त्यांच्यावर पडली, इतकेंच. माडखोलकरांचीं मतें नेहमींच बदलत असतात. देवदत्तांच्या (रे. ना. वा. टिळक यांचे पुत्र) लेखनाचें मात्र आश्चर्य वाटलें. देवदत्त-शहाणे सूज्ञ असतील अशी माझी समजूत. या समजुतीला परवांच्या लेखानें बराच मोठा धक्का बसला"

अलीकडे एक फॅशन होवूं पहात आहे. केशवसुतांच्या निरनिराळ्या काव्यांचें इंग्रजी मूळ शोधून काढण्यांत नवीच चढाओढ लागूं पहात आहे, चालू सालांत ! बिचारा कलाकार. त्याच्या डोक्यांत एखादी कलाकृति निर्माण करतांना काय असतें, आणि टीकाकार स्वतःची हुषारी, स्वतःची विद्वत्ता सामान्य लोकांच्या नजरेंत भरवण्याकरितां आपापलीं मतें, कल्पना बिचाऱ्या कलावंतांच्या कृतींवर व त्या कलावंतांवर लादत असतात. केशवसुतांसंबंधानें असले उपद्व्याप पाहून कदाचित् ते परलोकांत म्हणत असतील –

"मी माझ्या ९ कवितांचीं इंग्रजी मूळें कशांत आहेत तें स्वछ त्या त्या कवितांचे वर सांगितलें आहे. एकूण १६ काव्यें, मूळ संस्कृत काव्यांवर किंवा प्रसंगांवर, किंवा व्यक्तींवर किंवा "नैऋत्येकडील वारा". वगैरे सारख्या कौटुंबिक विषयांवर लिहून तसें स्पष्ट केलें आहे,बहुतेक ठिकाणीं.६ काव्यांना थोडचा विस्तृत टीपा दिल्या आहेत, आतां माझ्या तुतारीचें, सतारीचे बोल यांचें मूळ लोकांस सांपडलें आहे म्हणे! मला वाटतें उद्यां " खिडकीकडे मौज पहावयास " या काव्याचें मूळही कोणा रसिक टीकाकारास एखाद्या इंग्रजी काव्यांत सांपडावें ! इतका मी इंग्रजी कवींवर आणि कवितांवर भाळलों होतों असा नवा शोध पाहून त्या शोधकांबद्दल मला धन्यता वाटते! जर खरोखरीच माझ्या पुष्कळशा काव्यांचीं मूळें इंग्रजी काव्यें असतीं, तर मला कोणाची भीति होती काय तीं उघड सांगावयास ? मग मी जीं माझ्या जवळ जवळ १/४ काव्यांचीं मुळें उघडपणानें सांगितलीं तींही मला झाकून ठेवतां आलीं नसतीं काय? अशा या शोधकांना व टीकाकारांना मी या माझ्या दूरच्या ठिकाणाहूनच नमस्कार करतों!"

केशवसुत चरित्र लिहितांना कोकणभूमि, कोकणस्थ,केसोपंत, यांस बरींच पृष्ठें दिलेलीं कांहीं टीकाकारांस दिसतील; पण त्याचें कारण आतां त्यांस कळावें ही पार्श्वभूमि आहे आणि ती थोडी रंगवून दाखवलेली आहे; कारण हा काळ शेक्सपीरियन थिएटरचा काळ नव्हे, एक झुडूप रंगभूमीवर ठेवून व फळचावर 'अरण्य' असें लिहून अरण्य सुचवण्याचा. हा काळ आहे फिरत्या रंगमंचाचा ! ... दुर्दैव या कोकणच्या भूमीचें, कीं, जेथल्या आतां नष्ट झालेल्या खोतीबद्दल, खोतांबद्दल, अलीकडचेच कोकणांत राहिलेले लेखक त्यांच्या भ्रष्ट आचरणाबद्दल " पोवाडे " लिहिणारे कुपुत्र कादंबरीकार, जन्म घेत आहेत, व असल्या कादंबऱ्या प्रसवत आहेत ! आणि त्या कादंबऱ्यांस मान्यताहि मिळत आहे हेंहि एक नवलच आहे! पण खरें कोकण, हें नव्हे. ती भूमि फार निराळी आहे; जगांतून ज्याप्रमाणें शेक्स्पीयरचें Strat-ford on Avon पहावयास लोक जातात, त्याप्रमाणें ज्यांस कोकण समजून घ्यावयाचें असेल त्यानीं कोल्हापूरमार्गें रत्नागिरी, मालगुंड,श्रीगणपति पुळें, कोळंबें हा परिसर

दुसऱ्यांचा चष्मा न स्वीकारतां, अवश्य डोळे उघडे ठेवून पहावा, आणि समुद्रमार्गें मुंबईस परत यावें. जमल्यास चिपळूणास जाऊन श्री भार्गवरामाचें, श्री परशुरामाचें दर्शन घ्यावें असें केल्यास त्यांस खऱ्या कोकणाचें दर्शन, अल्पदर्शन घडेल, आणि "केशवसुत" समजण्यास त्यांस मदत होईल. नाहींतर खरा "केशवसुत" त्यांस दिसणार नाहीं! कळणार नाहीं! पण केशवसुत कळणें फार कठीण आहे. समजूं लागल्यापासूनच काव्याचा, काव्य वाचणें व करणें हा नाद, (वेडच म्हणा) त्यांस लागला. त्यानीं आयुष्याचें ध्येय, नवीन, आजपर्यंत जसें कोणी मराठी भाषेंत केलें नव्हतें अशा प्रकारचें काव्य करणें हें ठरवलें. त्यांतच रोमँटिक काव्य आलें. त्यांतच स्वतःची पत्नी, अशरीरी किंवा अज्ञात स्त्री, कवितादेवीहि या सर्वांचा समावेश झाला. कवि हा जगाला शिकवणारा तत्त्वज्ञ आहे ही देखील भूमिका त्यांनीं समर्थपणानें पेलली. ज्याप्रमाणें निसर्गास श्रेष्ठ मानून निसर्गपूजा केली, त्याचप्रमाणें जगाचा जास्त (कटु) अनुभव आल्यावर अध्यात्मवादही त्यानीं चोखाळला. त्यांचे जीवनावर तात्कालिक पुढारी- धाकटे शास्त्रीबुवा, आगरकर, लो. टिळक आदींचा पगडा बसला, थोडा फार. आणि सर्वांत मोठा पगडा त्यांचे स्वतःच्या जीवनानुभूतीचा त्यामुळें त्यांचे व्यक्तिमत्त्व समजणें फार अवघड आहे. त्यांचे मन फार लवचिक व कोमल, भोवतालच्या परिस्थितीचें पडसाद उमटवून घेणारें होतें; आणि ज्यावेळीं जी भावना, जो अनुभव ताजा असेल त्याचा पगडा त्यावेळच्या त्यांचे काव्यावर पडलेला आढळेल. आपल्या मनांतल्या खळबळीचें प्रतिबिंब न भितां काव्यांत उमटवणें हा मात्र त्यांचे जीवनाचा स्थायीभाव होता हें वाचकांनीं ध्यानांत ठेवल्यास त्यांचे काव्य त्यांस चांगलें समजावें.

शेवटीं वाचकांस, अभ्यासकांस विनंति करावयाची ती ही कीं, कोणताहि पूर्वग्रह न बाळगतां केशवसुतांच्या काव्यांचा डोळसपणानें अभ्यास केला तर त्यांचे चरित्र सामान्यपणानें लक्षांत यावें. ते येण्यास उपकारक असें अन्य कांहींतरी असावें म्हणून केशवसुतांचे हें चरित्र, माझ्या माहितीप्रमाणें सत्य स्वरूपाचें असें चरित्र वाचकांचे पुढें ठेवलें आहे. त्या चरित्रास पोषक, उपकारक व्हावें म्हणून, आणि महाराष्ट्र वाङ्मयांत स्वतंत्र प्रज्ञा व स्थान असलेले मला वंदनीय असे माझे वडील मोरो केशव, आणि सीताराम केशव यांची ही स्वतंत्र व जास्त विस्तृत चरित्रें यापुढें वाचकांस वाचावयास मिळतील, आणि त्यानंतर ज्या एका बंधूंच्यामुळें कृष्णाजीपंत व मोरोपंत शिक्षणास घराबाहेर, कोकणाबाहेर पडले, आणि ज्यांच्या थोड्या फार स्वार्थत्यागानें किंवा ज्यांस परिस्थितीनें उच्च शिक्षण घ्यावयास न मिळाल्यानें जे प्रकाशांत येऊं शकले नाहींत अशा दोन चुलत्यांचीं- श्रीधर केशव व चिंतो केशव –यांचीही चरित्रें यापुढें वाचकांस सादर केलेलीं आढतील.

# " मोरो केशव "

## मातापित्यांच्या मृत्युनंतरचे दिवस

१९१३ सालच्या मे महिन्याच्या ५।६ तारखेची गोष्ट असेल. आम्हीं त्यावेळीं नागपूरच्या त्यावेळच्या नील सिटी हायस्कूलच्या ईशान्येकडील कोपऱ्यांत, खालचे पातळीवर श्री. इंदूरकर यांचे वाड्यांत राहत होतों. मी त्यावेळच्या इंग्रजी २ री मध्यें म्हणजे अलीकडच्या सहावींत नुकताच गेल होतों. माझें वय जेमतेम १० वर्षांचें होतें. त्यावेळीं आम्हास अभ्यासास टेबल–खुर्ची कल्पनेंत देखील दिसत नव्हती. माझे वडील गादीवर तक्क्याला टेकून एका सागवानी पेटीचें टेबल करून त्यावर कागद ठेवून लिहीत असत .. आम्हांस आमचीं पुस्तकें-वह्या वगैरे व कपडे ही ठेवण्यास एक लाकडी पेटी– देवदारी दिलेली असे. मी व माझा एक आते भाऊ श्री. आत्माराम आपटे यांच्या पेट्या पडवींतल्या कोपऱ्यांत ठेवलेल्या असत. त्याच पडवींत मधोमध एक झोपाळा होता. भिंतीच्या पलीकडे ती. मोरो केशव उर्फ अण्णा यांचे माडीवर जाण्याचा जिना होता. दुसऱ्या टोकाला देवघर होतें. आणि काटकोनांत दुसरी एक पडवी होती. गुण्याचा काटकोन होतो तेथें देवघर, व दोन बाजू म्हणजे पडव्या होत्या. गुण्याच्या दोन्ही बाजूंसमोर समांतर दुसऱ्या बाजू काढून एक काटकोन चौकोन होण्यासारख्या उरलेल्या जागेंत पडव्या व फरसबंद अंगण होतें. जिन्याच्या पलीकडेहि थांडें अंगण होतें. या अंगणांत एक छान पारिजातकाचें झाड व एक पांढऱ्या चाफ्याचें झाड होतें.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि: ....................

आमच्या पेट्यांच्या कोपऱ्यापासून कर्ण काढला तर दुसऱ्या पडवीच्या टोकास तो मिळावा. त्याचे पलीकडे एक बोळ होता. आणि मुख्य घराचे कडेनें तो मागचे अंगणाकडे जात असे. त्या बोळांत जरा अडचणीच्या ठिकाणीं मला एक बेताचा असा देवदारी खोका बहुधा दीड फूट लांब, ८।९ इंच उंच; व तितकाच रुंद असा आढळला. मी तो प्रयासानें काढला; आणि मला लिहावयास डेस्क किंवा टेबलासारखा त्याचा उपयोग करावा असें मी ठरवलें. तो फोडण्याची व आंत काय आहे तें जाणण्याची प्रबळ इच्छा झाली. आणि त्यादृष्टीनें मी खटपटकरीत होतों. तों कोणी तरी मोठ्या माणसांनीं माझें कृत्य पाहिलें, मला पुष्कळ रागें भरून घ्यावें लागलें. तो खोका माझे हातून हिसकावून घेण्यांत आला. त्यावेळीं मला एकंदर गोष्टींचा, बोलण्याचा, विशेष अर्थ कळत नव्हता. त्या खोक्यांत माझे वडील ती. मोरोपंत व आई सौ. ती. सीताबाई यांच्या अस्थि ठेवलेल्या होत्या !

एप्रिलच्या २९ तारखेस रात्रीं (मंगळवारीं) माझे वडील, आई व धाकटी बहीण रत्नप्रभा ही मंडळी रात्रीचे पॅसेंजर गाडीनें पुण्याकडें गेली होती. त्याचे दुसरे दिवशीं दि. ३० च्या पहाटेस बोरगांव येथें आगगाडीच्या टक्करीमध्यें ते दोघेही कैलासवासी झाले होते, आणि रत्नप्रभा वाचून, जिवंत राहून धड अंगानें नागपूरास पुढें परत आली मेच्या २।३ तारखेपासून घरीं बरीच मंडळी येत; मोठी मंडळी रडत, गंभीर चेहरे करून बसत, परत जात, मला या गोष्टी कांहीं कळत नसत. आधींच्या वर्षींच्या मे महिन्याच्या सुट्टीप्रमाणें ती. अण्णा पुण्या–मुंबईकडे गेले आहेत, महिना दीड महिना ते येणार नाहींत, आणि आपणांस खेळावयास भरपूर मोकळीक आहे; शेळ्या पकडाव्यात, काठीस दोरी बांधून चाबूक करावेत, सर्कशीतल्या घोड्यां प्रमाणें शेळ्या फिरवण्याचा प्रयत्न करावा, नाहींतर लहान मुलांसच घोडे करून फिरवावें... खूपखूप खेळावें असे बेत मी योजीत असें. मला या रडण्याचा अर्थच कळत नव्हता. एक दिवस असें ऐकलें " बापूकाका उद्या (पुण्याहून) येणार आहेत" त्यावेळीं मी बरोबरीच्या आत्मारामाजवळ चर्चा करूं लागलों, " अण्णा बापूकाकां-कडे पुण्यास गेले असतांना बापूकाका इकडे कसे येणार ? कां येणार ?" तेव्हां तो मला सांगत होता, " अण्णा, आई मेले " पण मला त्याचें रडून समजावून सांग-ण्याचा फारसा बोध झाला नाहीं. पुढें बापूकाका प्रत्यक्ष आले. पुष्कळसे नातेवाईक मंडळी आली, आणि आम्ही सर्वच मंडळी नागपूर सोडून जाणार असें कळलें. ती. अण्णा व ती. सौ. आई आतां पुन: दिसणार नाहींत असें कळलें. यामुळें थोडें वाईट वाटलें. पण रोजचा मार चुकला, पुण्यास जावयाचें म्हणजे फार मोठा आगगाडीचा प्रवास घडणार आहे, याचा आनंदच वाटूं लागला ! माझी ती अवस्था आंग्ल कवि वर्ड्स्वर्थच्या We are Seven या कवितेमधल्या अज्ञ मुली सारखी होती; मला मरण, याचा अर्थच कळत नव्हता.

आई-वडीलांचे दिवस करण्याकरितां मला नागपूरास त्या संस्काराच्या करितां असलेल्या ठिकाणीं नेण्यांत येत असे, सकाळीं जानवें उजव्या हातातून डाव्या हातांत, कधीं पहिल्या सारखे ('सव्यापसव्य') कधीं माळेसारखेंवगैरे करावें लागे; १॥–२ तास भटजींच्या ताब्यांत राहून आचमनें वगैरे तंत्रें करावीं लागत, दर्भाचीं पवित्रकें बोटांत घालावीं लागत, एक दिवस हजामत करावी लागली..असा सर्व प्रकार यथासांग जो व्हावयाचा तो झाला. मी तो सर्व यांत्रिक पद्धतीनें केला या खोक्यांतील अस्थींचें पुढें काय झालें, तें आठवत नाहीं. बहुधा त्या नाशिकास किंवा पुण्यास, आळंदीस, दुस-या काणाकडून तरी विसर्जित केल्या असाव्यात. मी स्वत: अस्थि विसर्जन केल्याचें मला आठवत नाहीं.

आम्ही बहुधा ११ किंवा १२ मे रोजीं नागपूर सोडलें. त्याचे आधीं ४-५ दिवस मोठ-मोठ्या खोक्यांतून आमचें सामान भरणें पॅकिंग करणें चालूं होतें. निरनिराळी मंडळी निरनिराळें सामान " मी हें आण्णांची आठवण म्हणून नेतों, आईची आठवण म्हणन नेतों" म्हणत होती.वस्तु उचलत होते." कोणीतरी "स्टोव्ह" नेला, निळू मामांनीं (अलीकडचे प्रख्यात ललितवाङ्मय लेखक व निर्माते श्री. गो. नी. दांडेकर यांचे वडील) भजन करितांना ती, आण्णा वापरीत असलेला तंबोरा व चिपळ्या नेल्या असें पक्कें आठवतें. आणि एक वेळ श्री. गो. नी. नां विचारलें तेव्हां त्यानीं तो तंबोरा लहानपणीं पाहिलेला होता असें मला अलीकडे सांगितलेंही आहे. असा एकंदर मोठा चमत्कारिक प्रकार झाला; आणि आम्ही नागपूर कायमचें सोडलें !

## बोरगांवचा अपघात.

१९१३ चे पूर्वी व त्यानंतरही कांहीं वर्षें भुसावळ नागपूर हा जी. आय. पी. किंवा आतांच्या सेन्ट्रल रेल्वेच्या रुळांची एकेरी रांग असणारा मार्ग होता. जाणाऱ्या येणाऱ्या अशा दोन मार्गांची रचना पुढें झाली. कोणातरी रेल्वेच्या कर्मचाऱ्याच्या चुकीमुळें बोरगांव ते काटेपूर्णा या दरम्यान एक मालगाडी, मध्यें आणि नागपूरकडून पॅसेंजर गाडी, आणि भुसावळकडून मेलगाडी अशा एकत्र आल्या. पण मालगाडीवर पॅसेंजर गाडी आदळली, आणि बरेच डबे,पुष्कळशीं माणसें यांचा नाश झाला. माझे आई-वडील हे प्रथम मागच्या बाजूकडे बसलेले होते पण आई आदल्या वर्षी ४।५ऑपरेशन्स मधून बाहेर पडलेली, अशक्त; म्हणून ती मंडळी नेनकी एंजिन शेजारच्या डब्यांत बसावयास गेलीं होती. हा डबा थोडा प्लॅट-फॉर्मच्या कडेला जातो, लोक-उतारू फारसे चढउतार करणार नाहींत, आणि आपणांस आराम मिळेल या कल्पनेनें माझे वडीलांनीं जाणून बुजून मृत्युमुखांत प्रवेश केला होता ! ही सर्व हकीगत त्यावेळच्या एका मुसलमान पण वृद्ध तालीम मास्तरांनीं नागपूरच्या मंडळीस सांगितलेली होती. हे ड्रील शिक्षक होते.

वडीलांचा नेहमींचा रिवाज म्हणजे वेळापत्रकांतील गाडी सुटण्याचे वेळेच्या आधीं एक तास, निदान पाऊण तास स्टेशनवर हजर राहण्याचा असे. त्याप्रमाणें ते गेले होते. ड्रिल शिक्षक सहज त्यांस पोचवण्यास स्टेशनवर गेले होते. स्टेशन आमच्या इंदूरकरांच्या वाड्यापासून जवळ जवळ दोन मैल दूर, पण वडिलांस घोंगडीची - कांबळ्याची आठवण झाली, जवळ असेल तर बरें असें वाटलें. आणि त्यानीं तशी इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां ड्रिल शिक्षकांस आनंद वाटला. त्यानीं हेडमास्तरांची सेवा करण्याची संधि साधली. ते धांवत घरीं आले, "कंबल चाहिये, कंबल चाहिये" म्हणूं लागले. त्यानीं तें कांबळे घरून हस्तगत करून स्टेशनवर वडिलांस नेऊन दिलें; तेव्हां ते इंजिनाचे शेजारच्या डब्यांत बसलेले त्यांस आढळले. हे ड्रिल शिक्षक अपघातानंतर घरीं येऊन दुःख करून, रडून त्यानीं ही सर्व हकीगत मंडळीस रुद्ध कंठानें सांगितली होती. मी ती आठवणीनें येथें सांगत आहे.

अपघात पहाटेस घडला; त्यानंतर रेल्वे मार्ग खुला होण्यास दीड दिवस लागला. बरीच मंडळी अकोल्याहून अपघाताचे ठिकाणीं जमा झाली. त्यांत त्या वेळचे रावबहादुर दामले मंडळी होती. त्यांचेच एक बंधु डॉक्टर दामले हे कै. सीता-

रामपंत दामले यांचे कॉलेजमधील समकालीन व ओळखीचे होते. रावबहादुर हे अण्णांचे ओळखीचे होते. माझे एक मामा श्री. रामचंद्र विठ्ठल दांडेकर (फोटोग्राफर, श्रीराम थिएटर, अकोला) हेहि तेथें गेले होते. माझी बहीण रत्नप्रभा ही हुशार व चुणचुणीत, ७१हा वर्षांची होती. तिची ओळख पटल्यावर तिला तात्पुरती रावबहादुर दामल्यांकडे नेण्यांत आलें, तेथें सीतारामपंतहि पुण्याहून आले. नंतर ती मंडळी नागपूरास आली. माझ्या आईचा देह लौकरच सांपडला. पण वडिलांचा देह मात्र सायंकाळपर्यंत सांपडला नाहीं. त्यांचे शरीरावर पुष्कळच चक्काचूर पडलेला होता; आणि साफसफाई करीतांना अखेर अखेर तो देह मिळाला. तो माझे मामा आणि श्री. दामले मंडळी यानीं ताब्यांत घेऊन त्यांचें दहन करण्यांत आलें. पुष्कळ बेवारशी देह एका एका मोठ्या खड्यांत चार-सहा देखील याप्रमाणें ३०-४० खड्यांत पुरून टाकण्यांत आले, व अपघातांतील मृतांची संख्या खड्ड्यांचे एवढी अल्प सांगण्यांत आली, प्रसिद्ध करण्यांत आली. ही सर्व ऐकीव हकीगत आहे. त्यांत थोडी फार अतिशयोक्ति असेलही.

अपघातानंतर पुष्कळ चोरट्यांचे फावलें. माझ्या आईच्या शरीरावरील सुमारें दोन हजारांचे दागिने चोरीस गेले. गोठ, पाटल्या, गळ्यांतील, कानामधील कुडीदेखील. असें ऐकलें आहे कीं एक कान फाडून कुडें उपटून नेलेलें होतें! वडीलांचा देहच सांपडला नाहीं, म्हणून. नाहींतर त्याचे कनवटीला ४००।५०० रुपयांच्या गिनी (सॉव्हरियन नाणीं) होत्या त्या मात्र रावबहादुर दामले आदींकडून सीतारामपंत यांस मिळाल्या. त्याकाळीं प्रत्यक्ष प्रचारांत हीं नाणीं नव्हती; पण बंकांत तीं नाणीं दिली, घेतलीं जात असत असें ऐकतों.

## नागपूर येथील आमचें कुटुंब.

इंदूरकरांचा वाडा जसा मोठा होता, तसें त्यांत राहणारें आमचें कुटुंबहि मोठें होतें! माझे वडील मोरोपंत त्यावेळीं ४५ पूर्ण व ४६ वें वर्ष चालू असलेले, आई सीताबाई ३७।३८ वयाची ही मोठी माणसें होतीं. त्यांतच माझ्या आत्याबाई ती गं. भा. काशीताई दांडेकर या अशाच ३८ च्या, आईच्या बरोबरीच्या. त्या आमचेकडे अंदाजानें माझे वडील उज्जयिनीस असतांना १८९५ चे सुमारास आल्या. यानंतर आम्ही ४।५ भावंडें होतों.सर्वांत वडील सौ.शकुंतला, किंवा दत्ती,ही १३वर्षांची होती तिचा विवाह १९१२ च्या मे महिन्यांत नागपूरास इंदूरकरांच्या वाड्यांतच झाला होता. तिचे यजमान श्री. दामोदर व्यंकटेश घारपुरे हे सीत.बर्डीवर राहत

असत. मी त्यावेळीं १० चा होतों. माझ्या पाठच्या बहिणी शशिकला अंदाजे आठ वर्षांची, तिचे पाठची रत्नप्रभा ही अंदाजे सहा वर्षांची होती. १९१२ सालच्या दिवाळीचे आधीं ४।५ दिवसच,माझा एक धाकटा भाऊ श्रीपाद हा सुमारें २ वर्षांचा, घटसर्पानें एकाएकी देवाघरीं गेला होता. अशी आम्हीं भावंडें होतों.

पण येथेंच आमचें कुटुंब संपलें नाहीं ! पूर्वी एकदां उल्लेख केलेला माझा आतेभाऊ आत्माराम आपटे हा १९१२ सालीं बहीण शकुंतला किंवा ताई (दत्ती) हिच्या विवाहाच्या वेळीं आपल्या आईबरोबर(भीमाताई)कोकणांतून आला होता. तो शिक्षणाकरितां नागपूरास राहिला होता. माझा एक चुलत भाऊ परशुराम हा आम्ही नागपूरास आलों तेव्हांपासूनच आमचेकडे शिकावयास होता.तो त्या वर्षी मॅट्रिक परीक्षेस नील सिटी हायस्कूलमधूनच बसला होता. मध्यप्रांतांत तो पहिला आला, व त्यास इंग्रजी विषयाची स्कॉलरशिपहि मिळाली. तो त्या विषयांत पहिला आला. हा अण्णांचा आवडता होता. याचे वडील चिंतोपंत हे कोकणांत असत. त्यांचें शिक्षण झालेलें नव्हतें. ते कवि केशवसुतांचेहून मोठे होते. यानंतर माझ्या आईचे दोघे भाऊ घरींच असत. एक परसूमामा (परशरामपंत), हा त्यावेळीं २६।२७ वर्षांचा असावा. तो शिंप्याचा धंदा करीत असे; आणि नागपूरांतील त्यावेळच्या चांगल्या कसबी शिंप्यांपैकीं तो एक होता.त्याचप्रमाणें त्याचे पाठचा'मोठा'विष्णु हा एक मामा हिस्लॉप कॉलेजांत शिकत होता. हाही२।३वर्षें आमचेकडे शिकावयास असे.मोठा विष्णु त्याच प्रमाणें एक धाकटा विष्णु होता. हा माझा आतेभाऊ होता. हा विष्णु परांजपे कोकणांतून शिक्षणासाठीं आला; पण तो परसूमामा यांचे हाताखालीं शिवणकाम शिकत असे. हा २।३ वर्षेंच आमचेकडे होता. असें हें एवढें आमचें चांगलें १०।१२ माणसांचे कुटुंब होतें. यावरून मोरोपंत हे केवळ आपल्या कुटुंबाकरितां होते असें नव्हे; तर ते खरे कुटुंबवत्सल होते. बहिणींच्या मुलांस, भावांच्या मुलांस मेहुण्यांस विचारणारे, मदत देणारे असत, असें दिसून येईल.

याशिवाय अधून-मधून माझे मामा पूर्वोक्त नीलकंठराव व त्यांच्या पत्नी व एक-दोन मुलें अधून-मधून घरीं येत जात. त्यांचें बिऱ्हाड निराळें असे, नागपूरांतच.

ती. अण्णानीं १९१२ मध्यें चैत्रांत माझी मुंज बुरीबोरी या एका खेडेगावीं केली, आणि मुलीचा विवाह मे मध्यें (कदाचित् वैशाख किंवा ज्येष्ठ सुरुवात) नागपूरास केला. दोन्ही कार्यांस सुमारें तीन हजार रुपये खर्च झाला. त्यांस नागपूरास असतांना तीनशें रुपये महिना पगार मिळत होता. त्यांचे मृत्यूसमयीं बँकांत वगैरे सुमारें सात हजार रुपये त्यांचेजवळ शिल्लक होती.

✡ ✡ ✡ ✡

## मुलाचें (माझें) शिक्षण; त्याचे संबंधींच्या अण्णांच्या अपेक्षा.

माझे वडिलांना माझ्याआधीं चार मुली झाल्या होत्या. त्यांचे पाठीवर श्री दत्तात्रेय या दैवताच्या भक्तिमुळें आणि श्री हरीहरबुवा उदासी या एका सत्पुरुषाच्या गुरुकृपेमुळें माझा जन्म झाला, अशी त्यांची श्रद्धा होती. माझे जन्माचे आधीं मोठ्या बहिणीच्यावेळीं जेव्हा माझी आई प्रसूत झाली त्यावेळीं अण्णांचे गुरु श्री हरीहरबुवा म्हणाले होते– "अरे दामल्या, माझें लक्ष नव्हतें त्यावेळीं; नाहीतर या खेपेस तुला मुलगाच झाला असता !" त्यामुळें तिचें नांव जरी शकुंतला ठेवलें होतें तरी घरीं नेहमीं तिला "दत्ती" हें चमत्कारिक उपनांव मिळालें ! माझ्या पाठीवरही लौकर मुलगा झाला नाही. म्हणून माझ्या शिक्षणाकडे व एकंदर वागणुकीकडे वडील खास जास्त लक्ष देऊन माझा उत्कर्ष, विकास विविध अंगांनी व्हावा म्हणून झटत असावेत...

पण अस्मादिकांची स्वारी मोठी चमत्कारिक होती. मी फार उशीरां बोलावयास लागलों; जवळजवळ अडीच वर्षांचा झाल्यावर बोलूं लागलों ! त्यामुळें हें बाळ कसें निपजणार याची थोडी काळजीच सर्वांस वाटत असावी. मी दिसावयास काटकुळा, लंबाटचा दिसें. त्याचप्रमाणें माझा स्वभाव अबोल, घुम्या असावा. यामुळें माझ्या आईस मला तिचा मुलगा असें सांगावयास थोडी लाज वाटत असे, अशी माहिती सीतारामपंतांनी केव्हांतरी बोलतांना दिली होती. त्यांचे कडे माझी आई पुण्यास मी सुमारें ५ वर्षांचा असतांना गेलेली होती. त्यामानानें मुली चुणचुणीत व चलाख दिसत असत.

माझा जन्म ३० मार्च १९०३ चा, गुढीपाडव्याचा. पण त्याकाळीं मी मॅट्रिकला बसतांना १६ वर्षें पूर्ण होण्याची अट थोडीही आड येऊं नये म्हणून अण्णांनीं माझें वय शाळेंतील दप्तरांत ३ डिसेंबर १९०२ करून टाकलें होतें !

मी ५।६ वर्षांचा असेन. एके दिवशीं सायंकाळीं ते मला रामदासांचा एक श्लोक शिकवूं लागले. तो श्लोक म्हणजे– "अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया, परम दिनदयाळा नीरसी मोहमाया। अचपळ मन माझें नावरे आवरीतां, तुजविण शिण होतो धांवरे धांव आतां।।" हा होय. त्यांनीं स्वतः खूप शीण घेऊन मला तो श्लोक चांगला तासभर शिकविला. पण माझी गाडी कुठल्यातरी ओळीवर कुठेंतरी अडेच. त्यामुळें मला खरपूस मार मिळत चालला होता आणि या मारामुळें व

वडिलांच्या भयामुळें मला तो श्लोक कांहीं केल्या येईना. अखेरीस कंटाळून व मला "ढ" ठरवून ते त्या दिवशीं मोकळे झाले.

दुसरे दिवशीं सकाळीं दत्तीने मला बाजूस नेऊन तो श्लोक ५।१० मिनिटांतच शिकविला, व मी तो तिला बिनचूक पाठ म्हणून दाखवला. तेव्हां ती अण्णांकडे गेली आणि तिनें माझी वकिली केली. तुम्हीं काल दत्तूला विनाकारण मारलेंत त्याला 'ढ' मूर्ख ठरवतात. तो कांहीं तसा नाहीं. मी त्याला तो श्लोक ५ मिनिटांत शिकवला व तो शिकला." त्यावर अण्णांनीं मला समोर बोलावून तो म्हणावयास सांगितल्यावर काय गम्मत झाली म्हणतां,– पुन: आपले ये रे माझ्या मागल्या ! त्यांचे समोर माझी गाडा कुठेंतरी अडेच; मी चुकतच होतों !

मी ६।७ वर्षांचा असेन, त्यावेळीं. आम्ही नागपूरास प्लेग असल्यामुळें रामटेक या ठिकाणीं रहावयास गेलों होतों. एका धर्मशाळावजा चाळींत राहत असूं. समोरच एक तलाव होता. त्या तळचांत सर्व मंडळी स्नानें-धुणी करीत. त्यास पायऱ्यांचा घाटही बांधलेला होता. मला एक वेळ पोहणें शिकवण्याकरितां माझा चुलत भाऊ परशुराम आदि तरुणांनीं जेथें उडचा टाकतां येत असत, लोक उडचा टाकीत अशा ठिकाणीं नेऊन पाण्यांत ढकलून दिलें ! मी एक-दोन गंटागळचा खाल्ल्या, पाणी प्यालों थोडेसें,आणि मला मग वर काढण्यांत आलें. पोहणें शिकवताना मुलांची, शिकणाराची भीति घालवण्याकरितां या पद्धतिनें पोहणें शिकवतात पण या प्रकारानें पाण्याची प्रचंड भीति माझ्या अंतर्मनांत दडी देऊन बसली! अण्णांनीं मला घाटाच्या पायऱ्यांवर स्वत: छाती एवढचा पाण्यांत उभें राहून स्वत:च्या दोन्ही हातांवर आडवा पाडून हातपाय मारण्यास व पोहणें शिकण्यास लावलें. असा प्रकार कांहीं दिवस केला गेला; पण त्यांचे मला पोहणें शिकवण्याचे चांगले प्रयत्नही निष्फळ ठरले! .... मी माझ्या पुढील आयुष्यांत पोहणें शिकण्याचे ३।४ वेळां निरनिराळ्या मित्रांबरोबर पुण्याच्या महाराष्ट्रीय मंडळाच्या बंगला विहीरींत आणि डेक्कन जिमखान्यावरील टिळक तलावांत प्रयत्न केले. अखेरीस १९२७–२८ सालीं माझे मित्र श्री. रामभाऊ गोखले ( हे बडोद्याचे अलेंबिक केमिकल वर्क्स कंपनी लिमिटेड मध्यें पुष्कळ वर्षे नोकरी करून नागपूरास एक मोठे झालेले माझे मित्र) यांचे सहाय्यानें टिळक तलाव रुंदीचे बाजूनें या कडेहून त्या कडेपर्यंत तरून जाण्याइतकें पोहणें शिकलों ! याचा अर्थ मी २।३ मिनिटें पाण्यावर तरू शकत असें व ५०–६० फूट अंतर काटू शकत होतों. पण हें सर्व भीत भीतच ! म्हणून मी या प्रकारास पोहणे येणें असें म्हणत नव्हतों-नाहीं. लहान मुलांस, मला वाटतें, अण्णांची पोहणें शिकवण्याची रीतच शास्त्रशुद्ध व

चांगली आहे. मला पोहणें येण्याची त्यांची खटपट व इच्छा अशा प्रकारें कधींच सिद्ध झाली नाहीं.

माझ्या शिक्षणासंबंधीं दुसरी एक बाजू आतां सांगतों. १९१२ पासूनच असेल, अण्णांनीं आमच्या नील सिटी स्कूलच्या ड्रॉइंग शिक्षकांस मला व आत्माराम यास ड्रॉइंगचें खास शिक्षण द्य वयास सांगितलें. आम्ही इंग्रजी पहिलीमध्यें असतांनाच मेमरी, फ्री हॅन्ड. नेचर, मॉडेल, वगैरे चित्रकलेचे विविध प्रकार हौसेनें हाताळत असूं. मोठ्या मुलांना ड्रॉइंगच्या एलीमेंटरी व इंटरमीजिएट ग्रेड परीक्षांकरितां ते जेव्हां चित्रकला शिकवीत त्याच वेळेस स्टुलांवर बसून त्यांचेमध्यें आम्ही दोन लहान मुलें ही बसत असूं. एक डोळा, डावा, अर्धवट मिटून समोर ठेवलेल्या वस्तूंची पेन्सिलीनें मोजमापें घेऊन त्याप्रमाणें मॉडेल काढणें, चित्रें रंगवणें, झाडांच्या खांद्या हातीं धरून पानें फुलें काढणें, वगैरे, आम्ही आमच्या वयाचे मानानें पुष्कळ काम व पुष्कळ चांगलें करीत असूं असें वाटतें. आम्हास पुढच्या वर्षी एखाद्या ड्रॉइंगच्या परीक्षेस बसवण्याचा त्यांचा विचार होता. पण पुढें ते वारले, आम्ही नागपूर सोडलें, आणि माझें चित्रकला शिक्षणही संपलें! ... पण शिक्षक झाल्यावर माझी सुप्त चित्रकला मधून मधून जागी होई; आणि वर्गांत शिकवण्यास उपयुक्त होईल एवढी चित्रें मी सहज व बरीं काढीत राहिलों. वयाच्या ४५ च्या सुमारास मी विद्यार्थिनींस उत्तेजन यावें म्हणून १२"x१०" अशा आकाराचीं सर वॉल्टर स्कॉट, डिकन्स शेक्सपीयर यांची स्केचेस छापील चित्रांवरुन पाहून काढून वर्गांत लावून ठेवलीं होतीं. आणि तीं पाहून त्यावेळच्या इंग्रज इन्स्पेक्ट्रेस बाई कु. ट्वेलस यानीं या स्केचेसबद्दल माझी प्रशंसाही मुलींजवळ केली होती. माझें अनुकरण करून त्यानीं चित्रें काढावींत असें त्यांस सांगितलेंही.!

गायनकला मला शिकवण्याबद्दल अण्णांनीं विशेष खटपट त्यांचें हयातींत केली नव्हती. पण आमचे घरीं दर गुरुवारीं आणि रविवारीं रात्रीं सर्व कुटुंबीय एकत्र जमून भजन करीत असत, ९॥–१० वाजेपर्यंत. त्यांत जें काहीं गाणें येईल तें आम्ही गात असूं. या संबंधांत जास्त माहिती पुढें एका ठिकाणीं थोडी विस्तारानें देईन.

माझी मुंज झाल्यावर मला रोज सायंकाळीं रुक्मिणी मंदिरांतील पाठशाळेंत, संध्या शिकावयास जावें लागत असे. तेथें मी दररोज थोडी थोडी संथा घेई, व तो भाग सवडीनें पाठ करीत असें. हें संध्या शिकण्याचें काम मी नागपूरास होतों तों पर्यंत चाललें; तें पूरें झालें असावें असें वाटतें. पण खात्री नाहीं नागपूर सुटल्यानंतर आमची संध्याही सुटलीच!

१९१२ सालीं नागपूरांत डायरेक्ट मेथड पद्धतिनें इंग्रजी भाषेचें शिक्षण देणारे एक तज्ज्ञ गृहस्थ श्री. जी. के. सोमलवार ऊर्फ अण्णा हे आले असावेत; त्यानीं आपला तीन वर्षांत मॅट्रिक पर्यंत इंग्रजीचे शिक्षणाचा वर्ग ( दररोज एक तासभर शिक्षण देऊन हें कार्य साधणें ) आपल्या बिऱ्हाडीं वल्लीभाई बिल्डिंग, वॉकर रोड येथें,सुरु केला होता. त्यांची त्या वर्गाची फी त्यावेळीं रुपये दहा दरमहा होती. त्यानीं अण्णांस भेटून मला खास मागून घेतलें होतें. त्यांचे मतानें अण्णा हे एक नागपूरांतील थोर, सन्मान्य शिक्षण-तज्ज्ञ होते. तेव्हां त्यांस त्यांचे पद्धतिबद्दल खात्री पटवणें, त्यांचे मनांत या नव्या शिक्षणपद्धति बद्दल आस्था निर्माण करणें असें होतें. म्हणून त्यानीं मला त्यांचे वर्गांत फुकट शिक्षण देण्याबद्दल पाठविण्याची विनंती केली; अण्णांनीं मला वर्गात तर पाठवलें, पण पूर्ण फी देऊन! दरमहा ३।४ तारखेचे सुमारास सुर्ती दहा रुपये कागदांत गुंडाळून मजजवळ देण्यांत येत व मी ती फी नेऊन देत असें. या सोमलवार यांचे वर्गाबद्दल विस्तारानें कांहीं वेळानंतर लिहीन. याप्रमाणें माझे जादा इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था झाली होती.

गणित ते स्वतःच मला घरीं शिकवीत असत. माडीवर त्यांचे बैठकींत मला बाजूस बसून अभ्यास करावा लागे. त्यावेळीं ते आपलें काम करीत असत. मधून मधून मला विचारून माझी प्रगति कोठवर आली आहे, याची चौकशी करीत असत मला काम नेमून देत,आणि तेवढें करण्यास पुरेसा वेळ मिळे. काम संपलें तर खालीं जावून खेळण्यासही मोकळीक मिळे, काम तपासून पहातांना तपासणी कसून होई. उदाहरणार्थ गणितें-उदाहरणें सोडवावयास सांगितलीं असलीं तर ते नमुना म्हणून एखादें उदाहरण घेऊन तें कसें केलें याबद्दल चौकशी करीत आणि यावेळीं मी उडवाउडवी केली आहे, खोटें बोललों आहे असें उघडकीस आल्यावर मार मिळत असे. त्यांस मी खोटें बोललों तर फार राग येत असे. काम नाकारण्याची सोयच नसे,घरांतील इतर कोणाही मुलास,व्यक्तीस. आत्मारामास माझ्या प्रमाणें कामास अभ्यासास जुंपीत नसत. मला तो एका प्रकारें मजवर अन्याय वाटे. इतर मुलें जास्त नशीबवान् व मी स्वतः कमी नशीबवान् वाटत असें.

आतां थोडक्यांत माझी १९१२ मधील रोजची दिनचर्याच देतों. यावरून माझें शिक्षण कसें चौफेर चालू होतें याची कल्पना येईल. सकाळीं उठून स्नान करून व संक्षिप्त संध्या करून (चहा वगैरे कांहीं नसे, दूधही नसे) श्री. सोमलवार यांचे क्लासला जावून घरीं परत येणें. नंतर असल्यास शाळेंतील थोडा अभ्यास करावयाचा. ९॥

ला सर्वांची जेवणें सुरु होत. १० वाजतां जेवणें झाल्यावर १०॥–१०॥। पर्यंत असल्यास अभ्यास किंवा टंगळमंगळ करणें. शाळा घरापासून दोन मिनिटांच्या वाटेवर होती. दुपारीं ११ ते ४॥ पर्यंत शाळा असे. ५ पर्यंत खाणें खाऊन नंतर वेदशाळेंत ( रुक्मिणी मंदिरांत ) जावून संध्या पाठ करणें. तिकडूनच परस्पर रिंग घेऊन पळवून खेळून साडेसहापर्यंत घरीं दिवे लागणीचे आंत परत येणें. पुढें जेवणें झाल्यावर माझेकडून श्री गुरु–चरित्राचा रोज एक अध्याय मोठ्यानें वाचवून घेणें. अण्णा समोर बसत असत. घरांतील बायकामुलें ही जवळ बसत असत. हें वाचन देवघरा समोरील पडवीत चाले. त्यानंतर साधारणपणानें ९–९॥ च्या सुमारास आम्ही झोपत असूं. अण्णा स्वतः याच सुमारास गुरुवार व रविवार सोडून झोपीं जात; आणि पहाटें ४॥ वाजतां घड्याळाचा गजर लावून उठत असत. अशा प्रकारें माझा जवळ जवळ सर्व दिवस कोणच्या ना कोणच्या शिक्षणकार्यांत बांधलेला असे, मोकळा खेळावयास वेळच नसे. इतर मुलांत मिसळणें मनसोक्त खेळणें या गोष्टी मला वर्ज होत्या. त्यामुळें मला आत्मारामाचा थोडा हेवा वाटे! मी खोटें बोललों किंवा माझ्या कार्यक्रमांत कांहीं चुका झाल्या कीं मार, ताडन होई.अभ्यास झाला नाहीं तरी ताडन होई. आणि पुष्कळ वेळां अण्णांच्या भीतिमुळेंच त्यांचे पश्चात् जरी मी हुशारी दाखवली तरी त्यांचे समोर मी "ढ"–च ठरत असें. याचा त्यांस विषाद वाटत असावा राग येत असावा. म्हणून मला जवळ जवळ रोजच माराचा खुराक मिळे. यांत कदाचित् थोडी अतिशयोक्ति होत असेल, नक्की आठवत नाहीं म्हणून. पण या सर्वांचा परिणाम म्हणून १९१२ च्या अखेरी अखेरीस माझ्या मनांत या सर्व काचातून, संकटातून सुटका करून घ्यावयास घरांतून कोठेंतरी पळून जावें असा विचार डोकावत होता! पण तो प्रत्यक्षांत न येण्याचें कारणही घडलें. माझा एक मामा थोरला विष्णु, हा त्याच सुमारास एक दिवस घरांतून पळून गेला. तो साधु व्हावयास म्हणून गेला असावा असा लोकांचा तर्क होता. त्याचे करितां परसूमामा, परसूतात्या हे शोधाशोध करूं लागले. अखेर २।३ दिवसांनी एक दिवस विष्णुमामा स्वतःच पश्चाताप करून घरीं परत आला. तेव्हां एवढा मोठा, जवळ जवळ बावीस वर्षांचा विष्णुमामा बाहेर कुठें जगूं शकला नाहीं तर आपल्यासारख्या लहान मुलाची कथा काय ? तेव्हां घरांतच रहावें, आणि सोसावा जो काय आपला छळ(?) होत आहे तो; असे विचार मनांत येत; आणि घरांतून पळून जाण्याचा बेत मनांतून पळून जाई.

याच संदर्भांत अण्णांनीं "शास्त्रीय मराठी व्याकरण" हा त्यांचा प्रख्यात ग्रंथ कसा लिहिला त्याची माहिती सांगतों– माझे माहितीप्रमाणें त्या ग्रंथाची तयारी म्हणजे आधींच्या ग्रंथांचा अभ्यास, मनन, चिंतन, विचार करणें, टाचणें

करणें वगैरे काम ते उज्जयिनीस असल्यापासून १९१० पर्यंत सुमारें १४।१५ वर्षे करीत होते. एकदां १९०५ सालीं असेल, पुण्यास मुंबई सरकारनें व्याकरण व शुद्धलेखन विषयक एक सभा बोलावली होती आणि त्यावेळीं सरकारी शिक्षणखात्यानें सरकारचें प्रतिनिधित्व करण्याची संधि मोरोपंतांस दिली होती ! ● हा ग्रंथ नागपूरास लिहिला गेला. तो ४।५ महिनेपर्यंत लिहिण्याचें काम चालूं होतें. त्याकरितां चांगला जाड कोरा कागद आणून त्यास जाड टिकाऊ ब्राउन पेपरचें कव्हर घालून त्या वह्या शिवलेल्या होत्या. कदाचित् कांहीं एक भाग लिहून झाल्यावर वह्या शिवल्या जात असतील. त्यांचें अक्षर सुरेख असे. एक टाकी - ते टाकच वापरीत, (फाउन्टन पेन त्यावेळीं माहीत नसावें.) लेखन होई. सतत २।३ तास बैठक मारून लिहीत. उन्हाळयांत जेव्हां हें काम करीत, तेव्हां नागपूरी संत्रे कांहीं फोडी मधून मधून खात. डोक्यावर ओलें फडकें-पंचा पिळून टाकून ठेवीत .. त्यांच्या एकूण १८ वह्या प्रत्येक वहींत सुमारें ६०।७० पानें लिहिलेलीं अशा होत्या. त्या पुण्याम माझ्या घरीं १९३०-३२ पर्यंत शाबूत ठेवलेल्या होत्या हें मला माहीत आहे. त्यानंतर घरांत भाडेकरी होते. तरी १९४० सालचे सुमारासही त्या पाहिल्यासारखें वाटतें. पुढें मी घर १९५९ सालीं विकलें; त्यावेळीं घरांतील सामान मुलांनीं शनिवारपेठेंत त्यांचे आजोळीं आणून ठेवलें. नोकरीतून मी लवकरच मुक्त होणार होतों, तसा मुक्त झाल्यावर घरांतील मौल्यवान ग्रंथ-संग्रह व अशा या वह्यांसारख्या गोष्टी शोधून काढून त्यांचा कांहीं चांगला विनियोग करावयाचा विचार होता. पण पुण्याच्या पानशेत धरण फुटीच्या प्रकरणांत हा सर्व संग्रह चिखलमय झाला; त्याचा पूरा नाश झाला. हें हस्तलिखित एखाद्या संस्थेंत किंवा साहित्य परिषदे सारख्या ठिकाणीं देण्याचा विचार मनांत डोकावत होता. कांहीं कांहीं नामांकित ग्रंथ मी पूर्वी पुण्याचे S. N. D. T. कॉलेज आणि S. P. कॉलेज यांचे ग्रंथालयांस दिले ही होते. पण या हस्तलिखिताचा असा दुःखकारक शेवट झाला.

---

● या संबंधाची जास्त माहिती पुढें आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि: ....................

✲ ✲ ✲ ✲

## जी. के. ऊर्फ अण्णा सोमलवार यांची संस्था

इंग्रजी शिक्षणांत 'डायरेक्ट मेथड' या एका नव्या पद्धतीचा उदय १९०५–६ सालच्या सुमारास झालेला असावा. तिचा प्रयोगादाखल उपयोग १९१५ सालापर्यंत पुण्या–मुंबईतही होत असे. नागपूरांत प्रथम सोमलवार यांनीच ही पद्धति आणली होती. या पद्धतिमध्यें सुरुवातीपासून इंग्रजींत बोलण्यावरच भर देऊन शिक्षकानें व मुलांनींही ऐकून ऐकून बोलून बोलून इंग्रजी शिकावयाचें होतें. सोमलवार यांचेकडे इंग्रजी शिकावयास पुष्कळ लहान रंगीत चित्रांचीं पुस्तकें होतीं. पण विशेष म्हणजे एक कांचेचें मोठें कपाटभर वस्तु, खेळणीं, भरपूर चित्रें होतीं. एखादा पिंजऱ्यांतला पोपट आणून Cage, Parrot, वगैरे शद्ब शिकवले जात. खेळणीं पहावयास, हाताळावयास आम्हांस फार आवडे. आणि त्या त्या वस्तु पाहून त्यांचीं नांवें, कृति पाहून, करून, कृतिवाचक क्रियापदें आम्ही शिकत असूं. गोष्टी ऐकत असून पुनः पुनः वर्गांत वर्गाचे पुढें येऊन सांगत असूं. यामुळें शिक्षण फारच मनोरंजक वाटे. आणि आम्हास खूप इंग्रजी येई. २।३ महिन्यानंतर आम्हास लिपी शिकवण्यांत येऊन लेखन शिकवण्यांत आलें. आमचेकडून छोटचा छोटचा गोष्टी वह्यांत लिहून घेतल्या जात. त्या पद्धतिमुळें भाषा लौकर येई. शिकतांना गोडी वाटे. तास केव्हांच संपे !

अण्णा सोमलवार यांचे इतर विषय शिकवण्याचे वर्ग दुपारीं भरत. सर्वच विषय सुरुवातीपासून शिकवून पुढें पुढें केवळ ४।५ वर्षांत मॅट्रिकपर्यंत शिकवण्याची एक मोठी Academy त्यांनीं १९१५ चे सुमारास काढली होती. पुढें त्या Academy ची स्वतंत्र तीन मजली दीड–दोन लक्ष रुपये किंमतीची इमारतही त्यांनीं बांधली होती. सर्व कोर्सची फी २॥–३ हजार रुपये होती· आणि ती देणारीं बरींच मुलें त्यांचेकडे शिकत असत. मी स्वतः ही संस्था बहुधा १९२३–२४ मध्यें जाऊन पाहिली होती. त्यावेळीं अण्णा सोमलवार यानीं त्यांचे संग्रहामधून कांहीं एक अहवाल मला दाखवला. तो अहवाल १९१३ च्या एप्रिल मधील होता. अण्णा दामले व अण्णा सोमलवार यांनीं मिळून सोमलवारांच्या शाळेंतील एक वर्षभर इंग्रजी शिवलेलीं ५।६ हुशार मुलें आणि नील सिटी हायस्कूलमधील इंग्रजी ४ थी पूर्ण झालेलीं ५।६ हुशार मुलें एकत्र आणवून त्या सर्वांची अंदाजे २ तास एकत्र परीक्षा घेऊन त्या परीक्षेचा निष्कर्ष नोंदवलेला होता. सोमलवारांची मुलें एकंदरीनें नील सिटी हायस्कूलच्या मुलांशीं चांगली बरोबरी करीत होतीं असा हा निष्कर्ष होता. इंग्रजी संभाषण, लेखन, वाचन, गोष्ट सांगणें, नवी सांगितलेली पुनः सांगणें वगैरे दृष्टीनें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........... दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..............

सर्वांची परीक्षा, व सर्वांचे गुण दर्शक तक्ता ही मला पहावयास मिळाला.त्या प्रत्येक विषयांत दोन्ही संस्थांतील मुलांची तौलनिक तयारी कशी आहे याचा गोषवारा लिहिलेला आहे. हा अहवाल अण्णा सोमलवारांस फार मौल्यवान् वाटे. कारण त्यांत त्यांचे प्रयोगाची यशस्विता प्रत्यक्ष पाहून अनुभव घेऊन अण्णा दामल्यांसारख्या एका अनुभवी शिक्षण तज्ज्ञानें तो अहवाल तयार केलेला होता, हें त्याचें वैशिष्ट्य होतें. कोणा येरा गबाळाचें तें लिहिणें नव्हतें !

सोमलवारांच्या माझ्या सकाळच्या वर्गांत अंदाजें वीस एक मुलें होतीं त्यांत स्वतः सोमलवार यांचे दोन मुलगे व एक मुलगी असत. इतर विद्यार्थ्यांत श्रीमान टालाटुले घराण्यांतील एक मुलगा, श्रीमान सर गंगाधरराव चिटणवीस यांचा एक पुतण्या, बहुधा मनोहर, सुभेदार घराण्यांतील दोन मुलगे– एक हिस्लॉप कॉलेजसमोरच्या सुभेदार घराण्यांतील, आणि दुसरा कोतवालीसमोरच्या भागांत असणाऱ्या विभागांत राहणाऱ्या सुभेदार घराण्यांतील. यांत जरा लहानखुरा एक व दुसरा मोठा होता; आणि मी स्वतः. एवढीं नांवें मला आतां आठवतात, वर उल्लेखलेलीं सर्वच मुलें १० ते १२-३वयाचीं होतीं. मी, सुभेदार धाकटा आणि बहुधा पद्मा किंवा प्रमिला सोमलवार (मी नांव कदाचित् चुकत असेन) हीं मुलें सर्वांत लहान होतीं.

याच संबंधांत एक प्रसंग विशेष महत्वाचा आहे तो वर्णन केल्यावर या संस्थेबद्दलचें लिखाण आवरतों. तो प्रसंग असा–

सीताबर्डीवरील सरकारी " पटवर्धन हायस्कूल"मध्यें अलीकडच्या काळाप्रमाणें इंग्रजी शिक्षण–विषयक एखादा Seminar किंवा परिषद भरलेली असावी. तेथें मे. डायरेक्टर, इन्स्पेक्टर्स यांच्या सारखे गोरे अधिकारी आणि गांवातील किंवा मध्यप्रांतातील देखील असतील, कांहीं मान्यवर हेडमास्तर, शिक्षण तज्ज्ञ अशांचा एक मोठा मेळावा भरला होता. त्या मेळाव्यापुढें श्री. सोमलवार स्वतःच्या मुलांना तेथें नेऊन एक प्रयोग दाखवणार होते. त्या मेळाव्यांत अण्णा दामले हे एक मोठे निमंत्रित पाहुणे होते. आम्हा मुलांस तेथें ११॥-१२ पर्यंत जावयाचें होतें. सोमलवारांनीं आपलीं निवडक मुलें न्यावयाचीं होतीं. त्यांत मी होतोंच. माझा त्यावेळचा मित्र टालाटुलेही होता. तो घरचा खूप श्रीमंत. टांगाघोडेवाला होता. त्यानें मला स्वतःचे टांग्यातून नेण्याचें अभिवचन दिल्यामुळें आम्ही परस्पर टांग्यातून येऊं असें अण्णा सोमलवारांस सांगितलें होतें.

मी त्याप्रमाणें टालाटुलेकडे गेलों. तो आणि मी मिळून त्याचे टांग्यातून प्रथम सीताबर्डीकडे जातांना सध्यां शिवराज लिथो प्रेस आहे त्याचे जवळच्या डावीकडे

जाणाऱ्या एका बोळांतून कोठेतरी टालाटुल्यांच्या बागेकडे गेलों; आणि तेथून मग पुढे जाणार होतों. पण काय झालें कोणास ठाऊक. टांगा लौकर मिळण्याचीं चिन्हें दिसेनात. मला दोन्ही अण्णांची भीति वाटूं लागली. त्यांचेबरोबर सरळ जावयाचें तें सोडून देऊन हा टांग्यातून मित्राबरोबर जाण्याचा द्राविडी प्राणायाम आपण कां पत्कारला असें वाटलें. पण आतां दुसरा इलाज नव्हता. तेव्हां मी पायी पायींच परत आलों; सीताबर्डीवरून महाराज बागेकडे गेलों. त्याच भागांत कुठेतरी पटवर्धन हायस्कूल आहे अशी माहिती होती; पण प्रत्यक्ष पाहिलेलें नव्हतें तेव्हां तसाच कुठेतरी, कोणत्या तरी रस्त्यानें पायीं भटकत राहिलों. मधून चौकशी करीत होतों. पण कोणी कांहीं पत्ता लागू देईना ! अखेर बरीच भटकंती झाल्यावर एका सायकल स्वारास माझी दया आली. त्यानें माझी चौकशी करून मला पुढें दांड्यावर बसवून सायकलवरूनच पटवर्धन हायस्कूलमध्यें नेऊन सोडलें. मी तेथें गेलों तो एखाद्या सिंहाच्या गुहेंत एखाद्या कोकरानें प्रवेश करावा त्याप्रमाणें गेलों. मला दोन्ही अण्णांची भीति वाटली. माझ्या पराक्रमाची हकीगत त्यांस थोडक्यांत कळली. पुढच्या Seminar किंवा परिषदेच्या कार्यक्रमांत माझ्या प्रवेशामुळें थोडा खंड पडला, तो वजा जातां कार्यक्रम पुढें सायंकाळपर्यंत चालला. मी तिथें १।।चे सुमारास पोचलों असेन. २।।चे सुमारास अंदाजानें अर्धा तास या कार्यक्रमांत फराळाची विश्रांति होती. त्यावेळीं आम्हांस अण्णा सोमलवारांनीं फराळ दिला होता

या Seminar किंवा परिषदेमध्यें मध्यभागीं सन्माननीय असे दोन तीन गोरे साहेब (ब्रिटिश) होते; आणि त्यांचेजवळच उजव्या किंवा डाव्या बाजूस अण्णा दामले बसलेले होते एवढें आठवतें. अण्णा सोमलवारानीं आम्हा मुलांना कांहीं वेळ इंग्रजी शिकवून दाखवलें होते. त्यांचा एक "आदर्शपाठ" किंवा Demonstration Lesson झाला होता.

या घटनेचा पुढें काय परिणाम झाला तो कळला नाहीं. पण हो "डायरेक्ट" म्हणजे स्वाभाविक शिक्षण पद्धति पुढें रेटण्याचे दृष्टीनें तो एक प्रयोग असावा.

या निमित्तानें त्या प्रयोगास, अण्णा सोमलवारांस, अण्णा दामले यांस त्याकाळीं, त्या प्रांतांत कोणतें महत्वाचें स्थान होतें याची कल्पना येईल आणि माझे मतानें व माहितीप्रमाणें तें एक मोठें मानाचें स्थान असावें.

# नागपूरांतील कांहीं किरकोळ आठवणी

उजयिनी सोडून आम्ही नागपूरांत रहावयास प्रथम सीताबर्डीवरील एका घरांत आलों. पण सीताबर्डीपासून नील सिटी हायस्कूल हें फारच दूर म्हणून लौकरच बहुधा एक महिना दीड महिन्यांतच असेल, आम्ही सध्यां "महाराष्ट्र" कचेरी आहे त्याचे जवळपास समोरचे अंगास एका घरीं ( बहुधा श्री. ठेंगडी यांचें घर) महालमध्यें रहावयास आलों. तेथेंही आम्ही फार थोडे दिवस म्हणजे फारतर २।३ महिने असूं. याच घरांत पूर्वोक्त "अनुदिनीं अनुतापें" श्लोक शिकवण्याचा प्रयोग झाला होता. या घरांतच आम्ही एक काळी कपिला गाय पाळली होती. सीता_ बर्डीवरील घरांतही आमचेकडे गाय होती पण ही गाय फार मारकी निघाली. अण्णांना तिनें एक दिवस थोडा प्रसाद दिला. यामुळें पुढें ही गाय दान करण्यांत आली. घरीं गाय पाळण्यास अण्णांनीं उज्जयिनीस असल्या पासूनच सुरुवात केलेली होती. पण या नागपूरच्या कपिला गाईचें दान केल्यानंतर त्यांनीं गाय-पाळण्याचें सोडून दिलें. ही आमची शेवटची गाय

या नंतर चिटणवीस पार्कच्या गावाकडच्या बाजूला एका मोठ्या घरांत आम्ही रहावयास आलों. तें घर श्री. अण्णा पुराणिक यांचें होतें. एका प्रकारें आम्ही दर खेपेस नील सिटी हायस्कूलच्या जवळ जवळ येत होतों. या घरांत आम्ही जकळ जवळ वर्ष-दीड वर्ष तरी रहात होतों. या घराच्या मागच्या बाजूस पूर्वीं सांगितल्याप्रमाणें चिटणवीस पार्क होती. या मैदानांत पुष्कळ वेळां सर्कशी उतरत असत. तंबू ठोकीत, आपले खेळ करीत. सर्कशीमधील वाघ सिंहाच्या गर्जना रात्रीचे वेळीं मोठ्यानें ऐकावयास येत व आम्हीं आंथरुणांतही कधीं कधीं भिऊन दचकून उठत असूं. या घराचे समोरचे अंगास एक मोठें घर होतें. तेथें बहुधा सर्कस-मधील माणसें राहत असत तेथें प्रो.छत्रे यांचे सर्कशीतील एक मुलगी दोरावरुन चालणें, सायकल चालवणें याचा सराव करीत असतांना पाहिल्याचें आठवतें. मिस् आवडाबाई या नांवाची एक १५-१६ वर्षांची मुलगी छत्र्यांच्या सर्कशींत वाघ-सिंहाच्या कामांत भाग घेत होती, तिला ही पाहिल्याचें स्मरतें.

याच घरांत आम्ही रहात असतांना कवि केशवसुत यांची एक मुलगी वत्सला किंवा वच्छी ही तेथें आली होती. बहुधा आमचे थोरले काका चिंतोपंत किंवा भाऊ यानीं तिला आणली असावी. ती त्यावेळीं साधारणपणें ९-१०

वर्षाची असेल. दत्ती किंवा शकुंतला हिचेपेक्षां ती थोडी मोठी होती. ती बळकट दिसत असे; तिला समजूत कमी होती. कदाचित् आपले आईवडील गेलेले, आपणांस कोणीच जवळचें प्रेम करणारें नाहीं या जाणीवेचा सुप्त परिणाम ही तिचेवर झालेला असेल. काय तें आज नक्की सांगतां येणार नाहीं. पण हे केवळ माझे तर्क आहेत. ती भित्री, बुजरी होती. मी पुढें १९२८ सालीं तिचे घरीं कोकणांत गेलों असतांना ही ती तशीच होती. घरांत त्यावेळीं खाष्ट दीर सासू, नणंदा, जावा होत्या. नवरा ही थोडाफार तसाच. याचा परिणाम त्या मुलीवर त्या घरींही तसाच झालेला असेल.

बहुधा त्याच वेळीं भाऊंनीं – चिंतोपंतांनीं आपला मुलगा परशुराम उर्फ तात्या यास शिक्षणाकरितां नागपूरास आणला असावा. पूर्वी तो फैजपूर येथें कवि केशवसुतांकडे होता. त्याची व केशवसुतांची ही वत्सला व तिच्याहून मोठी मुलगी मनू यांली चांगली ओळख होती. मनू आतां-त्यावेळीं-लग्नाची झालेली; म्हणून तिच्या विवाहाचा अण्णांच्या सहकार्यानें विचार करावा, तात्यास ब वच्छीस शिकण्यास नागपुरास ठेवावें अशा विचारानें भाऊ त्यांस घेऊन आले असावेत.

एक दिवस केव्हां तरी नेहमींप्रमाणें तात्यानें वत्सलेस फारच चिडवून त्रास दिला असेल किंवा त्यांची थोडी मारामारी झाली असेल. पण त्यामुळें अण्णा तात्यावर फार रागावले. त्यांनी तात्यास धुणी वाळत घालण्याची आमचे घरीं एक जाड वेताची ४।।-५ फूड उंचीची काठी होती त्या काठीनें चोपलें ! त्यामुळें तात्या नरम आला. आणि त्यापुढें त्यानें अण्णांची भीति, धास्ती घेतली असेल त्याचप्रमाणें माझ्या आठवणीप्रमाणें बहुधा तात्याला अण्णांचे हातचा तोच पहिला व शेवटचा मार, प्रसाद !

पण पुढें लौकरच भाऊ वत्सलेस घेऊन कोकणांत गेले. तात्या शिकावयास नागपूरांतच राहिला. पुढे लौकरच मनूचें लग्न कोकणांत झालें असावें. तिचे लग्नाकरितां कांहीं रक्कम २५०–३०० रुपयांपर्यंत अण्णांनीं दिली होती. वत्सलाचें लग्नही १९११ सालपर्यंत पुढें कोकणांत झालें. त्याचप्रमाणें चिंतोपंत ऊर्फ भाऊ यांचा थोरला मुलगा पांडुरंग याचाहि विवाह त्याच सुमारास झाला. त्या दोन्ही विवाहांकरितां आर्थिक मदत अण्णांनीं नागपूराहून केली होती.

अण्णा पुराणिक यांचे घरांतील एक गम्मत आतां सांगतों– शिमगा किंवा पाडवा किंवा असाच दुसरा कोणता तरी सण असेल. पुरणपोळीचा बेत होता.

अण्णांनीं मला फार आग्रह करून खाऊ घातलें. मलाहि पुरणपोळी आवडत असे, आवडते अजूनहि. आमचेकडे माझी आई व आत्याबाई दोघीही पुरणपोळ्या फार उत्तम करीत असत. पण त्यांचा व्यास साधारणपणानें १०।११ इंच अशा करीत असत. पुष्कळ ठिकाणीं याहून मोठ्या पुरणपोळ्या खास मोठ्या तव्यांवर करतात.आम्ही कोकणांतले, मूळचे: म्हणून पुरणपोळी तूपाबरोबर जशी खातों, त्याचप्रमाणें दुधाबरोबर आणि ओल्या नारळाच्या दूधाबरोबरही खातों. या ओल्या नारळाच्या दुधाला एक निराळीच चांगली चव असते. मी त्या दिवशीं चांगल्या पांच पोळ्या, मोठ्या माणसांच्याबरोबरीनें खाल्ल्या ! आणि जेवल्यानंतर १२ चे सुमारास झोपी गेलों रात्र झाली तरी उठलों नाहीं; जो दुपारीं निजलों तो दुसरे दिवशीं सकाळीं जागा झालों ! त्या पोळ्या मला पचल्या होत्या; मी आजारी पडलो नव्हतों. पण पूर्वीं कधींही झोपलों नव्हतों एवढा वेळ झोपल्यामुळें रात्रीं कुटुंबीय मंडळीस माझेबद्दल जरा काळजी वाटली होती ! दुसऱ्या दिवशीं मी नित्याप्रमाणें हिंडू फिरूं लागलों, माझ्या दैनंदिन कार्यक्रमांत कांहींच व्यत्यय आला नाहीं., फरक पडला नाहीं.

या नंतर आम्ही वॉकररोडनें सिटी स्कूलच्या बाजूकडे आणखी पुढें सरकलों. आणि अण्णा पुराणिकांचें घर ज्या बाजूस एका बोळांत होतें त्याच्या विरुद्ध बाजूस एका बोळांतच, (जवळून एक नाला वाहत होता) श्री गोपाळराव गजराथी यांच्या मुख्य राहत्या घरासमोरच्या एका लहान स्वतंत्र घरांत रहावयास गेलों. हें घर त्यावेळीं नवें बांधलेलें होतें. आजही तें पूर्वीसारखेंच आहे. या घरांत आमचें वास्तव्य १९१०-११ मध्यें होतें. त्यासालीं आकाशांत पहाटेस आणि क्वचित् सायंकाळीं एक शेंडेनक्षत्र किंवा धूमकेतू दिसत होता. हें शेंडे नक्षत्र म्हणजे एक चमचमीत, प्रकाशमान तारा, आणि त्यास वरचे अंगास एक प्रकाशमय शेपूट किंवा फांदी, (नवलकोल ज्याप्रमाणें फळ आणि त्यापासून वरचे अंगास त्याचीं उंच गेलेली लांब अशी ३।४ पानें) असें हें शेंडे-नक्षत्र होतें, माझ्या आजपर्यंतच्या आयुष्यांत मी शेंडे नक्षत्र असें त्याच वेळीं पाहिलें. आमच्या अण्णांनी सर्वच कुटुंबीयांस मुद्दाम पहाटेचे वेळीं उठवून गच्चीवरून तें दाखवलें. तें८।१५ दिवस रोज दिसत होतें. याचें नाव हॅलेचा धूमकेतु असें मागाहून ऐकल्यासारखें वाटतें. हें नांव चुकीचेंही असेल....

या धूमकेतूचा वाईट परिणाम लौकरच जगाला दिसला. त्यावेळेस इंग्लंडवर राज्य करणारे राजे सातवे एडवर्ड, दि पीस मेकर, हे त्या धूमकेतुच्या दर्शनामुळें नंतर लौकरच वारले, ख्रिस्तवासी झाले. ते त्यावेळीं हिंदुस्थानचे

बादशहा होते. हा धूमकेतु सर्व जगांतच दिसत होता असें ऐकलें. म्हणून त्याकाळीं ज्या साम्राज्यावर सूर्य कधींही मावळत नाहीं अशा साम्राज्याचे सम्राट मरण पावणें ही जगालाच दुःखांत पाडणारी अशी एक घटना झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. विशेषतः त्यांची पदवी "शांतता निर्माण करणारे" ही होती. त्यामुळें ही घटना जास्त दुःखदायी ठरली. पुढें १९१४ मध्यें महायुद्ध सुरु झालें.

नागपूरकडे लहानपणींच मुलांस रेशीमकाठी उमरेडी धोतरजोडी घेऊन नेसावयास लावावयाचा प्रघात होता. त्याप्रमाणें मलाहि रेशीमकाठी धोतर प्रथम या गोपाळराव गुजराथी यांच्या वाड्यांत नेसावयास मिळालें. प्रथम प्रथम त्याचा बांगा होई, व त्रास वाटे. विशेषतः शौचकूपांत तर माझी पंचाईत होत असे. मी सगळ सर्व धोतर सोडूनच विधि उरकत असे व पुनः नेसून बाहेर येई. त्यामुळें मला शौचास फार वेळ लागत असे. इतर मोठ्या मंडळीस वाटे, मी आंत करतों तरी काय, झोपबीप तर घेत नाहीं! एक दिवशीं दुपारीं माझा हा सर्व प्रकार अण्णांचा नजरेंत आला. आणि त्यांनीं मला धोतर न सोडतांही शौचकूपांत कसें वावरावें हें प्रात्यक्षिक करवून शिकवलें. त्यानंतर मग माझे शौच विधिबद्दलचा, वेळ लागण्याबद्दलचा गैरसमज आपोआपच दूर झाला! ही गोष्ट खरोखर न सांगण्यासारखी असतांहि ती. अण्णा हे जातिवंत शिक्षक कसे होते, आणि ते मुलांची किती काळजी घेत असत, अगदीं क्षुल्लक गोष्टींतही ते किती काळजी घेत तें दर्शवण्याकरितांच ही गोष्ट मुद्दाम लिहिली.

बादशहा पंचम जॉर्ज हे भारतास भेट देण्यास १९११–१२ मध्यें आले होते. डिसेंबरांत दिल्ली येथें मोठा थाटाचा दरबार झाला. भारताची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीस नेण्यांत आली. त्या भारतभेटींत त्यांनीं नागपूरासही एक धांवती भेट दिली होती. राज्यारोहणानिमित्त अनेक आनंदाचे समारंभ झाले होते. मला आठवतें आहे, त्याकाळीं सिनेमा (मूक चालती चित्रे) नसत; पण त्यांचे आधींचे पडद्यावरचीं चित्रें दाखवणारे ( – बायास्कोप–हें नांव त्यांस वापरलेलें आठवतें) कार्यक्रम, म्युनिसिपल टाउन हॉलमध्यें मुलांकरितां खास करण्यांत आले होते. मुलांस खाऊ बाटण्यांत आला होता. त्याचप्रमाणें चांदीच्या रुपयासारखे दिसणारे, बादशहांचा मुखवटा असलेले बिल्ले, रंगीत रिबन व सेफ्टी पिनसह शर्टांस किंवा कोटावर लावण्यास मुलांस देण्यांत आले होते. शुक्रवार तलावातल्या बेटावरून शोभेचें दारूकाम उडवण्यांत आले होतें. या सर्व गोष्टींमुळें आम्हा मुलांस आनंद वाटला होता.

ज्या दिवशीं बादशहा नागपूरास येणार होते, तो, दिवस फार धामधूमीचा होता. दिवस हिवाळ्याचे म्हणून उन्हाचा त्रास वाटला नाहीं. दुपारीं १०।११ पासूनच सर्व शाळांतील मुलांस रांगा करून सीताबर्डीच्या पुलाखालून टेकडी-

खालच्या मैदानांत त्यांच्या त्यांच्या ठरवून ठेवलेल्या जागीं बसवण्यांत आलें. त्यांचे हातीं लहान लहान निशाणें, कदाचित् यूनियन जॅकचीं असतील, देण्यांत आलीं होतीं. त्यावेळीं नागपूरचें रेल्वे स्टेशन सध्यां आहे त्याचे समोरचे गावाकडचे बाजूस व फार लहान असें होतें. आणि सीताबर्डीच्या टेकडीवर सध्यां ही एक लहानसा त्यावेळची स्मृति दर्शवणारा खांब उभा आहे त्या ठिकाणीं एक शामियाना उभारलेला होता. बादशहा त्या शामियान्यांत यावयाचे होते, त्या ठिकाणाहून सध्यांच्या स्टेशनकडे तोंड करून उभें राहिल्यास डाव्या हाताकडील भागाकडून टेकडीवर जाण्याचा रस्ता तयार केलेला होता. रस्त्यावर स्वागतास त्यावेळचे नागपूरचे लेफ्टनंट गव्हर्नर आदि सरकारी अधिकारी, नागपूरचे श्रीमंत रघोजीराव राजे व श्रीमंत लक्ष्मणराव राजे भोसले बंधु, आणि इतर मोठे मोठे पुढारी हजर असतीलच. कदाचित गव्हर्नर जनरल स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी देखील हजर असतील. हजारों लोक टेकडीचे खालचे अंगास बादशहांचे स्वागतास व त्यांचें दर्शन घेण्यास जमा झाले होते, औत्सुक्यानें पुढील घटना पहात होते. अशा प्रकारें सर्व शाळांतील मुलांबरोबरच त्यांचे शिक्षक, हेडमास्तरही आलेले होते. अण्णा देखील याच घोळक्यांत होते.

होता होतां टेकडीवर हालचाल दिसूं लागली. लष्करी बॅन्ड वाजू लागले दोनच्या सुमारास बादशहा आले, आले अशा भूमका उठूं लागल्या. आणि ते खरोखरीच २।।-३ चे सुमारास त्यांचे शामियान्यांत आले. त्यांचे पुढें कोणीतरी लोक-पुढाऱ्यांनीं एक मानपत्र वाचून दाखवलें. पुष्कळ वेळ टाळ्यांचा कडकडाट होत होता. बादशहांचा जयजयकारहोत होता.अर्धा पाऊण तासांतच बादशहा टेकडीवरून खालीं उतरले.ते पायींच खालींवर आले असावेत, त्यानंतर पायथ्या खालच्या समुदायास तसेंच बसवून ठेवलेलें होतें. चार वाजण्याच्या सुमारास एक पांढरी शुभ्र, तीन डब्यांची खास आगगाडी मागच्या बाजूनें सीताबर्डीच्या रेल्वे पुलावरून जातांना दिसली. त्या खास गाडीनें बादशहा मुंबईकडे रवाना झाले. आगगाडी निघून गेल्यावर अर्धा पाऊण तास झाल्यावर पुन: मुलांना रांगारांगानीं आपापल्या शाळांकडे जाण्यास अनुज्ञा मिळाली; आणि मुलें सायंकाळपर्यंत आपापल्या घरीं गेलीं. अशी बादशहांची नागपूर शहरास झालेली भेट मी स्वत: डोळ्यानें पाहिली आहे.

## "दसरा" व "मोहरम"

नागपुरांतील त्या काळच्या कांहीं सार्वजनिक उत्सवांची मिरवणुकांची माहिती दिल्याशिवाय हें प्रकरण अपूर्ण राहील म्हणून त्याबद्दलची माहिती पुढें देतों—

श्रीगणपति उत्सव हा लोकमान्य टिळकांनीं महाराष्ट्रांत सुरू केला. त्या निमित्तानें राष्ट्रीय जागृति करणारी व्याख्यानें, प्रवचनें, मेळे व गाणीं–पदें इत्यादि कार्यक्रम होत असत. पण मी नागपुरांत असलेला काळ म्हणजे १९०८ ते १९१३ चा. हा काळ राष्ट्रीय चळवळीस दडपून टाकण्याचा काळ. भरीस प्लेगची साथ दरसाल भेटीस येऊन हजारों माणसें मृत्युमुखी पडत, घरोघर. त्यामुळें उत्साह नष्ट झालेला असा होता. यामुळें माझ्या माहितीप्रमाणें हा उत्सव सार्वजनिक स्वरुपाचा व मोठ्या प्रमाणांत नागपूरांत त्यावेळीं होत नसावा. गणपति विसर्जनही सार्वजनिक स्वरुपाचें होत असे कीं नाहीं तें आठवत नाहीं. आमचे घरीं श्रीगजाननाची प्रतिष्ठापना होवून ५ दिवस गणपति राहत असत; आणि गौरीं-बरोबर त्यांचे विसर्जन होई.

पण या संबंधांत श्रीमंत राजे रघोजीराव यांचे रुक्मिणी मंदिरांत एका फार मोठ्या श्रीगणेश मूर्तिची स्थापना, पूजा–अर्चा होत असे; सजावट होई हें आठवतें. ही मूर्ति फार मोठी, आणि सजावट, सोन्या–मोत्यांचे दागिने वगैरे भोसले घराण्याच्या इभ्रतीस साजेल अशी असे. तुलनेनें पुण्यांतील मंडईचा (सरस्वती विरहित) गणपति, किंवा बाहुलीच्या हौदाजवळचा गणपति या मूर्ति रुक्मिणी मंदिरांतील "मस्कऱ्या"(?) (नांवांत कदाचित् किरकोळ चूक होत असेल) गणपतिच्या मूर्तिपेक्षां थोड्या कमीच पडतील आकाराला.मी ही मूर्ति कांहीं वर्षे पाहिलेली आहे. श्रीरुक्मिणी मंदिराचें आवार, त्यांत बकुळीच्या फुलांचा सुवास दरवळलेला असावयाचा, आणि एकंदर वातावरण प्रसन्न असावयाचें.

पण दसरा हा सण मात्र मोठ्या थाटानें साजरा होत असे. दोनहो राजांच्या स्वाऱ्या आपापल्या लहानशाच कां होईना पण लवाजम्यानिशीं शिलंगणास गावाबाहेर सक्कर दऱ्यावर जात असत. या मिरवणुकीस "दसऱ्याची स्वारी" असेंच म्हणत असत. ही मिरवणूक श्रीमंत लक्ष्मणराव राजे यांचे बाड्यावरून पुढें जात असे. पण मिरवणुकींत पहिला मान श्रीमंत रघोजीराव राजे यांस असे. दहा पंधरा किंवा वीस पंचवीसही असतील, घोडेस्वार, त्यांचे वरचा एक इंग्रज अधिकारी, अबदागिरी, मोर्चेले असणाऱ्या काठ्या, दरबारी पोषाखांतील नोकरवर्ग चालत असे. त्यांचे मागें सजवलेले मखमली कापडाच्या मोठमोठ्या झुली पाठीवर घातलेले, रंगवलेले, अंबाऱ्या पाठीवर घातलेले असे ८।१० हत्ती असत. श्रीमंत रघोजीरावांचे पुत्र श्रीमंत फत्तेसिंगराव भोसले हे पुढें, मध्यें एका मोठ्या हत्ती-वरच्या अंबारींत श्रीमंत रघोजीराव भोसले, आणि त्यांचे पाठीमागें अशाच एका उमद्या हत्तीवर अंबारींत श्रीमंत लक्ष्मणरावराजे असत. ही मिरवणूक पहाण्यास

रस्त्यावर दुतर्फा लोकांची, नागरिकांची खूप गर्दी असे. मिरवणूक परत येई ती याच रस्त्यानें आणि दिवे लागणीचे सुमारास परत येई.

यानंतर विशेष सांगण्यासारखा सण, उत्सव म्हणजे नागपूरचा मोहरम होय. हा सण जरी मुसलमानांचा असला, तरी त्या सणांत प्रचंड उत्साहानें अनेक हिंदु सामील होत असत. एवढेंच नव्हे तर नागपूरचे दोनही राजे स्वतः उत्साहानें भाग घेत असत. बडोदें, ग्वाल्हेर येथील नरेश फार मोठ्या प्रमाणावर या उत्सवांत भाग घेत असत. आणि एकंदरींत देशांत हिंदु–मुसलमान संबंध निदान त्याकाळीं तरी सलोख्याचें होते, ते बिघडवण्याचें पातक इंग्रजांचेंच आहे.

शहरांत अनेक ठिकाणीं ताबूत बसवले जात. "धुल्ला! धुल्ला!" म्हणून दहा-वीस जणांचा घोळका 'सवाऱ्या' नाचत नाचत (पुढे एका काठीस कांहीं हार अडकवलेले) अशा प्रकारें जात असत. शें-दोनशें तरी "वाघ" (लहान मुलांप्रमाणें वयस्कही) असत. ताशे-वाजंत्र्यांच्या नादांत मुख्य सणाच्या आधीं ५।६ दिवसांपासून मिरवत असत. हातांत वाघनखांसारखें कांहीं तरी घेऊन पवित्र्यावर चालत वाघ नाचत असत. कांहीं वाघ सुरेख कसरती करून दाखवीत. बांबूच्या काठ्या उंच धरावयाच्या व त्यावर चढलेले वाघ कांहीं कसरती करीत असत. त्या आकर्षक दिसत. वाघांच्या मिरवणुकी रात्रींच्यावेळींही दिवे लावून, मशाली लावून त्यांचे उजेडांत निघत.

कत्तलची रात्र ही सर्व गावांस जागरणाचीच असे! त्या दिवशीं जिकडे तिकडे आरडाओरड, वाघांच्या मिरवणूका नाचत चालत असत. ताबूतांची मुख्य मिरवणूक दुपारीं असे. तीन–चार तास ही मिरवणूक चाले. मिरवणुकीचा थाट दसऱ्याच्या मिरवणुकीचाच असे. त्यांत कोणतीहि कमतरता नसे. डोले किंवा ताबूत, "धुल्ला! धुल्ला!" करणाऱ्यांच्या "सवाऱ्या", "वाघ" यांची भर असे. ताबूत खूप सुरेख व उंच उंच असत. कांही दोन तीन ताबूत तरइतके उंच असत कीं ते शुक्रवार दरवाजामधून पलीकडे शुक्रवार तलावाकडे जात नसत, तेथूनच परतत. त्यांचे विसर्जन शुक्रवार तलावांत होई.

मी पुढें १९३३ च्या मे महिन्यांत मोहरमची मिरवणूक बडोदे येथें पाहिली आहे. त्यावेळीं तेथील सेंट्रल लायब्ररीमध्यें बसून ती मिरवणूक पाहिली. ती मिरवणूक बडोद्यासारख्या श्रीमंत संस्थानांतीस मिरवणूक होती. नागपूरचें संस्थान केव्हांच ब्रिटिशांनीं गट्ट करून टाकलेलें. तेथील श्रीमंती अक्षरशः शेकडों हत्ती व उंटावरून वाहून धुवून नेलेली. तरीही एकाप्रकारें अक्षरशः नागवणूक झालेल्या भोसल्यांच्या नागपूरांतील ती मिरवणूक बडोद्याच्या मिरवणुकीशीं चांगल्या प्रकारें सामना देऊं शकली असती, अशी थाटाची असे. श्रीमंत भोसले-शाहीच्या वैभवाची चुणूक नागपूरांत या दोन मिरवणुकींच्या निमित्तानें लोकांच्या नजरेस पडत असे.

## नागपूरांतील प्लेगचा दरसालची वारी

आम्ही नागपूरांत होतों तेव्हां जवळ जवळ दर वर्षी प्लेगोबा त्या शहरास भेट देत असत. त्या निमित्त शाळा बंद पडणें, सुट्या लागणें, लोकांनीं गांव, शहर सोडून दूर जाणें हा दरसालचा कार्यक्रमच बनलेला होता, नाहीं म्हणावयास १९१२-१३ या सालांत मात्र प्लेगोबानीं नागपूर शहरास भेट दिली नसावी कारण आम्ही दुसरीकडे कोठे गेल्याचें आठवत नाहीं.

प्लेग निमित्तानें आम्ही एकूण ४ वर्षे निरनिराळया गांवीं गेल्याचें आठवतें, त्याचा अनुक्र रामटेक, कामठी, रामटेक व बुरीबोरी आणि स्थळें बहुधा अनुक्रमानें १९०८-९, १९०९-१०, १९१०-११, आणि १९११-१२, अशीं असावींत. पैकीं पहिल्या १९०८-९ सालच्या रामटेकच्या आमच्या वास्तव्यांत मला पोहणें शिकवण्याचा कार्यक्रम प्रयत्न झालेला होता. आम्ही या ठिकाणीं किती महिने काढीत होतों, त्या ठिकाणीं कोणकोणत्या संस्मरणीय हकीगती घडल्या त्या आतां कथन करतों .

प्रथम रामटेकचें वर्णन देतों. हें निसर्गरमणीय असें स्थळ नागपूरपासून जवळ जवळ ३० मैल दूर आहे. आगगाडीनें व मोटारनें दोन्ही प्रकारें आतां येथें जातां येतें. या ठिकाणीं दण्डकारण्यांत श्री रामचंद्र असतांना कांहीं काळ त्यानीं येथे घालविला होता असें म्हणतात. श्रीरामचंद्र यांचे सेवक म्हणजे वानरें या ठिकाणीं असंख्य आहेत. एका उंच टेकडीवर श्रीरामचंद्र, लक्ष्मणजी, वराह अशीं देवळें आहेत. जवळपास अन्य पुष्कळ टेकड्या आहेत. मधून मधून तळीं आहेत. एका टेकडीवर नागार्जुनाचें देऊळ आहे डोंगरावर झाडी आहे. त्यामुळें हें ठिकाण वर म्हटल्याप्रमाणें निसर्ग रमणीय आहे श्रीरामचंद्रांचें देवालय असलेली टेकडी पुष्कळ उंच असून तिला दगडी पायऱ्या बांधलेल्या असून त्यांची संख्या सुमारें ५०० आहे. या पायऱ्या जिन्यासारख्या जवळ जवळ १०।१५ पायऱ्या झाल्या कीं एक मोठी लांब पायरी. नंतर पुनः १०।१५ पायऱ्यांचा दुसरा एक जिना; पुनः विसाव्याकरितां एक मोठी पायरी, अशा म्हणजे अनेक जिन्यांचा समुदाय अशा प्रकारें बांधलेल्या आहेत. दुसऱ्या एका बाजूकडून – यास क्षेत्र रामटेक म्हणतात – देखील पायऱ्या आहेत. त्या थोड्याफार पुण्याच्या पर्वती प्रमाणें लांबलांब, मोठ्या अशा पायऱ्या आहेत. या बाजूकडून पाऱ्यांची संख्या कमी, पुष्कळ कमी आहे.

श्री रामचंद्रजींच्या देवळा सभोवतीं पुण्याच्या पर्वतीच्या मुख्य देवळा-सभोवतीं जशा भिंती तट, आहे, तसाच रामटेकासही आहे. पण देवळाचें आवार जास्त मोठें सभामंडप जास्त मोठा आहे.

आजू बाजूस डोंगरांवर सीताफळांच्या झाडांची खूपच गर्दी आहे. १९०८–९ सालीं जेव्हां आम्हांस अण्णांनीं गडावर नेलें होतें त्यावेळीं आम्हा मुलांस त्यानीं सर्व गड पायींच चढावयास लावलें. एक दोन जिने संपल्यावर आम्ही दमलों, खालीं पायऱ्यावर बसलों तर, "आतां आणखी २।३ जिने चढले कीं संपलें, चला" असें प्रोत्साहन देऊन व पूर्ण उंचीची कल्पना न देऊन त्यानीं आम्हास वरपर्यंत चढवलें. मध्येंच पुष्कळ वानरें भेटत, इकडून तिकडे उडया मारीत पळत जात. त्यांच्या लीला आम्ही पहात असूं. वानरींच्या पोटाला चिटकून खालचे अंगांस त्यांची लहान पिलें बिलगलेलीं असत. कधीं कांहीं वानरें खावयास मागत, लोकांनीं दिलेलें खात बसत. टेकडीवरील सीताफळें खात बसत. कांहीं वानरी आपल्या पिल्लांच्या किंवा आपल्या डोक्यांतील उवा, पिसवा, निवडीत बसत. असला देखावा पाहण्यास, त्यांच्या लांब लांब उडया मारीत पळणें, झाडावर चढणें, खाली उडया टाकणें, मोठे करमणुकीचें असे. या वानरांचा गावालाही बराच उपद्रव आहे.

प्रथम मी गडावर गेलों त्यावेळीं श्रीरामचंद्रांच्या देवळांत एखादी कथा चालू असावी. श्री लक्ष्मणजींच्या थोडया अंतरावर असलेल्या देवळांत पूर्वीं कधींच न पाहिलेली एक गोष्ट दृष्टीस पडली. कांहीं वाद्यें वाजवलीं जात होतीं आणि एक मोठी बाई पायांत साखळया तोरडया किंवा घुंगरें बांधून नाचत होती यापूर्वीं कधींच असा देखावा पाहिलेला नव्हता म्हणून ही गोष्ट चांगली स्मरणांत राहिली. दर आठवडयास ठराविक वारीं कथा कीर्तन, पुराण, शुक्रवारीं कलावंति-णीचा नाच, चौघडा, वाजंत्रीवादन वगैरे कार्यक्रम, निरनिराळया असामींस वार्षिक नेमणुका करुन देऊन देवस्थानकडून देवस्थानचे पंचांकडून, केले जातात. गडास पायऱ्या कोणी केव्हां बांधल्या, देवस्थानास पैसा, उत्पन्न कोणी, केव्हां दिलें या गोष्टी मला माहीत नाहींत. पण नागपूरकर भोसल्यांचा या कार्यांत कांहीं हिस्सा आहे हें ऐकल्याचें आठवतें. अर्थात् श्रीरामजयंतिचा उत्सव चैत्र महिन्यांत येथें फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

हें रामटेक गांवच कांहीं संस्कृत विद्वान् लोकांच्या मतानें कवि कुलगुरु कालिदास यांच्या मेघदूत काव्यांतील "रामगिरी" हें ठिकाण आहे. कांहीं विद्वा-नांच्या मतानें "रामगिरी" हें ठिकाण सध्यांच्या मध्यप्रदेशांत आहे, तें रामटेक नव्हे; पण रामटेकमधील सामान्य लोक एवढेंच बोलतात कीं श्रीरामचंद्र अयोध्येहून

लंकेकडे किंवा लंकेतून पुष्पकविमानांतून अयोध्येस परत जातांना या गांवी राहिले होते, त्यानीं थोडी वस्ती केली होती; ते "टेकले" होते, या कारणामुळें,या स्थळास "राम-टेक" हें नांव मिळालें आहे. या स्थळाबद्दलच्या विद्वानांच्या समजूती आणि सामान्य लोकांची समजूत यांची माहिती मनोरंजक आहे, यांत कांहीं शंका नाहीं. यांतील सत्य-असत्य काय असेल तें असो, हें एक निसर्गसुंदर श्रीरामचंद्राचें देवालय असणारें क्षेत्रस्थान आहे ही गोष्ट मात्र सत्य असून रामभक्तांनीं या ठिकाणास अवश्य भेट द्यावी असें मी म्हणतों.

रामटेक या गावीं दुसऱ्या खेपेस जेव्हां आम्ही गेलों होतों म्हणजे १९१०-११ साल, त्यावेळीं तेथें निदान ३।४ महिने आम्ही राहिलों असूं. त्याचें कारण त्यावेळीं तेथून एके ठिकाणीं खेडचांत बैलगाडींतून रात्रीचे वेळीं आम्ही हुर्डा खावयास गेलों होतों असें आठवतें, तर रामनवमीचा उत्सवही त्याच वर्षीं पाहिला होता. म्हणजे हा काळ ३।४ महिन्यांचा होतो. यावेळीं मी वयानें थोडा मोठा असल्यानें यावेळच्या आठवणी जास्त स्पष्ट अशा आहेत.

आमचें घर लहानसें स्वतंत्र होतें. एक लहानशी माडी देखील होती. पाण्याकरितां समोरच्या घरांतील अति खोल आड-विहीर होती तिचें पाणी हातानें ओढून काढून वापरावयाचें असे.

हुर्डा म्हणजे कोवळ्या ज्वारीचीं कणसें शेण्या, गवत, काडचा, यांचे आगटींत, एका खडचांत भाजणें व तीं हातानें चोळून ज्वारीचे भाजलेले दाणे खाणें होय. वऱ्हाड नागपूर या भागांतील शेतकरी वर्गांत मालगुजारांत हुर्डा-पार्टीचें जबरदस्त वेड आहे. आपल्या गावीं शेतावर इष्ट मित्रांस हुर्डा-पार्टीला बोलावणें हा एक घरंदाजपणा, मोठेपणाचें लक्षण मानतात. हुडर्याकरितां निरनिराळ्या जातींच्या खास जातींच्या कणसांची लागवड केलेली असते. पार्टीला केवळ हुर्डा खाणें हाच कार्यक्रम नसतो हुडर्याबरोबर कमीत कमी वांग्यांचें भरीत, दही साखर (सायीचे दही), गूळ खोबरें चटणी वगैरे सरंजाम ठेवावयाचा असतो. याशिवाय मग श्रीखंडाचा बेत, मेजवानी; गायनाचा, नाचाचा कार्यक्रमही फार जादा बेत म्हणून असतो कोठें कोठें. आम्ही कोणा एका ओळखीच्या गृहस्थांच्या जवळच्या खेडेगावीं बैलगाडीनें प्रवास करून हुर्डा पार्टीस गेलों होतों. ही हुर्डा-पार्टी बैल-गाडीच्या माझ्या बहुधा पहिल्याच प्रवासानें लक्षांत राहिली. गाडींत दाटीदाटीनें माणसें बसलेलीं, रस्ते खडबडीत, अंग घुसळून निघालेलें, कधीं कधीं आम्ही उडत असूं व आमची डोकीं एकमेकांस लागत, आपटत, असा हा बैलगाडीचा प्रवास झाला होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ..................
क्रमांक ...................... नों दि: ..................

अण्णा हे रामटेकास तात्या विष्णुमामा आणि इतर त्या गावीं आलेले शाळेंतील विद्यार्थी यांस दुपारीं गणित शिकवीत असत असें आठवतें. कांहीं तरी आमच्या अंकणितापेक्षां निराळें इंग्रजी गणित असे तें. आणि मला आज अंधुकपणानें बीज गणितांतील सायक्लिक ऑर्डर वरचीं उदाहरणें - भूमितीमधील वर्तुळविषयक प्रमेयें व उदाहरणें ते त्यांचेकडून रोज तास दोन तास करून घेत असत, असें नक्की आठवतें. खरें म्हटलें तर ते तत्वज्ञानाचे M. A. होते; पण शाळेंत इंग्रजी विषय शिकवीत असत. शिवाय मराठी हा विषय त्यांचा उत्तम असेलच. गणितही ते शिकवूं शकत हें मी स्वतः पाहिलें आहे. त्यांचें इंग्रजी विषयाचें शिक्षण मूलगामी पद्धतिनें चाले. एखादी शंका वर्गांत कोणी काढली तर त्याचे उगमापर्यंत मागें जावून तेथून सुरुवात करुन विद्यार्थ्यांस पूर्ण समाधान करून देत असत; अशी मला ऐकीव माहिती मिळाली.

कालान्तरानें शिमग्याचा सण आला. मोठी होळी पेटवण्यांत आली. अण्णाही घराजवळ चौकांत होळीवर गेले होते. लोकांनीं खूप बोंबा मारून शिमगा केला. रंगपंचमीचे दिवशीं लोकांचा घोळका घरीं आला. "आम्ही तुम्हाला आज रंगवणार आहोंत" असें कांहीं भीतिनें, आदरानें ते म्हणाले. अण्णा "ठीक आहे" म्हणाले, आणि जुने कपडे - धोतर नेसून लोकांत मिसळले - आमच्या घराच्या पुढच्या आंगणांत लोकांनीं शंखध्वनीच्या नादांत त्यांस चांगलें रंगवून काढलें होतें. घराबाहेर मात्र ते गेले नाहींत. लोकांच्या भावना, इच्छा यांस, आपलीं स्वतःचीं सुधारकी मतें थोडीफार बाजूस ठेवून मान देणें, त्यांचे कलाप्रमाणें वागणें हें लोकाग्रणींचें काम असतें. सामान्य लोकांस तुच्छ मानणें, त्यांस विरोध करणें हें समंजसपणाचें ठरत नसतें. अण्णांचें वागणुकीत हा समंजस-पणा दिसून येई.

एका वर्षीं आम्ही कामटी या गावीं प्लेगामुळें गेलों होतों हें रेल्वे स्टेशन नागपूरपासून जवळ असून लष्करी ठाणें आहे. आम्ही स्टेशनपासून जवळच समोर एक लांबलचक चाळ होती, ८।१० बिऱ्हाडें राहूं शकतील अशी. त्या चाळींत राहत होतों. त्यावर्षींची आमची दिवाळी कामटीस या चाळींत झाली. या गांवची आणखी एक आठवण म्हणजे आम्ही तेथें असतांना सर्वच लहान मुलांचे डोळे आले होते. त्यामुळें सर्वांस जवळजवळ पंधरा दिवस फार त्रास झाला. सकाळीं डोळे चिकटलेले असत; चिपडें आलेलीं असत. ते धुवून स्वच्छ करावे लागत. रात्रीं निजतांना कोरफडीची फोड, चीक डोळ्यावर येईल, आणि साल बाहेरच्या अंगास जाईल अशा प्रकारें फोडी प्रत्येक डोळ्यावर एकेक अशा प्रकारें ठेवून डोळे बांधून आम्ही निजत असूं.

रामटेक आणि कामटी या गांवाचे जवळपास मॅन्गॉनीज्च्या खाणी आहेत. मी कामटी येथील एक खाण पाहिल्यासारखें आठवतें. ही खाण एका टेकाडावर उंचावर होती. टेकडीला उतार केलेला होता. या उतारावर रेल्वेच्या रुळांच्या दोन जोडया घातलेल्या होत्या. टेकडीच्या वरच्या अंगास खाण होती. तेथें मॅन्गॅनीज धातू डोंगर फोडून काढण्यांत येई. आणि रेल्वेच्या रुळांवरचे छोटे-छोटे उघडे डबे भरण्यांत येत भरलेल्या डब्यांच्या दुसऱ्या बाजूस रुळावर खालच्या अंगास पायथ्यास रिकामे डबे असते. हे दोन्ही प्रकारचे डबे साखळीनें एकत्र जोडलेले, त्यांची एक माळ केलेली होती. भरलेले डबे वरचे अंगानें एका लाईनवरून खालीं सोडून दिले कीं ते आपोआप खालीं येत आणि खालचे रिकामे डबे वर जात. ही गम्मत मला फार आवडली. ती मी खूप वेळ पहात होतों. एकाप्रकारें कोकणांत विहीरींवर वाटोळया चाकावर रहाटावर लहान-लहान पोहऱ्यांची माळ चढवलेली असते आणि ज्याप्रमाणें पाणी काढलें जातें त्याचप्रमाणें ही मॅन्गॅनीज धातूची ने-आण केली जात होती.

या भागांतील यापैकीं पुष्कळशा खाणी नागपूरचे रावबहादुर शेठ डी. लक्ष्मीनारायण यांच्या मालकीच्या होत्या. पुढें १९२२।२५ च्या सुमारास या शेट-जींनीं सुमारे २५ किंवा असाच एक मोठा आंकडा लक्ष रुपये आपल्या मृत्यु—पत्रा-अन्वयें नागपूर विद्यापीठास शास्त्र शाखेचा उच्चतर अभ्यास करण्यास इमारती प्रयोग - शाळा मिळाव्या म्हणून दिली. या अपूर्व देणगीचा लाभ मँगॅनीज धातूच्या उत्पादनामुळें नागपूर विद्यापीठास झाला. या देणगीमुळें मृत्युपत्र खोटें ठरावें, विद्यापीठास पैसा मिळूं नये म्हणून कायदेशीर पुष्कळ प्रयत्न होवून शेवटीं ती देणगी विद्यापीठास मिळाली !

रामटेक निसर्गरम्य ठिकाण होतें; कामटी जरा रुक्षच होतें. आतां एक वर्ष मुंबईकडच्या बाजूस नागपूरपासून जवळपास वीस मैलांवरच्या बटी-बोरी गांवीं आम्ही १९११-१२ मध्यें गेलों होतों. हा गांव नदीकाठी असल्यामुळें थोडा बरा होता. परसूमामा यांचे एक स्नेही श्री. लांबे हे या गावचे राहणारे. त्यांच्या खटपटीमुळें आम्हास नदीपासून जवळच,नदीकाठाकडे पण गावापासून जरा दूर असें एक स्वतंत्र घर मिळालें होते. घर लहानच, पण माडीचें होतें. घराला लागूनच गावची तालीम होती; कुस्तीचा, लाल मातीचा, मोठा हौदा-आखाडा होता. आम्ही या आखाडयांत इतर वेळीं पुष्कळ उडया मारीत असूं, मातींत खेळत असूं. नदीवर सकाळ-संध्या-काळ जाणें, आंघोळ करणें, कपडे धुणें, येतांना आणवेल तेवढें पाणी आणणें हा आमचा क्रम असे. वाळवंटांत एक खड्डा खणावयाचा, आणि खड्ड्यांत आपोआप

गाळून आलेले पाणी तांब्या-तांब्यानें भरून घेऊन ते पाणी पिण्याकरितां आम्ही वापरीत असूं. असे खड्डे वाळवंटांत रोज पुष्कळ तयार होत, बुजून जात, पुनः तयार होत !

रामटेक हा आठ-दहा हजार वस्तीचा गांव असावा, तर, बोरी तीन-चार हजारांचा गांव होता. आम्ही तेथें हिवाळयांत गेलों होतों. चैत्र अखेरपर्यंत तेथें राहिलों. नंतर नागपूरास परत आलों. त्या गावांत आमच्या घराजवळचा रस्ता ओलांडल्यावर थोडे पलीकडच्या बाजूस एक मुलींची लहान शाळा होती. घराच्या दुसऱ्या बाजूकडे थोडया अंतरावर मुलांची खूप मोठी शाळा होती. इयत्ता ७ वी पर्यंतचे वर्ग तेथें असावेत असें वाटतें. एके दिवशीं मी ४ थीत किंवा ५ वीत– माझ्या वर्गांत जाऊन बसलों. गुरुजीनीं मला बसूं दिलें. कांहीं प्रश्न विचारले जात होते. मी सुरुवातीस गुरुजींच्या डाव्या बाजूस शेवटच्या नंबरवर बसलों होतों- पण प्रश्नांची उत्तरें बरोबर देत गेल्यामुळें मला वरच्या नंबराच्या मुलांच्या (ज्यांची उत्तरें चुकलेली असतील किंवा ज्यांनी उत्तरच दिलें नसेल अशा मुलांच्या) तोंडात मारीत जाऊन वर माझी जागा येईल तेथें बसण्यास सांगण्यांत आलें. हा सर्व प्रकार मला अगदीं नवीन होता. शिवाय त्या वर्गांतील निम्म्याचेवर मुलें माझेपेक्षां फारच मोठीं होती. कांहींचे तोंडापर्यंत माझा हात ही पुरत नव्हता ! मी असे करण्याचें नाकारलें. फक्त वरच्या नबरावर जाऊन बसलों .. माझ्या हुशारीचें गुरुजीनीं फार कौतुक केलें.

याच गावीं चैत्र शुद्ध १० रोजीं माझी मुंज करण्यांत आली. त्या काळांत मुंजी फार थाटाच्या, खर्चांच्या करण्याची रीत होती. पण बहुधा पुढें मे मध्येंच मोटी बहीण शकुंतला किंवा दत्ती हिचा विवाह होता म्हणून काटकसरीनें माझी मुंज बोरी या खेडेगावींच उरकण्यांत आली. पण या कार्यांची कल्पना असल्यामुळें त्याची जमवाजमव म्हणून वर्ष-सहा महिने आधींपासून तयारी सुरु झालेली असावी. नागपूरला आमचे घरीं कोणी एक फिरस्ते चांदीचीं भांडीं विकणारे गृहस्थ एक दोन मोठया ट्रंकाभरून भांडी घेऊन इंदूरकरांच्या वाडयांत आले होते. त्यांचेकडून चांदीच्या भांडयांपैकीं ताट, वाटया, गडवा, अत्तरदाणी– गुलाबदाणी, द्रोण, वगैरे भांडयांपैकीं कांहीं भांडीं त्यावेळीं तरी खरेद्री केलेलीं होतीं. कांहीं कदाचित् पूर्वींची असतील. त्याच प्रमाणें कापड चोपडही खरेदी केलेलें असावें. निळा रुफुली काठी, कद अण्णांना, व मला म्हणून एक पीतांबर मुद्दाम बनारसहून मागवण्यांत आले होते. अशी एकूण तयारी ठीक चालली होती, झाली होती. कमीपणा सांगावयाचा तर मुंज खेडेगांवांत झाली हाच; बाकी कांहीं कमी नसावें. आचारी होते, वाजंत्री

होते, बाकी सर्व होतें नातेवाईक थोडे फार, व इष्टमित्रही थोडे आले होते. मित्रांत नागपूरचे महाल पोस्टाचे पोस्ट मास्तर श्री. फडके व त्यांच्या पत्नी आल्या होत्या. मुंज झाल्यावर सोडमंज मात्र नागपूरास झाली. तोंपर्यंत मला घराबाहेर पडतां येत नसे.

या मुंजीच्या गडबडींत एक संस्मरणीय गोष्ट घडली. घराचे सर्वच बाजूंस आंगण होतें. पैकी डाव्या बाजूस असलेल्या अंगणांत जरा मागचे बाजूस एक सनकाड्यांचा ढिगारा होता. (सनकाड्या- जरा बारीक पण लौकर पेट घेणारें पांढुरकें लाकूड.) त्या ढिगाऱ्यास अकस्मात् अशी सकाळीं ९॥ – १० चे सुमारास आग लागली. तेव्हां जवळपास राहणारी २५-३० माणसें, जास्तच असतील. जमा झालीं. घरांतलें आणि शेजार पाजारच्या घरांतलें सर्व पाणी हंडे-घडे-ओतण्यांत आले. नदी काठापर्यंत माणसांची रांग धरून पाणी नदीवरून आणून आगीवर ओतण्यांत आलें. आग साधारणपणाने १५-२० मिनिटांत विझवण्यांत आली. नुकसान फारसें झालें नाहीं. फक्त सनकाड्यांचा ढीग पार जळून गेला. ज्वाला भडकूं लागल्या होत्या; होळीच्या सणांत खप मोठी होळी पेटावी तशी ही आग होती. पण शेजारच्या गावकरी लोकांच्या सहकार्यामुळें ती त्वरित विझवण्यांत आली. एका प्रकारें आमच्या सर्वांच्याच नशीबाची परीक्षा झाली. नाहींतर ३०-४० फुटांवरच आमचें घर होतें. तें सर्वच आगीच्या भक्ष्यस्थानीं सहज पडूं शकलें असतें.

या प्लेग प्रकरणीं एक गोष्ट आठवते. आम्ही पुढें पुण्यास रहावयास आल्यावर १९१३-१४ वगैरे सालीं तेथेंही प्लेगोबा दरसाल त्या शहरास उत्तर पावसाळ्यांत भेट द्यावयास येत. पण त्यावेळीं इनॉक्युलेशन-प्लेगची लस टोचून घेणें सुरू झालें होतें. आम्ही टोचून घेत होतों. पण नागपूरांत टोचून घेणें पुरेसें माहीत झालेलें नसावें. निदान अण्णांना माहीत नसावें, किंवा त्यांचा त्या गोष्टीवर विश्वास नसावा. म्हणून आम्ही प्लेग आल्यावर स्थलांतर करणें हाच एक उपाय वापरीत होतों.

पुढें १९५५ सालच्या सुमाराची गोष्ट आहे. मी नाशकास गेलों असतांना तेथील एक प्रख्यात डॉ. खाडीलकर यांची योगायोगानें गाठ पडली. हे डॉक्टर तेथें एक खाजगी हॉस्पिटल चालवीत होते. त्या गावांतील ते एक प्रमुख डॉक्टर असावेत. त्यांस मी जेव्हां मोरोपंत दामल्यांचा मुलगा आहे हें कळलें तेव्हां त्यानीं फार मोठा आनंद प्रदर्शित केला, माझी भेट झाल्याबद्दल. ते मूळचे नाशिकचेच राहणारे, पण १९०८-९ मध्यें नाशकास प्लेग झाल्यामुळें कोणा नाते-

बाइकांकडे नागपूरास गेले होते. तेथें ते ५।६ महिनेच नील सिटी स्कूलमध्यें शिकले. त्यावेळीं ते १० किंवा ११ वीत होते. - म्हणजे जुन्या इंग्रजी ६ वी ७ वींत. त्यांचे सांगण्यावरून त्यांचे आयुष्यांत त्यांचेवर ज्या फार थोडया गृहस्थांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटला त्यांत मोरोपंत हे एक होते. केवळ ५।६ महिन्यांच्या सहवासाचा मोठा ठसा त्यांचे मनावर मोरोपंत पाडू शकले. हें एका प्रकारें प्रभावी व्यक्तिमत्त्वाचें उदाहरण होय. मोरोपंतांच्या मुत्युनंतर ४०।४२ वर्षांनीं ही आठवण डॉक्टर साहेबांनीं सांगितली हें लक्षांत घेण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें माझ्यांत व माझ्या वडिलांच्या चेहऱ्यांत, अंग ठेवणींत त्यांस कांहीं साम्य आढळलें; त्यांस माझेवरून त्यांची आठवण झाली असेंही त्यांनीं सांगितलें!

## अण्णांची दिनचर्या, व्यक्तिमत्त्व

या प्रकरणांत अण्णांची दिनचर्या, रोजचा सामान्य कार्यक्रम देण्याचा विचार आहे, ते बहुधा रोज पहाटे उठत असत, शौचमुखमार्जनाचे वेळीं टूथब्रश, पेस्ट, किंवा दंतमंजन कांहीं नसे. केवळ राखुंडी! आणि प्रातः स्नान करीत असत, १९१०–११ मध्यें त्यांनी मुंबईहून एक प्रायमस स्टोव्ह आणला होता. त्यानंतर ते स्वतःच स्टोव्ह पेटवून स्वतःच्या आंघोळीचें पाणी तापवून घेत. त्यापूर्वीं बहुधा आई किंवा काशी आत्याबाई लवकर उठून त्यांस पाणी तापवून देत असत. दर बुधवारीं पहाटेच्या सुमारास एक न्हावी येत असे तो त्यांची दाढी व हजामत करी. त्यांचे पाठीमागून आम्हा मुलांस पाळीपाळीनें हजामतीस बसावें लागे. केस वाढवण्याचा, ठेवण्याचा त्यावेळीं प्रघात नव्हता. शेंडी मात्र ठेवीत असत. घेरा नव्हता. त्यानंतर खोबरेल तेल लावून आंघोळ होई, गरम पाण्यानें; पण साबण आमचे घरांत शिरला नव्हतां!

आंघोळीनंतर संध्या व देवपूजा चाले, ती जवळजवळ १ तास चाले. हें सर्व आटोपावयास ७ चा सुमार होई. ते सकाळीं त्यानंतर दूध घेत असत. नंतर माडीवर जाऊन कामास लागत. काम आटोपून ९॥ चे सुमारास जेवावयास खालीं येत ( दुपारचें जेवण सोवळें नेसून जेवावयाचें, सर्वांनीं, असा परिपाठ होता. ) जेवण पूर्ण व्हावयास १० वाजत असत. ते सावकाश प्रत्येक घास चांगला चावून नंतर जेवत. त्यामुळें त्यांस माझ्या आठवणींत कोणताच आजार झाला नव्हता. जेवणानंतर १०॥ किंवा १०॥। पर्यंत ही ते विश्रांति घेत. नंतर पोषाख करून शाळेंत

जात. शाळा ११ वाजतां सुरु होई, ते साधारणपणानें १०।। ला शाळेंत जात. शाळा घरापासून केवळ दोन मिनिटांच्या वाटेवर होती.

त्यांचा पोषाख डोक्यावर पगडी, अंगांत शर्ट, पारशी फॅशनचा बंद गळचाचा लांब कोट, स्वच्छ धोतर, कोटावर उपरणें पांढरे शुभ्र, पायांत लाँग बूट, पायमोजे असा असे. शाळेंत गेल्यावर बहुधा उपरणें आणि पगडी ते काढून ठेवीत; आणि इटॅलियन काळी टोपी घालीत असत. मधल्या वेळीं ते काय घेत तें मला माहीत नाहीं. ते चहा, बिस्किटें घेत नसत. शाळा साडेचारला सुटे. त्यानंतर ते घरीं येत. ५ चे सुमारास थोडें खात असत, दशमी अगर अन्य कांहीं. वर्तमान पत्रांचें वाचन सकाळींच बहुधा होई. "केसरी" ते घरीं स्वतः घेत असत. शाळेच्या वर्तमानपत्रांपैकीं आठवडी Illustrated Weekly Times मला नक्की आठवतो. आम्ही चित्रें पहात असूं. अन्य ही कांहीं असतील. तीं ते सायंकाळीं ही वाचत असतील. पहाटे किंवा संध्याकाळीं कोठेंहि फिरावयास बाहेर जात नसत. पण संध्याकाळीं आंगणांत अंगांत धोतर, शर्टानिशीं फेऱ्या घालीत असत. रात्रींचे जेवण बहुधा ७।।–८ चे सुमारास होई. त्यानंतर थोडा वेळ शतपावली. गुरुवार, रविवार असेल तर ८।। ते १० पर्यंत घरच्या मंडळींसमवेत भजन करीत असत. इतर वारी १९१२ च्या पावसाळचांत, चातुर्मासांत मजकडून "श्रीगुरुचरित्र" एक अध्याय रोज वाचून घेत असत. अन्यवेळीं बहुधा कांहीं वाचन, लेखन, शाळेचें काम वगैरे करीत असावेत. ९।। ला आणि भजनांचे वारीं त्यानंतर ते झोपीं जात आणि पहाटे ४।। ला गजर लावून उठत असत.

भाजी आणणें, किंवा धान्य, वाणी सामान वगैरे बाजाराचें काम घरांतील तरुण मोठचा मुलांकडून करवून घेत. कधीं कधीं रविवारीं इतवारी बाजारांत तर बुधवारीं बाजारांत भाजी आणण्याकरितां मोठचा मुलांबरोबर गेल्याचें मला स्मरतें. ते दरमहा पगार झाल्यावर शंभर रुपयेपर्यंत आई आणि काशीआत्या बाई यांचेजवळ देत असत. त्या खर्चाचा हिशोब ठेवीत. महिनाअखेर ते त्यांचेकडून हिशोब घेत आणि पुढच्या महिन्याकरितां पैसे देत असत. कापडचोपड खरेदी बहुधा ते स्वतः करीत. मुलांकरितां आणि स्वतःकरितां साधेंच कापड घेत. स्वतःकरितां एम्प्रेस मिलची शुभ्रकाठी धोतरें, अंग पुसावयास पंचा घेत असत. ते आपलें स्वतःचें धोतर–पंचा स्वतःच धुवून घडी घालून चोपून वाळत घालीत असत. मला ही त्यांनी हें काम शिकवलें होते. जोडे बहुधा पुणेरी जोडा वापरीत असत. वर्षाला एक नग घेऊन देत. तो लवकरच हरवला तर पुनः वर्षभर कांहीं मिळत नसे. धान्य बहुधा कांहीं ठरलेल्या मोठचा दुकानांतून एकदमच घेत असत, बेगमी करीत असत.

जेवावयाचा बेत म्हणजे भात व गव्हाच्या पोळया. भाकरी अजीबात नसे. सणावारीं संकेतांप्रमाणें पुरण, श्रीखंड, बासुंदी, लाडू, क्वचित् किरकोळ सणास तांदुळाच्या रव्याची खांडवी अशीं पक्वान्नें होत. अण्णा चांगले सशक्त होते. उंची पूरी साडेपांच फुट; चेहरा भव्य, मिशा राखीत असत. त्यामुळें आणि सदाचरणामुळें त्यांचे चेहऱ्यावर एका प्रकारचें तेज असे. ते रुबाबदार दिसत. विद्यार्थी त्यांस घाबरत असत. शाळेंत ते शिस्तबाज हेडमास्तर म्हणून प्रसिद्ध होते. एका वेळेस मी एका मोठया मुलास वेताच्या छडीनें ते मारीत असतांना पाहिल्याचें आठवतें. पण छडीचा वापर ते फार क्वचित् करीत असत. कोणाही मुलाला वर्गाबाहेर जावयाचें असल्यास कार्डबोर्डच्या पुठ्ठयाचे व्हिजिटिंग कार्डच्या आकाराचे त्यांच्या आद्याक्षरांचे पास असत ते घेऊनच बाहेर जातां येई !

विडी, सिगारेट, पान-तंबाखू, तपकीर, सुपारी कसलेंच व्यसन त्यांस नव्हतें, घरीं सणावारी गोडधोड झालें तर मात्र विडा खात असत. किंवा क्वचित कोठें लग्नसमारंभाच्या मेजवानीचें जेवण झालें तर त्यानंतर विडा खात असत. त्यांच्या अशा या राहणीमुळेंच त्यांची प्रकृति उत्तम होती.

आमचे घरीं पाहुणे रावळे फारसे नसत. कोणी एक विद्यार्थी दर आठवडयांतून एक दिवस "वारकरी" म्हणून जेवावयास येत असे. त्याचप्रमाणें नागपूरास कोणी एक साधु दर आठवडयास कोणच्याशा वारीं दुपारीं जेवावयास येत असे. एकदां तो आला असतां जेवावयास थोडा उशीर होता, म्हणून तो रागावला. तेव्हां त्यास बंदा एक रुपया देऊन त्याची त्या दिवशीं बोळवण करण्यांत आली.

धर्मादाय म्हणून ते काय करीत त्याची कल्पना नाहीं. पण भिकाऱ्यांस मूठभर धान्य देण्याची पद्धति होती. त्याचप्रमाणें त्या काळांत सार्वजनिक वर्गण्या, फंड फारसे नसत. त्यामुळें हा कांहीं खर्च होत नसावा.

त्यांचे नागपूरास तरी फारसे कोणी मित्र नसावेत, कोणी घरीं फारसे येत नसत. हे ही कोणाकडे जात - येत नसत. त्यांच्या मित्रांपैकीं दोन - तीन नावेंच आठवतात. पैकीं श्री. पुरोहित घराण्याची व आमच्या घराण्याचीच ओळख असावी. पोस्टमास्तर श्री. फडके हे एक जुने मित्र होते. ते माझ्या मुंजीस सहकुटुंब आल्याचा पूर्वी उल्लेख केला आहे. आणि श्री. बाक्रे म्हणून नांव ऐकलें आहे. त्यांची एवढी आठवण येत नाहीं. शाळेंतील शिक्षक वर्गापैकीं शास्त्राचे शिक्षक श्री. सदाशिवराव केळकर होते. त्यांस कल्याण-ठाण्याहून अण्णानींच शाळेंत आणलें होतें. त्यामुळें त्यांची कौटुंबिक स्वरूपाची ओळख होती.

शाळेच्या अधिकाऱ्यांचे ते फारसे जात येत नसतील; त्याचप्रमाणें सरकारी खात्यांतील अधिकाऱ्यांकडे ते जात येत असतील असें वाटत नाहीं. ते त्या बाबतींत फार मानधन होते. लांगूलचालनाची त्यांस स्वप्नांतही ओळख नसावी. त्यामुळें ते समाजांत, स्वतःच्या संस्थेत, सरकार दरबारांत मान मिळवून, राखून होते. मी मोठा झाल्यावर जेव्हां जेव्हां मध्य प्रांतातील कांहीं मोठ्या मंडळीस भेटत असें तेव्हां तेव्हां मला उगीचच त्यांचा, अण्णांचा, मुलगा म्हणून मान मिळत असे! अगदीं अलीकडे, ४।५ वर्षांपूर्वी नागपूरचे न्यायमूर्ति अण्णासाहेब मंगलमूर्ति भेटले होते त्यावेळीं त्यानीं अण्णांबद्दल आदरयुक्त गौरव व्यक्त केला. ते त्यांचे विद्यार्थीच होते. १९१३ मध्यें, अण्णा अपघातांत निधन पावले त्यावर्षीच ते नील सिटी स्कूल मधून मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले.

शाळेच्या अधिकारी वर्गांतील दोन नांवें मला आठवतात, एक सर गंगाधर राव चिटणवीस आणि दुसरें सर बिपिन कृष्ण बोस; पैकीं सर गंगाधरराव हे सुविद्य जमीनदार होते, तर सर बिपिन हे प्रख्यात कायदेपंडीत, बॅरिस्टर होते. सर बिपिन यांचे सहीचीं टाईप केलेलीं कांहीं पत्रेंही मी मोठेपणीं वाचलेलीं आहेत, पण तीं सर्व पानशेतच्या पूरानें नष्ट झाल्यामुळें त्यांचा कांहींच उपयोग करतां येत नाहीं.

☼ ☼ ☼ ☼

## अण्णा आणि करमणूक, वगैरे

अण्णा सर्वसाधारणपणानें पहाणारांस Puritan किंवा अति साध्या राहणीचे, छानछोकीच्या विरुद्ध असणारे, करमणुकींचे विरुद्ध असलेले, अरसिक वाटणारे दिसत. पण पूर्व वयांत ते चांगले रसिक असतील असें वाटतें. उज्जैन येथें ते टेनिस खेळत असत. त्यानीं आपल्या मुलींची नांवें अनसूया, प्रियंवदा, शकुंतला, अशीं कविकुल गुरु कालिदास यांच्या प्रख्यात "शाकुंतल" मधील ठेवलीं होतीं. शकुंतलेच्या सख्या आधीं जन्मलेल्या होत्या, ब शकुंतला ऊर्फ दत्ती ही मागून जन्मलेली होती. माझ्या पाठीमागून पण उज्जयिनी येथेंच जन्म पावलेल्या दुसऱ्या मुलींचीं नांवें शशिकला व रत्नप्रभा हीं आहेत. यावरून ते रसिक असावेत हें उघड होईल. हीं सर्व नांवें १९०६ पर्यंत जन्मलेल्या मुलींचीं आहेत.

सिनेमा तेव्हां माहीतच नव्हता, पण नाटकें असत. उज्जयिनी येथें नाटक कंपन्या येत किंवा नाहीं तें नक्की माहीत नाहीं; पण नाटक कंपन्या फारशा येत

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........

नसाव्यात. पण शारदा नाटक कुटुंबीय स्त्रियांनीं ही कोठेंतरी पाहिलेलें होतें. नाग-पूरास असतांना मलाच त्यानीं स्वतः, बहुधा नाटचकला प्रवर्तक किंवा प्रसारक कंपनीचीं दोन नाटकें– "भक्त सुदाम" आणि "कट्टा कर्मयोगी" दाखवलीं होतीं. त्याच प्रमाणें पाटणकर मंडळीचें "भस्मासुर-मोहिनी" ही पहिलें होतें, केव्हां तरी १९१०–११ मध्यें पंडीत विष्णु दिगंबर पलूस्कर हे आपली गांधर्व महाविद्यालयाची शाखा घेऊन नागपूरास आले असतांना त्यांचा जलसा त्यांनीं दाखवला होता. रविवार, गुरुवारच्या भजनांना आम्ही बाजाची पेटी व तबला जरी वापरीत नसलों तरी तंबोरा, एकतारी, झांजा, चिपळचा वगैरे वाद्यें वापरीत होतों. आणि भक्तिरसपर पदें सुरावर म्हणत असूं.

त्या काळांत बाल वाङ्मय असें फारसें निघत नसे. श्री. वासुदेव गोविंद आपटे, "आनंद" मासिकाचे कर्ते, यांनी तेव्हां नवीनच लिहून प्रसिद्ध केलेलीं "बाल रामायण", "बाल भारत" ही छोटीं पुस्तकें माझेकरितां मुद्दाम विकत घेऊन वाचावयास आणून दिलीं होती. Illustrated Weekly of India मधील चित्रें पहावयास लावीत. त्याचप्रमाणें शाळेकरितां त्यांनी त्या काळांत नवीन असलेलें असें एक दृक् शिक्षणाचें साहित्य सध्या विकत मिळत असलेल्या पटेल इंडियाच्या View Master प्रमाणें Stereoscope चित्रें पहावयाचा, गॉगलसारखा चष्मा व दोन डोळ्यांसमोर येणारीं तारेच्या फ्रेममधील चित्रें एका लाकडी पट्टीला दोन टोकाजवळ असत व त्या पट्टीला खालचे अंगास हें सर्व यंत्र धरावयास एक मूठ असे. गॉगल डोळचास लावावयाचा आणि समोर दोन दोन चित्रें एकत्र शेजारी-शेजारी एका कार्ड बोर्डाच्या पुठ्ठ्यावर चिकटवलेलीं अशीं चित्रें तारेच्या फ्रेममध्यें अडकवून तीं दृष्टीस योग्य दिसतील त्याकरितां मागे-पुढें करण्याची सोय असलेलें एक साहित्य त्यांनी ८।१५ दिवस आम्हां मुलांकरितां घरीं आणून ठेवलें होतें. त्या यंत्राचे सहाय्यानें शकडों चित्रें ते देखावे किंवा स्थळें अगदीं प्रत्यक्ष जवळ उभे राहून पहात आहोत असें पाहण्याची सोय होती. आम्ही त्या साधनाने टॉवरब्रिज लंडन, पार्लमेंट हाऊसेस, बकिंगहॅम राजवाडा, पॅरिसचा एफील टॉवर, ताजमहाल वगैरे किती तरी चित्रें पाहिलेलीं आहेत. तीं आम्हास अण्णा स्वतः दाखवीत व त्यांचे बद्दल थोडी फार माहिती तोंडी देत.

घरांत किंवा त्यांचे माडीवर देखावे, चित्रें तसबिरी, जवळ जवळ नसतच; निदान असल्याचे आठवत नाहीं. बहुधा "मौनी स्वामीं"चें २॥' x ३' असें एक एन्लार्जमेंट एका मामानें केलेलें घरांत होतें.

कादंबऱ्या, काव्यसंग्रह वगैरे पुस्तकें, यांचा मोठा ग्रंथ संग्रह घरीं असावा असें वाटत नाहीं. कविवर्य मोरोपंत यांचा काव्यसंग्रह, कांहीं भाग, आणि चिपळूणकर मंडळीचें महाभारताचें भाषांतर हे ग्रंथ घरीं होते. घरच्या बायकांस आईस, व काशीआत्या यांस लिहितां वाचतां येत असून पांडवप्रताप या बरोबर हरीनारायण आपटयांच्या "पण लक्षांत कोण घेतो"ची ही ओळख, वाचन त्यांचें झालेलें होतें असें आठवतें.

नागपूरांत त्या काळीं आंतरशालेय शारीरिक चढाओढी होत असत किंवा नाहीं याची नक्की आठवण नाहीं. पण एकदां बहुधा १९११-१२ सालीं हिवाळा किंवा असेच कोरडया हवेच्या दिवसांत तरुणांच्या धावणें, उडया रस्सीखेच वगैरे शर्यती व सामने भरलेले, आणि अण्णांच्या बरोबर मी ते पहावयास गेलेलें चांगलें आठवतें. त्या सामन्यांत नील सिटी स्कूलच्या तरुणांनीं विद्यार्थ्यांनीं भाग घेतलेला असावा; आणि विजयामध्यें ही त्यानीं बराच मोठा हिस्सा मिळवलेला असावा. या अशा सामन्यांस शाळेचा मुख्यध्यापक स्वतः हजर राहिला तर विद्यार्थ्यांस विशेष उत्साह येत असतो, आपलें कौशल्य पहावयास, आपल्याला उत्तेजन द्याव-यास आपले गुरूजी हजर आहेत या गोष्टींचा विद्यार्थ्यांचे मनावर चांगला परि-णाम होत असतो; आणि ते आपल्या परिश्रमांचीं, कौशल्याची, पराक्रमांची शर्थ करीत असतात. हे असे मर्दुमकीचे सामने,चढाओढी, Tiger,-gap's Ground या सीताबर्डी पलीकडे कोठेंतरी, गावापासून लांब अशा मैदानावर झाले होते. त्यांतील एक शर्यत त्यावेळीं मला फारच गम्मतीची वाटली होती Sack race, किंवा पोत्यांत शिरून पडून रहावयाचें आणि शर्यतीच्या सुरुवातीची शिट्टी झाल्यावर तसेंच उठून पोतें गळयापर्यंत बांधलेलें असतांना धांवत धावत, किंवा उडया मारीत आपल्या धावपट्टीतून (Track) जावून शर्यत जिंकणें. या चढा-ओढीची मला विशेष गम्मत वाटली. रस्सीखेंचमध्यें "खेंचो खेंचो" "खेंचो" करून दोन्ही संघाचे पुरस्कर्ते खेंचणाऱ्यास उत्तेजन देत होते. इतर पुष्कळशा चढाओढी झाल्या.

नागपूरास सर्कशी येत. आणि आम्हास सर्कसचे खेळ मात्र अण्णा पुष्कळ दाखवीत. माझा आडता छंद, खेळ म्हणजे मोठी दोरी लावलेला चाबूक करणें, सर्कसच्या रींगमास्टर प्रमाणें तो फाड फाड वाजवण्याचा प्रयत्न करणें, शेजार-पाजारचीं मुलें म्हणजे घोडे समजून त्यांस सर्कशींतल्या घोडयांप्रमाणें रिंगणांत निरनिराळया चालीवर धावावयास लावणें हा होता.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों दि: ..................

# मुलीचा विवाह

मोरोपंत यांचे हातून होणारें स्वतःच्या मुलांपैकीं मंगलकार्य असें हे पहिलेंच होतें. माझी मुंज म्हटलें तर पहिलें कार्य होतें. पण पाठोपाठच हा मुलीचा विवाह म्हणून कार्य असें जरी दुसरें असलें, तरी मोठें कार्य असें हे पहिलें व शेवटचेंच ठरलें, माझी बहीण शकुंतला ही बारा वर्षांची असताना १९१२ च्या मे महिन्यांत हा विवाह झाला.

त्या काळच्या परिस्थितिप्रमाणें ती मराठी शाळेंत शिकत होती. इंग्रजी शाळा मुलींची अशी नव्हती. विवाह करण्याचें ठरल्यावर स्थळें पाहणें सुरु झालें. पण सुदैवानें फारशीं स्थळें पहावीं लागलीं नाहींत. नील सिटी स्कूलच्या प्राथमिक शाळेचे हेडमास्तर श्री. वाकणकर म्हणून एक थोडे वृद्ध असे गृहस्थ सीताबर्डीवर राहत असत. त्यांचे शेजारीं मॉरिस कॉलेजांत इंटरच्या वर्गांत शिकत असलेले श्री. दामोदरपंत घारपुरे हे विवाहाच्या वयाचे तरुण रहात असत. त्यांचे घरीं त्यांच्या वृद्ध मावशी असत. हे मूळचे वर्धा येथील राहणारे. यांचे वडील आणि आई यांचे लहाणपणींच निवर्तले होते. पण त्यांचे भावांनीं व मावशींनीं त्यांचा सांभाळ केला होता. भावाभावांत इस्टेटीची वाटणी होऊन श्री. दामोदरपंत यांस बरीच शेती, मालगुजारी आली होती. श्री. वाकणकर यांच्या वर्णनावरुन ते खूप श्रीमंत होते. अणि तसें म्हटलें तर त्याकाळीं दरसाल दीड हजार रुपयांच्या सुमाराचें शेतीचें उत्पन्न म्हणजे श्रीमंतीच होती, मुलगी पसंत झाल्यावर विवाह अंदाजानें दोन महिन्यानें झाला. कारण मध्यंतरींच्या काळांत नागपूरास प्लेग होता.

वर सांगितल्याप्रयाणें हें पहिलेंच मंगलकार्य असल्यानें अण्णांनीं स्वतःच्या बहिणी-भाऊ वगैरे मंडळी जेवढी होती त्या सर्वांस निमंत्रण केलें होतें. पण कांहीं कांहीं कारणांनीं थोरले भाऊ चिंतोपंत, त्यांचा थोरला मुलगा पांडुरंग व त्याची पत्नी, सर्वांत धाकटी बहीण सौ. भीमाताई आपटे व त्यांचा मुलगा आत्माराम, एवढीच मंडळी आली. श्री. बापूकाका (सीतारामपंत) त्यांची पत्नी सौ. जानकीबाई, एका निवर्तलेल्या बहिणीची मुलगी सौ. तापूताई दीक्षित ही मंडळी कांहीं अडचणीमुळें पुण्याहून आली नाहींत. कोकणांतून आणखी दोन बहिणी व त्यांचे परिवारांपैकीं कोणी आले नाहीं. एका बहिणीचा मुलगा, धाकटा विष्णु नागपूरास होताच घरीं. मित्रांपैकीं कोणी आल्याचें आठबत नाहीं.

व्याही घारपुरे यांचेकडील पुष्कळ मंडळी येतील अशी माहिती कळलेली होती. शिवाय वर्धा हें ठिकाण नागपूरहून दूर नसल्यामुळें पुष्कळसे पाटील लोक बैलगाड्यांतून आपल्या मालगुजारांच्या विवाहास हजर राहतील असें कळलें होतें, व त्याप्रमाणें बरीच मंडळी आली देखील. यामुळें त्यांस राहण्याकरितां नील सिटी स्कूलचे समोरचे अंगास असलेल्या बोर्डिंगांत त्या पक्षाची राहण्याची व्यवस्था केलेली होती; आणि आमची सोय इंदूरकरांचे वाड्यांतच झाली.

विवाह समारंभ अण्णांच्या नागपूरांतील इभ्रतीस, प्रतिष्ठेस साजेसा झाला प्रत्यक्ष समारंभास–पानसुपारीस कोणती मंडळी, पुढारी हजर होते त्याचा तपशील कांहींच आठवत नाहीं. त्याकाळीं Greetings तारा माहीतच नव्हत्या; त्यामुळें त्या कोणाच्या, किती आल्या तें ही माहीत नाहीं,बहुधा नसतीलच. एखाद दुसरीच बापू काकांची पुण्याहून आली असेल.

विवाह समारंभ चार दिवसांचा झाला. नवऱ्या मुलाची मिरवणूक एवढी आठवत नाहीं. पण वरात मात्र हत्तीवरून आणि पहाटेस निघाली होती हें आठवतें. विवाह गोरज मुहूर्तावर सायंकाळीं लागला. त्याकाळीं नागपूरांत श्रीमंत रघोजीराजे व श्रीमंत लक्ष्मणराव राजे यांचे पदरीं मिळून १०–१२ हत्ती होते. आणि ते कांहीं बिदागी दिल्यास अशा मिरवणुकांस मिळत असत. जेवणावळी, मिरवणुका वगैरे गोष्टी यथास्थित झाल्या.

विवाह अर्थात् जुन्या पद्धतिनें झाला. व्याही भोजन, शेवती वाङ्‌निश्चय, सीमांतपूजन, रुखवत वगैरे समारंभ झाले. विहिणींची रुसणी-फुगणीं बहुधा झालीं नसावीत. पायघड्या नव्हत्या. पण जेवणावळीचे वेळीं वधूवरांनीं एका ताटांत जेवणें, उखाण्यातून नांव घेणें हें अर्थात् आजहि कांहीं ठिकाणी होते त्याचप्रमाणें झालें.पण शिवाय गेल्या सुमारें२५।३०वर्षांत शहरांत प्रचारांत नसलेल्या गोष्टींपैकीं पण जुन्या काळांत लहान वयाचे वधू-वर असतांनाचे प्रकार– विड्या तोडणें, समोरासमोर बसून विडे मांडलेले 'हा विडा कोणाचा ?' वगैरे प्रश्न हातांत पकडून धरलेली वस्तु सोडवून घेणें वगैरे खेळ ही झाले. एकत्र स्नानविधि झाला. पूर्वी हे असले प्रकार होत असतांना म्हातारे किंवा वयस्क स्त्री-पुरुष हा सर्व प्रकार हौसेनें पाहत असत.शिवाय नवीनच विवाह होत असलेल्या वधू-वरांसमवेत नुकतेच विवाह झालेल्या कांहीं जोडप्यांस देखील नूतन वधू-वरांबरोबर हे प्रकार करावयास बसवत असत. ते थोडे अनुभवी म्हणून त्यांनी प्रथम धडा घालून द्यावयाचा; व नंतर नव-वधू-वरांनीं तो गिरवावयाचा असा प्रघात होता. यावेळीं अण्णांचा पुतण्या पांडुरंग आणि त्याची पत्नी सौ. पार्वती वहिनी हें नवें कुटुंब हजर होतें. त्यांचा विवाह एक

वर्ष आधीं १९११ त झालेला होता. या सर्व प्रकारांची मौज झाली... मी हे असले प्रकार एकदां १९२८ च्या मे महिन्यांत कोकणांत गांग्रई मुक्कामीं (तालुका चिपळूण) येथील एका विवाह समारंभाचे वेळीं पाहिले. अलीकडे एकत्र पानांत जेवावयास बसणें ही पुष्कळसें नाहींसे होऊं पहात आहे. इतर सर्व गोष्टी वधू-वर प्रौढ झाल्यामुळें इतिहास जमा झाले आहेत. म्हणूनच जुनी माहिती, चालरीत, वर्णन केली आहे.

या विवाह समारंभाच्या आठवणींपैकीं एक-दोन आठवणी सांगून हा विषय संपवतों. सौ. शकुंतला हिचें नांव राधाबाई ठेवण्यांत आलें. ही विशेष सुंदर जरी नसली तरी मध्यम अशी मुलगी होती. त्यामानानें माझ्या धाकट्या बहिणी शशिकला व रत्नप्रभा या सुंदर ठरणाऱ्या होत्या. श्री. दामोदरपंत यांचे तोंडून पुष्कळ वर्षांनंतर खालील माहिती ऐकली. त्यांनी मुलगी पसंत केली ती तिच्या रूपापेक्षां तिच्या कुळावरून. कवि केशवसुत यांचे काव्याबद्दल (त्याकाळीं तें थोडे-सेंच प्रकाशित झालेलें होतें. त्यांची कीर्तिहि पुष्कळ कमी होती. आणि श्री. दामोदरपंत घारपुरे यांचे वय ही फार नव्हतें, वाचनही त्याकाळीं बेताचेंच असावें.) त्यांस आदर वाटत होता. अण्णा हे त्याकाळपर्यंत मध्य प्रांतांतील एक थोर शिक्षणतज्ञ म्हणून मान्यता पावले होते. आणि त्यांनीं लिहिलेला अतिथोर असा 'शास्त्रीय मराठी व्याकरण' ग्रंथ ही प्रसिद्धी पावला होता. सीतारामपंत दामल्यांची कीर्ति 'राष्ट्रमत' कार म्हणून त्यावेळीं फार मोठी होती. तेव्हां त्यांचे या उद्‌गारांत सत्यांश पुष्कळच होता. आमच्या कुळाबद्दल त्यांस मोठा आदर वाटला, आणि त्यामुळें या कुळांतील मुलगी म्हणून त्यांनी शकुंतला हिला पसंत केली.

हुंडा करणी वगैरे बद्दल रुपये १२००–१५०० पर्यंत आणि इतर सुमारें एक हजारपर्यंत खर्च असा या विवाहाप्रीत्यर्थ अण्णांनीं सुमारें अडीच हजार रुपये खर्च केले.

वरातीची आदली रात्र. त्या दिवशीं इंदूरकरांच्या वाड्यांतील तिसऱ्या मजल्यावर एक बाल्कनीसारखी लहान गच्ची होती. तिच्या मध्यें जावईबापू दामुअण्णा आणि त्यांचा मित्रवर्ग जमा झालेला होता. त्यांत दोन तीन नावें आतां आठवतात; बहुधा ती मंडळी असावीत. नाट्यमन्वंतर लिमिटेड आणि डेक्कन किंग सोप कंपनीचे प्रवर्तक श्री. श्रीधरपंत ऊर्फ बाळासाहेब वर्तक, श्री. आवदे, ॲडव्होकेट ढवळे, वगैरे मित्रमंडळी असावीत. त्या रात्रीं माझी थोडी चेष्टा करावी आमच्या घरच्या मंडळीची माहिती काढावी, किंवा सहज गम्मत म्हणून मला त्या

मंडळीनें गच्चीवर बोलावून घेतलें असावें. रात्रभर बहुतेक गप्पा, गोष्टी, जाग्रण झालें. त्यावेळीं मला "सहसा विदधीत् न क्रियाम् । अविवेकः परमापदां पदम् ।।" हा श्लोक ऐकावयास मिळाला. कां, कोणी सांगितला तें आठवत नाहीं. संस्कृत भाषेची संध्येच्या निमित्ताने जरी माझी थोडी तोंड ओळख झालेली असली तरी सुभाषितें वगैरे विद्ग्ध संस्कृत, अभिजात संस्कृत, वाङ्मयीन संस्कृत भाषेची व माझी त्या रात्रीं त्या श्लोकानें प्रथम ओळख झाली. दामुअण्णा हे पुढें संस्कृतचे मॉरिस कॉलेजांतील एक उत्तम स्कॉलर विद्यार्थी झाले होते. त्यांस व त्यांच्या मित्रांस संस्कृतची आवड होती. त्या रात्रीं कांहीं तरी पुष्कळ हास्यविनोद चालला होता एवढें आठवतें. आणि आमच्या पक्षातर्फें मी एकटाच त्या खेळांत 'लिमलोणच्या' सारखा होतों !

श्री. दामुअण्णा घारपुरे हे पुढें वर्धा येथें अति हुशार वकील म्हणून प्रख्यातीस आले. त्यांचे धंद्यात, पैसा मिळवण्यांत फारसें लक्ष नव्हतें. फ्रेंच भाषेचा आणि वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास फार दांडगा होता. पत्रव्यवहारानें त्यानीं एका फ्रेंच कुटुंबाची मैत्री संपादन केलेली होती, ते रसिक होते. काव्य, गायन, नाटय, वगैरे कलांची त्यांस आवड होतीं. इंग्रजी संस्कृत, मराठी फ्रेंच या भाषा त्यांस उत्तम अवगत होत्याच. शिवाय स्पॅनिश व जर्मन भाषा ते शिकत होते. यांचा ग्रंथसंग्रह फार वेचक व मौल्यवान आहे. खाजगी मालकीचा डॉ. श्री. व्यं. केतकर संपादित ज्ञानकोश तर त्यांचे संग्रही आहेच; पण १९३० चे सुमारास त्यानीं Encyclopaedia Britannica ची त्यावेळची आवृत्तिही घेतलेली होती. यावरूनच त्यांची ज्ञानोपासना वाचकांच्या लक्षांत येईल. असा आपला जावई मोठा झालेला अण्णांस पहावयास मिळाला नाहीं, आणि श्री. दामुअण्णांनाही त्यांचें यथायोग्य गुणग्रहण करणारा सासरा, जवळचा नातेवाईक, तर राहूंच द्या पण बहीणभाऊ, सासूसासरा, कोणीच शिल्लक राहिलें नाहीं. मी त्यांचेपेक्षां पुष्कळ लहान. आणि ते वारले त्यावेळींही माझी गुणग्रहण शक्ति आजच्यापेक्षां पुष्कळच कमी होती. ते थोर आहेत एवढेंच मला समजत होतें. पण ते किती मोठे आहेत त्याची पुरेशी चांगली कल्पना १९३९ त ते निवर्तले त्यावेळीं नव्हती. आणि केवळ गम्मत आणि योगायोग असा कीं, श्री. दामुअण्णा हे १९३९ सालीं दि. ३० एप्रिल रोजीं रात्रीं म्हणजे अण्णा व आई निवर्तल्यानंतर बरोबर २६ वर्षांनीं त्याच दिवशीं कैलासवासी झाले!

# अण्णांची धार्मिकता

सीतारामपंत दामले (बापूकाका) यांचे तोंडून समक्ष ऐकलेली एक आठवण सांगतों. प्रिन्सिपॉल सेल्बी हे डेक्कन कॉलेजमध्यें तत्त्वज्ञान विषय शिकवीत असत. अण्णा हे तत्त्वज्ञान विषय घेऊन एम. ए. झालेले त्यांचे विद्यार्थी. देवधर्म करणें, स्नान-संध्या, जप-जाप्य वगैरे कमंठपणा हा बुद्धिवादाशीं विसंगत आहे, आणि सनातनी वागणुकीच्या विरुद्ध बुद्धिवाद आहे असें समजलें जात असे. अण्णा हे कॉलेजांत असतांना बुद्धिवादी, किंवा सुधारक असत. पण केव्हांतरी उज्जयिनी येथें ते असतांना त्यांस गुरु भेटले, आणि गुरु मुखांतून मंत्र, आचार वगैरे त्यांनी स्वीकारला असावा ही सर्व माहिती उज्जयिनीच्या हकीगतींमध्यें पुढें देईन. पण बापूकाका डेक्कन कॉलेजांत असतांना अण्णांच्या परिवर्तनाची हकीगत प्रि. सेल्बी यांचे कानावर गेली होती, म्हणून त्यानीं आश्चर्य व्यक्त करून सीतारामपंतांस मोरोपंत असे कसे बदललें याबद्दल विचारलें होतें. अर्थात् त्यांनी त्याबद्दल विशेष माहिती नाहीं, माणसाच्या आयुष्यांत मनःप्रवृत्तीं मध्यें परिस्थितीप्रमाणें बदल घडतात, त्याला अनुसरून हा बदल मोरोपंतामध्यें, अण्णांमध्यें घडला असेल. अशा प्रकारचें कांहीं तरी उत्तर दिलें होतें.

या आठवणीवरून आणि त्यानींच एक लेख* लिहिला होता त्यावरून ते प्रथम सुधारक असावेत, आणि नंतर त्यांचा काल धार्मिक आचारा-विचारांकडे वळला असावा हें उघड होतें.

त्यानीं श्री. हरीहरबुवा उदासी-पाळंदे, या नांवाच्या साधु पुरुषास "गुरु" केलें होतें. त्यांचा उल्लेख आम्ही नागपूरास राहत होतों त्यावेळीं 'साधु महाराज' या नांवानें होत असे. या सत्पुरुषाबद्दल अनेक कुवार्ताहि ऐकलेल्या होत्या. लो. टिळकांकडेहि हे गेले असतां त्यांस भोंदू ठरवून हाकलून देण्यांत आल्याबद्दल ऐकलेलें आहे. त्यांस दारूचें व्यसन होतें; व अण्णा त्यांस विलायती दारूच्या बाटल्या विकत आणून घरीं ते असतील तेव्हां पुरवीत असत, असेंहि मोठ्या माणसांच्या तोंडून ऐकलेलें आहे... पण कांहीं ही असो ते अण्णांचे गुरु होते यांत शंका नाहीं.

---

तळटीप – *हा लेख 'सुधारक' या शीर्षकाखालीं मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षेच्या मराठी विषयाच्या १९३२–३३ सालच्या "गद्यवेंचे" मध्यें (म. म. दत्तो वामन पोतदार यांनी हा संग्रह तयार केला होता) आढळेल.

त्यांनी आपला प्रख्यात " शास्त्रीय मराठी व्याकरण " ग्रंथ शेठ दामोदर सावळाराम यंदे यांचे इंदुप्रकाश छापखान्यांत छापवून घेतला. त्या एवढ्या प्रचंड ग्रंथाच्या एक हजार प्रतींच्या आवृत्तिबद्दल त्यांना कोणताच पैशाचे स्वरूपांत मोबदला मिळाला नाहीं, त्यांनी घेतला नाहीं. पण अन्य असा मोबदला त्यांनीं मिळविला. १९११ पर्यंत बहुधा 'साधू महाराज' कैलासवासी झाले असावेत. त्यांचे काव्यांचा, पद्यांचा-अर्थात् धार्मिकच–संग्रह 'हरीहर महाराज उदासी यांची कविता' या नांवानें पुस्तक रूपानें छापून प्रसिद्ध करण्याची शर्त अण्णांनी श्री. यंदे शेट यांस घातली. यामुळें व्याकरण ग्रंथाचा मोबदला म्हणून हा काव्यसंग्रह यंदे शेट यांनीं फुकट छापून प्रसिद्ध केला. यांत अण्णांची गुरुभक्ति दिसून येते.

अण्णांची दिनचर्या वगैरे या छोटेखानी प्रकरणांत स्नान-संध्या, देवपूजा, गुरुवार–रविवारचीं भजनें वगैरेंची माहिती मी दिली आहे. त्याची पुनरुक्ति टाळतों. याशिवाय श्रीदत्तजयंती आणि कोजागिरी पौर्णिमेचे दिवशीं देवघराची शेवंतीच्या फुलांच्या हारांनी विशेष शोभा सजावट केली जावून मध्यरात्रीपर्यंत भजन होत असे. नंतर सर्वजण आटीव दूध पीत असूं. आईवडील यांची श्राद्धें, व पक्ष ते नियमानें करीत असत. खरोखर पाहतां थोरलेबंधु चिंतोपंत हयात असतांना हा हक्क त्यांचा होता. पण तो त्यानीं सोडला असावा, आणि अण्णांनीं तो आपण होवून स्वीकारला असावा. त्याचप्रमाणें आमचे येथें बहुधा नागपंचमी किंवा नारळीपौर्णिमेच्या दिवशीं 'श्रावणी' चा समारंभ होत असे. घरच्या शिवाय आणखीहि कांहीं मंडळी श्रावणीस येत असत. मला हा समारंभ खास आठवण्याचें कारण मला कसलें तरी पीठ खाणें, जानवी बदलतांना ती मांडीत धरून त्यांवरून आंगठा फिरवणें, विशेष म्हणजे पंचगव्य (गो–मूत्र) पिणें वगैरे गोष्टी चांगल्या आठवतात. मला चेष्टेनें पंचगव्याचा आग्रह केला जात असे, व मी त्यास डरत नसें !

या सर्व आचारांपेक्षा विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे 'श्रीगुरुचरित्र' या ग्रंथाचे सप्ताह दरवर्षीं ३।४ वेळां होत असत. हा सप्ताह म्हणजे देवपूजेंत ठेवलेली श्री गुरुचरित्राची सुमारें ५० वर अध्यायांची पोथी दर दिवशीं ठरलेले अध्याय निष्ठेनें सोवळ्यांत बसून वाचणें आणि सात दिवसांत तो ग्रंथ आदर पूर्वक वाचून संपवणें होय. सप्ताह समाप्तिचे दिवशीं आरती वगैरे होई, आणि थोडेसें गोडधोड असें जवणही असे. यावरून हें स्पष्ट होईल कीं त्यांनी "श्रीदत्तात्रेय" या दैवताची भक्ति चालविली होती.

श्रीरामनवमी, श्रीकृष्णाष्टमी, वगैरे दिवस विशेषत्वानें समारंभानें, घरीं साजरे झालेले आठवत नाहीं. श्री गणेशपूजा होत असे आणि तें दैवत पांच दिवस घरीं असे. नवरात्रांत दिवा व फुलांची माळ घालणें हा उपचार घरीं होई. आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................. वि: ......................
क्रमांक ...................... नोंद दि: ..................

विजया दशमीचे दिवशीं धार्मिक ग्रंथ, चाकू, कातरी, सुरी वगैरे शस्त्रें (?) यांची पूजा होत असे. (या पेक्षां अन्य शस्त्रें कोणाकडे असत त्याकाळीं ? आणि आजच्याकाळीं देखील आहेत कोणाकडे? )

जुन्या संत वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास असलाच पाहिजे. पण तो कोणत्या कवींचा, त्यांचे कोणत्या ग्रंथांचा, त्यांचे आवडते ग्रंथ (ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, दासबोध वगैरेंपैकीं कोणता ग्रंथ ) वगैरेंची मला कांहीं माहिती नाहीं. पण कविवर्य मोरोपंत यांचे समग्र काव्य-ग्रंथ प्रकाशनाची योजना त्यांचेच कुळांतील श्री. पंत पराडकर यानीं काढलेली होती; आणि या योजनेंत पूर्वींच अंदाजे शंभर किंवा दीडशें रुपये भरून समग्र ग्रंथांचे ते एक ग्राहक झाले होते. ते सर्व सुमारें १० ग्रंथ आमचे संग्रही पुण्यास मी पाहिलेले आहेत. त्यांतील आर्या भारताचा १ ला खड खेरीज सर्व पुस्तकें पानशेत पुरामुळें खलास झालीं. श्रीधर कविकृत पांडवप्रतापाचें एक फार जुनें पुस्तक आमचें घरीं होतें. आमची आई, काशीआत्याबाई यानीं वाचलेलें मी पाहिलेलें आहे. दुपारचे वेळीं, फावल्यावेळीं कोणीतरी डाळ तांदूळ निवडावेत, दुसरीनें मोठ्यानें वाचावें असें वाचन चालत असे. श्री. परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं संपादित केलेलें "नवनीत" हें पुस्तक ही त्यानीं वाचलेलें होतें. विशेष न शिकलेल्या, कधींही शाळा न पाहिलेल्या घरच्या स्त्रिया घरच्या घरींच वाचावयास शिकल्या होत्या, आणि त्या वर सांगितलेले ग्रंथ शिवाय शिवलीलामृत वगैरे वाचू शकत असत. अशा प्रकारचें धार्मिक वातावरण घरीं होतें.

पारिजातकाच्या फुलांचा लक्ष वाहणें, निरनिराळ्या धान्यांचे लक्ष दाणे (चांगले, निवडून, व एक एक दाणा मोजून) वाहणें; बोटावरच्या वातींचा लक्षकरणें व त्या चातुर्मास्यानंतर तूपातून देवापुढें जाळणें, वगैरे धार्मिक गोष्टी आईनें केलेल्या मी पाहिल्या आहेत. त्यावेळीं कसल्याशा एका लक्ष दाण्यांची मोजणी चालली असतांना परसू तात्या, माझा चुलत भाऊ, आईला म्हणाला, तुम्ही मला फक्त शंभर दाणे मोजून द्या; नंतर मी तुम्हाला एका तासांत आमच्या सायन्सच्या प्रयोगशाळेंत जाऊन अगदीं बिनचूक रीतीनें एक लक्ष दाणे वजन करून आणून देतों अगदीं एखाद्या लहान फुटक्या कणाचेंही वजन आमच्या तागडींत होतें. पण हा युक्तिवाद आईस पटला नव्हता. त्यांचें आपले दाणे मोजणें श्रद्धायुक्त रीतीनें सुरूच होतें! अर्थात् या सर्व गोष्टींस अण्णांची सम्मती असेलच. त्यांस या गोष्टी आवडत असतील.

या मुद्याचे संबंधांत मला नागपूरच्या आठवणाऱ्या गोष्टीच येथें देण्याचा मानस आहे. इतर गोष्टी यथाक्रम पुढें येतील. श्री दत्तात्रेय या दैवताची आई

अनसूया माता यांचें एक देवस्थान त्यावेळच्या बडोदें संस्थानांत नर्मदा नदीचे तीरावर सिनोर व चांदोद या गांवाच्या मध्यें आहे. त्या ठिकाणीं ते अधूनमधून जात असत, तेथें ३।४ दिवस राहत असत. भजन करून येत, मला व माझ्या पाठची बहीण शशिकला यांस कांहींतरी नवस फेडण्यासाठीं त्यानीं एकदां तेथें नेलें होतें. अर्थात् आम्ही दोघेही त्यावेळीं ७।८वर्षांच्या आंतील मुलें होतों; म्हणून ती. गं. भा. काशीआत्याबाई यांसही त्यानीं बरोबर घेतलें होतें, त्या सर्व सफरीची लांबलचक हकीगत देत नाहीं. पण त्या संबंधांत आवश्यक तेवढचा व ऐतिहासिक स्वरूपाच्या वाटतील तेवढचाच हकीगती येथें देतों.

आम्ही मुंबईहून बडोद्यास गेलों. मुंबईस व्हिक्टोरिया गाडचा या अगदीं नवीन वाटल्या, आवडल्या. ट्रामगाडी रुळावरून धावणारी आढळली. त्याचेंही नवल वाटलें. मोटारी बहुधा दिसल्या नाहींत. बडोद्याच्या स्टेशनासमोरच धर्मशाळेंत सकाळीं वास्तव्य केलें. लाकडांची मोळी, तेल (गोडें) वगैरे कांहीं जिन्नस बाजारांतून जवळून अण्णांनीं आणले. आत्याबाईनीं पिठलें भात केला, आम्ही खाल्ला.

बडोद्याच्याच दुसऱ्या एका स्टेशनाकडं गेलों. बडोद्यासही ट्राम गाडचा दिसल्या. पण त्या घोडचांच्या होत्या ! त्यास घोडे जोडलेले असत, त्याही रुळांवरून जात. आम्ही चांदोदला दुपारीं २ चे सुमारास पोचलों. भर उन्हांत होडी मधून पुढें प्रवास झाला. होडींत पुष्कळ माणसें सामानासह होतीं. शिडें होतीं. कधीं कधीं वल्हीं मारीत असत. कधीं कधीं जाड दोरानें माणसें होडी ओढून नेत. दोर, होडीला बांधून माणसें नदी काठावरून दोर ओढून चालत जात. कधीं कधीं लांब लांब बांबू पाण्यांत उभा रोवून मागें ढकलीत नेत, म्हणजे होडी पुढें जाई. एकंदरीत हा होडीचा प्रवास बराच कष्टप्रद होता. आम्ही जवळ जवळ दिवे लागणीस श्रीअनसूया माताजी या ठिकाणीं वाळवंटांत पोचलों. सामान वाहून घेऊनच जावें लागलें. अंधार पडल्यामुळें कंदील लावून त्याचे उजेडांत आम्ही देवस्थानच्या आवारांत पोचलों. पण एकंदर ती संध्याकाळची काळोखी वेळ, तें निर्जन वाळवंट ही परिस्थिती भयप्रदच होती.

श्रीअनसूयामाता देवस्थान लहानसेंच आहे. आवार थोडें बंदिस्त आहे. आंत २५ माणसें राहण्याची सोय आहे. आठवडचांतून एकावारीं तेथें थोडीफार गर्दी होते. पण एकंदरीत स्थान निर्जन आहे. आम्ही २।३ दिवस तेथें राहिलों. सकाळ-संध्याकाळ नदीकाठी जाणें-येणें हाच काय तो करमणुकीचा कार्यक्रम. सकाळीं नदीचे पाण्यांत डुंबणें, आंघोळ करणें, कपडे धुणें, वाळवंटांत पसरून वाळवणें, परत येणें. अण्णा कांहीं भजनें म्हणत, पदें म्हणत, स्तोत्रें म्हणत, दिवसभरही कांहीं

तरी भजन-पूजन असे. शशिकला ३।४ वर्षांची होईपर्यंत बरीच अशक्त होती. ती थोडीफार कॉडलिव्हर ऑईलवर जगली होती असें ऐकीवात आहे. म्हणून तिला, व मला, मी मुलगा म्हणून असेल, असें श्रीअनसूया माताजींचे दर्शन, त्यांचे पायावर घालण्यास नेलेलें होतें. नंतर आम्ही सरळ नागपूरास परत आलों.

याच संदर्भांत पिढी बदलली कीं, कसा फेरफार होतो तें लक्षांत घेण्यासारखें असल्यामुळें खालील हकीगत लिहितों. मी पुढील आयुष्यांत १९३२ सालीं दिवाळीचे सुट्टींत, व १९३३ सालीं मेच्या सुरुवातीस श्रीअनसूया माताजींचे दर्शनास गेलों होतो. १९३२ सालीं मोठी बहीण त्यावेळची सौ. राधाबाई घारपुरे ही स्वतः व हिच्या दोन मुलांस- चि. प्रभावती व चि. शरद्चंद्र यांस घेऊन गेलों. प्रवासांतील बहुतेक अनुभव सारखेच आले. पण आम्ही आतां सुधारलों होतो. कंदिलाऐवजी विजेरी किंवा टॉर्च आमचेजवळ होता. आम्ही पिठलें-भात केला नाहीं, लाडू-चिवडा खाल्ला, खाणावळींत जेवलों. प्रवास मात्र मियागांव सिनोर या मार्गानें केला. त्यावेळीं सिनोर येथील शाळा, वाचनालय पाहिलें, म्हणजे पाटचा व इमारती बाहेरून पाहिल्या. श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या प्रजाहित तत्परतेचें, उदारतेचें कौतुक वाटलें. उभोई स्टेशन लागलें, तेव्हां उभईची लढाई आणि दाभाडयांच्या पहिल्या बाजीरावानें केलेल्या पराभवाची, वधाची आठवण झाली. बडोद्यास स्टेशनसमोरच्या गायकवाडी धर्मशाळेंत (ही त्यावेळीं एक सुरेख इमारत होती. तेथें मच्छरदाणीयुक्त पलंग, स्वयंपाकाकरितां वगैरे भांडी नाममात्र भाडयानें मिळण्याची सोय होती) एक-दोन दिवस राहिलों. रथासारख्या शोभिवंत टांग्यातून शहर पाहिलें. कामाठीवाग, आंतील जनावरें, झुलता पूल, इंदिरा राजे ॲव्हेन्यू, गांव, लक्ष्मीविलास राजवाडा, आणि अन्य प्रसिद्ध ठिकाणें जीं टांगेवाल्यानें दाखवलीं तीं पाहिलीं. लक्ष्मीविलासमध्यें साफसफाई-स्वच्छता चालू होती. महाराज लवकरच युरोपची वारी संपवून परत येणार होते. राजा रविवर्मा यांची स्वहस्तें काढलेलीं भव्य सुंदर तैलचित्रें, राजवाडयाच्या जिन्यावरूनसुद्धां पायांचा आवाजही होवूं नये म्हणून बसवलेले गालिचे, स्नानगृहें, प्रार्तविधीची व्यवस्था, भोजनगृहें, दरबार हॉल वगैरे सर्व गोष्टी केवळ रुपया-दीड रुपयाची टिप-बक्षिसी राजवाडयांतील नोकरांस दिल्यानें पहावयास मिळाल्या. हें सर्व पाहण्याचें, दृष्टिसुख घेण्याचें माझ्या व माझ्या बहिणीच्या मनांत आलें, व आम्ही तें घेतलेंही. पण ती. अण्णांची दृष्टि निराळी होती. त्यांनीं या श्रीअनसूया मातेच्या वारीमध्यें कोणतें तरी अध्यात्मसुख मिळवलें. हाच दोन पिढयांतील फरक! १९३३ च्या सफरीमध्यें मी, माझी पत्नी सौ. सुशीलाबाई व मुलगा चि. श्रीनिवास वय ८।१० महिने, असे गेलों होतों. त्यावेळीं श्री. वाकनीस (त्यावेळीं बडोद्याचे प्रख्यात सेंट्रल

लायब्ररीचे क्यूरेटर व माझे स्नेही) यांचा पाहुणा होतों. यावेळीं कामाठी बागेंतील प्रख्यात म्यूझियम, त्यांतील उत्कृष्ट चित्रसंग्रह (इमारतीच्या छतास टांगून ठेवलेला) फार मोठा देवमासा, इजिप्त देशांत पिरॅमिडस्‌मधून सांपडलेल्या ममीज्, (कापडांत गुंडाळन ठेवलेली प्रेतें) पैकीं एक ममी, वगैरे गोष्टी, हत्तीखाना, वाचनालय व तेथील व्यवस्था, व पूर्वी एकदां उल्लेख केलेली मोहरमची भव्य राजशाही मिरवणूक या नव्या गोष्टी पाहिल्या. यामध्यें आमची ऐहिकता तर ती. अण्णांची पारमार्थिकता अगदीं उठून दिसतात. कोणांस अण्णा हे अगदींच अरसिक वाटतील. वर वर पाहणारांस तें तसें दिसेलही. पण कोणत्याही माणसाच्या कृतीबद्दल मत देतांना त्याची मनःप्रवृत्ति पाहिली पाहिजे हेंच खरें !

एक दोन किरकोळ (म्हटल्या तर किरकोळ, नाहींतर महत्वाच्या गोष्टी) सांगतों. १९१० चे सुमारास माझे एक मामा (श्री. नीलकंठराव यांचेहुन धाकटे) श्री रामभाऊ यांचा विवाह अकोल्याजवळ शेगांव येथें झाला. त्या विवाहास आम्ही मंडळी गेलों होतों. एका रात्रीं शेगांवचे सत्पुरुष स्वामी श्रीगजानन महाराज यांचे दर्शनास अण्णांबरोबर मी गेल्याचें आठवतें, वेळ रात्रींची होती. महाराजांचे समोर धूनी पेटलेली होती. प्रसादाचीं किंवा त्यानां अर्पण केलेलीं फळेंही पुष्कळ होतीं; महाराज कसे होते वगैरे कांहीं आठवत नाहीं. पण अण्णांचे आयुष्यांत या महाराजांना फार मोठें स्थान नसावें.

नील सिटी स्कूलमध्यें असलेले ड्रॉइंग शिक्षक श्री. बाबाजीराव (आडनांव आठवत नाहीं. हे ब्राह्मण नव्हते. ) हे श्री. इंदूरकरांच्या वाड्याचे पिछाडीस आणि नीलसिटी स्कूलकडे जातांना एका खड्ड्यांत लहानशा घरांत रहात होते. १९११ चे उत्तरार्धांत किंवा १९१२ चे पूर्वार्धांत त्यांचेकडे कोणी एक सत्पुरुष आलेले होते. त्यांचे दर्शनास अनेक लोक जात असत. त्यांत अण्णाही गेलेले आठवतें मी एक दोन वेळां गेलों होतों. ते आपल्याच तंद्रीमध्यें गुंगलेले असत. कांहीं निरर्थक शद्बांचीच पुनरावृत्ति किंवा तेच तेज शद्ब पुनः पुनः उच्चरीत बसणें असें करीत असत. त्यांत महाराजांचा "महाराज" पणा असावा. पण अश्रद्ध माणसांस त्यांत मूर्खपणा शिवाय दुसरें कांहीं आढळलें नसतें. लोक त्यांस प्रश्न भविष्य विचारीत असत; आणि लहर लागेल तर महाराज उत्तरें देत असत या महाराजांचें नांव आठवत नाहीं.

आमचे देवांत पूजेमध्यें दत्त भक्त अशा सत्पुरुषांच्या २ फोटोफ्रेमांची पूजा होत असे. श्री दत्तात्रेयांची तसबीर तर असेच. या दोन फ्रेम्समध्यें श्री. अक्कलकोटकर स्वामी महाराज, श्री. मौनीस्वामी होते. मौनीस्वामी महाराज यांचे एक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ..........................
क्रमांक ........................ नों: दि: ..........................

फार मोठें Enlargement, जवळ जवळ ३ फूट गुणिले २ फूट आकाराचें पुण्यास ही १९२७ सालपर्यंत होतें. केंव्हांतरी १९२५ चे सुमारास त्याची काच फुटल्यावर तें बाजूस पडलें; अलीकडे नाहींसें झालें आहे. पूजेमधील दोन्ही फ्रेम्सही अलीकडे नाहींशा झालेल्या आहेत. पुण्यांत त्या पूजेंत नसत.

ती. अण्णांच्या धार्मिकतेच्या पुष्कळच गोष्टी आहेत. पण त्या यथाकाळ, व उज्जयिनीच्या हकीगतींमध्ये येतील तेव्हा आतां हें लांबलेलें प्रकरण येतें पूरें करूं.

## आई व अण्णा

हा जरा नाजूक विषय आहे खराच. पण मी तो हाताळण्यापूर्वी कांहीं इतर गोष्टी म्हणजे आई व मी स्वतः यांचे संबंध जे आठवतात तेवढे सांगून मग मथळयाच्या कडे वळतो.

" स्वामी तिन्ही जगांचा, आई विना भिकारी " असें यशवंत कवीनीं वर्णन केलेलें आहे. आई ही व्यक्ति प्रत्येक जीवमात्राच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाची आहे. पंढरपूरच्या श्री. विठोबाला त्याचे भक्त ' विठाई माउली ' म्हणतात. पण मला स्वतःला मात्र माझ्या आईचा विशेष सहवास न घडल्यानें असेल तसें कांहींच महत्व वाटत नाहीं. पण वडिलांचाही सहवास जरी तेवढाच होता, तरी अजून अजूनपर्यंत कधीं कधीं (आणि ५० वर्षापर्यंत अनेकदां) लहान-मोठ्या महत्वाच्या गोष्टी करतांना. निर्णय घेतांना माझे अण्णा आभाळातून मजवर, माझ्या आचरणावर, वर्तणुकीवर नजर ठेवीत आहे अशी स्पष्ट, अस्पष्ट जाणीव होत असे. ती. अण्णांना आपण असें वागल्यास काय वाटेल,ते रागावतील किंवा काय, असें वागलें तर ते रागावणार नाहींत ना ,अशा प्रकारची अंधूक भावना. भीति किंवा अण्णांची शक्ति अप्रगट किंवा सुप्त मनांत सदैव जागी असे, आहे. पण आईबद्दल मात्र तसा कांहीं अनुभव नाहीं ! ... लहानपणीं अनेकवार वडिलांचा मार खाण्याचा प्रसंग आल्यावर त्यांच्या तडाख्यांतून सुटून आश्रय घेण्यास धांवत जावयाचें ते आईच्या कडे जाण्यापेक्षां मी माझ्या आत्याबाईकडेच जास्त वेळां धांवत गेल्याचें आठवतें.

माझी आई ही दाभोळजवळच्या गुडघें गांवच्या दांडेकर कुटुंबांतील श्री. विठ्ठलपंत दांडेकर यांचे दुसरें अपत्य. तिला एक भास्कर नाना म्हणून मोठा भाऊ होता, आणि धाकटे सहा भाऊ होते. तिला तीन बहिणीही होत्या. पण त्या तिचेहून लहानच असाव्यात. चंद्रू व शितू ही त्यांची नांवे. अलीकडील प्रख्यात कादंबरीकार श्री. गो. नी. दांडेकर यांनीं ' शितू ' ही कादंबरी लिहिली आहे. माझी शितू मावशी ही श्री.दांडेकर यांची आत्याबाई होय.

माझी आई दिसावयास सुंदर होती, गोरी होती. उंची पाच फुटाचे आसपास. शिक्षण शाळेंतील नसलें तरी मन फार सुसंस्कृत झालेलें. धार्मिक ग्रंथ घरांत चांगल्या प्रकारें वाचतां येत असत. घरचे हिशोब ठेवण्या इतपत लिहिणें व गणित येत होतें. तिच्या वयाच्या ७।८ व्या वर्षी व अण्णांच्या १४।१५ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला होता. अण्णांनीं B. A. झाल्यावर, डेक्कन कॉलेजांत फेलो असतांना १८९२–९३ मध्यें पुण्यांत बिऱ्हाड गेलें होतें. तोपर्यंत म्हणजे तिच्या वयाच्या १६–१७ वयापर्यंत ती सासरीं म्हणजे केसोपत व त्यांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई यांचे जवळच राहीली असावी. त्यानंतर अण्णांना उज्जयिनी येथें नोकरी लागल्यावर ती तेथें गेली. उज्जयिनी येथें ही कुटंब मोठेंच होतें. त्याची माहिती उज्जयिनीच्या हकीकतींत येईल. असलें कुटुंब चालवणें हें काम कठीण असतें. पुढें तिच्या मदतीस मुख्यत: माझ्या आत्याबाई - लक्ष्मीबाई दांडेकर काशीताई आल्या. त्या अजूनही हयात आहेत, व आम्हा मुलांच्या कुटुंबासही उपकारक होत आहेत !

नागपूरास असतांना आई व अण्णा यांचे स्वर एकमेकांवर चढलेले–विशेषत: ती. अण्णा आईवर रागावलेले मी कधींच पाहिले नाहींत. तसे ते फार रागीट व तापट स्वभावचे होते. त्याकाळीं बायकोचा स्वर नवऱ्याचेवर जाणें चढणें अशक्यच होतें. बाईस नवरा म्हणजे सर्वस्व, जगांत फार मोठा पुरुष वाटत असे; आणि पुरुष, पुष्कळसे, परस्त्रियांस मातेप्रमाणें पहात असत.

निदान आई व अण्णा यांचे बद्दल तरी मी असें निश्चित म्हणूं शकतों.

१९१२ सालीं ताई किंवा दत्ती हिच्या विवाहानंतर जुलैपासून आई आजारी पडली. तिच्या डाव्या पायांत कांहीं रोग झाला असावा; आणि त्याचेकरितां एकूण ५ वेळां शस्त्रक्रिया करावी लागली. मांडी, गुडघा व पोटरी अशा भागांत व डाव्या पायावर ही शस्त्रक्रिया केलेली होती. ती आमचे घरींच व त्यावेळचे नागपूरातील प्रख्यात डॉ. लक्ष्मणराव परांजपे (तळ्याच्या पाळीवर त्यांचा बंगला, दवाखाना, होता.) यानीं या शस्त्रक्रिया केल्या. त्याच वर्षी लंडनहून भारतांत परत आलेले डॉ. गोपाळराव देशमुख (मूळ गांव वाढोणा, जि. वर्धा) भारतांतील, लंडनचे, पहिलेच M.D. व F. R. C. S. आणि नील सिटी स्कूलचे माजी विद्यार्थी, हे नागपूरास आले होते. तेव्हां त्यांसही अण्णांनीं रुपये २५ फी देऊन आईस पहावयास बोलावलें होतें. आईचा आजार मार्च १९१३ अखेरपर्यंत होताच. त्याचे आधीं थोडेच दिवस ती कुबडया घेऊन चालूं लागली होती. पण आधीं सर्वकाळ आंथरुणांतच खाटेवर पडून जवळ जवळ ६।७ महिने होती. त्या काळीं अण्णांनी बेडपॅन

उचलून नेऊन शौच-कूपांत टाकण्यापर्यंत सर्व प्रकारची आईची सेवा केलेली होती. तसें म्हटलें तर घरांत पुष्कळ माणसें होतीं. पण ही अशा प्रकारची सेवा ते स्वतः करीत होते.

१९१३ च्या मार्च-एप्रिलांत गुढी पाडव्याच्या दिवशीं तिनें स्वयंपाक-घरांत विशेष दुखरा पाय आडवा पसरुन मुद्दाम पुरणपोळ्या केल्या होत्या; सर्वांस आग्रहानें वाढल्या होत्या. "पुरण पोळी" करण्यांत ती अत्यंत निष्णात होती. (आमच्या कुटुंबांत तिच्याही वरताण करणारी माझी दुसरी एक चुलती-सी. के. दामल्यांची पत्नी सौ. जानकीबाई होती. पण या हकीगती पुढें योग्य वेळीं येतील ) त्यानंतर लौकरच एप्रिल अखेर ती. अण्णा तिला पुण्यास बापूकाकां-कडे हवापालट करण्यास नेणार होते. एप्रिलच्या २९ तारखेची गोष्ट असावी. ती दिवसभर दुःखी कष्टी होती. तो दिवस ती अधूनमधून अश्रू गाळीत होती, रडत होती. अशी माहिती माझ्या बहिणींनी दिली. तिला काय पुढचें भवितव्य दिसलें होतें कीं काय कोण जाणें? तिला कसली काळजी वाटत होती, कशाबद्दल दुःख होत होतें, तें एक परमेश्वरच जाणें. पण प्रत्यक्षांत पाहिलें तर तिला सतीचें मरण लाभलें. आगगाडीच्या टक्करीमध्यें अण्णांच्या बरोबर, जरा आधींच सती-सारखें मरण आलें. तिच्या बरोबर प्रवासास गेलेली मुलगी रत्नप्रभा व नागपूरास मागें राहिलेलीं मुलें मी स्वतः व शशिकला हीं पुढें इतक्या सुखांत आणि समाधानांत वाढलों कीं आम्हा तिघांसही कधींही आई वडील यांचा अभाव, आणि उणीव स्वप्नांत देखील भासली नाहीं! आम्हांस आईच्या ठिकाणीं जन्मभर ती. काशी-आत्या मिळाल्या, आणि आवश्यक त्या काळापर्यंत अण्णांच्या ठिकाणीं बापू-काका लाभले. प्रथम प्रथम तर जानकी काकूही आईच्या जागीं होतीच. पण ती लवकरच ३।४ वर्षांनीं कालवश झाल्यानें काशीआत्या होत्या.

एकंदरीत सांगावयाचा मतितार्थ असा कीं, आई व अण्णा हे एकमेकांस अनुरूप तर होतेच, पण परस्परांमध्यें दुसऱ्याबद्दल प्रेमभाव विश्वास, निष्ठा, आदर, वगैरे गुण वसत होते. ते आदर्श माता-पिता होते.

## श्री. कृष्णाताई साठ्ये

१९११ च्या अखेरीस किंवा १९१२ च्या सुरुवातीस केव्हां तरी एका रविवारीं किंवा एका सुट्टीच्या वारीं असेल, एक सुरेख रबर टायर्सचा उमदा घोडा जोडलेला, खाजगी, टांगा, आमच्या दाराशीं उभा राहिला. त्यामधून एक २५ च्या सुमाराच्या वयाच्या बाई उतरल्या व घरांत आल्या. त्यांचे नांव मला पुढें कळलें कीं, श्रीमति कृष्णाताई किंवा किशाताई होतें. त्या अण्णांचे चुलत बंधु गणूबावा यांच्या कन्या होत्या. त्यांचें सासरचें आडनांव साठे किंवा साठ्ये होतें. त्यांचे एक चिरंजीव नागपूरांत त्यावेळीं धंतोलीवर राहत असत.त्याचें नांव बॅरिस्टर व्ही.डी.साठे होतें. त्यांचेच दुसरे एक चिरंजीव पुढें मुंबईत प्रख्यातीस आलेले व लो.टिळक पक्षाचे एक मोठे कार्यकर्ते डॉ. डी. डी. साठ्ये होते. त्यांचे हे मुलगे त्यांचेहून मोठेच, त्यांचे सावत्र चिरंजीव होते.त्यांचे यजमान पेन्शनर इंजीनियर होते; व त्यांस टेनिस खेळतांना चेंडू छातीवर बसल्यामुळें पुढें लौकरच मृत्यु आलेला होता. त्या आमचे कडे आल्या त्याचे आधींच थोडी वर्षे, त्यांस वैधव्य आलेलें होतें. त्या अधून मधून त्यांचे काकांकडे म्हणजे अण्णांकडे भेटावयास येत असत. त्या दिसावयास देखण्या होत्या, रुबाबदार होत्या. कधीं कधीं माझ्या बहिणी व आई देखील त्यांचे घरीं गेलेल्या होत्या. मला त्यांचे घरीं गेलेलें आठवत नाहीं. पण त्या घरीं आल्या कीं कोणीतरी फार मोठचा, फार श्रीमान बाई आपल्याकडे आल्या आहेत असें मला वाटत असे.

त्यांचा मृत्यु १९१६ चे सुमारास पुढें पुण्यास झाला. तो थोडासा दुःखद झाला. त्यांचे बरेच दागिने, स्त्रीधन होतें. पण त्यांचा उपयोग त्यांचे बंधूंस किंवा मातोश्रींस अजीबात झाला नाहीं ! त्यांचे आई–वडील व बंधू यांची थोडीफार माहिती सीतारामपंत यांचे विभागांत येईल.

## चि. श्रीपादचा मृत्यु

चि. श्रीपाद याचा जन्म नागपूरासच १९१० च्या अखेरीस झाला होता. १९१२ च्या दसऱ्यानंतर कोजागिरीनंतरच तो थोडा आजारी पडला. हा गोरा, दिसावयास सुंदर, सशक्त प्रकृतीचा व म्हणून सर्वांचा आवडता होता. ४।६ दिवस ताप आला. डॉक्टर परांजपे यांचें औषध सुरू होतेंच. पण ताप हटत नव्हता; आणि रोगनिदान निश्चित असें झालें नव्हतें. आईही आजारी असल्यामुळें डॉक्टर रोज घरीं येत असत. दिवाळीचे आधीं ५।६ दिवस असेल एके दिवशीं दोन प्रहरीं तात्या किंवा थोरला विष्णु कोणीतरी त्यास बरें नाहीं म्हणून सांगावयास गेले होते. डॉक्टर बऱ्याच पुस्तकांची उलथापालथ करीत होते. अखेरीस त्यांस रोगाचा पत्ता लागला. डिप्थेरिया किंवा घटसर्प हा रोग होता. श्रीपादचा घसा थोडा सुजला होता. अन्न, पेय घशांतून पोटांत जातांना त्यास त्रास होत होता. धड बोलतांही येणें मुष्किल झालें. आपल्याकडून कष्टानें तो 'पाई! पाई!' करून पाणी मागत असे... अखेर घशास भोंक पाडून (ऑपरेशन करून) श्वासोच्छवास त्या भोंकावाटे सुरू केल्यास त्याचे प्राण वाचतील, नाहीं तर तो लवकरच गतप्राण होणार असें डॉक्टरांचे नजरेस आलें. पण उशीर एवढा झाला होता कीं, ऑपरेशनची तयारी करून तें प्रत्यक्ष करण्याच्या आंत तो गतप्राण झाला! अर्थात त्यावेळीं घरांत विषण्णता पसरली; पण फारशी रडारड झालेली आठवत नाहीं. रात्रीच्या पहिल्या कांहीं तासांचे आंतच त्याचे देहाचे शेवटचे संस्कार झाले. (प्रत्यक्षांत त्याचा देह पुरला कीं, दहन झालें हे माहीत नाहीं.) आईला ही गोष्ट– श्रीपादचा मृत्यु ही- कळवण्यांत आली नव्हती, कांहीं काळपर्यंत.

---

## नील सिटी हायस्कूल, किंवा धनवटे नगर प्रशाला, नागपूर (अण्णांचे आधीं, त्यांचे काळीं, त्यांचे नंतर)

नील सिटी स्कूल किंवा अलीकडचें धनवटे विद्यालय त्याची स्थापना जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वी झालेली आहे. १८८५ चे सुमारास फार थोडे दिवस अण्णा आणि त्यांचे थोरले भाऊ केशवसुत किंवा कृणाजी केशव हे त्या शाळेंत विद्यार्थी होते, त्या शाळेस मोठा स्फूर्तिदायक इतिहास आहे. पण तो सगळा द्यावयाचें येथें कारण नाहीं. अण्णा त्या शाळेचे प्रमुख नेमले जाण्याचे आधीं १।२ वर्षापासून तेथील घडी थोडी बिघडूं लागलेली होती. विद्यार्थी वयानें मोठे व जरा

आडदांड असत. शिस्त कमी होती. १९०७ सालांत बहुधा शिमग्याचे सणांत किंवा अशाच कोणत्यातरी वेळी त्यावेळचे शाळेचे सुपरिंटेंडेंट श्री. जनार्दन विनायक ओक (पुढें संस्कृत कोश तयार करणारे, प्रख्यात लोकशिक्षण मासिक चालवणारे, विद्वान गृहस्थ) यांस शाळेसमोर असणाऱ्या व तळघाच्या पाळीच्या दिशेकडे जाणाऱ्या एका बोळांत विद्यार्थ्यांनीं गाठून मारपीट केलेली होती. ही जशी एक वाईट बाजू सांगितली तसेंस श्री. गोपाळराव देशमुख हे फार हुषार विद्यार्थी मॅट्रिक्युलेशन परीक्षा १ ल्या क्रमांकानें उत्तीर्ण झाले होते. ही एक चांगली बाजू होती. हेच पुढें इंग्लंडांत जाऊन पहिलेच भारतीय एम्. डी. (लंडन),व एफ. आर. सी. एस्. झालेले प्रख्यात डॉक्टर होत. श्री. ओक यांनीं राजिनामा दिला होता. शाळेच्या अधिकाऱ्यानीं रुपये तीनशें पगार देऊं केला होता. आणि प्रमुख वर्तमान पत्रांतून जाहीरात केलेली होती त्या जागेकरितां जसा अण्णांनी उज्जयिनी येथून अर्ज केला होता, तसाच पुण्याहून त्यांचेच धाकटे बंधु ती. सीताराम केशव यानींही अर्ज केला होता! पण पुढें त्यानीं मोरोपंतानीं अर्ज केला आहे हें कळल्यावर तो परत घेतल्याचें कळवलें.

या जागेची बिकटता प्रसिद्ध होती; म्हणून अण्णांनीं उज्जयिनीच्या जागेवर आपला हक्क कायम ठेवून एक वर्षाची रजा ग्वाल्हेर दरबार कडून घेऊन नागपूरची नोकरी पत्करली. त्यावेळीं त्या संस्थेचे अधिकारी सर बिपिन कृष्ण बोस, निष्णात कायदे पंडित, आणि सर गंगाधरराव चिटणवीस आदि मंडळी होती.अण्णांनी शाळेची धुरा स्वीकारली तेव्हां शाळेची विद्यार्थी संख्या २५० चे आसपास होती. आर्थिक परिस्थिति पुरेशी समाधानकारक नव्हती.

या अडचणींत भर म्हणूनच कीं काय नागपूरास त्याकाळपासून जवळ जवळ दरसाल प्लेगची साथ आपली हजेरी देऊन विद्यार्थ्यांच्या वार्षिक शिक्षणांत व्यत्यय आणीत असे. भर म्हणून १९०८ ची लोकमान्यांची चळवळ, नागपूरास भरावयाची काँग्रेस पुढें सुरतेस भरली, व मोडली; लोकमान्यांस राजद्रोहाचे आरोपाखालीं सहा वर्षे सक्त मजूरीची शिक्षा झाली. त्यामुळें लो. टिळकांना दैवत मानणाऱ्या नागपूर शहरचें वातावरण अगदीं बिघडून गेलेलें होतें. अण्णांचे धाकटे बंधु श्री.सीतारामपंत हे टिळक पक्षांतील एक कार्यकर्ते होते.ते नागपूरांत तेथें भरणाऱ्या (संभाव्य) काँग्रेस अधिवेशनाचे कामाकरितां नागपूरांत येत, पण बहुधा डॉ. मुंजे यांचे कडेच उतरत. पण एखादे वेळीं बंधूस घरीं भेटावयास येत तेव्हां सी. आय. डी.चा थोडा त्रास होई. आणि शाळेचे प्रमुख या नात्यानें त्यांचा संबंध हा थोडा घातुक व त्रासाचा होई. विद्यार्थ्यांवर शिस्त राखून दडपण टाकून शाळेचें नित्याचें शैक्षणिक कार्य अशा

काळीं चांगलें चालू ठेवणें हें अत्यंत कठीण असतें. सरकारची मर्जी सांभाळली पाहिजे, निदान रोष होणार नाहीं अशी काळजी घेतली पाहिजे. इकडे लोकमतही सांभाळलें पाहिजे, भावनावश तरुण विद्यार्थ्यांच्या देशभक्तिपर भावना ओळखून त्यांस निरुत्साह न करतां, आपण त्यांच्याच बाजूचे आहोंत असें त्यांस भासवणें म्हणजे ती एक फार मोठी तारेवरील कसरत, कठीण समस्या होती. याच ज्वलंत काळांत डॉ केशवराव हेडगेवार ( प्रसिद्ध राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक ) हे त्यांचे विद्यार्थी होते. ही माहिती स्वतः डॉक्टरसाहेबांचे तोंडूनच मी ऐकलेली आहे. ह्या कठीण परिस्थितींत पालकांचा संतोष राखून, शाळेंत आवश्यक ती शिस्त राखून अण्णांनीं शाळेचें तारु उत्तम कप्तानाप्रमाणें पैल तीरास नेलें.

अण्णांच्या वेळच्या शिक्षक वर्गांत श्री. वझे या नांवाचे फार जुने व निष्णात असे गणित शिक्षक, होते. ते अण्णांचेही शिक्षक होते ! श्री. मुळे नांवाचें आणखी एक चांगलें शिक्षक हे फर्स्ट असिस्टंट होते. अण्णांनीं मूळचे ठाणे येथील राहणारे श्री. सदाशिवराव केळकर या गृहस्थांस मुख्यतः सायन्स किंवा शास्त्रचे शिक्षक म्हणून आणलें, हेच बहुधा संस्कृतही शिकवीत असत ! अशाप्रकारें हे एक अद्वितीय हुशार शिक्षक होते. पुढें हे एल्. एल्. बी. झाले, आणि प्रथम बहुधा काटोल, व नंतर१९२०चे सुमारापासून अकोला येथील प्रख्यात वकील झाले.देशभक्त व पुढारी झाले. अशा प्रकारें निष्णात शिक्षकवर्ग होता.अण्णा स्वतः इंग्रजी, गणित मराठी, संस्कृत वगैरे विषय शिकवूं शकत असत. त्यामुळें शिक्षक वर्गावर त्यांची चांगलीच छाप पडत असे. पण ते मुख्यतः इंग्रजी शिकवीत. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजावून देतांना त्या अडचणीच्या मूळापर्यंत मागें जाऊन पायाशुद्ध रीतीनें ती अडचण ते समजावून देत. त्यामुळें वेळ थोडा जास्त लागे; पण काम पक्कें होत असे. शिस्तीचे संबंधांत ते कडक होते. पण त्यांचा या संबंधानें नियम म्हणजे " आधी केलें, मग सांगितलें " असा होता. जी शिस्त इतरांनीं पाळावी असें त्यांस वाटे. ती ते स्वतः पाळत असत ! या सर्वांचा परिणाम होऊन शाळेचा शैक्षणिक व इतर दर्जा वाढूं लागला. अधिकारी, सरकारी व संस्थेचे, दोघांसही त्यांचें काम आवडलें. विद्यार्थी संख्या वाढूं लागली. १९१३ मध्यें त्यांचे मृत्युचे सुमारास ती ६०० चे वर होती. शाळेची आर्थिक परिस्थिती देखील सुधारली होती. १९१३ च्या मार्च मध्यें झालेल्या मॅट्रिकच्या परीक्षेंत त्यांचाच पुतण्या श्री. परशुराम चिंतामण दामले हा इंग्रजीमध्यें सर्व मध्यप्रांतांत १ ला आला, सर्व विषयांत सर्व विद्यार्थ्यांत हा पहिला आला. शाळेचा निकाल स्पृहणीय लागला. त्याचवेळीं श्री. मंगलमूर्ति (पुढें हे नागपूर हायकोर्टाचे जज्ज झाले.) हे ही सन्मानपूर्वक पास झाले. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून असेल, संस्थेच्या चालकांचे मनांत एक

कॉलेज काढावयाचा बेत घर करूं लागला होता. त्या दृष्टीनें कांहीं योजना सुरू झाल्या होत्या. अण्णांस त्या कॉलेजचें प्रिन्सिपॉलचे पदही मिळालें असतें, या योजनेचें सूत्रचालकत्त्व त्यांचेकडे होतें. त्याचप्रमाणें त्यांस जून १९१३ पासून रु. पन्नास दरमहा अशी पगारवाढ मिळणार होती व त्यांचा दरमहा पगार रुपये ३५० होणार होता. एकंदरीत त्यांचीं कारकीर्द त्यांस व संस्थेस दोघांसही यशस्वी झाली होती.

त्यांच्या रेल्वेच्या अपघाती मृत्युमुळें शाळेपुढें मोठाच प्रश्न उभा राहिला तात्पुरतें सुपरिंटेंडेंटचें पद श्री. मुळे यांस मिळालें, पण पुढें श्री. प्रधान या इंग्लंडांतून जावून आलेल्या एका विद्वान गृहस्थांची नेमणूक या जागेवर झाली. पण श्री. प्रधान हे एक समाजसुधारक गृहस्थ होते. त्यांची मतें व वागणूक नागपूरच्या प्रतिगामी व सनातनी प्रवृत्तिच्या नागरिकांस पटली नाहींत; आणि नागपूरकरही एका विद्वान् व अन्यथा कर्तबगार गृहस्थांच्या सेवेस मुकले. ⁘ म्हणून श्री. मुळे यांसच सुपरिंटेंडेंटचें पद देण्यांत आलें. १९२४–२५ सालचे सुमारास श्री, तात्याजी वझलवार (हे अण्णांचे एक विद्यार्थीच होते) यांस सुपरिंटेंडेंटचें पद मिळालें. त्यानीं नंतर शाळा बरीच पुढे आणली. पण मध्यंतरीच्या काळांत शाळेची विद्यार्थि- संख्या कमी झाली व शैक्षणिक दर्जा घसरलाअशी माहिती मिळाली. याच काळांत नागपूरांत रावबहादुर पुरुषे ही एक कर्तबगार व्यक्ति शिक्षण क्षेत्रांत अवतरली. या विद्वान गृहस्थानीं वॉकर रोडवर न्यू इंग्लिश स्कूल म्हणून एक संस्था-शाळा स्थापून खूप भरभराटीस आणली. या शाळेची एक शाखाही सीताबर्डीं या नागपूरच्या एका विभागांत निघाली. अशा प्रकारें अण्णांचा अपघाती मृत्यु हा त्या संस्थेसही तात्कालिक मोठा तडाखा देणारी घटना ठरली. या तडाख्यातून त्या संस्थेस पार पडावयास चांगला एका तपावर काळ गाठावा लागला. आज ती संस्था पुनः त्या विभागांतील एक मान्यवर संस्था झाली आहे. पण अण्णांच्या काळांत सर्व मध्यप्रदेशांत जवळ जवळ पहिल्या क्रमांकाची खाजगी शाळा ही जी मान्यता त्या शाळेनें मिळवली तें भव्य पद आजही त्या शाळेस व संस्थेस मिळालेलें नाहीं, ही सत्य गोष्ट होय.

---

तळटीप ⁘ प्रख्यात नटी कु. स्नेहप्रभा प्रधान यांच्याच कन्या होय.

## अण्णांचें मजजवळ उपलब्ध असणारें एकच एक पत्र.

अण्णांचा पत्रव्यवहार कुठें कुठें झालेला असेल तो असो, विशेषतः त्यानीं दुसऱ्यांस लिहिलेलीं पत्रें तरी उपलब्ध होण्याचें कांही कारण नाहीं. त्यांस दुसऱ्यांची आलेलीं पत्रें मात्र सापडावींत, तशी कांहीं होतीं. पण पानशेत प्रकरणीं तीं खलास झालीं, पण एक पत्र त्यानीं त्यांचे वडोल बधु चिंतो केशव यांस लिहिलेलें माझे संग्रहीं सहज सांपडलें तें महत्त्वाचें आहे. तें समग्र येथें देतों व नंतर त्यावर मला काय सांगावयाचें तें सांगतों.

श्रीदत्त नागपूर २१।४।१९१३

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष.

आपलें ता. १७ चें मुंबईहून लिहिलेलें पत्र पोचलें. करारपत्र लिहून झालें समजलें. आपल्याकडे हजाराचेवर चारशेंचा अंदाज केला होता. तीनशेंच धरावयाचे व त्यामुळें मजला सहा हजार सातशे पन्नास साठेची तजबीज केली पाहिजे, हें समजलें त्याप्रमाणें करितों. मसुदा आपण तयार करीतच आहां. तो करावा. करारपत्रक होण्याचे पूर्वीं कांही गोष्टी व्हावयाच्या होत्या. त्या आपण झाल्या असें पाहिलेंच असेल. म्हणजे जमिनीचे हक्काचे नोंदबुकाचा उतारा पहाणें. ज्या पाटलाकडे जमीन इजारास लागलेली होती व ज्याचे मार्फत कुळांकडे होती, त्याजकडून ती सोडवून आपले ताब्यांत घेणें व सर्व कुळांची रुजवात होणें. जमीनीचे नंबर व आकार हें सरकारी पुस्तकातून पाहणें वगैरे वगैरे गोष्टी ज्या तांबे हे करणार होते व करविण्याची तजवीज होती. त्या सर्व च असल्या पाहिजेत असें मी समजतों. तसेंच पहिल्या गहाणदार सावकाराची भेट घेऊन तोआपली रक्कम परत घेण्यास तयार आहे, कीं नाहीं हें पाहणें व त्याप्रमाणें खरेदीखत झाल्यावर तें गहाणखत आपणास मिळणें ह्या गोष्टीही ठरल्या असतीलच. असो. आतां मे चे अखेरीस त्यांची बाकीची रक्कम त्यांस पटवून खरेदीखत होणेंचें शिल्लक राहिलें. सर्व कुळांची रुजवात वगैरे गोष्टी आपण चालविल्याच असतील. मकता पूर्वींच्या धान्यानें द्यावयाचा व तो धाराही आपणास मिळावयाचा आहे ना? असो.

माझी रक्कम येथें ता. १६ मे (शुक्रवार) ह्या दिवशीं मिळावयाची आहे व ती मुंबई येथें पूना ब्यांकेंत माझे खातीं यावयाची तजवीज मी केली आहे. म्हणजे ता. १६ मे रोजीं हुंडी हातीं येईल. ती मला मुंबईस पोष्टांतून रजिस्टर करून चि. परसू पाठवील. ती तारीख १७ शनिवारीं मला मुंबईस मिळेल. त्या दिवशीं न च मिळाली तर ती निदान सोमवारीं म्हणजे ता. १९ मे ला मिळालीच पाहिजे व लगेच दुसरे दिवशीं म्हणजें ता. २० मे मंगळवारीं रक्कम हातीं येईल. ती जमीनीचे मालकास कोठें व कशी पटवावयाची व खरेदीखत लिहून तें रजिस्टर कधीं व कोठें व्हावयाचें तें आपण भेटीअंतीं समक्ष ठरवूं.

चि. सौभाग्य. पार्वतीला आपण बेलापुरास नेली हें ठीक केलें. मी ता. १ चे सुमारास मुंबईस येऊन मग पुण्यास जाणार होतों. पण आतां मी मुंबईस येतच नाहीं. ह्यामुळें चि. सौ. पार्वतीला मुंबईस परत थोडक्यासाठीं आणण्याची जरुर नाहीं. मी सौभाग्य. सह एकदमच कल्याणहून पुण्यास जाण्याचा बेत ठरवला आहे. त्याप्रमाणें मी २ मे ला पुण्यास पोचेन. आपण मसुदा वगैरे घेऊन ता १० मे शनवारीं पुण्यास यावें, रिटर्न तिकीट (जाण्या येण्याचें एकदम तिकीट) काढलें असतां २।३ किंमतीस मिळतें असें वाटतें. चि. पांडुरंग ह्यास विचारावें. त्यास माहीत आहे त्यास विचारून तिकीट काढून यावें. व तुम्हीं व मी असे मिळून ता. १२।१३ रोजीं पुण्याहून मुंबईस येऊ, व पुढील सर्व काम उरकूं. रकमेबद्दल वर लिहिलेंच आहे. कीं, मी सर्व तजवीज केली आहे म्हणून. आपले जवळील तीनशांची मात्र आपण तयारी ठेवावी. कारण आपली २०० तयार आहेच व १०० आणखी व्याज व भात मिळून आकार धरलेली आहे. तेवढी तयार करून ठेवावी म्हणजे निदान तीनशांमध्यें तरी आतां घटूं नये म्हणजे झालें, बाकीची मजकडे लागली. असो. मी पुण्यास जातों. आपण ता. १० मे रोजीं तेथें यावें, व पत्राचें उत्तर पुण्यास बापूचे पत्त्यावर पाठवावें. शनवारांत गांधी यांचे वाड्यांत त्याचेच नांवे पत्र पाठवावें म्हणजे मला मिळेल. आपण पुण्यास येंण्याची गरज नाहीं असें आपणास वाटल्यास मला तसें कळवावें. अथवा कोणत्या गोष्टींसंबंधी वकीलाचा सल्ला पाहिजें आहे तें मला कळवून मी त्याचे मत घेतलें तरी चालण्यासारखे असल्यास तसें कळवावें. म्हणजे त्या गोष्टी विषयी मी त्यांचे मत घेईन. ता. १५।१६ मे ला मुंबईस येईन, त्यावेळीं आपणही तेंथें आलें पाहिजे कारण मोठी रक्कम घ्यावयाची आहे. तेव्हां आपण पुण्यास ता. १० ला येता कीं नाहीं नसल्यास बापूला काय काय गोष्टी विचारावयाच्या तें मला त्याचेच पत्यावर पुण्यास कळवणें म्हणजे मी त्याचें मत घेईन. ता. १६ चे सुमारास मुंबईस येईन त्यावेळीं आपणही यावें. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना

मो के. दामले

टीप :— मूळ पत्र मोडीमध्यें आहे. पत्ता बालबोधीमध्यें आहे. २।३ जागा कोऱ्या सोडलेल्या आहेत, तेथील शद्ब अडले आहेत.

| |
|---|
| Stamped<br><br>ती. रा.रा. चिंतो केशव दामले यांस<br>रा.रा. एम्.व्ही. बाळ, स्कूलमास्तर,<br>शाळा बेलापुर यांचे बिराडीं<br>बेलापुर Belapur<br>ता. साष्टी जि. ठाणें Dist. Thana |

ज्यांस पत्र लिहिलें आहे ते चिंतोपंत त्यावेळीं सुमारे ५० चे त्यांचे मोठे भाऊ होत. बापू म्हणून शेंवटीं शेंवटीं उल्लेख केलेले पुण्यास राहणारे ते धाकटे भाऊ सीताराम केशव होत. ते त्यावेळीं ३६ वर्षाचें होते. प्रतिष्ठित वकील माजी "राष्ट्रमत"चे संपादक होते. प्रसिद्ध लेखक होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ विः ........................
क्रमांक ........................ नों० दि: ........................

मोरोपंतांनीं उज्जयिनीस असतांना कोणतीच स्थावर मिळकत केलेली नव्हती. नागपुरास आल्यावर त्यांस तशा प्रकारची मिळकत करण्याची इच्छा झाली नसावी १९०७-८ चे सुमारापर्यंत श्री. चिंतोपंत हे श्रीमंत मंडलीक यांचे खोतीच्या गावांची – वळणें व सोनगांव – व्यवस्था पहान असत. पण त्याच सुमारास मंडलीकांचा व त्यांचा कांहींतरी बेबनाव झाला. आणि त्या सुमारास ते आपल्या आजोळीं श्री. गणूभाऊ करंदीकर यांचेकडे रहावयास गेले होते, मालदोली या गांवीं. त्या गावीं श्री. करंदीकरांच्या मुख्य घराचे खालचे अंगास अंदाजें २५'x१५' फूट आकाराचें एक लहानसें स्वतंत्र एक मजली घर श्री गणूभाऊ यानीं त्यांचे मुलीस बांधून दिलेलें होतें. त्या घराचा चौथरा १९२८ मध्यें शाबूत होता. मी तो स्वतः पाहिलेला असून श्री. महेश्वरपंत करंदीकर, गणूभाऊ यांचे पुत्र व नातू श्री. दामुअण्णा करंदीकर यानीं मला "येथें घर बांधून रहावयाची इच्छा असल्यास ये रहा" असें सांगितलें होतें. त्या घरांत चिंतोपंत अंदाजे १९१३ सालापर्यंत रहात असावेत. स्थावर जमीन घर आदि नागपूरांत करण्याचा विचार अण्णांनीं का केला नाहीं, आणि पनवेल बेलापूर वगैरे अनोळखी टापूकडे त्यानीं कां धांव घेतली याचें कारण शोधून काढणें कठीण आहे. पण केवळ तर्क जसा धावतो त्याप्रमाणें खालील माहिती देत आहे. वरच्या पत्राच्या पत्त्यामध्यें चिंतोपंत ज्या बाळ मास्तरांचे घरीं बेलापुरास राहत होते ते त्यांचे पत्नींचे बंधु किंवा चुलत बंधु असावेत. त्यांची सासुरवाडी बाळांकडची हें मला नक्की माहीत आहे. तेव्हां बाळ आणि ही बाळ मंडळी ठाणे जिल्हा, कुलाबा जिल्ह्यांतील हें ही माहीत आहे. तेव्हां या मार्गानें चिंतोपंतांनीं तो परिसर (दापोली दाभोळ ) सोडून हा परिसर निवडला असावा. चिंतोपंतांनीं जन्मभर शेतीभाती पाहिलेली, म्हणून ते त्या उद्योगांतले तज्ञ असावेत असा मोरोपंतांचा–अण्णांचा समज होता. तेव्हां १९११ १२ चे सुमारास उरण पनवेल या रस्त्यालगत सुमारें दीड हजार रुपयांची कांहीं बिघे, सुमारें दोन खंडी भात उत्पन्न येणारी, जमीन अण्णांनीं खरेदी केलेली होती. त्याचप्रमाणें साधारण त्याच रक्कमे एवढ्या रक्कमेंत दोन ठिकाणीं दोन जमिनी गहाण घेतलेल्या होत्या. हे सर्व व्यवहार ही जमीन व गहाणखतें त्यांचे नांवची व पुढें माझे नांवची होतीं. त्यानंतर १९१३ च्या मे मध्यें जर रेल्वे अपघातांत अण्णांचा मृत्यु झाला नसता तर बलापुर येथें सुमारें ८००० रुपयांची मोठी जमीन श्री. पाटणकर या गृहस्थांची व सुमारे दहा खंडी भाताचें उत्पन्न देणारी, विकत घेण्याचा व्यवहार झाला असता. (तो पुढें झाला नाहीं, हें येथेंच सांगतों.) ही जमीनही बहुधा अण्णांच्या नांवानें खरेदी झाली असती. त्यांचे मनांतील भविष्यकालीन विचार मी त्यांचे तोंडूनही ऐकलेले आठवतात ते असे. नागपूरची नोकरी फारतर माझें B. A. पर्यंत शिक्षण व रत्नप्रभा

आणि शशिकला यांचे विवाह होईपर्यंत म्हणजे आणखी ८।१० वर्षेंच करावयाची. त्यानंतर शेतीवाडीवर जाऊन श्री. दत्तात्रेयाच्या भक्तीमध्यें मिळेल त्या उत्पन्नामध्यें उर्वरित आयुष्य घालवावयाचें. पण त्या बाबतींत त्यांचेच तोंडीं असलेलें इंग्रजी वचन सांगतों. Man proposes, but God disposes! या वचनाप्रमाणें घडलें!

## नव्या विभागाची ओळख

ती. कै. मोरोपंत हे माझे वयास १९१३ मध्यें १० वर्षें झालीं तेव्हांच वारले. त्यामुळें माझ्या ताज्या व स्पष्ट अशा आठवणी नागपूरच्या त्यांचे रहिवासाच्या आहेत. त्याच सुरुवातीस दिल्या आहेत. आतां हा मधला विभाग ते पदवी परीक्षा पास झाले तेव्हांपासूनच आहे. हा सर्व विभाग झाल्यावर शेवटीं त्यांचे जन्मापासून पदवी मिळवण्यापर्यंतचा विभाग देईन. हा मधला विभाग काल दृष्टीनें जरी १८९२ ते १९०७ म्हणजे १५ ते १६ वर्षांचा किंवा पहिल्या विभागाचे तीनपट मोठा आहे, तरी लेखनाचे दृष्टीनें तो तौलनिक दृष्टीनें बराच लहान होईल. आणि शेवटचा विभाग त्यांचे आयुष्याचे दृष्टीनें सर्वांत मोठ्या कालखंडाचा म्हणजे १८६८ ते १८९२ म्हणजे सुमारें २४ वर्षांचा असला तरी तो लेखन दृष्टीनें फारच लहान होईल.

या विभागांत १८९२–९३ या दोन वर्षांचा एक छोटासा उपविभाग असून मुख्य विभाग उज्जयिनी येथील वास्तव्याचा सुमारे १४ वर्षांचा काळ वर्णन करावयाचा आहे.

## डेक्कन कॉलेजांतील फेलोशिप

माझे जवळ असलेल्या मोरोपंत यांच्या B. A. च्या डिग्री (पदवीचा कागद) वरून त्यानीं ती पदवी २२ जानेवारी १८९२ रोजीं मिळवली. त्या पदवी कागदावरून ते डेक्कन कॉलेजांत शिकत होते. त्यांस दुसरा वर्ग मिळाला असें दिसतें. खालीं व्हाइस चॅन्सेलर म्हणून मि. Birdwood अशी सही आहे. त्यांस दोन वर्षपर्यंत डेक्कन कॉलेजमध्यें दक्षिणा फेलोशिप मिळाली होती अशी मला माहिती आहे. त्याकाळीं परीक्षा दिवाळीचे आधीं होत असत, त्यामुळें त्यांची B. A. ची परीक्षा १८९१ मध्यें झाली असावी. त्यानंतर ते बरेच आजारी

पडले होते. म्हणजे बहुधा ते १८९२ मध्यें आजारी असावेत. केसोपंत यांस भीति पडली कीं त्यांस पदवी मिळालेला मुलगा लाभत नाहीं; त्यामुळें त्यानीं मोरोपंत यांस स्वत: जवळ न ठेंवतां दाभोळ जवळच्या गुडघें या गावीं, मोरोपंतांच्या श्वशुरगृहीं पाठवलें, त्यामुळें तिकडच्या दांडेकर कुटुंबीय मंडळींच्या शुश्रूषेमुळें, आणि माझी आई सौ. सीताबाई हिच्या सुभाग्यामुळे ते या आजारातून चांगले बरे झाले. एवढे कीं त्यांनीं पुढें लवकरच पुण्यास गावांत बिऱ्हाडही केलें; आणि त्यानीं तेथें सर्वांत धाकटे भाऊ बापू किंवा सीताराम आणि सौ. सीताबाई यांचे थोरले भाऊ भास्कर नाना यांस शिक्षणाकरितां पुण्यांत आणलें देखील. सीतारामपंत हे थोडें मागून १८९३ सालीं मोरोपंतांचे वडीलांच्या म्हणजे केसोपंतांच्या मृत्युनंतर पुण्यास आले. शनिवार रविवारीं ते गावांत येत, राहत, बिऱ्हाडाची व्यवस्था लावूत जात. श्री. भास्करनाना दांडेकर हे त्यावेळीं १८-२० वर्षांचे असावेत. ते लोकमान्य टिळक यांचे लॉ क्लासांत वकिलीचा अभ्यास करीत असत. त्यांचेच एक साडू-मेहुणी-बायकोच्या बहिणीचे यजमान, श्री. केळकर हे वर्धा येथें प्रख्यात वकील होते.

या कालांतील विशेष अशी कांहीं माहिती नाहीं. पण मोरोपंत यांचे बिऱ्हाड पुण्यांत असतांनाच त्यांचे एक चुलत बंधु गणूबाबा म्हणून होते, त्यांचेंही बिऱ्हाड पुण्यांत होतें. त्यांची पत्नी सौ. यमुनाबाई या ट्रेनिंगचें शिक्षण घेत असाव्यात, त्या पुढें अनेक वर्षें अहमदनगर जिल्ह्यांत प्राथमिक शाळांत शिक्षक म्हणून काम करीत असत या गणूबाबांचीच एक बहीण येसूताई म्हणून होत्या. त्यांचे यजमानांचें बुधवारांत मिठाईचें, मसाल्याचें दूध विकण्याचें दुकान होतें, व त्यांस चांगली प्राप्ति होत असावी.

बहुधा १८९३च्या एप्रिल-मेमध्यें खेड मुक्कामीं मोरोपंतांचे वडील केसोपंत यांस त्यांचे वय सुमारें ६६ असतांना देवाज्ञा झाली. त्यावेळीं सर्वच कुटुंबीय खेडास जमले असतील. उत्तरक्रिया झाल्यानंतर विशेषत: मोरोपंतांनीं एकाप्रकारें पुढाकार घेऊन कुटुंबाचा सर्व बोजा, म्हणजे बापू व मातोश्री यांचा, स्वशिरावर घेतला. पैकीं बापूला तात्काळ पुण्यास शिकावयास नेलें; आणि मातोश्री अन्नपूर्णाबाई यांस पुढें उज्जयिनीस नीट बिऱ्हाड लागल्यावर वर्ष दीड वर्षांनीं नेलें.

सीतारामपंत यांस त्यानीं पुण्याचे न्यू इंग्लिश स्कूल या प्रख्यात शाळेंत इंग्रजी चवथींत किंवा तिसरींत घातलें. ( आजकालच्या भाषेंत ते ७ वी किंवा ८ वीत बसले. ) खेड येथें त्यांचें प्राथमिक शिक्षण त्याचप्रमाणें संस्कृत धातुरूपकोश समास-

चक्र, कौमुदी, रघुवंशाची सुरुवात आदि गोष्टी केसोपंतांजवळ झाल्या होत्या; आणि एका खाजगी इंग्रजी क्लासांत इंग्रजी भाषा शिकत होते. त्यामुळें पुण्यास ते एकदमच अशा वरच्या इयत्तेंत बसू शकले.

१८९३ मध्यें दिवाळीचे सुमारास परीक्षा झाल्यानंतर निकाल लागण्यापूर्वींच त्यांस उज्जयिनी येथील माधव कालेजांत प्रोफेसर म्हणून नोकरी मिळाली. त्यानीं M. A. ची पदवी, डिग्री, २० फेब्रुवारी १८९४ रोजीं मुंबई येथें घेतली. चॅन्सेलर म्हणून गव्हर्नर हॅरीस यांची सही आहे. ह्या डिग्रीमध्यें डेक्कन कॉलेजचा उल्लेख आहे. पण कोणता वर्ग मिळाला आहे त्याचा उल्लेख नाहीं.

## उज्जयिनी येथील बिऱ्हाड, शेजारी

विक्रम राजाची उज्जयिनी किंवा अवंती नगरी ही इतिहास प्रसिद्ध नगरी होय. मराठ्यांच्या साम्राज्यांत शिंदे घराण्याची राजवट या भागांत होती; आणि शिंद्यांचे ग्वाल्हेर संस्थानांत उज्जैन हा दक्षिण भागाकडील एक मोठा व महत्त्वाचा सुभा होता. माधव कॉलेज ही संस्था माजी माधवराव महाराज शिंदे हे गादीवर आले त्यानंतर निघालें असावें. त्यांचा जन्म १८७६ मध्यें (२० ऑक्टोबर) झाला; आणि कै जयाजीराव महाराजांचे मृत्युनंतर ते १८८६ मध्यें राजे झाले अर्थात् वयांत आल्यावर त्यांस अधिकार प्राप्ति झाली असेल. पण त्याकाळांत उज्जैन, इंदोर येथील कॉलेजांत शिक्षण मोफत मिळे; शिक्षणाचा दर्जाही चांगला असे, राहणी स्वस्ताईची म्हणून क्वचित् महाराष्ट्रांतून देखील शिक्षण घेण्यास गरीब विद्यार्थी तिकडे जात, अगदीं १९२०-२५ सालापर्यंत इंदोरला शिक्षण घेतलेले विद्यार्थी माझ्या माहितीमध्यें आहेत.

अशा या माधव कॉलेजांत अण्णांची नेमणूक दर महा रुपये १२५ पगारावर झाली. अण्णा हे M. A. ला तत्त्वज्ञान किंवा फिलॉसफी हा विषय घेऊन बसले होते आणि B.A. ला किंवा M.A. ला पूरक विषय म्हणून त्यानीं इतिहास हा विषय घेतलेला असावा. अण्णा उज्जयिनीस १८९४ मध्यें गेले; त्यावेळीं त्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल ढेकणेसाहेब होते. हे मूळचे पुण्यास शनवारपेठेंत कबूतरखान्याचे अलीकडे राहणारे विद्वान् गृहस्थ होते. त्याचप्रमाणें दुसरी प्रोफेसर मंडळी (जी कांहीं नावें आठवतात ती देतों) म्हणजे प्रोफेसर परचुरे, प्रो. पाटणकर, प्रो. खोत ही होत. यांचे शिवाय श्री. केळकर व श्री. फाटक ही कुटुंबेंही शेजारास होतीं.

माधव कॉलेजची इमारत चांगली व गावाबाहेर स्टेशनकडे होती. आणि कॉलेज पासून जवळच एका लांबलचक चाळवजा इमारतींत (दुमजली) ही सर्वच मंडळी शेंजारीं शेजारीं राहत असत. सर्व कुटुंबें मूळचीं महाराष्ट्रीय, पुण्या-मुंबईकडचीं, आणि दूर वसाहतीस गेलेलीं. यामुळे या सर्वांचें एक विस्तृत कुटुंबच होतें असें समजावयास हरकत नाहीं. या बाबतींत माहितीच द्यावयाची झाली तर खालील गम्मत पहा. १९६२ च्या नोव्हेंबर मध्यें मी कोल्हापूरास शिवाजी विद्यापीठाचे त्यावेळचे रजिस्ट्रार प्रो बी. आर ढेकणे (हे उज्जयिनीच्या प्रिन्सिपॉल साहेबांचे पुतण्ये) यांस भेटावयास गेलों होतों नंतर १९६३ च्या मे मध्यें पुण्यास त्यांचे थोरले बंधू व वृद्ध मातोश्री यांस भेटावयास गेलों होतों, त्यावेळीं त्यांस परम आनंद झाला.जुन्या आठवणी जागृत होवून वृद्ध मातोश्रींनीं आमच्याकडच्या वृद्ध आत्याबाई लक्ष्मीबाई दांडेकर किंवा काशीआत्याबाई यांनी विशेष चौकशीकेली. प्रि. बी. आर. ढेकणे यांचे वडील श्री. रामभाऊ ढेकणे (उज्जनीच्या प्रि. ढेकणे यांचे बंधु) यांस मी पुण्यास सी. के. दामले यांचेकडे १९१३ मध्यें राहावयास आल्यावर १९१५-१६ पर्यंत पाहिलेलें आहे. त्यांचेकडच्या मुंज-विवाह आदि एका कार्यासही गेलेलों होतों असें आठवतें त्यांचेकडे आमच्या कुटुंबाचे उज्जनी येथील काढलेलें फोटोही आहेत अशी माहिती प्रि. ढेकणे यानीं मला दिली !

अण्णांचे प्रोफेसर या नात्यानें काम चोख असेल. कारण त्यांचा स्वभाव करारी होता, कर्तव्यदक्षता त्यांचे ठिकाणीं फार मोठ्या प्रमाणांत होती. त्या संबंधांतील पुढील एक हकीगत येथेंच देतों. १९०२ नंतर असेल बहुधा, माधव कॉलेज हें कॉलेज या स्वरूपांत बंद करण्यांत आलें, आणि तें हायस्कूलच झालें. त्यावेळीं ग्वाल्हेर संस्थानचे डायरेक्टर ऑफ एज्युकेशन-शिक्षणाधिकारी मि. जॉन्सन किंवा जॉन्स्टन साहेब (हें नांव मी स्मरणांतून देत आहे) आणि ती. अण्णा यांचा एक महत्वपूर्ण व अण्णांच्या स्वभावाचा एक वैशिष्टचपूर्ण पैलू दाखवणारा पत्र-व्यवहार आमच्या जुन्या कागदपत्रांत मला मिळाला होता. मी तो वाचलेला आहे; पण पानशेत पूर प्रकरणांत तो नाहीसा झाला आहे. मि. जॉन्सन यानीं अण्णांची बदली ग्वाल्हेरच्या कॉलेजांत इतिहासाचे प्रोफेसर म्हणून केली. त्यावर अण्णांनीं त्यांस लिहिलें होतें. कीं इतिहास शिकवणें त्यांस ताबडतोब जमणारे नव्हतें; Logic व फिलॉसफी ते शिकवूं शकले असते. पण इतिहासाचा त्यांस जवळ जवळ एक वर्षभर अभ्यास करावा लागेल व मग तें शिकवणें जमेल. तेव्हां जॉन्सन साहेबानीं उलट उत्तर पाठवलें कीं रजा द्यावयास सवड नाहीं, आणि स्वतः जॉन्सन यांस अण्णांच्या इतिहास शिकवण्याचे बाबतींत विश्वास वाटत होता, ते तो विषय समर्थपणानें शिकवूं शकतील असें त्यांचें मत होतें! त्यावर

अण्णांनीं त्यांस निक्षून कळवलें कीं जास्त पगाराची ती जागा, विषय बदलून ( Logic व Philosophy ) दिल्यास ते स्वीकारतील; नाहींतर एक वर्षाची पगारी रजा मिळावी अभ्यास (इतिहासाचा) करण्यास; नांहींतर कमी पगाराची हेडमास्तरची जागाच उज्जैनची कायम करावी. अखेर जॉन्सन यांचा राग पत्करून ते उजैन येथेंच राहिले ! या प्रकरणावरून त्यांचें उजैन येथील काम किती चांगले चाललें असेल त्याची वाचकांस कल्पना यावी.

उजैन येथें सुरुवातीस म्हणजे १८९४ मध्यें अण्णा आई व बापूकाका यांस घेऊन गेले. तेथें त्यानीं आपलें बिऱ्हाड थाटलें. सुरुवाती सुरुवातीस त्यांचेवर जॉन स्टचुअर्ट मिल्ल आदि तत्ववेत्त्यांचा, सुधारकी मतांचा पगडा होता. ते डेक्कन कॉलेजांत असताना त्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. सेल्बी (हे तत्वज्ञानाचेच प्रोफेसर होते.)यांचे ते एक आवडते विद्यार्थी होते. त्यानीं पुढें केव्हांतरी सीतारामपंत कॉलेजांत असतांना अंदाजे १८९८-९ चे सुमारास "तुझा भाऊ आतां देवपूजेच्या नादीं लागला आहे, त्यानें गुरु केला आहे असें ऐकतों. त्याचेमध्यें असा एकाएकीं पालट कसा झाला?" असा प्रश्न विचारलेला होता. त्यावर सीताराम-पंतांनीं काय उत्तर दिलें होतें, तें त्यांचें त्यांस माहीत !

उज्जनीस अण्णा स्थिरस्थावर झाल्यावर बहुधा १८९६ चे सुमारास किंवा थोडें आधीही असेल त्यानीं आपली मातोश्री श्री अन्नपूर्णाबाई व धाकटी विधवा बहीण काशी यांस कोकणांतून उज्जैन. येथे नेलें असावें. १८९४ मध्येंच केव्हांतरी अण्णांच्या सर्वांत थोरल्या मुलीचा जन्म झाला. माझी थोरली बहीण शकुंतला, जिच्या विवाहाची हकीगत नागपूरच्या हकीकतींमध्यें विस्तारशः दिली आहे. तिच्या-हून मला मोठ्या तीन बहिणी होत्या. त्यांची नांवें अनसूया, प्रियवंदा, व कृष्णाबाई होत. पैकी १८९४ मध्यें अनसूया हिचा जन्म झाला. आणि बहुधा दुसऱ्या मुलीच्या जन्माच्या आधीं त्यानीं घरांत वडीलधारें माणूस व घर कामास मदत म्हणून माझ्या आजी व आत्याबाई यांस उज्जनीस नेलें असावें. त्या दोघीजणी नंतर अण्णांचे जव-ळच कायम राहिल्या.

१८९३ मध्यें केसोपंतांचे मृत्युनंतर खेडचें बिऱ्हाड मोडले गेलें. आणि आमच्या आजी अन्नपूर्णाबाई स्वाभाविकपणानें त्यावळचें ऱ्यांचे सर्वांत वडील चिरं-जीव चिंतोपंत यांचे जवळ वळण्याचे घरांत रहावयास गेल्या. काशीताई यांचे सासर जवळच दीड-दोन मैलही नाहीं अशा जालगांवीं दांडेकरांकडे होतें. त्याही अधून मधून वळण्यास जात-येत असतील. शिवाय त्यांस वैधव्य प्राप्त झालेलें होतें.

त्यामुळें त्यांस दांडेकर कुटुंबांत मोठें स्थान नसणारच. त्यांची सासूबाई फार कर्तबगार आणि खाष्ट होती. त्या पुढें पुष्कळ वर्षें जवळ जवळ १९२५-३० सालपर्यंत हयात होत्या. आमच्या आजींचा केव्हांतरी एकवेळ चिंतोपंताकडून अपमान झाला. त्यांची कांहीं अल्पशी इच्छा चिंतोपंत यांनी मानली नाहीं. त्यावेळीं घरच्या म्हाताऱ्या गड्यानें चिंतोपंतास थोडे रागावून आईची इच्छा पूरी करावयाची विनंति केली. त्या काळांत कोकणांत (आणि देशावरही असेंच असेल) घरांत पिढीजात नोकर असत; आणि म्हाताऱ्या नोकरांचे तरुण मालकावर कांहीं नैतिक वजन पडत असे; ते तसा अधिकार घेत असत. अर्थात् तरुण तडफदार चिंतोपंत नोकरास काय जुमानणार ? या हकीगती कशातरी मोरोपंत यांचे कानावर गेल्या असाव्यात. म्हणून ही भानगड नको म्हणून त्यांनीं मातोश्री व बहीण यांस स्वतःकडे उज्जयिनीस नेलें! त्याकाळांत कोकणांत जन्म घालवलेल्या माणसांस तो मुलूख सोडून दुसरीकडे देशावर जाणें मनापासून आवडत नसे; म्हणून सुरुवातीस आजी अन्नपूर्णाबाई उज्जयिनीस जावयास कदाचित् नाखूषही असतील. परंतु परिणामतः त्यांचे उज्जयिनीस जाणें त्यांस श्रेयस्करच ठरलें. तें कसें त्याचा खुलासा पुढें होईलच.

त्या काळांत उज्जयिनो येथें श्री शीलनाथ महाराज या एका सत्पुरुषाचा उज्जयिनी येथ रहिवास होता. ते गावाबाहेर एका धुनीजवळ बसलेले असे तेजःपुंज व खरे सत्पुरुष होते, व साधुवृत्तिनें राहत असत असें ऐकलें आहे. महाभारताचार्य चिंतामणराव वैद्य पूर्वीं उज्जयिनी येथें सुभे म्हणून अतस. प्रिन्सिपॉल ढेकणे, प्रोफेसर परचुरे आदि मंडळी शीलनाथ महारांजाचे शिष्य बनले होते. तेव्हां स्वाभाविकपणानें मोरोपंत हे सुरुवातीस कुतूहल म्हणून म्हणा, शीलनाथ महाराजांस पहावयास गेले असतील; कालांतरानें त्यांचेबद्दल त्यांस कांहीं आदरभाव वाटावयास लागला असेल . अशाप्रकारें हळुहळूं ते देवधर्म, परमार्थ या मार्गाकडे झुकूं लागले. हा काळ बहुधा १८९७-९८ चा असेल. गावाबाहेर एक मैलावर शीलनाथ महाराज धुनीजवळ बसत असत. कोणी भक्तांनीं कांही नैवेद्य दिल्यास थोडा धुनीत टाकीत असत. भक्तगण तसे फारसे त्यांचे अवती भोवती नसत. मोरोपंत कधीं कधीं सहकुटुंब, सह परिवार जात असत, दर्शनास, असें काशीआत्या म्हणाल्या.

मोरोपंत यांचे वैवाहिक जीवन एकंदरीत सुखाचें सुरू झालें. १८९४ मध्यें उज्जयिनीस गेल्यावर बहुधा लौकरच त्यांस पहिलें अपत्य–मुलगी अनसूया झाली. दुसरीही मुलगीच झाली. तिचें नांव प्रियंवदा व ती १८९६ त झाली. तिसरी मुलगीच झाली; १८९८ मध्यें तिचें नांव कृष्णाबाई होतें. यांतील प्रियंवदा हीच जरा मोठी झाली होती म्हणजे अंदाजानें ३ वर्षांची. दुसऱ्या दोघी अल्पवयांतच

गेल्या. प्रियवंदा ही सीतारामपंत यांस फार आवडत होती, बाळसेदार होती. एकदां ती फार आजारी पडली असतां एका इंग्रज डॉक्टरनें तिला बरी केलें. ताप विषम किंवा असलाच Typhoid सारखा मुदतीचा होता. टेंपरेचर खूप चढलें होतें. तेव्हां तें उतरवण्याकरितां त्याकाळांत बर्फाची पिशवी ठेवणे वगैरे प्रकार माहीत नसावेत. डॉक्टरनें थोडा अघोरी वाटणारा उपचार केला. तो म्हणजे एकदम गार पाण्याचें स्नान घालणें. त्यामुळें ताप उतरला खरा. पण एकंदर दुखणें थांबलें नाहीं; पहिल्या मुलींत हीच मुलगी सर्वांस चटका लावून, ळळा लावून देवाघरीं गेली. या नंतरची मुलगी १९०० मध्यें मार्चच्या सुमारास झाली; ती म्हणजे शकुंतला, आपल्या प्रियसख्यांच्या मागून आली मोरोपंतांच्या संसारांत; आणि या नंतरचें अपत्य मुलगा, मी लेखक. माझा जन्म गुढीपाडव्याचा, १९०३ सालचा.'' पण या हकीगती मागाहून सांगेन.

मोरोपंत हे उज्जयिनीस असतांना टेनिस खेळत असत. त्यांचा पोषाख नागपूरला असतांना जो मी वर्णन केला आहे तसाच म्हणजे पर्शियन फॅशनचा लांब कोट, पगडी, उपरणें, लाँग बूट; पण धोतराऐवजीं पांढरी विजार किंवा पॅन्ट असे. कॉलेजांत शिकवण्या व्यतिरिक्त अन्य लेखनही ते करीत असत. Logic वर विगमन आणि निगमन हीं ( Deductive व Inductive ) छोटेखानी पुस्तकें त्यांनी लिहिलीं होती. Edmund Burke च्या Reflections on the French Revolution चे भाषांतर, विचारभ्रमण या मोठ्या नांवाखालीं सुखाचा विचार, सुधारक, वगैरे लेख प्रो. अण्णा विजापूरकर या त्यांच्या मित्राच्या ग्रंथमाला मासिकांत ते लिहीत असत. याशिवाय "शास्त्रीय मराठी व्याकरण" ज्या ग्रंथानें त्यांस अजरामर केलें आहे, निदान आजतागायत, त्या ग्रंथाची पूर्व तयारी ते १८९८ पासून करीत होते अशी मला माहिती कळलेली आहे.

मातृसेवा, इतर कुटुंबियांस मदत देणें, गो-भक्ति, (त्यांनी उज्जयिनीस गेल्यापासूनच गाय घरी ठेवली) कालांतरानें सत्पुरुष समागम, सन्मित्रांचा समागम, चरित्राचा उद्योग नेटका करणें आणि ग्रंथांचा अभ्यास, व ग्रंथलेखन असे विविध उद्योग त्यांनी आपल्या मागें लावून घेतले होते.

सीतारामपंत हे फार हुषार बंधु होते. पुण्याहून ते आले त्यावेळीं पुण्यास ते त्याकाळच्या ४ थीत म्हणजे आजच्या ८ वीत होते. वर्षअखेर High School Entrance परीक्षेस बसले व Central India मध्यें पहिल्या क्रमांकानें पास होऊन त्यांनीं स्कॉलरशिप मिळवली. त्यांचेबद्दल मोरोपंत व कवि केशवसुत यांस फार

अभिमान वाटे, आणि त्यांचेवर या दोन्ही बंधूंचें फार प्रेम होतें. आणि ते पुढें लौकरच म्हणजे पुरी तीन वर्षे न घेतांच १८९६ च्या सुरुवातीसच अलाहाबाद विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तम प्रकारें पास झाले. त्यांस मोरोपंतांनीं पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत शिक्षणास पाठवलें. त्यांनीं १९०० सालीं बी. ए. ची पदवी दुसऱ्या वर्गांत मिळवली. त्यावेळीं इंग्रजी विषयांत पहिले येऊन त्यांस प्रसिद्ध Ellis Prize व Ellis Scholarship ही मिळाली. त्याचे आदले वर्षीं त्यांचा विवाह झाला.

## सीतारामपंतांचा विवाह व नंतरचा आजार

सीतारामपंत यांचा विवाह फार गमतीदारपणानें व अगदीं एकाएकीं ठरला. याबाबतींत थोडीफार इतिहासाची पुनरावृत्तिच घडली. ज्याप्रमाणे कृष्णाजीपंतांचे विवाहाचे वेळीं चितळ्यांनीं मुलगा पाहिला नव्हता, व दामल्यांनीं मुलगी पाहिली नाहीं अगदीं त्याचप्रमाणें याही खेपेस वैद्यांनीं मुलगा पाहिला नव्हता, आणि दामल्यांनीं मुलगीही पाहिली नव्हती ! पण प्रो. परचुरे यांनीं मुलगा व मुलगी दोघेही पाहिलेली होतीं; आणि त्यांच्या मध्यस्थीनें हा विवाह विद्युद्वेगानें-तारेनें ठरला !

त्याची गम्मत अशी—नानासाहेब वैद्य (रावबहादुर चिं. वि. वैद्य, महाभारताचार्य, या उपाधि त्यांस पुष्कळ पुढें चिकटल्या, या विवाहाचेवेळीं, १८९९ साल, ते चीफसाहेब, ग्वाल्हेर संस्थानचे मुख्य न्यायाधीश होते) हे मुलीचे विवाहाकरितां मुंबई, नाशिक, कल्याण ( त्यांचा मूळ गांव ) इकडे गेले होते. त्यांच्या मुलीचा विवाहही ठरला होता, एका चांगल्या ठिकाणीं. पण त्यानंतर लौकरच वराचे पक्षांतील कोणी एक महत्त्वाची व्यक्ति मरण पावल्यामुळें त्याचें खापर या मुलीचे डोक्यावर फोडण्यांत येऊन, तो तिचा पायगुण समजण्यांत येऊन, तो विवाह मोडण्यांत आला ∴ विवाहाचा मोसम संपत आलेला. पुढचे सालीं सिंहस्थ, मुलगी त्या काळच्या मानानें मोठी झालेली. अशा परिस्थितींत वैद्य चिंतेंत पडले. प्रो. परचुरे यानीं त्यांस सीतारामपंतांचें स्थळ सुचवलें; आणि त्यांस तें पसंत पडलें. प्रो. परचुरे यानीं लगेच उज्जैन येथें मोरोपंतांकडे संधान बांधलें. मोरोपंत व सीतारामपंत यानीं परचुरे यांचे शद्बावर व वैद्य यांचे सारख्या मानमरातब असणाऱ्या विद्वान्

तळटीप– ∴ ही हकीगत माझी आतेबहीण श्री. तापूबाई दीक्षित यानीं सांगितली.

गृहस्थांकडे, त्यांचे घराण्याकडे पाहून सम्मति दिली. हा विवाह पत्रें व तारा यानीं ठरला. कदाचित् परचुरे हे त्यापूर्वी जसे वैद्य यांस भेटले होते तसे मोरोपंतांस उज्जयिनी येथें भेटले असतीलही आणि शेवटची सम्मति तारेनें कळवली असेल.

विवाह नाशिक येथें जून मध्यें ज्येष्ठांत झाला. त्याकरितां उज्जयिनीचे मंडळींशिवाय कृष्णाजीपंत, मेहुणे केशवराव पेठे व कुटुंब, वगैरे मंडळी होती. चितोपंत होते किंवा नाहीं ती कल्पना नाहीं; पण ते व कोकणची मंडळी नसावीत. कारण बोटी बंद झालेल्या होत्या, व त्याकाळीं मोटारी नव्हत्या. केशवराव पेठे यांच्या मुलीनें एक दोन गम्मतिच्या आठवणी या प्रसंगींच्या सांगितल्या, त्या येथें देतों. केशवराव हेही थोडेफार कवि होते. या विवाहापूर्वी अंदाजें दोन महिने सर्कसवाले काशिनाथपंत छत्रे यानीं केवळ २४ तासांची मुदत देऊन गव्हर्नर साहेबांची स्तुति असणारें, त्यांचें स्वागत करणारें पद तयार करणें, पेटी तबल्यावर तें बसवून घेणें, तें योग्य अशा मुलांकडून नीट म्हणवून घेणें एवढें सर्व पेठ्यांनी करावें. दुसरे दिवशीं रात्रीं सर्कसचा खेळ पहावयास गव्हर्नर साहेब यावयाचे होते. पेठे यानीं ठरल्याप्रमाणें काम उत्तम केल्यामुळें (त्यावेळीं मुंबईत एक नाटक कंपनी होती. त्या कंपनींत पेठे यांची ओळख, जाणें येणें होतें) त्यांस छत्र्यांनीं एकदम खूष होवून शंभर रुपये दिले होते. त्या रक्कमेचें त्यानीं चांदीचें ताट व वाटी घेतली होती, स्वतःच्या जावयांकरितां. पण त्याचा उपयोग या विवाहाचेवेळीं झाला, दामले कुटुंबास. दुसरी गम्मत योग्य वेळीं सांगेन, याच प्रकरणांत, थोडी पुढें.

विवाह समारंभ थाटाचा झाला. हुंडा असा न देता मुलीस भरपूर दागिने घालून सालंकृत कन्यादान झालें. त्या काळच्या हिशोबानें अंदाजे ३५–४० तोळे सोनें, त्याचे गोट पाटल्या, तोडे, वाकी, आदि दागिने आणि मोत्याची नथ, कुडीं, व गळ्यांतला एक पेटचा किंवा असाच कांहींसा दागिना, असे दागिने त्यानीं घातले. नवरदेवास पोषाखादि गोष्टी ही केल्याच. त्या विवाहाचे वेळीं घेतलेले दोन्ही कडचे बुट्याचे स्त्रियांचे जरीचे शालू, अजूनपर्यंत माझ्या घरांत होते, पण त्यांचे कांहींतरी रुपांतर करण्यांत आलें होतें. पुरुषांनीं घ्यावयाचे जरीचे उपरणीं वजा शेले ही थोड्या वर्षांपर्यंत होते, शिल्लक, माझ्याकडे. नवरा मुलगा देखणा होता. नवरीही देखणी होती. जोडा चांगला शोभणारा होता. .. आणि परिणामीं चिंतामणराव यांस जावयाबद्दल अखेरपर्यंत अभिमान वाटत होता. आणि जावयांसही त्यांचेबद्दल आदर होता... या हकीगती सीतारामपंतांच्या चरित्रांत येतील.

एक किरकोळ गोष्ट घडली, दामले कुटुंबीयांस अपमान वाटणारी, कोण-च्याशा एका जेवणाचे वेळीं (बहुधा मांडव परतणें समारंभाच्या) . वैद्यांनीं त्यांच्या कडच्या खाशा मंडळीस व जावयीबावांसही कलमी आंब्यांचा रस वाढला; पण इतर दामले कुटुंबीयांचे पंक्तीस साध्या आंब्यांचा रस, आंबे वाढले, त्याबद्दल थोडीफार कुजबूज झाली; पण ती आतल्या आंतच शमली.

सीतारामपंत यांस ग्वाल्हेरीस कारणपरत्वें बोलावणें येई. शिवाय ग्वाल्हेरचे त्यावेळीं अगदीं तरुण व तडफदार असणारे महाराज माधवराव महा-राज शिंदे यांचेबरोबर टेनिस खेळावयास तसेच तरुण खेळाडू म्हणून सीताराम पंतांस आमंत्रण येई. ते डेक्कन कॉलेजांतील टेनिस खेळाडूंपैकींएक चांगले खेळाडू होते. बोटिंगच्या शर्यतींत ही ते यशस्वी चमूमधील एक होते. त्यांस त्यावेळीं नवीनच प्रचारांत आलेल्या Sandow यांचे Dumb-bells चा व्यायाम आवडत होता. व ते तो व्यायाम नियमित घेत असत.

मला वाटतें केसोपंतांच्या B. A. झालेल्या प्रत्येक मुलाला परीक्षेनंतर मोठा आजार यावा असा परमेश्वरी संकेतच असावा. श्रीधरपंत तर B. A. नंतर एका वर्षानें कालवशच झाले; व त्याचा केसोपंतांस फार मोठा धक्का बसला. मोरोपंतही ९२ सालीं परीक्षेनंतर फार आजारी पडले होते, केसोपंतांना ती गोष्ट, तो त्यांचा आजार सहन होईना म्हणून त्यांस आजारपणांत त्यांचे श्वशुर-गृहीं गुडवें येथें ठेवण्यांत आलें. पण त्यांचे स्वतःचें नशीब, किंवा त्यांचे पत्नीचें नशीब, किंवा एकूण कुटुंबाचें नशीब यावेळीं चांगलें असेल म्हणून ते या जीवा-वरच्या दुखण्यांतून बचावले, उठले आणि त्यानंतर त्यांचे हयातींतच त्यांस दुसरा कोणताच आजार झाला नाहीं. सीतारामपंत ही या नियमास अपवाद ठरले नाहींत! त्यांचें आजारीपण त्यांचें स्वतःचें नशीब, पत्नीचें सौभाग्य, कुटुं-बीयांचेही नशीब ..ही यादी लांबवावयाची गमतीनें तर मी व माझी पाठचीं त्यावेळीं जन्म न पावलेली भावंडें यांचेंही नशीब, बलवत्तर म्हणून ते आजारातून उठले. पण या कारणांस दूर सारणारें एक कारण आहे. या आजाराचे आधीं एखादें वर्ष मोरोपंत यांचा व एका साधु महाराजांचा गुरुशिष्य संबंध जडला होता, व त्या गुरूंच्या औषध योजनेनें सीतारामपंत बरे झाले!

आतां हे गुरु म्हणजे हरीहरबोवा उदासी होत. यांचें मूळ नांव किंवा आडनांव पाळंदे होय. या घराण्याचें घर पुण्याच्या जोगेश्वरीच्या बोळांत आंतील बाजूस आणखी एका पश्चिमेकडे जाणाऱ्या बोळांत कोठेंतरी होतें, अजूनही असेल.

मी त्या घरीं एका मंगल कार्याकरितां जेवावयासही १९१४ मध्यें श्री. चिंतामणराव वैद्य यांचे बरोबर गेल्याचें पक्कें स्मरतें. या बोवांचे एक बंधु ग्वाल्हेर संस्थानांत नोकरींत होते व त्यांचेकडच्या मंगलकार्यास मी वैद्यांबरोबर गेलों होतों...

या हरीहर बोवांबद्दल पुष्कळ वाईट एकलेलें आहे. त्यांस सर्व प्रकारचीं व्यसनें होतीं. दारूचें व्यसन आमच्या घरच्या बायकां माणसांसही परिचयाचें झालेलें होतें. पण अण्णांच्या मुळें ती मंडळी साधुमहाराजांविरुद्ध ब्र उच्चारूं शकत नव्हती. अण्णांसही दारूच्या त्यांच्या व्यसनाबद्दल पूरी माहिती होती. पण त्यांचे ठायीं असलेल्या आध्यात्मिक शक्तीमुळें ते भुलून गेले असावेत. आतां ही शक्ति तरी त्यांचेजवळ कितपत होती देव जाणे. ते लो. टिळक यांचेकडे कशास तरी गायकवाडवाड्यांत गेले असतां त्यानीं त्यांस वाड्याबाहेर घालवून दिलें होतें असें मी ऐकलेलें आहे. मी या साधु महाराजांस पाहिल्याचें स्मरण नाहीं. ते आमचे घरीं उज्जयिनीस पुष्कळवेळां येत असत, राहत असत घरीं५ नागपूरास सुरुवातीस ते आले असतीलही; पण १९१० चे सुमारास त्यांचा अंतही झाला,असें ऐकल्यासारखें वाटतें. माझे वडीलांची, अण्णांची, त्यांचे ठायीं एवढी भक्ति होती कीं त्यानीं कांहीं वर्षे उज्जयिनीस असतां आपला अर्धापगार त्यांस अर्पण केला होता. आणि बहुधा दरमहा त्यांस ४०।५० रुपये अशी रक्कम जवळजवळ १० वर्षेपर्यंत ते देत राहिले, त्यांचे म्हणजे बोवांचे मृत्युपर्यंत.

एकवेळ ओंकारमांधाता येथें त्यानीं अण्णांस नेलें होतें. रात्रीचे अंधारांत, अगदीं किर्र झाडी असलेल्या टापूंत त्यानां विहीरीचें पाणी आणावयास त्यानीं पाठवलें होतें. आणि वाटेंत वाघाचें दर्शनही झालें अण्णांस, असें ऐकलें. काशीआत्यांनीं ही माहिती सांगितली. साधुमहाराज व अण्णा या यात्रेवरून आल्यावर ते आत्मप्रौढीनें सीतारामपंतांस म्हणाले, "अरे बाप्या, बघ, तुझ्या भावास वाघाच्या तोंडींच देणार होतों!" त्यावर सीतारामपंत म्हणाले– "तुम्हीबरोबर असल्यावर वाघाची छाती काय होणार अण्णांस खाण्याची!" या हरीहर बोवांच्या शिष्यत्वापासून अण्णांचे अनेक लाभही झाले म्हणावयाचे–बापूकाका–सीतारामपंत–भाऊ याची आजारांतून सुटका, मातोश्रींस यांचेच आग्रहावरून काशी, प्रयाग, मथुरा, गया या यात्रा घडवणें, आणि पुत्र प्राप्ति, माझा जन्म.

साधुमहाराज यानीं सीतारामपंत यांस जवळ जवळ तीन महिने केवळ दुग्धाहारावरच ठेवलें होतें; आणि त्यांस कांहीं भस्में व इतर औषधें दिली. त्यानिमित्तानें घरीं भट्टी लावून अंदाजें ५००। ६०० रुपयांचे खर्चांत पाडून त्यानीं

अण्णांकडून पुष्कळ औषधें करवलीं. ती बरीच वर्षे घरांत पडलेली होतीं नागपूरासही, हें ऐकलें आहे! ... सीतारामपंत आजारांतून उठले, पुढें पुष्कळ वर्षे जगले, त्यांचे हातून वृत्तपत्र - सृष्टीची, मराठी वाङ्मयाची व देशाची ही सेवा घडली यांत कांहीं शंका नाहीं.

## काशीयात्रा व आईचा मृत्यु

कोणत्याही हिंदु सुपुत्राला आपल्या आईवडीलांस काशी प्रयाग, रामेश्वर आदि यात्रा घडवाव्यात असें साहजिकच वाटतें. पवित्र गंगा-यमुना सरस्वती यांचा प्रयागचा संगम, काशीचा श्री विश्वेश्वर आणि दक्षिणेकडचा रामेश्वर आदि स्थळें हीं प्रत्येक हिंदूस पावन क्षेत्रें वाटतात देह गंगेत मिळाला तर उत्तमच; निदान स्वतःच्या अस्थि तरी गंगेत विसर्जन व्हाव्यात ही इच्छाही असते अनेकांस. तेव्हां मोरोपंतांच्या मनांत मातोश्री अन्नपूर्णाबाई हिला या महायात्रांपैकीं कांहीं यात्रा तरी घडवावयाचा विचार आला असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. अन्नपूर्णाबाईचे वय त्यावेळीं ६५ च्या सुमाराचें होतें. प्रकृतीहि बरी होती, तशा त्या आजारी नसत. पण या वयापुढें कोणत्याही व्यक्तीबद्दल फारशी खात्री देतां येत नाहीं. तेव्हां हा बेत जुळवण्याचे त्यांचे मनांत आल्यापासून ते योग्य संधिची वाट पहात असतील; आणि तसा योग त्यानीं १९०१ सालच्या दिवाळीनंतर जुळवून आणला.

या बेतास जोराची चालना मिळण्याचें तात्कालिक कारण हरीहर बोवा किंवा साधुमहाराज यांचीदेखील यात्रा करण्याची व ती "दामल्या" बरोबर करण्याची इच्छा झाली हें होय, तेव्हां गुरुची इच्छा झाल्याबरोबर पूज्य मातोश्री व इतर कुटुंबीय यांस नेणें भाग होतेंच. इतर कुटुंबीयांत पत्नी सौ. सीताबाई व लहान मुलगी शकुंतला, आणि बहीण काशी या होत्या. यात्रांबद्दल तयारी करण्यांत आली. हिवाळचाचे दिवस, एका प्रकारें सोयीचे. पण दिवस लहान थंडीचे, त्यामुळें कपडालत्ता जास्त घ्यावा लागला. मोरोपंतांनीं थंडीकरितां ओव्हरकोटही केला होता. प्रवासांत मोठी मंडळी २ पुरुष आणि तीन स्त्रिया; पैकीं एक वृद्धच; आणि एक दीड पावणेदोन वर्षांची मुलगी. पैशांची तजवीज तर प्रथम करावयास हवी. यात्रा म्हणजे नाना श्राद्धें, देवधर्मही आलाच. त्या प्रमाणें क्षेत्रांचे ठिकाणीं पंडये - उपाध्याय यांचेकडून लुबाडले जाण्याचें ही भय असतेंच. इकडे घरराखणीचीही व्यवस्था करावयाची होती. कारण ही यात्रा जवळजवळ दोन अडीच

महिन्यांची होती. तेवढी रजा मिळणें नोकरीतून या गोष्टी सर्व नीट झाल्या. घर राखणीचे काम धाकटे बंधु सीतारामपंत व जानकीकाकू यांचेकडें देण्यांत आलें. पैशांची रजेची सोय झाली. आणि त्यापेक्षांही एक फार उत्तम प्रकारची सोय झाली. ग्वाल्हेर संस्थानच्या बहुतेक प्रत्येक मोठ्या क्षेत्राच्या ठिकाणीं धर्मशाळा होत्या, (त्यांतच दररोज कांहीं लोकांस शिधा अन्नदान होत असे.) किंवा अन्नछत्रें होती. त्या त्या ठिकाणच्या मुनीमांस संस्थानच्या धर्मदाय खात्याच्या प्रमुखांकडून ओळखपत्रें व मोरोपंतांस व त्यांच्या मंडळीस त्या त्या ठिकाणीं रहावयास जागा व अन्य मदत माहिती द्यावी असे आदेश देणारीं पत्रें मोरोपंत यांस मिळालीं. ही एक फार मोठी सोय झाली, व त्यामुळें यात्रा एकूण सुखकर झाली.

या यात्रेस प्रारंभ कुठून झाला, आणि कोणत्या अनुक्रमानें निरनिराळीं स्थळें या यात्रिकांनीं पाहिलीं याची माहिती मिळाली नाहीं. पण एकूण जीं स्थळें त्यानीं पाहिलीं तीं - मथुरा - वृंदावन, अयोध्या, प्रयाग, काशी, व गया, (मातृ-गया, पितृ–गया) होत; आणि बहुधा हाच क्रम त्यानीं घेतला असावा असें नकाशा पाहिल्यास वाटतें. मथुरा वृंदावन आणि अयोध्या येथें माकडांचा वानरांचा त्रास झाला. त्यांस कांहीं खावयास दिल्यास यात्रिकांची सुटका व्हावयाची नाहींतर हातातल्या वस्तुदेखील हिसकावून घेण्याइतकीं धीट तीं जनावरें झालेलीं आहेत असें ऐकलें आहे. प्रयाग किंवा काशी येथें कोठेंतरी - वेणी दान, विधवा काशीताई यांचे केशवपन करणें, श्राद्धें आदि जीं कांहीं धार्मिक कृत्यें असतील तीं यथासांग करण्यांत आलीं. गयेसही श्राद्ध, पितरांस स्वर्गास पोचवणें आदि कृत्यें झालींच. त्या सर्व कामांत अण्णांची वृत्ति दिवसेंदिवस धार्मिक होत चालली होती, आणि त्यांत या खेपेस साधुमहाराज बरोबर होते आईही होती. त्यांची आज्ञा पालन करणें, त्यांच्या भावनांचा मान राखणें ही मुख्य गोष्ट होती. काशीची गंगा रामेश्वरास व रामेश्वराचा सेतु काशीस पोचवणें हें परम धार्मिक कृत्य समजलें जातें. पण तें साधण्याचा प्रयत्न केलेला नसावा. प्रयाग किंवा काशी, बहुधा काशी येथूनच, गंगोदक भरलेली सीलबंद केलेली "गंगा" घरीं देवपूजेत होती; पुष्कळ वर्षें मी तिची पूजा केलेलीही आठवते. आणि ती शेवटीं सीताराम पंतांची पत्नी जानकीकाकू हिच्या मृत्युचे वेळीं १९१६ सालीं फोडलेली मला आठवते. कदाचित् अशा २।३ गंगाही आणलेल्या असतील, त्यांतली एक मला आठवत आहे एवढेंच.

यात्रा करून आल्यावर स्वभाविकच त्यांचे मावंदें झालें. आणि यात्रा व मावंदें या सर्वांचा खर्च जवळजवळ एक हजार रुपये झाला असें ऐकिवांत आहे. अशा प्रकारें अण्णांनीं ही एक मोठी मातृसेवाच केली म्हणावयाचें. ही यात्रा नोव्हेंबर–डिसेंबर १९०१ मध्यें सुरु होऊन शिमग्यापूर्वी फेब्रुवारींत संपली. या यात्रेस एकूण दोन महिने लागले हा प्रवास पॅसेंजरने व तिसऱ्या वर्गानें करीत असत. बरोबर शिधाही नेलेला होता, एक गडी चपराशीही सोबत म्हणून नेला होता.

इकडे सीतारामपंत व जानकीबाई यानीं घराचा सांभाळ केला. कोणी म्हणेल त्यांत काय विशेष आहे? पण थोडें विशेष होतें, ही. उज्जयिनीस गेल्या पासून लवकरच अण्णांनीं दूधदुभत्याची सोय म्हणून असेल आणि धार्मिकता म्हणून ही असेल, नेहमीं उज्जयिनी सोडीपर्यंत घरीं गाय पाळलेली होती. शिवाय कधीं कधीं म्हैस ही असे. जी एक गाय उज्जयिनीस पाळली होती तिला ७।८ वेळां खोंड किंवा कालवडी झाल्या. शेवटीं ती गाय अण्णांनी दान दिली. ही गाय एकवेळ केव्हांतरी रानांतून आली ती शिंग मोडून आली. म्हणून तिला शिंग मोडकी गाय असें म्हटलेलें मला आठवतें. तिची एक मुलगीही आमचे घरीं मोठी झाली होती... या गुरांची व्यवस्था पहाण्यास घरचें माणूस हवेंच नाहीं का ?

•

या काळांत सीतारामपंत बरे झालेले होते, आजारांतून, आणि कदाचित् ते त्यावेळीं कॉलेजांत–शाळेंत Leave Vacancy मध्यें नोकरीही करीत असतील. अशाप्रकारें उज्जयिनीस २।३ महिने त्यांनी नोकरी केली होती हें ऐकलेलें आहे मी. केशवसुतांप्रमाणें त्यांस काव्य करणें, चित्रें काढणें यांचा नाद होता. उज्जयिनीस ते साध्या कागदाच्या वहींतच रबर फारसा न वापरतां मानव आकृतिही काढीत असत, चांगल्या. त्यांची अशी एक वही मी पुण्यास १९१५–१६ चे सुमारास पाहिली आहे. त्या चित्रांपैकीं युलिसीस किंवा ओदसीयस्, रोम मध्यें युद्धें खेळणारे ग्लॅडिएटर्स, अशांच्या सारख्या आकृति, सॅन्डो, वगैरे आकृति होत्या. ही आवड कदाचित् प्रकृति चांगली दणकट व्हावी यामुळें, व सॅन्डोचा डंबेल्सचा ते व्यायाम घेत असत म्हणूनही ही आवड चित्रकलेच्या रूपांत प्रकट झाली असावी...

याच म्हणजे १९०२ साल अखेर माझी आजी ती, अन्नपूर्णाबाई हिला दिवाळीचे आधीं देवाज्ञा झाली. अखेरच्या काळांत ती तशी विशेष प्रकारें आजारी नव्हती, अंथरुणाला खिळलेली नव्हती. कांहीं किरकोळ ताप वगैरे आजार झाला २।४ दिवसांचा, आणि त्यांतच एकाप्रकारें शांतपणानें व आनदांत तिचा अंत झाला. त्यावेळीं

मोरोपंत व सीतारामपंत जवळ होते. मृत्युनंतर कृष्णाजीपंतही आले. कोकणांतून मात्र कोणी आलें नाहीं. कारण जाणें येणें फार लांबचे आणि त्यांस जाण्या येण्याचा खर्चही द्यावा लागला असता अण्णांस किंवा मोरोपंत यांस.

या काळांत माझे मामा व अण्णांचे मेहुणे श्री. नीलकंठराव दांडेकर हे उज्जयिनीस अधून मधून येत असत. ते फोटोग्राफी उत्तमप्रकारें जाणत होते. कॅमेरा, प्लेटस्, त्या धुण्याचें व प्रिंटस् घेण्याचें साहित्य वगैरे सर्व सामान घरांत होतें. त्यावेळींच जर नातेवाईकांच्या आग्रहास बळी पडून कृष्णाजीपंतांनीं किंवा केशवसुतांनीं आपला फोटो काढूं दिला असता तर त्यांचा फोटो शिल्लक राहता, व जगास ते कसे होते, हें आज दिसलें असतें, समजूं शकलें असतें.

या वेळेस कृष्णाजीपंतांनीं उज्जयिनीस स्वतः बरोबर परशुराम यांस नेलें असा उल्लेख श्री. वा. वा. गद्रे ( काव्यविहारींचे बंधु ) " केशवसुत स्मृति-ग्रंथा" चे पृष्ठ २२५ वर करतात. ती त्यांची चूक आहे. तो मुलगा परशुराम नसून त्यांचेच मोठे बंधु पांडुरंग होत. हे पांडुरंगपंत अण्णा उज्जयिनीस होते तोंपर्यंत तेथें राहिले व तेथें मॅट्रिक झाले १९०७-८ सालीं. १९०३ मध्यें परशुरामपंत यांस कृष्णाजीपंतांनी कोकणांतून शिकावयास देशावर आणलें.

## उज्जयिनीचीं अखेरचीं वर्षें

मोरोपंत यांस ओळीनें १८९५-६ पासून ४ मुलीच झाल्या होत्या. मुलगा नव्हता. १९०० मध्यें जी मुलगी झाली तिचें नांव शकुंतला ठेवलेलें होतें, तरी श्रीदत्तभक्तिमुळें तिला घरांत टोपण नांव "दत्ती" हें जरा कानास चमत्कारिक लागणारे नांव मिळालें होतें. तिच्या जन्मवेळेची एक दंत–कथा पूर्वींच, सुरुवाती सुरुवातीच्या भागांत सांगितली आहेच. अन्नपूर्णाबाई या माझ्या आजींच्या मृत्युनंतर ५।६ महिन्यांनीं आलेल्या चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या म्हणजे गुढीपाडव्याचे दिवशीं सकाळीं एकीकडे गुढी बांधण्याची तयारी चालू आहे त्यावेळींच मी जन्मलों ! गुरु भक्तिमुळें, श्रीदत्त सेवेमुळें, त्या दोघांच्या प्रसादामुळें कृपेमुळें स्वतःस हा पुत्र झाला अशी अण्णांची समजूत झाली म्हणून माझें नांव दत्तू किंवा दत्तात्रेय ठेवण्यांत आलें, १९०४ अखेर १९०५ च्या सुरुवातीस पौष वद्य ९, बहुधा, या तिथीस माझे पाठची बहीण शशिकला हिचा जन्म झाला, आणि १९०६ सालच्या नोव्हेंबरचे सुमारास

कार्तिक शुद्ध एकादशी या दिवशीं रत्नप्रभा हिचा जन्म झाला. आज देखील उज्जयिनीस जन्मलेलीं आम्ही पाठोपाठचीं ४ भावंडें हयात आहोंत. आधींचीं तीन व मागाहूनची तीन अशीं आणखी ६ भांवडें गतप्राण झालीं.

उज्जयिनीस असतांना अण्णा गोसेवक बनले होते. एक कपिला गाय माझ्या जन्माआधीं बरीच वर्षे आमचेकडे होती. तिला एकूण आठ वेतें गोऱ्हे किंवा कालवडी झाल्या. आमच्या चाळीवजा घराच्या मागच्या अंगास कोठेंतरी, घरापासून जरा अंतरावर गोठे किंवा आमच्या गुरांचा गोठा होता गाई-म्हशी व्यायल्यानंतर बाळंतीण झाल्यानंतर त्यांस जाड गव्हाचा गुळाचा शिरा करून देत असत. मी एकवेळ तो शिरा खावयास मागण्याचा हट्ट धरून बसलों असल्याचें मला पक्के आठवतें! मला तो खावयास मिळाला कीं नाहीं, तें आतां आठवत नाहीं, बहुधा नसेल, पण हट्ट मात्र नक्कीच आठवतो।

माधव कॉलेजची इमारत फार मोठी असावी; आजूबाजूस मोकळी पटांगणें, टेनिसकोर्ट, बागबगीचा होता असें आठवतें. [पण लहानपणच्या आठवणी थोड्याफार फसव्या असतात. एक उदाहरणच देतों. नागपूरच्या जुन्या नील सिटी ह्मयस्कूलची (आतांच्या धनवटे विद्यालयाची इमारत) माझ्या लहानपणींच्या आठवणींप्रमाणें फार मोठी भव्य होती. पण मी १९२४ च्या डिसेंबरांत मो ती जेव्हां पुनः पाहिली तेव्हां ती जुन्या राजवाड्याची इमारत सामान्यच वाटली! ] बगीच्यांत सूर्यकमळें उमलत असत. संध्याकाळच्या वेळीं तळहाताहूनही मोठी कमळें सूर्याकडे तोंड केलेलीं चांगलीं आठवतात. ही असलीं झाडें आयुष्यांत पुढें फारच थोडी पहावयास मिळालीं. म्हणून तीं चांगलीं लक्षांत आहेत. एकवेळ कोणी शारीरिक कसरतीचे खेळ करून दाखवणाऱ्या, दोरावरून बांबूनें तोल सावरीत चालणें वगैरे खेळ करणाऱ्याचे खेळ पाहिल्याचें आठवतें. एका रात्रीं बायास्कोपचा खेळ, स्थिर चित्रें, पण मॅजिक लँटर्नपेक्षां कांहीं तरी निराळें असावें, असा खेळ पाहिल्याचें स्मरते. त्यांत शेवटीं शेवटीं एका माणसाचा चेहरा खूप मोठा पडदाभर मोठा झालेला पाहून मी भ्यायलो होतों! ... पण त्यापुढें ७।८ वर्षांनीं अनेकवार चलत् चित्रपट पण मूक असेच संपताना एक डोकें टक्कल पडलेलें, व त्याच्या कोऱ्या कवटीवर Good Night ही अक्षरें वाचलेलीं आठवतात. त्यावेळीं याप्रकाराची गम्मत वाटे; आज आठवणीनेंही हें सुंदर रसिक नव्हतें हें जाणवतें, पटतें.

आम्ही उज्जयिनीस असतांना श्री महांकालेश्वरास अधून मधून जात असूं. पण मला त्या देवळाची अत्यंत अस्पष्ट कल्पना आहे. या चरित्रग्रंथाचे निमित्तानेंच अलीकडें उज्जयिनीस जाण्याचा विचार होता; पण योग आला नाहीं.

जी अस्पष्टशी कल्पना आहे. ती थोडीशी श्रीत्र्यंबकेश्वराच्या देवळाशीं सदृश अशी आहे. म्हणजे एखादे तीर्थ व त्याच्या कोपऱ्यावर देऊळ (तळें पायऱ्या पायऱ्या असलेलें, चौकोनी लहानसा तलाव किंवा मोठा हौद ) ही माझी कल्पना फार पुसट असल्यामुळें चुकीचीही असेल. तसा खुलासा येथेंच करतों. त्याची टीकाकारांनींही दखल घ्यावी. क्षिप्रा नदी उज्जयिनीस आहे असें केवळ ऐकलेलें आहे. पण ती पाहिल्याचें आठवत नाहीं.

कुंभमेळा सिंहस्थपर्वणी या निमित्त किंवा अन्य निमित्तांनीं, साधूंचा घोळका उज्जयिनीस अनेकवार येत असे. एका साधूची गम्मतीदार हकीगत ती, काशी आत्याबाईंचे तोंडची ऐकलेली सांगतों. एक फार तेजस्वी, केवळ लंगोटी धारण करणारा साधु " दूधो पियो मेरे दत्तात्रय मूर्ति " किंवा "साधूजी को दूध पिलाव " म्हणत यावयाचा दारांत सकाळीं थोडा वेळ थांबावयाचा, दूध मिळालें लोटाभर तर प्यावयाचा, आणि जावयाचा. अशाप्रकारें २।३ लोटे दूध प्यायल्यावर तो दिवसभर मग कांहींच मागत नसे, कोठें जात नसे, त्या साधूस नियमानें एक तांब्यावर अंदाजें शेरभर दूध आमचेकडे देण्यांत येई. पुष्कळसे नंगे बैरागी मिरवत, गळयांत रुद्राक्षांच्या माळा घालून, अंगास राख किंवा भस्म फासून, रस्त्याने जात असलेले अस्पष्टसे आठवतात.

उज्जयिनीस आमचेकडे अण्णांस कागदपत्र ठेवावयास रेशमी किनखापी रुमाल निरनिराळीं डिफाइन्स – रेखाकृति असलेले तुकडे जोडून व चारी बाजूस किनार लावलेले चौरस वार भरेल असे रुमाल सरकारांतून मिळत असत. असला एक रुमाल अगदीं अलीकडच्या काळापर्यंत शिल्लक राहिलेला मजजवळ होता. आहेही. आमचे कपडे शिवावयास एक दर्जी–शिंपी ( त्याचें नांव जे आठवते तें "डोंगा" दर्जी असें आहे ) येत असे. त्यानें एक कातरी आम्हास दिली होती. ती फार सुरेख धारवान होती. आजही जवळजवळ सत्तर वर्षें पर्यंत काम देत आलेली घरांत आहे.! ही लहानशी वस्तु १९०८ नंतर आमचीं अनेक स्थलांतरें झालीं; पण ती टिकून राहिली आहे व त्यामुळें त्या "डोंगा" दर्जीची आठवण मला येते. माझ्या मागे ती राहणें मुष्कील!

एक वेळ केव्हांतरी फार मोठे मोठे हत्ती मिरवणुकींत जातांना आणि त्यांच्या गळयांतील घंटा वाजताना, हत्तींवरच्या हौद्यामधून कोणीतरी मोठे लोक मिरवत गेल्याचें दृश्य मनावर कोरलेलें आहे. पण ती कशा निमित्तची मिरवणूक, तें लक्षांत नाहीं.

अण्णांच्या गुरुभक्तिच्या कांहीं गोष्टी मी काशीआत्यांकडून ऐकलेल्या आहेत त्या आतां देतों. साधू महाराज किंवा हरीहर बोवा उदासी हे त्यांचे गुरु. त्यांचेबरोबर त्यानीं कांहीं तीर्थयात्रा केल्या. चित्रकूट किंवा ओंकार मांधाता या जरा जंगलांतल्या अशा अवघड स्थळीं ते गेले होते; त्यावेळची अण्णांच्या कसोटीची एक हकीगत पूर्वी पृ. १७२ वर दिली आहे. चित्रकूट संबंधांत आमच्या भजनांतील कोणा एका पद्यांतील कांहीं भाग आठवतो तो असा–

" चित्रकूट गिरि कंदरिं अत्र्याश्रम वास रेवातटिं औदुंबरिं तव मंदिर खास
तीर्थ कमंडलु सन्निध एरंडी तीरे एकांत तपश्चर्या विश्वहिता पसरे "

बहुधा हें पद्य " जयदेवी जयदेवी जय माते अनुसूये " हिच्या संबंधांतील असावें. हरिहर बोवा यांचा काव्यसंग्रह सुमारें २५०–३०० पृष्ठांचा, अण्णांनीं १९१२ मध्यें प्रसिद्ध केला. या साधुमहाराजांस दरमहा निदान ३०-४० रुपये अण्णा साधुबोवांचे अखेरीपर्यंत अदाजें १९१० पर्यंत पाठवीत असत. त्यांचेसमवेत ते एकदां कर्नाटकांतही गेले होते, कोणत्याशा तीर्थक्षेत्रास भेट देण्यास. त्यांचे मुळेंच नर्मदा तीरावरच्या जुन्या बडोदा संस्थानांतल्या सिनोर व चांदोर यांचे मध्यें असलेल्या श्री माता अनुसूया देवीच्या दर्शनास ते बहुधा वर्षांतून एकवार जात असत. डेक्कन कॉलेजांत असतांना प्रो. सेल्बी साहेबांपासून तत्त्वज्ञानाचे धडे घेतलेले, मिल्ल, स्पेन्सर यांचें तत्त्वज्ञान आत्मसात् केलेले, बुद्धिवादी असे अण्णा उज्जयिनीस आल्यावर अंदाजें १९०० सालपर्यंत पुष्कळसे तसेच राहिले असतील. आणि त्यानंतर किंवा त्याचे आधींच्या काळापासूनही त्यांचे मनांत हळूहळू पालट पडत जाऊन ते ईश्वरवादी व श्रीदत्तभक्त बनले. त्यानीं गुरु केला; गुरूपदेशही घेतला असावा. त्यांच्या गुरूवर, साधू महाराजांवर, त्यांची निष्ठा असावी. त्यांचे गुरू दारू पीत असत. आणि त्यांचें तें व्यसन चालू ठेवण्यास अण्णा हातभार लावीत असत हें ही मी ऐकलेलें आहे. कांहीं काळपर्यंत तर ते स्वतःचा अर्धा पगारही त्यांस दक्षिणा म्हणून पाठवीत होते! या त्यांच्या गुरुभक्ति विरुद्ध कोणाचीही ब्र बोलण्याची छाती नव्हती, ताकद नव्हती!

१९०७ अखेरच्या सुमारास नागपूरच्या त्यावेळींच्या नील सिटी हायस्कूलच्या चालकांची एक जाहीरात वर्तमान पत्रांतून आली. त्या शाळेस सुपरिंटेंडेंट हवा होता. पगार रुपयें ३०० होता. ती. अण्णांनीं अर्ज केला होता. त्यांची

त्या जागेकरितां पसंती झाली. पण अण्णांनीं त्यांचा संसार अर्धवट झालेला, उज्जयिनी संस्थानची चांगली कायम नोकरी १४ वर्षे झालेली, तेव्हां त्यानीं नोकरीवर आपला हक्क कायम ठेवून प्रथम एक वर्षाचा करार नागपूरच्या संस्थेशीं करून त्या नोकरीवर एक वर्षाकरितां म्हणून ते गेले. पण त्या वर्षात त्यांचा जम चांगला बसला; त्यांचें व अधिकाऱ्यांचे जमलें, म्हणून त्यानीं उज्जयिनी कायमची सोडली; व ते नागपूरकर झालें.

## मोरोपंत यांचें बाल्य व शिक्षण

मोरोपंत यांचा जन्म मालगुंड येथें १८६८ सालीं झाला. त्यांची जन्मतिथि, जन्मकुंडली वगैरे माहिती पुढें देत आहे–

शालिवाहन शके १७९०, विभवनाम संवत्सरे, दक्षिणायने, शरदृतौ, कार्तिकमासे, कृष्णपक्षे, सप्तम्यांतिथौ मंदवासरे, घटि २, पळे ६... केसो विठ्ठल दामले, अन्नपूर्णाबाई चतुर्थपुत्ररत्नं ∵ प्रासूत, नक्षत्र आश्लेषा (?), चरण प्रथम, नाम डीमदेव, रास कर्क, गण राक्षस, नाडी अंत्य.

मोरोपंत यांस स्वतःची पत्रिका दाखवण्याचा नाद होता. स्वतःचें, मुलांचें भविष्य जाणून घेण्याची इच्छा असे. पण आश्चर्य असें कीं, त्यांचा मृत्यु योग एका प्रकारें अपूर्व असा होता. ते कीर्तिशिखरावर होते. प्रकृति उत्तम होती. आणि अशा अवस्थेंत एकाएकीं आगगाडीच्या अपघातांत पति–पत्नी दोघेही एकदम कालवश झाली. अण्णा ४५ वर्षाचे असतांना १९१३ मध्यें त्यांचा मृत्यु व्हावा ही गोष्ट कोणीही ज्योतिषानें केव्हांही नुसती सूचितही केली नव्हती ! म्हणतात असें कीं, ज्योतिषी कोणाच्याही मरणाबद्दल कळलें तरी सांगत नाहींत. आतां दिलेल्या पत्रिकेंत तसा योग आहे कीं नाहीं तें जाणकारांनीं अवश्य पहावें. ज्योतिष शास्त्र, कुंडलीं–विज्ञान खरें असेल तर तसा योग यांचे पत्रिकेंत असावयास हवा.

---

तळटीप– ∵त्यावेळीं हयात असलेले पहिले श्रीधर, दुसरे चिंतोपंत, तिसरे कृष्णाजीपंत (केशवसुत) व चवथे मोरोपंत. प्रत्यक्ष पत्रिका सर्व चरित्रांचे शेवटीं पहा.

बालपणीं मोरोपतांचा स्वभाव कसा होता, ते दिसत कसे, कोणते खेळ खेळत, वाचनाचा नाद त्यांस असल्यास कसा होता, त्यानीं काय वाचलें होतें वगैरे कांहीं माहिती नाहीं. पण मला ते आठवतात त्याप्रमाणें अनुमान करावयाचें तर ते गोरे, दिसावयास सुदृढ व चांगले असतील. पण ते थोडे अबोल असतील. खेळ मैदानी खेळ, ते खेळले नसतील. त्यांचें प्राथमिक शिक्षण, आप्पांच्या चरित्रांत त्यांचे शिक्षण जसें झालें म्हणून वर्णन केलें आहे, त्याचप्रमाणें झालें असेल. सर्वच भावांचे शिक्षण केसोपंतांनीं कांहीं एका पद्धतिप्रमाणें केलें असेल; व तेच त्यांचे प्रधान गुरु आचार्य असावेत. बहुधा मराठी ७ वीची परीक्षा त्यांनीं दिली असेल, आणि १८८१–८२ मध्यें त्यांचा विवाह झाल्यावर थोरले बंधु तात्या किंवा श्रीधर केशव यांचेकडे आप्पांबरोबर ते इंग्रजी शिकावयास गेले. बडोदें येथील त्यांचे व आप्पांचें आयुष्य बरोबरच गेले. पुढें तात्यांचे मृत्युनंतर दोघेही बंधु वर्ध्यांस स्वतःचें मामा रामभाऊ करंदीकर वकील यांचेकडें गेले, नंतर नागपूरास गेले. पण शेवटीं मोरोपंत हे उमरावतीच्या हायस्कूलमधून तेथें एक–दोन वर्षें किंवा आवश्यक तें शिक्षण घेऊन मॅट्रिक झाले. उमरावतीस असतांना त्यांना श्रीधरपंत किंवा तात्या यांचे मित्र मोरोपंत जोशी वकील (पुढें प्रख्यात सुधारक, सर मोरोपंत, झालेले) यांची मदत मिळाली. त्या मदतीचे आधारावर त्यांचें शिक्षण झालें. त्या काळांत त्यांस XI क्लास मध्यें जनरल प्रोफिशियन्सीबद्दल बक्षिस मिळालेलें एक पुस्तक — A Short History of the English People या नांवाचें जॉन रिचर्ड ग्रीन यांनी लिहिलेलें एक सुंदर पुस्तक आजही माझ्या संग्रहीं आहे! तें त्यांस १८८७ च्या वार्षिक परीक्षेतील हुशारीबद्दल दि. १३।७।१८८८ रोजीं मिळालें. हेडमास्तर म्हणून श्री. आर. बी. तलवलकर अशी सही आहे. त्यावरून ते एक हुषार विद्यार्थी होते असें दिसेल. मॅट्रिकनंतर ते पुण्यास फर्ग्युसन कॉलेजांत शिकावयास गेले. तेथें जाण्याचें कारण बहुधा आप्पांची देशभक्ति व त्यांचा आग्रह असावा. त्यावेळीं ते पुण्यांत एकत्र राहत असतील पण त्यावेळच्या पी. ई. परीक्षेंत एकदां ते नापास झाले. पण पुढें मात्र एम. ए. पर्यंत एकही अपयश न घेतां ते डेक्कन कॉलेजांत शिकले. बी. ए. च्या परीक्षेंत त्यांस दुसरा वर्ग मिळाला, आणि ते फेलो नेमले गेले.

डेक्कन कॉलेजांत त्यांचे मित्र कोणकोणते होते याविषयीं विशेषशी माहिती नाहीं. पण त्या संबंधांत थोडी थोडी विखुरलेली अशी माहिती मिळते. दे. भ. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांच्या आत्मचरित्रांत तो ग्रंथ फार मोठा (एक हजार पृष्ठांवरच ) असल्यानें मी थोडचा आशाळभूत पणानें त्या ग्रंथांत पाहिलें. पण माझी निराशा झाली, आशाळभूतपणा यासाठीं कीं त्यांचेच तोंडून मला ते व अण्णा डेक्कन कॉलेजांत समकालीन होते हें कळलें होतें; आणि १९१३

नंतर त्यानीं मजवर मित्राचा पोरका मुलगा, आणि सीताराम केशवांचा पुतण्या म्हणून खूप प्रेम केलेलें होतें. अगदीं १९४५-४६ सालपर्यंत सोलापूरला कधीं आले, भेटले तर "कायरे दामले, कसें काय चाललें आहे" असा प्रश्न असेच. पण त्यांच्या आत्मचरित्रांत डेक्कन कॉलेज विषयक प्रकरणांतही, विशेषसा उल्लेख नाहीं! पण दुसरे साहित्यसम्राट व तात्यासाहेब, श्री. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या छोटयाशा आत्मवृत्तांत मात्र मधून मधून पण चांगली उद्बोधक माहिती आढळते, याबद्दल मला आश्चर्य वाटलें. "आत्मवृत्ता"च्या पृ. ७ वर पहा –

"माझ्या वेळीं कॉलेजांत नरसिंह चिंतामण केळकर, मंगेश शिवाजी तेलंग, शंकर श्रीकृष्ण देव, मोरो केशव दामले, बळवंत बाबाजी देशपांडे, बेळवी, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, शिवराम महादेव परांजपे, नीलकंठ पांडुरंग पाटणकर, शांताराम अनंत देसाई इत्यादि अनेक बुद्धिमान् गृहस्थ शिकत होते. माझें विशेष सख्य, भास्कर रामचंद्र नानल, श्रीनिवास त्रिंबक द्रवीड. सखारामपंत बाक्रे, खानविलकर इत्यादि कांहीं गृहस्थांशीं होते" पण शंकर मोरो रानडे यांचे चिरंजीव रघुनाथ शंकर रानडे यांचा लेखक या नात्यानें त्यांचेवर विशेष परिणाम झाला. अशीही माहिती कोल्हटकर देतात.

त्यांचे वेळच्या प्राध्यापकांबद्दलची माहितो पृ. ८ वर पहा :–

"ऑक्झेन्हॅम, सेल्बी, भांडारकर करकरे, दस्तूर हे प्रमुख प्राध्यापक असत. ऑक्झेन्हॅम साहेब एल्फिस्टन कॉलेजचे प्रिन्सिपॉल होऊन गेले..." त्यानंतर सेल्बी प्रिन्सिपॉल झाले.

एक फारच मजेदार व ऐतिहासिक महत्त्वाची माहिती ते पृ. ८ वरच देतात ती पहा :–

"१८९१ साली आम्ही... संस्कृत मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग केला. त्यांत मजकडे शकाराच्या विटाची भूमिका आली होती. मी इसबानें व तापानें आजारी असतांही माझी भूमिका बरी वठली असावी असें वाटतें. त्यावेळीं बेळवी हे फेलो होते. त्यानीं टाइम्स्‌ला प्रयोगाच्या हकीगतीचें एक सविस्तर स्तुतीपर पत्र पाठविलें होतें. या प्रयोगांत न. चि. केळकरांनी मदनिकेची व कुंभीलकाची, मंगेश शिवाजी तेलंग यानीं वसंतसेनेच्या विटाँची, मोरो केशव दामल्यांनीं सूत्रधाराची, व 'संतापशमन'कार दत्तात्रय अनंत केसकर यानीं न्यायाधीशाची भूमिका घेतली होती. चारुदत्त, शकार, मैत्रेय, शर्विलक, वसंतसेना यांची कामें अनुक्रमें मल्हार-राव गर्दे, साठे, मोरोपंत आगाशे, गोविंदराव ओक व कट्टी यानीं घेतली असून

ती सारीं अप्रतिम वठलीं, वसंतसेनेचे सोंग तर इतके सुंदर दिसलें व त्या सोंगाची बतावणीही इतकी सरस झाली कीं खुद्द भांडारकरांनीं पडद्यांत येऊन त्याबद्दल अभिनंदन केलें. तितका सुंदर प्रयोग धंदेवाल्या नाटक मंडळ्यांकडूनहि झालेला पाहण्यांत आलेला नाहीं असे उद्‌गार त्या प्रयोगाचे अनेक प्रेक्षक अजून (प्रस्तावना सन १९१९) काढितांना दिसून येतात."

या नाटका विषयींची हकीगत न चिं. केळकरांच्या एक हजार पृष्ठांच्या "गतगोष्टी" या ग्रंथांत नाहीं! ते राजकारणी पुरुष म्हणून राजकारण या विषयास त्यांच्या "गतगोष्टीं"त स्वाभाविकपणानें विशेष महत्त्व दिलेलें आहे, आणि श्रीपाद कृष्ण नाटककार, म्हणून त्यानीं या नाटच प्रयोगास महत्त्वाचें स्थान, निदान स्थान, दिलेलें दिसतें. ही मृच्छकटिक नाटकाची माहिती खरोखरच मनोरंजक व महत्त्वाची होय.

'आत्मवृत्तां' त वर आलेल्या पुष्कळशा काय, बहुतेक सर्वच मंडळींचा व त्यांचा पुढील आयुष्यांत फारसा संबंध न आल्यानें त्यांच्या १४६ पृष्ठांच्या चरित्रांत पूर्वोक्त मंडळींपैकीं जवळ जवळ कोणाचाच फारसा उल्लेख नाहीं. तात्यासाहेब केळकरांचा अपवाद सांगतां येईल, पण ते द्रोघेही नाटककार, व मित्र आणि त्या दृष्टीनेंचत्यांचा उल्लेख आहे थोडाफार

आत्मवृत्तांतील वर उल्लेख केलेले श्री. बाक्रे हें नांव अन्य रीतीनेंही मी ऐकलेलें आहे, व त्याचा उल्लेख नागपूरच्या हकीगतींत केलेला आहे. ते बहुधा मोरोपंत व श्रीपाद कृष्ण या दोघांचेही समान स्नेही असावेत. पण अन्य उल्लेख करतों सरदार खं. चिं मेहेंदळे यांनीं स्वतःच मोरोपंतांचे समकालीन होतों म्हणून मला एकवार १९२३ च्या मे मध्यें त्यांचे घरीं मी काहीं कारणानें (ठाण्याचे साहित्यिक, वि. ल. भावे– 'महाराष्ट्र–सारस्वत' या अपूर्व ग्रंथाचें लेखक यांचा त्यांचेकडे निरोप घेऊन गेलों असतांना) गेलो असतां सांगितलें होते. श्री. बाळ म्हणून एक जज्ज होऊन गेले. त्यांनीही त्यांचेकडें मी माझी भाची सांगून गेलों असतां ते व मोरोपंत हे समकालीन होत अशी माहिती दिली. श्री. बाळ यांचा मोठा दगडी बंगला पुण्याच्या टिळक रोडजवळ साहित्य परिषदेच्या कचेरीच्या जवळपास आहे. कोपरगांव येथें शेतीवाडी करून राहिलेले श्री. गणपुलें या नांवाचे गृहस्थही त्यांचे सहकारी होते. ही माहिती श्री. गणपुले यांचेच तोंडून वर उल्लेखल्या प्रमाणेंच त्यांचेकडे भाचीस सांगून गेलों असतांना १९४१–४२ मध्यें कळली . पण या सर्वांत महत्त्वाचें नांव मला वाटतें प्रो विष्णू गोविंद विजापूरक, समर्थ विद्यालयाचे संस्थापक

स्मृतिस्थितींत आणलें. गणू बाबा व यमुनाबाई माझे आजींच्या मृत्युपूर्वी एकवेळ उज्जयिनीस येऊन गेले होते.या गणूबाबा कुटुंबाचा व सीतारामपंतांचा पुण्यास जो घनिष्ट संबंध आला तो अनेक वर्षे टिकला. आणि त्यांचे मुळेंच पुढें श्री. दत्तोपंत ह्यांच्या मातोश्री त्यांचे बंधु वगैरे मंडळींची व माझी चांगली ओळख निर्माण झाली.

या फेलोशिप संबंधांत न. चिं. केळकरांच्या "गतगोष्टी" मध्यें एक उल्लेख आहे. बी. ए. झालेले जवळ जवळ सर्वच हुषार विद्यार्थी एल्. एल्. बी. व्हावयास मुंबईस गेले, आणि प्रिन्सिपॉल सेल्बी यांचा आग्रह एम्. ए. स तत्त्वज्ञान विषय घ्यावा असा होता. म्हणून मोरो केशव (त्यांस एम्. ए. व्हावयाचें असल्यानें) फेलो म्हणून राहिले. अशा अर्थाचा मजकूर "गतगोष्टीं" त आहे. दे. भ. शि. म. परांजपे (काळकर्ते) हे संस्कृतचे पंडीत होते. तेही डेक्कन कॉलेजांत फेलो होते असें ऐकलेलें आहे. तेही एम्. ए. झाले. तेव्हां मोरोपंत व काळकर्ते परांजपे बरोबरच फेलो होते किंवा एखाद दुसरें वर्षं आगे मागें होतें असें अनुमान निघतें. याचा शोध घेण्यासारखा आहे; त्या दृष्टीनें खालीलमाहिती पहा :–

[प्रो. दे. भ. शि. म. परांजपे यांचें चरित्र लेखक त्यांचेच नातू श्री. वामन कृष्ण परांजपे आपल्या ग्रंथांत पृ. ४३ वर माहिती देतात– १८८३ मध्यें अण्णासाहेब किंवा बाळक्या मॅट्रिक नापास झाले; पण १८८४ त त्यांनी जगन्नाथ शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ति मिळवली. ते फर्ग्युसन कॉलेजच्या पहिल्या विद्यार्थ्यांतील एक होते. (यादृष्टीनें ते हरी नारायण आपटचांचे सहकारी ठरतात. कु. वेणूताई पानसे आपल्या ग्रंथाच्या पृ. ६५ वर हें साल १८८५ सांगतात. तर श्री. वा. कृ. परांजपे त्यांच्या ग्रंथाच्या पृ. ४४ वर तें साल १८८४ देतात ! तेव्हां या बाबतींत जिज्ञासूंनीं जास्त शोध घ्यावा.) पण पृ. ४६ वर वा. कृ. परांजपे लिहितात–"फर्ग्युसन कॉलेजांतून प्रीव्हियसची परीक्षा पास झाल्यावर शिवरामपंत डेक्कन कॉलेजांत दाखल झाले. व तेथेंच त्यांचा एम्. ए. पर्यंतचा अभ्यास पूर्ण झाला." त्याच पृष्ठावरील पुढच्या परिच्छेदांत ते लिहितात–"डेक्कन कॉलेजांतील पहिलें वर्ष डे-स्टूडन्ट म्हणून काढल्यानंतर पुढीलसालीं म्हणजे १८८७ मध्यें शिवरामपंत रेसिडेन्सींत रहावयास गेले." या माहितीवरून शिवरामपंत हे ८४ साल अखेर शंकरशेठ स्कॉलर आले व ८५ मध्यें फर्ग्युसनमध्यें दाखल झाले हेंच बरोबर ठरतें. ८४ साल देण्यांत त्यांची चूक वाटते.

शिवरामपंतांच्या समकालीन विद्यार्थ्यांत बरींच नांवें कै. श्री. कृ. कोल्हटकरांनी दिलेलीं आढळतात. पण त्यांत आश्चर्य असें कीं दे. भ. न. चिं. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, मोरो केशव दामले यांचीं नांवें आढळत नाहींत, आणि! "तथापि राजवाडे व खाडिलकर यांच्याशीं त्या वेळेपासूनच त्यांचें विशेष रहस्य असे" (पृ.४७), असा मजकूर देतात. श्री. खाडिलकर यांचें नवेंच नांव आढळतें!

पृ. ४७ वर "ना. बेळवी व प्रो. विजापूरकर हे त्यावेळीं भाषण चतुर म्हणून प्रसिद्ध होते." १८८६ मध्यें विजापूरकर हे डेक्कन कॉलेजांत फेलो म्हणून असणें शक्य आहे. कारण श्री. खानोलकर कृत प्रो. वि. गो. विजापूरकर यांचे चरित्रांत ते १८८६ मध्यें बी. ए. झाल्याचा उल्लेख आहे! ..

पृ. ५८, ५९ वर श्री. वा. कृ. परांजपे लिहितात– "अध्ययनाबरोबर अध्यापन करणें भाग पडल्यामुळें त्यांना बी. ए. होण्याला १८९० साल गाठावें लागलें त्यांत त्यांचा नंबर बराच वर आल्यामुळें त्यांना डेक्कन कॉलेजांतील दक्षिणा फेलोशिप मिळाली. १८९१–९२ हीं दोन वर्षे ते फेलो होते. व त्या अवधींत ते डेक्कन कॉलेजच्या रेसिडेन्सींतच राहूं लागले .."

या सर्व उताऱ्यांवरून मोरो केशव किंवा अण्णा व शि. म. (ऊर्फ अण्णासाहेब) परांजपे हे दोघेही बरोबरीनें डेक्कन कॉलेजांत फेलो होते हें सिद्ध होतें!

प्रो. अण्णासाहेब परांजपे हे सीतारामपंत यांजकडे अधूनमधून येत जात असत. त्यांचे मृत्यूनंतर म्हणजे १९२७ च्या ऑक्टोबर नंतरही कांहीं वेळां त्यांनीं Major Basu यांच्या एका ऐतिहासिक ग्रंथाच्या विभागांची बहुधा "Story of Satara" ने-आण केली. त्यावेळीं मी मोरोपंतांचा मुलगा हें कळल्यामुळें त्यानीं विशेष आनंद प्रकट केला होता. व मोरोपंत त्यांचे डेक्कन मध्यें सहविद्यार्थी होते अशी माहिती दिली होती. आतां त्यांचे संबंध जास्त सौहार्दाचे कां असतील त्याचें कारण समजतें.

१८९५ सालीं शिवरामपंत पहिल्या क्रमांकानें एम्. ए. परीक्षा पास झाले. त्यांस "झाला वेदान्त", व "गोकुळदास" अशीं बक्षिसें मिळालीं.

ज्या एका नाट्यप्रयोगाचा उल्लेख श्री. कृ. कोल्हटकरांनीं केला आहे, त्याचा उल्लेख वा. कृ. परांजपे अजीबात करीत नाहींत! बेळवींचा उल्लेख श्री. कृ. कोल्हटकर फेलो म्हणून करतात.]

आधींचा मजकूर मे मध्यें लिहिला. पण पुढें प्रो. शिवराम महादेव परांजपे चरित्र वाचण्यांत आलें, नव्हे मुद्दाम वाचलें. त्यामुळें. [पृ. १८६-८७वरील कंसामधला मजकूर जोडला] (दि. ५ जून १९६६ द. मो. दामले)

यानंतरच सुमारें २० जूनचे सुमारास दे. भ. काकासाहेब खाडिलकर यांचें चरित्र (लेखक त्यांचेच पुतण्ये काशिनाथ हरी खाडिलकर ) वाचलें. त्यांत पृ. ३० वर लेखक दे. भ. शि. म. परांजपे यांचे नांव देत नाहींत ! पण केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, धुळ्याचे देव, बेळगांवचे गंगाधरराव देशपांडे हीं नांवे देतात. मोरोपंत दामले यांचे नाहीं; मृच्छकटिक नाटकाचा उल्लेख नाहीं. ते १८९२ मध्यें बी. ए. झाल्याचा उल्लेख आहे तो परिशिष्टांत ३५३ पृष्ठांवर ! त्यांचे कॉलेज जीवनाची ते फारशी माहिती देत नाहींत.

सीतारामपंतांच्या व त्यांच्या (काकासाहेबांच्या) संबंधांत अधून मधून कांहीं माहिती देतात. पण ती सामान्यच. त्याबद्दल सी. के. दामले यांचे चरित्रांत पाहूं.

(२२ जून १९६६ द. मो. दामले)

याच सुमाराचें मोरोपंत यानीं त्यांचे श्वशुर विठ्ठलपंत दांडेकर मुक्काम गुडघें, ता. दाभोळ यांस लिहिलेलें एक पोष्टकार्ड प्रख्यात लेखक श्री. गो. नी. दांडेकर यांचे कृपेनें उपलब्ध झालें आहे. तें फार महत्त्वाचें आहे, एका प्रकारें. त्याचा संपूर्ण अर्थ " गो. नी." ना ही कळला नव्हता, नाहीं; मलाही त्यांतील एका एका व्यक्तीचा दाभोळच्या श्री. वामन रामचंद्र (पुत्र) व रामभाऊ दामले यांचा ते कोण होते हा उलगडा करतां येत नाहीं. पण इतर सर्व उलगडा करतां येतो. तें महत्वाचें पत्र पुढें देतों–

मोरोपंत यांचें १८९३ मधील पत्र पहा :–

श्री दत्त माधव कॉलेज, उज्जनीं

३–१०–६३

चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष.

---

* तळटीप :– या सर्व चरित्रग्रंथांत एकवाक्यता दिसत नाहीं कोणीतरी पुणे– किंवा मुंबईच्या अभ्यासूनीं डेक्कन कॉलेजचें रेकॉर्ड किंवा मुंबई विश्वविद्यालयाचें कॅलेंडरमधून शोध घेण्यासारखा आहे, घ्यावा.

पुण्याहून निघाल्याचें पत्र पोचलेंच असेल. काल रोजीं येथें सुखरुप येऊन पोंचलों. चिरंजीव बापू, निळू, रामा, व आप्पा यांस ता. २१ चे सुमारास रा. रा. वामन रामचंद्र दामले, दाभोळच्या रामभाऊ दामल्यांचे चिरंजीव हे घेऊन दाभोळेस येतील. रा. रा. भास्करराव आपणास कोणत्या दिवशीं दाभोळेस होडी घेऊन यावयाचें तें कळवतील. त्याप्रमाणें आगबोटीवर जावून त्यांस गुडघ्यास घेऊन जावें. मी नंतरचे २० तारखेस मुंबईस परीक्षेस येईन त्यानंतर तिकडे येईन. त्यावेळीं माणसांस इकडे आणण्याची तजवीज करीन. बाकी मजकूर नवल विशेष नाहीं. भास्कररावांचे पत्र आपणास येईल. कळावें. शेंवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

(सही) मोरो केशव दामले.

पत्ता :– प्रोफेसर, माधव कॉलेज.

कार्डाची दुसरी बाजू
East India Post Card
(Address only to be written on this side.)
Vitthal Balkrishna
Dandekar Esqr.
Gudaghen
Post :- Dabbhol
Taluka - Dapoli
Zilla - Ratnagiri.

या पत्रांतील बापू– सी. के. दामले; पृ १८५ वर दिलेल्या व्यक्तींपेक्षां आणखी तीन बायकोचें भाऊ त्या बिऱ्हाडीं शिकावयास असावेत असें या पत्रावन वाटतें.
निळू – नीलकंठ
रामा – रामचंद्र
आप्पा – धारोपंत
भास्कर – हे सर्व मोरोपंत यांचे पत्नीचे भाऊ होत.

या पत्रावरून मी ऐकलेली गोष्ट खरी ठरली. मोरोपंत यांस फेलो असातांनाच उज्जयिनी येथील माधव कॉलेजांत प्रोफेसरची १२५ रुपये दरमहा पगाराची जागा मिळाली, व ती त्यांनी स्वीकारली. त्यानंतर त्यांची एम. ए. ची प्रत्यक्ष परीक्षा झाली, व त्यांनी फेब्रुवारी १८९४ मध्यें ती पदवी घेतली. या पत्रावरून ऐकीव हकीगतीस बळकटी आली.

या पत्रांत उल्लेख केलेले श्री. रामभाऊ दामले हे दाभोळचे रहिवाशी दिसतात. कदाचित याच दामल्यांच्या घराण्यांत प्रसिद्ध रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांची बहीण एक दाभोळचीच 'दामली' म्हणून उल्लेखलेली स्त्री असावी. या घराण्याचा व केसोपंत यांचा घरोबा असावा असा तर्क करावयास

या पत्रामुळें जागा निर्माण झाली आहे आणि एका प्रकारें रावसाहेब मंडलीक हे केसोपंत यांचे केवळ मित्रच नव्हते, तर लांबचे आप्त देखील असावेत असा तर्क करावयास जागा निर्माण झाली आहे.

अशा प्रकारें जवळ जवळ २५ वर्षांचे मोरोपंत हे खऱ्या अर्थानें शिक्षण, लौकिक शिक्षण, संपवून गृहस्थाश्रमांत १८९४ पासून पडले. आणि तो संसार, गृहस्थाश्रम, त्यांनी अति उत्तम प्रकारें आदर्श असा, अंदाजें २० वर्षे करून संपवला, नव्हे अपघाती मृत्युमुळे त्यांस संपवावा लागला, ३० एप्रिल १९१३ रोजीं.

मोरोपंतांच्या ग्रंथ लेखनासंबंधीं आतापर्यंत कांहींच माहिती दिलेली नाहीं. फक्त ' शास्त्रीय मराठी व्याकरण ' या ग्रंथासंबंधीं कांहीं माहिती नागपूरच्या विभागांत दिलेली आहे. पण त्यांनीं अन्य लेखनही केलें; आणि तें मुख्यतः उज्जयिनी येथें केलें. बहुधा Logic विषय कॉलेजांत शिकवत असतांना तो सोपा करावा, मुलांस मातृभाषेंत मराठींत तो वाचावयस मिळाला तर सोपा होईल, असे विचार त्यांचे मनांत आले असतील. यामुळें त्यांनी Logic च्या Deductive आणि Inductive या दोन्ही पद्धतींवर ' निगमन ' व ' विगमन ' (कदाचित् अनुक्रम चुकला असेल) अशा दोन पुस्तिका लिहिल्या होत्या. त्या बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे नांवानें निघालेल्या ' सयाजी विजय ग्रंथमाला ' या मालेमध्यें मुंबईचे शेठ दामोदर सावळाराम यंदे यानीं प्रसिद्ध केल्या. या पुस्तिका मी जन्मांत पाहिल्या नाहींत. पण या फार चांगल्या आहेत असें ऐकलेलें आहे. फार जुन्या ग्रंथसंग्रहालयांत या मिळाल्यास मिळतील. कारण हीं दोन्ही पुस्तकें १९०० च्या सुमारास प्रसिद्ध झालीं आहेत.

दुसरी निबंध रचना म्हणजे प्रख्यात इंग्रज लेखक Edmund Burke यांच्या " Reflections on The French Revolution " या ग्रंथाचें सुरस भाषांतर होय. हें भाषांतर सुमारें ३०।४० पृष्ठें मजकडे आहे. त्यावरून तें अपुरें झालें असावें किंवा तें पूरे झालेलें असेल; पण मजकडे त्याचा अपूर्ण भागच संग्रहीं असेल. या बाबतींतही शोधपूर्वक माहिती मिळवण्यासारखी आहे. याशिवाय आणखी कांहीं लेख– 'विचारभ्रमण' या मोठ्या नांवाखालीं 'सुख दुःख', 'स्वातंत्र्या-स्वातंत्र्य ' व ' सुशिक्षण व सुधारक ' असे तीन निबंध प्रत्येकीं सुमारें २५।३० पृष्ठें निबंध रूपानें त्यांनी प्रो. अण्णा विजापूरकर यांच्या ग्रंथमालेमध्यें लिहून प्रसिद्ध केले. यापैकीं एका लेखाचा कांहीं भाग १९३५ च्या आगेमागें मुंबई विद्यापीठाच्या त्यावेळच्या मॅट्रिक परीक्षेकरितां मराठी विषयांचे वेचे जे आजचे म. म. दत्तो

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. वि: ........

वामन पोतदार यांनीं काढलेले होते, त्यांत 'सुधारक' या नांवानें घेतला होता. त्यांत साहेब लोक जेवायास जातांना शुद्ध असा पोषाख घालून जेवावयास जातात, तर आम्ही जेवावयास रेशमी सोवळे नेसून जावयास हरकत कोणती ? अशा प्रकारचा कांहीं युक्तिवाद केलेला आढळला; तो माझ्या स्मरणांत आहे.

त्यांचे लेखनाची ढब, शैली, Style, पुष्कळशी प्रख्यात धाकटे शास्त्रीबुवा, विष्णु कृष्ण चिपळूणकर यांच्या निबंधमालेचे अनुकरणानें बनलेली वाटेल. लांब पल्लेदार वाक्यें आणि प्रतिपादनांत आवेश, भाषा साधीच, पण आजच्या काळांत निराळचाच वळणाची वाटावीअशी आढळेल.त्या काळांत किंवा मोरोपंतांच्या विद्यार्थी दशेंत विष्णुशास्त्री यांचा पगडा, निबंधमालेचा पगडा, तरुण मनावर फार होता. त्याचप्रमाणें आगरकरांच्या 'सुधारक' व लो. टिळकांचे 'केसरी' मधील लेखन शैलीचा प्रभावही त्या काळांतील लोकांचे मनावर जोरदार होता. त्या लेखन पद्धतिचा नमुना, धाटणी,मोरोपंतांचे लेखनांत आढळते.विनोद हा शिष्टसम्मत नव्हता, त्या काळांत; म्हणून त्याचा जवळ जवळ अभावच आहे, मोरोपंतांच्या लेखनांत.

ते उज्जयिनीस असतांनाची एक संस्मरणीय गोष्ट आहे. या चरित्रास शेवटीं पुरवणी वजा एक त्यांचेवरचा मृत्युलेख माझे वाचनांत आला तो दिला आहे. ∵ त्यांतील द्विरुक्ति शक्य तों टाळतों व खालील मजकूर लिहितों. १९०४–५ पर्यंत मराठी व्याकरणावर त्यांनीं कांहीं तरी स्फुट लेखन केलेलें असावें, त्या विषयांत त्यांची तज्ञता मानली जात असावी. 'शास्त्रीय मराठी व्याकरण' या ग्रंथाबद्दल ते अभ्यास करीत होतेच, जवळ जवळ १८९५-९६ सालापासून. त्या परिशिष्टांतल्या लेखावरून मराठी शुद्धलेखनावर चर्चा करण्यास पुण्यांत एक परिषद किंवा आजच्या भाषेंत बोलावयाचें तर सरकारने एक Seminar भरवला होता, त्यांत मोरोपंतांनीं भाग घेतला होता हें दिसेल. त्या Seminar मध्यें भाग घेण्यास मोरोपंत यांस सरकारतर्फे पाचारण करण्यांत बोलावण्यांत आलें होतें अशीही माहिती अन्य ठिकाणीं वाचलेली आहे; आणि त्यांनीं या परिषदेंत प्रामुख्याचा भाग घेऊन जुने शुद्धलेखनच चांगलें व तेंच प्रचलित ठेवावें, बदल करूं नये, या पक्षास विजय मिळवून दिला. या हकीगतीवरून ते वक्तृत्वकला–निपुण ही असावे हें सिद्ध होतें. पण त्या काळांत आजच्याप्रमाणें हरघडी सभा व व्याख्यानें होत नसल्यानें त्यांचें वक्तृत्व वाढण्यास, प्रख्यात होण्यास संधि व अवसर मिळाला नसावा.

---

तळटीप :– ∵ "बालबोध" जून १९१३ चा अंक; यामधला मृत्युलेख परिशिष्ट म्हणून दिला आहे तो पहावा.

मोरोपंत यांचे मनांतून श्रीमद्भगवद्‌गीता हिचा संकोच करुन एक "शिशुगीता" तयार करावयाची असा विचार होता. तो संकोच केवढा, काय त्याची मला कल्पना नाहीं. परिशिष्टांतल्या मजकूरवरून व अन्य ऐकीव हकीगतीं-वरून मी हें लिहीत आहे. याचा अर्थ त्यांचा गीतेचा अभ्यास चांगला सखोल असावा. त्याचप्रमाणें प्रत्येक हिंदु मुलास गीता यावी, अर्थ कळावा, पाठ यावी अशीही त्यांची इच्छा असावी. मी १० वर्षांचा असतांनाच ते मृत्यु पावले; तोपर्यंत त्यानीं मला गीतापाठाचे धडे दिलेले नव्हते; तेव्हां "शिशु" याचा त्यांचा अर्थ ११-१२ वर्षेपर्यंतचा मुलगा असा मी धरून चालतों. आणि त्यांच्या अर्थाप्रमाणें माझ्याकरितांच हा छोटा संकोच ते करणार असावेत, असें मी समजतों. जमेल तर पुढें मागें मी तसा प्रयत्न करून पाहीन, माझ्या नातवंडांकरितां!

त्यांचा उज्जयिनीसारख्या महाराष्ट्रापासूनच्या दूर अशा शहरीं रहिवास पडल्यामुळें, मराठी लेखकांचा, वाङ्मय सेवकांचा, वृत्तपत्र संपादकांचा, मासिकांचा व त्यांचा संबंध दूरावला. म्हणून त्यांचे हातून मराठी भाषेची फार मोठी सेवा झाली नाहीं, लेखन झालें नाहीं. पण जो एकच मोठा ग्रंथ व्याकरण शास्त्राचा, त्यांचे हातून लिहिला गेला तो अजोड ग्रंथ अजूनही तसाच ठरत आहे हें एक आश्चर्य नाहीं काय? आणि पुनरुक्ति दोष पत्करूनही पुनः लिहितों कीं हा ग्रंथ केवळ मराठीसच उपकारक झालेला नसून राष्ट्रभाषा हिंदीच्या श्रेष्ठ व्याकरणकार श्री. कामता प्रसाद गुरु यांसही त्यांच्या त्या भाषेच्या व्याकरणासही उपकारक झाला; नव्हे मोरोपंतांचें फार मोठें ऋण त्यानीं आपल्या प्रस्तावनेंत मानलेलें आहे.

## उपसंहार

केसोपंत यांची कीर्ति शिक्षक, शिस्तप्रियता, या नात्यानें रत्नागिरी जिल्हाभर पसरली. आणि त्यांचे मृत्युनंतर ती जवळ जवळ ३० वर्षें पर्यंत म्हणजे १९२५ सालापर्यंत ऐकावयास मिळत होती; तर मोरोपंत यांची त्याच नात्यानें कीर्ति त्यांचे मृत्युनंतर ४०–५० वर्षेपर्यंत जुना मध्यप्रांतभर पसरलेली होती, टिकून राहिली होती. आणि व्याकरणकार या नात्याची त्यांची कीर्ति त्यांचे मराठी भाषेवरील आणि दूरान्वयानें राष्ट्रभाषेंवरीलही ऋण तर केवळ असाधारण आहे. ह्या दृष्टीनें पहातां केसोपंताचा हा पुत्र "बापसे बेटा सवाई" निघाला यांत कांहीं शंकाच नाहीं. पण उज्जयिनी येथील त्यांचें शिष्यांपैकीं श्री. फरासखानेवाले म्हणून

एक आर्वी (जि. वर्धा) येंथील १९१९-२० मधील जज्ज आणि श्री. दिवेकर म्हणून पुण्याच्या पुरंदरे बाग कॉलनीमध्यें बंगला बांधून राहीलेंलें एक सद्गृहस्थ १९४०-४१ मध्यें मला भेटलें होते. त्यांचें तोंडीं मोरोपंतांबद्दल अपार आदर वसत होता

पुत्र या नात्यानें ते वडिलांची सेवा जरी करूं शकले नाहींत, तरी त्यानीं आपल्या मातोश्रींची अन्नपूर्णा बाईंची चांगली सेवा केली. भाऊ या नात्यानें त्यानीं भावंडांत पुढारीपण स्वीकारुन भावाबहिणींचा परामर्ष घेतला. आपले मेहुणे-बायकोचे भाऊ, पुतण्ये, भाचें. यांस शिक्षणास ठेऊन घेऊन त्यांचा परामर्ष घेतला, स्वतःच्या मुलाबाळांकतिां जे जें योग्य व आवश्यक तें तें त्यानीं ह्यातभर केलें. समाजाकरितां त्यानीं आपलें बुद्धिधन वेचलें. अध्यात्माचे बाबतींत गुरु करून व श्रीदत्तात्रेय या दैवताची उपासना करुन पुष्कळसा पुण्यसंचय केला. त्यांचें चारित्र्यच विशेषतः त्यांचे शिष्यांचे विशेषेंकरून लक्षांत राहिलेलें मला आढळलें. त्यांचे बद्दलच्या आदरभावनेंत पहिलें स्थान त्यांच्या ऊच्च चारित्र्यास त्यांचे परिचित देत असत. निर्व्यसनीपणा, स्वावलंबीपणा, मिताहार, वक्तशीरपणा, जी शिस्त इतरांकडून अपेक्षावयाची ती प्रथम स्वतःस लावून घेऊन अंगीं बाणवून घेऊन, पाळून, मगच ती इतरांस लावावयाची असे त्यांचे अंगचे गुण आतां दुर्मिळ होत चाललें आहेत. ते श्री तुकाराम महाराज यांचें भाषेंत सांगावयाचें झाल्यास " बोले तैसा चालें " होते. म्हणूनच जगानें, त्यांच्या भोवतींच्या जगानें त्यांचें पावलांचे वंदन केलें. या बाबतींत एक पत्र पुढें देतों; तें स्वतःच बोलकें आहे :-

Camp
May 10th, 1913

Dear Sir, Bipin Bose,

I hope you, as manager of The City High School, will accept my sincere condolence on the sad death of Mr. Damle and his wife.

He was one of the pleasantest men I have ever worked with, and I shall miss him very much, personally and officially. He worked for the school with great devotion and simple [(single)?] mindedness and had attained conspicuous success.

You will find it very difficult to replace him.

Yours Sincerely
(Sd.) J. C. Evans
Inspector of Schools, Nagpur Circle.

True Copy

(Sd.) D. M. Dawande
Superintendent, Shri Dadasaheb Dhanawate
Nagpur Vidyalaya, Nagpur.

नील सिटी हायस्कूल किंवा श्री दादासाहेब धनवटे नगर विद्यालय, नागपूर या संस्थेच्या फार जुन्या रेकॉर्डमध्यें दडून राहिलेलें हें एका इंग्रजाचें प्रशस्ति पत्र लहान पण फार बोलकें आहे. एप्रिल १९६५ मध्यें सध्यांचे मुख्याध्यापक श्री. दवंडे यांचें सौजन्यामुळें मला त्या संस्थेचें दप्तर, सभांचें इतिवृत्त पुस्तक पहावयास मिळालें. त्या पुस्तकांत मोरोपंत यांचे नेमणूक करण्याबद्दलचा ठरावही वाचावयास मिळाला... अन्य बऱ्याच गोष्टी वाचावयास मिळाल्या. वरचें पत्र त्याच पुस्तकांत आढळलें. मला आवडलें व मी त्याची अधिकृत प्रत मागून घेतली. पण त्या संस्थेचा म्हणून खास दुखवटयाचा असा ठराव झालेला नमूद केलेला नाहीं ! ही गोष्ट आश्चर्याची नव्हे काय ? पण तो काळ महिमा आहे ! त्या काळांत आजच्यासारखे आपण साहेबी रीतिभाति घेंतलेलें लोक नव्हतों. स्वतःच्या भावना व्यक्त न करणें म्हणजेच मोठेपणा मानणारे आपण सनातन हिंदु लोक होतों. तसे नसतों तर खात्रीनेंच कांहीं तरी गौरवपर उल्लेख त्या इतिवृत्तांत मिळाला असता. पण एक इंग्रज मोठा अधिकारी एका हिंदी माणसाबद्दल किती गौरवपर उद्गार काढीत होता तें या छोटयाशा पत्रावरून स्पष्ट होतें. आणि त्यांतील शेंवटचें वाक्य तर ऐतिहासिक सत्यच ठरलें आहे !

## मोरो केशव दामले यांचेवरील मृत्यु लेख
### ("बालबोध" जून १९१३ चा अंक)

जाळें तोडुनियां पळे हरिण तो टाळोनि दावाग्निला
व्याधाचे चुकवोनि बाणहि महावेगें पुढें चालिला
तों घाईंत उडी चुकोनि पडला आडामध्यें बापडा
होती सर्वही यत्न निष्फळ जरी होई विधी वांकडा

कृष्णशास्त्री चिपळूणकर

चरित्राची त्रोटक रूपरेषा :–
जन्म मालगुंड येथें १८६८

प्राथमिक मराठी विद्याभ्यास दाभोळ येथें

इंग्रजी अभ्यास – प्रथम बडोदें, नंतर उमरावती हायस्कूल.

मॅट्रिक १८८७ सिक्लेर बक्षीस. (वऱ्हाडांत संस्कृतांत १ लें येंणेबद्दल)

बी. ए. १८९२ ऐच्छक विषय तर्कशास्त्र-डेक्कन कॉलेज.

एम्. ए. १८९४ (फेलो); विषय – इतिहास व तत्वज्ञान.

अभ्यासाविषयीं मोठी आख्या असे, सगळ्या गुरुजींची फार प्रीति असे. ह्यांतहि प्रिन्सिपाल सेल्बी ह्यांस ते फार आवडत असत. हे जात्याच मोठे उद्योगी होते. पाश्चात्य शिक्षणाच्या संस्कारानें आमच्या होतकरू मंडळीस जे अनेक उद्योग स्वदेश हितार्थ सुचतात ते सगळे नेहमीं ह्यांच्या अंतःकरणांत घोळत असत, आणि तसे त्यांचे व्यवसाय चालू होते.

ह्यांच्या व्यवसायांत मराठी ग्रंथ लिहिणें हा एक मोठा व्यवसाय होता.

ह्यानीं लिहिलेलीं पुस्तकें :–

१) " भाषांतर " मासिक पुस्तकांत एडमंड बर्क ह्यांचें व्याख्यान - (हें २२--३--१७७५ रोजीं झालें.)

२) अमेरिकेवरील करासंबंधीं भाषण (१९–४–१७७४ रोजीं झालें.)

३। " ग्रंथमाला " मासिक पुस्तकांत बर्ककृत आधुनिक असंतोष.

४) विचार परिभ्रमण, एक निबंध .

५) शुद्धलेखन सुधारणा

६) न्यायशास्त्र भाग १, व २, गायकवाड सरकारांनीं प्रसिद्ध केले आहेत.

७) शास्त्रीय मराठी व्याकरण,

८) " शिशुगीता " भगवद्गीतेंतील निवडक ७०।७५ श्लोक (अप्रसिद्ध)

दामले यांचे ठायीं एक मुख्य गुण – दृढनिश्चय व उद्योग सातत्य. एखादें काम हातीं घेतल्याबर त्यांत यश मिळाल्याशिवाय त्याचा पिच्छा सोडावयाचा नाहीं हा त्यांचा मोठा नेम अगदीं अखेरपर्यंत होता.

१९०४ मधील एक अनुभवाची हकीगत–

सरकारनें मराठी क्रमिक पुस्तकें सुधारण्यास कमिटी नेमली होती. तिच्या मनांत शुद्धलेखन पाठांत आणि च्या जागीं आणी, परंतुच्या जागीं परंतू, कवि च्या ठिकाणीं कवी, असे कितीएक फेरफार करावयाचे होते, आणि तिला पाठिंबा एका मोठ्या संस्कृत गुरूंचा होता. पण हें बाहेर पडतांच त्या विषयीं प्रचलित पद्धतीच्या पुरस्कर्त्यांनीं, सर भालचंद्र कृष्ण यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस एक सभा काढून तत्द्वारा तें प्रकरण अगदीं सरकारपर्यंत पोचवलें. पुढें त्या विषयीं ता. ३० सप्टेंबर १९०४ रोजीं उभय पक्षांच्या प्रतिनिधींची एक परिषद सरका-

रच्या हुकुमानें पुण्यास भरली. तींत मुंबईकरांच्या प्रतिनिधींत मोरो केशव दामले हे होते. आणि त्या कार्याकरितां उज्जनीहून मुंबईस ते मुद्दाम आले होते. ते प्रतिपक्षाच्या विद्वान पाठिंब्यांचे विद्यार्थी होते. त्यांची ह्यांची दृष्टादृष्ट होतांच गुरुजींनीं शिष्यास विचारलें कीं "का हो दामले, बुद्धया या कामाकरितां उज्जनीहून आलां काय?" त्यांस ह्यांनीं नम्रतेनें उत्तर दिलें, "होय महाराज!" ही गोष्ट अल्प आहे. परंतु स्वीकृत कार्याविषयींचा दृढनिश्चय आणि विचार–स्वातंत्र्य हे दामल्यांचे दोन गुण चांगले स्थापित करण्यास बस आहे, असें वाटतें. पुढें त्या परिषदेंत खडाजंगीचा वाद झाला. त्यांत, बहुमतानें जुन्या पद्धतीच्या पक्षपात्यांचें म्हणणें खरें ठरलें; तें सरकारनें मान्य केलें. आणि असा हुकूम फर्मावून ठेविला आहे कीं, जुन्या पद्धतींत फेरफार करूं नये, त्याप्रमाणें नवी पुस्तकें पूर्वींच्या पद्धतीनें छापलीं आहेत; आणि सर्व कार्य पूर्ववत् चाललें आहे. हें यश येण्यास ज्यांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत, त्यांमध्यें मोरो केशव दामले हे प्रमुखांतले एक आहेत. आणखी ह्यांनीं ह्या विषयावर एक चांगले मोठें पुस्तक लिहून छापलें आहे. तें चांगले वाचनीय झालें आहे.

उज्जनीच्या पाठशाळेंत प्रोफेसर – १४ वर्षे
१९०७ मध्यें पाठशाळा बंद पडली (?).
तेथून पुढें नागपूरच्या नील सिटी हायस्कूलचे सुपरिंटेंडेंट.

दामले काळ महात्म्यास अनुसरुन प्रथम सुधारक होते, परंतु शीलनाथ महाराज आणि हरिहर बुवा उदासी ह्या सत्पुरुषांच्या कृपेनें त्यांस उपरति झाली. ते काशीस गेले व प्रायश्चित घेऊन आले; व अगदीं जुन्या कर्मठ ब्राह्मणांप्रमाणें स्नानसंध्यादि कर्मे करूं लागले.

कामांत रावसाहेब मंडलीकांप्रमाणें अत्यंत नियमित असत. ते इतके कीं, उज्जनीस आणि नागपूरांत त्यांस त्यांच्या मंडळीमध्यें "घडयाळ" हें टोपण नांव पडलें होतें. हा गुण खरोखर आपणांस फार पाहिजे आहे.

त्यांच्या बरोबर त्यांची धर्मपत्नी सीताबाई प्राणांस मुकली. ती माऊली सती गेली, असें आम्हांस वाटतें. तितक्या संबंधानें थोडक्या एका शद्वाच्या बदलानें मोरोपंती एक आर्या बरोबर बसण्यासारखी आहे-

पतिसंगें स्त्रीस मरण तें लग्नाहून काय हो ऊन ।
न रहावेंचि सतीनें पळभरही विरूपकाय होऊन ।।

हींत "पूर्वीं"च्या जागीं "संगें" शद्व घातला आहे. या उभयतां नवराबायकोच्या आत्म्यांस परमेश्वर चिरस्थायी शांति देवो, असें सांगून हें चरित्र समाप्त करितों.

(टीप :- कांहीं थोडा मजकूर गाळून हा लेख उतरून घेतला. तो दिला आहे.)

# " सीताराम केशव "

## सीतारामपंत व जानकीकाकू यांची तोंडओळख

१९१३ सालच्या मे महिन्याची ६।७ तारीख असेल. एके दिवशी सकाळी घरीं बरीच मंडळी आली होती. त्यांत एक अगदो नवा चेहरा आणि ती व्यक्ति पाहण्यांत आली अण्णांच्याहून ती व्यक्ति उंचीला कमी होती, त्यांचे मानानें लठ्ठ वाटत होती. डोक्याला वाढलेले पण विरळ केस, टक्कल होतें, पण तें केसानी झाकलेलें होतें. नाक सरळ, डोळे पाणीदार, चेहरा सुरेख व एकूण व्यक्तिमत्त्व डोळ्यात भरणारें होतें. पुढे कळूं लागल्यावर तें व्यक्तिमत्त्व व ती एकूण आकृति पुष्कळशी नेपोलियन बोनापार्टच्या आकृतिशी जुळू शकेल अशी ती आकृती होती. आणि ही फार सुरेख, आकर्षक व्यक्ति कोण ? ती बापूकाकांची आकृती होती. आणि अशा व्यक्तींकडे आम्ही लौकरच नागपूर सोडून पुण्यास रहावयास जाणार होतों. ती व्यक्तीं फार तर दोन दिवसच राहिली असेल नागपुरास. त्यांची व इतर तेथे जमलेल्या माझ्या आप्तांची कांही बोलणी चालणी झाली होतीं; व आम्ही नागपूर सोडून पुण्यास जाणार होतों...

ही खालीं दिलेली सर्व हकीकत मी मागाहून ऐकलेली आहे. मे महिन्याची १ किंवा २ तारीख असेल. पुण्याच्या बुधवार चौकांत सध्यां पॅरेमाउंट टॉकीज हें जें बोलपटगृह आहे त्याचे रस्त्याचे अंगास १९२४-५ सालपर्यंत एक छोटेसें पुस्तकाचें दुकान होतें. दुकानाचे मालक श्री. शंकर हरी मुळे नांवाचे एक अ-ब्राह्मण दुकानदार व प्रकाशक असत. त्यांचा व सीतारामपंत यांचा स्नेह होता, व्यवहार

झालेला होता. त्यांची निदान दोन छोटीं पुस्तकें-गोष्टी "वाचाळरावाचे विचित्र अनुभव" व "पांडोबाच्या लीला" हीं मुळे यांनी प्रकाशित केलेलीं होतीं त्यांचे दुकानाचे पायऱ्यांवर बसून गप्पा मारण्याचा सीतारामपंताचा एक छंद होता. व ते आठवड्यातून १।२ वेळां तसे तेथें बसत असत. मे च्या एक किंवा दोन तारखेचे संध्याकाळी सीतारामपंत यांचे घरीं शिकावयास असलेल्या त्यांच्या चुलत पुतण्यांपैकी बहुधा श्री. गंगाधर किंवा श्री. दत्तात्रेय एक तार घेऊन त्यांचेकडे रडवेला चेहरा घेऊन गेला. त्यानें त्यांचे हाती तार दिली. त्यांनी ती तार वाचली. आणि घाईघाईनें मित्रांचा निरोप घेऊन ते घरीं परतले. त्या तारेनें त्यांस प्रचंड धक्का दिला होता. ते आपल्या थोरल्या भावाचें व त्यांचे कुटुंबाचें स्वागत, प्रेमानें स्वागत करण्याच्या मनोभूमिकेंत होते, आनंदात होते... आणि एकाएकी आगगाडीच्या टक्करीत अपघातानें त्यांचा तो मोठा भाऊ व त्याची पत्नी निवर्तल्याची ती तार त्यांचे हाती पडली होती ! बहुधा त्याच दिवशी रात्री त्यांनी पुढील व्यवस्थेचे निमित्तानें पुणे सोडलें, आणि अकोला येथें वाटेत त्यांस तार करणाऱ्या रावबहादुर दामले कुटुंबांकडे थांबून नंतर ते नागपुरास आले होते.

मे महिन्याची १२ किंवा १३ तारीख असेल, आम्ही मंडळी टांग्यातून पुण्यात गांवाकडे येऊ लागलों. ससून हॉस्पिटलचें घड्याळ, तो मोठा चौक.. असे रस्ते पाहत पाहत आम्ही गावाकडे येत होतों. नागपूरचे मानानें हें सगळें मला एकदम चांगलें व आकर्षक वाटत होतें.. तसें म्हटलें तर नागपूरलासुद्धा दगडी कोळशामुळे काळाकुळकुळीत झालेला रस्ता, व गांवाकडें जाताना डाव्या हातास एम्प्रेस मिलचे कॉम्पाऊंड संपल्यावर (हा भाग रुक्ष वाटतो थोडा फार) शुक्रवार तलाव हा नयनमनोहर तलाव लागतो आणि बरें वाटतें एकदम ! पण एकंदर गांवातील रस्ते, घरें यांचे तुलनेने पुण्यांचील रस्ते व घरे यानी माझ्या मनावर पहिल्या प्रथम चांगली छाप पाडली. जवळ जवळ अर्धा पाऊण तासाने आम्ही शनवार पेठेतील प्रसिद्ध गांधी वाड्यांत आलों.

शनवार पेठेंत गांधीवाडा एक मोठा वाडा आहे. त्याचे पुढचे भागीं मोठें अंगण आहे. अंगणांत हौद आहे. मागचे अंगास पोर्च व त्याचे मागें तीन मजली भव्य वाडा आहे. आंगणाच्या ( आंत जाताना ) डाव्या हाताकडे एक चाळवजा इमारत आहे. त्या इमारतीमध्यें दोन बिऱ्हाडें होतीं; एक श्री. मेथा किंवा मेहता या गुजराथी गृहस्थांचें व दुसरें सीतारामपंतांचें. मेहतांकडे खालीं व वर अशा दोनच खोल्या होत्या. आणि जिन्याचे दुसरे बाजूस खालचे अंगास दोन खोल्या व वरचें अंगास दोन्ही खोल्यांवर मिळून एक हॉल होता. हॉलच्या बाहेर व्हरांडा होता. खालच्या मजल्यावरही व्हरांडा होता. आणि या अंगासही एक जिना होता. सर्व दुमजली इमारतीचे पलीकडे एक मजली व तीन खणी खोली-स्वयंपाक घर, व

त्याचेजवळ पलीकडे न्हाणी घर होतें. एकंदरींत सीतारामपंत यांचा स्वतःचा संसार म्हणजे ते व पत्नी या दोघांच्या मानानें ही जागा फार मोठी होती व त्यावेळीं त्या जागेस केवळ ८।१० रुपये दरमहा भाडें होतें.

या बिऱ्हाडांत प्रथम मी व माझ्या तीन बहिणी, काशी आत्याबाई परशुराम अशीं सहा माणसें एकदम जास्त आलीं. सीतारामपंत किंवा बापूकाका यांचेकडे त्यावेळीं त्या पती-पत्नींचे शिवाय श्री. गंगाधर, आणि त्याचा धाकटा भाऊ 'नाथ' किंवा मीनानाथ (यानें यापुढें नांव बदलून दीनानाथ असें नवें रूप धारण केलें होतें) हे दोघे चुलत पुतण्ये राहत असत. त्यांतच त्यांचाच थोरला भाऊ दत्तात्रय कधीं असे-नसे. असें हें कुटुंब होतें. पण आम्ही ज्यावेळीं नागपुराहून पुण्यास आलों त्यावेळीं एकटा गंगाधरच घरीं होता; आणि दुसरे आपल्या आईकडे राहुरीस उन्हाळचाचे सुट्टीनिमित्त गेलेले होते.

ज्याप्रमाणें बापूकाकांचें व्यक्तिमत्त्व मला एकदम आकर्षक, रम्य वाटलें होतें, तसेंच जानकीकाकू ही मला एकदम आवडली. ती त्यांस सर्व प्रकारें शोभादायक स्त्री होती. उंची मध्यम, रंग फार गोरा नाहीं. पण काळा नाहींच नाहीं, गोल चेहरा, पाणीदार व मोठे डोळे, कपाळ मोठें, केसही काळेभोर व पुष्कळ, नाकही पुष्कळसें सरळ--एकंदरींत ठसा उमटवणारें असें व्यक्तिमत्त्व होतें तिचें. आणि कर्तबगारी तर विचारूंच नका. हस्त कौशल्य ( विण काम, भरत काम ), स्वयंपाक, आदि कृत्यांत तिचें कौशल्य खूपच होतें. बोलणेंही मृदु, थोडें आणि लाघवयुक्त. आजूबाजूच्या पण मुलांवर अपरंपार प्रेम...श्री. दत्तात्रय, गंगाधर, एवढेंच काय, विद्यार्थी म्हणून वाळगलेले श्री. महेश्वरपंत कुलकर्णी ( हे पुढें देशभक्तही झाले होते, आणि गिर-गांवांत गायवाडींत राहून विमा एजंटाचा धंदा उत्तम करून नांव कमावलेले गृहस्थ होते. सध्यां मांगलवाडीत राहतात. ) या सर्वांच्या सांगण्यांत काकूनें त्यांच्यावर आईप्रमाणें प्रेम केलेलें होतें. त्यांच्या खाण्या-पिण्याच्या आवडी-निवडी लक्षांत ठेवून त्याप्रमाणें त्यांस खाऊ घालावें अशी तिची वृत्ती होती अशा पतिपत्नींकडे आम्हां पोरक्या चार मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी अगदीं अनपेक्षितपणें पडली होती. आणि ती त्यांनीं इतक्या उदारपणानें आणि इतक्या चांगल्या प्रकारें सांभाळली कीं, आम्हांस आई वडीलांची उणीव काय, पण आठवणही कधीं होईनाशी झाली.

✣ ✣ ✣

## पुण्यांतील पहिला महिना

पुण्यांतील आमचा पहिला महिना, दीड-महिना इतक्या आनंदानें आणि गडबडींत गेला कीं, बोलून सोय नाहीं. आम्हांस नवे चांगले कपडे करण्यांत आले.

शशी, रत्नी यांस नवे धारवाडी खणांचे परकर, पोलके, मला शर्ट, ओपन कॉलरचा कोट, सर्वांस पायमोजे, बूट, माझीं हजामत करणें बंद होऊन केस वाढणें सुरू झालें जरीची टोपी मिळाली–आमचा एकंदर कायापालट झाला. आम्हीं सर्वजण प्रदर्शनीय मुलें बनलों. आणि रत्नी तर काय, विशेषच! आगगाडीतून उडालेली, आगगाडीतून उडी टाकलेली, आईवडील वारले तरी वाचलेली, जखमींना पाणी वाटणारी,... नाना प्रकारचे खरे आणि काल्पनिक गुण तिला चिकटवण्यांत येत होते–एकदा केव्हां तरी आम्हांस चित्रशाळेंत नेऊन रत्नीचा फोटोही काढण्यांत आला होता–वर्ष सहा महिन्याचे आंत घरच्या काका–काकूंच्या " टोण्या " या कुलुंगी कुत्र्याबरोबर आम्हा त्रिवर्ग भावंडांचा एक ग्रूप फोटोही काढण्यांत आला होता.आम्हीं मुलें चांगली देखणी व हुशार आहोंत असें सर्वत्र आजूबाजूस बोललें जाऊ लागलें. मी स्वतः बद्दल तरी असें कधीं नागपूरास फारसें ऐकलें नव्हतें, त्यामुळें मला पुणें व पुण्याचें आमचें वास्तव्य एकदम आवडूं लागलें.

याच काळांत, मे महिन्यांत सीतारामपंतांचे सासरे महाभारताचार्य चिं. वि. वैद्य एक दोन वेळां घरी आले गेले. त्यांनीं परत जातांना आम्हां प्रत्येकास खाऊ म्हणून एक एक रुपया दिला; आम्हांस हा एक एक रुपाया म्हणजे खूप मोठी दौलत वाटली––त्यांचे धाकटे मेहुणे–बायकोचे भाऊ श्री. विसूभाऊ दामले यांचा विवाह सोटचा म्हसोबाचे देवळाजवळ एका वाड्यांत झाला. तो समारंभ पहावयास मिळाला पुण्यास त्यावेळीं पेरूचे गेटासमोर सध्यांचें कै. दे. भ. अण्णासाहेब भोपटकर यांचे बळवंताश्रम बंगल्यासमोर एक मोठी बखळवजा जागा होती, श्री. केळकर यांची. त्याजागेचें नांव होतें. " क्रीडा भुवन " तेथें वार्षिक वसंत व्याख्यानमाला भरत असे, आणि मी एक दोन व्याख्यानांस गेल्याचेंही स्मरतें.

त्याच काळांत माझ्या मोठ्या बहिणीचे यजमान श्री. दामोदरपंत धारपुरे हे पुण्यांत आले होते.त्यांचा मुक्काम कधीं आमचे घरीं तर पुष्कळ वेळां त्यांचेच थोरले भाऊ वर्ध्याचे प्रख्यात वकील श्री. वामनराव धारपुरे यांचे बिऱ्हाडीं असे. त्यांचें बिऱ्हाड डॉ. व्ही. डी. फाटक यांच घराच्या आळींत एका दुमजली घरांत होतें. त्यानीं त्यावेळीं नुकतेंच रंगभूमिवर आलेलें दे. भ. न. चिं. केळकर यांचें चित्ताकर्षक नाटक मंडळी करीत असलेलें " तोतयाचें बंड " नाटक मला मोठ्या रसिकतेनें पुण्याच्या किर्लोस्कर नाटक गृहांत दाखवलें होतें. नाटकगृहाच्या दुसऱ्या मजल्यावरील अर्ध गोलाकार गॅलरीमधील पुढच्या रांगेतील खुर्चीवर बसून, त्या भव्य नाटकगृहांत बसून पाहिलेलें तें नाटक आज मला फारसें आठवत नाहीं. पण त्या नाट्यगृहाच्या स्टेजवरच्या भिंतीवर जो एक गमतीदार संस्कृत श्लोक कोरलेला होता त्याचे सुरुवातीचे शद्व 'प्रज्ञाविघृष्ट प्रतिमा' आणि शेवटचे शद्व 'रंगमंदिरम्' हे अजूनही आठवतात! आणि या श्लोकाबद्दल पुढें तात्यासाहेब केळकरांनींच जाहीरपणानें

सांगितलेली कथाही आठवते. किर्लोस्कर थिएटर तयार होत असतांना त्या नाटक मंडळीचे व्यवस्थापक व मालक श्री. शंकरराव मुजुमदार यांनीं नाट्यशास्त्रकार भरतमुनीचें किंवा दुसरें अन्य सुयोग्य वचन त्या थिएटरवर कोरण्यास श्री.केळकरांस मागितले असताना त्यानीं स्वतःच एक अनुरुप संस्कृत श्लोक रचून दिला व तो श्लोक म्हणजेच मी वर सांगितलेला आदि, अंत असणारा श्लोक होय !

याच काळांत मला केव्हांतरी थोडासा ताप आला होता. तेव्हां जवळच्याच डॉ. बापट या डॉक्टरांचें औषध मला देण्यांत आलें. आम्हांस सकाळीं दररोज दूध देणें सुरू झालें, बिस्किटें मिळत दुधाबरोबर...क्वचित् दारीं एक भिकारी येत असत. गमतिदार होते ते भिकारी. त्यांचें

O My God, General Smith, your's our good-morning.
Your station Koregaon, so is at Bhima-river,
O My God, General Smith, your's our good-morning,

हें गाणें म्हणणें, छप्पन्न कीं चौसष्ट भाज्यांचें गाणें वगैरे आठवतात. ते घरीं आल्यावर व त्यांचें गाणें ऐकल्यावर त्यांस द्यावयास पैसा आम्हांस मिळे. व तो देतांना आपण कोणी तरी फार मोठे आहोंत. असें आम्हांस वाटे !

✣ ✣ ✣

## मोरोपंतांचे निधनामुळें प्राप्त झालेलें कर्तव्य व तें पार पाडण्याची तत्परता

सीतारामपंतांना मोरोपंतांबद्दल काय वाटत होतें तें खालीं देतों. खालील मजकूर आहे सीतारामपंत यांच्या पहिल्या व उत्तम अशा "जग हें त्रिविध आहे" या कादंबरीची अर्पण पत्रिकाः–

माझे वडील बंधु
कै. वा. परमपूज्य
मोरो केशव दामले
एम्. ए., सुपरिंटेंडेंट नील सिटी
हायस्कूल नागपूर
ज्यांच्या कृपा प्रसादामुळें मला
उच्च शिक्षणाचा लाभ मिळाला
त्यांच्या स्मृतीस
हे पुस्तक अर्पण केलें असे.
सीं. के दामले
ग्रथकर्ता

'जग हें त्रिविध आहे ही कादंबरी १९१२ मध्यें चित्रमयजगत् या मासिकांत दरमहा थोडी थोडी अशी प्रसिद्ध झाली. पण पुस्तक रूपानें ती श्री. हरी रघुनाथ भागवत या गृहस्थांच्या अष्टेकर आणि मंडळीनें प्रसिद्ध केली. छपाईचें काम बहुधा एप्रिल अखेरच संपत आलेलें असावें, कारण पुस्तकाचा मोबदला जो ठरला होता त्यांत सी. के. दामले यांस प्रकाशकांनी २५० प्रति द्यावयाच्या होत्या. त्या प्रति मे अखेर घरीं आल्याही होत्या !

ही अर्पण पत्रिका सीतारामपंतास आयत्या वेळीं स्फुरलेली दिसते. ती आहे अत्यंत साधी, अत्यंत लहान, पण त्यांत अति मोठा आशय भरलेला आहे.

या आशयाचा प्रत्यय पुढे पहा, लवकरच. आम्ही मुलें रेल्वेच्या नोकरांच्या हलगर्जीपणामुळें पोरकीं झालों, आणि आम्ही फार लहान होतों. तेव्हां आमचें लालन पालन, पोषण होण्यास रेल्वेकडून नुकसान भरपाई मिळणें अगत्य होतें. म्हणून त्यांनी त्या दृष्टीनें जी कारवाई सुरू केली ती पहा:–

**NOTICE**

To

The Agent,

G. I. P. Railway Company,

Bombay.

Sir,

On behalf of Dattatraya Moreshwar Damle, Dattibai Damle, Shashibai Moreshwar Damle and Ratnaprabha Damle, the minor son & daughters of Late Moro Keshav Damle, M. A., and Sitabai Damle of Nagpur who were both killed in a collision of the G. I. P. Rly. on the 30th of April 1913 between the stations Katepurna & Boregaon on Nagpur Bhusawal section, I, Sitaram Keshav Damle, B. A. LL. B., Pleader, Poona, younger brother of the deceased Moro Keshav Damle and uncle and guardian of above-named minor children of the deceased Moro Keshav do hereby give you notice:-

That the late Moro Keshav Damle and his wife Sitabai Damle were travelling as Passengers who had paid for their tickets entitling them to travel on your Railway from Nagpur to Poona, started from Nagpur by passenger train which left Nagpur at about 21-15 on the night of Tuesday the 29th of April, and while so travelling by this train met with their death on Wednesday morning in a collision between the Passenger train and a goods train near Boregaon. This collision was due to the negligence

of your company's servants stationed at Katepurna and Boregaon as well as to the negligence of your Inspector in charge of the Ball signalling apparatus and the Drivers and Guards of the passenger and Goods train which collided together.

The deceased Moro Keshav Damle was M. A. of the Bombay University, and was serving as Superintendent of the Neil City High School Nagpur, on a monthly salary of Rs 300/-. He was about 45 years of age and was a man in robust health, and in due course would have served the City High School in his capacity as Superintendent, for the next 15 years, with prospects of promotion. He was also a well known Author-writer,&used to make money by selling copy-right of his writings. The gross amount of his earning from his monthly pay as Superintendent Neil City High School would have reached a total of Rs. 54000/- during the next 15 years; and he could easily have made about Rs. 10000/- by his books and writings. After the collision gold and pearl ornaments worth about Rs. 2500/- were stolen from the dead body of Mrs. Sitabai Damle as well as from the baggage which she was carrying with her. A formal complaint with reference to the loss of these ornaments has been lodged with the Superintendent of Police, Akola District.

By the death of Moro Keshav and his wife Sitabai their four minor children, one son and three daughters are rendered orphans and are deprived of the comfort and happiness of parental affection and care. The deaths of Moro Keshav and Sitabai were caused by the gross, culpable and criminal negligence of your servants, and the G. I. P. Rly. Co. is liable

for all the financial loss, worry and anxiety which has overwhelmed the minor children of the deceased Moro Keshav and his wife Sitabai.

Under these circumstances, I hereby give you notice that unless you as the Agent of the G. I. P. Rly. Co., or some other competant officer of the Company holding the necessary authority and power to deal with such matters, pay or agree to pay to the Guardian of minor children named above, a sum of Rs. 75000/- (Seventyfive thousand) as damages and compensation for the loss of their parents, within one month from the receipt of this notice, the company will be sued in the proper court of law for such damages and compensation, and the company will be liable for all the costs and charges incidental to such proceedings.

Poona, Shaniwar Peth,
Dated 13th May 1913

Sd. S. K Damle,
B. A. LL. B. Pleader.

या नोटिसीला G. I. P. Rly. च्या सेक्रेटरीकडून ताबडतोब १६ मे १९१३ च्या तारखेचें खालील उत्तर आलें.

Mr. S. K. Damle, B. A. LL. B., Pleader,
Shaniwar Peth, Poona.

Dear Sir,

Re : Claim for Compensation,

With reference to your letter dated 13th May 1913 in which as guardian of the minor children of the late Moro Keshav Damle and Sitabai Damle who were killed in the accident at Boregaon on the 30th of April 1913 you claim Rs. 75000/- as compensation.

I have to inform you that a further communication will be sent to you shortly.

Yours faithfully,

Bombay Sd.
16th May, 1913. Secretary

जूनमध्यें रुपये १२००० नुकसान भरपाई दाखल द्यावयास कंपनी तयार असल्याचें पत्र आलें. पुढें ऑगस्टमध्यें आम्हां मुलांचें पालकत्व Letters of Administration त्यांनीं मिळविलें आणि सॉलिसिटर्स Messrs Malvi Hiralal Mody & Ranchoddas यांचेमार्फत पत्रव्यवहार चालू ठेवला. शेवटी G. I. P. Rly. Co. च्या Little & Co. सॉलिसिटर्स यांचे दि. ११ डिसेंबर १९१३ चें पुढील पत्र Malvi सॉलिसिटर्स यांचे मार्फत आले तें असें–

Copy Bombay 11th Dec. 1913

Messrs Malvi Hiralal Mody & Ranchoddas

Dear Sirs, Boregaon Accident

With reference to your letter of the 12th ultimo we have to inform you that we have now received a Cheque for Rs. 20,000/-. Please send for our perusal the doccuments before you bring your client to receive the money.

Yours faithfully,

Sd/- Little & Co.

अशाप्रकारें आम्हा मुलांचें पालकत्व अंगी पडल्यावर त्यांनीं तें कशा उत्तम रीतीनें पार पाडलें, आणि किती त्वरित पार पाडलें, त्याचा हा पुरावाच होय, याच संबंधात त्यांस जो कांही मनस्ताप सहन करावा लागला त्याची माहिती आतां थोडक्यांत पुढच्या प्रकरणीं सादर करतों.

✤ ✤ ✤

## आमचें पालकत्व स्वीकारण्याबद्दलचा मनस्ताप

आम्ही पुण्यास आलों होतों. पण आमचे हित पाहणारी मंडळी निघाली पुष्कळ. माझे मामा यांत श्री. रामभाऊ दांडेकर मु. आकोला येथील प्रसिद्ध

फोटोग्राफर, आणि श्री. परशुराम दांडेकर हे मु. नागपूर येथील शिंपी यांचा एक गट, पांडुरंग, परशुराम व चिंतोपंत यांचा दुसरा गट. माझे मेहुणे म्हणजे बहिणीचे यजमान श्री. दामोदरपंत घारपुरे हे फार तरुण २१।२२ वर्षांचे आणि नुकतीच इंटरची परीक्षा पास झालेले असे, आणि स्वतः सीतारामपंत हे थोडेफार अलिप्त होते. मामांचा गट आणि चुलते व त्यांचे चिरंजीव हा गट यांच्यांत सख्य नव्हतें, चुरस होती. दामोदरपंत घारपुरे यांस ही सर्वच मंडळी अनभिज्ञ होती. यांचा विवाह झाल्याला अजून पुरें एक वर्षही लोटलें नव्हतें. त्यांस माहिती होती थोडीफार ती दोन परशुराम यांची, कारण ते नागपुरास घरांत होते. मामा लोकांनी त्यांचेवर आपली छाप पाडली आणि मुलांचा ताबा पांडूरंग आदि लोकांचेकडे नको, तुम्ही आम्ही घेऊं असें मामांचें त्यांस सांगणें होतें. इकडे पांडुरंगादि लोक काय वाटेल तें झालें तरी दामल्यांची मुलें दामल्यांकडेच राहिलीं पाहिजेत, सीतारामपंतांनीं पुढाकार घेतला नाहीं तर आम्ही घेऊं; पण मुलें दांडेकर किंवा घारपुरे यांचे ताब्यांत देणार नाही असा त्या गटाचा दावा होता. आम्हांस कांहीं कळतही नव्हतें, आणि कांहीं मतही नव्हतें. काशी आत्याचा ओढा तसें पाहिलें तर कोणत्याच पक्षाकडे नव्हता. तिला आम्ही बापू काकांकडे आलों तर बरें असें मात्र वाटत असावें. पांडुरंग आदि लोकांनी खरे खोटें असें उठविलें होतें कीं, आईच्या अंगावरील दागिन्यांच्या चोरीमध्यें दांडेकर मंडळींचा हात होता. त्याचा कांहीं भाग म्हणा, त्यांतील पैसा म्हणा त्यांच्या हाती लागला, कांहीं. म्हणून त्या लबाड लोकांच्या हातीं मुले जाणें म्हणजे त्यांचा सर्वस्वी घात होय. या सर्व गोष्टी आमच्याही कानीं येत होत्या. मुंबईंत दांडेकर मंडळी व पांडुरंग, परशुराम, चिंतोपंत आदि मंडळी जमून त्यांचीं परस्परांविरुद्ध कारवाई चालू होती. श्री. दामोदरपंत हे पुण्यांत त्यांचे बंधूकडे उतरले होते.

या अशा भानगडींमध्यें सीतारामपंतांस अलिप्त रहाणें शक्य झालें नाहीं. त्यांची मोरोपंतांबद्दलची कृतज्ञता बुद्धि एकाएकी जागी झाली; आणि त्यांनी आमच्या कल्याणाचा त्यांस जो योग्य मार्ग दिसला त्या मार्गानें जाण्यास, पावलें टाकावयास सुरुवात केली. त्याप्रमाणें त्यांनी आपली दि. १३ मे ची नोटीस G. I. P. रेल्वे कंपनीस पाठविली देखील.

पण ही नोटीस बरोबर नाहीं. चुकीची आहे. ती योग्य अधिकाऱ्याकडे पाठवलेली नाहीं. आकोला, नागपूर, भुसावळ कडच्या रेल्वे अधिकाऱ्यांकडे किंवा हाय कोर्टाकडे पत्रव्यवहार करावयास हवा, खटलाच भांडावयास हवा, नुकसान भरपाईची रक्कमच कमी आहे. वगैरे टीका होवूं लागल्या, त्यामुळें त्यांचे डोके फिरून गेलें असल्यास नवल नाहीं. पण या असल्या टीकेकडे त्यानीं लक्ष दिले नाहीं. जूनचे दि. १५ चे सुमारास G. I. P. Rly. च्या अधिकाऱ्यांकडून रुपये बारा हजार

नुकसान भरपाई दाखल देऊं करण्यांत आले. एका प्रकारें कारवाई योग्य दिशेनें सुरू झाली असल्याची ही विसार पावतीच होती !

मला शाळेंत घालावयाचें ठरलें. मी इंग्रजी २रीमध्यें होतो. म्हणजे हल्लीच्या ६वी मध्यें. ते स्वतः एकेकाळीं फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर व न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक होते. घरचा पुतण्या गंगाधर त्याच न्यू इंग्लिश स्कूलध्यें होता, गांधी वाड्यांतील माझेच वयाचा, पेन्शनर शहाणे मामलेदार यांचा नातू ज्ञानेश्वर उर्फ बाळ चांदोरकर त्याच न्यू इंग्लीश स्कूलमध्यें होता, ते स्वतः, केशवसुतही कांहीं काळ त्याच न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी होते, अशा शाळेंत मला पाठवण्यांत आलें. पण वर्गांत जागा नाहीं म्हणून मी परत आलों. नंतर मला त्यावेळच्या दुसऱ्या श्रेष्ठ शिक्षण सस्थेत " नूतन मराठी " विद्यालयांत पाठवण्यांत आले, आणि त्या शाळेंत मला प्रवेश मिळाला. त्याच शाळेंत माझें शिक्षण पुढें मॅट्रिकपर्यंत पूर्ण झालें व माझा त्या संस्थेशी संबंध जडला, ती संस्था माझी झाली ! पण त्याचे आधीही त्या संस्थेशीं आमचे दामले घराण्याचा संबंध आला होता. गंगाधरचे थोरले बंधू दत्तात्रय हे त्या शाळेंतून मॅट्रिक झाले. १९१३ चे अखेरीस, आणि त्यांनी फ्रेंच भाषा दुसरी भाषा घेतलेली होती !

हे माझें चरित्र नाहीं. नाहींतर नूतन मराठी, न्यू इंग्लिशस्कूल यांची चुरस क्रिकेटच्या मॅचेस नूतन मराठी व भावे स्कूल यांचे मधील Tug of War ची चुरस आटचापाटचा, खोखो यांचे सामने आदि पुष्कळ मनोरंजक गोष्टी सांगता येतील. माझे त्यावेळचे स्नेही, नूतन मराठी मधून न्यू पुना कॉलेजची स्थापना, नूतन मराठीची भव्य इमारत वगैरे हकीगती मला मोह झाला तरी टाळल्या पाहिजेत. ऑगस्ट अखेरपर्यंत पुण्याच्या डिस्ट्रिक्ट कोर्टांत आमच्या पालनकर्त्याचा अर्ज सीतारामपंतांनी देऊन त्याची योग्य ती सुनावणी होवून, विशेष कोणाचा विरोध न होतां, त्यांस आमच्या म्हणजे मोरोपंतांच्या पूर्वीच्या जिंदगीचें Letters of Administration मिळाले, ते आमचे कायदेशीर पालक झाले...

१९१३ चे सप्टेंबर पर्यंतचे महिने त्यांचे बऱ्याच गडबडीचे व मानसिक अस्वास्थ्याचे गेले असले पाहिजेत. आणि डिसेंबर अखेरीस रेल्वे कंपनीकडील पैसे मिळेपर्यंतही त्यांची तशी अस्वस्थता असेलच. या काळांत ते आमचेशीं अतिशय चांगले वागले. आम्हांस कधीं रागावून घेतल्याचें आठवत नाहीं. उलट नेहमी कांहींना कांहीं आमचें कौतुक चाले. पावसाळ्यांत नदीस पूर आल्यावर दोन तीन वेळां आम्हांस टांग्यातून किंवा बग्गीतून बंडगार्डनवर पुराची मजा दाखविण्यास नेण्यांत आलें. एकदां त्यानीं व काकूनें बग्गीमधून, एकवेळ गांधीवाड्यांत त्यावेळीं राहणाऱ्या श्री. हणमंतराव चिन्मुळगुंद या स्मॉलकॉज कोर्टाचे न्यायाधीश

यानीं त्यांचे घरच्या व्हिक्टोरियांतून, फिरावयास नेले.एक-दोन वेळां मला एकटचा-लाच बापूकाकांनीं सायंकाळीं टांग्यांतून तेथें नेलेले आहे. बंडगार्डन ही बाग त्यावेळीं गावापासून फार दूर वाटे. त्या बगीचांत धावणें-बागडणें, दगडी सिंहावर स्वार होणें, पाणी पडत असतांना, त्याचे तुषार उडतांना त्या पडणाऱ्या खूपच मोठ्या म्हणजे रुंद कृत्रिम धबधब्याची शोभा पाहणें याची कांहीं और मजा वाटत असते... बंडगार्डन हे सीतारामपंतांचे आवडतें ठिकाण होतें. पुढेही ४।५ वर्षेपर्यंत वर्षा-ऋतूमध्यें ते ५।६ वेळांतरी दरवर्षी तेथें जात असतील. कोर्टांत एखादे दिवशीं कमी जास्त पैसे मिळालेले असले, मनाचीं खुषी असली कीं, त्यांस 'बंडा'वर जाण्याची लहर येई, आणि अशावेळीं मी शाळेंतून घरीं आलेला असलों कीं, माझी किंवा क्वचित् शशी व रत्नी या जोडगोळीची वर्णी लागे; आणि आम्हीं तेथें जात असूं.

त्याच सुमारास त्यांचे श्वशुर रावबहादुर चिं. वि. वैद्य यांनीं घरच्या मुलांचे शिक्षणासाठीं गांधी वाड्यांतच स्वतंत्र बिऱ्हाड केले होतें. त्या मुलांचे (Local Guardian) स्थानिक पालकत्व त्यांचेकडे होतें. त्यांचा व्यवसाय वकिलीचा होताच. माझी मोठी बहीण सौ. राधाबाई घारपुरे किंवा दत्ती हिला जून जुलैमध्यें ऋतुप्राप्ती झाली. त्यामुळें सासरेपणाची कर्तव्यें ही त्यांस करावीं लागत होतीं. परशुराम हा जूनमध्यें मॅट्रिक पास झाला होता, उत्तम प्रकारें त्यास दरमहा रुपये १० ची इंग्रजीमध्यें पहिला नंबर आल्यामुळें शिष्यवृत्ति मिळाली होती. तेव्हां त्याचें शिक्षण नागपूरास पुढें चालू ठेवण्याची कांहीं व्यवस्था जमते काय तें पहावयाचें होतें. आणि हाती रोकड पैसा तर नाहीं! ऑगस्ट अखेरीनंतर मोरोपंताच्या जिंदगीची व्यवस्था करणें किंवा त्या पैशांचा वापर करणें त्यांस शक्य झालें तोपर्यंत या विविध खर्चाची तोंडमिळवणी करणें यांस खरोखरीच कठीण गेलें असेल. पण तसें आम्हास त्यांच्या चेहऱ्यावर वर्तनांत कधीं दिसल्याचें आठवत नाहीं. उलट ते नेहमीचे गंभीर प्रकृतीचे असले तरी आनंदी होते असें वाटतें, आठवतें.

याच काळांत पावसाळ्यांत उद्भवणारे अपचनादि, हिंवतापादि आजार आम्हांस केव्हां केव्हां होत. त्यावेळीं प्रथम प्रथम आम्हास त्यावेळी जवळच असणाऱ्या डॉक्टर बापट यांचें औषध देण्यांत येई. पण जुलै-ऑगस्टमध्यें असेल, केव्हांतरी, पंढरपूरचे श्रीयुत गोविंदराव करकरे शिक्षक, आम्हांस भेटावयास घरीं आले. पुढेंही ४।६ वर्षे पर्यंत येत असत, ते, पुण्यास आल्यावर. ते मोरोपंत यांचे गुरुबंधु होते. श्री अनसूया माता, श्री दत्तात्रेय या दैवतांचे भक्त होते. एकवेळ केव्हांतरी आम्हा मुलांपैकीं कोणीतरी आजारी असेल, म्हणून त्यांनी "त्याच आळींत एका टोकाजवळ हौदाचे जवळच्या घरांत राहणारे डॉ. नरहर गोपाळ

सरदेसाई यांचें औषध मुलांस द्या. ते माझे स्नेही आहेत. मुलांस उत्तम औषध योजना करतील." असें सांगितल्यावरून पुढें आमचे फॅमिली डॉक्टर, हे सरदेसाई डॉक्टर झाले. आम्ही पोरकी मुलें! तेव्हां आमचे हितकर्ते अनेक हजर होत. आणि आपापल्या परीनें कोणी कोणी कांहीं कांहीं सूचना करीत असतील. सीतारामपंतांस त्यांचा मनस्ताप वाटत नसेल असें सांगवत नाहीं. श्री. गोविंदराव करकरे मात्र असे उपद्रवी, फुकट सल्लागार नव्हते. तर अगदीं सत्वशील गृहस्थ होते; आणि पुढें डॉक्टर सरदेसाई हेही आम्हास विशेष प्रकारें वागवीत होते.

ऑगस्ट पासूनच पुण्यांत प्लेगोबानें आपलें थैमान सुरु केले. त्यावेळीं आम्हांस वैद्यांच्या मुलांच्या बिऱ्हाडी ३ ऱ्या मजल्यावर झोपण्याकरितां पाठवण्यांत येऊं लागले. तिसऱ्या मजल्यावर उंदीर, घुशी, पिसवा जात नाहींत. प्लेगपासून तेवढेंच आमचें संरक्षण होईल असा त्यांचा विचार असावा. पुढें किंवा त्याच सुमारास प्लेगची लस टोचणें नुकतेच सुरु झालेलें होतें, तेव्हां आम्हा मुलांस लस टोंचून घेतली, आणि अखेर स्थलांतर म्हणून आम्हास मुंबईस पांडूनाना यांचे बिऱ्हाडीं पाठवण्यांत आलें! अशा प्रकारच्या नाना प्रकारच्या विवंचना होत्या, आणि त्या पसर्वातून पार पडण्यांत त्यांस यश आलें. त्या यशाचा कळस म्हणजे रेल्वे कंपनी-कडून नुकसान भरपाईची मोठी रुपये वीस हजारांची रक्कम मिळणें होय.

✣ ✣ ✣

## मोबदला रक्कम व त्यामुळें उत्पन्न झालेले प्रश्न

मथळचाचा विषय घेण्यापूर्वी एक लहानसा परिच्छेद, १९१३ च्या दिवाळी बद्दलचा लिहितों! अण्णा व आई यांच्या मृत्युनंतरची ती आमची पहिली दिवाळी होती. दिवाळी पांडूनाना यांच्या बिऱ्हाडीं मुंबईस साजरी झाली. पुण्याच्या प्लेगामुळें आम्ही तीनही मुलें व ती. काशीआत्या मुंबईस आलों होतों. परशराम होताच. पांडूनानाही होते. मुंबईस त्यावेळीं ते कांदेवाडीमधल्या महंम्मदी बिल्डिंगमध्यें ३ ऱ्या मजल्यावर २२ नंबरच्या खोलींत राहत असत. त्या दोनच जेमतेम १०×१० फुटांच्या खोल्यांतली ती दिवाळी, पण आम्हांस ती आनंदाची वाटली. फराळ, फटाके, यांची चंगळ होती, सीतारामपंत पैसे पाठवत असत, खर्चावयास, आणि मुलांस कांहीं कमी पडू देऊ नका असें त्यांचें वारंवार लिहिणें असे.

दिवाळीच्या आगे मागेंच माझी वार्षिक परीक्षा झाली, आणि मी वरच्या वर्गांत गेलों पास होवून, पण मला मराठी विषयच कठीण वाटूं लागला होता. नागपूरकडच्या मानाने इकडील मराठी पद्य फार अवघड वाटे. मोरोपंती आर्या-

"द्रोण द्रौणिकृपादि प्रबळ बहु भटांसही न तो आटे
फाके तत् दृष्टिपुढें बळ जलदी मुर्त वातसा वाटे"

वगैरे संस्कृत प्रचुर काव्यें विशेषतः मला कांहीं कळत नव्हतीं! म्हणून मी मराठींतच कसातरी काठावर पास किंवा नापास होवून वरच्या वर्गांत गेलों!

सीतारामपंतापुढें मोबदला रक्कम मिळाली. तिचें काय करावें हा एक मोठा पेंचप्रसंग उभा राहिला. डिसेंबर १९१३ च्या आगेमागें बँकिंग व्यवहारांत फार मोठी क्रांति झाली. मुंबईस बॉम्बे बँकिंग कंपनी दि इंडियन स्पीसी बँक या बँका बुडाल्या! पैकीं स्पीसी बँक ही एका फार कुशल आणि महत्वाकांक्षी व्यापारी चुनीलाल मोहनदास सरय्या या गुजराथी व्यापाऱ्यांच्या ताब्यांत होती. त्यानीं सर्व जगांतील चांदी बँकेमार्फत खरेदी करण्याचा घाट घातला, म्हणून इंग्रज सरकारनेंच कारवाया करून ती बँक बंद पाडली असा प्रवाद होता. Money Market म्हणजे मुंबईचा आर्थिक व्यवहार करणारा बाजारच हादरलें! तेव्हां पैशाची गुंतवणूक कोठें कशी करावी, तो सुखरुप कोठें राहील, आणि निश्चित उत्पन्न मिळून आम्हा पोरक्या मुलांचें भविष्य कसें सुरक्षित राहील ही त्यांस चिंता वाटली.

इकडे चिंतोपंत आणि त्यांचे चिरंजीव बेलापूरच्या श्री. पाटणकरांची जमीन, खरेदी करून मोरोपंतांचे मृत्युमुळें अडून राहिलेला व्यवहार पूरा करावा म्हणून आग्रह धरून बसले. कारण चिंतोपंत यानीं साठेखत करीत असतांना एक हजार रुपये गुंतवलेले होते, तेव्हां ते तरावेत, व व्यवहार न झाल्यास ते बुडून जावूं नयेत असे त्यांचें म्हणणें होतें. जेव्हां रेल्वेकडून कांहींच मिळालेलें नव्हतें तोपर्यंत म्हणजे डिसेंबरपर्यंत त्यांस कसलाच आग्रह करतां येत नव्हता. पण रुपये वीस हजार मिळाल्यावर त्यांच्या या मागणीस जोर चढला. त्यांस अण्णांची, मृताची, ती शेवटची इच्छा असें पाठबळही चिकटवण्यांत आलें. . पण सीतारामपंत यानी काय विचार केला तो त्यांचा तेच जाणोत; त्यानीं सरकारी ३॥ टक्के दराच्या कर्जरोखे Government Promisory Notes मध्यें वीसही हजार रुपये गुंतवले! त्यांस ऑगस्ट १९१४ला पुण्याच्या डिस्ट्रिक्ट जज्जकडे मोरोपंतांच्या किंवा आतां आम्हा अज्ञान मुलांच्या इस्टेटींची व्यवस्था ते अशीकाय पाहत आहेत याचा जमा खर्च द्यावयाचा होता, तो सर्व व्यवहार निर्धास्त आहे. चोख आहे, बिनभानगडीचा आहे असें त्या जज्ज महाशयांस पटवावयाचें होतें. त्यानंतर दरसाल हिशोब देण्याची भानगड उद्भवणारी नव्हती, म्हणूनही असेल त्यांनीं मिळालेला पैसा सरकारी 'परमेश्वरी' नोटांत गुंतवला, पण यामुळें त्यांचें आणि चिंतोपंत व त्यांचे दोन्ही चिरंजीव यांचें थोडेफार प्रच्छन्न स्वरुपाचें वैर आले. उघड रीतीने ते कांहींच विरोध करूं शकत नव्हते, त्यांनी केले नाहीं. पण मनांतून मात्र सीतारामपंतांवर

त्यांचा राग झाला. पण पुढील एकंदर घटना घडल्या त्यांचा विचार केल्यास सीतारामपंत यांनी केलें तेंच आमच्या हिताचें झालें असें आतां वाटतें.

पाटणकरांची जमीन घेतली असती तर आम्हांस त्या जमिनीचें उत्पन्न दरसाल नियमित मिळालेंच असतें अशी खात्री देतां येत नाहीं. पण सरकारी व्याज मात्र दर सहामाहीस मिळत राहिलें !

कदाचित् हा सौदा सीतारामपंतांनी न करतांना ते व चिंतोपंत आणि त्यांचे चिरंजीव यांच्यांत तोंडीच कांहीं दुसरा सौदा ठरला किंवा काय तें कळण्यास मार्ग नाहीं. पण पनवेल जवळच्या जमिनी माझ्या मालकीच्या झालेल्या, त्यांचें उत्पन्न, गहाण खतें व त्यावरील रक्कमेचें व्याज वगैरे सीतारामपतांनी चिंतोपंतांस उपभोगास दिलें असावें, आणि अशा प्रकारें त्यांची नुकसान भरपाई केली असावी. शिवाय परशराम यास शिकावयास पुण्यास ठेवून घेतलें, आणि तो पुढें पुष्कळ वर्षे पुण्यासच होता त्याबद्दलही त्या लोकांचा असा प्रवाद होता कीं परशराम पोसला सीतारामपंतांनीं, पण तो आमच्या पैशांवर, आणि मोठेपणा मात्र घेतला स्वतःकडे!

पण यांतली खरी गोष्ट सांगावयाची म्हणजे १९१६ मध्यें सीतारामपंतांची पत्नी सौ. जानकीकाकू यांचे निधन झाल्यावर आणि त्यांनी द्वितीय विवाह करावयाचा नाहीं हे ठाम ठरवल्यानंतर त्यांचा व आमचा असा स्वतंत्र संसार, कारभार राहिलाच नाही. आम्ही त्यांचीच मुलें होतों व ते आमचे वडीलच होते ! जें जें कांही त्यांनीं केलें तें सद्बुद्धीनें केलें. कोठे अपयश आलें, कोठे ठीक झालें ! पण त्यांनी स्वतंत्र अशी स्वार्थी बुद्धि कधींच स्वप्नांतहीं आणली नाही अशी माझी स्वतःची संपूर्ण खात्री आहे.

✣ ✣ ✣

## सीतारामपंत आणि त्यांचे सासरे भारताचार्य वैद्य

सीतारामपंत आणि त्यांचे सासरे महाभारताचार्य, रावबहादुर चिंतामण विनायक वैद्य यांचे संबंध फार प्रेमळ, आणि परस्पर आदरयुक्त होते, असें मी स्वतः पाहिलें, अनुभवलें आहे. १९२७ मध्यें सीतारामपंत मरण पावल्यानंतरही माझे व त्यांचे संबंधांत आजोबा व नातू अशा प्रकारचे त्यांचे मरणापर्यंत कायम राहिले. चिंतामणरावांस एकच मुलगी "दुर्गी" आणि पुनः ती आईविना पोर झाली. तिचे आजोबा मुंबईचे प्रख्यात डॉ. कुंटे होते. सीतारामपंत-दुर्गाबाई यांचे विवाहाची हकीकत पुढें येईल, तेंव्हा यासंबंधात लिहीन अधिक. पण सध्यां १९१२ नंतरच्याच हकीगती मी देणार आहे.

चि. वि. उर्फ नासासाहेब वैद्य ही अति थोर व्यक्ति होती. त्यांचें व्यक्तिमत्व उतारवयांत एवढें परिणामकारक नव्हतें. त्याचें प्रमुख कारण त्यांचा गबाळा पोषाख, व साधी राहणी होय. ते पुण्यास येत जात तेव्हां आपली सामानाची पिशवी हातांत घेऊनच बुधवार चौकापासून पायीं येत जात, आणि तेथून स्टेशनपर्यंत स्वारीच्या टांग्यानें जात येत! धोतर कोट जरा मळकटच असत. उपरणें साधेंच. मात्र पगडी असे डोक्यावर; पण ती ही भपकेदार चांगली नसे. एवढें वय झाल्यामुळें चेहऱ्यावर एवढी तरतरी दिसणार कोठून?

चिंतामणराव किंवा नानासाहेब यांची पुण्यास अधून मधून खेप होई, आणि दर खेपेस ते आमच्याकडेच उतरत असत. १९२० पर्यंत. कधीं लो. टिळक पक्षाच्या सभा म्हणून, कधीं साहित्य सम्मेलन, कधीं कीर्तन सम्मेलन, कधीं मुलगे, पुतण्ये यांच्याकरितां मुली पाहण्यास. त्यांच्या दोन मुलांचे विवाह पुण्यास झाले, तेव्हां त्या कार्याप्रीत्यर्थ असे ते येत असत, आणि १९२० च्या डिसेंबर नंतर म्हणजे लो. टिळक महाविद्यालयाचे स्थापनेनंतर तेथें शिकवण्याकरितां म्हणून दर शुक्रवार शनिवारी ते येत, आपले शिकवायचे तास घेत आणि पुनः परत जात असत, २।३ वर्षेपर्यंत. १९२४ सालचे सुमारास त्यानीं पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंदिरामध्यें स्वतःचें बिऱ्हाड थाटलें. एक आचारी ठेवून ते तेथेंच कायम राहत असत, कांहीं वर्षे पर्यंत.

सासरे व जावयी यांच्या जेवतांना गप्पा रंगत असत पुष्कळ, व ऐकणारांस विविध विषयांचें आपोआपच ज्ञान होत असे. अशावेळीं दोघांचीही हुशारी दिसून येई. नानासाहेबांची राहणी व्यवस्थित असल्यामुळें घरच्यांस त्यांचा कसलाच त्रास वाटत नसे. बाहेर जातांना परत केव्हां येणार, जेवावयास दुसरीकडे कोठें जाणार असले तर त्याची माहिती आधीं योग्यवेळीं देणें, विशेष आवडीच्या भाज्या, अळू, वाटाण्याच्या शेंगा, हरभऱ्याचे सोले, फुलावर (कोबी) वगैरे ज्या त्या दिवसांत जे मिळत असेल मंडईत, तें घेऊन येत असत व करावयास सांगत. जरा जून अशा कवठाची कढी त्यांस फार आवडत असे, म्हणून कवठें देखील ते आणीत, अधून मधून, त्यामुळें त्यांची पुण्यास भेट म्हणजे एका प्रकारें आनंदायी असे.

सीतारामपंत हे मुंबईस जात असत, अधून मधून कामांकरितां, पण ते बहुधा कल्याणला जात नसत.

नानासाहेबांची एक खूपच मोठी सुमारें १००–१२५ एकर जमीन होती पाटस गावीं. त्या जमिनीची व्यवस्था पाहण्याचें काम त्यांनी सीतारामपंतांस मुखत्यार पत्र देऊन, त्यांचेकडे सोपविलेलें होते. त्यामुळें सीतारामपंत पाटसला जात असत दोन तीन महिन्यांनी. त्या जमिनीचें वर्णन ऐकलेले होतें आम्ही.

एक खूप उत्तम बांधलेला तलाव होता, त्यांचे जमिनींत, आणि तो बांधावयास १९१५ चे सुमारास देखील सहज ३०–४० हजार रुपये खर्च आला असता. आणि ही सर्व जमीन त्यांस सुमारें ४।५ हजाराचे किंमतीत गहाणामुळें मिळालेली होती.

१९१३–१४ पासूनच नानासाहेबांच्या एका पुतण्याकरितां श्री. विनायकराव यांचे करितां व थोरले चिरंजीव धुंडीराजपंत यांचेकरितां मुली पाहण्याचें काम सीतारामपंत व काकू यांचेकडे होतेंच; अर्थात् स्वतः चिंतामणराव देखील मुली पाहत असत. विनायकराव यांचा विवाह कल्याणास झाला. पण धुंडीराजपंत यांस मुलगी ठरली साताराच्या रावबहादुर काळे यांची पुतणी. या मुलीचे वडील म्हणजे प्रख्यात Kale's English Translation चे कर्ते होते. पण त्यावेळीं मुलीचे पालनकर्ते रावबहादूरच असत. विवाह ठरला, निमंत्रण पत्रिका छापून टपालानें रवानाही झाल्या; आणि एकाएकीं मुलीची पत्रिका नानासाहेब यांनी बारकाईनें स्वतः पाहिल्यावर त्यांस ती मुलगी सासऱ्याच्या म्हणजे स्वतःच्या मूळावर आहे अशी शंका आली, किंवा खात्री झाली. यामुळें कांहीं झालें तरी हा विवाह मोडावा, करू नये, असा त्यांचा विचार झाला इकडे रावबहादूर काळे हट्टास पेटले, आणि इतक्या थरावर गोष्टी आल्यानंतर, नानासाहेब कसे मोडतात हा विवाह ते पाहतोंच मी, असें म्हणूं लागले ! तेव्हां या मोठ्या आपत्तिचे प्रसंगीं-कारण हा तंटा एक जहाल व मातबर पुढारी, तर दुसरे मवाळ आणि तितकेच मातबर पुढारी, हुशार सरकारी वकील यांचे मधला होता– सीतारामपंत यांनीं धैर्यानें सर्व जबाबदारी स्वतःचे शिरावर घेऊन हा विवाह अत्यंत सुखरूपपणानें पार पाडला. विवाह स्वाभाविकपणानें रावबहादुर काळेयांनी डामडौलानें, थाटानें, पुण्यांत पार पाडला.

या समारंभाच्या निमित्ताने पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. पण अगदीं आवश्यक अशा गोष्टी थोडक्यांत सांगतों, हा विवाह आतां होणारच अशी चिन्हें दिसूं लागल्यावर नानासाहेबांचे डोके फिरून त्यांस वेड लागल्या सारखें झालें. ते बडबडत, शिव्या देत, स्वतःच डोक्यावर थपडा मारून घेत, जेवण खाणेंही नेहमीं सारखें राहिले नाही. या एकंदर प्रकारानें सर्वांच्या तोंडचे पाणी पळालें. तरी सीतारामपंत आणि जानकीकाकू पुढाकार घेऊन, जणू स्वतःच्या मुलाचें किंवा भावाचेंच कार्य असें समजून आत्मीयतेने, अशा कार्यांत ज्या प्रकारचा रस, आनंद उपभोगावयाचा असतो, जी जबाबदारी स्वीकारावयाची असते, ते सर्व कर्तव्य करून हा समारंभ त्यांनीं पार पाडला. या कार्यांत त्यांस नानासाहेब यांचे ज्येष्ठ पुतणे श्री. हरिभाऊ किंवा भाऊराव यांची भरीव मदत झाली. नानासाहेबांस सांभाळणें, जरूर त्या प्रत्येक महत्वाचे प्रसंगी त्यांस हजर ठेवणें, समारंभ संपला की टांग्यातून स्वतःच्या बिऱ्हाडी पाठविणें, (म्हणजे कार्यांत कोणताच विरस उत्पन्न होवू नये

म्हणून) इत्यादी गोष्टी त्यांनी चतुराईनें पार पाडल्या. या बाबतींत त्यांस नानासाहेबांचेच एक स्नेही श्री. नीळकंठराव सहस्त्रबुद्धे म्हणून जरा चमत्कारिक वागणारी, शनिवार पेठेंत राहणारी व्यक्ति होती. तो व मी उपयोगी पडलों. नीळकंठराव हे मद्रासी पद्धतीची लुंगी नेसत, डोक्यावर हॅट घालीत असा चमत्कारिक पेहेराव करीत, पुष्कळवेळां. म्हणून मी वर त्यांस चमत्कारिक म्हटलें आहे. त्यांनी नानासाहेबांवर मनाचे दडपण, दाब ठेवावा, आणि मी त्यांचे देहधर्म, शारीरिक गरजा यांचेकडे लक्ष द्यावे. अशी आमची श्रम विभागणी होती. विवाह कार्याच्या मिरवणुका-वराची मिरवणूक, व वरात, या थाटांत निघाल्या. दोन्ही पक्षांकडील मेजवान्या झडल्या··· विशेषतः रावबहादुर काळे यांनी हे कार्य चांगले हौशीनें सदाशिव पेठेच्या हौदासमोर रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांच्या वाड्यांत पार पाडलें. मिरवणुकीमध्यें पुढचे बाजूस त्यांचीही वजनदार व्यक्तिमत्वपूर्ण आकृति आणि सीतारामपंतांचीही रुबाबदार मूर्ति अशा जोडीनें चालत, तेव्हां लोक आश्चर्यानें पाहत. पोलीस लोकही जरा दबकत. याची साक्ष म्हणजे वरातीच्या मिरवणुका ११॥ चे आंत संपल्या पाहिजेत असा पोलिसी कायदा असतांना ११॥ वाजतां भर बधवार चौकांत मिरवणूक मिरवतच होती ! मिरवणूक थांबवण्याची पोलीसांची आज्ञा झाली नाहीं, या दोन सातारा पुण्याच्या वकीलांपुढे !

नानासाहेबांच्या सुदैवानें आणि त्यांच्या सुनेच्या दुर्दैवानें ती मुलगी बिचारी स्वतःच्या मुळावर आली असावी ! साधारण विवाहानंतर एक दीडवर्षाच्या आंतच बिचारीची इहलोकींची यात्रा संपली; आणि नानासाहेब, महाराष्ट्र वाङमयाचे सुदैवानें पुनः पूर्ववत् झाले. त्यांचे डोक्यांतला सर्व वेडसरपणाचा परिणाम पूर्णपणें नष्ट झाला. त्यांनी आपला मध्ययुगीन भारत हा इतिहास, संस्कृत वाङ्मयाचा इतिहास आदि विराट स्वरूपाची ग्रंथरचना, सगळी यापुढेंच केली.

नानासाहेबांचे याच चिरंजीवांचा श्री. धुंडीराजपंतांचा द्वितीय विवाह पुढें पुण्यातच झाला, प्रख्यात नूलकरांचे वाड्यांत, सदाशिव पेठेंतच. या कार्यांत विशेष असें कांही घडलें नाहीं. अर्थात् सीतारामपंतांकडे होतें थोडे पुढारीपण. मुलगी होती बडोद्याच्या आपटे या हेडमास्तरांची, आणि मुंबईच्या उद्योगपति आपट्यांची पुतणी. हा विवाहही थाटांतच झाला.

नानासाहेबांचे दुसरे चिरंजीव श्रीं. भालचंद्रपंत यांचा विवाह पुण्याचे सरदार ढमढेरे यांचे कुळांतील एका मुलीशी पुण्यांतच १९२०-२१ सालीं ढमढेरे यांचे वाड्यांत झाला. पण नानासाहेबांच बिऱ्हाड होतें, शनवारवाड्याच्या ईशान्य कोपऱ्याजवळच्या एका वाड्यांत. त्यावेळीं तेथें भावे स्कूलचीं एक शाखा भरत असे. हाही विवाह दोन्ही घराण्यांच्या इभ्रतीस साजेसा असा झाला, अणि याही कार्यांत मुली पाहणें, विवाह ठरवणें वगैरे बाबतींत सीतारामपंतांचा हात होता.

नानासाहेबांची मुलगी दुर्गाबाई किंवा जानकीकाकू यांचे निधनानंतर म्हणजे १९१६ च्या ऑगस्ट-सप्टेंबर नंतर, या दोन्ही विद्वानांचे संबंध कमी व्हावेत, साधारण रुढी प्रमाणें. पण या दोन व्यक्तींचे संबंध यत्किचित्‌ही कमी झाले नाहींत. हे वाढतच राहिले. लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर महाराष्ट्रांतील राजकीय वर्तुळांतील टिळक पक्षांत फाटाफूट झाली. त्यावेळींही ही सासरे जावयी यांची जोडी असहकारितावादी, गांधी पक्षाकडे झुकली, व अभेद्य राहिली.

## बापूकाका व पत्नी सौ. जानकीकाकू

बापूकाकांचे विवाहाबद्दलची हकीगत माझे वडील मोरोपंत यांचे चरित्र विभागांत सांगितली असल्यामुळें तिच्या पुनरुक्तीची जरूर नाहीं. जानकीकाकू माझे मतानें दिसावयास चांगली होती, श्रीमंताची मुलगी होती, पण तिचा विवाह त्या काळच्या मानानें कां लांबला होता तें कळण्यास मार्ग नाहीं. तिची पत्रिका मला माहीत नाहीं, किंवा त्यासंबंधीं मी कांहीं देखील ऐकलेलें नाहीं. कदाचित चिंतामणराव हे महाराष्ट्रापासून लांब, उज्जैन-ग्वाल्हेरकडे होते, म्हणून त्यांस इकडे या महाराष्ट्रांत येऊन किंवा मुलीस ठेवून कार्य जुळवणें शक्य झालें नसेल. जानकीकाकूचें आजोळ मुंबईच्या प्रख्यात डॉ काण्यांकडे होनें, (या डॉ. काण्यांनीच त्यांचे घरीं कंपाउंडरवजा काम करणाऱ्या श्री. के.टी. डोंगरे यांस कांही एक फॉर्म्युला-औषधांचें मिश्रण सांगून 'तुझें नशीब पहा, असेल चांगलें तर मिळेल यावर तुला पैसा' असें म्हणाले. तोच Formula किंवा रसायन म्हणजे प्रख्यात 'डोंगरे का बालामृत' होय ! आणि त्यावर श्री. डोंगरे यांनीं व त्यांचे वंशजांनीं पुष्कळ पैसा मिळवला, व अजूनही थोडा फार पैसा तें रसायन त्या घराण्यास मिळवून देत आहे.) तरीही विवाह जुळत नव्हता ! * पण म्हण आहे ना, "खाकेत कळसा आणि गावाला वळसा" त्याप्रमाणें होवून उज्जैनच्या मोरोपंत दामल्यांचा भाऊ चिंतामणराव वैद्य चीफ साहेबांचा जावई झाला !

जानकीकाकू आणि सीतारामपंत यांचें परस्पर प्रेम होतें. तें अगदीं सुरवातीपासून अखेरपर्यंत असावें. कारण विवाहानंतरच्या २।३ वर्षांतच म्हणजे १९०२-३ मध्येंच केव्हांतरी, मोरोपंत मंडळी व ते उभयतां यांचेमध्यें कांहीं किरकोळ कुरबूर झाली असावी असें ऐकण्यांत आहे. बापूकाका यांस, जानकीकाकूस, नवी तरणी सून

* तळटीप :– मोरोपंत चरित्रांतील श्री. दीक्षित यानीं सांगितलेली माहिती, मागाहून कळली, ती या मजकुराशी फार विसंगत नाहीं.

या नात्यानें तिला घरांत कांहीं कामधाम पडत असेलच, तें तितकें पसंत नसावें. किंवा तिच्या माहेरच्या श्रीमंती संवयीमुळें जड जात असेल, म्हणून किंवा अन्य कारणानें पण बायकोमुळेंच दोन्ही भावांत थोडा मत-विरोध किंवा भांडण म्हणा झालें असेल ··· आणि म्हणूनच ते १९०३-४ मध्यें मुंबईकडे आले. त्यानंतर वर्षादोन वर्षांतच बहुधा चिंतामणरावही ग्वाल्हेरच्या नोकरींतून मुक्त होवून कल्याणास परत आले. सीतारामपंतास एल्. एल्. बी. ची परीक्षा मुंबईस द्यावयाची होतीच, आणि आपण आतां स्वतंत्रपणें आपल्या पायावर उभे राहणें जरूर आहे याची जाणीव ही त्यांस झाली असेल. म्हणून मग ते स्वाभाविकपणें या भागांत मुंबईस आले.

या काळांत त्यांनीं बिऱ्हाड केलें होतें किंवा नाहीं याची माहिती नाहीं. पण १९०४ सालापासून त्यांनीं पुण्यांत बिऱ्हाड केलें होतेंच. १९०५ साल, तर, ते फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर म्हणून काम करीत असत, व त्याकाळीं श्रीयुत श्रीधर शास्त्री लिमये यांचे वाडयांत निंबाळकर तालमीसमोर त्यांचें बिऱ्हाड होतें.

जानकीकाकू, सुरूप, मध्यम उंचीची म्हणजे ५ फूट आणि २ इंच उंचीची, वाटोळया अंगाची, भरदार बाई होती, दिसावयास ठसठशींत, मनांत भरेल अशी होती. केस पुष्कळ लांब, मोठा आंबाडा येईल असे होते. त्याकाळीं गंगावन वापरून केसांच्या बाबतींत फसविण्याचा प्रकार फारच दुर्मिळ होता. तिला सीताराम पंतांबद्दल अभिमान वाटत असावा; कारण तेही देखणे, बुद्धिमान्, विद्वान्, लेखक, पराक्रमी देशभक्त होते. ते काकूस खर्चाखयास हाताशीं रक्कम देत असत. घरची तिजोरी तिचे ताब्यांतच होती. (त्याकाळीं लोखंडी तिजोऱ्या किंवा लोखंडी गोद्रेजची आरसेवाली कपाटें नव्हती, जरी कांहीं थोडया लोकांजवळ सोनें, दागिने, पैसे असले तरी. आज-काल जवळ जवळ कांहीं नसलें-तरी गोद्रेजचें कपाट मात्र असतें ! ) त्या काळच्या मानानें ती कोठल्याच शाळेंत जावून शिकली नव्हती. पण मला आजही " अमृतानुभव " नांव म्हटलें तरी, कापरें भरतें; पण तिच्या पुस्तक संग्रहांत मी " अमृतानुभव " ग्रंथ पाहिला होता ! तुकोबांचा गाथा होताच- - - शिवाय घरीं वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें असत त्यांचा ती यथायोग्य रसास्वाद घेऊं शकत असेलच - - - अशी सुसंस्कृत बाई होती आमची काकू.

कला कुसरीचीं कामें करणें तिला आवडत असे, मूलबाळ घरांत नसल्यानें, तिला न झाल्यानें, तोच एक विरंगुळा, किंवा तींच एक तिची करमणूक असावी लोकरी, सुताचें भरत काम, विणकाम, पोतीचें विणकाम, चिनी मातीच्या बाहुल्या, त्यांस पोतीचे कपडे बसविणें, लहान कुंडयांतून पोतीची झाडें करणें, लाकडी बोळकी असली तर त्यावर पोतीचेंच काम मढवणें असें कांहींना कांहीं काम तिचें चालत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..................... वि: ...................
क्रमांक

असे. तिनें तयार केलेला एक चौकोनी फूट दीड फूट उंचीचा मांडव आणि त्यांतील चैत्र गौरीचा पाळणा, आणि एक मोठी कमान ९--१० इंच रुंद, १५ इंच लांब व अंदाजे १० इंच, एक फूट उंच आणि त्या कमानींत ४।६ बाहुल्या, चहाचें टेबल, लहान कपबशा, किटली, वगैरे सरंजाम असा देखावा, हिरवागार पोपट, हीं तीन तिचीं कलाकुसरीचीं कामें मला अजून स्पष्ट आठवतात. त्या वस्तू अनेक शेजारी पाजारी चैत्र गौरीचेवेळीं आमचेकडून मागून नेत असत व आपली आरास शोभिवंत करीत. त्याकामांत तिचें हस्त–कौशल्य, रंगसंगती साधण्याचें काम, नाजूकपणा, बारीक सारीक, लहान लहान गोष्टींच्या बारकाया लक्षांत घेणें, ( उदा. बाहुल्यांच्या झग्याना बटणें निराळ्या रंगाच्या पोतीचीं ) एकूण कुशलता फार होती. या वस्तू मीं १९१३ त पाहिलेल्या, अजूनही त्यांचे अवशेष सौ. शशिकला रानडेकडे आहेत. चौकोनी मांडवांत तिनें घरचे देव ठेवलेले आहेत.

जाळीदार रूमाल तर किती तरी करीत असे, आणि देऊन टाकीत असे, शेजाऱ्यांस ! तिनें पॉकेटवॉच ( खिशांतले घड्याळ ) ठेवण्यास एक जांभळी मखमली पिशवी, त्या घड्याळाच्याच आकाराची आणि त्यावर SKD हीं जरीचीं कलाबुती अक्षरें मोनोग्राम काढतात तशीं, अक्षरें एकमेकांत गुंतवून त्याप्रमाणें काढलेली घड्याळाची केस फार सुरेख होती. आणि सीतारामपंतांच्या मृत्यूनंतर आमच्यांत ( मी व चिंतोपंत यांच्यात ) जी फारकत झाली, त्या फारकतींत ती SKD ची पिशवीही गेली त्या शाखेकडे ! --- नाहीं म्हणावयास तिचीच एक आंगठी, श्रीराम नांव कोरलेली जाळीची, राहिली माझेकडे अगदीं अलीकडच्या काळपर्यंत होती घरांत - - - पण एका भामट्यानें, एका बदमाषानें तीं हातोहात माझ्या हातातून पळवली, लांबवलीं, अगदीं अलीकडे, ऑगस्ट १९६५ अखेर !

स्वयंपाकाचे बाबतींतहो ती फार कुशल होती. फुलक्या पोळ्या आणि पुरण पोळी याबाबतींत तिची फारच तारीफ होती. सर्व करणें स्वच्छ, टापटिपीचें, आणि सौंदर्ययुक्त; ज्यास Aesthetic Sense असें आपण आजकाल म्हणतों तो तिचे ठिकाणीं त्याकाळचे मानानें फार मोठ्या परिणत अवस्थेंत होता.

तशी ती धार्मिक प्रवृत्तीची होती. आणि अखेरचीं २ वर्षे तर, तिची धार्मिकता पराकोटीस गेली होती - - - आणि या सर्व दृष्ट लागण्यासारख्या त्यांच्या संसारांत गालबोट वजा एक गोष्ट होती ही ! आणि ती म्हणजे स्वतःचें अपत्य नसणें.

तरी त्यांचेजवळ कोणी ना कोणी तरी तरुण मुलें नात्याचीं नाहींतर संभाळावयास ठेवलेलीं असत. मुंबईस राष्ट्रमताच्यावेळीं पुतण्या पांडुरंग, भाचा बंडू विझे चुलत पुतण्या दत्तात्रय (हे तिघेही एकाच वेळीं नव्हते; विझे थोडेच दिवस होते) अशी मंडळी होती. पुण्यास चुलत पुतण्ये दत्तात्रय, गंगाधर व मीनानाथ हे एक

दोघेजण असतच. यांचेशिवाय महेश्वर ( हे M.G. Kulkarni पुढें Western India चे फार मोठे विमा एजंट होते, मुंबईतले. ) कुलकर्णी हे होते. आणि श्री. महेश्वरपंत आणि दत्तात्रय दामले यांचे तोंडून जानकी काकूची भरपूर स्तुति ऐकलेली आहे मी. ती त्यांस आश्रित म्हणून वागवीतच नसे. तर घरचे, नात्याचेच मानी; त्यांच्या आवडी निवडी, सोयी गैरसोयी पहात असे - - - खरोखर फार थोर माऊली होती ती. आम्हीं मुलें, दुर्दैवी; म्हणून आम्हांस तिचा सहवास लाभला नाहीं फार काळ.

अपत्य नसण्याचें दुःख सीतारामपंत पुरुष म्हणून दाखवीत नसतील. कदाचित् पुढें आम्हांसच त्यानीं मुलें मानल्यामुळं तें कमी झालें असेल; पण जानकी काकूस मात्र तें दुःख फार मोठें झालें असेल. कारण १९१४ च्या पावसाळ्यानंतर ती थोडीफार "वेडी" झाली होती. तिचें "वेड" कोणालाच त्रासदायक नव्हतें, जो काय त्रास होत असेल तो तिचा तिलाच असेल. आणि तो तसा तिला होत असावाच.

तिला वेड लागण्याचें कारण तर्कानें सुद्धां सापडत नाहीं. मूल नव्हतें हें एक संभाव्य कारण ठरेल; पण तें नसावें असें वाटतें. कांहींच तर्क चालत नाहीं. तिनें त्या काळांत एकदां गोठपाटल्या संडासांत टाकल्या होत्या. एकदां गोठपाटल्या किंवा कानांतल्या कुड्या मुंबईस माझा चुलत भाऊ पांडुरंग याचे बायकोस देऊन टाकल्या होत्या. अर्थात् त्यानीं ते दागिने परत दिले. तसेंच शास्त्रीबुवा लिमये यांची सूनबाई यांसहि कांहीं दागिने दिले होते ! त्यांनी ही ते परत दिले. . . . घरांतल्या स्वयंपाकात ती भाग घेत नसे घरांतील जिन्नसही खाणें तिनें हळुहळू कमी करुन उपास तापास करणें वाढवलें. स्वतंत्र एक स्टोव्ह आणवून भुइमूग दाणे, साबूदाणा, भगर वगैरे गोष्टी आणवून, कधीं थोडीं केळी आणवून ती त्यांवर राही. आणि अखेरच्या चातुर्मास्यांत तर तिचें खाणें अगदींच कमी झालें होतें. काशी आत्यांच्या सांगण्यावरून तिचें शरीर आंतून पोकळ झालें असावें.

सकाळ संध्याकाळीं देवास जाणें चाले, जपाची माळ घेऊन जप चाले. कोणता मंत्र ती जपत असे तें माहीत नाहीं. एका दुपारीं एक छकडा भाड्याचा करून ती जंगली महाराजाचे दर्शनास रत्नी व शशी यांस व एक मोलकरीण-बरोबर घेऊन गेली होती, त्यावेळीं जंगली महाराजाचे दर्शनास जावयाची वाट फार लांबून होती. लकडी पुलावरून फर्ग्युसन कॉलेजवरून, शेतकी कॉलेजच्या अलीकडच्या चौकातून वळून कामत बंगल्यावरुन इंजिनियरिंग कॉलेजच्या वसती-गृहापर्यंत जावयाचें, व त्यांचे मागून बोळांतून रस्ता होता. असें त्यावेळीं तें ठिकाण अक्षरशः जंगलांत होतें व तेथे दर्शनास जाणाऱ्यांची संख्या दिवसातून २५--३० तरी असेल किंवा नसेल याची शंका आहे.!

या सर्व हकीगतींवरुन तिचें वेड हें तसें वेड नसावें, असें दिसून येईल आमच्या (भाड्याच्याच) घरांत एक छोटीसी खोली होती. आणि त्या खोलींत भिंतीमध्यें एक मोठें ३ फूट रुंद आणि ५-६ फूट उंच असें कपाट होतें. त्यास खण नव्हते, ती त्या कपाटांतच दारें लोटून घेऊन बसून राहत असे ! या काळांत धार्मिक पुस्तकांचें वाचन मात्र करीत असे थोडें फार, घासलेट तेलाच्या डब्याच्या सारखी एक पेटी होती तिची, आडवी. आणि त्यांत तिचें ग्रंथ असत. मागें एक-वेळ "अमृतानुभवा"चा जो उल्लेख केलेला आहे तो कापडी ग्रंथ मी तिच्या या घासलेट तेलाच्या डब्यांत पाहिला होता. तिचे मृत्युनंतर तो इतर ग्रंथांच्या कपा-टांत मग नेऊन ठेवण्यांत आला.

या वेडाच्या गडबडींत तिचे हातून एकच थोडी वाईट अशी गोष्ट घडली. त्या दिवशीं बहुधा १९१५ सालीं घरांत माझी थोरली बहीण शकुंतला हिचीं श्रावणांतली मंगळागौर होती, ती सर्व दिवसभर जेवली नाहीं. उपाशीच होती. रात्रीं मुलींचे फराळ झाल्यावर बापूकाका तिला रागावले. एका प्रकारें घरांत बायकांचा सण चाललेला होता, गोड धोड झालेलें होतें. तेव्हां उपाशी काय रहावयाचें ? ते तिला रागें भरले एवढेंच नव्हे तर जबरदस्तीनें तिला ताट वाढून देऊन जेवणाचा आग्रह करू लागले. धाक दाखवूं लागले; तेव्हां तिनें भरलेलें ताट उडवून दिलें! आणि रागाच्या भरांत त्याच खरकट्या हातानें तिनें पूजा केलेली चौरंगावरची मंगळागौर उधळून टाकली! हा प्रकार साधारणपणानें रात्रीं ९ च्या सुमारास झाला. पण १०॥--१०॥। पर्यंत झाल्या प्रकाराबद्दल बहुधा ती चांगली शुद्धीवर आल्यावर तिला पश्चात्ताप झाला असावा. ती गौरीच्या चौरंगा-पुढें गेली. गुडगे टेकून नाक जमिनीवर घासून तिनें देवीची क्षमा मागितली, रडवी झाली, जमलेल्या मुली देखील खट्टू झाल्या होत्या. आजूबाजूस दुःखी कष्टी चेहेरे करून बसल्या होत्या. त्यांस तिनें एकत्र बोलावून "मीं चुकलें, असें करा-वयास नको होतें, तुम्ही आतां सगळें विसरा, आणि नीट खेळ खेळा, झिम्मा, फुगडचा वगैरे सर्व नीट खेळा, झालें तें सर्व विसरा." अशा अर्थाचें त्यांस सम-जावून सांगून तिनें त्यांस पुनः आनंदी करण्याचा, होण्याचा प्रयत्न केला. . . पण मुलींचा जो एकदां हिरमोड झाला तो झालाच. त्यास कोणाचाच कांहीं इलाज नव्हता !

या एका प्रकाराशिवाय दुसरा कोणताही गैर प्रकार घरीं कधीं घडला नाहीं. बापूकाका फार रागीट, तापट स्वभावाचे म्हणून प्रसिद्ध होते. थोडे फार केशव-सुतांप्रमाणेंच लेखनाची तंद्री लागली कीं जेवणखाण याचें भान राहत नसे त्यांस. आणि त्यांची लेखनाची वेळ पुष्कळवेळां रात्री ८ ते ९-९॥ क्वचित् १० सुद्धां अशी असे, आणि त्यानंतर जेवण ! त्यावेळीं कोणीही त्यांस "जेवावयास झालें

आहे पानें वाढावयाचीं काय ?" असें विचारण्याची सोय नसे. कोणी विचारलें तर ते असे कांहीं रागावून अंगावर येत कीं, विचारून सोय नाहीं. या गोष्टीची त्या माउलीला सवय होती, म्हणून ती इतरांस जेवू घालीत असे; आणि बापूकाकांचें जेवण झाल्यावर त्यांचे उष्टें खरकटें काढून झाल्यावर नंतर स्वतः जेवण करून झाकापाक, आवरासावर करी, चुकून कधींही आधीं जेवली नाहीं काकू . . तसेंच दुपारच्या जेवणास तिला सहजच १२॥-१ व्हावयाचा. यामुळें ती सकाळीं दोन वेळां चहा पीत असे. एकदां सर्वांचे बरोबर ७चे सुमारास आणि नंतर ९॥-१० च्या सुमारास ती स्वतः करितां चहा करून घेत असे.

तिला इंग्रजी सही करितां येत असे. तिचे आईचे वडील, डॉ, काणे, (मुंबई) यानीं तिला रुपये २०००च्या सरकारी प्रॉमिसरी नोटा दिलेल्या होत्या. त्यांचे सहामाही व्याज काढते वेळीं फॉर्म्सवर ती इंग्रजी सही करीत असे.

तिच्या अखेरच्या दिवशीं आम्ही सर्वजण शाळेंत गेल्यानंतर ती एकवेळ संडासांत जाऊन आली, आणि तिनें कशी तरी आंघोळ उरकली. मी २-२॥वाजतां मधल्या सुट्टींत घरीं आलो होतो, तो पुनः नेहमींसारखा थोडें खाऊन शाळेंत परत गेलों. त्यावेळीं काकू व काशीआत्याच घरांत होत्या. थोड्या वेळानें परसूतात्या आला, त्यावेळीं काकूनें आत्याबाईस 'मला बरें वाटत नाहीं आहे जरा, झोक जाईलसें वाटतें, धरा" असें कांहीं तरी म्हटलें. परसू तात्यानें समोरचे वझे मास्तर, पुढच्या आळीतील डॉ. गणपतराव सहस्त्रबुद्धे यांस आणलें. तिचे (काकूचे) भावांस डेक्कन कॉलेजांत कोणीतरी बोलावणें गेले. श्री. धुंडीराज वैद्य तिकडल्या तिकडेच Cantonment Magistrate च्या कोर्टांत सीतारामपंतांस बोलावणें गेले. ते खटला चालवीत असतांना सहज वळून त्यानीं मागें पाहिल्यावर त्यांस धुंडीराज जरा रडवा चेहरा करून उभा राहिलेला दिसल्यावर त्यानीं मॅजिस्ट्रेटांची परवानगी घेऊन त्यांस तेथें येण्याचें कारण विचारलें. त्यांनीं काकूचें जास्त आहे, तेव्हां शक्य तितक्या लौकर घरीं चला असें सांगितल्यावरून त्यानीं मॅजिस्ट्रेटांस विनंती केली, खटला तहकूब करून घेतला, आणि टांग्यानें घाईनें घरीं आले. . . पण त्या दोघांची शेवटीं गाठ पडली नाहींच, काकूचा प्राण आधींच तिचें शरीर सोडून गेला होता. . .!

रीतसर सर्व क्रिया झाल्या . . . त्यावेळीं डॉ. धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांचें महिला विद्यापीठ नुकतेंच निघत होतें. तेव्हां सीतारामपंतांनीं काकूचे नांवानें त्या विद्यापीठास रुपये १०१ ची देणगी दिली.

त्यांस कांहीं जणांचा पुनः विवाह करण्याचा आग्रह होत होता, क्वचित् कोणी आगाऊ न कळवतांच एखादी प्रौढ मुलगी एकदम पुढें आणून उभी करून

दाखवलेली होती असेंही ऐकलें होतें मी. पण त्यांनीं पुनः विवाह न करण्याचाच विचार केला, आणि तो जन्मभर पाळला. तसें म्हटलें तर जानकीकाकूच्या मृत्युचे समयीं त्यांचे वय ३९ वर्षांचें होतें; आणि त्यांनीं विवाह केला असता पुनः, तरी त्यांस हसण्याचें कांहींच कारण नव्हतें,त्या वयाचे पुष्कळ तरुण अशा अवस्थेंत पुनः विवाह करतात . . , फार लांब जावयास नको, मी स्वतःच ३९ वर्षांचा असतां विधुर झालों होतों. आणि नंतर दीडवर्षांनीं पहिलीं ४ लहान मुलें होतीं म्हणून माझे पहिले श्वशुर यांच्याच सांगण्यावरुन पुनः विवाह केला, एवढेंच काय पन्नाशी ओलांडलेले विधुरही पुनः चतुर्भुज होतात. अशा परिस्थितींत ते विधुरच राहिले पुढें जवळ जवळ ११ वर्षें, हें उल्लेखनीय आहे. यांत त्यांचें जानकीकाकूवरील प्रेमच दिसून येतें.

## सीतारामपंतांचा मित्रपरिवार

सीतारामपंत यांचा मित्र परिवार म्हटला तर दोन प्रकारचा होता. एक राजकीय क्षेत्रांतील मित्र व दुसरा प्रकार म्हणजे इतर मित्र राजकीय क्षेत्रांमधील मित्रांतही साहित्यिक व साहित्यिकांपेक्षां इतर असे भेद होवूं शकतील. पण अगदीं खरें सांगावयाचें तर त्यांस फारच थोडे खऱ्या अर्थाचे मित्र होते. बाकीचे सगळे ओळखीचे. आणि बहुधा दर मे-जूनमध्यें बृहन्महाराष्ट्रांतून बरीच साहित्यिक व अन्य पुढारी पुण्यास रहावयास येत असतात, तेहि एखादेवेळीं भेटून जात त्यांत नाना प्रकार असत. ... ... खरंच एक राहिलेंच. वकील मित्रांचाहि एक प्रकार होता.

प्रथम राजकीय क्षेत्रांतील मित्रांची हकीगत सांगतों. १९२० सालापर्यंत म्हणजे लो. टिळक यांच्या मृत्युपर्यंत या मित्रांत फाटाफूट नव्हती. म्हटलेंच तर एक श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर ( संदेशकार ) हे इतरांपासून बाजूस पडले. पण ते अगदीं १९२१–२२ पर्यंत मित्र राहिले होते. घरीं जेवावयासही आलेले आहेत.

लो. टिळकांचा जो एक राष्ट्रीय पक्ष म्हणून संबोधला जाई त्या पक्षांतील बहुतेक मंडळी, आणि विशेषतः पुण्यांतील मंडळी ही त्यांची मित्र म्हणता येईल. तात्यासाहेब केळकर, काकासाहेब (कृ. प्र.) खाडिलकर, अण्णासाहेब ( शि. म ) परांजपे, भाऊसाहेब (भा. ब.) भोपटकर, अण्णासाहेब (ल. ब.) भोपटकर,

बाबूराव (दा. वि.) गोखले, अॅक्चुअरी (ग. स.) मराठे, तात्यासाहेब (ज. स.) करंदीकर, वासुकाका जोशी (चित्रशाळा) ही सर्व मंडळी त्यांची मित्र होती. पण या सर्वांच्यात तसें मित्रत्व म्हटलें तर शेवटचे वासूकाका जोशी यांचेपाशींच होते. त्या सर्वांचें अधूनमधून घरीं जाणे येणें असे, परस्परांच्यामध्यें पण लो. टिळकांच्या मृत्युनंतरच्या काळात फेर, न.फेर असे पक्ष पडले, आणि या लोकांत दुफळी झाली. त्यामुळें तात्यासाहेब केळकरादि लोकांचा व त्यांचा राजकीय बेबनाव झाला ... पण अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, साधारणतः त्याच काळांत २।३ वेळां ते आजारी पडले होते. तेव्हां निरवानिरवीच्या गोष्टी करतांना (त्यांच्या मृत्युनंतर) मी तात्यासाहेबांकडे मदत मागावी, आणि ते निखालस उपयुक्त अशीच मदत देतील अशी खात्री सांगत ! त्यावेळीं इतर कोणाही दुसऱ्या मंडळीचें नांव निघत नसे, याचें मला फार आश्चर्य वाटे ! आणि मलाही तात्यासाहेबच फार जवळचे वाटत; कारण त्यांचा मुलगा य. न. उर्फ अण्णासाहेब व मी हे मी पुण्यात आल्यापासूनचे मित्र; शिवाय माझे वडील अण्णा (मोरो केशव) आणि तात्यासाहेब हे डेक्कन कॉलेजांत एकत्र होते, मित्र होते !

लो. टिळक यांच्या या राष्ट्रीय पक्षाचा एक शुक्रवार क्लब असे. दर शुक्रवारीं कोणातरी एकाकडे सभासदांनी सायंकाळी एकत्र जमावयाचें, सहनाववतु सहनौ भुनक्तु, सह वीर्यं करवावहै । तेजस्वी नावधीतमस्तु, मा विद्विषावहै ।। प्रमाणें सर्व कांहीं होतच होतें असे नाही. पण लोक एकत्र जमत, आणि खात पीतही. यामुळे या क्लबास कधी कधी विनोदाने खब्बू किंवा खाबू क्लब असेंही म्हणत. यांत वैद्य पंचानन कृष्णशास्त्री कवडे यांचें महत्त्वाचें नांव वर द्यावयाचे राहिले. ते त्यावेळी हाडापेरानें, ताकदीनें आणि त्यामुळें आहारात फार पक्के होते. तसे पाहिलें तर सर्वच मंडळी चांगली खाणारी होती. मटाराची उसळ, किंवा जरा तेलकट पदार्थ हे भाऊसाहेब भोपटकरांस जास्त प्रिय असत. शिवरामपंत परांजपे यांना चहांत किती साखर लागे याचा सामान्य माणसास अंदाजच लागला नसता. एका कपास कमींतकमी पाव कप साखर लागत असे त्यांस ! लो. टिळक हेही या क्लबांत येत असत. पण त्यांस अगोड चहा आणि त्यांत त्यांची खास साखर–सॅक्रीनच्या लहान गोळ्या, चपट्या मोजून एक किंवा दोन वड्या...अशा गम्मती असत. मंडळी जमली की हशा फार पिकत असे आणि ही क्लबची मजलस जवळजवळ दोन अडीच तास चालत असे! ... इतर वारीं बहुधा हीच मंडळी आप्पाबळवंताचे चौकापासून बुधवार चौकाकडे जाताना उजव्या बाजूस सरदार मोरोबादादा फडणीस (प्रसिद्ध नाना फडणीसांचें भाऊ ) यांचे वाड्यांतील वैद्य कवडे शास्त्री यांचे दवाखान्यांत, पण एका मोठ्या पडद्यापलीकडे एकत्र जमत, आणि थट्टा, विनोद, किंवा राजकीय चर्चाही करीत असे.

वर दिलेल्या नांवा व्यतिरिक्त आणखीही कांही नांवे आतां आठवलीं तीं अशीं – श्री. दत्तोपंत बेहरे, श्री. गणपतराव देवधर ( उगाशी विठोबा देवळाजवळचे) श्री. सदाशिवराव बापट (लो. टिळकांचे आठवणीकार), श्री. अंतु काका फडणीस (लो. टिळकांमागाहून तात्यासाहेब केळकराचे 'बॉडी गार्ड'), श्री. धोंडोपंत विद्वांस (लो. टिळकांचे भाचे), डॉ. गोपाळराव पळसुळे ( होमिओ पॅथिक डॉक्टर), श्री. यशवंतराव कुलकर्णी (श्री. नरसोबाचे देवळाचे) ही मंडळी देखील या क्लबचे सभासद होती. एखादा फोटोग्राफर ज्याप्रमाणें फोटो घेताना कांही मंडळींस खुर्चीवर बसवतो कांहींस मागे उभे रहावयास सांगतो कांहीच पुढेच बसवतो, त्याप्रमाणें आधी घेतलेली नांवें हीं समजा खुर्चीवर बसणारांची. आणि मागाहून घेतलेली नांवे ही समजा मागे उभे रहाणारे किंवा पुढे बसणाऱ्यांची.

मे–जून मध्यें भेटावयास येणारांत तात्यासाहेब (श्री. कृ. कोल्हटकर) श्री. नी. चाफेकर. सांगलीचे छापखाने, वऱ्हाडांतील लोकनायक श्री. अणे, बेळगांवचे नरकेसरी गंगाधरराव देशपांडे, विजापूरचे श्री. कौजलगी, हैद्राबादचे न्यायमूर्ति नामदार केशवराव, व श्री. राववेंद्र शर्मा. बार्शीचे टिळक वकील, आणि श्री. साने वकील, नागपूरचे श्री. ओगले, नारायणराव वैद्य, बुलढाण्याचे रावबहादूर दामले वकील, जुनागढचे म. म. जोशी, वऱ्हाडांतील डॉ. बाबासाहेब परांजपे, वीर वामनराव जोशी, नारायगराव बामणगांवकर, नागपूरचे कवि आनंदराव टेकाडे नागपूरचे श्री. धुंडीराजपंत ठेंगडी - - वगैरे किती एक लोक येत जात असत.

पुण्याचेच रावसाहेब गोविंदराव कानिटकर (सौ. काशीताई कानिटकरांचे यजमान) श्री. लक्ष्मण गणेश शास्त्री लेले हीं जोडी येत असे कधीं कधीं.

पण या सर्वांत दे. भ. अच्युत बळवंत कोल्हटकरांशीं त्यांचे विशेष सख्य असावें असें वाटें. ते ४।६ वेळां आमच्याकडे जेवावयास आलेले आठवतात. त्यांचेबरोबर आणखी २।३ मंडळी असत. आणि "साहेबां" चें व्यक्तिमत्त्वच असें कांहीं आकर्षक असे, पोषाख, सिंहाचे आयाळी सारखे केस, भरदार उंच देहयष्टि आणि विनोद, मोकळें तीन मजली हास्य - - सर्व कांही और असे. सीतारामपंतही त्याकाळांत मुंबईस गेल्यावर त्यांच्याकडे "संदेश" कचेरी, काळबादेवी रोड, वर क्वचित् उतरावयास जात असत. त्यांच्या इंग्रजी दैनिक "Message" मध्यें दर आठवड्यास २।३ कॉलमी मजकुराचे लेख विनामूल्य लिहून पाठवीत असत. या सर्व विशेष प्रेमाचें कारण ते डेक्कन महाविद्यालयांत समकालीन विद्यार्थी होते आणि परस्पर हुशारीचा परस्परांस अंदाज, आदर असावा.

संदर्भ सादृश्यामुळें पुढच्या काळांतील एक पत्र खालीं देतो. त्यावरून मला काय म्हणावयाचें आहे तें वाचकांस कळेल थोडें, पण त्याबद्दल स्पष्टीकरण देईन मागाहून. पत्र पहा–

The 'Nawa Kal' Office
388, Girgaum Road, Bombay.
१ मे १९२६
L. No. ५०१९

श्री. सीताराम केशव दामले यांस,
कृ. सा. न. वि. वि.

नवाकाळ पत्रावरील फौजदारी फिर्यादीचा निकाल कळलेलाच आहे. नुकसान भरपाईचा दुसरा दिवाणी दावा कोर्टात दाखल झाला असून त्याच्या तजविजीला एव्हांपासून लागणें अवश्य आहे. या संबंधाचा विचार करीत असतां पगारी लेखक व बातमीदार कमी करणें योग्य, असें ठरलें. अर्थात् ही गोष्ट अत्यंत दिलगिरीनें करावी लागत आहे. वरील विचारास अनुसरून आपण यापुढें नवाकाळ पत्राकरितां लेख पाठविण्याचें बंद करावें, असें रा. रा. कृ. प्र. खाडिलकर यांच्या सांगण्यावरून आपणांस कळविण्यासाठीं हें पत्र लिहीत आहे. आजपर्यंतचें नातें सुटल्यावरहि पूर्वीप्रमाणेंच आपणांस लेख लिहावयाचे असल्यास त्यांचें स्वागत नवाकाळ पत्रांत जरूर होईल, नाईलाजानें कराव्या लागत असलेल्या गोष्टीबद्दल आपण कोणत्याही प्रकारची शंका अगर विकल्प मनांत येऊ देणार नाहीं, असा भरवंसा आहे. नवाकाळ पत्राला पुन्हां चांगले दिवस येतील. आज बंद कराव्या लागत असलेल्या उपक्रमाचा अनुकूल विचार खचित होईल, असेंहि रा. खाडिलकर यांनीं कळविण्यास सांगितलें आहे.

कळावें, लोभ करावा ही विनंती.
आपला
न. र. फाटक
दुय्यम संपादक

या पत्रावरून श्री. काकासाहेब खाडिलकर व सीतारामपंत यांचे स्नेहाचे संबंध कसे होते तें कळेल. "नवाकाळ" पत्रांत दर आठवड्याला ४।५ कॉलम मजकूर सीतारामपंत पुण्याहून लिहून पाठवीत असत, आणि तो सर्व जसाच्या तसा छापला जाई. त्या प्रीत्यर्थ त्यांस श्री. खाडिलकर दरमहा रुपये तीस फक्त देत असत नियमितपणानें. हा क्रम हें पत्र येण्यापूर्वी जवळ जवळ २।३ वर्षे १९२३ पासून, चालू होता. या वेळीं सीतारामपंतांस दुसरा कोणताच अर्थार्जनाचा व्यवसाय नव्हता. पण Messageचे वेळीं ते वकीलीचा व्यवसाय करीत असत, आणि म्हणून हौसेनें व मोफतच त्यांनीं श्री. अच्युतरावांस मदत केली.

-मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ................ दि: ..............
क्रमांक ................ नों दि: ..........

दे. भ. काकासाहेब खाडिलकर आणि सीतारामपंत यांच्या परस्पर स्नेह-संबंधाबद्दल काकासाहेबांच्या चरित्रांत (लेखक त्यांचे पुतण्ये श्री. काशिनाथ हरी खाडिलकर) कांहीं माहिती मिळते. ती पाहण्यासारखी आहे.—

पृष्ठ १०४ वर पहा– "राष्ट्रमत दैनिक सुरूं करण्याच्या कामी काका-साहेबांचे विशेष स्नेही– सीतारामपंत दामले, गंगाधरराव देशपांडे, वीर वामनराव जोशी वगैरे – मंडळी प्रमुख होती. त्यांचे सांगली हायस्कुलांतील गुरु बापू सरदेसाई हे व्यवस्थापक होते. सीतारामपंत दामले पहिले संपादक झाले. दैनिकाची व्यवस्था मुंबईस उत्तम तऱ्हेनें केली गेली... लोकमान्य टिळकांच्या हातांनीं "राष्ट्रमत" हीं पहिलीं अक्षरें जुळविण्याचा समारंभ करून मोठ्या धडाक्यानें दैनिक सुरुं झालें..."

पृष्ठ २०८ वर [ "लोकमान्य" दैनिकाची (१९२१ साल) माहिती थोडी दिल्यानंतर ] ते लिहितात– "याच सुमारास याच कारणासाठीं– (महात्माजींच्या असहकारितेच्या विचारांच्या प्रसारासाठीं) पुण्यास दे. भ. शिवरामपंत परांजपे यांनीं 'स्वराज्य' व श्री. सीतारामपंत दामले यांनीं "राजकारण" अशी साप्ता-हिकें चालू केलीं..." यांत चूक आहे. ती म्हणजे 'राजकारण' पत्र १९१८ च्या छत्रपति शिवाजी महाराजांच्या जन्मदिनीं म्हणजे त्यावेळीं माहीत असलेल्या अक्षय्य तृतीया या दिनीं मे महिन्यांत सुरूं झालें. प्रथम म्हणजे लो. टिळक यांच्या हयातींत तें टिळक पक्षीय वृत्तपत्र होतें. नंतर, किंवा महात्माजींची असहकारितेची चळवळ सुरू झाल्यानंतर हळुहळू पण लो. टिळक यांच्या हयातींत देखील तें पत्र असहकारिता तत्त्वाचें पुरस्कार करणारें बनत चाललें होते. पुढे म्हणजे लो. टिळक यांच्या मृत्यूनंतर तें सपूर्णपणानें असहकारितावादी झालें.

पृष्ठ २२० वर पहा "१९२२ च्या ऑक्टोबरमध्यें विरारच्या निवडणुकीच्या सभेंत नाफेर पक्षानें बहुमतानें निवडणुका जिंकल्या. विरारची ही सभा फार गाजली. पुण्याहून शिवरामपंत, वासुकाका (चित्रशाळेचे जोशी)... सीतारामपंत मंडळी उपस्थित होती..." यांत महिना चुकत आहे खास. कारण या मंडळींची (मुळशी सत्याग्रहामुळें तुरुंगांत होते हे) सुटका ७ नोव्हेंबर १९२२ रोजीं झाली.

पृष्ठ २२१ वर ते लिहितात– "सभा संपल्यावर पहिल्याच गाडीनें शिव-रामपंत परांजपे, सीतारामपंत दामले ..वगैरे मंडळी विरारहून मुंबईस लोकमान्य ऑफिसांत आली.

पत्र छपाई सुरु करण्यास फारच थोडा अवधि होता. अशा स्थितींत सभेहून परत आलेल्या मंडळीपैकीं, सीतारामपंत दामले यांनी विरारच्या सभेची अत्यंत

उत्साहवर्धक व प्रक्षोभक हकीगत अत्यंत द्रुतगतीनें जसजशी सांगितली तसतशी तीं लगेच जलदीने कंपोज केली गेली. अशा रीतीनें सुमारें दहा कॉलम मजकूराची मधलीं पानें विरारच्या हकीगतीनेंच नटून "लोकमान्य" पत्र दुसरे दिवशीं सकाळींच लोकांच्या हातांत पडलें - - -

पृ. २८६ व २८७ वर "संपादन पद्धतीचीं वैशिष्टचें" या मथळयाखालीं बरीच माहिती आहे. अनेक प्रख्यात संपादकांची नांवे, व त्यांची वैशिष्टचें दाखल केलीं आहेत. त्या संदर्भांत ते लिहितात :-

"विषय कोणत्या वर्गासाठीं लिहावयाचा त्या वाचक वर्गाच्या ज्ञानाची उंची विचारांत घेऊन त्याचें लेखन केलें पाहिजे अशी त्यांची (खाडीलकरांची) शिकवण होती. आपणांस या जनतेला जागृत करून, स्वहितासाठीं दक्ष बनवावयाची आहे, यावर लक्ष ठेवून लेखकानें आपल्या विषयाची मांडणी व प्रस्ताव सोप्या व जोरदार भाषेंत केला पाहिजे असा त्यांचा विचार असे. १९०८ सालीं सीतारामपंत दामले यांच्या संपादकत्वाखालीं राष्ट्रीय मंडळींनी काढलेलें "राष्ट्रमत" दैनिक व त्यानंतरच्या काळांत निघालेल्या साप्ताहिक व दैनिक पत्रांतील बऱ्याच संपादकांनीं याच काकांनीं अंगिकारलेल्या पद्धतीचें अनुकरण व स्वीकार केला आहे."

आतां सीतारामपंत यांच्या डायऱ्यांमध्यें खाडिलकरांबद्दलचे दोनच उल्लेख देऊन हा भाग पूर्ण करूं. दि. १३ जानेवारी २५ रोजीं ते लिहितात :-

"Saw Khadilkar in B'bay yesterday. His paper does not seem to be very successful on the financial side. Very heavy competition with Times selling for one anna.

याच साल अखेरच्या तेरीज वगैरे कागदांवर ते लिहितात. "Wrote to Khadilkar suggesting to him the line of defence in his defamation case and telling him that I am prepared to go to B'bay to assist him in his defence if he thinks my help is likely to be of some use to him"

ज्या खटल्याबद्दल सीतारामपंत उल्लेख करतात त्या खटल्याची तारीख काकासाहेब यांचे चरित्रकार देत नाहींत, पण २४८-४९ पृष्ठावर अब्रूनुकसानीच्या खटल्याची हकीगत देतात. सोलापूरच्या डी. एस्. पी. नी, मि. डंकन मॅडोनल्ड यांनी, हा खटला भरला होता

चित्रशाळेच्या श्री. वासूकाका जोशी यांच्या व सीतारामपंत यांच्या मैत्रीचे संबंधांत प्रख्यात संस्कृत सुभाषित–" उत्सवे, व्यसने चैव, दुर्भिक्षे–शत्रुविग्रहे। राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः॥" हें जवळ जवळ पूर्णपणें लागू पडते. त्यांच्या चित्रमय जगत् मासिकाच्या जवळ जवळ सुरुवातीच्या काळापासून तों अगदीं सीतारामपंत मरण पावले त्या ऑक्टोबर १९२७ या महिन्यापर्यंत त्या मासिकाचे लेखक म्हणून त्यांचा संबंध टिकला. ज्या अंकांत, (नोव्हेंबरचे सुरुवातीचा अंक) त्यांचेबद्दलचा मृत्युलेख चित्रमयजगत्मध्यें छापून आला, त्याच अंकांत त्यांनीं लिहिलेला महाबळेश्वर वर्णनाचा लेख व कांहीं छायाचित्रेंही छापून आलीं! सीतारामपंत यांच्या उत्कृष्ट अशा दोन कादंबऱ्या "जग हें त्रिविध आहे" व "न्याय कीं अन्याय" या प्रत्येकीं एक एक वर्षभर त्या मासिकांत क्रमशः प्रसिद्ध होत होत्या. पहिल्या महायुद्धाचे काळांत कांहीं प्रासंगिक विषय उदा "नीत्च्छे व त्याचें तत्त्वज्ञान", "सर फेरोजशहा मेहता" यांचे वरचा मृत्युलेख वगैरे सोडले तर बहुधा "महायुद्धाचीं स्थित्यंतरें" या मथळ्याखाली त्यांचे लेख दर महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध होत असत मुळशीच्या प्रख्यात सत्याग्रहांत ६ महिन्यांचा कारावास दोघांनीं एकदमच भोगला. माझी धाकटी बहीण शशिकला हिच्या विवाहाकरितां जुन्या मुरलीधराजवळचा आजचा टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा वाडा ( हा एकेकाळीं भूताचा वाडा या नांवानें प्रसिद्ध होता; व तो चित्रशाळेच्या ताब्यांत होता ) श्री. वासूकाकांकडून मोफत ४।५ दिवस वापर करावयास मिळाला, त्यांचे आजारांत व शेवटच्या आजारांत मुळशी सत्याग्रही डॉ. व्ही. डी. फाटक यांचे औषध सुरू करण्यापासून तों अखेर मृत्युनंतर त्यांस स्मशानांत नेण्याची तयारी करण्यापर्यंत त्यांस तेथें पोचवीपर्यंत सर्व व्यवस्था पाहण्यांत श्री. वासूकाकांचा मोठा हात होता. तेव्हां वर उधृत केलेलें सुभाषित त्या दोघांच्या मैत्रीस अगदीं अक्षरशः लागू पडतें!

आतां वकील मित्रांबद्दल माहिती पाहू, ते मुख्यतः फौजदारी काम करीत. म्हणून खडकावरच्या सिटी मॅजिस्ट्रेट कोर्टांतील वकील वर्गांत त्यांची मित्रमंडळी होती त्यामध्यें भाऊसाहेब भोपटकर हे या दृष्टीनेंही त्यांचे मित्र होते. पण रावबहादुर लक्ष्मणराव आपटे, अॅडव्होकेट गडकरी, श्री. नानासाहेब भडभडे. श्री. कर्वे (पी. बी.), श्री. दंडवते वकील आणि एक मुखत्यार गोखले नांवाचे एक वृद्ध पण फारसें काम नसणारे वकील (त्यांस घोड्यांच्या शर्यतीचा नाद होता, व त्यांत त्यांनी बराच पैसा गमावलेला होता.) ही होते. दिवाणीकडील वकीलांत त्यांची मैत्री नसे, पण त्यांचें तोंडून तात्यासाहेब गोखले, अण्णासाहेब भोपटकर, श्री. भालेराव. श्री. वाकनीस, अशीं नांवें येत असत. श्री. कर्वे हे जरी एल. एल. बी. नव्हते तरी फार हुषार असत. त्यांनीं पैसाही पुष्कळ मिळवला होता

असें सांगतात. पक्षकारांस खालीं अंगणांतच उभे करून माडीवरून खिडकींतूनच ते त्यांच्याशी बातचीत करीत. जुन्या पद्धतीप्रमाणें पगडी, कोट, उपरणें, पुणेरी जोडा हा त्यांचा पोषाख असेच. पण ते हातांत चांगलीं जाड सोन्याचीं सलकडीं, कानांत बिकबाळी घालीत असत. पक्षकारांस वाटेल तशी फी सांगत; आणि परवडत नसेल तर जा " म्हणून धुडकावून लावींत. कोणी त्यांस दुसऱ्या कोणाकडे खात्रीच्या वकीलांकडे पाठवा अशी विनंती केल्यास ते कांही अशीलांस सीतारामपंतांकडे पाठवींत असत, त्यांचें घर होतें निंबाळकर तालिमीपासून मंडईकडे जातांना शे दीडशें फूट, पण विरुद्ध बाजूस, चौक ओलांडल्यावर; आणि आमचें घर होतें, निंबाळकर तालिमीच्या बाजूला पण शिवाजी मंदीराच्या दिशेला दोन तीन घरें सोडून.

वकील मंडळींचाही एक क्लब असे. जेवणें होत अधून मधून व पाळीपाळीनें एकाएकाकडे. रावबहादुर आपटे व सीतारामपंत हे बरेच वेळां विरुद्ध, पक्षाचे, समोरासमोर खटला चालविणारे वकील असत. इंदापूरच्या कोणा मोठ्या व्यापाऱ्यांवर एक खटला होता. दोघे दोन पक्षांचे वकील पुण्याहून रात्रीचे गाडीनें पोमलवाडीस उतरत. भीमा नदी ओलांडून टांग्यातून दहा बारा मैलांचा प्रवास करीत बरोबरच, आणि कोर्टांत भांडत विरुद्ध विरुद्ध बाजूनें! हा काळ होता १९१७-१८ मधला.

पूर्वी सांगितलेले मुखत्यार गोखले हे अधूनमधून कोर्टांतून टांग्यातूनच सीतारामपंताबरोबर घरीं येत. ते त्यांस " अरे, तुरे " च करीत, अर्थात् ते चहा घेतल्याशिवाय आणि विडी ओढल्याशिवाय जात नसत. पण चहा दिल्यावर बहुधा " लाल रे लाल, आणखी दूध आण थोडें? " असें म्हणावयाचेच! अशी एक वल्ली होती ती...

इतर मित्रांपैकीं पुण्यांतील बुधवार पेठेंतील बालाजीचे देवळासमोर घर असलेले, गोविंद चिंतामण भट वकील यांचे एक बंधू (लौकरच वारले होते), श्री. अच्युत चिंतामण भट व वारले होते म्हणून सांगितले ते, अशा तीन बंधू पैकीं वारलेले श्री. भट हे सीतारामपंतांचें मित्र होते. ते बहुधा १९१३ पूर्वींच, मी पुण्यास येण्यापूर्वीच निवर्तले होते. त्याच प्रमाणें बहुधा तुळशीबागेच्या बोळांतील एक उप-बोळ गोंदणीचा बोळ, श्री. आबासाहेब गोखले, उत्तमराव गोखले, आणि त्यांचेच एक भाऊ हे कुटुंबच सीतारामपंतांच्या ओळखीचें होते, पण वर नांव दिलेले एक बंधू हे त्यांचे विशेष मित्र होते आणि त्यांचाच मुलगा बहुधा दत्तू हा पुढें माझे बरोबर नू. म. विद्यालयांत मॅट्रिकपर्यंत होता. पण याच कुटुंबात एक लहान मुलगा झाला होता त्यास सीतारामपंतांनीं दिलेलें नांवच व्यवहारांत जन्मभर प्रचलित राहिलें. तें म्हणजे ' टोग्या ' गोखले. हे नांव रूसो जपानी युद्धांतील

जपानी सेनापति जनरल 'टोगो' व हें मूल यांचेंमध्यें कांहीतरीं साम्य सीतारामपंतास वाटलें असेल, म्हणून त्यांनी तें सुचवलें, व तेंच प्रचलित झालें. पण या 'टोग्या' गोखलेचें दुसरें कांहीं तरी नांव असावें...

आतां ज्या त्यांच्या मित्रांशी त्यांचा जरा जास्त घनिष्ठ संबंध होता त्या दोन मित्रांची हकीकत देतो. पहिले श्री. चिंतामणराव किंवा बँकवाले घारपुरे होत. हीं त्यांची मैत्री पुष्कळशी एकतर्फीच असावी. श्री. चिंतामणराव थोडे ठेंगणें, पण पाणीदार व्यक्तिमत्व असलेले गृहस्थ असत. तुळशीबागेच्या बोळांत एक मोठें भव्य दार, पुढें आंगण, आंत बंगलें वजा घर असें त्यांचे घर होतें. त्यांचे मृत्यूनंतर तें घर कापडवाले परांजपे या मुंबईच्या एका व्यापाऱ्यांनी घेऊन तेथें त्यांचे दुकान होतें, साधारणपणाने ३० सालापर्यंत. पुढचें माहीत नाही. श्री. घारपुरे बहुधा आठड्यांतून २–३ वेळां निदान दोन वेळां सकाळी फिरून घरीं परत जातांना आमचेकडे येत, गप्पा मारीत चहा घेत व घरीं जात. यांच्या मध्यस्तीनेंच माझी बहीण शशिकला हिचा विवाह रानडे काँट्रॅक्टरांचेकडे ठरला. पण सीतारामपंत त्यांचेकडे केव्हां व कितीवेळां जात तें माहीत नाहीं. म्हणूनच मी वर म्हटलें कीं ही मैत्री एकतर्फी होती. या घारपुरे यांचेच चिरंजीव डॉ. बंडोपंत,(के. सी.)घारपुरे आणि हे पुण्यांत जवळजवळ १९३५ पासून नामांकित सर्जन म्हणून प्रख्यात झाले. त्यांचें हॉस्पिटल शनवार वाड्याजवळ आहे. आंता आतांपर्यंत ही त्यांची कीर्ति नामांकित सर्जन म्हणून चालू आहेच.

पूर्वी एकदां उल्लेख केलेले श्री. आबासाहेब गोखले ( गोंदणीच्यां बोळांत घर असलेले) यांचे धंद्यातील जोडीदार श्री. कृष्णराव गोपाळराव टोकेकर म्हणून एक देशस्थ सद्गृहस्थ होते. त्यांचा व श्री. गोखले यांचा पातीदारींत फर्निचरचा धंदा होता. मॅट्रिकच्या परीक्षेचे वेळीं विद्यार्थ्यांकरितां मांडव घालणें, त्यांचे करितां डेस्कें व खुर्च्या किंवा टेबले देणें वगैरे कंत्राटें तें करीत असत त्यांचा धंदा कांहीं काळ चांगला चालला. पुढें १९१९–२०चे सुमारास त्यांची पाती मोडली. त्यानंतर श्री. टोकेकर मुख्यतः फलज्योतिष सांगण्याचा धंदा करीत. ते बोलण्यांत फार मिठ्ठास गृहस्थ व एकंदर चलाख होते. मला वाटते ते Free Mason ही होते. त्यांचेमुळें सीतारामपंतांच्या बऱ्याच ओळखी झालेल्या होत्या. त्यावेळच्या Imperial Bank of India च्या सार्वजनिक सभेच्या हॉल शेजारीं (शुक्रवार पेठ) जी नवी शाखा गावांत उघडली गेली त्या शाखेचे एजंट श्री. रामराव तळपदे, श्री. गोपाळराव कसबेकर वगैरे स्नेह्यांची नांवें आठवतात. पैकीं श्री. तळपदे यांची व माझी ही पुढें ओळख झाली होती, थोडी, माझें खाते त्या बँकेत उघडलें तेव्हां. श्री. टोकेकर यांचे बद्दल पुढें आमचें घर बांधणें या विषयींचें जें एक स्वतंत्र प्रकरण लिहीन त्यात जास्त लिहीन.

श्री. टोकेकर यांचा १९१५–१६ चे सुमारास श्री. करुणश प्रासादिक संगीत नाटक मंडळीशीं कांही मालकी संबंध होता. त्या कंपनीं करितां सीतारामपंतांनी एखादें नाटक लिहावें अशी कल्पना होती. नट वर्गाचा परिचय त्यांची गाण्याची कुवत वगैरे कळावी म्हणून सीतारामपंतानी त्या कंपनीचीं कांहीं नाटकें पाहिलेलीं होती. आणि त्यांचे बरोबर मी सौभद्र, रामराज्य वियोगाचे कांही अंक आणि नारायणराव पेशव्यांचे मृत्यूचा फार्स असा एक संयुक्त प्रयाग मी पाहिल्याचें आठवतें. त्या कंपनीत एक तोफखाने नावाचे संगीत नट होतें, आणि आणखी २।३ चांगले नट होते. नांवें आठवत नाहींत. कोणीतरी श्री. गोखले. मराठे वगैरे मंडळी होती असें वाटते, पण खात्री देत नाहीं. पेशव्यांचे मृत्यूचे फार्समध्यें सुमेरसिंग गारदी याचें काम कोणीतरी एक प्रख्यात नट करीत असत. त्यांची त्या कामाबद्दल विशेष कीर्ति होती. या कंपनीकरितां सीतारामपंतांनीं दीड दोन महिन्यांत ‘ संगीत कलहप्रभाव ’ किंवा ययाति–शर्मिष्ठा देवयाची आख्यान घेतलें होतें. नाटकांत सुमारें ४०–४५ पदें ही योग्य ठिकाणीं घातलेलीं होतीं... पण त नाटककार म्हणून जगास माहीत व्हावयाचे नव्हते. नाटक चांगले आहे. आज पद्यांसह माझे-कडे माझ्याच हस्ताक्षरांत उतरवून काढलेलें आहे. आणि अधून मधून १९३५ ते ४०–४२ सालपर्यंत माझ्या मनांत तें छापावें अशी कल्पना येई. पण तो नाट-कांचा पडता काळ होता, आतां पुन: नाटकांस बरा काळ असला तरी पौराणिक नाटकांस कोण विचारतो आज? श्री. टोकेकरांच्या मैत्रीमुळें नाटककार होण्याची संधी सीतारामपंतास मिळालेली होती. नाटकाच्या तालिमी ही सुरू होत्या, पण एकाएकीं पैशांच्या-उत्पन्नांच्या-अभावी कंपनी बुडाली आणि नाटककार होण्याची दामल्यांची संधि ही नष्ट झाली!

१९१६ च्या मे महिन्यांत श्री. शंकरराव मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या नाट्य संमेलनांत प्रख्यात आंग्ल कवि शेक्सपीयर त्रिशत सांवत्सरिक उत्सव साजरा करण्यासंबंधी कांहीं चर्चा झाली. त्यावेळीं झालेल्या भाषणांत सीतारामपंतांनी चांगलें भाषण केलें होतें अशी माहिती “ मराठीं नाट्य परिषद, इतिहास व कार्य ” या ग्रंथाचे पृ ५७ वर आहे.

येरवडा जेलमधील ओळख झालेल्या किंवा थोडी फार मैत्री झालेल्यांची ओळख सीतारामपंतांची त्यांच्या “ तुरुंगाच्या कोठडीतून ” या पुस्तकांत दिलेली आहे. त्यानंतरच्या ५।६ महिन्यांत म्हणजे १९२३ च्या पहिल्या अर्धभागांत मुंबईचे श्रीमान व्यापारी शेठ मनमोहनदास रामजी यांचे जावयी शेठ तापीदास सववी यांची गणना होईल. १९२३ च्या मे मध्यें या कुटुंबाबरोबर ते आपली पुतणी रत्नप्रभा हिला घेऊन सिंहगड येथे २।४ दिवस रहावयास गेले होते. पण

पुढें या संघवी शेठ यांचा व सीतारामपंत यांचा फारसा संबंध आलेला आठवत नाहीं.

याच काळांत १९२३ मध्ये सीतारामपंतांची एका तरुण मुलाची १५-१६ वर्षांच्या मुलाची ओळख झाली, दोस्ती झाली ! हा तरुण त्यावेळीं राम गोखले होता. आमच्या घराचे शेजारींच त्यांचीं मोकळी जागा. एक चिंचोळी २२ फुटांची पट्टी होती तेथें तो आपल्या लहान बहिणीस खेळवावयास आणीत असे. आजूबाजूंच्या कवठी, जांभळी, आदि झाडांवर चढत असे, संस्कृत श्लोक पाठ म्हणत असे, पुष्कळ ........आणि त्याच काळांत गोखले घराण्याचा इतिहास हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यामुळें पेशव्यांचे सेनापति " बापू गोखले " यांचे ध्येय तरुणांनीं ठेवावें, " तूं बापू गोखल्यांप्रमाणें बन " असें कांहीं गम्मतीनें सीतारामपंत रामला सांगत असत... .....आणि या त्यांच्या एका प्रकारें एक तरुण मुलगा, केवळ मॅट्रिकच्या वर्गातील विद्यार्थी, आणि एक मोठे विद्वान, राजकीय पुढारी, अशा असमान व्यक्तींच्या मैत्रीचें मला, माझी बहीण, रत्नप्रभा व माझे चुलत बंधु परशुरामपंत यांस आश्चर्य वाटे ! ......पण खरी वस्तुस्थिती होती ती ही अशी होती. कांहीं वर्षांनंतर " राम " ची व आम्हां मुलांची ही ओळख झाली. मैत्री झाली, तो भाग निराळा.........

आणि १५ ऑक्टोबर १९२७ या दिवशीं सीतारामपंतांच्या स्मशान यात्रेस रामला हजर राहतां आले नाहीं. त्यांची स्मशान यात्रा एकाप्रकारें अगदीं गुपचूपपणानें निघाली, त्यांचें देहावसानही अगदीं एकाएकीं झाल्यामुळें आणि त्यांचे लोकप्रियतेबद्दल त्यावेळच्या त्यांच्या मित्रांच्या मनांतील संशयामुळें...... पण यामुळें " राम " माझ्यावर फार रागावला. पण माझी त्यास ही गोष्ट कळवण्यांतली अडचण त्यानें जाणली, व आपल्या मनांतला राग त्यानें गिळून टाकला.......पण तिसऱ्या दिवशीं ज्यावेळीं स्मशानभूमींतील रक्षा नदीच्या पात्रांत भरून टाकावयाचीं, व अस्थि गोळा करावयाच्या होत्या, त्यावेळीं हें कार्य रामनें स्वहस्तें सर्व केलें; आणि मला या कामीं अजीबात हात लावूं दिला नाहीं! ......असें हें विलक्षण मित्रत्व होतें आणि हें पाहून मनांत येते,

राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः ।

हा " राम "च आतां साठीजवळ आला आहे. बडोद्याच्या प्रख्यात Alembic Works Co. Ltd. या कपनींत सुमारे ३८।३९ वर्षे काम आज करून नागपुरांत यांनीं व यांचे कुटुंबानें आतां चांगला नांवलौकिक कमावला आहे. पैसाही थोडा फार मिळवून जीवन यशस्वी केलें आहे.

सीतारामपंत यांच्या कांहीं डायऱ्या उपलब्ध आहेत. श्री. मुळे यांचे दुकानीं सायंकाळीं गेलों होतो, भेटले, वगैरे एका विषयाचे संबंधांत महत्त्वाचे उल्लेख आहेत ते देतों.

२७ एप्रिल १९२७

In the evening went out early. Shankarrao Mule is arranging a Shiwaji Birthday Celebration for the 3rd May in Budhawar Chowk.

३, मे १९२७

Shiwaji Utsav a poor affair. I spoke for 15 minutes. It was a sorry show.

**अन्य महत्त्वाचें मित्रविषयक उल्लेख खालीं देतों :-**

२ मे १९२७

Dadasaheb Karandikar met me at Muley's shop soon after he got down from a motor lorry. The old fellow is wonderfully active for his age.

( सातारचे प्रख्यात वकील व लो. टिळक यांचें मित्र दादासाहेब करंदीकरांबद्दलचा हा उल्लेख आहे. )

११ मे १९२७

In the evening at Mulay's shop met K. K. Gokhale of Jat. He is a broken down sort of man and he has lost his power of speech owing to some affection of throat nerves. Dr. V. B. Gokhale has cut a hole and fixed a tube through. He can breathe. He is in such a condition for one year.

३० एप्रिल १९२७

In the evening went to V. V. Bhide on a condolence visit. His wife died after a prolonged illness lasting over months. It is over a month since she died. Old man, he is now left alone with his grown up and unemployed son and daughter.

२० एप्रिल १९२७.

Old friend D. A. Tuljapurkar came in the evening and gave me a copy of his new book माझें रामायण which is a big vol. of 600 pps.

१५ एप्रिल १९२७

Kept strolling about Tilak Road, met Bhaskarbhau Bhopatkar who said result of H. C. Pleaders' examination was out, only 36 passing out of 400; and 100 are disqualified for one year. High Court wants to gradually suppress that superfluous examination. N. C. Kelkar's son has passed the examination.

२९ मे १९२७

I read of Prof. G. S. Bhate's death in the papers. He was a junior contemporary of mine at College and was son of Abasaheb Bhate pleader of Belgaum. He was a handsome and physically well developed man, but intellectually was of mediocre calibre. but was very ambitious. He failed in the I. C. S. as he was bound to do. Then, came out as a mere M. A. of Edin. He was red-hot reformer and married a widow from Karve's Ashram; was in Baroda service, then went to Patna as Prof. of English. He died of heart failure at Lonavala.

श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे संबंधांत पुष्कळ उल्लेख आहेत. ते ' खान–कु. मालिनी पाणंदीकर ' विवाहाचे संबंधांत आहेत. हा विवाह त्यावेळीं फार गाजला ही थोडी सामाजिक महत्वाची व ऐतिहासिक घटना आहे, म्हणून त्या संबधांत व कोल्हटकरांचे संबंधांतील बरेच उतारे पहा-

३ जून १९२७

Masurekar came at 6-30 p. m. and told me that a grand daughter of Dr. R. G. Bhandarkar-Miss Panandikar M. A. who is a teacher in Huzur Paga is to marry one Mr. Khan a Mohammedan under the

Special marriage Act tomorrow. He consulted me as to whether there was any legal remedy to prevent the marriage. I told him there was none as the bride was above 21. It is certainly very strange that she should have chosen a Mohammedan. He is a Prof. in Deccan College and B. A. B. T. But such things must occur in these days of individual liberty, and one must not be shocked by them. One wonders how, old Dr. Bhandarkar would have liked the doings of his grandchildren.

१९ जून १९२७

The papers say that Mr. Khan whom Miss Panandikar wants to marry under the Civil Marriage Act is a married man. Then how could he have made a declaration that he had no wife living? Perhaps he has a divorced wife. So there is a hitch in the proposed marriage.

Khan Panandikars' projected marriage is creating a great stir in journalistic writings. अच्युतराव has written 5 or 7 articles in his usual vein dissuading the girl from her ill-advised project. Of course she is not a woman to care for any one.

२१ जून १९२७

In the evening met अच्युतराव कोल्हटकर at Muley's shop. He has come here in connection with the पाणदीकर marriage tangle. He says the lady is kept in hiding by Khan. She was returning with him from Ooty and on her way back she was spirited away, and her whereabouts are not known. So an application to a criminal Court for a search warrant is thought of. I have asked him to come to me tomorrow morning, and we have to see if by engaging Gadkari, we can do something. Khan is also said to have a wife living

Perhaps Miss Panandikar is converted to Islam and a Nikka already performed. If so, the woman is lost to Hinduism and her father's family. She is also said to have a property worth Rs. 20,000. The girl has brought shame and disgrace on the Hidu community, on Bhandarkar's family, and higher female education. She is purposely keeping in hiding. Achyutrao Kolhatkar did not turn up as there was no use in doing so.

२६ जून १९२७

The news of Khan--Panadikar marriage having been registered yesterday is published in the papers. Dr. Ketkar's wife शीलवती केतकर and two Mohammedan gentlemen were present as witnesses. It was registered in Khan's house in Shukrawar Peth.

२८ जून १९२७

Kesari disposed of the खान-पाणंदीकर marriage in 20 lines. That is the most sensible view to take, of the incident.

१३ डिसेंबर १९२४

Some effort is being made to give to Congress delegates going to Belgaum from Northern India, some sort of reception and refreshments at Poona Railway station. N C. K. (Kelkar) called the meeting at the Municipal Hall, but only 20 gentlemen attended. However every one liked the idea, and about Rs. 250/- were promised on the spot. In all about Rs. 3000 are wanted which may be collected within next week. I have promised to give Rs. 10/-

१९ डिसेंबर १९२४

Good reception accorded to Mahatmaji & party. I had long talk with Dr. Kitchlew. Pandit Madan

Mohan and Mr. Natrajan as each had to wait at the station for over two or three hours. On the whole our reception arrangements have been appreciated and taken advantage of by over 1500 delegates and visitors going to Belgaum. Achyutrao Kolhatkar also was among these going to Belgaum. He is going to issue his चाबूक as a daily there for a week. Met at the station मुंजे, अभ्यंकर, अणे, ओगले & others.

मुळशी सत्याग्रहांत भाग घेतलेल्या शेट तापीदास संघवी यांची व सीतारामपंतांची मैत्री थोड्या काळचीच. शेठ तापीदास यांचे मृत्यूचा उल्लेख दि. ५ मार्च १९२४ रोजीं त्यांनीं खालील शब्दांत केलेला आहे.

Poor Tapidas Sanghavi is dead. He was so well and healthy. He had only two days' fever here. When he went to Bombay he was free from fever. But he again got fever and died in some hospital. three days back. Poor soul! His life was total failure. I learnt of his death from बाळूकाका.

इतिहासकार प्रसिद्ध बि का. राजवाडे हे त्यांचे मित्र म्हणतां येणार नाहींत; पण चांगले ओळखीचे होते. त्यांचे मृत्युनंतर दि. ३१ डिसेंबर १९२६ रोजीं ते लिहितातः–" विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, सुप्रसिद्ध इतिहास संशोधक काल रोजीं धुळें येथें वारले. उकिरड्यावर हिरा पडावा त्याप्रमाणें सध्यांच्या महाराष्ट्रांत हा हिरा पडला होता.

He was a great and original thinker and gigantic worker in the field he had chosen for his labours. A really great savant."

या सर्वांपेक्षां निराळें एक गुजराथी नांव आहे, श्री. हरीलाल एम्. भट्ट. यांनीं सीतारामपंत यांस भेट म्हणून दिलेले Golden Treasury Series मधील "Poems of Wordsworth" हें पुस्तक आजही माझ्या संग्रही आहे त्याचे सुरुवातीच्या कोऱ्या पानावर S. K. Damle, Deccan College, हे शब्द सीतारामपंतांच्या हातचे असून

Presented
to
Mr. Sitaram K. Damle
of The Deccan College
by
Harilal M. Bhatt
1st Jan. 1899

असा चांगल्या अक्षरांतील मजकूर आहे.

हे भट्ट कोण त्याचा उल्लेख मी कधींच ऐकलेला नाहीं. पण ते एक कॉलेज मित्र असावेत असा तर्क करावयास हरकत नाहीं.

श्री. गडकरी वकीलांचे बद्दल ( एक मित्र ) ते दि. १८ जानेवारी १९२७ रोजीं लिहितात.

Gadkari was relating his exploit of having shot a panther at the foot of Sinhagad fort. He is a lucky and very jolly good fellow who is having the most glorious period of his life.

श्री. टोकेकरांच्या मैत्रीचाच एक परिणाम म्हणा, सीतारामपंत हे पावसाळ्यांत पुण्यांत ज्या घोड्यांच्या शर्यती होत त्या शर्यतींस सर्व सीझन ( ऋतू ) मध्यें २।३ वेळां जात असत, आणि कांहीं पैसे घोड्यांवर लावीत असत. त्यामुळें घोड्यांचा शर्यतींसंबंधीं गप्पा, घोड्यांचे मालक M. Gokuldas किंवा Mathuradas Gokuldas, R. R. S. (कोल्हापुर) जॉकी किंवा घोडेस्वार परतूसिंग, वगैरे नांवें कानीं पडत. त्या गम्मति ऐकावयास येत. अशावेळीं गम्मतीनेंच थोडे पैसे घालवीतही असत, सीतारामपंत; पण त्यांस नाद नव्हता शर्यतींस जाण्याचा, किंवा पुण्याबाहेर मुंबईच्या Race-Course ( महालक्ष्मीवर ) वर गेलेले ही कधीं ऐकलें नाहीं,

मृत्युपूर्वी २।४ वर्षें श्री. विद्याधर वामन भिडे या अनेक भाषाभिज्ञ, अत्यंत क्लिष्ट शब्दरचना करणारे कवि, मराठी वाक्प्रचार व म्हणी यांचा कोश करणारे 'कोरलईचा किल्लेदार' आदि कादंबऱ्या लिहिणारे असे एक सरकारी शिक्षणखात्यांत असि. एज्यूकेशनल इन्स्पेक्टरपर्यंत काम करून पुढें नू. म. वि. मध्यें फ्रेंच व इतर विषय शिकवणारे शिक्षक अशा एका विक्षिप्त विद्वान् गृहस्थांची त्यांची मैत्री जमलेली होती. या श्री. विद्याधरपंत भिड्यांच्या कन्या शांताबाई भिडे (नाशिककर) या पुढें चांगल्या कांदबरीकार झाल्या. त्यांची व सीतारामपंत यांची मैत्री झाली होती. याच काळांत प्रो. लक्ष्मण गणेश शास्त्री लेले यांचेबरोबरही त्यांचा स्नेह होता. प्रो. लेले यांनीं कालिदासांच्या शाकुंतलाचें मराठी भाषातर १९२५ चे सुमारास केलेलें व सीतारामपंत यांस भेट म्हणून त्यांनीं दिलेलें पुस्तक माझ्या पाहण्यांत होतें

अशा प्रकारें सीतारामपंत यांच्या जीवनांतल्या साधारणपणानें १९१३ ते १९२७ पर्यंतच्या काळांतील स्नेह्यांची माहिती दिली आहे. आणि पुनः एकदां असें स्वच्छ नमूद करतों कीं त्यांस खऱ्या अर्थानें मित्र फारसे नव्हते.

## सीतारामपंतांचें लेखन

सीतारामपंतांनीं आयुष्यांत पुष्कळच लिहिलें. वर्तमानपत्रकार म्हणून निदान ७।८ वर्तमानपत्रांशीं त्यांचा संबंध होता; आणि त्यासबंधांबद्दल व लेखनाबद्दल एखादें स्वतंत्र प्रकरणच होईल म्हणून त्याबद्दल येथें कांहींच न लिहितां इतर लेखनाबद्दलची या प्रकरणीं माहिती देईन. त्यांचें लेखन स्थूलमानानें पुढें दिलें आहे–

अ) कादंबऱ्या :– १) जग हें त्रिविध आहे, (२) न्याय कीं अन्याय, (३) दोनशें वर्षांपूर्वीं, (४) वसईचा रणसंग्राम.

आ) चरित्रें :– १) कार्लाइल चरित्र, (२) महात्मा गांधी.

इ) कायदे विषयक :- १) The Indian Evidence Act. २) घरचा वकील.

ई) संकीर्ण – १) तुरुंगाच्या कोठडींतून सुचलेले विचार, २) पंजाब प्रकरण रिपोर्ट, ३) लो. टिळकांवरील राजद्रोहाचा खटला १९०८ चा, रिपोर्ट.

उ) फुटकळ कथा वगैरे :– १) वाचाळरावाचे विचित्र अनुभव, २) पांडोबाच्या लीला.

ऊ) टीकालेख– १) बहुधा 'भाऊबंदकी' नाटकावर एक उत्कृष्ट टीका लेख. "लोकशिक्षण" मासिकांतून प्रसिद्ध झालेला, २) जर्मन महाकवि गटेचें अमर नाटक डॉ. फॉउस्टवर लेख (चित्रमय जगत्.)

ए) काव्य– "मार्गण" या टोपण नांवानें प्रसिद्ध झालेलें काव्य लेखन.

ऐ) अपूर्ण कादंबऱ्या:–१) अशक्य काय आहे (राष्ट्रोदय मासिक) २) राणू आणि गेनू (चित्रमय जगत् मासिक)

ओ) स्फुट लेखन:–चित्रमय जगत्मधून पहिल्या महायुद्धासंबंधीं लेख आणि इतर विषयांवरील लेख.

औ) नाटक:–संगीत "कलहप्रभाव" उर्फ शर्मिष्ठा (अप्रकाशित)

या शिवाय राज्यशास्त्र, फ्रेंच राज्यक्रांति व जगाचा इतिहास या विषयांवर त्यांचे मनांत कांहीं ग्रंथ लिहावयाचे असा संकल्प दिसतो पण या गोष्टींचे आराखडे, विचार, त्यांचे मृत्युमुळें तसेच राहिले.

वरील व्याप पाहिल्यावर हा मनुष्य असामान्य बुद्धीचा, कर्तृत्वाचा आणि आकांक्षा असणारा असावा अशी भावना व्हावी. १९२३ पासून त्यांचे जीवन खंगत चाललें. १९२०–१ पर्यंत तें चढत चाललें होतें आणि त्यास एकदम उतरती कळा लागली.

आतां या लेखनाच्या तपशिलाकडे वळूं.

कादंबऱ्या:- माझे मनानें त्यांच्या पहिल्या दोन सामाजिक कादंबऱ्या या श्रेष्ठ दर्जाच्या आहेत. "जग हें त्रिविध आहे" मध्यें सदानंदराव सुखात्मे, बृहस्पतराव कुशाग्रे, श्रींपतराव कांचने या सत्व, रज, तम या प्रवृत्तींचे प्रतिनिधी असणाऱ्या तरुणांचे सुमारें ३०-३२ वर्षांचे आयुष्यपटाचा इतिहास त्यांनीं मोठ्या कौशल्यानें आणि मनोरंजकपणानें वर्णिलेला असून प्रकरणांचे मथळे किंवा प्रकरणांचे अधून मधून अनेक संस्कृत, इंग्रजी सुभाषितांची पखरण केलेली आहे. आजकालचें जीवन १९१०च्या सुमाराच्या जीवनापेक्षां कितीतरी निराळें आहे. त्या काळीं लेखनकला बाल्यावस्थेंत होती. त्यामुळें त्यांतील संवाद आदि गोष्टी जुनाट वाटतील, पण कादंबरी अमर होय. "न्याय कीं अन्याय" मध्यें डॉ. रत्नप्रकाश पाताळे हा एक धूर्त मनुष्य व्यवहारी जगांत वाटेल तेवढीं दुष्कृत्यें करून भरभराटीस कसा पोंचतो आणि त्याचे तावडींत एक सस्थानिक, डॉ. शूलपाणी, एक नाटक कंपनीचा मालक व त्याची पत्नीं सरस्वतीबाई, सामान्य कारकून सखारामपंत व त्याचा मित्र हीं कशीं सांपडतात, व त्या सर्वांना हा कसा बनवतो ही कथा मनोरंजक रीतीनें आणि प्रेम प्रकरण कांहींही न आणतां रंगवलेली आहे. प्रेम प्रकरणाचा अभाव हाच या कादंबरीचा विशेष होय. सुष्ट प्रवृत्ति विरुद्ध दुष्ट प्रवृत्ति यांचे झगड्यांत क्वचितच सुष्टांचा जय, पण बहुधा दुष्टांचा जय कां आढळतो हा तात्विक विषय अप्रत्यक्षपणानें हाताळून जगांत न्याय अन्याय कांहीं आहे काय, परमेश्वराचे दारीं असें कांहीं आहे काय हा प्रश्न विचारून त्यांनीं त्यास, सीतारामपंतांस वाटलें तें उत्तर-पूर्व सुकृत, पुनर्जन्म, आधींचें जन्म वगैरे कांहीं मानण्याशिवाय हें कोडें सुटत नाहीं हें-त्यांनीं दिलें आहे. या दोन्ही कादंबऱ्या लेखनाचें त्यांचे तंत्र सारखेंच होतें. त्या चित्रमय जगत् या मासिकांत साधारणपणानें १९१२-१३ व १९१४-१५ मध्यें छापून आल्या, व नंतर पुस्तक रूपानें प्रसिद्ध झाल्या, त्यांचा स्थूल मानानें आराखडा सीतारामपंतांचें डोक्यांत असे. आणि दर महिन्याला २५-३० पृष्ठांचा मजकूर एखाद्या आठवड्यांत लिहून ते कागद छापखान्यांत पाठवण्यांत येत. नंतर पुढच्या महिन्याच्या अंकाकरितां आणखी एखादा महिना लोटल्यावर पुन: असेंच होई. या पद्धतिनें आणि केवळ हौस म्हणून, आणि जें जगाचें निरीक्षण झालें तें टिपून काढावें म्हणून त्यांनीं या कादंबऱ्या लिहिल्या. माझ्या मतानें याच कारणानें त्या विशेष चांगल्या आहेत, अमर आहेत. कोणत्याही लेखकाच्या लेखनासंबंधानें माझा हाच सिद्धान्त आहे. लेखक जेव्हां आत्मानंदाकरितां लिहितो तेव्हां तें त्याचें लेखन चांगलें उतरतें. आणि जेव्हां तो अन्य हेतूस्तव लिहितो तेव्हां ते तसें चांगलें उतरत नाहीं. या सिद्धांताचीं उदाहरणें सीतारामपंतांच्याच संबंधांत याच प्रकरणांत पुढें दिसतील.

## सीतारामपंतांचें लेखन

सीतारामपंतांनीं आयुष्यांत पुष्कळच लिहिलें. वर्तमानपत्रकार म्हणून निदान ७।८ वर्तमानपत्रांशीं त्यांचा संबंध होता; आणि त्यासबंधांबद्दल व लेखनाबद्दल एखादें स्वतंत्र प्रकरणच होईल म्हणून त्याबद्दल येथें कांहींच न लिहितां इतर लेखनाबद्दलची या प्रकरणीं माहिती देईन. त्यांचें लेखन स्थूलमानानें पुढें दिलें आहे—

अ) कादंबऱ्या :– १) जग हें त्रिविध आहे, (२) न्याय कीं अन्याय, (३) दोनशें वर्षांपूर्वी, (४) वसईचा रणसंग्राम.

आ) चरित्रें :– १) कार्लाइल चरित्र, (२) महात्मा गांधी.

इ) कायदे विषयक :- १) The Indian Evidence Act. २) घरचा वकील.

ई) संकीर्ण – १) तुरुंगाच्या कोठडींतून सुचलेले विचार, २) पंजाब प्रकरण रिपोर्ट, ३) लो. टिळकांवरील राजद्रोहाचा खटला १९०८ चा, रिपोर्ट.

उ) फुटकळ कथा वगैरे :– १) वाचाळरावाचे विचित्र अनुभव, २) पांडोबाच्या लीला.

ऊ) टीकालेख– १) बहुधा 'भाऊबंदकी' नाटकावर एक उत्कृष्ट टीका लेख. "लोकशिक्षण" मासिकांतून प्रसिद्ध झालेला, २) जर्मन महाकवि गटेचें अमर नाटक डॉ. फॉउस्टवर लेख (चित्रमय जगत्.)

ए) काव्य– "मार्गण" या टोपण नांवानें प्रसिद्ध झालेलें काव्य लेखन.

ऐ) अपूर्ण कादंबऱ्या:–१) अशक्य काय आहे (राष्ट्रोदय मासिक) २) राणू आणि गेनू (चित्रमय जगत् मासिक)

ओ) स्फुट लेखन:–चित्रमय जगत्मधून पहिल्या महायुद्धासंबंधीं लेख आणि इतर विषयांवरील लेख.

औ) नाटक:–संगीत "कलहप्रभाव" उर्फ शर्मिष्ठा (अप्रकाशित)

या शिवाय राज्यशास्त्र, फ्रेंच राज्यक्रांति व जगाचा इतिहास या विषयांवर त्यांचे मनांत कांहीं ग्रंथ लिहावयाचे असा संकल्प दिसतो पण या गोष्टींचे आराखडे, विचार, त्यांचे मृत्युमुळें तसेच राहिले.

वरील व्याप पाहिल्यावर हा मनुष्य असामान्य बुद्धीचा, कर्तृत्वाचा आणि आकांक्षा असणारा असावा अशी भावना व्हावी. १९२३ पासून त्यांचे जीवन खंगत चाललें. १९२०–१ पर्यंत तें चढत चाललें होतें आणि त्यास एकदम उतरती कळा लागली.

आतां या लेखनाच्या तपशिलाकडे वळूं.

कादंबऱ्या:- माझे मतानें त्यांच्या पहिल्या दोन सामाजिक कादंबऱ्या या श्रेष्ठ दर्जाच्या आहेत. "जग हें त्रिविध आहे" मध्यें सदानंदराव सुखात्मे, बृहस्पतराव कुशाग्रे, श्रींपतराव कांचने या सत्व, रज, तम या प्रवृत्तींचे प्रतिनिधी असणाऱ्या तरुणांचे सुमारें ३०-३२ वर्षांचे आयुष्यपटाचा इतिहास त्यांनीं मोठ्या कौशल्यानें आणि मनोरंजकपणानें वर्णिलेला असून प्रकरणांचे मथळे किंवा प्रकरणांचे अधून मधून अनेक संस्कृत, इंग्रजी सुभाषितांची पखरण केलेली आहे. आजकालचें जीवन १९१०च्या सुमाराच्या जीवनापेक्षां कितीतरी निराळें आहे. त्या काळीं लेखनकला बाल्यावस्थेंत होती. त्यामुळें त्यांतील संवाद आदि गोष्टी जुनाट वाटतील, पण कादंबरी अमर होय. "न्याय कीं अन्याय" मध्यें डॉ. रत्नप्रकाश पाताळे हा एक धूर्त मनुष्य व्यवहारी जगांत वाटेल तेवढीं दुष्कृत्यें करून भरभराटीस कसा पोंचतो आणि त्याचे तावडींत एक संस्थानिक, डॉ. शूलपाणी, एक नाटक कंपनीचा मालक व त्याची पत्नीं सरस्वतीबाई, सामान्य कारकून सखारामपंत व त्याचा मित्र हीं कशीं सांपडतात, व त्या सर्वांना हा कसा बनवतो ही कथा मनोरंजक रीतीनें आणि प्रेम प्रकरण कांहींही न आणतां रंगवलेली आहे. प्रेम प्रकरणाचा अभाव हाच या कादंबरीचा विशेष होय. सुष्ट प्रवृत्ति विरुद्ध दुष्ट प्रवृत्ति यांचे झगड्यांत क्वचितच सुष्टांचा जय, पण बहुधा दुष्टांचा जय कां आढळतो हा तात्विक विषय अप्रत्यक्षपणानें हाताळून जगांत न्याय अन्याय कांहीं आहे काय, परमेश्वराचे दारीं असें कांहीं आहे काय हा प्रश्न विचारून त्यांनीं त्यास, सीतारामपंतांस वाटलें तें उत्तर-पूर्व सुकृत, पुनर्जन्म, आधींचें जन्म वगैरे कांहीं मानण्याशिवाय हें कोडें सुटत नाहीं हें-त्यांनीं दिलें आहे. या दोन्ही कादंबऱ्या लेखनाचें त्यांचे तंत्र सारखेंच होतें. त्या चित्रमय जगत् या मासिकांत साधारणपणानें १९१२-१३ व १९१४-१५ मध्यें छापून आल्या, व नंतर पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्या, त्यांचा स्थूल मानानें आराखडा सीतारामपंतांचें डोक्यांत असे. आणि दर महिन्याला २५-३० पृष्ठांचा मजकूर एखाद्या आठवड्यांत लिहून ते कागद छापखान्यांत पाठवण्यांत येत. नंतर पुढच्या महिन्याच्या अंकाकरितां आणखी एखादा महिना लोटल्यावर पुन: असेंच होई. या पद्धतिनें आणि केवळ हौस म्हणून, आणि जें जगाचें निरीक्षण झालें तें टिपून काढावें म्हणून त्यांनीं या कादंबऱ्या लिहिल्या. माझ्या मतानें याच कारणानें त्या विशेष चांगल्या आहेत, अमर आहेत. कोणत्याही लेखकाच्या लेखनासंबंधानें माझा हाच सिद्धान्त आहे. लेखक जेव्हां आत्मानंदाकरितां लिहितो तेव्हां तें त्याचें लेखन चांगलें उतरतें. आणि जेव्हां तो अन्य हेतूस्तव लिहितो तेव्हां ते तसें चांगलें उतरत नाहीं. या सिद्धांताचीं उदाहरणें सीतारामपंतांच्याच संबंधांत याच प्रकरणांत पुढे दिसतील.

त्यांच्या उरलेल्या दोन कादंबऱ्या या ऐतिहासिक आहेत. माझे मतानें त्या पुरेशा चांगल्या नाहींत. "दोनशे वर्षांपूर्वी" यामध्यें थोरले बाजीराव पेशवे यांची बुंदेलखंडावरील स्वारी व त्यांचा आणि राजा छत्रसालकन्या मस्तानी यांचा संबंध हा विषय हाताळलेला असून "वसईचा रणसंग्राम" मध्यें बाजीरावाचाच भाऊ पराक्रमी चिमाजीआप्पा यांनीं पोर्तगीजांवर विजय मिळवून वसईचा दुष्प्राप्य किल्ला कसा मर्दुमकीनें जिंकून घेतला तो प्रसंग वर्णिलेला आहे. १९१६ मध्यें पहिली कादंबरी सुमारें ५०० पृष्ठांची व रुपये ५०० मिळवून त्यांनीं लिहिली. प्लेग होता. वकिलीचा धंदा त्यामुळें पडला होता "सुधारक" छापखान्याचे तरुण धडाडीचे मालक श्री. तात्यासाहेब फडतरे यांनीं विनंति केली, पैसे देऊं केले. सीतारामपंतांनीं पैशांकरितां, व कंटाळलेला वेळ घालविण्यास ही कादंबरी घेतली लिहावयास. पण त्यांचें आधींचें सर्व लेखन दिवसाच्या धकाधकीच्या मामल्यांत विशेषतः रात्रीचेवेळीं वेळ सापडेल तेव्हां ते लिहून काढीत. त्याही परिस्थितींत मनास आल्हाद, आत्मानंद, ही त्या लेखनाची प्रेरक शक्ति होती.

"वसईचा रणसंग्राम" ही छोटी सुमारें १७५ पृष्ठांची लघुकादंबरी सन १९२५ मध्यें मुंबईचे ( ठाकुरद्वार ) "भावे आणि मंडळी" या मंडळीनें अंदाजें १००, १२५ रुपये मोबदला देऊन प्रसिद्ध केलेली त्यांची कादंबरी होय. हिच्या बद्दलही वरच्यासारखेंच म्हणतों. मोबदल्याकरितां लिहिलेली ही कादंबरी होय. हें स्वयंस्फूर्त लेखन नव्हे.

**कायदे विषयकः**-त्यांचीं दोन्ही कायदेविषय पुस्तकें पुण्याचे लॉ प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. खांडेकर यांनीं छापून प्रसिद्ध केलीं. पैकीं पहिलें इंग्रजी हौसेनें व प्रसिद्धीकरितां, पूर्वायुष्यांत १९११ चे सुमारास लिहून प्रसिद्ध केलेलें, म्हणून चांगलें आहे. दुसरें उत्तर आयुष्यांत १९२५ चे सुमारास, चरितार्थाकरितां. लोकांस हरघडी ज्याप्रमाणें डॉक्टरांचा उंबरा ओलांडण्याची पाळी येऊं नये असें वाटतें, तसेंच हरघडीस वकीलाची पायरीही चढण्याची पाळी येऊं नये अशा उद्देशानें सामान्य जीवनांत उपयोगी पडणारी कायद्यांची तात्त्विक व व्यावहारिक माहिती देणारा उपयुक्त असा सुमारें ३५० पृष्ठांचा हा ग्रंथ त्यांनीं रचला. त्याचा उद्देश पुष्कळसा साध्य झाला होता, व या पुस्तकानें प्रकाशकांस फायदाही झाला असावा. सीतारामपंतांस बहुधा रुपये २५०–३०० मिळाले या ग्रंथापासून.

"तुरुंगाच्या कोठडीतून सुचलेले विचार" हें पुस्तक सीतारामपंतानीं मुळशीच्या सत्याग्रहांत त्यांस येरवडा जेलमध्यें जो कारावास घडला त्या संबंधानें लिहिलेलें हें पुस्तक होय. हें एक वाचनीय पुस्तक आहे. तें त्यांनी स्वतः खर्च करून छापून प्रसिद्ध केलें. त्यांचसारखा प्रसिद्ध लेखक, 'श्रीराम आणि मंडळी"

सारखी तात्पुरती स्वतःचीच प्रकाशन संस्था, पण हें चांगलें पुस्तकही फलदायी झालें नाहीं, अर्थप्राप्तीचे दृष्टीनें त्यांत 'राम' दिसला नाहीं. त्यांनीं तुरूंगातलें जीवन, तुरुंगांतील झालेल्या बेरड अशा गुन्हेगारांच्या तसेंच राजकीय पुढाऱ्यांच्या ओळखी, त्यांस पुढें जें अल्पवेळ रोज वाचन करावयास मिळे. त्यावेळेंतील वाचन व मनन यांबद्दल फार छान माहिती दिली आहे. येरवडा हा लहान तुरुंग तर हिंदुस्थान देश हा एक मोठा तुरुंगच आहे ही कल्पना फार उत्तम प्रकारें त्यांनीं मांडली. देशाबाहेर जावयास Pass-port, परवाना पाहिजे, स्वातंत्र्य नाही! त्याव-प्रमाणें त्यांचे वाचन किती जबरदस्त होतें आणि स्मरणशक्ति किती उत्तम होती याचें प्रतीक पुस्तकांत मिळतें. जवळजवळ २५-३० मोठमोठ्या ग्रंथाची माहिती आहे. यांत Abbott चें नेपोलियन, " ला मिझराब्ल " फ्रेंच कादंबरी, कुराण ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर विविधता दर्शवतें. हरिणें येत कोठडीजवळ. त्यांना उरलेलें खाऊ घालीत कधीं, कधीं. त्या हरिणशावकांवर २०।२५ आर्या केल्या होत्या त्यांनीं, लेखन साहित्य नसतांही. त्यांचा समावेश आहे, शेवटी शेवटीं. तुरुंगवासांतला उत्तरार्ध याची त्यांनीं त्यांच्या पूर्वायुष्यांत जवळच असलेल्या डेक्कन कॉलेजांतल्या ४ वर्षांच्या अभ्यासाच्या काळाशीं ही थोडी मनोरंजक तुलना केलेली आहे. हें पुस्तक १९२२ च्या मे-जूनमध्यें त्यांनीं प्रसिद्ध केलें तें चांगलें आहे.

१९१९ च्या डिसेंबरमध्यें कॉंग्रेसनें पं. मोतीलाल नेहरू यांचे अध्यक्षतेखालीं पंजाबातील मॉर्शल लॉ मुळें जे अत्याचार झाले त्यांची चौकशी करण्याकरितां एक मंडळ नेमलें होते. त्या मंडळानें लाहोर, अमृतसर (जालियनवाला बाग) सहारण-पूर, फिरोजपूर, अंबाला, जलंधर आदि ठिकाणीं जे अत्याचार झाले त्यांची माहिती साक्षी पुराव्यासह प्रसिद्ध केली होती. मूळ रिपोर्ट होता इंग्रजींत; तेव्हां मराठी वाचकांस त्याची माहिती व्हावी म्हणून त्याचें मराठी भाषांतर 'पंजाब प्रकरण " या नांवानें १९२० चे सुरुवातीस श्री. शंकर हरी मुळे यांनी प्रकाशित केलें, हा भाषांतरित ग्रंथ सीतारामपंतानी तयार केला.

अशाच प्रकारचें एक काम १९०८ मध्यें लो. टिळकांस राजद्रोहाबद्दल सहा वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाल्यावर सीतारामपंतानीं केली त्या प्रख्यात खट-ल्याच्या रिपोर्टाचें तें काम होतें. पुस्तक फार मोठें २००-३०० पृष्ठांचे होतें. ते त्यांनीं केवळ १५ दिवसांत तयार करून छापून प्रसिद्ध केलें. त्याचे पाठोपाठ पुढें " राष्ट्रमत " दैनिक सुरू झालें.

**चरित्रें** :- कार्लाइलचें चरित्र, त्यांनी १९०८ च्या सुमारास फार सुरेख लिहिलें होतें असे ऐकतों. म. म. द. वा. पोतदार यांनी त्या पुस्तकाची मजजवळ

फार प्रशंसा केलेली होती. पण मी तें डोळ्यांनी पाहिलेलें नाहीं. पण ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये १९०५ चें सर्व वर्षभर प्रोफेसर होते, इंग्रजी शिकवीत असत. कार्लाइलचें कोणतें तरी एक पुस्तक शिकवण्याचे निमित्तानें त्यानी कार्लाइलचे सर्व ग्रंथ वाचून काढले असें ते बोलल्याचें स्मरतें. तेव्हां त्यानंतरच केव्हांतरी त्यांनीं हा ग्रंथ लिहिला असावा.

" महात्मा गांधीं चरित्र " हा सुमारें ५२५ पृष्ठांचा ग्रंथ त्यांनीं १९२४ व १९२५ मध्यें लिहिला. " भारत गौरव ग्रंथ माला " या नांवाची एक मुख्यतः कादंबऱ्या प्रकाशित करणारीं ग्रंथमाला होती, त्यावेळीं. त्या ग्रंथमालेचे चालक श्री. प्रभाकर श्रीपत भसे हे एक दिवस घरीं आले आणि त्यानीं सीतारामपंतां-जवळ या चरित्रासंबंधी करार केला. त्या ग्रंथाबद्दल श्री. भसे यांनीं एकूण रुपये ५०० दिले आणि सुमारें २५।३० रुपयांची इंग्रजी पुस्तकें ( जीं सीताराम-पंतांनीं सांगितलीं तीं ) दिलीं. हा ग्रंथ लिहिण्याचें काम अंदाजानें ३।४ महिने चालूं होतें. पूर्ण ग्रंथ लिहून झाल्यावर छापावयास गेला, असें याही खेपेस झालें नाहीं. साधारणतः २५०।३०० पृष्ठांचा मजकूर लिहून झाल्यावर लेखन व छपाई जोडीनें सुरूं झाली ! या ग्रंथांत चरित्रापेक्षां महात्मा गांधींची कामगिरी व शिकवण, सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान याचा उहापोह जास्त प्रमाणांत आहे. या ग्रंथास थोडीफार मान्यता मिळाली. पण चरित्र वाङमयांत तें शुद्ध चरित्र नसल्यानें त्यास तसें मानाचें स्थान मिळालें नाहीं, व मला वाटतें मिळणार नाहीं. याचें प्रमुख कारण तें थोडें धेडगुजरी स्वरूपाचें व अर्थार्जनार्थ लिहिलेलें पुस्तक होय.

त्यांच्या फुटकळ कथा चित्रमय जगत्‌मध्यें प्रथम छापून आल्या, व लहानशा आकारांत त्या छापून श्री. शंकर हरी मुळे या सद्‌गृहस्थांनीं १९१२ पूर्वी प्रसिद्ध केल्या, त्यांस विशेष महत्त्व नाहीं. पण त्या थोड्या " विनोदी " कथा होत्या हें त्यांचेबद्दल विशेष असें सांगावयाचें आहे.

त्यांच्या टीका लेखांपैकीं जर्मन महाकवि गेटच्या डॉ. फॉस्ट किंवा फाउस्ट वर सुमारें ३५।४० पृष्ठांची पुस्तिका होईल असे २।३ लेख चित्रमय जगत्‌मध्यें सीतारामपंतांनीं लिहिले, आणि ते चांगले होते. पण ते फुटकळ लेख म्हणून कोणाच्या फारसे नजरेंत आले नाहींत. ‡ भाऊबंदकीवरील लेख फार चांगले होते असें ऐकले आहे. मूळ लेख मला पहावयास मिळालेले नाहींत.

---

‡ तळटीप : १९३२ मध्यें महाकवि गटे यांचे निधनास १०० वर्षे झालीं. त्यांचे फाउस्ट बद्दल प्रो. स. बा. हुदलीकर यानीं त्यावेळीं फाउस्टबद्दल 'पहिलें'च लेखन प्रसिद्ध केलें. पण ते खरोखर दुसरें होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.......................... वि: ..........................
क्रमांक .......................... नों: दि: ..........................

त्यांच्या एकूण २५।३० कविता होत्या असें ऐकलेलें आहे. त्या "मार्गण"-बाण या टोपण नांवानें प्रसिद्ध झाल्या. त्यांतील फक्त एकच कविता, कवि केशवसुतांवरील मी अगदीं अलीकडे पाहिली, वाचली. तसेंच "तुरुंगाच्या कोठडीतून" मधील आर्यांबद्दल पूर्वी लिहिलें आहेच. पण ते स्वतःही कवि म्हणून मोठा दावा मांडीत नव्हते. गम्मत म्हणून काव्य करण्याचा प्रयत्न केला होता त्यांनीं, आणि बहुधा ते मनाशीं म्हणाले असतील "हा ांत आपला नव्हे, सोडन देऊं या, हा नाद !"

"चित्रमय जगत्" मासिकाचे त्यांचे हयातीपर्यंतच्या अंदाजानें १७-१८ वर्षांचे काळांत मिळून दोनशें वर अंक निघाले. त्यांतील माझ्या अंदाजानें निदान शंभर वर अंकांमधून त्यांचे कांहीना कांही लेख छापून आलेले आहेत.

त्यांच्या 'कलहप्रभाव' या अप्रकाशित नाटकाबद्दल पूर्वी एकदां लिहिल्यामुळें द्विरुक्ति नको.

**सीतारामपंतांची डायरी दि. १० मे १९२७ पहा**

Gadkari pleader came in the morning at 8-30 with Chitnis pleader and took away my Ms play भटजीचा मुलगा which a club of his wants to stage in an amateurish fashion. As the play was lying with me for over a year. I have to thank him if he really brings it on the stage. If it proves successful some Dramatic Company may go in for the rights of staging it professionally, & I might reap some earning advantage. But that all depends !

त्यांच्या अपूर्ण कादंबऱ्या पैकीं दोन 'अशक्य काय आहे' या कादंबरीची प्रकरणें त्यांनी स्वतः संपादित केलेल्या चांगल्या अल्पजीवी अशा "राष्ट्रोदय" नांवाच्या मासिकाच्या पहिल्या पांच अंकात छापून आलीं. पुढें हें मासिकही बंद पडलें व त्याबरोबर कादंबरीही. हें मासिक १९१०-११ मध्यें निघाले होतें. दुसरी कादंबरी 'राणू व गेनू' ही बहुधा डिसेंबर १९२२ पासून ३-४ हप्ते चित्रमयजगतांत छापून आली. पहिल्या महायुद्धांत राणू व गेनू हे रिक्रूट भरती होवून मेसापोटेमियाकडे लढाईवर गेले असा कांहीं मजकूर होता. आणि ती कथा त्यांनीं तशीच सोडून दिली. याबद्दल त्यांनी एकदां खालील उद्‌गार काढल्याचें पक्कें आठवतें. कादंबरी, करमणूकप्रधान लेखन करावयास जी एक मनाची बैठक लागते ती त्यांची त्या काळांत ढळली होती. त्यामुळें तसलें लेखन अनुकूल मनःप्रवृत्तिच्या अभावी बंद पडलें.

## “ संपादक ” सीतारामपंत

सीतारामपंतांचा वृत्तपत्र सृष्टीमध्यें बऱ्याच वर्तमानपत्रांशी संबंध आला. ते १९०० मध्यें B. A. झाले. आणि फेब्रुवारी १९०४ मध्यें त्यांनी एल्.एल्. बी. ची डिग्री घेतली. १९०३ चें सर्वच वर्ष बहुधा ते मुंबईंत होते. १९०२ च्या दिवाळीच्या सुमारास त्यांचे आईच्या निधनानंतर ते बहुधा एल्.एल्. बी. च्या अभ्यासास म्हणून मुंबईस आले असतील, आणि अभ्यास करितां करितां जमेल तर द्रव्यार्जन करावें म्हणून त्यांनीं लेखन व्यवसाय केला असावा. त्या काळांत त्यांचा ‘इंदुप्रकाश’ व ‘सयाजी विजय’ या शेट दामोदर सावळाराम यंदे यांच्या पत्रांशीं प्रथम संबंध आला. त्यांत पूर्वी १।२कॉलम मजकूर इंग्रजीमध्यें येत असे. कांहीं काळ सर नारायणराव चंदावरकर हे स्तम्भ लिहीत असत. बहुधा या इंग्रजी स्तम्भांची कामगिरी सीतारामपंतांकडे आलेली असावी असें वाटतें. मराठी ही स्तम्भ ते लिहीत असतील. पण एल. एल. बी. पास झाल्यावर १९०४ मध्यें ते पुण्यास रहावयास आले असावेत.

पुण्यास त्यांचे बिऱ्हाड निंबाळकर तालीम– (सदाशिवपेठ, गायआळी) समोरच्या श्रीधर शास्त्री लिमये (लिमये टाइपरायटिंग रूमचे सध्यांचे चालक यांचे आजोबा) यांचे वाड्यांत होतें. मागचे अंगास एक दुमजली भाग त्यांनीं नवा बांधलेला होता. त्या भागांत खालींवर अशा खोल्यांत त्यांचें बिऱ्हाड होते. सध्यां त्या जागेंत श्री. कोपर्डेकर प्रकाशनाचे श्री. दयार्णवराव राहत आहेत. तेथें त्यांचें बिऱ्हाड कांहीं वर्षे राहिलें. त्याच काळांत ते लो. टिळक यांच्या मुख्यत: इंग्रजी “ मराठा ” मध्यें लिहीत असत. क्वचित् “ केसरी ” मध्यें देखील. त्यांच्या या “ मराठा ” मधील लेखनाबद्दल नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे खूष झाले. आणि त्यांनीं सीतारामपंत यांस लो. टिळक यांचे कंपूमधून फोडून त्यांचे कंपूत नेलें ! ते प्रथम फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंग्रजीचे प्रोफेसर म्हणून नेमले गेले. आणि याच काळांत “ ज्ञानप्रकाश ” मध्यें त्यांनीं कांहीं लेखन केलें. प्रोफेसर, शिक्षक, म्हणून त्यांनीं जी कामगिरी केली त्याचे संबंधांत एक छोटेसें प्रकरण होईल व तें या प्रकरणापुढें देईन - - - - पण हे सर्व संपादकीय संबंध अल्पकाळचे ठरले.

१९०८ च्या सुरुवातीपासूनच किंवा त्याचे आधींपासूनच असेल, लो. टिळक व त्यांचे स्नेही यांचे मनांत त्यांचे पक्षाची एखादी प्रकाशन संस्था, दैनिक वर्तमानपत्र मुंबईत असावें. त्या दृष्टीनें राष्ट्रीय प्रकाशन किंवा अशाच कांहीतरी नांवाची संस्था लिमिटेड कंपनीचे धर्तीवर टिळक पक्षीयांनीं स्थापिली. छापखाना विकत घेतला, कोणी एक श्री. सरदेसाई ( बहुधा हें नांव बरोबर असावें, मी केवळ स्मृतिनें तें देत आहे. ) हे प्रकाशन विभागाचे मुख्य, छापखान्याचे मुख्य, आणि लेखन विभागाचे संपादक म्हणून सीतारामपंत हे मुख्य अशी श्रम विभागणी, अधिकार विभागणी होती. लो. टिळकांस राजद्रोहाबद्दल सहा वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा झाली. तो खटला मुंबई हायकोर्टांत फार गाजला, त्या खटल्याची हकीगत पृष्ठें १५० ते २०० हें पुस्तक या छापखान्यातर्फे, संस्थेतर्फे तयार करण्यांत येऊन प्रसिद्ध झालें. तें काम केवळ १५-२० दिवसांत सीतारामपंतांनीं केलें. " राष्ट्रमत " दैनिक जवळजवळ दीड वर्षपर्यंत चाललें. राष्ट्रीयपक्षाचें मुंबईमधील पहिलें व गाजलेलें दैनिक हेंच. त्यानंतर पुढें श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर यांचें " संदेश " श्री. कृ. प्र. खाडिलकर यांचें " लोकमान्य " वगैरे दैनिकें निघाली. त्या दैनिकाच्या भाषेबद्दल, स्वरूपाबद्दल, मला कांहींच माहिती नाहीं. त्याचा एकही अंक मी पाहिलेला नाहीं. पण ऐकीव माहिती अशी कीं, याचें संपादन सीतारामपंतांनी समर्थपणानें, जोरदार लेख लिहून केलें; आणि संपादकीय क्षेत्रांत मोठें नांव कमावलें. पण त्यांचा व श्री. सर देसाई यांचा बेबनाव झाल्यामुळें त्यांनी एक वर्षभर काम केल्यानंतर त्या पत्राशीं आपला संबंध सोडला, त्यानंतर तें पत्र चालवण्याचा पुष्कळ संपादकांनी प्रयत्न केला. त्यांत पुढें नागपूर येथें प्रख्यात झालेल्या ' महाराष्ट्र ' पत्राचे संस्थापक व संपादक श्री. गोपाळराव ओगले हे एक होते असें ऐकलें आहे. पण " राष्ट्रमत " लवकरच बंद पडलें.

सीतारामपंतांनीं या नंतर पुण्यास " राष्ट्रोदय " या नांवाचें एक मासिक सुरू केलें. त्याचा दर्जा चांगला होता. आकार " लोकशिक्षण " मासिकाचे एवढा होता. वरच्या मुख पृष्ठावर हिंदमाता उभी आहे. तिचे पाय कन्याकुमारीजवळ शिर काश्मीर, केशकलाप मोकळा सुटलेला–हिमालय, असें एक सुरेख चित्र होतें. त्याचे फक्त पांचच अंक निघाले व तें बंद करण्यांत आलें.

दे. भ अच्यत बळवंत कोल्हटकर यांनीं १९१८ चे सुमारास इंग्रजी " Message " दैनिक सुरू केल्यावर त्यांत ते इंग्रजी लेख पाठवीत असत; ही माहिती पूर्वीं दिलेली आहेच. त्याचप्रमाणें पुढें दे. भ. खाडिलकर यांचे " नवाकाळ " मध्येंही ते लेख पाठवीत असत ही ही माहिती पूर्वीं दिलेली आहेच. तेव्हां आतां त्यांच्या एका व जरा जास्त काळ चाललेल्या साप्ताहिक " राजकारण " या पत्राची माहिती देऊन हें प्रकरण पूरे करूं.

" राजकारण " हें पत्र माझ्या चांगल्या आठवणीच्या काळात सुरू झालें, व बंद करण्यांत आलें. त्याची प्रुफें तपासण्याचें कामही मी केलेलें आहे. सदाशिव पेठेंतील प्रख्यात फडतरे घराण्यापैकीं श्री. तात्यासाहेब फडतरे यांचा व मवाळ पक्ष, नामदार गोखले, पक्ष यांचा संबंध आला. १९१३-१४ च्या सुमारास सध्यां पुण्याच्या सेवासदनच्या इमारती आहेत. त्या इमारतींचा पश्चिमेकडील जवळ जवळ अर्धा भाग त्याकाळीं बखळवजा जुना वाडा होता. त्यांस चांगली किंमत त्या पक्षातर्फे श्री. फडतऱ्यांस मिळाली. तेव्हां त्यांनीं कै. गु. आगरकर यांचे " सुधारक " पत्राचा पुनरुद्धार करावा अशी सूचना श्री. फडतरे यांस करण्यांत आली. त्याप्रमाणें त्यांनीं छापखाना काढला, पत्र सुरू केलें. पण तें दीड दोन वर्षांवर चालूं शकलें नाहीं. याच काळांत केव्हांतरी श्री. फडतरे यांची व सीतारामपंतांची ओळख होऊन त्यांची " दोनशें वर्षांपूर्वी " ही कादंबरी त्यांनीं छापून प्रसिद्ध केली. मवाळ पक्षाचें नाहींतर नाहीं, जहाल पक्षाचें एखादें साप्ताहिक काढून पाहूं या, असा विचार श्री. फडतऱ्यांचे डोक्यांत आला; आणि त्याच सुमारास ( जवळ जवळ दोन वर्षे आधीं सीतारामपंतांची पत्नी सौ. जानकीकाकू कैलासवासी झाली होती; त्यांचें सांसारिक लक्ष थोडें फार उडत चाललें होतें ) वैशाख शुद्ध द्वितीया परशुराम जयंती किंवा जुनी शिवजयंती या शुभमूहूर्तावर ( मे १९१८ ) हें साप्ताहिक सुरूं झालें. त्याचे मुखपृष्ठावर मुख्य नांवाखालीं " जे जें कांहीं आपणांस ठावें, ते ते हळूं हळूं शिकवावें। शहाणे करून सोडावे, सकळ जन " । हा समर्थ रामदासांचा श्लोक बोधवाक्य म्हणून छापलेला होता. हें वर्तमानपत्र १९२० च्या अखेरपर्यंत जवळ जवळ, श्री. फडतरे व सीतारामपंत या दोघांच्या भागीदारीमध्यें चाललें. त्याचा खप सुरूवातीस जवळ जवळ अडीच हजार होता. तो वाढत वाढत चार ते साडेचार हजारपर्यंत गेला. पैकीं मुंबईसच एक हजारपासून सतराशें-अठराशेंपर्यंत व उरलेला खप अन्य ठिकाणीं अशी वाटणी असे.

लो. टिळकांनीं १९२० चे आधीं केव्हां तरी जवळ जवळ २०-२५ रिमें किंवा ७००-७५० रुपयांचा कागद मदत म्हणून घरीं पाठवून दिलेला होता हें मला पक्कें आठवतें. या पत्रामधून सीतारामपंत यांची स्वतंत्र विचारसरणी दिसून येई. लो. टिळक पक्षाचे धोरण शारदा कायद्यास विरोध करण्याचें होतें सक्तीचे शिक्षणाच्या रँ. परांजपे यांचे ( ते मंत्री होते त्यावेळीं) धोरणास विरोध होता. पण सीतारामपंतांनी या दोन्ही गोष्टींच्या तर्फेनें लेख लिहिले होते. दक्षिण महा. राष्ट्रांतील संस्थानें व त्यांची प्रजा, कोल्हापूरकर छत्रपति, ब्राम्हणेतर चळवळ सत्यशोधक समाजाचा धुमाकूळ व ब्राम्हणांचा थोडाफार छळ या बाबतींत त्यांची जनतेकडे सहानुभूति व ब्राम्हण वर्गाकडे सहानुभूति होती. अथणी, बेळगांव,

निपाणी वगैरे मराठी-कानडी सीमा भागावरील प्रश्नांबद्दलही जनतेची बाजू ते घेत. म्हणून या भागाकडे पत्राचा खप चांगला होता. त्याच प्रमाणें मराठवाड्यांतील जनतेबद्दलही सहानुभूतिपूर्वक धोरण असल्यानें त्या भागांतही पत्राचा खप चांगला होता.

या पत्रांत सीतारामपंतांचे शिवाय श्री. अनंत हरी गद्रे (मौजकार झुणका-भाकर भोजन चळवळीचे प्रवर्तक), दे. भ. शंकरराव देव, कम्युनिस्ट मताकडे झुकणारे श्री. लालजी पेंडसे, श्री. डी. व्ही. ताम्हनकर (सध्यां लंडन येथें असणारे "केसरी" चे बातमीदार) ही मंडळी स्फुटें किंवा स्वतंत्र लेख लिहीत असत. त्यांस कांहीं मेहनताना मिळत असे. अग्रलेख ते स्वतःच लिहीत.

श्री. फडतरे यांचे बरोबरची भागीदारी १९२० मध्यें केव्हांतरी मोडली. आणि नंतर हें पत्र, त्याची कचेरी आमच्या घरींच आली, आणि संपादकीय व व्यवस्थापकीय जबाबदारी, सर्वच, सीतारामपतांवर आली. पत्र छापण्याची व्यवस्था नेने घाट, शनवारपेठ या भागांत श्री. दाते यांचा एक छापखाना होता त्या छाप-खान्यांत १९२२ अखेर वर्तमानपत्र बंद पडलें तोंपर्यंत होती. श्री. फडतरे यांस कांहीं रक्कम दरमहा द्यावयाची होती असें वाटतें अशा प्रकारें वर्तमान पत्र चाललेंच होतें. १९२२ च्या ७ मे रोजीं सीतारामपंतांस मुळशीस सत्याग्रह केल्या-बद्दल सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्यांचे तुरुंगवासाचे काळांत माझे चुलत बंधू कै. परशुराम चिंतामण हे घरीं रिकामेच होते ते संपादनाचें काम करीत. या काळांत पत्र कसें चाललें तें कळलें नाहीं मला नीट. पण घरखर्चास किंवा अन्य खर्चास सीतारामपंत यांचे मित्र श्री. टोकेकर (यांचेकडे कर्जाऊ रक्कम येणें होती.) त्यांचेकडून कांहीं पैसे येत. त्यामधून संपादकीय मेहनताना म्हणून दरमहा रुपये पन्नास परशुरामपंत परभारें किंवा मजकडून घेत असत. छाप-खान्यांतून प्रति महाराष्ट्रांतीस एजंटांकडे जात. पैसे कोठून कसे येत जात ते सगळें काम छापखान्यांतच चाले. पण याचे पूर्वी हें काम घरीं चालत असे. या सर्व बाबतींत कांही तरी घोटाळे झाले असावेत. आणि त्यामुळें १९२२ च्या डिसेंबरांत केव्हांतरी सीतारामपंतांनी पत्र बंद केल्याचें जाहीर केलें. हें पत्र जवळ जवळ चार वर्षें आणि ८ महिने चाललें.

महात्मा गांधींची असहकारिता, सत्याग्रहाचें तत्त्व, वगैरे गोष्टी उचलून धरणारें पहिलें व कांहीं काळपर्यंत एकटेंच वृत्तपत्र म्हणजे सीतारामपंत यांचे "राजकारण" पत्र होय. १९२०-१ चे सुमारास दे. भ. शिवरामपंत परांजपे यांनी आपलें "स्वराज्य" पत्र सुरु केलें होतें. तेंही असहकारितावादीच होतें. त्याचा खप "राजकारण" पेक्षां जास्त कधींच नव्हता, तेंही कांहीं वर्षांनीं श्री. परांजपे यांनीं बंद केलें. गांधीवादाचीं पाळेमुळें महाराष्ट्रांत कोणी प्रथम रुजवलीं याचा

इतिहास लिहावयाचा प्रसंग आला तर सीतारामपंत व "राजकारण" पत्र यांस फार मानानें स्थान इतिहासकारांस द्यावें लागेल. दे. भ. कृष्णाजीपंत खाडिलकरांनीं "लोकमान्य" दैनिक १९२० अखेर मुंबईंत सुरु केलेलें होतें. त्याबाबतींत व्यवस्थापकीय मंडळींपाशीं त्यांचा मतभेद झाल्यानें त्यानीं १९२३ च्या मार्चमध्यें "नवा–काळ" हें स्वतःचें पत्र, दैनिक सुरु केलें. पण तेंही राजकारणाचे पाठी-मागून, पुण्यांत "लोकसंग्रह" दैनिक निघालें, तें मागाहूनच...अशा प्रकारें गांधी-वादाचे महाराष्ट्रांतील आद्य पुरस्कर्ते हें मानाचें स्थान खऱ्या इतिहासकारांस सीता-रामपंतास देणें भाग पडेल. पण ज्याप्रमाणें पायाचे दगड जमीनींत गाडले जातात, त्यांचें स्मरण कोणासच नसतें, आणि वरचे कळस फक्त तेजानें तळपत असतात, त्याप्रमाणें गांधीवादाचे पुरस्कर्ते म्हणून तिसरींच नांवें आज महाराष्ट्रांत घेतलीं जात आहेत; आणि मूळ खरीं नांवें विस्मृतींत गाडलीं गेलीं आहेत.

या "राजकारण" पत्राची देव घेव, आर्थिक व्यवस्था, आणि घर किंवा बंगला यांचे खर्चांची आर्थिक व्यवस्था या खालीं सीतारामपंत यांचा जीव रंजीस आला, ते मेटाकुटीस टेकले असावेत, अशी माझी आतां कल्पना आहे. पण या विषयाबद्दल बंगला किंवा घर बांधणें या स्वतंत्र प्रकरणांतच त्याची माहिती देईन.

सीतारामपंतांच्या डायरीमध्ये कोणी श्री. खोत यांचें "रणगर्जना" पत्र, त्या पत्रास लिहून पाठवलेले लेख यांची माहिती १९२६-२७ सालीं आढळते. त्यां पत्रांचे संबंधांत श्री. एस्. के. पाटील यांचाही एकदां उल्लेख आहे. पण हे सर्व उल्लेख तुरळक आहेत. त्यावेळीं श्री. एस्. के. पाटील यास फारसें महत्त्व नव्हतें.

"नवा–काळ" मधील लेखनाबद्दलची माहिती पूर्वी एकदां येऊन गेली असल्यामुळें त्याची द्विरुक्ति नको. अशा प्रकारें हें प्रकरण पुनः चाळून पाहिल्यास सीतारामपंत यांचा एकूण ८।९ वृत्त पत्रांशीं साक्षात् संबंध आला होता, व तो जवळ जवळ २३-२४ वर्षेपर्यंत होता अशी माहिती मिळेल. मराठी वृत्तपत्र सृष्टीचा एक इतिहास कांहीं वर्षांपूर्वी एका त्या विषयावरच्या मोठ्या ग्रथांत मी पाहिला. यांत सीतारामपंतांचा ।४ ओळींचा त्रोटक उल्लेख आहे. तो त्यांस अन्याय करणारा आहे. त्याचप्रमाणें चित्रमय जगत् व स्वतःचेंच 'राष्ट्रोदय", शिवाय "लोकशिक्षण" या मासिकांत ही ते लिहीत असतच. क्वचित् अन्य मासिकांतून ही त्यानीं थोडें लेखन केलें होतें.

त्यांची लेखणी सडेतोड, साधी भाषा, क्वचित् थोडी तिखट, होती. अलं-कारिकतेचा बहुतेक अभाव होता. त्यांचे अग्रलेख फार सुटसुटीत नसत, किंवा फार लांबही नसत. साधारणपणानें वर्तमानपत्राचे ३ ते ४ स्तंभाचे अग्रलेख असत. श्री. अच्युतराव कोल्हटकर हे जवळपास सहासात स्तम्भाचे अग्रलेख लिहीत. श्री. खाडिलकर, केळकर यांचे अग्रलेख २।३ स्तम्भांपर्यंतचे जरा सुटसुटीत असत.

## शशिकलाचा विवाह

" घर पहावें बांधून " व " लग्न पहावें करून " या दोन म्हणी त्या दोन्ही गोष्टी थोड्या फार अवघड मानल्या गेल्यानें तशा पडल्या असाव्यात. सीताराम पंतांनीं हे दोन्ही अनुभव मिळविले. पैकीं लग्न करण्याचा अनुभव मे १९१९ मधला, तर घर बांधण्याचा अनुभव १९२०-२१ मधला. तेव्हां या दोन विषयांवर स्वतंत्र अशीं दोन प्रकरणें प ठोपाठ लिहितों.

माझ्या पाठची बहीण शशिकला हिचा जन्म १९०४ अखेर किंवा १९०५चें सुरुवातीचा मराठी पौष महिन्यांतला. त्या काळच्या मानानें तिला स्थळें पहावयास १९१८ दिवाळीनंतर पासून सीतारामपंतांनीं सुरुवात केली. तिचें विवाह करण्याचें वय झालें होतें, आणि ती इंग्रजी शाळेंत नियमितपणानें जाऊन शिकत नव्हती. तिला थोडा फार पित्त विकार असे, म्हणून आणि शिक्षणाची तीव्र आवड नव्हती म्हणून, तिला त्यानीं घरींच इंग्रजी शिकवलें होतें. तिचें इंग्रजी शिक्षण रात्रीं ९ ते १० पर्यंत चाले. जेवणानंतर आंथरुणावर पडल्या पडल्या झोपेपूर्वी तिनें वाचावें व यांनीं शिकवावें असा क्रम असे. पण ती रूपानें सुंदर असल्यामुळें व त्याकाळी शिक्षणाचा एवढा प्रसार नसल्यामुळें ती बाब अडण्यासारखी नव्हती.

पुण्यांतील बॅरिस्टर गाडगीळ घराणें हें प्रसिद्ध व श्रीमान होतें. जुने बॅरिस्टर काशिनाथपंत आणि सीतारामपंत यांनीं कांहीं कोर्टातील कामें बरोबर केलेलीं होतीं. तेव्हां त्यांचें चिरंजीव धाकटे बॅरिस्टर गोविंदराव यांचेकडे त्यांचे मुलाकरितां सीतारामपंत मुलगी सांगून गेले. एक वेळ ते मुलगी पाहून गेले. पण त्याठिकाणी मुलगी पसंत पडली नाही त्यानंतर शनवार पेठेंतील सरदार राजमाचीकर यांचे चिरंजीव व पुतण्ये विवाहाचे होते. त्याठिकाणीं मुलगी दाखवण्यांत आली, आणि त्याही ठिकाणा मुलगी पसंत पडली नाही. आणि ३ रें स्थळ म्हणून भाऊ महाराज यांचे बोळांतील किवळेकर रानडे कॉन्ट्रॅक्टर्स यांचेकडे दोन मुलगे विवाहाचे होते असें कळल्यावरून त्याठिकाणीं ते मुलगी सांगून गेले. मुलीस पहावयास त्यावेळचे दोन कर्ते पुरुष डॉ. हरीभाऊ व श्री. गोविंदराव बाबासाहेब, अशी मंडळी आली.

हरीभाऊंचे थोरले चिरंजीव भास्करराव व त्यांचे पाठचे भाऊ शिवरामपंत हे वर होते. गोविंदराव घरीं आमच्या माडीवरील दिवाणखान्यांत आल्यावर त्यांची व सीतारामपंत यांची डेक्कन कॉलेजांतील ओळख पटली. त्या कॉलेजांतील नाटकांत एक विवाह जुळवण्याचाच प्रसंग होता आणि ते दोघे विरुद्ध विरुद्ध पक्षांतील इतर वऱ्हाडी होते, तशीं कामे त्यांतीं केली होतीं ! ती आठवण निघाली, मुलगी पाहणें झालें. मुलगी पसंत असा निरोप आला! ( पत्रिका आधींच पाहिली जात असे, व ती पटल्यावरच मुलगी पाहण्याचा सभारंभ होई. ) आतां मुख्यतः शशीला पंचाईत पडली कीं तिचा नवरा होणार कोण ? भास्करराव कीं शिवरामपंत ? भास्कर हा तर शेजारच्या नामजोशांच्या बाबूचा मित्र, म्हणून काशी नामजोजी, आपण आपल्या सर्वांचाच मित्र ! तेव्हां याचेशींच विवाह व्हावयाचा काय ? आपण तर त्यास आतांपर्यंत 'अरे तुरे' करीत होतों ! ... त्याच सुमारास डॉ. हरीभाऊंनी श्री. पटवर्धन मामलेदार यांची मुलगी पसंत केलीं. त्याठिकाणीं मुलीस आईबाप वगैरे सर्व मंडळी होती. तेव्हां मानपान वगैरे सर्व होण्याचे दृष्टीनें तें कुटुंब आमच्यापेक्षां सरस होतें. आमच्याकडे काय ते चुलते होते. आणि त्यांसही त्यांची बायको नव्हतीच. म्हणून ही मुलगी त्यानी भावाकरितां पसंत केली; आणि शशी मी रत्नी, आमची भीति दूर झाली. भास्कर हा आमचा सर्वांचाच चांगल्या ओळखीचा, माझा तर मित्रच होता ! आणि शिवरामपंत देखील माझ्या ओळखीचे होतेच, पण कमी. भास्करराब २-३ वर्षे माझ्या वर्गातलाच, नेहमी शेजारीं येणारा, असो. अशा प्रकारें वधू परीक्षा पास होण्यापर्यंत ठीक झालें. पण पुढें विवाह ठरवण्याचें काय ?

सीतारामपंतांस हा कांहींच अनुभव नव्हता. तेव्हां त्यांनीं त्यांचे मित्र श्री. चिंतामणराव घारपुरे, बँकवाले यांस बरोबर नेण्याचें ठरवलें. कारण रानडे कॉन्ट्रॅक्टर्स हे त्यावेळीं फार मोठें व श्रीमान घराणें असें पुण्यांत प्रसिद्ध होतें. जवळ जवळ १२५-१५० मंडळींचें एक बडे कुटुब होतें तें ! आणि त्या कुटुंबाशीं विवाहाचा सामना देण्यास आमचेकडे सीतारामपत, काशी आत्याबाई, मी व रत्नी अशीं केवळ चार माणसें ! विवाह ठरला मार्च सुरुवातीस; पण प्रत्यक्ष कार्य झालें मे मध्यें, वैशाखांत. मध्यंतरीं अवसर पुष्कळ मिळाला. तयारी करावयास. फाल्गुनांत व्हावयाचें होतें कार्य, पण या एवढ्या मोठ्या कुटुंबांत कोणी बाळंतिणी होणें, कोणी मृत्युही होणें, अशा नाना अडचणी असत. एक मुलगी मृत्यु पावली फाल्गुनांत. त्यामुळें कार्य लांबणीवर गेलें......पण प्रथम भीति वाटली, विवाहच मोडतो काय ! कांहींतरी कुणीतरी मुलीचा पायगुण वाईट ठरवावयाचे ! पण तसलें कांहीं घडलें नाहीं; आणि कार्य निर्विघ्न व उत्तम प्रकारें पार पडलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

नाना जिन्नस विकत घेणें, धान्य निवडून ठेवणें, कापड चोपड घेणें, वाजंत्री, गुरुजी, बँडवाले, आचारी, इत्यादि माणसें मिळवणें, त्यांचे ठराव करणें, निमंत्रण पत्रिका छापवून घेऊन त्या टपालांत टाकणें, गावांत वाटण्याची व्यवस्था करणें, एक ना दोन अनेक प्रकारचीं कामें अनुसंधान सांभाळून करून घ्यावयाचीं होतीं, व ती तशीं झालीं. माझी आतेबहीण त्यावेळच्या सौ. तापूताई दीक्षित (विश्रामबाग वाड्या शेजारचे वाड्याचे मालक आतां कैलासवासी झालेले श्री. अनंतराव दीक्षित यांच्या पत्नी) व त्यांचे मुलगे या मंडळींचा आम्हास चांगला उपयोग झाला. आमच्या घरासमोरच पेन्शनर मामलेदार श्री. पाध्ये यांचे मुलगे सुना यांचाही, कार्यांत, आम्हांस उपयोग झाला. माझी थोरली बहीण सौ. राधाबाई घारपुरे लग्नाचे आधीं एकच दिवस येऊं शकली, आणि चुलतभाऊ परशुराम ऊर्फ तात्या हा अचानकपणानें विवाहाच्या दिवशीं पहाटेस मद्रासहून आला. तो कांहीं ऑफिसच्या कामाकरितां मद्रास येथें गेला होता. माझे आजोबाच जणूं असे रा, ब. चिंतामणराव वैद्य हे मोठे मनुष्य म्हणून, शोभादायक, म्हणून होतेच. पण त्यांचा आचारी उत्तर हिंदुस्थानी " महाराज " मुन्नाराम हा एक दिवस अमोल उपयोगी पडला. विवाहाच्या चार दिवसांत एक दिवस नळ बंद होते. तेव्हां विवाहस्थळ म्हणजे विद्यापीठ वाडा (गाय आळी मध्यें सध्यां टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा हा वाडा आहे तो. पूर्वी तो भूताचा वाडा म्हणून प्रसिद्ध असे. तेथें कोणीच राहत नसे. तो वाडा चिडगुप्पीकर या कोणा कर्नाटकीय गृहस्थांचा होता, व त्यांस लाभदायक न झाल्यानें रिकामाच असे. त्याची व्यवस्था चित्रशाळा प्रेसचे श्री. वासुकाका जोशी यांचे कडे होती. म्हणून आम्हास तो विनामूल्य वापरावयास मिळाला.) आणि आमचें राहतें घर गानूंचा वाडा. यांचेमधील जवळ जवळ५०-६० यार्डांचे अंतरावरून विहिरीचें पाणी काढून कावडीने तें भरणें हे काम त्या एकट्या बहाद्दरानें केलें, आणि पाण्याची कसलीच टंचाई किंवा ओरड झाली नाहीं! तो म्हणाला ' यावे काय एवढें, आमच्या मुलुखांत किती तरी अंतरावरून पाणी आणावें लागतें! हें तर फार सोपें होतें काम. " अशी कुठून कुठून माणसें जमत गेलीं आणि भरपूर सहकार्य मिळालें; कार्य उत्तम तऱ्हेनें पार पडलें! खरंच, एक राहिलेंच चिंतामणरावांचे चिरंजीव भालचंद्रराव (बी. ए.) फेलो डेक्कन कॉलेज यांनी जावई बुवांची, त्यांचेकडे आले गेले त्यांची विचारपूस–चहा फराळ पुरवणें ही व्यवस्था चोखपणानें सांभाळली. तें कार्य आजच्या सारखें एक दिवस कार्यालय घेतलें, कॉन्ट्रॅक्ट दिलें झालें, असें नव्हतें. नवरा मुलगा पूरा चार दिवस घरीं राहिला. चवथे दिवशीं रात्रीं वरात निघाली. विवाह झाला सकाळीं १०॥चे सुमारास. मध्येंच एक दिवस संकष्टी चतुर्थी आली, आणि त्या दिवशीं रानडे कुटुंबांत सर्वांस उपवास! ही वार्ता आयत्यावेळीं कळली. पण चक्का मिळवून श्रीखंडाचा बेत ही तशांत साधून घेतला!

नवरा मुलगा येण्याची मिरवणूक आणि वरात या दोन्ही मिरवणूका चांगल्या झाल्या. विवाह समारंभाच्या पानसुपारीचे वेळीं हॉल गच्च भरला होता. त्यावेळीं गुलाब पाणी लोकांस देण्याची एक संस्थानी पद्धति चिंतामणराव यानीं दाखवली. चांदीच्या मोठ्या प्याल्यांत गुलाब पाणी ठेवून लहानशा चांदीच्याच पिचकारीनें (तिचे तोंडास गुलाबदाणी प्रमाणें अनेक भोंके असलेली) भरून लोकांचे समुदायावर त्या पिचकारीनें फवारा मारणें. ही ग्वाल्हेर संस्थानची पद्धत त्यानीं दाखवली, अवलंबात आणली. अत्तर सुद्धां सर्वांगास लावणें ही संस्थानी पद्धत कांहीं खास लोकांचे संबंधांत पाळण्यांत आली.

रानडे कुटुंबीय व त्यांचे पक्षाचेच लोक एवढें होते कीं आमच्याकडच्या लोकांस आम्हांस मेजवानीस बोलावतांच आलें नाहीं. शशीचे लग्न झालें त्याचे दुसरे दिवशीं डॉ. हरीभाऊंच्या भास्कररावांचे लग्न झालें एका प्रकारें दोन समारंभांत कुटुंब वाटलें जावयाचें; पण सीतारामपंतास विवाहाचा ठराव करणें, याद्या करणें वगैरे कांही माहिती नसल्यामुळें व पटवर्धन मंडळी त्या बाबतींत अनुभवी होती त्यामुळें त्या घराण्यापेक्षां आमच्याकडे रानडे कुटुंबीय मंडळींची वर्दळ जास्त झाली. विवाहाचे ठरावाचे वेळीं हुंडा म्हणून रु. १२०० व करणी म्हणून रु. ३०० असें कांहीं ठरवावयाचें होतें, पण प्रत्यक्ष रु. १००० च हुंडा आणि मानपान करणी म्हणून ५०० असा ठराव झाला. त्यांत मांडव परतण्याचे दिवशीं जावयी बुवांस सोन्याचें रु. १२५ चें घड्याळ जादा म्हणून सीतारामपंतांनी दिलें.

विहिणींस जेवावयास बोलवणीं करावयास जाण्याचें काम रत्नीकडे असे. पहिल्यांदा केव्हांतरी ती गेली असतां कुणीतरी त्या पक्षाच्या बाईनी विचारलें "आंबोण आणलें आहे काय?" तिला कांहींच माहींत नव्हतें, त्यामुळें ती बावरली! मग मात्र केव्हांतरी खरोखरच फणसाच्या बाहेरचें काटेरी कवच वगैरे आंबोण एक वेळ तिने नेलें होतें! एका वेळीं, पुरुषांच्याकरितां बोलावणें म्हणून मी गेलों होतों तेव्हां, यशवंतराव उर्फ काकासाहेबांनी मला विचारलें "विहिणींकरितां मांडे लागतील, तुमच्याकडे आहेत काय?" मी म्हटलें "आम्हांस मांडे वगैरे कांहीं माहीत नाहीं, आमच्याकडे नाहींत." त्यावर ते म्हणाले "कांहीं हरकत नाहीं. तू घरीं जावून कुणी नोकर पाठवून दे. माझें नांव सांगून मला भेटावयाचें असें त्यांस सांग. मग मी सर्व इकडून शिपतरें भरून पाठवतों. तूं काळजी करूं नकोस." आणि मग तें सर्व रीतसर तसें झाले! या किरकोळ गम्मति, आठवणी सांगण्याचें कारण रानडे मंडळी एकंदरींत फार चांगली वागली. आमचेकडच्या मनुष्यबळाचा कमकुवतपणा ओळखून त्यांनी आम्हांस एकूण रुसणी फुगणीं वगैरेंचा त्रास न देतां चांगलें सहकार्यच दिलें।

विवाहाकरितां माझे चुलते चिंतोपंत यांस सहकुटुंब बोलावलें होतें, ते त्यांची मुलगी कमळाबाई वय सुमारें १०, आणि पत्नी सौ. सत्यभामाबाई अशी मंडळी आली होती. व्याही भोजनाचे वेळीं व्याह्यांना द्यावयाचे मान रानडे मंडळींनी कापड वगैरे चिंतोपंत व त्यांच्या पत्नी, मुलगी यांस दिले. पण त्या मंडळीनें ते सर्व जिन्नस घरीं आल्यावर ताबडतोब स्वतःच्या मालकीचेच करून टाकले खरें म्हटल्यास मुख्य व्याही सीतारामपंतच. आणि विहीण कोणी नाहीं. किंवा मानलींच तर माझी थोरली बहीण सौ. राधाबाई घारपुरे. पण ती त्या भोजनाचे वेळीं हजर नव्हती. म्हणून व्याह्यांचा व विहिणीचा मान म्हणून आलेली वस्त्रें चिंतोपंतांनीं व त्यांचे पत्नीनें सीतारामपंत व काशी आत्याबाई यांस दाखवून त्यांचे ताब्यांत देणें इष्ट होतें .. पण त्यांस हा साधा व रास्त विचार स्वार्थामुळें सुचला नाहीं .. आणि पुढें कोणी त्यावर फारसें बोललेंही नाहीं.

विवाहाकरितां जे आंबेमोहोराचे तांदूळ घेतलेले होते ते फार नांवाजले गेले. आचारी चांगले मिळाले होते. त्यामुळें जिलबी, मोतीचूर हीं पक्वान्नें हीं नांवाजलीं गेलीं...पुढें बहुधा श्रावणांत त्याच विद्यापीठ वाड्यांत सीतारामपंतांनीं वकील वर्ग व त्यांचा राष्ट्रीय क्लब यांतील मित्रवर्ग यांस एक खास मेजवानी दिली. त्या वेळीं जिलबी, मटाराची उसळ आदि स्वतंत्र बेत झाला .. एकूण विवाह, ही नंतरची मेजवानी, वर्षांतील निरनिराळे सण वगैरेंचा मिळून सुमारें तीन हजारांचा खर्च आला. आजच्या काळच्या मानानें हा खर्च म्हणजे जवळ जवळ आठ ते दहा हजार तरी व्हावा...

सीतारामपंतांस या विवाहाबद्दल, या घराण्याशीं झालेल्या सोयरिकीबद्दल, आपण शशीचें फार मोठें कल्याण केलें असा रास्त अभिमान वाटत असे. एक मोठें कर्तव्य आपण उत्तम प्रकारें पार पाडल्याचें समाधान वाटे, आणि ते याबद्दल अनेकवार अभिमानाचे उद्‌गार काढीत असत.

हरीभाऊंचे थोरले चिरंजीव भास्करराव व त्यांचे पाठचे भाऊ शिवरामपंत हे वर होते. गोविंदराव घरीं आमच्या माडीवरील दिवाणखान्यांत आल्यावर त्यांची व सीतारामपंत यांची डेक्कन कॉलेजांतील ओळख पटली. त्या कॉलेजांतील नाटकांत एक विवाह जुळवण्याचाच प्रसंग होता आणि ते दोघे विरुद्ध विरुद्ध पक्षांतील इतर वऱ्हाडी होते, तशीं कामे त्यांतीं केली होतीं ! ती आठवण निघाली, मुलगी पाहणें झालें. मुलगी पसंत असा निरोप आला! ( पत्रिका आधींच पाहिली जात असे, व ती पटल्यावरच मुलगी पाहण्याचा सभारंभ होई. ) आतां मुख्यत: शशीला पंचाईत पडली कीं तिचा नवरा होणार कोण ? भास्करराव कीं शिवरामपंत ? भास्कर हा तर शेजारच्या नामजोशांच्या बाबूचा मित्र, म्हणून काशी नामजोजी, आपण आपल्या सर्वांचाच मित्र ! तेव्हां याचेशींच विवाह व्हावयाचा काय ? आपण तर त्यास आतांपर्यंत 'अरे तुरे' करीत होतों ! ... त्याच सुमारास डॉ. हरीभाऊंनी श्री. पटवर्धन मामलेदार यांची मुलगी पसंत केली. त्याठिकाणीं मुलीस आईबाप वगैरे सर्व मंडळी होती. तेव्हां मानपान वगैरे सर्व होण्याचे दृष्टीनें तें कुटुंब आमच्यापेक्षां सरस होतें. आमच्याकडे काय ते चुलते होते. आणि त्यांसही त्यांची बायको नव्हतीच. म्हणून ही मुलगी त्यानी भावाकरितां पसंत केली; आणि शशी मी रत्नी, आमची भीति दूर झाली. भास्कर हा आमचा सर्वांचाच चांगल्या ओळखीचा, माझा तर मित्रच होता ! आणि शिवरामपंत देखील माझ्या ओळखीचे होतेच, पण कमी. भास्करराब २-३ वर्षे माझ्या वर्गांतलाच, नेहमी शेजारीं येणारा, असो. अशा प्रकारें वधू-परीक्षा पास होण्यापर्यंत ठीक झालें. पण पुढें विवाह ठरवण्याचें काय ?

सीतारामपंतांस हा कांहींच अनुभव नव्हता. तेव्हां त्यांनीं त्यांचे मित्र श्री. चिंतामणराव घारपुरे, बँकवाले यांस बरोबर नेण्याचें ठरवलें. कारण रानडे कॉन्ट्रॅक्टर्स हे त्यावेळीं फार मोठें व श्रीमान घराणें असें पुण्यांत प्रसिद्ध होतें. जवळ जवळ १२५-१५० मंडळींचें एक बडे कुटुंब होतें तें ! आणि त्या कुटुंबाशीं विवाहाचा सामना देण्यास आमचेकडे सीतारामपत, काशी आत्याबाई, मी व रत्नी अशीं केवळ चार माणसें ! विवाह ठरला मार्च सुरुवातीस; पण प्रत्यक्ष कार्य झालें मे मध्यें, वैशाखांत. मध्यंतरीं अवसर पुष्कळ मिळाला. तयारी करावयास. फाल्गुनांत व्हावयाचें होतें कार्य, पण या एवढ्या मोठ्या कुटुंबांत कोणी बाळंतिणी होणें, कोणी मृत्युही होणें, अशा नाना अडचणी असत. एक मुलगी मृत्यु पावली फाल्गुनांत. त्यामुळें कार्य लांबणीवर गेलें......पण प्रथम भीति वाटली, विवाहच मोडतो काय ! कांहींतरी कुणीतरी मुलीचा पायगुण वाईट ठरवावयाचे ! पण तसलें कांहीं घडलें नाहीं; आणि कार्य निर्विघ्न व उत्तम प्रकारें पार पडलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नोंद दि: ....................

नाना जिन्नस विकत घेणें, धान्य निवडून ठेवणें, कापड चोपड घेणें, वाजंत्री, गुरुजी, बँडवाले, आचारी, इत्यादि माणसें मिळवणें, त्यांचे ठराव करणें, निमंत्रण पत्रिका छापवून घेऊन त्या टपालांत टाकणें, गावांत वाटण्याची व्यवस्था करणें, एक ना दोन अनेक प्रकारचीं कामें अनुसंधान सांभाळून करून घ्यावयाचीं होतीं, व ती तशीं झालीं. माझी आतेबहीण त्यावेळच्या सौ. तापूताई दीक्षित (विश्रामबाग वाड्या शेजारचे वाड्याचे मालक आतां कैलासवासी झालेले श्री. अनंतराव दीक्षित यांच्या पत्नी) व त्यांचे मुलगे या मंडळींचा आम्हास चांगला उपयोग झाला. आमच्या घरासमोरच पेन्शनर मामलेदार श्री. पाध्ये यांचे मुलगे सुना यांचाही, कार्यांत, आम्हांस उपयोग झाला. माझी थोरली बहीण सौ. राधाबाई घारपुरे लग्नाचे आधीं एकच दिवस येऊं शकली, आणि चुलतभाऊ परशुराम ऊर्फ तात्या हा अचानकपणानें विवाहाच्या दिवशीं पहाटेस मद्रासहून आला. तो कांहीं ऑफिसच्या कामाकरितां मद्रास येथें गेला होता. माझे आजोबाच जणूं असे रा. ब. चिंतामणराव वैद्य हे मोठे मनुष्य म्हणून, शोभादायक, म्हणून होतेच. पण त्यांचा आचारी उत्तर हिंदुस्थानी "महाराज" मुन्नाराम हा एक दिवस अमोल उपयोगी पडला. विवाहाच्या चार दिवसांत एक दिवस नळ बंद होते. तेव्हां विवाहस्थळ म्हणजे विद्यापीठ वाडा (गाय आळी मध्यें सध्यां टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा हा वाडा आहे तो. पूर्वीं तो भूताचा वाडा म्हणून प्रसिद्ध असे. तेथें कोणीच राहत नसे. तो वाडा चिडगुप्पीकर या कोणा कर्नाटकीय गृहस्थांचा होता, व त्यांस लाभदायक न झाल्यानें रिकामाच असे. त्याची व्यवस्था चित्रशाळा प्रेसचे श्री. वासुकाका जोशी यांचे कडे होती. म्हणून आम्हास तो विनामूल्य वापरावयास मिळाला.) आणि आमचें राहतें घर गानूंचा वाडा. यांचेमधील जवळ जवळ ५०-६० याडांचे अंतरावरून विहिरीचें पाणी काढून कावडीने तें भरणें हे काम त्या एकट्या बहाद्दरानें केलें, आणि पाण्याची कसलीच टंचाई किंवा ओरड झाली नाहीं! तो म्हणाला 'याचे काय एवढें, आमच्या मुलुखांत किती तरी अंतरावरून पाणी आणावें लागतें! हें तर फार सोपें होतें काम." अशी कुठून कुठून माणसें जमत गेलीं आणि भरपूर सहकार्य मिळालें; कार्य उत्तम तऱ्हेनें पार पडलें! खरंच, एक राहिलेंच चिंतामणरावांचे चिरंजीव भालचंद्रराव (बी. ए.) फेलो डेक्कन कॉलेज यांनी जानई व्रवांची, त्यांचेकडे आले गेले त्यांची विचारपूस–चहा फराळ पुरवणें ही व्यवस्था चोखपणानें सांभाळली. तें कार्य आजच्या सारखें एक दिवस कार्यालय घेतलें, कॉन्ट्रॅक्ट दिलें झालें, असें नव्हतें. नवरा मुलगा पूरा चार दिवस घरीं राहिला. चवथे दिवशीं रात्रीं वरात निघाली. विवाह झाला सकाळीं १०॥चे सुमारास. मधेंच एक दिवस संकष्टी चतुर्थी आली, आणि त्या दिवशीं रानडे कुटुंबांत सर्वांस उपवास! ही वार्ता आयत्यावेळीं कळली. पण चक्का मिळवून श्रीखंडाचा बेत ही तशांत साधून घेतला!

## आमचें घर

दामले कुटुंबाचें असें स्वतःचें घर किंवा शेती जमीन नव्हतीच असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि सध्यांही पण नाहीं. राहुरी येथें माझे चुलत बंधू कै. परशुरामपंत यांनीं विकत घेऊन, दुरुस्त करून वापरलें, तें आज त्यांचे मुलांचें घर आहे, अपवाद म्हणून. पण केसोपंत, त्यांचे वडील, विठ्ठलपंत यांचेपासून सीतारामपंत यांचे पिढी-पर्यंत म्हणजे १८२५ ते १९२१ पर्यंतच्या जवळजवळ एका शतकांत आमच्या घराण्यास घर वा जमीन नव्हती. यासही एक अपवाद होता व तो मला १९२८ सालीं मी माझ्या वडिलांच्या आजोळीं म्हणजे केसोपंतांच्या सासुरवाडीस मु. मालदोली येथें ( माझ्या पंजोळीं-आजीचें माहेर ) श्री. महेश्वरपंत करंदीकर यांचेकडे गेलों असतां कळला. त्यांच्या राहत्या मोठया घराच्या पायथ्याजवळ एक सुमारें १२'x२५' असें जोतें मला दाखवण्यांत आलें. तेथें त्यावर एक घर होतें, तें श्री. गणुबाबा करंदीकर या माझे पंजोबानीं आपल्या मुलीस, जावयांस म्हणून दिलेलें घर होतें. त्याचबरोबर कांहीं मण भात पिकणारें एखाद दुसरें शेतही दिलेलें होतें. त्या घरीं चिंतोपंत वळगें सोडल्यावर म्हणजे १९०८-९ चे सुमारास जावून राहिले होते, आणि १९१०-११ मध्यें किंवा १२ अखेर पर्यंतही ते राहिले होते. नंतर ते बेलापूर जि. ठाणें याठिकाणीं श्री. मोने यांचे वाडयांत रहावयास आले. ते तेथेंच जवळजवळ ९-१० वर्षे होते. या घराव्यतिरिक्त दामले घराण्यास हक्कानें पाय ठेवण्यास घर वा जमीन कांहीं नव्हतें. तेव्हां ही परिस्थिति नाहीशी करावी, घराण्याचें घर असावें, व तें पुणे या महाराष्ट्राच्या राजधानी समजलें जाणाऱ्या शहरांत असावें, करावें अशी महत्त्वाकांक्षा सीतारामपंतांचे मनांत डोकावली. १९१०-११ सालाचे सुमारास पनवेल जवळ माझे वडील मोरोपंत यांनीं २॥-३ खंडी उत्पन्न येईल अशा जमिनी विकत घेतल्या आणि १०-१२ खंडी उत्पन्न येणारी जमीन ७-८ हजार रुपयांत बेलापूर येथें विकत घेण्याचा त्यांचा विचार होता. त्याचप्रमाणें दोन गहाण जमिनी पनवेल जवळच त्यांनीं घेतलेल्या होत्या. म्हणजे एके प्रकारें दामले घराण्यास आसरा निर्माण करण्याचा त्यांचा बेत होता, अल्पसा आसरा त्यांनीं निर्माण केला होता, पण "भवितव्यता बलीयसी" या न्यायानें त्यांचे ते बेत फसले होते.

घर करण्याचे, नवेंच बांधण्याचे विचार नक्की केव्हांपासून त्यांचे डोक्यांत आले हें सांगतां येत नाहीं. पण बहुधा १९१७ सालीं म्हणजे सौ. जानकीकाकूच्या मृत्युनंतर त्यानीं सध्याच्या टिळक रस्त्यास महाराष्ट्रीय मंडळापासून तों साहित्य परिषदेची इमारत या दरम्यान साधारण मधोमध एक जागा दर फुटास ५ आणे या दरानें डॉ. गर्दे यांचे बखळींमधील घेण्याचें साठेखत केलेलें होतें. ती जागा आम्ही पाहिली होती. ती जागा संभाव्य टिळक रस्त्यांत पुष्कळशी कापली जाईल अशी माहिती साठेखत झाल्यावर कळल्यामुळें तो करार पुढें सीतारामपंतांनीं पूरा केला नाहीं. श्री. गोखले यानीं त्यांचें शेजारचो जागा घेतलेली होती, त्यानींच पुढें तो प्लॉट, मोकळी जागा विकत घेतली. ती जागा अंदाजानें ४५०० ते ५००० फूट होती. आणि त्याचा एक कोपरा ६००–७०० फूट जागाच फक्त टिळक रस्त्यांत गेली ! ही चांगली मोक्यावरची जागा अशा-प्रकारें त्यानीं गमावली... पण लौकरच १९१८ चे अखेर अखेर श्री. नरसोबाच्या देवळाच्या पिछाडीस 'रंगशाळा' म्हणून एक मोठी बखळ होती. तिचा १/६ भाग अंदाजें १२५'x३७' असा भाग दर रुपयास ३ चौरस फूट या दरानें सीताराम-पंतांनीं विकत घेतला. तो. श्री. आगाशे या त्या काळच्या तुळशीबागेच्या बोळां-तील बायसिकल दुरुस्ती करणाऱ्या एका दुकानदारांचा होता. त्यानीं त्याचे दुप्पट भाग केवळ सहाशें रुपयास व आमचे आधीं १।२ वर्षेच घेतलेला होता. आमच्या एवढाच भाग आमच्या आधीं अंदाजे ६ महिने त्यानें श्री. लिमये यांस ८०० रुपये ते १००० रुपये अशा कांहीं किंमतीस विकला होता ! अशाप्रकारें जागा खरेदी तर झाली. आतां वर इमला बांधावयाचा, केव्हां, कसा, इत्यादि विचार त्यांचे डोक्यांत त्या नंतर घोळूं लागले.

दरम्यानच्या काळांत म्हणजे १९१९ च्या मे मध्यें शशिकलाचा विवाह हा एक खर्चाचा मोठा भाग झाला. तरीही घर बांधण्याचे त्यांचे विचार जोर करूं लागले. १९२०-२१ सालांतच केव्हांतरी (मला आतां नक्की महिना आठवत नाहीं. पण लो. टिळक यांचे निधनानंतरच असेल.) ते आजारी पडले होते. पोटांत आतले बाजूस तोंड असलेलें गळू झाले होतें. आधीं ताप वगैरे असे; पण मित्र कवडेशास्त्री, डॉ. गणपतराव सहस्त्रबुद्धे यांस त्या तापाचा प्रथम कांहीं सुगावा लागला नाहीं. पोट थोडे फुगलें होतें, दुखत असे एवढेंच! तेव्हां त्यावेळीं पुण्यांत नवीनच आलेले डॉ. टी. एन्. चिपळूणकर (प्रख्यात निबंधमालाकार विष्णुशास्त्री यांचे बंधूचे नातू) सर्जन यांस प्रकृति दाखवल्यानंतर त्यानीं गळू आहे, तें शस्त्रक्रिया करून कापलें पाहिजे अशी माहिती दिली. डॉ. चिपळूणकर हे इंग्लंड-मध्यें वैद्यक शास्त्राचें शिक्षण घेऊन लंडन येथील कांहीं इस्पितळांमधून हाऊस सर्जनचें काम करून पुष्कळ अनुभव व हुशारी मिळवलेले सर्जन होते. पुढें त्यांना

पुण्यांतील व ससून इस्पितळांतील एक नामांकित सर्जन म्हणून किर्ति मिळाली. त्यांचे घरोंच त्यानी नुकत्याच उघडलेल्या इस्पितळांत (पुणें मराठी ग्रंथ-संग्रहालय, नारायणपेठ, डोलकर आळी ) येथें त्यांचेवर शस्त्रक्रिया करण्यांत आली. आणि ते दीड दोन महिन्यांचे आजारांतून उठले.

या आजारामधून पूर्ण बरे झाल्यावर तर त्यांचा घर बांधण्याचा विचार जोर करूं लागला आणि १९२० च्या नोव्हेंबर डिसेंबरांत केव्हांतरी तो पक्का होवून त्याप्रमाणें घराचा प्लॅन (नकाशा) म्युनिसिपालिटीमध्यें परवानगी करितां पाठवण्यांत आला. घर बांधणीचें कॉन्ट्रॅक्ट देण्यांत आलें. घराचा प्लॅन, आराखडा, आमचा आम्हीच तयार केला होता. समोरच्या बाजूस चांगलें ३० फूट आंगण ठेवले होतें. एका बाजूस घराच्या मोऱ्या जाव्यात बाहेरच्या बाजूनेंच म्हणून दोन फुटांचा बोळ, व दुसऱ्या बाजूस ५ फूटांचा बोळ, ( एखादे म्हशी सारखें जनावर, किंवा कांहीं लाकूड फाटा अन्य सामान नेण्या-आणण्यास, बाहेरच्या बाहेरचा रस्ता म्हणून) असे दोन बोळ सोडण्यांत येऊन उरलेल्या रुंदीच्या ३० फूट जागेंत तिघई घर होतें. पुढें मधोमध ४।५ फूट रुंदीचा बोळ किंवा रस्तां आणि दोन बाजूस १०x१० अशा दोन खोल्या, मधल्या बोळाचे समोर प्रवेशद्वार (या भागाचें जोते १ फूट जास्त उंच, एकूण २॥ फूट उंचीचें होतें) त्या द्वारांतून आंत गेल्यावर मोठा १३'x२७' फूट असा हॉल किंवा दिवाणखाना. त्या हॉलच्या पलीकडच्या बाजूस ११"x१५" आणि ११"x१२" अशा दोन खोल्या. प्रत्येक खोलींत जाण्यास हॉल मधून दारें आणि त्या खोल्यांतून एकमेकींत जावयास ही एक दार. त्यांतील लहान खोलींतून पुढें एकदम मागच्या अंगणांतच प्रवेश व्हायचा. अणि मोठ्या खोलीस काटकोन करून समोर दारातून पुढें गेल्यावर एक फूट कमी उंचींच्या जोत्यावर १०'x२०' असें स्वयंपाकघर असा हा बंगल्याचा आराखडा होता. म्हणजे एक मोठा हॉल, व मोठें स्वयंपाक घर, आणि इतर ४ खोल्या होत्या. इमारत बांधकाम शास्त्राच्या भाषेंत सांगावयाचे तर अंदाजे ३०'x४०' एवढा मूख्य भाग व अंदाजे १३'x२१' असा त्यास जोडलेला भाग, एकूण १४५० ते १५०० चौरस फूट बांधकाम होतें. शिवाय दोन पायखाने मुख्य इमारतीपासून दूर अंतरावर मागच्या हद्दीजवळ आणि त्यांचे सांडपाणी साठवल्याचा खड्डा सेप्टपूल. इमारतीला एकूण १२ खिडक्या ३'x६' मापाच्या आणि ९ दरवाजे ७'x३' मापाचे होते. फडताळें ६'x३' मापाचीं ७ होतें. या शिवाय स्वयंपाक घरांत ३'x३' अशी मोठी उंच कठडा असणारी मोरी होती. कोनाडे वगैरे अपवादात्मकच २।३ असल्यास असतील. कपडे वाळत घालावयास दांड्या वगैरे कांही नव्हत्या! त्यांची सोय आम्हीच कशी तरी घरांत रहावयास गेल्यावर करून घेतली! एकूण बंगला सर्व साहेबी थाटाचा होता. किंवा सरकारी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.......................... दि: ..........................
क्रमांक .......................... नोंद दि: ..........................

अधिकाऱ्यांचे गांवाबाहेरील दगडी बंगले असावेत त्याच तऱ्हेचा बांधकामाचा थाट होता. बांधकामही दर्शनी बाजूस खांडकीचा काळा दगड, मळलेला चुना, सिमेंटच्या दरजा, आतले अंगास साधा अनघड दगडच. कपाटांच्या बाजूस दारें खिडक्यांच्या चौकटीजवळ आवश्यक तेवढेंच वीटकाम. अशा या बंगल्याचें कंत्राट श्री. दत्तोपंत राहतेकर या गृहस्थांस देण्यांत आलें. मध्यस्त श्री. कृष्णराव टोकेकर कॉन्ट्रॅक्टर होते. या कामास मुदत सहा महिने आणि काम एकूण रुपये ६॥ हजार रुपयांचें (खरें सहाच हजारांचे, पण वरचे अडीचशें बक्षिसी वगैरे कांहींही समजावयाचें) असा ठराव झाला होता. कामास सुरुवात १९२० च्या डिसेंबरांत नाताळचे आधीं केव्हां तरी झाली, आणि आमचा पहिला स्वयंपाक २२ जून १९२१ चे रात्रीं त्या घरांत झाला!

आजकालचें सिमेंट कॉंक्रीटचें बांधकाम त्यावेळीं अज्ञात होतें. खालीं मुरुम लागेपर्यंत अंदाजें ६ फूट पाया खोदण्यांत आला. वरच्या भिंती दीड फूटाच्या म्हणून पाया चांगला २॥ फूटांचा रुंद होता. तळाशीं जाड खडी व चुना यांचा जवळजवळ पाऊण फूट, एक फूट असा थर देण्यांत येऊन तो धुमसानें ठोकून काढण्यांत आल्यावर मग दगडी पाया झाला. जमिनीच्या पातळीपासून पुढें दर्शनी भागास काळी खांडकी व आंतल्या अगास रबल दगड असें काम चालू झालें. जोत्याचे वेळीं आणि आढ्याचेवेळीं पूजा करण्यांत आली. दोन्ही वेळां पूजा माझ्या हातून झाली. पाया खोदलेला आम्ही पाहिल्यावर "खोल्या फारच लहान होतील" हें कसलें घर वगैरे आम्हीं बडबडूं लागलों. पण पुढें कळलें कीं, उघड्या जागेंत हें असेंच वाटत असतें. खोल्या फार लहान वाटतात. आणि अनुभव नें तें पटलें देखील.

आमच्या आवारांत विहीर होतीच. आणि चुना व दगड याची इमारत होत होती. पाण्याचा भरपूर मारा होत होता, म्हणून बांधकाम चांगलें मजबूत होत होतें. त्याच वेळेस विरुद्ध पक्षाचे देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांचा पेरुगेट-जवळचा बळवंताश्रम हा बंगला श्री. कृष्णराव साठे कॉंट्रॅक्टर बांधत होते. त्या बांधकामाची व आमच्या बांधकामाची, विनाकारणच, कॉंट्रॅक्टर व सीतारामपंत आणि श्री. टोकेकर, हे निष्कारण तुलना करीत असत. त्यांत तुलना करण्यासारखें विशेष कांहीं नव्हतें. दोन्ही दगडी कामें एवढेंच, दोन्ही बंगलेच, पण त्यास आमच्या मानानें खर्च बराच चालला होता असें बोललें जाई. आमच्या चुन्याची निष्कारण प्रशंसा होई--- मला आतां हें असें वाटतें. त्यावेळींही मी या असल्या तुलनेंत रस घेत असे! पण जसजसें घर वरवर येऊं लागलें तसतसें तें बरें दिसूं लागलें. आवडूं लागलें--मार्च अखेरपर्यंत ८-९ फूट असें बांधकाम वर आलें. आणि पुढें हळूहळूं कामास मंदपणा येऊं लागला. दर आठवड्यास २५०-३०० रुपयांचा मलिदा कॉंट्रॅक्टरांस चालला होता--पैसे, ठरावाप्रमाणें ठरलेले संपत आले. पण

काम मात्र मंदाऊ लागले ! तेव्हां सीतारामपंत चिंताक्रांत दिसूं लागले. छप्पर कसें बसवावयाचें याची श्री. राहतेकर यांस थोडी पंचाईत पडूं लागली असावी. मधल्या हॉलच्या भिंती खूप वरवर चढूं लागल्या. त्या जवळजवळ १५ फूट उंच गेल्या-- छप्पर मंगलोरी कौलांचें असें ठरलें होतें. श्री. राहतेकर यांस दगड, खडी, फकी वगैरे मिळूं शकत असत. पण लाकूड व्यापाऱ्यांकडे त्यांची पत नसावी. लाकूड, घनफूटाचा दर ही जास्त होता. आणि त्यामुळें नाडच्या आखडल्या. पैसे जास्त हवेत असें ते म्हणूं लागले; आणि कराराप्रमाणें पैसे पुरवण्याचें कारण तसें नव्हतें. मला वाटतें, मध्यस्त कॉंट्रॅक्टर श्री. के. जी. टोकेकर यांचीहि पंचाईत होत असावी. अखेरीस सीतारामपंत व श्री. राहतेकर यांच्या या तंटयांत तेच मध्यस्त ठरले; आणि कॉंट्रॅक्टची रक्कम आठ हजारपर्यंत वाढवण्यांत आली ! त्याप्रमाणें हळूंहळूं रक्कम सुटूं लागली आणि कैंच्या, बॅटन वगैरे बसूं लागून मंगलोरी कौलें बसलीं. पण खिडक्या दारें यांच्या झडपांचा दारांचा पत्ताच दिसेना. यावेळीं सीतारामपंत शहाणे झाले असावेत; आणि त्यांनीं पुरे पैसे द्यावयाचे ठेवले असावेत. त्याचप्रमाणें कॉंट्रॅक्टरांचा कावा, घराचा ताबा न देण्याचा असावा, तोहि त्यांनीं ओळखला असावा. त्यांनीं त्यांस कोणता धाक दाखवला त्यांचा त्यांस माहीत. पण मुख्य म्हणजे बाहेरच्या अंगास असलेल्या चार दारांस झडपा, फळया लावून देण्याची निकड लावून तीं बसतीं झाल्यावर आणि भिंतींचा गिलावा चुन्याचा न सनला सर्व घराचाच, ( बहुधा बाहेरच्या खोल्या शिल्लक राहिलेल्या ) झाल्यावर, जमीन मातीचीच चोपून तयार करून घेऊन आमचें श्री. गानू यांचे घरांतील सामान हलवून घराचा ताबा घेऊन आम्हीं घरांत रहावयास आलों! दि. २२ जून १९२१ च्या रात्रीं पहिला स्वयंपाक स्वतःच्या घरांत केला.

इतर दारांच्या झडपा, खिडक्यांच्या झडपा इत्यादी कामें पुढें जवळ जवळ दोन महिने चालूंच होतीं. कपाटांच्या चौकटी, व त्यांस दारें झडपा या पुढें दिवाळीच्या सुमारास केव्हांतरी बसल्या! खिडक्यांस जाड लोखंडी गज होते म्हणून झडपांची एवढी जरुरी वाटली नाहीं. शिवाय घर एकीकडे होतें, शेजार जवळजवळ नव्हताच, पण एक थोडा तिखट मोत्या कुत्रा होता. म्हणून आम्हांस तशी भीति वाटली नाहीं.

यापुढें कॉन्ट्रॅक्टरानें जवळ जवळ कांहींच काम केलें नाहीं. पैसे मात्र पुरे आठ हजार द्यावे लागले! याहून ही जास्त पैसे दिल्यासच पुढचीं राहिलेलीं कामें होणार होतीं!

दिवाळीचे सुट्टींत चुना देणें आमचे आम्हींच खपून दिला. आणि हॉलच्याकरितां फक्त तो फारच उंच (जवळ जवळ १७।१८ फूट होता) त्याकरितां एक

बुधवाऱ्या गडी आणून शिडीवर त्यास चढवून उंच उंज भाग त्याचेकडून देववला. मला वाटतें १९२२ साल अखेर किंवा नंतरही असेल केव्हां तरी हबक आदि तेलिया रंग ब्रश आदि साहित्य आणवून खिडक्यांच्या लोखंडी सळ्या, दारांच्या, खिडक्यांच्या झडपा वगैरेंस ऑईल पेंट आम्हीच घरीं तयार करून दिला बाहेरच्या उत्तरेकडच्या खोलीस फरशी तर स्वतः सीतारामपंत हेच गवंडी व हेच हाताखालचे गडी, बाई झाले; आणि फरशी, चुना आणवून ती फरशी त्यानीं स्वतःच बसवली! या बाबतींत त्यांचे व माझें थोडें भांडण झाले होतें. ही जरा अवजड व थोडी कसबीं कामें योग्य ती माणसें लावूनच सवडी सवडीनें करावींत असे माझे विचार होते. रंग सफेती, ऑइल पेंट हीं कामें मी रत्नी, आम्ही हौसेनें पुष्कळ केलीं!

पुढच्या खोल्यांवर चांगलें छप्पर, फरशी केलेली नव्हती. नुसत्या लाकडी तुळ्या, फळ्या व वर चुना आदि मळमा सुमारे ८।१० इंच पसरलेला होता. तेव्हां त्या सर्व भागास पुरतील एवढे नळीचे पत्रे आणवून ते भिंतीच्या बाजूस खालीं अंतरा अंतरावर विटा, दणकट फळ्या टाकून १० फुटी पत्रे जुळवून आंथरून द्यावे लागले. त्यामुळें त्या खोल्या मग कोरड्या झाल्या...वानरांच्या झुंडीच्या झुंडी येत. कौलेघरांवरून आणि शेजारच्या झाडांवर जात येत, उड्या टाकत. म्हणून मधून मधून कौलें फुटत असत. पावसाळ्यांत छप्परावर चढून फुटकें कौल बदलून नवें बसवणें हा उपद्व्याप सुरू होई. जेथें सांधे होते छप्पराला, तेथें पत्रे घातलेले होतें. पण कौले संपली कीं शेवटी चुन्यानें गोट बांधणें, वगैरे छप्परासंबंधींचीं शास्त्रशुद्ध कामें झालेलीं नसल्यामुळें हें घर सारखें पावसाळ्यांत गळे, व त्याचा त्रास होई.!

त्यांतच एकूण घर ओलें होतें. त्यांतच पावसाळ्यांत आम्ही रहाबयास गेलेले त्यामुळें जवळ जमळ सर्वच माणसांस मलेरियाचा ताप जडला. कोणी ना कोणी तापानें आजारी असेच. कोयनेलचा सारखा मारा चालू ठेवावा लागे. मला वाटतें परसूतात्याही त्यावेळीं घरींच होता ... पण एवढें असूनही आमच्याकडे या सुरुवातीच्या ५-६ वर्षांत कधीं कसली चोरी झाली नाहीं, किंवा सायंकाळी रात्रीं आम्हांस भीति वाटली नाहीं. पुढें ३-४ वर्षांनी आमच्या पाठीमागें घरें होवूं लागली आणि भीति कमी होवूं लागली.

याच काळांत मुळशीचा सत्याग्रह झाला. ७ मे १९२२ रोजीं सीतारामपंतांस सहा महिन्याची सक्त मजूरीची शिक्षा झाली ते नोव्हेंबरांत सुटून आले. डिसेंबर अखेर त्यांनी 'राजकारण' वर्तमानपत्र बंद केलें. या वर्तमान पत्राचेच पैसे हाताशीं येत ते बहुधा सीतारामपंत यानी कॉन्ट्रॅक्टर राहतेकर यांस दिलेले असावेत. आतां वर्तमानपत्री कागदाच्या पैशांचें देणें झालेलें होतें. ते मला वाटतें 'आनंद' छापखान्याचे श्री. जोशी यांचें व 'चित्रशाळेचें' मोठ्या प्रमाणांत देणें

राहिलेलें असावें. पण १९२७ त त्यांचे मृत्यूनंतर चित्रशाळेकडून त्यांचे देवघेवीचे व्यवहाराचा, हिशोब आला त्यांत ते निष्कर्जी मरण पावल्याचें आढळलें. कोणाचेंच कसलेंही देणें शिल्लक राहिलेलें नव्हतें.

घर बांधतांना, कुणीतरी मृत्यू पावतो, तें लाभत नाहीं बहुधा, असें म्हणतात. तसें म्हटलें तर घराची घरभरणी, वास्तुशांत, किंवा अन्य कांहीं वास्तु-देवतेला अर्पण असें कांहीं केलेलें नव्हतें. घरीं कधीं कांहीं फारसें धर्मकृत्य, सत्य-नारायण देखील होत नसत. म्हणून कोणी ब्राम्हण जेवले आहेत असेंही बहुधा घडले नाहीं. तरीही माझ्या माहितीं प्रमाणें १९२१ ते १९६० पर्यंत जवळ जवळ ४० वर्षात त्यांचे स्वतःचा मृत्यू १४ ऑक्टोबरची रात्र किंवा १५ ची पहाट, वेळ सुमारें १॥–१॥। वाजतां झाला तो एकच मृत्यू झाला. तो अपघाती असा नव्हे. त्याची चाहूल यांस स्वतःस चांगली लागली असबी असें त्यांची डायरी सांगते! ... घरांत जन्मही, माझी थोरली बहीण राधाबाई घारपुरे हिला १९२४ ज्या जूनच्या २१–२२ तारखेस एक मुलगा चि. शरद्‌चंद्र झाला होता, तो एकच असावा या काळांत. किंवा मध्यंतरी श्री. मामाराव दाते (माजी ‘ काळ ’ कर्ते) यांचे बिऱ्हाड १९३१ ते १९३९ पर्यंत असतांना आणखी कांहीं झाला असल्यास माहीत नाही... अशा प्रकारें घराचा चांगलेपणा, वाईटपणा आम्हांस भोवला नाही. आढळला नाहीं. उलट १९५९ मध्यें मी घर विकल्यावर सध्यांचे मालक श्री. भोंग हे घराच्या वास्तुवर खूष आहेत, त्यांस ते लाभलें, असें त्यांचेच तोंडून ऐकलें!

सीतारामपंतांच्या मृत्यूनंतर मी स्वतः देखील घरावर किरकोळ स्वरूपाचा म्हणता म्हणतां जवळ जवळ एक हजार, बाराशेंचा खर्च केला होता. नहाणी घरें नळ आणणें, साधे पायखाने फ्लशचे करणें आंगणांत भर घालून घेणें, वगैरे हे खर्च होते...

या घराच्या निमित्तानें म्हणा, किंवा वर्तमानपत्राच्या निमित्तानें म्हणा सीतारामपंतांस सरकारी प्रॉमिसरी नोटस् माझ्या म्हणून रुपये ५००० च्या, त्यांचे मालकीच्या रु. २००० च्या पोर्ट ट्रस्ट (मुंबई) चे रु. २००० चे बॉन्डस् आणि त्यांचे पत्नीचे अंगावरचे कमींत कमी २५–३० तोळे सोने - गोठ पाटल्या-विकावे लागले. आणि त्यांचे भरीस त्यांनी कवि केशवसुत यांचे काव्यसंग्रहाच्या दोन आवृत्ति १९२१ व १९२७ मध्यें चित्रशाळे मार्फत काढल्या त्यांचे कॉपीराइट बद्दल प्रत्येकी रुपये ५००–५०० मिळून हजार देखील या घराप्रीत्यर्थ घालावे लागले त्यांची स्वतःची जी कांही रोकड शिल्लक असेल तर ती सर्व संपुष्टांत आली...त्यामुळें एका प्रकारें ‘ घर बांधणें ’ हा प्रकार त्यांस चांगलाच भोवला म्हणावयास हरकत नाहीं. जरी बाहेरचें असें त्यांस कर्ज शिल्लक राहिलें नाहीं, आणि माझ्या पैशांपैकींही कांही भाग खर्च करावा लागला असला, तरी

त्यांचे दृष्टीनें व माझे दृष्टीनेंही ते व मी भिन्न नव्हतों. पण कवि केशवसुत यांचे काव्यसंग्रहाचे निमित्तानें जे रुपये एक हजार त्यांस घरांत घालावे लागले ते एका प्रकारें त्यांचे थोरले बंधू कृष्णाजीपंत किंवा 'केशवसुत' यांचें, त्यांचे मुलींचें, ऋणच होय असें श्रेष्ठ नीतिमत्तेचश दृष्टीनें ठरतें. मी व श्री. परशुरामपंत दामले किंवा त्यांचे वडील चिंतोपंत हे त्यांचे आर्थिक दृष्टीनें वारस होतों. सीताराम-पंताचें मृत्यूनंतर मला जरी घर मिळालें, पूर्ण हक्कानें, तरी सीतारामपंत यांची इस्टेट म्हणून आणि घराचा त्यांचा भागाचा मोबदला म्हणून माझ्या जमिनी, गहाण जमिनी या सर्व चिंतोपंतांस मिळाल्या. पुढें ही परशुरामपंत यानीं काव्याच्या आवृत्ति काढल्या, पण केशवसुत यांचे मुलींस किंवा त्यांचे वंशजांस त्यापैकीं कांही मिळालें नाहीं हें सत्य आहे. एक प्रकारें माझेकडे हा बोजा कांहीं उरला नव्हता, तर परशुरामपतांकडे होता. पण तो त्यांनी पार पाडला नाहीं.

## सीतारामपंतांचें राजकारण

सीतारामपंत १९०३–०४ सालीं एल.एल. बी. झाल्यावर त्यांनीं राज-कारणाकडे आपला मोर्चा निश्चितपणानें वळवला असावा. कदाचित् त्याचे आधीं १–२ वर्षें, जेंव्हां ते "इंदुप्रकाश" आणि "सयाजी-विजय" या थोड्या फार नेमस्तच वर्तमानपत्रांत संपादनाचें काम करूं लागले तेव्हांपासूनच आपाततः त्यांस राजकारणाचा विचार, लेखन करावें लागलें असेल. त्याचे आधीं आणि B. A. ची पदवी घेतल्यानंतर त्यांनीं M. A. चा इतिहास व राज्यशास्त्र ( History & Politics ) या विषयांचा बराच अभ्यास केलेला होता, आणि त्याचा परिपाक म्हणून ते राजकारण, प्रत्यक्ष देशाचें राजकारण करणें. याकडे वळले असावेत.

१९०५ किंवा ४ असेल; ज्या सालीं बनारस येथें अखिल भारतीय कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें होतें त्यावेळीं, त्या अधिवेशनास ते त्यांचे सासरे रावबहादूर चिंतामण विनायक वैद्य यांचे बरोबर, हजर राहिले होते. चिंतामणराव व त्यांचे ३।४ स्नेहीं, एक आचारी असा एकूण सरंजाम होता, एका बंगल्यांत मंडळी उतरली होती......त्यावेळचें कॉंग्रेसचें अधिवेशन आजकालच्या अधिवेशनांपेक्षां अगदीं निराळ्या स्वरुपाचें असे. तें अधिवेशन Arm-chair Politicians, किंवा Politics एक फुरसतीचा विषय करणाऱ्या पुढाऱ्यांचा मेळावा असे. २५०–३०० थोडी श्रीमान् पण देशाबद्दल मनांत कळकळ असणारी, पण

प्रत्यक्ष विशेष कांहीं न करणाऱ्या अशा मंडळींचा, बुद्धिमानांचा, मेळावा असे. त्यावेळीं सुरेख इंग्रजी भाषणें होत. कागदावर सुरेख दिसतील असे, मोठ्या सनदी नोकऱ्या, हायकोर्टाच्या जज्जांच्या नोकऱ्या, कायदेमंडळांत जास्त जागा, बिलें आणणें, प्रश्न विचारणें, पुनः प्रश्न विचारणें अशांसारखे हक्क मिळावेत म्हणून अर्ज-विनंत्या करणारे, ठराव होत. मंडळी ठिकठिकाणीं परत जात. ज्यांचे हाताशीं वर्तमानपत्र असे किंवा जे कायदे मंडळांत असत ते वर्षभर थोडें जास्त कार्य करीत लेखांचे, भाषणांचे द्वारें,... आणि पुनः पुढच्या वर्षी दुसऱ्या एखाद्या शहरीं असाच मेळावा भरला जाई. असें स्वरुप होतें, भारतीय काँग्रेसचें, पहिल्या २०-२२ वर्षें पर्यंत, म्हणजे १८८५ ते १९०५-६ पर्यंत. पुढें तें स्वरूप हळुहळू पालटत चाललें. १९०८ मध्यें सुरतेस काँग्रेस मोडली, आणि १९१६ पर्यंत निष्प्रभ राहिली. १९१५-१६ मध्यें तिच्यांत लो. टिळक, अॅनी बेझंट आदि जहाल पुढारी, Indian Home-rule ची चळवळ करणारे, शिरले; आणि त्या संस्थेस थोडें तेज चढत चाललें......

१९०५ सालभर सीतारामपंत पुण्यांत असले पाहिजेत. कारण त्या सर्व सालभर ते फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्याचे आधीं १९०४ मध्यें निदान ४।६ महिने तरी ते लो. टिळक यांच्या इंग्रजी "मराठा", या आठवडी पत्रांत, लेख लिहीत होते. या त्यांच्या इंग्रजी लेखांमुळें नेमस्त पुढारी ना. गोपाळराव गोखले यानीं त्यांस स्वतःचे भेटीस बोलावलें. त्यांचें इंग्रजी भाषेवरील नैपुण्य नामदारांस आवडलें. ते त्यावेळीं फर्ग्युसन कॉलेज सोडून 'भारत सेवक समाज', 'Servants of India Society' काढण्याच्या नादांत होते. त्यांस बुद्धिमान, राजकारणांत लक्ष घालणारे, धडाडीचे तरुण हवे होते, अशांच्या शोधांत ते होते. तेव्हां साहजिकच ग्वाल्हेरचे सरन्यायाधीश, रावबहादूर चिंतामण विनायक वैद्य यांचे जावई, इंग्रजीचे स्कॉलर, सीतारामपंत यांचेकडे त्यांची नजर गेली. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कर्तबगारी त्यांस पसंत पडली. आणि ते प्रोफेसर नेमले गेले. याच काळांत त्यांचेकडे ज्ञानप्रकाशचें संपादनही होतें थोडें. पण त्या वर्षभरांत सीतारामपंतांचे प्रकृतीला नामदार गोखले आणि त्यांच्या प्रभावळींतील फर्ग्युसनमधील नेमस्त वृत्तीची प्रोफेसर मंडळी कै. रँग्लर परांजपे, कै प्रि. केशवराव कानिटकर, कै. हरीभाऊ लिमये, कै. वामनराव काळे वगैरे मंडळींचे नेमस्त राजकारण पसंत पडलें नसावें. म्हणून ते फर्ग्युसन कॉलेजांतील प्रोफेसरीचा राजीनामा देऊन लो. टिळक यांच्या जहाल पक्षाकडे वळले. त्या काळांत दारूबंदी व्हावी म्हणून 'मद्यपान निषेधा'ची चळवळ पुण्यांत चालत असे. त्या चळवळीचा प्राण कै. शंकरराव लवाटे म्हणून एक गृहस्थ होते. त्यांस भारतीय 'Pussy Foot Johnson' ही पदवी पुढें मिळाली होती. ते

आणि लो. टिळक यांच्या पक्षांतील तरुण मंडळी पुण्यांतील निरनिराळ्या दारूच्या गुत्त्यांचे जवळ उभे राहून दारू पिण्यास जाणाऱ्या कंगाल, मजूर, भिकार, ब्राम्हणेतर लोकांचीं आर्जवें करून ' तुम्ही या गुत्यांत जावू नका, दारू पिऊं नका, दारू शरीरास अपायकारक आहे ' वगैरे उपदेश करीत. श्री. लवाटे हे तर भजनें कीर्तनें ही करीत असत, या मद्यपान निषधाच्या मोहिमेप्रीत्यर्थ, जवळजवळ १६–१७ सालपर्यंत! त्यावेळीं या चळवळीस ' सत्याग्रह ' हें भव्य नांव मिळालें नव्हतें. त्या कृत्यास ' पिकेटिंग ' म्हणत असत. पण त्याचें स्वरूप व त्या चळ–वळीचें वळण होतें सत्याग्रहाचेंच. स्वाभाविकपणानें दारू मक्तेदार ' पिठे ' मालक, श्रीमान पारशी यांस, सरकारी पाठबळ मिळूं लागलें. पोलीस गुत्त्यां–जवळ येत, आणि ' पिकेटिंग ' करणाऱ्यांस पकडून नेत, खटला करीत; त्यांस दंड व कैद अशी शिक्षा होई. या चळवळींत बहुतेक टिळक भक्तांनीं भाग घेतलेला होता. तसा सीतारामपंत यांनींही भाग घेतला होता. अशा प्रकारें ते प्रत्यक्ष राजकीय चळवळींत भाग घेऊं लागले.

" संपादक सीतारामपंत ", या प्रकरणांत त्यांचे राजकारणाचा कांहीं भाग येऊन गेलेला आहे. म्हणून त्यांतल्या गोष्टीं वगळून, किंवा अन्य प्रकरणां-मधून आलेला भाग वगळून इतर भाग आतां लिहीन.

सीतारामपंत हे साधारण पणानें १९०७ पासून चांगले, कट्टे लो. टिळक–भक्त झाले. सुरतेची काँग्रेस होण्यापूर्वी काँग्रेस नागपूरास करावी, त्या अधि-वेशनाचे अध्यक्ष लो. टिळक असावेत, असे विचार सुरू होते. नागपूरास त्या अधिवेशनाचे तयारीसाटीं असेल सीतारामपंत २–३ वेळां नागपूरांत येऊन गेले होते. सुरतेच्या बनावाची अधिवेशनांत, झालेल्या मारामारीची हकीकत सीताराम-पतांच्या तोंडून ऐकलेली आहे. त्या मारामारींत भाग घेतलेल्या लोकमान्य भक्तांत ते होते, एक.त्यानंतरच पुढें " राष्ट्रमत " चा जन्म झाला.

लो. टिळक मंडालेहून सुटून आल्यावर, १९१५ मध्यें त्यांनीं मुंबई इलाख्याची, राजकीय परिषद १९१५ च्या मे महिन्यांत मुंबईचे बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा यांचे अध्यक्षतेखालीं भरवली. त्या परिषदेचे चिटणीस होते, न. चिं. केळकर, दा. व्यं. गोखले, ल. ब. भोपटकर, श्री. पेटकर वकील, व सीतारामपंत अशा या पांच जणांच्या चिटणीशी खालीं आणि क्रांतिकारक ग. डॉ. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या स्वागताध्यक्षत्वाखालीं ही परिषद किर्लोस्कर थिएटरमध्यें भरली होती. थिएटर चिक्कार भरत असे, आणि या परिषदेमध्येंच बहुधा लो. टिळक यांच्या Home-Rule League ची प्रत्यक्ष स्थापना जरी नाहीं तरी त्या संघटनेचा विचार झाला. अध्यक्ष बॅ. बॅप्टिस्टा यांचें स्वागत पुण्याच्या स्टेशनवर झाल्यानंतर यंडगार्डन रस्त्यावरच्या एका प्रशस्त बंगल्यांत त्यांची राहण्याची

व्यवस्था करण्यांत आली होती. परिषदेच्या चिटणीसांचा पुतण्या म्हणून त्यांचे पाठोपाठ माझा ही शिरकाव होत असे, बहुतेक महत्त्वाच्या ठिकाणीं, आणि प्रसंगीं. पण त्यावेळीं मी जेमतेम बारा वर्षाचा आणि सध्यांच्या ८ वीत गेलेला विद्यार्थी. तेव्हां समज तो काय असणार मला ?

त्या परिषदेचा अहवाल पुढें २।३ महिन्यांनी तयार झाला; तें काम सीतारामपंतांनीं केलें.

१९१६ सालीं अहमदनगर येथें केलेल्या कांहीं भाषणांबद्दल राजद्रोहा-सारख्या आरोपाखालीं लो. टिळकांवर सरकारनें एक खटला केला होता. त्या खटल्यांत लो. टिळकांचे पुण्याच्या कोर्टांत वकील म्हणून काम करण्याची संधि सीतारामपंतांस मिळालेली होती.

१९१६ च्या डिसेंबरांत लखनौ येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत टिळक पक्ष हजर राहिला, आणि तेथें टिळकांनीं कॉंग्रेस जिंकली. या व त्या पुढच्या कांहीं अधिवेशनांस हजर राहण्याकरितां पैशांची अडचण पडूं नये म्हणून लो. टिळकांचेकडून त्यांचे भाचे श्री. धोंडोपंत विद्वांस किंवा श्री. अंतुकाका फडणीस ५०-७५ रुपये आणून देत असत; आणि सीतारामपंतास कॉंग्रेसला जावें लागत असे......असे ते लो. टिळकांच्या प्रेमांतल्या कांहीं लोकांतील एक होते.

पुढें १९१८ च्या मे पासून त्यांनीं लो. टिळकांच्या राजकारणाला वाहून घेतलेलें, किंवा राजकारणाला वाहून घेतलेलें साप्ताहिक "राजकारण" सुरूं केलें. तें दर रविवारीं निघत असे. त्या पत्रास अप्रत्यक्ष मदत म्हणून लोकमान्यांनीं १९१९-२० मध्यें केव्हांतरी बराचसा कागद-रिमें रुपये ७००/- किंवा जास्त किंमतीची पाठवून दिल्याचें स्मरतें. खरोखर पाहिलें तर त्या पत्राचा आणि लो. टिळकांचा प्रत्यक्ष असा संबंध नव्हता. पण लोकमान्यांचा स्वभाव आपल्या पक्षीयांस आधार देण्याचा असल्यामुळें, आणि नवें वर्तमानपत्र काढणें, चालवणें यांतील अडचणींचा त्यांस चांगलाच अनुभव असल्यानें त्यांनीं ही मदत केलेली असावी.

लो. टिळक विलायतेस आपलें डेप्युटेशन-शिष्टमंडळ घेऊन गेले, त्यावेळीं ( किंवा चिरोल विरुद्ध खटला ही भांडावयास गेले त्यावेळीं ) जे फोटो घेण्यांत आले, त्यांत पुण्यांतील राष्ट्रीय पक्षासमवेत लो. टिळक यांचा फोटो घेतलेला असून त्यांत लो. टिळकांच्या शेजारींच सीतारामपंत बसलेले आढळतील ! त्यासंबंधींची त्यांचे तोंडून ऐकलेली माहिती अशी कीं फोटोची वेळ भरत आली; आणि लोकमान्यांचे शेजारीं पक्षांतील मातबर ज्येष्ठ पुढारी तात्यासाहेब केळकर, शिवरामपंत परांजपे, काकासाहेब खाडीलकर कोणीच बसत ना ! जो तो मागें

मागें करूं लागला. त्यावेळीं मग तेच बसले एका बाजूस, लोकमान्यांचे शेजारी! आणि मग कोणी कांहीं म्हटले नाहीं त्याबद्दल :-

अमृतसर येथील काँग्रेस १९१९ च्या डिसेंबर अखेर भरल्यावर माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा राबवावयाच्या कीं त्या धिक्कारावयाच्या असा विरोध देशांत माजूं लागला. १९२० च्या एप्रिलांत म गांधींच्या असहकारितेच्या चळवळीनें थोडें मूळ धरलें. आणि ऑगस्ट अखेर, सप्टेंबरमध्यें कलकत्त्यास खास या सुधारणा स्वीकाराव्यात कीं धिक्काराव्यात या विषयावर एक जादा खास अधिवेशन भरलें. लो. टिळकांचा कल मिळतात त्या सुधारणा घेऊन, राबवून जास्त मागण्याकरितां लढा करावयाचा, प्रयत्न करावयाचा अशा विचारांकडे होता, तर महात्मा गांधीचा कल या सुधारणा अगदींच कुचकामी एक आणा दीड आणा किंमतीच्याही नसतांना त्या धिक्काराव्याच, आणि लढा द्यावा, सरकारशी सुधारणांचे संबंधांत असहकारिता करावी असा होता. एक फार मोठा राजकीय लढा देशांत माजता, फार मोठी दुफळी झाली असतो, किंवा कोणातरी एका पुढाऱ्याचा जय होवून दुसरा पराभूत झाला असता...पण नियतीनें लोकमान्यांस अचानकपणानें ही काँग्रेस तिचे खास अधिवेशन भरण्यापूर्वींच आपल्या मधून परलोकीं नेलें! आणि ही अत्यंत भीषण वाटणारी, अप्रिय वाटणारी घटना टाळली. लोकमान्यांनी प्रत्यक्षतः कलकत्त्यास काय केलें असतें याबद्दल यांच्या पक्षांत दुमत झालें. तात्यासाहेब केळकर, अण्णासाहेब भोपटकर, दा. वि. गोखले, डॉ. मुंजे आदि मंडळींचे मतानें त्यांनीं 'प्रतियोगी सहकारिता' (Responsive co-operation) हें धोरण मान्य केलें असतें, तर अण्णासाहेब परांजपे, काकासाहेब खाडिलकर, सी. के. दामले आदि लोकांचे म्हणणें लोकमान्यांची वृत्ति लढाऊ राजकारणाची होती, आणि त्यांनी सरकारशी कोणत्या तरी प्रकारचा लढा दिला असता, आणि लढा देणारे राजकारण म्हणूव महात्माजींची असहकारिता ही लोकमान्यांनी धिक्कारली नसती! अशीच विचारसरणी सीतारामपंतांची होती, आणि आतां त्यांस संसारांत पाश नव्हता, आम्हीं मुलें थोडी जाणती झालो होतों, तशी आमची विशेष काळजी नव्हती. म्हणून महात्माजींचे एका प्रकारें लढा देणारें असहकारितेचें राजकारण त्यांनी १९२० च्या एप्रिल मे पासूनच उचलून धरलें! त्याचे आधींही शारदा कायदा, सक्तीचे शिक्षण वगैरे सुधारणा होत असतांना केसरी आणि राजकरण यांतील मतें विरूद्ध असत. तीं पुढें वाढत चाललीं; आणि कलकत्ता व नागपूर काँग्रेस नंतर १९२१ च्या सुरुवातीपासून ते संपूर्ण गांधीवादी, असहकारितावादी बनले!

असहकारिता यशस्वी होण्यास लेख, भाषणें, व्याख्यानें देणें, दौरे काढणें, खादी प्रचार करणें, सूत काढणें, वापरणें, लो. टिळकांचें स्मारक म्हणून स्थापन

झालेल्या टिळक महाविद्यालय या संस्थेंत शिकवण्याचें काम करणें, आदि अनेक कामें त्यानीं अंतःकरणपूर्वक आणि रस घेऊन केलीं! हीं सर्व कामें दे. भ. अण्णा-साहेब परांजपे, रा. ब. चिंतामणराव वैद्य आदींनी जशी केलीं, तशीच दे. भ. तात्यासाहेब केळकर, ज. स. करंदीकर आदींनीही केलीं. पण या दुसऱ्या गटांतील मंडळींनीं तीं क्रमप्राप्त आहेत. जोराच्या काल–प्रवाहांत ती करणें अपरिहार्य आहे म्हणून केलीं. .आणि तीं करीत असतांना गांधीवाद, किवा मत हें चुकीचें आहे, 'एक वर्षात स्वराज्य', 'सुतानें स्वराज्य' या अव्यवहार्य अतएव स्वप्नवत कल्पना आहेत, असा त्यांस विरोध ही केला! ...याचमुळें मुळशीचें धरण व्हावें की न व्हावें या प्रश्नावर या धरणामुळें देशांतील उद्योग धंद्यांस मदत होणारी आहे, पावसांतील जमीन गेली तर दुसरी मिळू शकेल देतां येईल, असा व्यवहार्य विचार केळकरादि पुढाऱ्यांनी मांडला, तर कायद्याच्या जोरावर इंग्रज सरकार व टाटा कंपनी हजारों मावळचांस देशोधडीस लावून त्यांच्या जमिनी व त्यांचे तोंडचा घास, अन्न काढून घेणार त्यामुळें या धरणास विरोधच न्याय्य, योग्य, असहकारिता, सत्याग्रहच न्याय्य अशीं मतें दुसऱ्या गटाचीं पडलीं! महाराष्ट्रांत लो. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षांत फार मोठी दुफळी पडली––आणि कालान्तरानें १९३६–३७ सालीं प्रांतिक स्वायत्तता जी मिळाली ती काँग्रेसनें स्वीकारली. केळकरादि पुढाऱ्यांचें म्हणणें, हा गांधीवादाचा पराजय होता; आणि त्यांचा, लो. टिळकांचे पक्षाचा विजय होता! उलट गांधी पक्षाचे लोकांचें म्हणणें असें कीं, या असहकारितेच्या चळवळीचें फळ, निरनिराळ्या सत्याग्रहाच्या चळवळीचें फळ म्हणजेच प्रांतिक स्वायत्तता प्राप्ती; आणि ती स्वराज्याची फार मोठी पायरी किंवा स्वराज्याचा तो एक मोठा हिस्सा आहे; म्हणून महात्माजींनीं धोरणांत थोडा बदल करून तो हिस्सा पदरांत पाडून घेतला! मोठ्या राजकारणी लोकांचा शाब्दिक खेळ आहे हा. कोणाचाही जय असो, दोन्ही पक्षांतील लोक, पुढारी आपापल्या परीनें थोर होते, प्रामाणिक होते, देशभक्ति करीत होते, यांत शंका नाहीं.

१९२३ पासून सीतारामपंतांचें वर्तमानपत्र नव्हतें. तेव्हां पुणें शहर, जिल्हा महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटी, ऑल इंडिया कमिटी, आणि काँग्रेस संस्था, यांचें राजकारण मुख्य संस्था जें आखील तें सेनेमधल्या आपल्या जागच्या अधिकाऱ्या प्रमाणें मानून तेंच आखीत पुढें जावयाचें, त्याप्रमाणें वर्तन करावयाचें असें आचरण सीतारामपंतांनीं चालवलें...

याच काळांत त्यानीं महात्मा गांधी यांचे चरित्र व शिकवण या नांवाचा ग्रंथ रचून गांधीवादी विचारसरणीस वैचारिक मदत केली.

आणि साधारणपणानें १९२३ पासून त्यांचे जीवनांत घसरगुंडी सुरू झाली. त्यांनीं सोडलेली वकिली ही १९२६ सालीं पुनः सुरू केली! पण विस्कटलेली घडी पुनः सांधतां आली नाहीं.

पुणें म्युनिसिपालिटीच्या राजकारणांत शिरण्याची, कार्य करण्याचीहि त्यांची तीव्र इच्छा होती. आणि त्यादृष्टीनें त्यांनीं एक त्रैवार्षिक निवडणूक लढवली. आणि त्या निवडणुकींत त्यांचें डिपॉझिटही जप्त होण्याइतकी त्यांची फजिती झाली. या पराजयानें त्यांस फार मोठा मानसिक धक्का बसला--पण त्याच एका प्रकारें अज्ञातवासांतच, जनमानसाच्या विस्मृतींतच शेवटचे दिवस कंठून त्यांनीं आपला अंत जवळ आणला.

पण या विषयासंबंधीं अन्य एखाद्या प्रकरणीं लिहीन.

## "शिक्षक" सीतारामपंत

सीतारामपंतांनीं शिक्षकाचा पेशा आयुष्यांत एकूण तीन वेळां आणि प्रत्येक वेळीं अल्पकाळ असा केलेला आहे. पहिला असा प्रयत्न आपाततः उज्जैन येथें त्यांनीं केला बी. ए.ची परीक्षा सन्मानानें पास झाल्यावर कांहीं महिने उज्जैनच्या माधव कॉलेजमध्यें बहुधा इंग्रजीचे प्रोफेसर रजेवर असतांना त्यांनीं काम केलें होतें. तें कसें केलें, काय केलें वगैरे माहिती नाहीं. पण दुसरीं संधि ही सन्मानाची संधी होती.

१९०५ सालीं ते पुण्याच्या प्रख्यात फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्यावेळीं ते बहुधा प्रीव्हियस व इंटर या दोन वर्गांस इंग्रजी शिकवीत असत. शिवाय त्यांस दररोज शाळेचा एक तास किंवा थोडें जास्त असें इंग्रजी न्यू इंग्लिश स्कूल, ( नानावाडा ) येथें शिकवावें लागे. प्राध्यापक कै. श्री.म. माटे यांनीं सुमारें २० वर्षांपूर्वी पुण्याच्या "प्रभात" दैनिकांत स्वतःच्या आठवणी लिहिल्या, छापल्या. त्यांत कै. ती. सीतारामपंत यांचेबद्दल फार गौरवपर आणि आदरयुक्त उद्गार काढलेले आहेत. त्यांत त्यांनीं खालील आठवण दिलीं ती उल्लेखनीय आहे.

सीतारामपंत वर्गांत शिकवीत होते. मुंबईच्या गव्हर्नरांची भेट होती. प्रिन्सिपॉल रँग्लर परांजपे आदि मंडळीबरोबर गव्हर्नर वर्गांत शिरले, त्यांची ओळख करून दिल्यानंतर सीतारामपंत पूर्ववत शिकवीत राहिले. फरक एवढाच झाला कीं,

गव्हर्नर येण्यापूर्वी त्यांचा जो आवाज होता. त्यापेक्षां तो थोडा चढला. गव्हर्नर साहेब त्यांचे शिकविणें, व्याख्यान कौतुकानें ऐकत कांहीं काळ उभे राहिले आणि नंतर गेले. त्यांचे चेहऱ्यावर समाधान दिसलें, व्याख्यान ऐकल्याचा आनंद आढळला !

सीतारामपंतांच्या तोंडून त्यांच्या कॉलेज विद्यांर्थ्यांत पुढें न्यू पूना कॉलेजांत इंग्रजीचे प्रोफेसर म्हणून प्रसिद्धीस आलेले श्री. हरी विठ्ठल तुळपुळे हे एक इंटरच्या वर्गातील हुशार विद्यार्थी होते असें ऐकलेलें आहे.

पण न्यू इंग्लिश स्कूलमधील इंग्रजी ६ वी चा म्हणजे हल्लींचा दहावीचा वर्ग त्यांस फार आवडत असे असें दिसतें. त्यांतील हुशार विद्यार्थ्यांची नाममालिका फार मोठी होतीं. त्यांत डॉ. पां दा. गुणे ( पुढें प्रख्यातीस आलेले अल्पायुषी, संस्कृतचे फर्ग्युसनमधील प्रोफेसर) श्री. अभ्यंकर शास्त्री यांचे चिरंजीव ( पुढे सरकारी कॉलेजांतून प्रोफेसर झाले ) श्री. के. जी. काळे ( प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ वा. गो. काळे यांचे बंधु व प्रख्यात इजीनियर ), श्री. मराठे ( श्री. ग. स मराठे अॅक्चुअरी यांचें बंधु व शास्त्रज्ञ) ), प्रो. गो. रा. परांजपे ( रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, प्रिन्सिपॉल व प्रख्यात शास्त्रज्ञ ) ही कांहीं ठळक नांवें आठवलीं ती दिलीं. हे सर्व एकापेक्षां एक हुशार, बृहस्पति होते. या वर्गास शिकविण्यास मला विशेष आनंद वाटत असे असें ते सांगत.

या काळांतील आठवण पहा. त्यांस कार्लाइलचें प्रख्यात Sartor Resartus हें पुस्तक शिकवावयाचें होतें त्याप्रीत्यर्थ त्यांनीं कार्लाइलवर दहा ग्रंथ वाचले कार्लाइलचा समग्र ग्रंथांचाही अभ्यास त्यांनी केला होता ... त्याच काळांत केव्हांतरी " कार्लाइलचें चरित्र " हा थंग्र त्यांनी लिहिला, प्रसिद्ध केला. हा ग्रंथ मी पाहिलेला नाहीं; आमचे घरीं १९१३ पासून केव्हांही त्याची प्रत माझे आढळण्यांत आली नाही! पण म. म. दत्तो वामन पोतदार यांनी सांगितलेल्या माहितीप्रमाणें हें फार सुरेख चरित्र होतें ... या लहानशा आठवणीवरून त्याकाळचे प्राध्यापक आपलें काम कसे दक्षतेनें, मेहनत घेऊन करीत तें दिसून येतें.

त्या काळांत ते बायसिकलवर बसत असत, आणि न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज, ज्ञानप्रकाश कचेरी वगैरे स्थलीं सायकलवरून त्यांची ये जा चाले. त्यांचे व्यक्तिमत्व आकर्षक व प्रसन्न असल्यामुळें ते विद्यार्थी वर्गात आवडते झाले होते. अशीं ती माहिती कळलेली व ऐकलेली आहे.

त्यानंतर त्यांनी शिक्षकाचा पेशा स्वीकारला तो १९२० च्या डिसेंबरमध्यें. टिळक महाविद्यालयांत प्राध्यापक या नात्यानें तेथें ते इग्रजीं इतिहास व राज्य-

शास्त्र हे दोन विषय शिकवीत. त्यावेळी मीं त्यांचा विद्यार्थी होतों, आणि खालील माहिती स्वानुभवाची, व मित्रांच्या अनुभवाची म्हणून सांगत आहे.

शेक्स्पीअरचें " ज्यूलिअस सीझर " हें नाटक ते रसाळतेनें शिकवीत असत. प्रत्येक भूमिकेचें अंतरग उघडें होई. त्यांचा तास आणि सर्वंच विद्वानांचे तास, मेजवानीसारखे असत. त्यावेळीं जे सुमारें १६० विद्यार्थी टिळक महाविद्यालयांत शिकून " वाङमय विशारद " झाले ते धन्य होत. त्यांस जो शिक्षक वर्ग मिळाला तसा शिक्षक वर्ग कोणत्याही महाविद्यालयास व कधींही मिळाला नसेल. राज्यशास्त्र व इतिहास शिकवतांना, आशियाखंड, हिंदुस्थान हे देश सदैव यूरोपीय देशांच्या जोखडाखालीं, राजकीय, सांस्कृतिक, बौद्धिक, असत होते ही समजूत निपटून काढण्यांत त्यांचें विद्वत्व व वक्तृत्व यांचा ओघ चाले. चीन देशानें आपलें अधिराज्य चीनच्या समुद्रापासून स्पेन देशाच्या किनाऱ्यापर्यंत, किंवा पॅसिफिक महासागरापासून अटलांटिक महासागरापर्यंत कसें पसरविलें होतें, सांस्कृतिक दृष्टीनें इंग्लडांतील लोक वल्कलें, कातडीं पांघरून राहत त्यावेळीं आपण किती सुधारलों होतों, सुधारणेच्या कोणत्या महान टप्प्यावर होतों, इत्यादि माहिती सांगून आम्हांस त्यावेळीं भारून टाकीत होते. त्यांचे तोंडीं, Historians History of The World या एक महान् ग्रंथराजाचें नांव वारंवार येत असे.

## आमचे पालक, सीतारामपंत

मथळचाच्या विषयासंबधींची कांहीं माहिती सीतारामपंतांविषयींच्या सुरुवातीच्या कांहीं प्रकरणांत आली आहे. पण ती अत्यल्प आहे. मी व माझ्या धाकट्या बहिणी शशिकला व रत्नप्रभा यांचें पालकत्व मे १९१३पासून त्यांचे मृत्युपर्यंत त्यांनीं केलें, आणि तें चांगलें केलें, याबद्दल मी स्वतः तरी त्यांचा फार कृतज्ञ आहे. शशिकलाचा विवाह १९१९च्या मेमध्यें होईपर्यंतच तिचें पालकत्व त्यांस करावें लागलें; पण त्या काळपर्यंत, विशेषतः तिचा विवाह त्यांनी कसा केला याबद्दलची माहिती एका स्वतंत्र प्रकरणांत दिली आहेच. तेव्हां मुख्यतः या प्रकरणांत मी व रत्नप्रभा या दोघांस त्यांनीं कसें वागवलें, वाढवलें हाच विषय या प्रकरणांत आहे. शिवाय शेवटच्या भागांत त्यानी आणखीही कांहीं जणांचें पालकत्व केलें, तें कसें केलें त्याचीही त्रोटक माहिती देईन.

आमचें पालन पोषण करण्यांत मुख्य भाग म्हणजे आमचें शिक्षण कसें झालें, हाच येतो. त्यादृष्टीनें मी प्रथम माझी हकीगत देईन, व नंतर रत्नप्रभाची.

मी पुण्यांत आलों तो इंग्रजी २रींत होतों. म्हणजे अलीकडच्या ६वीमध्यें आलों. ६वी, ७वी व ८वी पास होईपर्यंत विशेष असें कांहीं घडलें नव्हतें. मी वार्षिक परीक्षेंत बहुधा ५० टक्केच्या वर गुण मिळवीत असें, आणि इतर परीक्षांत १।२ विषयांत नापासही होई. तशी अभ्यासाकडे लक्ष देण्याची जरुरी नसे. आम्हीं बहुधा खेळतच असूं अभ्यास फारच थोडा व तो वार्षिक परीक्षेच्या आधीं एक दोन महिनेच करीत होतों. ८वी, ९वीं, १०वीत असतांना घराच्या मागच्या आंगणांत आम्ही क्रिकेट खेळत असूं. मी, परशराम, आत्माराम (माझा आतेभाऊ) आणि ते स्वतः देखील आमच्यांत खेळत असत! क्रिकेटची ८–१० रुपयांची बॅट् व चेंडू एवढेंच साहित्य असे. स्टम्पा म्हणजे एक खांब होता कोपऱ्यांतला. त्यावेळीं नायडू, पी. विठ्ठल, प्रा. देवधर ही मंडळी फार मोठ्या फॉर्ममध्यें असत. तेव्हां त्यांची नांवें आम्ही धारण करीत असूं. मला तर असेंहि आतां आठवत आहे कीं कधीं कधीं सहामाहीच काय, वार्षिक परीक्षेच्या आदल्या आठवड्यांतसुद्धां Book-worm, पुस्तकी किडे होण्यापेक्षां, डोकें पुस्तकांत खुपसून बसण्यापेक्षां "कांहीं अभ्यास झाल्यावर मन Fresh ताजेतवानें प्रसन्न ठेवण्यांस खेळणें आवश्यकच आहे" असें ते म्हणत असत. अर्थात आम्हांस अभ्यासास फारच उल्हास असे, त्यांत हें असें वातावरण मिळे! पण मूळची बुद्धि बरी होती त्यामुळें सर्व ठीक होत राहिलें.

बहुधा शनिवारीं रविवारीं क्वचित् सकाळीं देखील, नाहींतर दुपारचा चहा झाल्यानंतर आमचा पत्त्यांचा डाव बसत असे. ते स्वतः आमच्यांत बसून खेळत. बहुधा सात हाती, किंवा क्वचित् लॅडिस आणि झब्बू हे खेळ चालत असत. बहुधा ते व मी भिडू होत असूं. कधीं पत्तेच भिकार येत आणि डाव बिघडे ते मग अधून मधून चिडत असत... आमच्या विरुद्ध बहुधा परसु तात्या आणि रत्नी असत. पत्त्यांत परसू तात्याचें नशीब बहुधा चांगलें असे... कधीं आत्माराम असे.

त्याकाळीं मुके सिनेमाच होते. आर्यन सिनेमा थिएटर १९१५ १६ सालापासून रेमार्केट किंवा फुले मंडईसमोर निघालें होतें. दर असत १ आण्यापासून पुढें. आम्हीं जरी पंधरवड्यानें नाहीं तरी सरासरी महिन्यास एक सिनेमा सहजच पहात असूं. त्याची अशी गमत असे कोणताही नवा सिनेमा लागला, बहुधा इग्रजीच असत त्यावेळीं, आणि ते कोर्टांतून प्रसन्न चेहऱ्यानें घरीं आलेले पाहिले कीं आम्ही दबकत दबकत जिना चढून माडीवर जात असूं. हळूच डोकावून ते काय करीत आहेत, लिहीत वगैरे आहेत काय कीं आपले विडी ओढत आराम खुर्चीवर पडले आहेत तें पाहून मग आम्ही आमचा मोर्चा वळवीत असूं. आणि ते लिहीत असले कीं लगेच परत वळून आम्ही खालीं येत असूं. पण ते रिकामेच खुषीत आहेत असें दिसलें कीं हळूंच कोणीतरी माडीत प्रवेश करून म्हणे "काका

आम्ही आज सिनेमाला जावूं ? "; " नेहमीं कसला आला आहे सिनेमा, परवांच नव्हता का गेलांत ? "; " पुष्कळ दिवस झाले कीं त्याला; आणि आज कनी, फार छान असा आहे, सिनेमा " मग क्वचित् नकार मिळे, आणि बहुधा ४ आणे किंवा पुढें दर २ आणे झाल्यावर ६।८ आणे आम्हांस मिळत, आणि संध्याकाळच्या ६ च्या खेळास एकमेकांचा हात धरून धांवत धांवत आम्ही जात असूं.

पुण्याच्या गणेशोत्सवाचे काळांत श्रीगणेशाच्या मूर्ति पाहणें. आणि कार्तिक शुद्ध पक्षांतील दशमीपासून पौर्णिमेपर्यंत रांगोळीचे गालिचे पाहणें यास आम्ही तिघे आजूबाजूच्या मुलांबरोर २।३ रात्रीं ९चे सुमारास बाहेर पडून रात्रीं ११ ते ११।।पर्यंत हिंडून परत येत असूं याबद्दल आम्हास फुल परवानगी असे. त्याचप्रमाणें आम्हांस क्वचित् चांगलीं नाटकेंही दाखविलीं जात असत. मुलींस चांगलें खणांचे परकर असत. पोलकीं असत. फ्रॉक किंवा स्कर्टस् त्या काळांत माहीत नव्हते. १३ वर्षांच्या सुमारास मुलींस इरकली लुगडीं मिळत. मला आठवतें तो काळ थोडा महागाईचा होता; पण रत्नप्रभास पहिली इरकली टोपपदरी साडी २५ रुपयांची घेतली गेली. आणि ती नेहमी खूप खेळत असे. आणि साडया फाडत असे; पण तिला त्याबद्दल फार रागवून घ्यावें लागलें नाहीं. मी नेहमीं धोतर, शर्ट, कोट, टोपी वाला होतों. चड्डचा किंवा पॅन्टस् आमच्या काळीं माहीत नसत. जोडे, पुणेरी जोडे, मुलींस गादीचे पुणेरी जोडे असत, पुढें पुढें कोल्हापुरी चपला आल्या. क्वचित् बुटही असत म्हणजे शूज.

इयत्ता ८ वी ची परीक्षा पास झाल्यानंतर माझेकरितां म्हणून एक जुनी, सेकंड हॅन्ड, डबल बार, बॅक पॅड्ल् ब्रेक असणारी सायकल ५० रुपये खर्चून घेण्यांत आली. ते स्वत: १९०५ सालीं ( प्रोफेसर; फर्ग्यूसन कॉलेजांत ) असतांना सायकलवर बसत असत. म्हणून पेरूचे गेटाजवळ, पश्चिमेचे अंगास त्यावेळीं एक मोठी बखळ जागा होती. तिच्यांत सायकलवर बसण्याची सवय करीत होते एखादा आठवडाभर, पण पुढें त्यानीं तो नाद सोडून दिला. ती सायकल माझ्या नांवाची घेतलेली होती, पण ती मी, परशुराम, आत्माराम आम्ही सर्वच जण वापरत होतों पहिलें एक-दोन वर्षे. पण पुढें ती सपूर्णपणें माझी झाली. इयत्ता ५ असेल किंवा ६ वो म्हणजे ९ वी, १० वी असेल पास होवून वरच्या वर्गांत गेल्यावर मला एक मनगटी घड्याळ, Wrist-watch मिळालें. पण फाउन्टन पेनें त्या काळीं प्रचारांत नव्हतीं एवढीं. १९२४-२५ सालापर्यंत ती जास्त प्रचारांत आलीं. पण मी माझें फाउन्टन पेन स्वतःच आणि १९२९ सालीं B. A. झाल्यावर घेतलें!

शेजार पाजारच्या इतर मुलांपेक्षां आम्ही कितीतरी मजेंत व थाटांत वाढलों. एक वेळां बैलगाडी करून आम्ही १९१५-१६ सालीं काशीआत्याबाई-

बरोबर आणि शेजारींच राहणाऱ्या एक श्रीमती पुसाळकर बाई व त्यांचा मुलगा (अशीं चार मुलें व दोन स्त्रिया) पहाटेस निघून आळंदीस गेलों. सायंकाळपर्यंत आळंदीहून परत आलों. त्या काळीं शाळांतून सहली निघत नसत, पण आम्ही मुलें-मुली पर्वती चतुःशृंगी, विठ्ठलवाडी येथें त्या त्या स्थानच्या माहात्म्याप्रमाणें तेथें तेथें जात होतों. मी १५।१६ वर्षांचा असतांना शेजारचा विश्वनाथ सोमण, व चुलतभाऊ यशवंत असे तिघेजणच पायीं सिंहगडास जावून आलों. उसाच्या रसाच्या दशम्या, घट्ट पिठलें, भत्ता, आदि वस्तु बरोबर घेऊन एका संध्याकाळीं ४।।-५ला निघून मधला दिवस सोडून पुढच्या दिवशीं सकाळीं १० पर्यंत परतही आलों. पुढें सायकलवरुन मी शेजारच्या विश्वनाथ सोमणबरोबर कात्रजचा घाट ओलांडून बनेश्वर येथेंही जावून आलों. बंडगार्डन, एम्प्रेस गार्डन, डेक्कन कॉलेज वानवडीची शिंद्यांची छत्री वगैरे स्थळें तर सायकलवरुन आम्ही किती वेळां पाहिलीं असतील त्याची गणतीच करावयास नको ..

इयत्ता ४ थी (८ वी) पासूनच मला संस्कृत येईनासें झालें. तरीही८ वीचे वेळीं डॉ. भाडारकरांच्या १ ल्या पुस्तकांतील वाक्यें उदा. 'तूलस्य राशावग्नेरिव मृदुनि मृगस्य शरीरे निशीतस्य वाणस्य पातः' "बिडालांस्ताडयति पुरुषः !" वगैरे वाक्यें कारणां कारणांस्तव पाठ करून ठेवून त्यांच्या साहाय्यानें वार्षिक परीक्षेंत ५०।५ ५गुण मिळवले होते. पण आमच्या आत्मारामानें मात्र ९५।९६ मिळवले ! इ. ९ वीत आणि१०वींत माझी पुच्छा प्रगति झाली, पण कसा तरी काठावर पास झालो. १० वीत परफेक्टच्या वेळीं "शक्लपच् मुचि रिच् वच विच्," वगैरे कारिका, तृतीय गणाचे धातु उदा. भी, चीं रूपें बिभेमि, बिभिवः बिभीवः, बिभिमः बिभीमः, वगैरे . . . कसें तरी पाठ करावयाचें, आणि कसें तरी निसटावयाचें . . . पण याची काकांस काळजी वाटूं लागली, आणि मग मला वाटतें १० वीत गेल्यापासून रात्रीं ९.९।। पासून त्यांस झोप येईपर्यंत मला ते आंथरुणावर पडल्या-पडल्या संस्कृत शिकवीत असत. कधीं कधीं लक्ष्मण गणेश शास्त्री लेले यांचीं संस्कृत वेच्यांची पुस्तकें, त्यांतील वेचे, कधीं कुसुमांजलि मधील धडे, आणि कांहीं महिने रोज २।३ रघुवंशाचे श्लोक असा कार्यक्रम चाले. मला आठवतें रघुवंशाचा २ रा सर्ग आणि ४था कीं ५ वा ज्यांत रघुराजा सोन्याचा पाऊस पाडतो तो सर्ग यांचा बराच भाग मी त्यांचेजवळ शिकलों. १३ व्या सर्गांत ल श्री रामचंद्र अयोध्येस पुष्पक विमानामधून परत येत असतांना प्रयागच्या गंगा-यमुना संगमाच्या वर्णनाचे श्लोक, दोन निरनिराळया रंगांचे पाणी एकमेकांत मिसळत आहे वगैरे वर्णन असलेलें, इंदुमती स्वयंवराचे कांहीं श्लोक, अजविलापाचे श्लोक, मेघदूताचे सुरुवातीचे कांहीं श्लोक, असे किती तरी संस्कृत त्यानीं मला अशा रात्रीचे वेळीं शिकवलें. ते आंथरुणांत पडलेले असत, मी त्यांचे उशाजवळ पण पाठमोरा (त्यांस

दिव्याचा, उजेडाचा त्रास होवूं नये म्हणून) बसून समोर घासलेटचा चांगल्या उजेडाचा स्टॅन्ड घेऊन बसत असें. या वर सांगितलेल्या सगळचा गोष्टी त्यांस पाठच होत्या. तो श्लोक त्यांच्या डोळचांपुढें मनःचक्षूपुढेंच ते धरीत. माझ्या हातीं पुस्तक असे! संस्कृत श्लोक कसा लावावा, अन्वय अर्थ कसा करावा वगैरे तें शिकवत, आणि अर्थ सांगत, आणि हें असें होत असतांनाच केव्हां तरी घोरूं लागत! मध्येंच जागे झाल्यास दचकून बिचकून तर "अरे कोणता श्लोक चालला आहे?" म्हणत मी ही अधून मधून पेंगत असें.. ! आणि साधारणपणानें १० च्या सुमारास आमचें, माझें शिक्षण थांबे !

मी किंवा रत्नप्रभा यानी अभ्यास कसा करावा, रोज नियमित कांही अभ्यास करावा किंवा नाहीं, वाचलें तर काय वाचावें, काय वाचूं नये, वगैरे, त्याचप्रमाणें पुढें आम्ही कोणता व्यवसाय करावा, त्यादृष्टीनें शिक्षणक्रम कोणता निवडावा, त्याची पूर्व तयारी काय, वगैरेंचा विचार त्यांनी केला नाही, त्या दृष्टीनें त्यांनी आम्हास कांही वळण लावलें नाही. कदाचित् तो आम्हावर पोरक्या मुलांवर जुलूम होईल, जाच होईल अशी त्यांची भावना असावी. किंवा त्यांस फुरसद मिळाली नाही, किंवा सर्वसामान्य पालकांप्रमाणें स्या बाबतींत Indifferent विशेष लक्ष न देणारे राहिले.

१९२० सालीं नोव्हेंबरमध्यें महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीस जोर चढला. शाळा सोडणें, वकीली सोडणे वगैरे कार्यक्रम धडाक्यानें सुरू झाले. सीतारामपंतांनी त्यांच्या "राजकारण" पत्रांतून या कार्यक्रमास जोराचा पाठिंबा दिला. वातावरण बाहेरचें व घरातलें हें असें होतें. तेव्हां मी व रत्नप्रभा दोघांनी आपापलीं कॉलेजें, शाळा सोडल्या नसत्या तरच नवल! पण सीतारामपंत घरांत असें बोलत होते, " तुम्ही आपलीं शाळा–कॉलेजें सोडू नका, तुम्ही माझी मुलें नाहीत, माझ्या भावाचीं, पोरकीं मुलें आहांत; तुम्ही या फंदांत पडू नये. मला सार्वजनिक रीतीनें याबद्दल जो कांही जाब द्यावा लागेल तो मी देईन. माझ्याकरितां तुम्ही शाळा–कॉलेजें सोडून नुकसानी करून घेऊं नका" पण आम्हांस हें कसें पटावें? रत्नी हुजूरपागा सोडून कन्याशाळेंत गेलीं, मी न्यू पूना कॉलेज सोडून सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत भरणाऱ्या, सुरू झालेल्या टिळक महाविद्यालयांत गेलों... पण जून १९२१ मध्यें रत्नप्रभा पुनः हुजूरपागेंत परत गेली. मी मात्र कॉलेजचे बाहेरच राहिलों.

१९२० च्या डिसेंबरपासून १९२१ च्या एप्रिलपर्यंत मी टिळक महाविद्यालयांत गेलों. पुढें आजारी पडत गेल्यानें त्या कॉलेजांत जाणे बंद पडलें. १९२१ च्या जूनमध्यें, आमचें घर या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें आम्ही घरीं

रहावयास गेलों. आणि नंतर थोडाफार आजार, मलेरियाचा ताप सर्वांसच सुरू झाला. पावसाळ्यांत त्यांतच मला आमांशहि झाला. त्यामुळें माझें टिळक महा-विद्यालय सुटलें; पण पुढें काय तें ठरलेंच नाही. ७ मे २२ रोजीं, सीतारामपंतांस मुळशी सत्याग्रहानिमित्त तुरुंगवासाची ६ महिन्यांची शिक्षा झाल्यामुळें ती एक अडचणच निर्माण झाली. त्यावेळीं तें तुरुंगांत असतांना मी जून अखेरचे सुमारास मुंबईस गेलो होतों. तेव्हां माझी चुलत बहिण सौ. बाबीताई वैद्य व तिचे यजमान श्री. रामभाऊ वैद्य यांचेकडे जात असें. त्यावेळीं त्यांचे शेजारीं श्री. जोशी म्हणून एक गांधर्व महाविद्यालयांतून गायन शिकलेले गृहस्थ व त्यांचा धाकटा भाऊ राहात असत. मोठे भाऊ गायनाच्या शिकवण्या करीत, धाकटा भाऊ मोटार ड्राय-व्हिंग शिकविला होता; पण उद्योग करीत नव्हता. मोटार ड्रायव्हिंग शिकलें, त्याची यांत्रिक दुरुस्ती–काम शिकलें तर त्या धंद्यांत पुष्कळ पैसा मिळण्याचा चरितार्थ चांगला चालण्याचा संभव आहे असें कळलें होतें. ते विचार डोक्यांत घोळत होतें. कॉलेज शिक्षण म्हणजे ठरलेली चाकोरी होय. कांही तरी नवीन, धडाडीचें केलें पाहिजे ब्राम्हण तरुणांनी, तरच तरणोपाय आहे असें कांहीं विचार डोक्यांत घोळत होते.

नोव्हेंबरात सीतारामपंत येरवड्यामधून परत आल्यावर त्यानी मला मुंब-ईच्या नॅशनल मेडिकल कॉलेज, भायखळा येथें घालण्याचें ठरवलें. आमचे घरा-ण्यांत कोणीच डॉक्टर नव्हता. मी तो अभ्यासक्रम घ्यावा अशी त्यांची इच्छा होती, त्याप्रमाणें मी मुंबईस गेलों. काँही दिवस, फार तर एक आठवडाभर, त्या कॉलेंजांत जात राहिलों; प्रत्यक्ष नांव घातलें नव्हतें, फी भरून. पण या काळांत मोटार धंद्याचें आकर्षण वाटलें. त्याचप्रमाणें तिसरीच एक कल्पना डोक्यांत शिरली! ती कल्पना म्हणजे आमच्या घराच्या शेजारचा रिकामा प्लॉट, आमच्या घरा एवढाच, विकत घ्यावयाचा, छापखाना काढावयाचा घरींच; आणि 'राज-कारण" वर्तमानपत्र घरींच छापावयाचें वगैरे. अंदाजे भांडवल दहा हजार रुपये लागेल ते गुंतवावयाचें ! त्या दृष्टीनें त्यांस मुंबईहून पत्र टाकलें! त्यांचे सांगण्या-प्रमाणें पुण्यास परत गेलों आणि अर्थात तसाच राहिलों, एक महिना दीड महिना. कारण सीतारामपंतांनीं या काळांत "राजकारण" वर्तमानपत्रच बंद केलें ! ...

मग जानेवारी अखेरीस केव्हां तरी मुंबईस गेलों; एका मोटार ट्रेनिंग स्कूलमध्यें रुपये १००/- फी भरून ड्रायव्हिंग शिकूं लागलों. तो कोर्स ३ महिन्यांचा होता. एप्रिलच्या १०।१५ तारखेपर्यंत ड्रायव्हिंग परीक्षा होऊन लायसेन्स मिळेल असा अंदाज होता. ड्रायव्हिंग चालू असतां डॉज कंपनी, फोर्ड कंपनी, आणि अशाच इतर तीन चार प्रख्यात कंपन्या, ह्यूजेस रोडवर असलेल्या, तेथें जाऊन Apprentice म्हणून कामाला घेतां काय अशीं चौकशी करीत राहिलों. कोठेंच

थारा मिळाला नाही. मोटार ड्रायव्हिंग स्कूल अगदीच गचाळ होतें. ३।४ विद्यार्थ्यांना एका जुन्या मोटारींत कोंबून, दर एकास शिक्षक मैल दीड मैल चालवावयास सांगे, परत आणून सोडीत, असल्या १॥--२ महिन्यानंतर रिव्हर्स चालवण्याची Practice ४।८ दिवस मिळाली. आणि एक दिवस मुंबईच्या पोलीस कमिशनरच्या कचेरींत आमची Trial, परीक्षा होती. त्यावेळीं रिव्हर्सचेवेळीं मी मोटारची थोडी धडकच दिली एका दगडाला . . . आणि आमचा शिक्षक शिव्या देऊं लागला ! मी मोटारीमधून उतरलों, घरी परत गेलों, आणि रामराम ठोकला, कायमचाच, त्या स्कूलला, आणि त्या धंद्याला . . . पण त्यावेळीं विचार होता मनांत, फिरून यत्न करून पहा, असा. ही गोष्ट झाली एप्रिलच्या २० तारखेच्या सुमारास . . . त्यावेळीं माझी थोरली बहीण वर्ध्याकडून उन्हाळयानिमित्त मुलींसह घेणार होती. त्याप्रमाणें तिला मुंबईस घेऊन पुण्यास परत गेलों; मे संपला. जूनचे ४।५ तारखेचे सुमारास माझे चुलत भाऊ पांडूनाना आणि त्यांचा एक मुलगा अंदाजे ४।५ वर्षांचा असे दोघेजण अगदीं अचानकपणानें कांहीं थोडया आजारानें २।३ दिवसांच्याच अंतरानें देवाघरीं गेले! या घटनेचा एकाएकी मनावर परिणाम घडला. आणि 'आतां पुष्कळ झाले प्रयोग, जीवनाशीं. जुन्या रुळलेल्या चाकोरीमधून वाट काढावी पुन:; म्हणजे जावें कॉलेजांत, आणि व्हावें B. A. नाहींतर B. Sc. नाहीतर असेंच कांही तरी, या विचारांनीं जोर केला; आणि सीतारामपंतांस सांगून न्यू पूना कॉलेजांत नांव घांतलें !

१९२४ च्या एप्रिलमध्यें १ ली परीक्षा दुसऱ्या वर्गात चांगल्या प्रकारें पास झालों. २५० वर विद्यार्थी होते. ६ पहिल्या वर्गात, अंदाजें ४० दुसऱ्या वर्गात, आणि अंदाजें १५०तिसऱ्या वर्गात पास झाले. तेव्हां निदान पहिल्या ४५।४६ त आलों हें समाधान लाभलें. कारण मध्यंतरी ३ वर्षे जवळजवळ 'उनाडक्या' केलेल्या, अभ्यासाची सवय, ओळख सुटलेली; तेव्हां हा निघेल उडाणटप्पू, असा अंदाज असावा आजूबाजूच्या लोकांचा. पण तो चुकीचा ठरला . . . या काळांत मी नियमितपणानें अगदीं कॉलेज सुरु झाल्यापासून ३।४ तास अभ्यास करीत राहिलों. तो परीक्षेंपर्यंत तोच क्रम, कधीं जास्त नाहीं, कधीं कमी नाहीं . . . या सवयी माझ्या मीच लावून घेतल्या. कोणी विशेष सांगितलें नाहीं, मार्गदर्शन केलें नाहीं, कांहीं नाहीं !

याच सालांत केव्हांतरीं, सीतारामपंतांनीं ३॥ टक्के दराच्या सरकारी प्रॉमिसरी नोटस् ( रेल्वे अपघातांस माझे वडील वारल्यावर नुकसान भरपाई दाखल मिळालेल्या रु. २००००।. रक्कमेमधून बिकत घेतलेल्या नोट्स पैकीं ) रुपये १५००० च्या माझ्या नांवानें करून दिल्या. त्यांचे सहामाही व्याज कशाप्रकारें ट्रेझरी ऑफिसांत जावून घ्यावें ती माहिती त्यांनीं मला दिली, त्यामुळें मी थोडाफार स्वतंत्र झालों होतों. रत्नप्रभानें बडोद्याच्या राणी चिमणाबाई ट्रस्टकडे

अर्ज करुन दरमहा रुपये १० ची एक शिष्यवृत्ति मिळवली होती ... "आर्टस्‌पेक्षां सायन्स कोर्स चांगला, तोच तरुणांनीं घ्यावा" असे विचार वातावरणांत दुमदुमत होते. मी सायन्सकडे, Inter Science च्या वर्गात फर्ग्युसन कॉलेजांत दाखल झालों. कोरी सायकल घेतली... पण हें पुराण थोडे बाजूस सारतों. दरम्यान रत्नीच्या लग्नाची एक गम्मत झाली होती, मार्च एप्रिलांत. तेव्हां ती हकीगत सांगणें अवश्य आहे.

सीतारामपंतांनीं तिच्याकरतां शनिवारपेठेंत कन्याशाळेजवळ एक वाडा होता, त्या वाडयाचे मालक कर्वे या बंधूपैकीं आजचे प्रख्यात प्रो. डी. जी. कर्वे, (पुढें प्रिन्सिपॉल झालेले, टॅरिफ बोर्डावर, गॅझेटीयर तयार करण्याच्या कामांवर काम केलेले प्रख्यात सद्‌गृहस्थ) यांस पत्रिका दाखवून मुलगी दाखवण्याचा विचार केला.. त्यावेळीं आम्हां मुलांवर परशराम चिंतामण याचा थोडा वैचारिक पगडा होता. "काय भिकार स्थळ काकांनीं शोधून काढलें आहे, रत्नीला याहून पुष्कळ उंची मोठीं स्थळें पाहिलीं पाहिजेत;" या अर्थाचे विचार प्रगट केले, त्यांचा आम्हां भावंडांवर पगडा बसला; आणि आम्हीच तें स्थळ नापसंत केलें! अर्थात पुढें कांहींच घडलें नाही, या स्थळाचे संबंधांत. साधारण असेच विचार होते, माझे मेहुणे श्री. दामोदरपंत घारपुरे यांचे. तेव्हां तिच्याकरितां पाहू दुसरीं उंची स्थळें असें कांहीं तरी ठरलें ... आणि सीतारामपंतांनी रत्नीच्या विवाहाचा विचार एकवेळ ही ठोकर बसल्यानें कायमचा डोक्यांतून काढून टाकला. त्या वाटेस ते पुन: कधींच गेले नाहींत! याच रत्नीच्या विवाहाचे संबंधांत सीतारामपंत आणि त्यांचे-सासरे भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांचें अधून मधून संभाषण होई. तेव्हां एक-वेळ वैद्य म्हणाले होते. "काय चिंता करिता, बापूसाहेब, रत्नीच्या विवाहाची काळजीच करूं नका तुम्हीं. कालिदासानें म्हटलें नाहीं काय, "न रत्नमन्विष्यति, मृग्यतेहि तत्" तिला मागणी घालून येतील कोणी; तुम्ही फिकीरच करूं नका... आणि तसें थोडें फार घडलें ही. पण तो विषय सीतारामपंतांचे चरित्रानंतरचा, बाहेरचा, म्हणून त्याचा उल्लेख करीत नाहीं. ..

१९२४च्या जूनपासून १९२५च्या मे मध्यें इंटर सायन्सचा निकाल लागेपर्यंत मी अर्थात् कॉलेजांत जात होतों. अभ्यास करीत होतों, आणि पुष्कळ हुशार पण कमी मेहनती मुलांप्रमानें तीं मेहनत कमी पडत होती. आणि त्यामुळें मी नापास झालों. त्याचे आधीं म्हणजे जून १९२४ च्या सुरुवातीस मी शेतकीं कॉलेजांत प्रवेश मिळवण्याचा यत्न केला होता. त्या काळांत कोणी एक कृषितज्ञ श्री.गाडगीळ हे कॅलिफोर्निया या विद्यापीठामधून शेतकीची पदवी घेऊन आलेले होते. "महा-राष्ट्र कृषीवल" म्हणून मासिक काढीत होते. त्यांचे चरित्राचा परिणाम मनावर झाला होता. आपण B. Ag व्हावें, अमेरिकेंत जावें. वगैरे विचार डोक्यांत

आले होते. पण तेथें प्रवेश मिळाला नव्हता. माझें तारू मीच जीवन समुद्रांत लोटत होतें, त्यास कप्तान, सुकाणू धरणारा कोणीं नव्हता. सीतारामपंत बाजूस किनाऱ्यावर होते व नुसते पहात असत, आमच्या दोघांच्या नौकांकडे.

१९२४ च्या डिसेंबरमध्यें श्री दामोदरपंत धारपुरे यांचे इच्छेनुसार मी व रत्नी वर्धा-नागपूरकडे गेलों. हेतु तिचेकरितां तिकडे स्थळें पाहणें. एक स्थळ नुसतेंच पाहिलें गेलें, जास्त हालचाल कांहींच झाली नाहीं ! हें ही स्थळ एका थोर अर्थशास्त्रज्ञाचेंच ! प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ आजचे श्री. धनंजयराव गाडगीळ यांचें स्थळ पाहण्याचें बोललें जात होतें एवढेंच. यापेक्षां जास्त कांहींच हालचाली झाल्या नाहींत. मी नागपुरास गाडगीळ वकीलांच्या सीताबर्डीवरच्या पटवर्धन हायस्कूलच्या जवळच्या घरी गेलों होतों - - - बस्स ! संपला हा स्थळें पाहण्याचा कार्यक्रम---- पुढें ती B. A. होईपर्यंत स्थळें पाहणें तितकेंच राहिलें. आणि दरम्यान आमच्या Senior बी. ए. ची पहिली सहामाही संपतां संपतां सीतारामपंत कालवशही झाले !

Inter Science नापास झाल्यावर मी पुनः Inter Arts ला न्यू पूना कॉलेजांत आलों. आतां रत्नी व मी एकाच वर्गांत आलों. पण तिचें होतें Logic, मी घेतलें Mathematics. आम्हीं दोघेही पुन्हां चांगल्या प्रकारें पास झालो. इंटरला आमच्यावेळीं १५०च्या सुमारास विद्यार्थी परीक्षेस बसले होते. पहिल्या वर्गांस कोणीच नाही. एकूण विद्यापीठांत जवळजवळ २२००।२३०० विद्यार्थ्यांत फक्त ३ पहिल्या वर्गांत होते. सुमारें १५० दुसऱ्या वर्गांत होते.आमच्या कॉलेजच्या वाट्यास त्यांतले सहा होते. आणि ८००।९०० तिसऱ्या वर्गांत. रत्नी व मी १ टक्का गुणाच्या फरकानें पास झालों. दोघांसही दुसरा वर्ग मिळण्यास १०।१५ फारतर २० गुण कमी पडले होते. त्यांतल्या त्यांत तिला एक टक्का जास्त होते.

त्या काळांत सीतारामपंतांच्या मनास लागून राहिलेली आणखी एक गोष्ट घडली. मीं त्यांस वेगळें होण्याचें एक पत्र, घरांतल्या घरांतच लिहिलें. त्यानीं जरी माझी मालमत्ता मला थोडीफार दिली होती, तरी सर्वस्वी पूरा हिशोब दिला नव्हता। त्यांचा देण्याचा विचार नव्हता असे मुळींच नाहीं. कारण कोणा एका कॉंग्रेसला जातांना त्यानीं एक मृत्युपत्रवजा कागद लिहून मला दिला होता तो कागद पहा-- ( मूळ कागद त्यांचें मृत्युनंतर कोर्टांत दाखल केला गेला, त्याची नक्कल आहे. मूळ लेख मोडीमध्यें आहे. त्याची बाळबोध प्रत)

मी सीतारामपंत केशव दामले राहणार पुणें आज रोजीं लिहून ठेवितों कीं, मी गयेस कॉंग्रसला जात आहे. प्रकृति अशक्त आहे. तरी परत न येतां वाटेत कांही झाल्यास माझ्या पश्चात माझ्या राहत्या बंगल्याची मालकी सध्यां माझी

आहे. तरी त्या बंगल्याचा अर्धा खर्च माझा व अर्धा माझा पुतण्या चि. दत्तात्रय मोरेश्वर याच्या पैशांपैकीं झालेला आहे. माझ्या पश्चात सर्व बंगला त्याच्या मालकीचा होईल. माझ्या अर्ध्या हिश्यावर दुसऱ्या कोणाचा वारसा चालणार नाहीं. माझ्या नांवे बँकेत ( Imp. Bank) मध्यें ठेव आहे तीही चि. दत्तूचीच होईल, व माझ्या नांवचे कांहीं शेअर आहेत तेही त्याचेच होतील. दोन पॉलिस्या आहेत त्यांतील रु. २००० ची चि. दत्तू याची होईल व रु. १५०० ची आहे. ती माझी बहीण गं. भा. काशीताई इचीं होईल.

ता. २१।१२।२२

S. K. Damle

सी. के. दामले

हा कागद माझे जवळ होता. पण या पेक्षां अन्य कांहींच कायदेशीर तरतूद माझ्या मालमत्तेची नव्हती. त्यांचीं प्रकृति बरी नसे म्हणून श्री. दामोदरपंत घारपुरे यांचे सल्यानुसार मी स्वतंत्र होण्यासंबंधी एक पत्र त्यांस लिहिले होतें. निराळें बिऱ्हाड पाहत होतों. पत्रांत घर शक्य तर विकून टाकावें, आणि माझी रक्कम त्यांनी मला द्यावी, आणि त्यांची त्यांनी घ्यावी असा कांही मजकूर होता...पण त्या पत्राचा त्यांनीं विचार केला नाहीं. मी ही त्यांस सोडून दूर राहिलों नाहीं..

या एका प्रकारच्या मृत्युपत्रांत उल्लेख केलेल्या रु. २००० ची पॉलिसीपुढें त्यांनी रत्नीच्या नांवाने Endorsement करून तिच्या विवाहाची तरतूद म्हणून ठेवली. आणि रुपये १५०० ची पॉलिसी त्यांस हप्ते भरतां न आल्यानें Surrender करून त्याचे जे पैसे आले ते त्यांनी घेतलें.

मला मुली सांगून येऊं लागल्या होत्या १९२५ पासून किंवा त्याचे थोडे आधींपासून हीं. तेव्हां मी त्यांस सांगितले, " आपली आर्थिक स्थिति पुरेशी चांगली नाहीं, माझें शिक्षण पुरे झाले नाहीं, मी मिळवता नाहीं. केवळ वय झालें आहे. तरी मी B. A. झाल्यावर माझे विवाहाचा विचार करा, करूं. " ते म्हणाले होते " तुझीं बायको पोसण्याची एवढी काळजी कशास करतोस? तें मी पाहीन. " पण मी तें मानले नव्हतें. त्यांची स्थिती मी रोज पहात होतों. आर्थिक व शारीरिक स्थिति खालावतच चालली होती. त्यामुळें ते माझ्यावर थोडे रुष्ट होते.

तरीही त्यांच्या डायरीमध्यें अधून मधून रत्नीबद्दलचे व माझ्या बद्दलचे उल्लेख आहेत. ते जिव्हाळ्याचे, प्रेमाचे आहेत. आम्हांबद्दल आमच्या वर्तनाबद्दल त्यांस भीति वाटत नव्हती. आम्हीं गैर वागणारी नाहीं अशी त्यांची खात्री दिसते. त्याच प्रमाणें आम्हीं त्यांस सोडणारही नाहीं अशी ही त्यांस खात्री दिसते.

१९२७ च्या ऑक्टोबरच्या १५ तारखेस रात्री १॥–१॥। चे सुमारास ते कैलासवासी झाले ते एका प्रकारें आम्हांस व त्यांस ओळखणाऱ्या पुणेकरांस,

अचानकपणानेंच...पण त्यांच्या डायरीमध्ये त्यांच्या आदल्या जन्म दिवसापासूनचे पुढचे उल्लेख त्यांचे अखेरीबद्दलचेच आहेत. त्यांस त्यांचे मरण दिसूं लागलें असावें असें स्पष्ट वाटतें.

पालक या नात्यानें आमचें पालन उत्तम केलें. पण दोषच काढावयाचा तर मागें सांगितल्याप्रमाणें ते जर आमच्या बोटींत होडींतच असते व त्यांनी आमच्या होडीचें सुकाणू जबरदस्तीनें हातीं घेतले असतें तर...? पण कांहीच बिघडलें नाहीं आमचे. जे झालें त्यांतही मी त्यांचेबद्दल अत्यंत कृतज्ञ आहे. त्यांनीं जर आमचें पालकत्व १९१३ च्या मे मध्यें स्वीकारले नसतें तर आमची नौका वादळांत सापडून कोणच्या तरी खडकावर नक्कीच आदळली असती. आम्ही जे कांहीं बरे वाईट झालों, ती त्यांचीच कृपा होय.

## बाल्य, शिक्षण व तारुण्य. अन्यत्र न आलेल्या गोष्टी

सीतारामपंत किंवा बापूकाका यांची संगतवार हकीगत १९१३ पासून त्यांचे मृत्युपर्यंत म्हणजे १९२७ ऑक्टोबरपर्यंत येथवर सांगितली. पण त्यामध्यें अधूनमधून त्यापूर्वीच्या काळाची ही हकीगत येऊन गेलेली आहे. उदाहरणार्थ त्यांचे लेखन संपादक सीतारामपंत, त्यांचा विवाह किंवा सासरे-जांवई आणि जानकी काकू-सीतारामपंत यांचे संबंध, त्यांचे मित्र, अशा प्रकारें कांही कांही प्रकरणांतून आधींच्याहि हकीगती आपाततः आल्या आहेत. त्याचप्रमाणें कृष्णाजीपंत किंवा आप्पा यांचे चरित्रांत, केसोपंत विषयक माहितीमध्यें मोरोपंत चरित्रांत त्यांचे शिक्षण, विवाह व त्यांचे मोरोपंत यांचे बरोबरचें जीवन या हकीगती येऊन गेलेल्या आहेत. तेव्हां पुनरुक्ति दोष बहुतेक टाळून त्यांच्या बालपणापासून तो १९१३ सालपर्यंतच्या काळापर्यंत त्यांचे जे चरित्र शिल्लक राहिलें आहे, तें आतां सांगावयाचे असा विचार आहे.

सीतारामपंत यांचा जन्म सन १८७८ मध्यें फाल्गुन कृष्ण १२ शके १७९९ या दिवशी झाला. जन्म स्थळ नक्की सांगतां येत नाही पण बहुधा तर्क असा कीं तो रत्नागिरीस झाला असावा. केसोपंत विषयक प्रकरणांत ते १८७८ मध्यें व त्याचे आधी २-३ वर्षे तरी रत्नागिरीमध्यें रहात असावेत असा उल्लेख केलेला पहावा. त्यांची जन्म कुंडली मी अलिकडेच तयार करून घेण्याचा अयशस्वी यत्न केला त्यांचे डायरीमध्यें १९२७ मार्चच्या ३० तारखेस

त्यांचे स्वतःचे हातची नोंद पहाः-वरच्या बाजूस "My Birth-day according to Indian Calender" या तारखेस त्याचे खालचे अंगास तिथी फाल्गुन वद्य १२, शके १७९९ अशी दिली आहे. या नोंदीवरून त्यांची जन्म कुंडली तयार करवून घेण्याचा बेत होता, सिद्धीस गेला नाही.

या तारखेच्या अन्य नोंदी पहा–

To-day I have completed my 49th year and have entered upon the 50th year of my life. Thus I am now entitled to be called an old man. ( Entry made on Feb. 7th ). जन्मतिथी. ४९ वर्षें संपून ५० वें वर्ष लागलें; म्हातारपण सुरू झालें, वृद्धापकाळाची छाया शरीरावर आज चार पांच वर्षांपासूनच पडली आहे. आतां कदाचित ४–५ वर्षे फार तर जगणें आहे. १-२ वर्षांच्या आंत देखील एखाद्या थोड्या दुखण्यानें परिसमाप्ति होईल. असें झालें तर फारच उत्तम.

Birth day was passed in comparative good health and spirits. God knows if I am to see my birth-day in 1928. Went out for a tonga drive in the evening. १९२६ च्या डायरींत ११ मार्च रोजीं Birth day in 1878 A. D. or 1799 s. s. शके असा उल्लेख आहे.

केसोपंत–अन्नपूर्णाबाई यांस त्यांचे पाठीमागून एकच मुलगी–भीमा झाली. मुलगा या नात्यानें त्यांस ' शेंडेफळ ' संबोधतां येईल. ते वडिलांचे त्या नात्यानें आवडते असतील. दिसावयास ते गोरे, गुटगुटीत सुरेख असावेत. केशवसुत किंवा आप्पा यांनीं त्यांचे विषयीं जे उद्‌गार त्यांचें काव्यांत काढले आहेत ते पहा --

तताचिया बघ गडचा उजवे कडेला
बापू असे तिथ बरें अमुचा निजेला

अज्ञान तो चपलधी परि बाल आहे
त्याचे विशीं मम मनीं अतिलोभ राहे!

बापू ! गडचा ! ध्वज उभा करशील काय ?
तूं देशकारण करूं झटशील काय ?

बापू जनांत दिवटी धरशील काय ?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ?

अशी दोन कडवीं त्यांनीं बापूचे खास वाट्यास दिलीं आहेत. त्यावेळीं ( १८८७, २२ जुलै ) बापू केवळ ९ वर्षांचा होता. त्याच बापूनें १९२६चे सुमारास या कडव्यासमोर एका प्रतींत Yes I have done it ! असे सार्थ उदगार लिहुन ठेवलेले आहे ! केवढे Prophetic ( भविष्यवादी ) उद्गार आहेत हे, आणि तितक्याच आश्चर्यानें बापूनें ते वास्तव आयुष्यांत खरे करून दाखवले ही नाहींत काय ?

सीतारामपंतांचे बाळपण वळणें व खेड येथें गेलें. त्यांचे शिक्षण त्यांचे वडील केसोपंत यांचे देखरेखीखालीं खेडासच झालें असेल. त्यांचे त्यावेळच्या स्नेह्यांपैकीं खेडचे श्री. गणपतराव कार्लें हे एकवेळ पुण्यास १९१९–२०च्या मेमध्यें आमचे-कडे आले होते. मी त्यांस पाहिलेलें आहे त्यांचे इंग्रजी शिक्षणाचा पाया खेडासच एका खाजगी इंग्रजी क्लासांत झाल्याचें ऐकलेलें आहे. त्यांस खेडास वडिलांनीं मराठी व संस्कृतदेखील चांगल्या प्रकारें शिकवलेलें असावें, त्याकाळच्या पद्धति-प्रमाणें "नवनीत" हा परशुरामपंत तात्या गोडबोले यांचा मराठी काव्यग्रंथ आणि संस्कृत धातुरूपावलि, शब्दरूपावलि, समासचक्र, अमरकोश, रघु आदि संस्कृताचा भक्कम पाया त्यांचा खेडास घातला गेल्याची हकीगत त्यांचेच तोंडून मीं ऐकलेली आहे.

केसोपतांचे मृत्युनंतर ते पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकावयास राहिले. पण थोड्याच महिन्यांनी मोरोपंतांनी उज्जयिनीस बिऱ्हाड केल्यावर ते तेथें गेले. तेथें Middle School स्कॉलरशिप परीक्षेंत मध्य हिंदुस्थानांत ते पहिले आले. आणि लौकरच १८९६मध्यें अलाहाबाद विद्यापीठाची मॅट्रिक परीक्षा उत्तमप्रकारें पास झाले त्या परीक्षेंत त्यांचा ८वा नंबर आला. त्यानंतर मोरोपंतांनीं त्यांस स्वतःच्या डेक्कन कॉलेजांत शिकावयास पाठविलें. तेथून ते १९०० सालीं बी. ए. झाले. त्यावेळीं त्यांस इंग्रजी विषयांतील प्रसिद्ध एलिस स्कॉलरशिप व बक्षिस मिळालें. त्यांचे डेक्कन कॉलेजांतील वास्तव्याबद्दल या प्रकरणा पाठोपाठ एक स्वतंत्र प्रकरण लिहीन.

बी. ए. होण्यापूर्वी एक वर्ष त्यांचा विवाह नाशिकास झाला. त्यांचे श्वशूर ग्वाल्हेरीचे चीफ जस्टिस, महाभारताचार्य चिंतामणराव वैद्य व त्यांची पत्नी (माहेरचें नांव दुर्गा) जानकीबाई. बी. ए. झाल्यावर ते बरेच आजारी पडले. पण मोरोपंत यांचें गुरु हरीहरबोवा उदासी यांचे औषधांमुळें ते बरे झाले. बहुधा १९०२ अखेरपर्यंत ते उज्जयिनीस असावेत. त्याकाळीं त्यांस ४।६ महिने उज्ज-यिनीस बदलीमध्यें हंगामी प्रोफेसराची जागा माधव कॉलेजांत मिळाली होती.

त्या काळांत त्यांनीं सॅन्डोचा डंबेल्स पद्धतीचा व्यायाम घेतला. त्यावर त्यांचा भर होता. त्यानीं जरी फार मोठी तालीम केलेली नसली तरी ते सुदृढ होते.

१९०४ मध्ये त्यानीं एल्. एल्. बीं. ची पदवी घेतली, त्याचे आधीं म्हणजे १९०३ मध्येंच ते मुंबईस २ ऱ्या एल्. एल्. बी. करितां गेले, त्या काळीं पहिली एल् एल्. बी. ची परीक्षा B. A. होण्यापूर्वी देतां येण्याची सवड असे, व त्यानीं ती तशी दिली होती. बी. ए. झाल्यावर ते मुंबईच्या विल्सन कॉलेजांत फेलो होते. (पुण्यास प्लेग झाल्यानें सीनियर बी. ए. ची शेवटची सहामाही ते विल्सनचे विद्यार्थी होते.) त्यावेळीं तेथें प्रि मॅकोकन व इंग्लिशचे प्रख्यात प्रोफ-सर रेव्हरेंड स्कॉट हे त्यांस प्राध्यापक असत.

१९०४ सालांत ते पुण्यांत अपावेत. आणि लो. टिळकांच्या इंग्रजी " मराठा पत्रांत लिहीत असतील, बहुधा याच सालांत ते त्यांचे श्वशुर नानासाहेब वैद्य यांचे बरोबर बनारस येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनास मवाळ पुढाऱ्यांत सामील होवून हजर राहिले असावेत. त्यानंतरच त्यांस ना. गोखल्यांच्या विनंति-वरून व सांगण्यावरून फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंग्रजीचे प्रोफेसर म्हणून नेमून घेण्यांत आलें होतें. १९०५ साल भर ते फर्ग्युसन कॉलेजांत प्राध्यापक, न्यू इंग्लिशस्कूल मध्यें शिक्षक. आणि ज्ञानप्रकाशमध्यें लेखक होते. पण एक वर्षभरच अशा प्रकारचें संमिश्र काम केल्याबर त्यांस मवाळ पक्षाच्या राजकारणाचा कंटाळा आला असेल, किंवा त्याची नावड उत्पन्न झाली असेल. फर्ग्युसन कॉलेजच्या त्यांचे प्रोफेसरीच्या काळांतील गप्पागोष्टी ते सांगत कधी कधीं. त्यांत रँग्लर परांजपे यांचेबद्दल आदर-भाव असे. शिवाय प्रो. भाटे, प्रो. काळे, प्रों. वा. ब. पटवर्धन प्रो. केशवराव कानिटकर प्रो. कोल्हटकर, प्रो. हरीभाऊ लिमये, प्रो पानसे याचे उल्लेख प्रसंगाप्रसंगानें येत असत. ही सर्व मंडळी पुढें नामवंत प्राध्यापक झाली. प्रो. धों. के. कर्वे यांचें नाव फारसें येत नसे कारण कदाचित् गणित विषय त्यांचा नावडता असेल!

या शाळांतील हकीगतींमध्येंच कधींकधीं श्री. गणेश व्यंकटेश जोशी या अत्यंत हुशार आणि भारताच्या अर्थ व्ययवहाराचे चिकित्सक अभ्यासक या थोर गृहस्थांचा ही उल्लेख असे. त्यांचे या विद्वानांकडे जाणें येणें असेल. त्यांच्या भाषणांचा लेखांचा एक मोठा ग्रंथ आमचे घरीं होता तो जवळ जवळ एक हजार पृष्ठांचा असावा.

या काळांत ते बायसिकलवर बसत असत. त्यांचे बिऱ्हाड सदाशिव पेठेंतील गाय आळीमधील निंबाळकर तालिमीसमोरच्या लिमयांच्या वाड्यांत होते.

सध्यांच्या Type-writing Class च्या संचालकांचे आजोबा शास्त्रीबोवा म्हणून मालक असत.

या नंतरचा काळ धामधुमीचा होता. लो. टिळक पक्षीय राजकारणाचा होता. दारूबंदी, पिकेटिंग, स्वदेशी कापड पुरस्कार, विलायती कपड्यांची होळी संभाव्य नागपूर काँग्रेस, सुरत काँग्रेसचा बखेडा, लो. टिळकांवरील राजद्रोहाचा खटला, त्या खटल्यासंबंधीचें पुस्तक तयार करणें 'राष्ट्रमत' पत्राची तयारी, त्याचें एक वर्षभर संपादन वगैरे भानगडीमध्यें १९०९ साल अखेर पर्यंतचा काळ गेला असेल. त्यानंतर ते पुण्यांत पुनः आले. यावेळीं ते सोटया म्हसोबा जवळच्या त्यावेळच्या एका जोशांच्या वाड्यांत राहिले, आणि १९१०-११ मध्यें केंव्हांतरी शनवार पेठेतल्या प्रख्यात गांधी वाड्यांत रहावयास आले. या काळांत ते वकीली करूं लागले. मध्यंतरी त्यांनीं 'राष्ट्रोदय' या नावांचें एक मासिक काढलें. त्याचे तेच मालक संपादक होते. त्याचे पांचच सुंदर अंक निघाले व तें बंद पडलें. या काळांत त्यांचा आणि थोरले बॅरिस्टर काशीनाथपंत गाडगीळ यांचा धंद्यांत संबंध आलेला असावा. प्रख्यात इतिहासतज्ञ इग्रज जिल्हा न्यायाधीश मि. किंकेड यांचा त्यांचेबद्दल वकील या नात्यानें चांगला हुशार वकील असा ग्रह झालेला होता. त्या काळांत कै. वासुकाका जोशी यानीं 'चित्रमय-जगत्' या नांवाचे मासिक सुरु केलें. त्या मासिकाशीं लेखक या नात्यानें त्यांचा घनिष्ठ संबंध आला आणि तो पुढें वाढत जावून अगदीं त्यांच्या मृत्युपर्यंत टिकला.

अशा प्रकारें सीतारामपंताच्या चरित्रांतील राहिलेले दुवे सांगून झाले आतां त्यांचें डेक्कन कॉलेंजांतील जीवनाविषयीं कांहीं माहिती देऊन शेवटीं उपसंहारात्मक कांहीं लिहीन.

## डेक्कन कॉलेजांतील जीवन

हा काळ त्यांचे जीवनांतील एक आनंददायक काळ असावा. कारण विद्यार्थी-दशा, तारुण्य, विद्वान् प्राध्यापक, समानशील विद्यार्थी मित्र, डेक्कन कॉलेजचा रम्य परिसर अन्यत्र हिंदुस्थानांत कोठल्याही महाविद्यालयांत नसलेली बोटिंगचे व्यायामाची सोय, आदि गोष्टींमुळें त्यांचें हें जीवन सुखाचें असावें.

त्यांच्या वेळेचा प्राध्यापक वर्ग पहा : प्रि. सेल्बी, प्रोफेसर बेन, प्रो. फ्रेझर, आणि प्रो. हॉथार्नथ्वेट, डॉ. भांडारकर, प्रा. आबासाहेब काथवटे, श्री. नंदर्गीकर

शास्त्री किंवा झळकीकर शास्त्री ही नांवें ऐकींवांत आहेत. प्रा. गोविंद विठ्ठल करकरे किंवा टक्कर साहेब हें ही एक नांव आठवतें. टक्कर साहेब हे बहुधा नेटिव्ह खिश्चन होते. आणि ते गणित शिकवीत असतील. Let, put, say, X—— असें कांहीं तरी म्हणत व त्यावर वर्गांत हंशा पिकत असे. हेच गोविंद विठ्ठल केंब्रिजच्या सेंट जॉन्स कॉलेजचे पहिले हिंदी रँग्लर विद्यार्थी. रँग्लर परांजपे आदि याच कॉलेजचे विद्यार्थी. (पहा रँग्लर परांजपे यांचें " नाबाद ८९ " हें आत्मचरित्र पृ. २३) सायन्सचे प्राध्यापक फारसे प्रयोग वर्गांत करून दाखवीत नसत. त्यामुळें ते तास थोडे फार रुक्षच होत. त्यांना विशेष आवडत तास, ते शास्त्रीबुवा यांचे व प्रो. बेन यांचे. शास्त्रीबुवा खरे रसिक व संस्कृत पंडीत होते. डॉ. भांडारकर यांचें शिकवणें रुक्षच असे. प्रो. बेन हे अतिशय हुशार होते. Oxford मधल्या त्यांच्या वेळच्या २।३ अति हुशार विद्यार्थ्यांपैकीं ते एक होते. लॉर्ड कर्झन हे त्यांचे कॉलेजचे समकालीन व थोडे मित्र होते. प्रो. बेन मुख्यतः इतिहास व अर्थशास्त्र यांचे प्राध्यापक. पण ते विषय असा शिकवीतच नसत. पण त्यांचे इंग्रजी बोलणें, त्या भाषेवरचें प्रभुत्व फार उत्तम असे. ते निर्भीडपणानें इंग्रज राजकारणावर--इंग्लंडांतील व भारतांतल्यासुद्धां निर्भीड टीका करीत. घरच्या गरीबीमुळें ते इकडे भारतांत आले. त्यामुळें ते थोडेफार जीवनावर असंतुष्ट असत. इंग्रजीचे प्राध्यापक प्रो. फ्रेझर हे केवळ तात्या पंतोजी होते. त्यांचा इंग्रजी वाङ्मयाचा व्यासंग व त्या भाषेवरचें प्रभुत्व बेताबाताचेंच होतें. त्यामुळें त्यांचा प्रभाव पडला नव्हता सीतारामपंतांचे मनावर. पण मुंबईच्या विल्सन कॉलेजांतील प्रि. मकीकन आणि रे. स्कॉट यांचेबद्दल त्यांस आदर वाटत असे. पैकीं स्कॉट खरे विद्वान् म्हणून आणि मकीकन हे उत्तम व्यवस्थापक, सचालक म्हणून.

वाचनालयाचा त्यांनीं भरपूर फायदा घेतलेला होता. बोटिंगचा व्यायाम ते पुष्कळ घेत असत. आणि एका वर्षीं बोटिंगच्या शर्यतीमध्यें विनिंग क्रूमधील एक होते. ते टेनिसही खेळत असत. त्या खेळांत जरी चॅम्पियनशिप मिळवलेली नसली तरी ते तो खेळ चांगला खेळत असत. विवाहानंतर उज्जयिनी व ग्वाल्हेर येथें त्यांस त्यावेळच्या तरुण श्रीमंत माधवराव महाराज शिंदे सरकार यांचें बरोबर टेनिस खेळण्याची संधि मिळालेली आहे. फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर असतांना तरुण रँग्लर परांजपे आदि मंडळी बरोबर ते टेनिस खेळत असत. पण त्यानंतर मात्र उभ्या आयुष्यांत त्यांनीं कधींच रॅकेट हातीं घेतलेली नसेल. माझ्या १९१३ नंतरच्या आठवणींत मी एकच मोडकी टेनिस रॅकेट घरीं पाहिली होती! बहुधा एकदां कॉलेजांत 'त्राटिका' नाटक सम्मेलनाचे वेळीं केलेलें होतें. त्यावेळीं त्यांनीं व त्या वेळचे त्यांचे एक सहकारी विद्यार्थी श्री. गोविंदराव बाबा रानडे (कॉंट्रॅक्टर, पुणें) यांनीं एका विवाहाच्या वाटाघाटी ठरवणाऱ्या दुय्यम स्वरूपाच्या पात्रांपैकीं

एका एकाचें काम केलेलें होतें. सीतारामपंत व बाबासाहेब रानडे एकमेकांच्या विरुद्ध पक्षाकडील बोलणीं करणारे होते. आणि पुढें प्रत्यक्ष जीवनांत अशाच प्रकारें त्यांनीं एक विवाह ठरवला, घडवून आणला.

कॉलेजांत असतानांच, त्यांनीं जी कांहीं थोडी काव्यरचना केलेली आहे, त्या काव्यरचनेस सुरुवात केली असावी. त्यांचेच थोरले बंधु काव्य रचीत होते. त्यामुळें ही ते या वाङमय प्रकाराकडे आकर्षिले गेले असतील. पण मी त्यांचीं काव्यें पाहिलेलीं, वाचलेलीं नाहींत. स्फुट रचनाच त्यानी केलेली आहे; व ती ' मार्गण ' या टोपण नांवानें प्रसिद्ध झालेली आहे, कोठे कोठें. ' मार्गण ' या नांवाचा नक्की अर्थ ' बाण ' आहे, त्यानी तें कां घेतलें असावें याचा तर्क मला करतां येत नाहीं. पण त्यांचेच थोरले बंधु केशवसुत यांचे निधनानंतर १९०६ च्या सुरुवातीस ' केशवसुतां'स ' म्हणून जी एक कविता त्यांनी लिहून प्रसिद्ध केली ती मी प्रथम प्रा. भ. श्री. पंडित यांच्या ' समग्र केशवसुत ' ग्रंथाच्या शेवटच्या भागांत पाहिली, वाचली. या रचनेवरून ते बऱ्याप्रकारें काव्यरचना करीत असावेत हें स्पष्ट होईल, त्याच प्रमाणें त्यांची अखेरची काव्यरचना, प्रसिद्ध झालेली काव्यरचना, 'तुरुंगाच्या कोठडींतून सुचलेले विचार ' या त्यानी जून १९२३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत आढळते. ती येरवडा जेलमधील निर्भय हरिणांवर असून त्या कांही आर्या त्या कारावासांत रचल्यां आणि त्या लिहून पुस्तकांत प्रसिद्ध केल्या.

त्यांच्या सहाध्यायांत पुष्कळ नामवंत मंडळी होती. लो. टिळक यांचें भक्त दे. भ. संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर, संस्कृत कोशकार श्री. ज. वि. ओक. ( हेच प्रख्यात लोकशिक्षण मासिक चालवीत असत ) श्री. द. आ. तुळजापूरकर मुंबईचे प्रख्यात वकील, Income-tax कमिशनर श्री. बाच्छा, पुण्याचे महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचे पुत्र श्री. रा. वि. पटवर्धन ( हे, श्री. तुळजापूरकर, श्री. कोल्हटकर वगैरे मिळून मुंबईस " श्रुतिबोध " म्हणून वेदवाङ्मय प्रसिद्ध करणारें मासिक काढीत असत. याच " श्रुतिबोध " मुद्रणालय, काळबादेवी रोड, येथून पुढें अच्युत बळवत यानी आपलें " संदेश " पत्र सुरू केलें. ) जस्टिस तेलंग यांचे पुत्र एकेकाळचे प्रख्यात क्रिकेट पटू पंढरीनाथपंत काशिनाथ तेलंग ( हे थिऑसॉफिस्ट होते. ॲनी बेझंट यांचे शिष्य होते.) प्रख्यात गिरणी मालक, व्यापारी व क्रिकेट पटूच सर चुनीलाल व्ही. मेहता ( पुढें १९२० नंतर मंत्रि झाले होते) अशी थोर बुद्धिमान व विख्यात मंडळी त्यांचे समकालीन होते. त्यांस इंग्रजी वाङमयाची गोडी कॉलेजांतच लागली. व त्याचा परिपाक म्हणून ते B. A. च्या परीक्षेंत त्या विषयांत पहिले आले. संस्कृत व मराठी वाङमयाचा ही त्यांचा अभ्यास होता. त्यांस आवड होती. मराठी संत वाङमय याची गोडी त्यांस केव्हां लागली तें जरी मला ठाऊक नसलें तरी संस्कृताची गोडी शास्त्रीबोवांच्या रसिक शिकवण्यामुळें

लागली. त्यांनी M, A. करितां इतिहास या विषयाचा अभ्यास केला होता. पण ते परीक्षेस बसले नाहींत. प्रख्यात इंग्रज इतिहासकार गिबन याचे Decline & Fall of The Roman Empire, श्री. सी. मेरिव्हेल यांचे रोमन लोकांच्या इतिहासावरचे ७ ग्रंथांचा सेट हे आमच्या घरीं मी स्वतः १९३० पर्यंत पाहिलेले आहेत. ते मी पुढें S. P. College च्या वाचनालयास भेट म्हणून प्रा. ओतूरकर यांचे मार्फत दिले.

त्यांची स्मरणशक्ति फार फार उत्तम होती. माझ्या शालेय शिक्षणाच्या हकीकतींत ते आंथरुणावर पडल्यापडल्याच मला संस्कृत कसे शिकवत असत या हकीगतींचे संदर्भांत त्यांचें संस्कृताचे ज्ञान याची थोडी माहिती आहे. इंग्रजी पद्य तर खूपच पाठ होतें त्यांस, पण गद्य देखील. माझे चुलत बंधू प. चिं. दामले जेव्हां F. Y. ला फर्ग्युसनमध्यें होते तेव्हां त्यांस स्कॉटची आय्व्हॅनो ही कादंबरी होती. त्या कादंबरींतील वाक्येंच्या वाक्यें ते पाठ म्हणून दाखवत. आम्हीं चकित होत असूं. मी F. Y. ला होतों, १९२० सालीं, तेव्हां मला त्याच स्कॉटचें The Bride of Lammermoor हें पुस्तक होतें, त्या संबंधांतही असा अनुभव आला! डिकन्स ही त्यांचा आवडता कादंबरीकार– शेक्सपीयर अत्यंत आवडता, मिल्टन कवि ही. गद्य ग्रंथकारांत कार्लाइल (त्याचें चरित्रच त्यांनीं लिहिलें.) (डॉ. जॉन्सन चरित्र) वगैरे. त्यांचा वाचनाचा वेग फार होता. तासास जवळ जवळ ५० पृष्ठें ते संपवीत. नुसती नजर फिरवून ते वाचीत असत. मनांत झपाट्यानें कसें वाचावें याचें एक अलीकडे शास्त्र निर्माण झालेलें आहे, पण त्यांनी स्वतः पुरतें आधींच तें जातमसात् केलेलें असेल.

त्यांचा कामाचा उरक ही फार दांडगा होता. कामास बसले कीं, ३–४तास ते सहज तन्मय होवून बसत. कॉलेजांत त्यानी "पुस्तकांतला किडा" हें अभिधान मिळवलें नसावें. माफक अभ्यास, अवांतर वाचन पुष्कळ, खेळ बोटिंग, वगैरे करमणुकी यांचा सर्वांचा आस्वाद त्यांनी चाखला होता. त्यामुळें त्यांची आंवड, बौद्धिक आवड, चतुरस्त्र स्वरूपाची होती. त्या मानानें माझे वडील मोरोपंत एक मार्गी होतें. बुद्धिमत्तेंत देखील माझ्या ऐकीव माहितीप्रमाणें सीतारामपंतच जास्त बुद्धिमान होते. मोरोपंतांना त्यांचेबद्दल अभिमान प्रेम, व आदर वाटत असे; उलट सीतारामपंत ही मोरोपंतांची योग्यता चांगली जाणत असावेत.

मला वाटतें डेक्कन व एल्फिस्टन ही कॉलेजें स्थापन झाल्यापासून १९०८–१० सालांपर्यंत (विशेषतः डेक्कन कॉलेज हें पुणें शहरापासून ५–६ मैल दूर, बंडगार्डनच्या पलीकडे थोडें फार वस्तीपासून दूर. अलग होतें म्हणून) जुन्या काळच्या, रामायण–भारत काळच्या ऋष्याश्रमांप्रमाणें खरोखरीच विद्येचीं केन्द्रें होतीं. तेथील आचार्य व छात्र हे विद्येची सेवा करीत होते. कॉलेजांचे हें स्वरूप

अलीकडे पार पालटून गेलेलें आहे. अलीकडचें कॉलेजविश्व पाहून त्या काळच्या लोकांस कसें काय वाटेल त्याची कल्पनाच करावी. त्याकाळीं विद्यार्थी ही थोडे असत, सर्व कॉलेजांत फार तर २०० चे आसपास. त्यामुळें विद्यार्थी व प्राध्यापक यांचे संबंधही. फार जवळचे व प्रेमाचे असतील.

प्रख्यात क्रिकेटपटु प्रिन्स रणजितसिंग स्वतःच्या कीर्ति शिखरावर असतांना हिंदुस्थानांत व पुण्यास आले होते. गव्हर्नरांच्या बंगल्यावर, गणेश खिंडींत एका सामन्यांत त्यांनी भाग घेतला होता तो सामना पहावयास सीतारामपंत गेले होते. रणजीनी दोन्हीं डावांत एकदां शून्य व एकदां एक कीं दोन धांवा काढल्या--! पण लोकांस तृप्त करावें म्हणून त्याना जीवदान देण्यांत आलें! नंतर त्यानीं त्यांचा खास असा लेग ग्लान्स, कव्हर ड्राइव्ह लेट कट् वगैरे आकर्षक फटके मारून दाखवले!

## सीतारामपंत व नातेवाईक यांचे संबंध

सीतारामपंत हे सर्वांत धाकटे बंधु व सर्व भावंडांत शेवटून दुसरे होते. १९१३पर्यंत माझे वडील हे मोठे कर्तृत्ववान बंधु असल्यामुळें कुटुंबाचें पुढारीपण त्यांचेकडे होतें त्यानंतर ते स्वाभाविकपणानें सीतारामपंत यांचेकडे आलें. तसें पाहिलें तर चिंतोपंत हे त्यांचेहूनच काय पण मोरोपंत व केशवसुत यांचेहूनही वडील; आणि ते मृत्यु पावले सर्वांचे नंतर १९३१ मध्यें! पण त्यांचेकडे, आर्थिक व शैक्षणिक कमतरतेमुळें कौटुंबिक पुढारीपण कधीच गेलें नाहीं.

१९१६मध्यें सीतारामपंत यांच्या पत्नी जानकीबाई मरण पावल्या. त्यानंतर त्यांस १९२१-२२ पर्यंत आयुष्यांत थोडाफार राम वाटत होता; पण पैसा मिळवण्यापेक्षां बेताचीच प्राप्ती, व देह कष्टबून बुद्धिचा व्यय करून साधल्यास देशसेवा करण्याकडे त्यांचा कल होता, त्यामुळें १९१६ ते २१पर्यंत जरी ते कौटुंबिक प्रमुख होते तरी खरी समर्थता कमी होवूं लागलेली होती. आणि १९२१।२२ नंतर तर ती फारच गेली! या संबंधांत २६ मार्च रोजीं ते लिहितात—

If there is any truth in गृहदशा the period of my life ever since 1921 mnst be full of much adverse planetory influence, that is to bring total financial ruin on me & mental worry anguish & anxiety. It

seems to be God's will and all calamities have to be patiently borne as it is not possible to escape from them.

त्यांचे बहिरंग होतें कोकणच्या प्रातिनिधिक मोठ्या फळासारखें–फणसासारखें कांटेरी; पण अंतरंग होतें मृदु, गोड. तें कळत मात्र नसें फारसें कोणास. लो. टिळक काकासाहेब खाडिलकर या पुरुषांबद्दलही असेंच सांगतात, त्यांचे अंतरंग त्यांच्या डायऱ्यांतील उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें. पण त्यांनीं डायरी ठेवावयास सुरुवात फार उशीरानें केली. माझेजवळ त्यांच्या १९२४ ते १९२७ या त्यांच्या अत्यंत पडत्या काळांतल्या डायऱ्या आहेत. त्यांतही २६ व २७ सालच्या डायऱ्यांत भरपूर मजकूर आढळतो; त्या मानानें २४ व २५ सालच्यांत कमी आहे. या डायऱ्यांतील निरनिराळ्या व्यक्तींबद्दलच्या निरनिराळ्या उल्लेखांवरून त्यांस आपल्या नातलगांबद्दल किती प्रेम वाटे व त्यांचेबद्दल ते विशेष करूं शकत नव्हते म्हणून त्यांस कशी हळहळ वाटे त्याचें प्रतिबिंब दिसतें.

पहाः–

माझे वडील मोरोपंत यांचेबद्दल त्यांनी स्वतःच्या " जग हें त्रिविध आहे " या पहिल्या कादंबरीच्या अर्पण पत्रिकेंत आपला भाव प्रकट केलेला आहे

कवि केशवसुत यांचेबद्दल त्यांचे काव्यसंग्रहास प्रस्तावना लिहिली; त्यांचें मृत्युनंतर एक शोकपर काव्य - " केशवसुत निधन " हें लिहिलें. हें काव्य प्रा. भ. श्री. पंडित यांच्या " समग्र केशवसुत " ग्रंथांत पृ. ३९९–४००वर दिलें आहे. आणि अन्यप्रकारें जरी भवानी शंकर यांनीं सीतारामपंतांना बरेंच फैलावर घेतलें असलें तरी त्यांच्या प्रस्तावनेबद्दलचे त्यांचे उद्गार खास उल्लेखनीय आहेत. ते आपल्या ग्रंथाच्या पृ. २४–२५वर म्हणतात– ' केशवसुतांसंबंधीं दिलेली माहिती अधिक विश्वसनीय व महत्त्वपूर्ण आहे. सीतारामपंतांनी केशवसुतांच्या कवितेचें केलेलें विवेचन आजपर्यंतच्या विवेचनांत सर्वोत्कृष्ट आहे ... मात्र हें विवेचन सर्वांगीण व संपूर्ण नाहीं... "

आतां डायऱ्यांतील उतारे बघूं या–

खालील उतारा माझी धाकटी बहीण श्री रत्नप्रभा घारपुरे हिचेबद्दल आहे. तो त्यावेळीं इंटरच्या वर्गांत होती. हा उतारा दि. १ जानेवारी १९२६ चा आहे–

I saw some of Ratni's papers written in the course of her terminal examination. Her answers in the administration paper would do credit to an M. L.

C. In Logic too she seems to be already a Professor having scored 67 p. c.; in Sanskrit, she seems to be rather weak. But on the whole she seems to have vastly improved.

श्री. काशीताई दांडेकर ( त्यांची बालविधवा भगिनी ) यांचेबद्द ल त्यांनीं केलेल्या मृत्युपत्रांत (२१-११-१९२२ हें प्रत्यक्ष अम्मलांत आलें नाहीं, कारणा-कारणांनीं) खालील उल्लेख केला आहे "...दोन पॉलिस्या आहेत. त्यांतील २००० रुपयांची चि. दत्तू याची होईल, व १५०० ची आहे ती माझी बहीण गं. भा. काशीताई इची होईल..."

धाकटी बहीण भीमा (सौ. भीमाताई आपटे) यांचेबद्दल दि. १७ फेब्रुवारी १९२७ रोजीं ते लिहितातः-

" Parsu ( परशराम चिंतामण, त्यांचा पुतण्या ) has returned ( from Bombay ) with भिमी, my younger sister with her grand-daughter. girl of 6 years. Bhimi is quite weak & is looking pale & sickly. Her two sons are employed in Bombay, one-teacher & the other Atmaram as a short-hand typist, & stay in मुगभाट.

त्या दोघींबद्दल पुनः ते दि. ११ मार्च रोजीं लिहितातः-

" Bhimabai, my sister left by 3 p. m. Express. Dattu has gone with her to Bombay. I had nothing to give her. I could put only Rs. 2/- into the hands of her little grand-daughter.

त्यांचे स्वतःचे धाकटे मामा, महेश्वरपंत करंदीकर यांचेबद्दल दि. ७ व ८ मार्च १९२७ रोजीं ते लिहितातः-

" Went to see महेश्वर मामा at the place of his nephew शिवराम ( आजचे प्रसिद्ध लेखक शि. ल. करंदीकर ), but neither of them was at home.

" महेश्वर मामा came to see me in the morning. Gave him tea and invited him to dine with us at 11 a. m. He came to dine & talk.

खेडचे बालपणचे मित्र गणपतराव कार्ले यांचे संबंधांतील पृष्ठ २९ जून २७ मधील उल्लेख पहा:-

" Ganpati Karle of Khed has given a note of introduction to one Patki asking me to help him in finding out a job for him. I told him that I could do precious little for him as I have no influence or connection with any employers of clerks etc. He has already got a small job as salesman in a Cantonment shop owned by a Mohamedan merchant. I told him to stick to it & not to wander about in search of a better one as no jobs are to be secured for the asking.

I am in a very poor condition of health.

पुतण्ये प. चि. दामले यांचे संबंधांत दि. २८ ऑगस्ट २७ रोजीं लिहितात-

" Parsu had brought his wife & children for noon-dinner. His little son is now nearly four months old, and his girl is 3 years old, but she is very weak cannot yet walk. They are both however in good health. He left for Rahuri by evening train.

मोठे बंधू चिंतोपंत, परशुराम-वरचे परसू-यांचे वडील, हे आमचे चुलत चुलत बंधू दत्तात्रेय गणेश दामले यांचे विवाहाकरितां पुण्यास आले होते. तो विवाह दि. २३ जून १९२६ रोजीं झाला. चिंतोपंत पुण्याहून दि. २८ जूनला परत गावीं गेले. त्यांचे संबंधांतील खालील मजकुर पहा:-

" Bhau left for पळस्रें in the early morning after tea. Poor fellow ! He is nearly deaf and is now a physical wreck. He is about 62 years old.

२३ सप्टेंबर २७ रोजीं ते लिहितात-

Received letter from भाऊ my elder brother asking for a sum of Rs. 40/-. I replied to him that I am myself in a very bad financial condition and physically prostrate & I could not spare any money. His demands only give me great mental worry and vexation.

दि. २० जून १९२५ चा उतारा पहा–

" भागवत, Son-in-law of Bhau, Kamali's husband had come to dine. Nanasaheb ( सासरे, महाभारताचार्य चिं. वि. वैद्य ) was also invited for a dinner. Mr. Bhagwat is related–a मामस भाऊ–to Mr. Soman, the rich Mill-owner & land-lord of Bombay.

Shashi ( सौ. रानडे, माझी धाकटी बहीण. हिचा विवाह सीतारामपंतांनीच करून दिला होता. ती त्यांची आवडती होती ) had also come with her sprightly little boy who is fast growing healthy & strong & is a jolly playful little fellow who is always welcome. ( हाच मुलगा हल्लीं भारतीय लष्करांत लेफ्टनंट कर्नल या हुद्यावर आहे. )

या उताऱ्यावर भाष्य करण्याचें कारण नाहीं. भागवत हे मोठ्या भावाचे जावई हें उघड होईल.

त्यांचे सासरे नानासाहेब वैद्य यांचेबद्दलचा एक चांगला उल्लेख पहा:- दि. १० जुलै १९२५:-

" Nanasaheb has returned from Gwalior. He says, he had a fine trip to Gwalior (Sheopuri) where the bones & ashes of the deceased Maharaja (Madhavrao) were taken. He travelled in the special train with Rao Bahadur R. J. Bhide. He was well treated as an honoured guest and late high official of the State & trusted adviser of the Maharaja deserved to be—"

खालील उतारा दिवाळी, नर्क चतुर्दशी यां दिवशींचा दि. १६ ऑक्टोबर १९२५ चा पहा:-

"We had a good Diwali. Narayanrao Ghaisas's five children (हे भाऊंचे जावई) had come to dine with us."

त्याचेनंतर दोन दिवसांचा दि. १८।१०।२५ चा उतारा पहा:-

" Shivrampant शशीं's hasband was with us for dinner. Alse Shivram Karandikar ( आजचे प्रख्यात लेखक शि. ल. करंदीकर व सी. के. दा. यांचे मामेभाऊ ) & his wife &

sister and mother etc. Owing to a heavy meal I had a severe tooth-ache."

दि. ११ में १९२७ रोजीं ते लिहितात:-

From Wardha, Rambhau Mama's daughter and her children who have come here for the hot season had come to see sister & Ratni & others. They are putting up in a house opposite Bendre's.

आतां हा एक शेवटचाच उतारा देतों. तो दि. ४ सप्टेंबर १९२५ या दिवशींचा आहे.

"दामू the son of my maternal uncle Maheshwar who has come to Poona from Konkan, had come to see me. He was invlted to dinner. He talked about his father, who is now an ald man of 60, and the general state of things in his villege मालदौली"

या विविध उताऱ्यांवरून त्यांचे व त्यांच्या विवध नातेवाईकांचे संबंध कसे होतें हे कळावें. यावेळीं ते स्वत: विधुर होते. त्यांची पत्नी सौ. जानकीबाई कैलासवासी झाल्यास पुष्कळ वर्षे लोटलीं होतीं. घरांतील मुख्य बाई त्यांचीच मोठी बहीण श्री. काशी ही एक बालविधवा होती. आर्थिक दृष्टीनें हा त्यांचा पडता काळ होता. त्याचप्रमाणें राजकीय पुढारी, लेखक वगैरे नात्यानेंही त्यांचा पडता काळच होता अशा या काळांत त्यांचा स्वत:चा असा संसार नसूनही त्यांचे विविध नातेवाइकांशीं जे सबंध होते, ते दिलेल्या उताऱ्यां-वरून स्पष्ट व्हावेत. माझे स्वत:चें मत म्हणजे ते एक उत्तम कोकणी कापा फणस होते; बाहेरून खडबडीत बोचणारे, पण आंतून रसाळ, गोड! माझें हें मत एखाद्या भक्तासारखें एकांगी वाटलें कोणास, तर त्यांचे व माझें दुर्दैव; दुसरें काय! आणि जर माझें म्हणणें पटलें कोणाकोणास, तर त्याचा सर्वांत जास्त आनंद होईल मलाच!

## मृत्युचे वाटेवर

१९२७ सालच्या डायरीचे शेवटच्या पानावर त्यांनीं थोरले कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी रचिलेली एक प्रख्यात अन्योक्ति उतरून ठेवलेली दिसते ती पहा –

‘ रत्नांचा जणु ताटवा झळकतो मोरा पिसारा तुझा
वाटे पाहुनियां तुला बघ वनीं पक्षी न ऐसा दुजा
मोठा सुंदर तूं खरा, परि दया नाहींच भिल्लांस या
हे घेतील तुझ्या जिवा झडकरी सोडी अरण्यास या ।।

आणि या अन्योक्तिची चवथी ओळ त्यानीं अधोरेखित केलेली आहे. यावरून मोर म्हणजे मनुष्यप्राणी स्वतःस सुंदर समजणारा असा मनुष्य प्राणी, अरण्य म्हणजे जग किंवा हा मानवी संसार, व भिल्ल म्हणजे परिस्थिति दुःखें किंवा प्रत्यक्ष मृत्यूच, अशी कांहीं या अन्योक्तिबद्दल त्यांची कल्पना असावी अशी शंका मनांत येते.

१९२६ सालच्या डायरीमध्यें शेवटच्या कोऱ्या पानांमधील एकावर खालील मजकूर आढळतोः–

“ Astrologers say that I am likely to live 10 or 11 yeare morc i. e. upto an age of 60. But I doubt very much if their prediction is likely to prove correct. I wish to die now as early as possible. According to my own thinking I am not likely to live for more than two or three years and may even succumb to some short illness during the course of the next year or two as I have a weak heart and now have also developed hernia.

पण या घटनेकडे, मृत्यूकडे, ते २३-२४ सालापासूनच वाटचाल करीत असावेत. ती वाटचाल करीत असतांना माझे मनानें एक गोष्ट अत्यंत मोठा वाईट परिणाम करणारी घडली. ती घटना प्रथम देतों.

१९१६ किंवा १७ साल असेल. ते पुण्याच्या म्युनिसिपल निवडणूकीस उभे होते. आणि या निवडणुकींत पुष्कळ खर्च करून ही पडले. त्यावेळेस ते वकील होते . . . त्यांची वकिली चांगली चालत होती. देशभक्त म्हणून त्यांस मान होता. एकूण स्थिति चांगली होती. पण म्युनिसिपल कारभारांत आपण सभासद म्हणून काम करावें ही इच्छा त्यांचे मनांत, सुप्त मनांत कायम असावी. १९२५ सालच्या निवडणुकीच्या वेळीं ती जागीं झाली, पुन: या वेळेस त्यांस विरोधी गोष्टी घडत गेल्या. पण त्यांस अनुकूलता वाटत होती ती म्हणजे मुळशीच्या सत्याग्रहांत त्यांनी शिक्षा भोगलेली होती, त्यांनी महात्माजींच्या राजकारणांत मोठा भाग घेतलेला होता या त्यागाबद्दलची. पण पैसा नव्हता, शारीरिक दुर्बलता होतीच. याचवेळीं चित्रशाळेचे वासुकाका जोशी यानीं त्यास सल्ला दिला कीं, डॉ. व्ही. डी. फाटक व श्री. हरीभाऊ तुळपुळे वकील हे त्यांचेच पक्षाचे दुसरे उमेदबार असतांना त्यांनी माघार घ्यावी. उलट सीतारामपत हट्टास पेटले! ते म्हणाले डॉ. फाटक तरुण आहेत. श्रीमंत आहेत. त्यानीं माझेकरितां माघार घ्यावी, व पुढच्या खेपेस उभे राहावें. या म्हणण्यांत तथ्य होतें ही, पण गरीबाचें ऐकतो कोण! धर्मराज युधिष्ठिरानें ज्या प्रमाणें द्यूतांत आपली पत्नीही पणास लावली तशाच अविचारीपणानें सीतारामपंतांनी आपली कीर्ति, अब्रू, पणास लावली. ते पायीं घरोघर फिरले. निवडणुकीच्या दिवशीं २-४ टांगेही त्यांनीं ठेवले. एकूण जवळ जवळ शंभर रुपये निवडणूक खर्च केला. पण अखेरीस ते पडले, एवढेंच नव्हे तर त्यांस शंभरही मतें मिळाली नाहींत. व रुपये १०० ची अनामत (डिपॉझिट) रक्कम मात्र बुडाली! या संबंधांत त्यांचे डायरींतील दि. १२ जानेवारी १९२५ चा उतारा पहा –

“Doubtful if I should stand for Municipal election as success is not certain.

मला विशेष स्थान नव्हतें घरांत, पण मी त्यांस म्हणालों होतों कीं त्यांनीं या निवडणुकीच्या भानगडींत पडूं नये. पण ते पडले; आणि निवडणुकींतही 'पडले'च; नव्हे आपटले! या अपयशाचा त्यांचे मानी मनावर फांर मोठा आघात झाला.

या काळांतल्याच कांहीं कांहीं गमतीच्या हकीगती आहेत. त्यांचा उल्लेख करावासा वाटतो. दि. ९ एप्रिल १९२५ रोजीं व त्याचे दुसरे दिवशींच्या नोंदी पाहण्यासारख्या आहेत:–

" Wasukaka (जोशी, चित्रशाळेचे मालक) says there is a scheme a-foot for reorganising " स्वराज्य " the paper conducted by शिवरामपंत (परांजपे). Wasukaka is going to take up the management and financial responsibility and it is to be developed so as to compete with Kesari. I have promised to help him, if I am likely to be paid for my troubles. "

दुसऱ्या दिवशीं ते लिहितात-

" Owing to having incurred financial losses I have now decided to withdraw from all public life and not to attend meetings and conferences. I have now to solely depend on my pen for my livelihood and I am going to wield it to some purpose..."

या " स्वराज्य " पत्राच्या संबंधांत दि. २० ऑगस्ट १९२५ रोजी ते लिहितात:-" देव, भूस्कुटे व हरोलीकर have taken over S. M. P.'s Swarajya for conducting it together with the गोवर्धन Press. They had come to request me & Nanasaheb to write for it. I told them that I could not do any more writing, nor had I any printing work to give them. They are to take over the Press by paying Rs. 1000/- per year & pay Rs. 5000/- in 5 years. The declaration will be in S. M. P.'s name.

केशवसुत यांच्या चरित्र विभागांत सीतारामपंत यांचे मनांत कोकणस्थ लोकांबद्दल एक मोठा प्रबंध लिहावयाचा असावें अशी माहिती मी दिलेली आहे, त्यापैकीं कांहीं टिपणें दिलीं आहेत. याबद्दलची पुष्कळ माहिती १९२५ च्या डायरींत आहे. पण जरा आश्चर्याची गोष्ट मला वाटली. पृष्ठ १६ मे १९२५ या दिवशींच्या पानावर " ठळक कोकणस्थ ब्राम्हणांचीं घराणीं " या मथळ्याखालीं एकूण २४ आडनांवें आहेत. त्यांत आमचें दामले आडनांव नाहीं; खाडिलकर नाहीं. केळकर, परांजपे करंदीकर, गोखले, टिळक, ..वगैरे पुष्कळ आहेत.

दि. ५ ऑगस्ट १९२५ रोजींचा एक गमतीचा उतारा पहा:-

"Strange dream at night. Been to America where in a Hotel called Montana Hill Hotel my co-

boarders were late Maharaja Kolhapur, C. R. Das, Choubal & others. Had free discussion."

दि, २४ ऑगस्ट १९२५ रोजीं खालील ऐतिहासिक महत्त्वाची नोंद आहे:–

"Dr. Sir Ramkrishna Gopal Bhandarkar died to-day at 1 p. m. He was in a dying condition during the last two years. He was nearly 90 years old It seems that many prominent men are to die this year. दासबाबू, सर सुरेंद्रनाथ, माधवराव महाराज शिंदे, डॉ. भांडारकर, कर्झन, मिल्नर, लॉर्ड फ्रेंच, रॉलिन्सन, काश्मीर महाराज.– The list is a long one."

घोडयांच्या शर्यतीबद्दल, क्रिकेटच्या चौरंगी सामन्यांबद्दल पुण्यांतल्या निरनिराळ्या परिषदा. सम्मेलनें यांचेबद्दल, नाटकांबद्दल ही नोंदी आहेत. मधून मधून. दि. १० डिसेंबर १९२५ ची नोंद पहा:–

"After all the Hindus have won the Championship in the Quadrangular Cricket-Tournament by 4 wickets. Bastmen as well as bowlers have done their best in the final batch. Deodhar failed miserably scoring 0 and 1." पण याच देवधरांनी पुढें M. C. C. विरुद्ध १४८ धांवा काढल्याची नोंद आहे."

दि. १८ डिसेंबर १९२६:–"Indian team has scored 437 in their first innings against the M. C. C. Thus the redoubtable M. C. C. is soundly thrashed by the Bombay Indians by 75 runs. Deodhar scored 148 runs. Deodhar has maintained the prestige of the Indians and of Poona Brahmans." यांत क्रीडाक्षेत्रांत कां होईना, पण इंग्रजांविरुद्ध हिंदी लोकांनीं जय मिळवल्याचा व पुण्याचा अभिमान स्पष्ट दिसतो.

दि. २४ ऑगस्ट १९२४ या दिवशीं महात्मा गांधीबद्दलची नोंद पहा:–

"Mahatmaji's influence seems to be waning. Even at Delhi he could not do much to remove Hindu-Moslem friction.

Every Big-Leader seems to command influence only for a short time. The Swarajists seem to be now in the ascendant."

महात्माजींबद्दल २ ऑक्टोबर १९२७ रोजींचा गम्मतीचा उतारा पहा:-

" He is a real saint who is thrown on a world which is not fit to absorb and profit by his teaching. Thousands will revere him, but few will accept his advice. "

आर्थिक अडचणी नसल्यामुळें त्यांनीं साधारणपणानें १९१८-१९ पासूनच वकीलीचा धंदा जो सोडला होता, तोच आतां आर्थिक अडचण निर्माण झाल्यानें पुन: स्वीकारावयाचें ठरवून त्या दृष्टीनें १९२६ पासून पुन: कोर्टाची पायरी चढण्याचा निर्णय घेतला ! आतां अर्थात् वकीली चांगली चालली नाहींच. पण त्या धंद्याची सुरुवात करतानांचा त्यांचे डायरींतील दि. ९ जुलै १९२६ चा थोडा करुणरसपूर्ण उतारा पहा:-

" In the morning went to Nanasaheb ( वैद्य त्यांचे सासरे ) and requested him to give me almost a small loan of F. R (Five rupees) for my initial expenses about the resuming of practice. He of course promptly complied with my request. "

या उताऱ्यावरून त्यांचे व त्यांचे सासरे यांचे प्रेमाचे संबंध उघड होतात; पण सीतारामपंतांची आर्थिक हलाखीही दिसून येते!

१९२७ सालच्या १५ जून रोजीं ते लिहितात:-

" It is now full six years ( खरोखर पाहतां २२ जून १९२१ रोजीं रात्रीं आम्हीं घरांत पहिला स्वयंपाक केला ) since I occupied my own bungalow. But ever since I did so, I have been in a very sad and precarious sort of financial and physical position, which never improves but is almost going from bad to worse. "

हेंच घर बांधत असतांना त्यांस फार अभिमान वाटत होता ! " लग्न पहावें करून आणि घर पहावें बांधून " या म्हणीप्रमाणें त्यांनीं पुतणीचें लग्न थाटांत केलें, तें लाभदायक झालें; पण घर-बंगला बांधला, तो मात्र पूर्ण असा कधींच झाला नाहीं, व त्याचा परिणाम कसा झाला तो वर त्यांचेच शब्दांत दिला आहे.

याच काळांत त्यांनीं कांहीं ग्रंथरचना केली. तिची माहिती पूर्वीं येऊन गेलेली आहे. पोटापाण्याचा मुख्य व्यवसाय ग्रंथरचना हाच होता. " तुरुंगाच्या

कोठडीतून सुचलेले विचार " " महात्मा गांधी " " घरचा वकील " " वसईचा रणसंग्राम " हे ग्रंथ आणि एक किरकोळ पुस्तिका–अध्यक्ष त्यांचे अधिकार वगैरे संबंधी. हा एवढा ग्रंथनिविष्ट प्रपंच. शिवाय बरेच फुटकळ लेख त्यांनीं लिहिले. दे. भ. काकासाहेब खाडिलकरांच्या " नवाकाळ " मध्यें दर आठवड्यास ३–४ कॉलम मजकुराचा लेख, असे ते २–२॥ वर्षेपर्यंत लिहीत होते. पूर्वीं उल्लेख न केलेलें एक नाटक " भटजीचा मुलगा " ही त्यांनीं लिहिलें असावें. त्याचें हस्त लिखित मी पाहिलेलें नाहीं. पण ती नाटिका ॲडव्होकेट गडकरी (त्यांचे स्नेहीच) यांचे ओळखीचा कोणतातरी एक क्लब तें रंगभूमिवर आणणार होता असें त्यांच्या डायरीवरून वाटतें. पण या सर्व खटाटोपापासून त्यांचा स्वतःचा जीव थोड्याशाच सुखानें जगण्या पलीकडे त्यांस प्राप्ति होत नव्हती.

आतां त्यांस मृत्यु कसकसा दिसूं लागला होता त्याचे निदर्शक उतारे पाहूं, आणि ते मरणाची, तयारीं कशी करीत होते, इहलोकाची यात्रा संपविण्याची त्यांची तयारी ते कशा प्रकारें करीत होते तें पाहूं. या संबधांत कांहीं उतारे पूर्वीं येऊन गेले आहेत. त्यांची पुनरुक्ति करणार नाहीं. केवळ उल्लेख करीन.

१९२६ साल अखेरचा उल्लेख व ३० मार्च १९२७, त्यांचे ५० व्या वाढदिवसाचे दिवशी लिहिलेला उतारा पूर्वीं दिलेले आहेत. पण ११ मार्च १९२७ रोजींचा खालील उतारा पहाः–

" I wonder what is wrong with my head! But it is not only the head, but heart, stomach and the whole system is at fault and has gone almost to pieces. It is now absolutely un-reasonable to expect that I can work and do anything useful or earn anything in any line. The only thing desirable is that life should end as abruptly and peacefully as possible without much further ado! "

मरणाच्या तयारीतला आणखी एक भाग म्हणजे ईश्वराराधना, जप वगैरे. त्या संबंधींचा दि. ६ मे १९२७ चा खालील उतारा पहाः–

" My रामनाम जप is going alright every evening during the last 10 months. It averages to 5000 daily recently i. e. for over two months. "

त्यांना शारीरिक पीडा मुख्यतः दातांची जास्त होती. पायोरिया झाला होता. दांत उपटून नवे बसवावयाचे तर जवळजवळ १५०।२०० रुपयांचा खर्च

होता. माझेकडे पैसे होते. त्यांचे स्वतःजवळ मात्र बँकेंत पैसे नव्हते. आणि अखेरपर्यंत त्यांनीं जितके जितके दिवस काढतां आले तितके काढले, पण मजजवळ पैसे मागितले नाहींत. सप्टेंबर अखेर त्यांस ताप येऊं लागला, अशक्तता फार आली. पण डॉ. व्ही डी. फाटक ( मुळशी सत्याग्रही ) यांनीं तावडतोब दांत काढून ध्या; मग मी दुसरी जी योग्य तीं उपाय योजना करतों असें सांगितल्यावरून ऑक्टोबरच्या ५।७ तारखेपासून दांत उपटण्यास सुरुवात झाली. त्याच संदर्भांतील खालील कांहीं उतारे पहाः—

दि. २८ मे १९२७ चा उतारा–

" Great discomfort in the evening, owing to painful teeth & bad throat. "

दि. ७ जुलै १९२७ रोजीं ते लिहितातः–

" In the evening consulted Deodhar, the Dentist. He says there is no painless extraction. Painless meaning only causing bearable & only slight pain. Least Cost he says will be 60. After extraction of all teeth new set can be fixed in a month or $1\frac{1}{2}$ months, as the gums take so much time to harden. I have told him that I shall come to him within a month or two for extraction and refilling of set.

एखाद्या भविष्यवाद्याप्रमाणेंच तें आपल्या मृत्युबद्दल लिहीत आले. त्यांचा मृत्यु खरोखर दि. १५ ऑक्टोबरला रात्रीं २ चे थोडावेळ आधीं झाला. तर ते दि. १६ सप्टेंबर रोजीं काय लिहितात तें पहाः—

" Mukhtyar Gokhale ( त्यांचे एक वकील स्नेही ) had come to inquire after my health. I told him that I was in the last stages of life and it may not even take a month or two for death to overtake me. He advised me to drink lemon juice in a cup of water. "

दि. २३ सप्टेंबर रोजों ते लिहितात।—

I was even worse to-day. In the evening by way of change I took a cup of tea, but could not bear it. I vomitted it within half an hour.

In the evening owing to extreme weakness, kept at home.

दि. ४ ऑक्टोबर रोजींच त्यांनीं डायरी लिहिली. त्यानंतर लिहिणें बंद आहे. त्यादिवशीं ते लिहितातः—( या एक दोन दिवसांतील अक्षर बरेंच खराब आहे. )

Thoroughly confined to bed day and night. Did not bother-no पूजा, संध्या or जप. Keeping in bed all day & night.

Have spoken to Dattu ( मी स्वतः, लेखक ) about calling in a Vaidya. Nanasaheb has injured his knee and he cannot go to any vaidya. Dattu will do the same.

आतां त्यांचा अंत झाला त्याच वर्षीच्या डायरीतील अखेरच्या पानांत, मानवजीवन म्हणजे काय, सुख म्हणजे काय? मृत्यु म्हणजे काय? वगैरे प्रश्नांसंबंधीं विचारांचे सुवर्णकण आढळतात. ते देतों:–

"सुख म्हणजे काय ? संपत्तींत सुखाचें सर्व साधन नाही. मनुष्यमात्राच्या व एकंदर विश्वाच्या पसाऱ्याचा अंतिम हेतु काय ? कशाकरितां हा सर्व पसारा व देखावा मांडलेला आहे ?

या प्रश्नाला कोणीच उत्तर देत नाहीं. परंतु सर्व प्राणी, पशु, पक्षी व माणसें एकमेकांशीं ओढाताण, चुरस, तंटेबखेडे करून जन्मभर धडपड करीत आहेत. अरे पण एवढी धडपड व आटापिटा कशासाठीं ? केवळ साडेतीन हात देहाला वस्त्र व टींचभर पोटाला अन्न मिळावें म्हणून ? मनुष्यप्राणी देखील कीटकाप्रमाणेंच क्षुद्र आहे.

A Poor man who is some how struggling to make both ends meet has not much of an account to jot down ( हें सर्व निरनिराळ्या महिन्यांचे जमाखर्चाचें तेरीज लिहिण्यास जी पानें असतात त्यांवर आहे ! ) Thanks to the continuous writing work that Khandekar is getting done through me, I am enabled to earn enough to live independently Were it not for this. I do not know how I could

secure even a bare subsistence wage. God is great! I am daily performing जप of रामनाम; and राम will not throw me completely over board.

" What is happines? Why the bother of this life? Why and wherefore of the existence of the whole universe is known to none. These questions nobody answers satisfactorily and all work struggle and jostle one another in a vain endeavour to achieve what? Nobody knows.

Agnosticism, atheism and Materialism are alright so far as they go. But what is the first and principle motive power or source of power which keeps the universe going? There is constant motion activity and regulated rhythmic action. What is the guiding and controlling power which does all this? No answer नैति नैति. However the idea of an individual or personal soul being immortal in the individual capacity is absurd and un-sustainable.

What is death? and why should a man be always afraid of it? Of course untimely death is a deplorable calamity. But when death comes in nature's due course, it is only to be welcomed and the sooner the better. To the man who dies it is a grand release from all bother, worry, grief, pain and the thousand and one evils which torment him all through life. If the man has many dependents and relations, who look up to him for their comfort and happiness the Man's death is certainly a misfortune. But death can never be great evil to the man who dies. But man is always in dread of it, and he shudders even to think of its near approach.

But a man in my position would welcome it at any moment without any great agony or physical suffering.

The month of Aug. & Sept. were financially alright. But physical health was simply pitiable and I almost imagined that my end was quite near. This may even now prove to be the real case. But is seems I am still destined to prolong my life for some time more. How tenaciously man clings to life even when there is very little charm left in it. Wonderful were the old Romans who committed suicide when they found life intolerable. The Japanese Samurais who perform Hara Kiri are also really brave fellows who do not cling foolishly to a miserable & useless cxistence.

चित्रशाळेचे श्री. वासुकाका जोशी हे दिनांक १६ च्या ‡ पहाटेच्या सुमारास सीतारामपंत यांच्या प्रकृतीच्या चौकशीकरितां आले. त्यांचें निधन झालें असें कळल्यावर त्यांनीच अंत्ययात्रेची सर्व तजवीज केली. सकाळीं ८ चे सुमारास किंवा आधींच घरांतून त्यांचा देह बाहेर पडला. आणि आम्ही १०॥-११ ला त्यांच्या बगल्यांत त्यांच्याविना परत आलों. स्मशानयात्रेस थोडी पण निवडक कॉंग्रेस पक्षीय व इतरही मंडळी होती. श्री. ज. स. उर्फ तात्यासाहेब करंदीकर होते. ओंकारेश्वराचे स्मशान भूमीमध्यें कोणाचेंच भाषण झालें नाहीं, दे. भ. भालाकार भोपटकरांभोवतीं वकील लोकांच्या गोष्टी चालल्या होत्या. दे. भ. शिवरामपंत परांजपे यांचेभोवतीं कॉंग्रेसच्या लोकांच्या गोष्टी चालल्या होत्या. दहन जवळजवळ संपल्यानंतर श्री. तात्यासाहेब करदीकर घरापर्यंत आले आणि ज्या ठिकाणीं सीतारामपंत यांनीं देह ठेवला त्या ठिकाणीं जो दिवा लावून ठेवलेला होता, त्यास नमस्कार करून हातपाय धूवून घरीं परत गेले. मी ही एक नवी गोष्ट स्मशान यात्रेस जाण्यासंबंधींची, जुनी, शास्त्रास धरून असणारी शिकवण त्यांचेपासून घेतली. आचरणांत मात्र फारशी आणूं शकलों नाहीं.

---

† तळटीपः– माणसाचें स्मरण चुकतें थोडे कधीं कधीं याचा प्रत्यय आला. पुढें एका पृष्ठावर सीतारामपंतांच्या स्थावर जंगम मालमत्तेची यादी दिली आहे, त्या यादीची मूळ यादी माझेजवळ आहे. ती पुनः तपासून पाहिली, व आतां सी. के. दा. यांचा मृत्यु दिनांक १६ हा आहे, १५ नाहीं.

श्री. वासूकाका जोशी यांनी स्मशान यात्रेबद्दल एकप्रकारें गुप्तता ठेवली. याबद्दल त्यांस पुष्कळांनी दोष दिला.... पण परिणामाकडे नजर दिल्यास झाली ही गोष्ट कांहीं वाईट झाली असेंही म्हणतां येणार नाहीं.

त्यांचे मृत्युनंतर योग्य वेळीं मजकडे तीन ठराववजा कागद आले. ते अजूनही मजजवळ असल्यानें ते शेवटीं परिशिष्ट म्हणून जोडतों. पहिला कागद त्या मंडळींपैकीं पुष्कळजणांनीं बाराव्या दिवशीं स्वतः घरीं येऊन मला दिला, तो काँग्रेसवाल्या पुढाऱ्यांनीं. त्यांच्या बहुतेकांच्या सह्या आहेत त्या कागदावर. दुसरा आहे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिकारी मंडळींचा व तिसरा टिळक महाविद्यालयाचा.

सीतारामपंतांच्याच चरित्रांत त्यांचा एक "मृत्युपत्र" वजा लेख दिला आहे. चितोपंत यांच्या चरित्रांत त्यांच्या ऐहिक मालमत्तेची विभागणी कशी झाली तें कळून येईल. याबाबतींतही ते थोडेफार दुर्दैवीच ठरले. त्यांच्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडल्या नाहींत.

एकंदरींत सीतारामपंत हा फार मोठया कर्तृत्वशक्तीचा पुरुष होता. त्यानें कोणतीच एक गोष्ट सातत्यानें केली नाहीं हा त्याचा मोठा दोष. वकिली, प्रोफेसरी, संपादकी, कादंबरी लेखन व संकीर्ण लेखन या व्यवसायांपैकी प्रत्येकांत त्यांनीं आपली चमक दाखविली. लोकांस स्वतःच्या कर्तबगारीची चुणूक दाखविली पण पुढें तें काम तेवढेच राहिलें! कदाचित् आयुष्यांत स्वतःचा प्रपंच नसल्यामुळें त्यानीं आयुष्यांत स्थिरता आणली नाहीं, किंवा योगायोगानें त्यांच्या आयुष्यांत ती आली नाहीं.

महात्मा गांधीच्या असहकारितेचा मोठ्या प्रमाणांत पहिला पुरस्कार महाराष्ट्रांत त्यांनींच केला. सत्याग्रहाची व गांधी तत्त्वज्ञानाची शिकवण प्रथम त्यांनी दिली. मागाहून काकासाहेब खाडिलकर, अण्णासाहेब परांजपे, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ आदि मंडळी. त्यांनीं आपल्या आयुष्याचा बराच मोठा भाग पुण्यांत खर्च केला. पण त्याच पुण्यांत (त्यांचे राहतें घर १९६०पर्यंत माझ्या मालकीचें होतें.) त्यांच्या घराच्या रस्त्यास साधें त्यांचे नांव देण्याचेंही कोणास सुचलें नाहीं, त्यांची आठवण झाली नाहीं. काँग्रेसच्या संस्थेचा जो मोठा थोरला पसारा इमला महाराष्ट्रांत झाला, त्या इमल्याच्या पायांत सीतारामपंत अक्षरशः गाडलें गेले आहेत. त्यांची कांहींच नांवनिशाणी कोठेंच दिसत नाहीं! त्यांनींच २७च्या डायरीच्या शेवटच्या पानांत लिहून ठेवलेलें नाहीं काय कीं "मनुष्य प्राणीदेखील कीटकांप्रमाणेंच क्षुद्र आहे." पण हा त्यांचा थोर विचार झाला. सामान्य माणसास आतां तरी पुणेकरांनी केलेल्या त्यांच्या या उपेक्षेबद्दल थोडी खंत वाटू नये काय? अजूनही त्यांचें संबंधांत कांहीं होईल काय?

# परिशिष्टें

॥ श्री ॥

रा. रा. दत्तात्रय मोरेश्वर दामले यांस–

सीतारामपंत दामले हे वारल्यामुळें त्यांच्या कुटुंबांतील आपण जी मंडळी, त्यांना वाईट वाटलेंच असेल; पण आपल्या प्रमाणें आम्ही जी त्यांची मित्रमंडळी त्यांनाहि सीतारामपंतांचे निधनामुळें अतिशय दुःख वाटत आहे. त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचे लेखन, कौशल्य, आणि त्यांचा तरतरीतपणा, या गुणांच्या योगानें सार्वजनिक कार्यांमध्यें त्यांचा सर्वांना फार उपयोग होत असे. राष्ट्रमत हें दैनिक वर्तमानपत्र व राजकारण हें साप्ताहिक वर्तमानपत्र चालवून त्यांनी लोक–शिक्षणाची फार मोठी कामगिरी बजाविलेली आहे. लो. टिळक आणि म. गांधी या उभयतांच्याहि चळवळीमध्यें जीं उदात्त तत्त्वें होतीं, त्यांचा अंगिकार करून आणि त्याप्रमाणे आपलें वर्तन ठेवून सीतारामपंतांनी आपलें चरित्र सर्व लोकांना आदर्शभूत असें करून ठेवलें आहे. मुळशी सत्याग्रहामध्यें मोठ्या धैर्यानें भाग घेऊन राष्ट्रकार्याकरितां जें संकट येईल तें सोसण्याची त्यांनी जी तयारी दाखविली ती त्यांच्या चरित्रांतील एक विशेष भूषणास्पद आणि संस्मरणीय अशी गोष्ट आहे. हल्लीं प्रत्येक क्षणीं आपापल्या स्वार्थाच्या अनुरोधानें प्रत्येक जण आपली राजकीय मतें बदलीत सुटले असतांना सीतारामपंत यांनी आपलीं तत्त्वें आणि मतें कायम टिकविलीं याबद्दल ते खरोखरच अत्यंत स्तुतीला आणि सन्मानाला पात्र आहेत. राजकारणांतील त्यांच्या या स्थैर्याप्रमाणेच त्यानीं आपल्या लेखन कौशल्यानें आणि वक्तृत्वाच्या चातुर्यानें वाङ्मयाच्या प्रांतामध्येंहि आपलें नांव कायमचें स्थिर करून ठेविलें आहे. अशा प्रकारचे आमचे मित्र आणि आमच्यामध्यें राहून नेहमी प्रेमळपणाने काम करणारे सीतारामपंत यांची आम्हांला वरचेवर आठवण होते. व त्यांच्यासारख्या कार्यकारीं माणसाची जागा भरून निघणे कठीण आहे. याचे प्रत्यंतर आम्हाला पदोपदीं येतें. ते आपल्या पुणें शहराच्या कॉंग्रेस कमिटीचे व

पुणें जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे थोडे वर्षापूर्वीं अध्यक्ष होते. व त्या नात्यानें हल्लीच्या या दोन्ही संस्थांच्या आम्हां सभासदांना त्यांच्या वियोगामुळें जें दुःख होत आहे तें व्यक्त करणे आपलें कर्तव्यकर्म आहे असें आम्हांस वाटत आहे. व त्यासाठीं आमचे हे दुःखाच उद्गार येथें नमूद करून ते आपले पुढें आम्ही सादर करीत आहों.

सीतारामपंतांच्या निधनानें आपल्या कुटुंबांतील मंडळींची तर हानि झालेलीच आहे, पण त्यामध्ये आम्हीहि वाटेकरी असून आम्हालाहि आपल्या इतकेंच दुःख वाटत आहे. परंतु ज्या गोष्टी परमेश्वराधीन आहेत तेथें मनुष्याचा काय उपाय चालणार आहे ? तेव्हां जगाचे रहाटीकडे पाहून आपण त्यांचे बद्दलचें दुःख विसरण्याचा प्रयत्न करावा. ज्यानी आमरणांत स्वार्थनिरपेक्षतेनें लोककल्याणासाठीं आपला देह झिजविला, त्यांच्या आत्म्यास परमेश्वराचे घरी खात्रीनें शांती मिळेल यांत संशय नाही.

मिती कार्तिक शु. ४ शनवार शके १८४९.

१ ह. वि. तुळपुळे } मोडी { १ वासुदेव गणेश जोशी
१ सी. म. परांजपे } सह्या { १ हरी गणेश फाटक
१ ज्ञा. कृ. लद्दू } मोडी — १ गणेश शास्त्री वैद्य
१ ( सही कळत नाहीं. ) सह्या — मोडी — १ शंकर नरहर जोशी
१ पोपटलाल रामचंद्र शहा — मोडी — १ त्र्यं. ब. हरोलीकर.
१ डॉ. शिवराम भिकाजी परुळेकर
१ मीर शकुल्ला (इंग्रजी)
वासुदेव गणेश कुलकर्णी (मोडी)
आदमभाई महमदभाई
हुसेनभाई मगतुंभाई
गोटीराम संत्राम काची
शेक बाबुमीया रुस्तुंम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नोंद दि ........

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

ता. २।३।२८

कृ. सा. न. वि. वि.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियामक मंडळानें गेल्या ता. २६ च्या सभेंत पुढील ठराव सर्वानुमतें पसार करण्यांत आला असून तो आपणांस कळवीत आहे

ठराव : "टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे एक विद्वान सभासद, टिळक महाविद्यालयाचे एक संस्थापक व माजी अध्यापक, महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लेखक, वर्तमान पत्रकार व करारी अति स्वार्थत्यागी देशभक्त कै. सीताराम केशव दामले बी. ए. एल्एल्. बी. यांच्या निधनाबद्दल नियामक मंडळाच्या या सभेस अत्यंत दुःख होत असून त्यांच्या आप्तेष्टांच्या दुःखांत ही सभा वाटेकरी आहे."

कळावें. लोभ असावा ही वि.

स. के. भावे
उपकार्यवाह

## टिळक महाविद्यालय

वि. प्र. लिमये
अधिपति

पुणें, ता. ९।११।१९२७

रा. दिनकरराव दामले यांसी

विनंति विशेष.

आपले चुलते कैलासवासी सीतारामपंत यांच्या निधनाबद्दल टिळक महाविद्यालयांत सोमवार ता. ७।११।१९२७ रोजीं अध्यापक व विद्यार्थी यांची संयुक्त सभा होवून पुढीलप्रमाणें ठराव मंजूर झाला तो आपणाकडे पाठवीत आहे व आपणांस झालेल्या दुःखांत आम्ही सर्वजण वाटेकरी आहोंत एवढें कळविण्याची अनुज्ञा घेत आहे.

लो. टिळकांचे अनुयायी, निस्सीम राष्ट्रभक्त, प्रसिद्ध लेखक व टिळक महाविद्यालयाचे एक संस्थापक कै. सीताराम केशव दामले यांच्या मृत्युबद्दल टिळक महाविद्यालयांतील विद्यार्थी व अध्यापकांच्या सभेस अत्यंत दुःख होत आहे. त्यांच्या मृत्युमुळें जुन्या पिढीतील एक स्वार्थत्यागी व कर्तव्यदक्ष राष्ट्रभक्त व धंदा वाङ्मय लेखक नाहींसा झाला असें या सभेचें मत आहे."

कळावें हे विनंति.

आपला
वि. प्र. लिमये
अधिपति

# आणखी एक दुखवटा पत्र

कार्तिक शु. ८, शके ४९; पुणें

सप्रेम सा. न. वि. वि.

मी कर्नाटकांत फिरतीवर होतों. तो नुकताच परत आलों. तों रा. सीतारामपंत दामले यांच्या मृत्युची वार्ता कळली! ऐकून परम दुःख झालें! कै. सीतारामपंत यांचे मृत्यूनें मराठी साहित्याचा अभिमानी असा विद्वान लेखक नाहींसा झाला आहे. रा. दामले यांची लेखणी ओजस्वी होती. मोरोपंत काय सीतारामपंत काय किंवा कृष्णाजीपंत काय सर्व सरस्वतीचे लाडके पुत्र होते. कार्लाईलचें चरित्र पुनः छापण्याविषयीं मी त्यांस एकवार बोललों होतों व तें जरा वाढवून छापण्याचा विचार आहे असें ते मला म्हणाले. आतां हा सर्व ( भार ) तुम्हां आम्हां अवशिष्टांवर आहे. दामले घराणें या त्रिवर्ग बंधूंनीं अजरामर केलें. ही कीर्ति त्यांच्या वंशजांनीं सतत सांभाळली पाहिजे. कळावें. बहुत काय लिहिणें. ही विनंति.

दत्तो वामन पोतदारकडून.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक .................... दि: ....................
क्रमांक .................... नों. दि: ....................

येथपर्यंत मुख्य ग्रंथ संपला. पण " सरस्वतीचे लाडके पुत्र " घडवण्यांत ज्याप्रमाणें त्यांचे वडील केशव विठ्ठल दामले यांचा वाटा आहे, त्याचप्रमाणें त्यांचेच दोन वडील बंधू चिंतो केशव, व विशेषतः श्रीधर केशव यांचाही वाटा आहे. म्हणून यापुढें या दोन बंधूंची चरित्रें दिलीं आहेत.

—द. मो. दामले

# चिंतो केशव –

## [ पूर्वायुष्य १८६४ ते १९१० (सुमारें) ]

केसोपंतांच्या सर्वच मुलांत चिंतोपंत हे एकाप्रकारें सर्वांत दुर्दैवी पुत्र होत, तसें म्हटलें तर त्यांसच सर्वांत जास्त आयुष्य लाभलें. ते १९३० मध्यें जवळजवळ ६६ वर्षांचें होऊन कैलासवासी झाले. त्यांचें वय साधारणपणानें केसोपंतांचें एवढें होतें. त्यांस बंधूंचा प्रेमभाव भरपूर प्रमाणांत मिळालाही. विशेषतः कृष्णाजीपंत आणि मोरोपंत यांचेकडून त्यांस पुष्कळच मदत मिळाली, प्रेम मिळालें. श्रीधरपंत अकालींच वारले आणि सीतारामपंतांकडून मात्र त्यांच्या अपेक्षेप्रमाणें त्यांस प्रेम मदत मिळाली नसावी, नाहीं. १९१३ पर्यंत, मोरोपंत यांचे मृत्युपर्यंत, त्यानीं तशी अपेक्षाही केली नसावी. सीतारामपंतही देशाच्या सेवेंत थोडेफार कार्य करी होते. त्यांचे आयुष्यांत स्थैर्य आलेलें नव्हतें. पण पुढें थोडें स्थैर्य आल्यावर यांचेही आयुष्य १९१६ त त्यांची पत्नी मरण पावल्यावर व पुढें लो. टिळक यांचा १९२० त मृत्यु झाल्यावर, अस्थिरच बनलें, वादळांत हेलकावे खावूं लागलें. त्यामुळें सीतारामपंत हे चिंतोपंतांस अपेक्षित अशी आर्थिक मदत देऊ शकले नाहींत.हा विषय पूर्वी आला आहे केव्हां तरी; पण त्याबद्दल आणि चिंतोपंतांबद्दलही, त्यांचे कर्तबगारीबद्दलही थोडी कल्पना यावी म्हणून त्याचें सीतारामपंत यांस लिहिलेलें एक पत्रच पुढें देतों, समग्रः–

सोबत सरकार दस्ताच्या चालू सालच्या पावत्या आहेत.

**श्री.**

ता. २६–४–२६
पळस्पें. ता. पनवेल
जि. कुलाबा

चि. रा. रा. बापूसाहेब दामले मु. पुणे यांस
अनेक आशिर्बाद विशेष

∴ पुत्रशोकानें
● कर्ण दुःखानें
दारिद्र्यानें

"बहुत पिडिलें बंधो मरण बरें वाटतें"– परंतु तें येणें ईश्वराधीन आहे.

"गात्रं संकुचितं गतिर्विगलिता भ्रष्टाच दंतावलि ।।
दृष्टिर्नश्यति वर्धते बधिरता वक्त्रंच लालायते ।।
वाक्यं नाद्रियते च बांधवजनैर्भार्या न शुश्रूषते ।।
हा कष्टं पुरुषस्य जीर्णवयसः पुत्रोप्यमित्रायते ।।"

"निर्द्रव्या पुरुषा न बंधु भजती त्या मान कोठें नसे ।।
जातां तो धनिकगृहा कुशलहि त्याला न कोणी पुसे ।
थोरांपासुनि दूरदूर फिरतो लाजोनि वस्त्रांविणें
वाटे निर्धनता महा नरक हा, हा धिक् तयाचें जिणें ।"

---

∴ थोरले चिरंजीव, पांडुरंग चिंतामण, हे १९२३ च्या जूनचे सुरुवातीस वारले.
● त्यांचे स्वतःच्या कानाचें एक ऑपरेशन झालें होतें त्यानंतर, मुंबईस.

वर कविच्या उक्ति दिल्या आहेत, त्यांतील थोड्या कांहीं उक्ति खेरीज करून बाकी सर्व बाजूनीं माझी स्थिती दु:खद व कष्टमय झालेली आहेच. हें आपण विचाराअंतीं जाणालच. बायको वारली हें आपणांस कळविलेलें आहे. त्याचें दु:ख कमी करीत नाहीं. येका अर्थीं सौभाग्यपणांत ती वारली हें चांगलेंच आहे. परंतु तिच्या अंत्यविधीपासून उत्तरक्रिया होईपर्यंत सुमारें ७५-८० रुपये खर्च आला. चि. परशराम त्यावेळीं येथें आला होता. त्यानें बराच खर्च केला. परंतु तो येण्यापूर्वी नुसत्या दहन विधितच २५-३० रुपये खर्च करावे लागले, ते केवळ लोकांचें कर्ज काढून मला खर्च करावे लागले. ते अजून तसेच देणें आहेत. परशराम यास आपला तेथील खर्च भागवून आम्हास नित्य खर्चास लागतात ते देऊन जास्त देण्यास सवड झाली नाहीं. तो तरी काय करणार बिचारा. असो. पांडुरंग कैलासवासी झाल्यापासून जिकडून तिकडून सर्व भार त्याचे डोक्यावरच पडला आहे. चि. रा. रामभाऊ वैद्य जांवई हे सौभाग्यवतीस भेटण्याकरितां आले होते, त्यांनीं डॉक्टर आणून औषध देण्यास सांगितलें ते डाकतरचे फी वगैरेचे पैसे वैद्य यानीं मला दिले. परंतु दुसरे किरकोळ बारिकसारीक औषधें वगैरे खर्च मलाच करावा लागला.

कानाचें दुखणें आलें त्यावेळीं कानावर टाळाकपाळाचाही भाग बिघडला होता तो दवाखान्यांत जाऊन ऑपरेशन केल्यानें बरा झाला .परंतु कपाळाचा जो भाग बिघडला होता त्यांतून पू किती गेला तें दुसऱ्यास शद्बांनीं व्यक्त करतां येत नाहीं. पू गेल्यामुळें कपाळाचा जो भाग पोकळ जालेला आहे तो वार्धक्यामुळें आतां भरून येणें शक्य नाहीं. त्यामुळें " गात्रेषु सर्वेषु शिरः प्रधानं " डोकेंच जर बिघडलेलें आहे तर सर्व शरीरास सुख कोठून व कसें होणार? येकंदर वयमानापेक्षां या दुखण्यानेंच अशक्तता आलेली आहे. कांहीं कामधंदा करवत नाहीं. डोळ्यांसही अधूपणा आलेला आहे, त्यामुळें वाचनही फारसें होत नाहीं. केवळ " खायला काळ व भुईला भार " याप्रमाणें आयुष्याचे दिवस कंठीत रहाणें नशिबीं आलेलें आहे. तें भोगीत आहे.

कैलासवासी अण्णांनीं जमीन घेऊन ठेवली, व ती त्यांचे मुलानें चि. दत्तात्रयानें) अजूनपर्यंत माझेकडे ठेविली आहे. तिचें भात येतें त्यामुळें पोटाची खाण्याची दधात पडत नाहीं. भाताशिवाय इतर खर्चास परशराम पुरवतो.

अण्णांचे पश्चात आपण मला व मुलांसही मदत केलेली आहे. आतां आपल्यास विशेष मिळकत नाहीं आहे. हें मला समजलेलें आहे. तथापि आतां माझे आयुष्याचे दिवस फार जातील असा नेम नाहीं. येकंदर दु:खानें जीवास चैन नाहीं. त्यांत ही अलीकडे झालेली लोकांचे देण्याची कांचणी; त्यामुळें जीवास

फारच त्रास होतो. राहवेना म्हणून सर्व हकीगत सविस्तर पूर्वक कळविली आहे. जावई यानीं थोडीफार मदत केली. आतां धांव कोणाकडे घ्यावी तर बंधूकडे घ्यावी अशी ईश्वरानें प्रेरणा केली त्याप्रमाणें आपल्याकडे धांव घेतलेली आहे. रोजचें कसें तरी चाललें आहे. परंतु हा प्रसंग, संकट अवचित आलेलें आहे. हें आपण ध्यानीं आणून आपल्या सवडीनुसार कांहीं पैसे ४०।५० रुपये पाठवाल अशी आशा करतों.

आतां आपण दोघेच बंधु हयात आहों, एकमेकांस भेटावें अशी इच्छा गुदस्त सालापासून मनांत येते आहे. परंतु तसा योग अजूनपर्यंत आला नाहीं, असो. जास्त काय लिहूं.

माझी प्रकृति आहे ती बरी आहे. ताप वगैरे येत नाहीं. परंतु डोकें बिघडलेलें असल्यामुळे व वयमानानें खाणें पिणें वगैरे अगदीं पथ्यासारखेंच रहावें लागतें. पडसें होता कामा नये. पडसें जालें तर डोक्यास जास्त त्रास होतो. म्हणून ऊन पाणी पिणें, ताक वगैरे आंबट न खाणें, ऊन पाण्यानें स्नान करणें, वगैरे फार जपावें लागतें

कळावे लोभ असावा हे आशिरवाद चि. रा. दत्तात्रय वगैरे सर्वत्रांस आशिरवाद.

ता. क. सूनबाई व तिच्या मुली येथें मजजवळच आहेत.

बंधो तूं चतुराग्रगण्य अससी त्या तूज बा काय तें ।
सांगावें अभिधान हेंच म्हणुनी होईल कीं स्पष्ट तें ।
पत्राचा मजकूर सर्व जरी तो ध्यानीं मनीं घेऊनी ।
मातें आठविसी विचारचतुरा प्रार्थीतसें तूज मीं ॥

चिं. के. दामले

चितोपंताचें आयुष्य दुःखदायक कसें होतें याची जाणीव देण्याकरितांच हें पत्र या पहिल्या भागांत दिलें पण याबद्दल लिहीन त्यांचेच चरित्राच्या दुसऱ्या भागांत.

चितोपंतांचा जन्म १८६४ सालांत झाला. म्हणजे ते केशवसुतांच्या वरचाच नंबर होते. केसोपंतांचा थोरला मुलगा श्रीधर याचा जन्म सन १८५७ चा त्याचे शिक्षणाचा भार केसोपंतांनीं स्वाभाविकपणानेंच शिरावर घेतला होता. ते १८८२ मध्यें बी. ए. झाले आणि १८७८ मध्यें ते मॅट्रिक झाले. (पूर्वी

मॅट्रिकनंतर तीन वर्षांनीं बी. ए. होतां येत असे अशी माहिती आहे.) यावेळीं १८७८ मध्यें चिंतोपंत हे १४ वर्षांचे होते. त्यावेळीं चिंतोपंताखेरीज कुटुंबांत कुशा, मोरू त्याचे पाठच्या तीन बहिणी, आणि श्रीधरपंत यांची बायको एवढा कुटुंबविस्तार पोसावयाचा होता. त्यामुळें चिंतोपंतांस उच्च शिक्षण, इंग्रजी शिक्षण, किंवा फायनल परीक्षेनंतर पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजचें शिक्षण ही देणें अशक्य झालें. कुशा म्हणजे केशवसुत, आणि मोरू यांचें तरी शिक्षण झालें, याचें कारण श्रीधरपंत किंवा तात्या यानीं त्यांस कोकणाबाहेर काढलें आणि सुरुवात करून दिली. म्हणून पुढें त्यांचे शिक्षणाचें कसें तरी रेटले गेलें. आणि तें चालू राहण्यास, चिंतोपंतांस मंडलीकांचे येथील नोकरी मिळाली त्यामुळें ही तें सुकर झालें.

चिंतोपंताचें व्यक्तिमत्व मी पाहिलें तें देतों. मी त्यांस प्रथम माझ्या बहिणीच्या विवाहांत म्हणजे १९१२ च्या मे मध्यें पाहिलें. त्याचे आधींही नागपुरास ते आले होते, १।२ वेळां; पण त्यावेळची विशेष आठवण नाहीं. ते उंचीनें ५ फूट ३।४ इंच म्हणजे बापूकाकांप्रमाणेंच (सी. के. दामले) होते. पण यांचा वर्ण गोरा नव्हता, काळ्याकडे झुकणारा होता. तोंडावर शिक्षण न झाल्यामुळें असेल किंवा बहुतेक आयुष्य कोकणांत, खेड्यांत गेल्यामुळें तशी कांहीं चमक, हुषारी, तेज दिसत नसे. ते धोतर, कोट, उपरणें (पांढरें) आणि पांढराच फेटा घालीत असत. यांस विडीचें थोडें व्यसन होतें. त्यांचे जवळ तंबाखू आपट्याचीं पानें, चकमक, (एक डबी त्यांत कापूस भरलेला, एक लहानसा पोलादाचा तुकडा व गारगोटीचे दगड) असे. आपली विडी ते स्वतः तयार करून ओढीत असत. ती तयार करीत व चकमकीनें ठिणग्या पाडून डबींतील कापूस पेटवून नंतर विडी पेटवीत. हें पहातांना आम्हा मुलांना मोठी गम्मत, कुतूहल वाटत असे. ते तपकीरही ओढीत असत थोडीफार, सुपारी खाणें ही सवयही त्यांस होती. ते चंची बाळगीत असत स्वतःजवळ; पण विडा मात्र नेहमीच खात नसत, पायांत कोकणी वाहणा घालून असत. पायीं फिरणें हाच त्यांचा व्यायाम असावा. केसरी वाचना व्यतिरिक्त विशेष असें त्यांचें वाचन नसावें. कारण पुढें १९१४ मध्यें आम्ही एक वेळ त्यांचे घरीं बेलपुर (जि. ठाणे) येथें पुण्यास प्लेग असल्यानें गेलो होतों, जवळ जवळ दोन महिने राहिलों होतों. त्यावेळीं त्यांचेकडे पुस्तकें वगैरे पाहिलीं नव्हती. त्यांस वाचतांना पाहिलें नव्हतें. त्यांची वृत्ति धार्मिक नव्हती. त्यांचेकडे ते देवपूजा करीत नसत, धार्मिक वाचन नव्हतें, भजन नसे, पण जेवतांना आगेंमागें "अन्नदाता सुखी भव, अन्नदात्याचें कल्याण होवो" हा मंत्र त्यांचे तोंडून ऐकावयास येई कधीं कधीं खालील पद्याचा चरण " हरीस्मरण विस्मरण तरी (करी?) तुज काय जिणें रे फसूं " हा ऐकूं येत असे. पण यापलीकडे त्यांची कसलीच धार्मिकता संध्या

देखील नागपूरास, पुण्यास किंवा बेलापुरास पाहिल्याचें मला आठवत नाहीं. ते बहुधा गार पाण्याने स्नान करीत, आणि आपलें धोतर पंचा स्वःच धुवून टाकीत असत. त्यांचे धोतर जरा आखूड असे, जाड असे.

चिंतोपंतांचा स्वभाव कसा होता, निदान लहानपणीं तो कसा होता तें कांहींच माहीत नाहीं. ते भावांशीं किंवा बहिणींशी कसे वागत वगैरे कांहीं माहिती नाहीं. पण जी इतर ऐकीव माहिती आहे, व मोठेपणीं जी थोडी प्रत्यक्ष पाहिली काशी या एका बहिणी बरोबरची वागणूक, त्यावरून ती फारशी चांगली नाहीं. १९१०पर्यंत (साधारणतः१८९३त केसोपंतांचे मृत्युनंतरच्या १७-१८वर्षांच्याकाळांत) त्यांच्या तीन बहिणी परांजपे कुटुंबात व आपटे कुटुंबात विझे यांचेकडे दिलेली, अनुक्रमें आवडी, भीमा, व यमुना कोकणांतच होत्या. आणि त्यांचेशिवाय अन्य भाऊ देशावर होते. पण त्यांस माहेरपणाचा लाभ फारसा मिळाला नाहीं. खरोखर पाहिलें तर यमुना ही त्यांचेपेक्षां दोन वर्षांनी मोठी बहीण त्यांच्या वळणें गावांपासून फार दूर नाहीं अशा गुडघें गांवी होती; आणि दुसऱ्या दोघी खेडजवळ शेरवली व कळमणी या गांवीं असत. पण त्यांस कोकणांतल्याच त्यांच्या या भावानें अगत्यपूर्वक विचारावयास हवें होतें. पण तसें त्यानीं केलेलें नाहीं अशी माहिती कळते.

त्यांचें बाळपणचें शिक्षण अर्थात् केसोपंतांबरोबर ते जेथें असत त्या गावींच झालें असेल. विद्यार्थी या नात्यानें ते हुशार होते, एवढेंच नव्हे तर त्यांचे वेळेस व्हर्नाक्युलर फायनलच्या, मराठी ७ वी च्या परीक्षेंत ते रत्नागिरी जिल्ह्यांत पहिल्या क्रमांकानें पास झाले होते अशी माहिती त्यांचे चिरंजीव श्री. परशुरामपंत यांचेकडून ऐकलेली आहे. ते खरें असेलही; त्यांचे इतर भावंडांची हुशारी लक्षांत घेतली म्हणजे पटतें. तें, आणि बहुधा ते ही परीक्षा १८७८-७९ त पास झाले असावेत. त्याच सुमारास मग त्यांचा विवाहही झाला असावा. त्यांची सासुरवाडी बाळ घराण्यांत होती. त्यांचें मूळ गांव किंवा अन्य माहिती मला फारशी नाहीं. पण त्यांचे एका मेहुण्याचें म्हणजे बायकोच्या भावाचें नांव श्री. केशवराव बाळ होतें व ते मुंबई जवळपास असत असें आठवतें. त्यांच्या पत्नीचें सासरचें नांव सरस्वती होतें. ही बाई चांगली ठसठशीत, रूपानें गौरवर्ण, नाकी डोळीं नीटस अशी होती. तशी ती कर्तबगार बायकोही होती. तिचें घरांतील करणें जिन्नस, स्वयंपाक वगैरे जरा जास्तच असे. पुष्कळवेळां फुकट जाईल, नोकरवर्गास देऊन टाकावें लागेल अशा प्रकारचें असे; करणें सवरणें काटकसरी नसे, उधळ माधळ असे थोडी फार.

१८८० चे सुमारास केसोपंतांनीं नोकरी सोडली. आणि ते रावसाहेब मंडलीक यांचे खोतीगांवची व्यवस्था पाहूं लागले. ते गाव कॅम्प दापोलीपासून जव-

ळच होते. एक होता वळणें गांव, व दुसरा होता सोनगांव. वळणें या गांवीं खूप मोठा प्रशस्त मजबूत वाडा किंवा घर होतें मंडलीकांचें. मूळांत तें तेवढें मजबूत नव्हतें, मोठ्या सडकेपासून घरापर्यंत चांगली सडक वाट नव्हती. बैलगाडी येण्याची चांगली सोय नव्हती. झाडी, रान पुष्कळ होतें. पण या गोष्टी प्रथम केसोपंतांनीं व नंतर चितोपंत किंवा भाऊ यानीं दूर केल्या; घर मजबूत बांधले, वाट केली, रान तोडलें, गोठा गुरांचा, चांगला केला. भाऊ किंवा चितोपंत यास केसोपंतांनीं सोनगांवची व्यवस्था पहावयास दिली, व स्वतःकडे वळण्याची व्यवस्था घतली. पण पुढें १८८६-७ मध्यें त्यांस या कामाचा कंटाळा आला म्हणा, किंवा अन्य कारण काय झालें तें माहीत नाहीं म्हणा, ते खेड येथें राहावयास गेले. तेथेंच पुढें त्यानीं मुलगी भीमा हिचा विवाह ठरवून केला. खेड त्यांस आवडत असेल, त्याकाळांत तें मोठें, तालुक्याचें,शहरगांव वाटे.म्हणून कदाचित् असेल.तसें म्हटलें तर दाभोळ हा गांव कोकणपट्टींत सुरेख आहे. बंदर आहे; पण तेथे न जातां केसोपंत खेडास कां गेले तें कळत नाहीं. तो गांव रूक्ष आहे, निदान १९२८ मध्यें मी पाहिला तेव्हां तो फारच रूक्ष वाटला. म्हणून १८८६-७ पासून चितोपंतांचें वास्तव्य वळण्यास झालें, तें जवळ जवळ १९०७-८ सालपर्यंत असावें. त्यानंतर ते मालदोली येथें कांहीं वर्षें (२।३) राहत होते अशी माहिती आहे. पण यासंबंधानें थोडें पुढें पाहूं.

चितोपंतांच्या पहिल्या अपत्याचा मुलीचा–नांव वाली–हिचा जन्म १८८४ च्या सुमाराचा आहे. त्या मुलीनंतर दुसरी मुलगी अंब, तिसरा मुलगा पांडुरंग याचा जन्म १८८८ च्या सुमाराचा होता. हा केसोपंत म्हणजे त्याचे आजोबा यांचा फार लाडका होता, स्वाभाविकपणें. त्यांस हा एवढा एकच नातू पहावयास मिळाला असावा. त्यांचे मृत्युचे सुमारासच चितोपंतांचा दुसरा मुलगा परशराम याचा जन्म झाला १८९३ मध्यें. पांडुरंग व परशराम यांचेमध्यें एक बहीण तापी होय, १९०१ चे सुमारास त्यांस तिसरा मुलगा यशवंत झाला. मध्यंतरी कांहीं मुलें असतीलच, पण तीं दगावलीं असतील त्यानंतर १९०५ चे सुमारास एक मुलगी सुंदरी किंवा बाबी होय, व तिचे पाठची १९०७ च्या सुमाराची कमळाबाई होय. कमळीच्या नंतरही त्यांस दोन मुलें झालीं, पण तीं दगावलीं अशी माहिती आहे, म्हणजे त्यांस एकूण सुमारें पंधरा मुले मुली झालीं पैकीं जी मोठी झालीं त्यांची माहिती वर दिली आहे. तीं त्यांचीं मोठीं झालेलीं मुलें ३ मुलगे ५ मुली होत. थोरल्या-वालीचा विवाह कदाचित् केसोपंतांचे हयातींत त्यांचे देखतही झाला असावा. ती चिपळूण जवळच्या खडपोली या गांवच्या बापट या घराण्यांत दिली होती. पण तिला संतति व्हावयाचे आधींच ती कैलासवासी झाली.

केसोपंत १८९३ त खेड येथें वारल्यानंतर चितोपंतांची आई अन्नपूर्णाबाई या वळण्यास त्यांचे जवळ रहावयास आल्या. १८९४-९५ च्या सुमारास त्यांची

बहीण काशी किंवा लक्ष्मीबाई दांडेकर (मुक्काम जालगांव, वळण्यापासून मैल दीड मैल अंतरावरच) यांस दुर्दैवानें वैधव्य प्राप्त झालें. अशा प्रकारें एका प्रकारें चिंतोपंतांवर कौटुंबिक आपत्ति आल्या, त्यांचे वरची जबाबदारी वाढली. पण मातोश्री व बहीण काशी यांस मोरोपंतांनी उज्जयिनीस नेऊन त्यांचे शिरावरचा हा भार दूर केला. अशीही एक माहिती ऐकीवांत आहे कीं त्यांचे मातोश्रींस खाजगी खर्चावयास म्हणा, मुलीस देण्याकरितां वस्तु विकत घेण्यास म्हणा, किंवा अन्य कारणांस्तव थोडीफार किरकोळरोकड रक्कम हवी असे; पण ती त्यानीं तिला दिली नाहीं. तेव्हां एक म्हातारा जुना गडी त्यावरून चिंतोपंतास थोडा रागावलाही ! त्याकाळीं असे पिढीजाद नोकर असत, आणि ते प्रसंगीं तरुण धन्यास हितोपदेश करीत असत; आणि त्यास मान मिळत असे कोकणांत,... या प्रकारामुळें असेल कदाचित्, मोरोपंतांनीं मातोश्रींस व त्यांचे बरोबर बहीण काशी यांसही उज्जयिनीस नेलें. भाऊ सीताराम हा शिक्षणाकरितां आधींच गेलेला होता मोरोपंतांकडे. म्हणजे चिंतोपंतांवर स्वतःचे कुटुंबापेक्षां अन्य कोणताही कौटुंबिक भार इतर भावांनीं पडू दिला नाहीं; त्यांचें शिक्षण होऊं शकलें नाहीं यास्तव अशा प्रकारें ते वडील होते तरीही त्यांचे पाठचे भाऊ कुशा व मोरू यानीं त्यांस मदत देण्याचें व्रत चालवलें.

चिंतोपंतांचा मुलगा पांडुरंग हा १०–११ वर्षांचा असतांना कुशा किंवा केशवसुतांनीं त्यांस शिक्षणाकरितां खानदेशीं नेलें. पण मातोश्रींच्या निधनानंतर लगेच हा पांडुरंग शिक्षणास उज्जयिनीस गेला. तेव्हां त्यांचे दुसरे मुलास परशुराम यांस केशवसुतांनीं शिक्षणास खानदेशीं आणलें. पण ते धारवाडास गेल्यावर त्यांस कोकणांत जावें लागलें पुढें मोरोपंत नागपूरास आले तेव्हां १९०८ च्या सुरुवातीपासूनच परशुराम नागपुरास शिक्षणास आला, तो पुढें मोरोपंत व त्यांचे मृत्यु-नंतर सीतारापंत यांचेकडे जवळ जवळ १९२२ अखेरपर्यंत क्वचित् २।३ वर्षे सोडल्यास अखंडपणानें बाहेरच होता. थोरला पांडुरंग हा १९०७-८ नंतर मुंबईस थोडा काळ सीतारामपंतांकडे ते राष्ट्रमताचे संपादक असतांना होता आणि नंतर तो स्वतंत्र पणानें बिऱ्हाड करून राहिला गिरगांवांत, महम्मदी बिल्डिंग या चाळी-मध्यें साधारणपणानें १९१० पासूनच. तिसरा मुलगा यशवंत यास लहानपणींच कांहीं अपघात झाला आणि त्यामुळें एक पाय बहुधा डावा, थोडा आखूड झाला व तो लंगडा झाला. त्यामुळे, शिवाय लहानपणीं त्याचे वाणींत, बोलण्यांतही कांहीं दोष होता म्हणून त्यास इंग्रजी शिक्षणाचा संस्कार झाला नाहीं. या सर्व हकीगतीं-वरून ही गोष्ट लक्षांत यावी कीं पुनः त्यांचे मुलांचे शिक्षणाचे सबंधांत त्यांचे बंधू त्यांचे उपयोगी पडले.

१९०५ अखेर केशवसुत यांचें हुबळीस अचानकपणानें व दुःखद निधन झालें. त्याचवेळीं, त्यांच्या पत्नीच्या सद्भाग्यानेंच म्हणावयास हरकत नाहीं, त्यांचे पाठपोठ रखुमाबाई या निवर्तल्या, केशवसुत हे निष्कर्जी निवर्तले. त्यांच्या मुली मात्र मागें राहिल्या, पण त्यांचा संसार, भांडी कुंडी भरपूर होतीं त्यांचेजवळ; कांहीं थोडी शिल्लकही असेल, असा माझा अंदाज आहे. त्यांच्या संसाराची, धारवाड येथील, विल्हेवाट लावून त्यांच्या मुली कोकणांत चितोपंतांकडे पोचवण्याचें काम पुष्कळसें त्यांचेच चुलत काका-हरीकाका यानीं उरकलें असावें.त्यांचे संसारांतील १।२ मोठी भांडीं–पाणी सांठवण्याचीं माझेंकडे नागपूरास आलीं होती किंवा नाहीं हें जरी नक्की सांगतां आलें नाहीं तरी पुण्यांतील मोरोपंत व सीतारामपंत यांच्या संयुक्त संसारांत मी पाहिलेलीं आहेत. कृ. के. दा. किंवा "कृ. के. दामले" अशीं नांवें त्या भांड्यावर होतीं. त्यापैकीं एका घागर फुटलेली अजूनही पुण्यास माझ्या बहिणीकडे आहे म्हणे ! जुनी आठवण म्हणून ठेवलेली आहे ती. तेव्हां इतर सर्व संसार–भांडीकुंडी वळण्यास चितोपंतांकडे पाठवलेलीं असावीं. त्या वेळचा श्री. हरीकाका व चितोपंत आणि हरीकाका व मोरोपंत यांचा आणि चितोपंत व मोरोपंत यांचाही पत्रव्यवहार झालेला असेल, त्यापैकीं एकानें केशवसुत यांचें मृत्युतिथी बद्दलचा वाद परशुरामपंतांनीं मिटला.

केशवसुतांची धाकटी मुलगी सुमन ही लौकरच म्हणजे ६।७ सालीं वारली मनीला त्यांचेकडेच ठेवून मधल्या वत्सला हिला शिक्षणाकरितां नागपूरास पाठवलें होतें. पण ती थोडीफार मंद बुद्धि, भित्री, बुजरी असावी. ती व परशराम हे दोघे जास्त ओळखीचे होते. पण तिचें शिक्षण होईल अशी आशा वाटेना म्हणून असेल, कदाचित् ती नागपूरास दीड दोन महिन्यांवर न राहतां बळण्यास परत गेली. या मनू व वत्सला या दोघींचें विवाह चितोपंत यांनीं कोकणातच आणि १९१०।११ चे आधीं लावून दिले. चि. मनू हिला चिपळूण जवळच्या खडपोलीच्या बापट यांचेकड दिली होती, तर वत्सला हिला गांग्रईच्या फाटकांकडे दिली होती. या दोन्ही मुलींची थोडी माहिती केशवसुतांचे चरित्रांत दिलेली असावी त्या भागांत. त्यांचे विवाहाचे खर्चास मोरोपंतांनीं प्रत्येकीं दोनशें अडीचशें अशी रक्कम दिलेली होती. मनोरमा हिचा विवाह बहुधा १९०८ मध्यें झाला असेल, तर वत्सलेचा विवाह १० किंवा ११ मध्यें असेल. कारण चितोपंत यांचा थोरला मुलगा पांडुरंग याचे विवाहाचे आगेमागें तो झाला हें स्मरतें, मला. आणि पांडुरंग याचा विवाह १९११ मध्यें आसूद गांवचे श्री. जोशी या नांवाचे भिक्षुकी करणाऱ्या गृहस्थांच्या एका मुलीबरोबर झाला होता त्या श्री. जोशी यांस व त्यांच्या मुलीस सौ. पार्वतीस मी चांगलें पाहिलेलें आहे. ही पार्वती व पांडुरंग हे मोरोपंतांच्या मुलीच्या–शकुंतलाच्या विवाहास १९१२ च्या मे मध्यें हजर होते.

चितोपंत यांच्या जरा मोठ्या मुली अंबूताई व तापूताई यांचे विवाह केशवसुत यांचे निधनापूर्वीच म्हणजे १९०५ पूर्वीच झालेले असले पाहिजेत. व त्या दोघींनाही दुर्दैवानें वैधव्यदशा आली होती. पैकीं अंबूताई ही गु. कै. अण्णासाहेब कर्वे हे जेव्हां कोकणांत त्यांचे गांवीं मुरुड येथें जात असत तेव्हां, केव्हांतरी १९०६ चे सुमारास ती घरून निघून जाऊन त्यांचेबरोबर त्यांचे आश्रमांत राहिली होती. तिचा पुनर्विवाह १९०८-९ मध्यें, राष्ट्रमत वर्तमान पत्र निघत असतांना, त्यावेळीं रंगून, ब्रह्मदेश येथें राहणारे श्री. नारायणराव घैसास या गृहस्थांबरोबर झाला. या गोष्टीस, विशेषतः ही मुलगी टिळकानुयायी सीतारामपंत यांची, व धार्मिकवृत्तिचे मोरोपंत यांची पुतणी आंहे अशी प्रसिद्धी देण्यांत आली होती. या अंबूताईनींच केव्हांतरी ब्रह्मदेशांत जातांना आपल्या दुर्दैवी अशा बहिणीस, तापूताईस, तिकडें नेली होती. पुढें १९१७-१८ मध्यें मुंबईचे प्रख्यात वकील व विधवा विवाह सहाय्यक मंटळाचे चिटणीस श्री. बंडोपंत भाजेकर यांनीं त्यांचा पुनर्विवाह श्री. ढवळे यांचेबरोबर लावून दिला.

केसोपंत किंवा चितोपंत यांस रावसाहेब मंडलीक किंवा त्यांचे चिरंजीव पगार म्हणून काय देत असत. त्याची कांहींच माहिती मला नाहीं. पण कांहीं रोख रुपये १०० अंदाजें वर्षास आणि भात कांहीं असा पगार असावा. आणि त्यांत त्यांचा नित्याचा चरितार्थ चालत असावा.

चितोपंतांचा मोठा मुलगा पांडुरंग हा उज्जयिनी येथें मोरोपंत यांचेकडे शिकावयास होता. तो शरीरानें चांगला तालीम केलेला, दांडगा पुरुष होता. त्याचेवरूनच कदाचित् असेल सीतारामपंत यानीं "पांडोबाच्या लीला" म्हणून एक छोटेसें गोष्टीचें पुस्तक-सुमारें २०-२५ पृष्ठें लिहिलें असावें. यांचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें होतें. ते मुंबईस टाईपरायटिंग शिकले आणि १९१०-११ सालापासून असेल "बांद्रा ऑफिस" म्हणून एक बहुधा सरकारी किंवा निमसरकारी कचेरी होती, त्या कचेरींत व कांहीं वर्षें ग्रिडले कंपनींतटायपिस्ट म्हणून मरेपर्यंत, १९२३पर्यंत नोकरीस होते. ते उत्तम टायपिस्ट होते आणि त्यांचा मिनिटाचा वेग६०शद्बांपर्यंत असे असें ऐकलें होतें. मुंबईस त्यांचा मित्रपरिवार होता थोडाफार त्यांत श्री. गोंधळेंकर, श्री. माधवराव आपटे, श्री. सोहोनी वगैरे मंडळी होती. त्यानीं मुंबईच्या ब्राह्मण सभेच्या बाल्यावस्थेंत त्या संस्थेचें चांगले कार्य केलेलें असावें; कारण त्या संस्थेच्या इतिहासांत पांडुरंगपंत व माधवराव आपटे या जोडगोळीचा उल्लेख मी वाचलेला आहे, १९२३ त हे अगदीं एकाएकीं वारले. आणि त्यांचे आगेमागें ३-४ दिवस त्यांचा एकुलता एक मुलगा (हा अंदाजें पांच वर्षांचा होता) ही मरण पावला.

चिंतोपंत यांचा वळणें व सोनगांव येथील कारभारावर मंडलीक यांचे कुटुंबीयच एक गृहस्थ दापोलीस असत, त्यांची थोडीफार देखरेख असे १९०० नंतर नंतर आणि मधूनमधून थोडीफार कुरबूर झालेली असावी. चिंतोपंतांच्या पत्नी चोरून म्हणजे चिंतोपंतांच्या पश्चात् त्यांस नकळत, थोडेंफार भात विकीत असत असा प्रवाद काशी आते, माझी आई सीताबाई यांचे तोंडून ऐकल्याचें स्मरतें. त्यामुळें असेल, "ही कटकट नको आतां" असा विचार करून चिंतोपंतांनीं मंडलीकांची नोकरी सोडली. केसोपंत यांस त्यांचे सासरे श्री. गणोबा करंदीकर, मालदोलीचे खोत, यानीं त्यांचे घराचे लगत खालच्या अंगास एक घर गवता छपराचें, साधारणपणानें २० फूट × २५' अशा मापाचें बांधून दिलेलें होतें. शिवाय मुलीला कांहीं मण भात पिकेल अशी जमीनही दिली होती असें ऐकलेलें आहे. मी स्वतः सुमारें ५ वर्षांचा असतांना एक वेळ मालदोलीस गेलों होतों तेव्हां सुमारें १०० गाठलेले माझे पंजोबा यांस पाहिलें होतें. ते त्यावेळीं देखील स्वतःचें धोतर पंचा, धुवून पिळून टाकीत. काठी टेकीत टेकीत वाकून चालतांना थाप लागल्यानें "भा, भा!" करीत असत असें आठवतें. त्यानंतर एक वर्षभर मी त्यांची नक्कलही घरीं करीत असें, असेंही आठवतें. त्यानंतर ते लौकरच निवर्तले. या मालदोलीच्या घरीं चिंतोपंत कुटुंबासह रहावयास गेले. तेथें त्यांचे बरोबरीचे त्यांचे मामा श्री. महेश्वरपंत हे असत. श्री. महेश्वर मामा मला १९२८ त मी कोकणांत गेलों असतांना भेटले होते; आणि त्यानीं मला आमच्या घराचा चौथरा दाखवला, "इच्छा असल्यास अजूनही तुम्ही कोणी येथें या, घर करा, रहा" असें ते म्हणाले होते.

या मालदोलीचें निष्क्रिय जीवन चिंतोपंतांस आवडलें नसेल. येथें असतां-नाच बहुधा त्यानीं केशवसुतांच्या दोन्ही मुली व स्वतःचा मुलगा पांडुरंग यांचे विवाह केले आणि आतां हा कोकणचा भाग सोडून दूर कोठेंतरी जावें, नवी विटी नवा डाव सुरू करावा, थोडीशी मंडलीकांची नोकरी सुटण्यांत जी मानखंडना झाली आहे ती विसरावी व नव्या व्यापांत स्वतःस गुंतवावें असें विचार स्वाभाविकपणानें त्यांचे मनांत घर करू लागले असावेत; आणि यामुळें त्यानीं हा कोकणाचा भाग सोडून ते देशावरच्या, ठाणे जिल्ह्याकडच्या कोकणाकडे वळले. या सुमारास ते पन्नाशीच्या जवळ जवळ येत चालले होते. आणि धाकटे बंधु मोरोपंत यांचे साहाय्य मिळाल्या-मुळें ते इकडे सहकुटुंब सहपरिवार येऊं शकले. १९१३ चे आधीं केव्हां तरी बहुधा एखाद-दुसरें वर्षच ते ठाणे जिल्ह्यांतील बेलापुर या गावीं रहावयास आले असावेत.

# चिंतो केशव

## ( उत्तरायुष्य; १९१० (सुमारें) ते १९३० पर्यंत )

मोरोपंतांच्या चरित्राचे भागांत नागपूरच्या हकीगती सांगताना त्या भागाच्या शेवटीं शेवटीं मोरोपंतांचे एक पत्र दिलें आहे. तें त्यानीं चिंतोपंतांस बेलापुर या गांवीं, श्री. बाळ मास्तर यांचे घरीं पाठवलेलें आहे चिंतोपंतांची सासुरवाडी बाळ कुटुंबातली, तेव्हां हे बाळ मास्तर त्या कुटुंबातले असावेत, व त्यांचे मध्यस्तीनें आणि मोरोपंत यांच्या पैशानें या भागाकडें कांहीं जमीन जुमला करावा, व आतां मालक म्हणूनच शेतीचा व्यवसाय करावा अशा कल्पना चिंतोपंतांनीं धारण केलेल्या असाव्यात. कारण पनवेलच्या जवळपास सुमारें २ खंडी भात खंड रूपानें मिळणारी जमीन अंदाजें किंमत रुपये दीड हजार आणि. आणि सुमारें १२०० रुपयांच्या दोन जमिनी गहाण म्हणून मोरोपंतानीं १९११–१२ त घेतलेल्या होत्या. पैकीं विकत घेतलेल्या जमिनीचा उल्लेख, चिंतोपंतांच्या आधींच्या प्रकरणाचे सुरुवातीस दिलेल्या पत्रांत आहेच. या जमिनी या भागांत घेण्याचें कारण बहुधा चिंतोपंत–बाळ यांचा नात्याचा किंवा अन्य स्नेहसंबंध असावें.

चिंतोपंत यानीं जन्मभर शेतीचा व्यवसाय केलेला होता. ते त्या विषयांत तज्ञ होते असें मी ऐकलेलें आहे. रत्नागिरी जिल्हा किंवा दक्षिण कोकण या भागापेक्षां ठाणे कुलाबा जिल्हे किंवा उत्तर कोकण भाग जास्त सपाट, आणि जास्त सुपीक आहे तेव्हां त्या भागांत आपण वास्तव्य करावें अशी कल्पना चिंतोपंत यांच्या डोक्यांत आली असावी. आणि त्यादृष्टीनें त्यानीं मोरोपंतांचे मन स्थावर इस्टेट करण्याकडे वळवलें असावें. मोरोपंतांचे विचारही श्री. दत्तात्रेयाच्या उपासनेंत एखाद्या खेडेगांवीं घालविण्याचे होतेच. तेव्हां या दोन्ही बंधूनीं बेलापुरच्या, पनवेलच्या आसपास इस्टेट करण्याचे विचार केले. मोरोपंत व्यवहारी असावेत असा तर्क आहे. बंधुप्रेम जरी होतें त्यांचेमध्यें तरी "व्यवहार तो व्यवहार" असा त्यांचा खाक्या असावा, असें वाटतें. म्हणून या जमिनी, गहाणखतें त्यांचे व पुढें माझे नावानें होतीं. तशी नसतीं तर बहुधा स्थावर इस्टेट मला केव्हांच मिळणें शक्य झालें नसतें. आणि प्रत्यक्षांत देखील त्या जमिनीचें किंवा गहाण खतांचें उत्पन्न पैसे मला केव्हांच कांहीं मिळालें नाहीं ! ती सर्व मालमत्ता चिंतोपंत व त्यांचे चिरंजीव यांस मिळाली.

१९१३ साल, विशेषतः एप्रिल अखेरीस मोरोपंत यांचा काळ झाला तेव्हांपासून दामले कुटुंबास फार दगदगीचें गेलें. त्याची झळ प्रत्यक्षतः आम्हा मुलांस

बसावी; पण आमच्या नशिबानें आम्हास ती न बसतां ती थोडीफार सीतारामपंत व चिंतोपंत आणि त्यांचे कुटुंब यास ती झळ बसली. थोडीफार, सीतारामपंत यांस मनस्ताप झाली पुष्कळ, आणि चिंतोपंत, आणि त्यांचे चिरंजीव पांडुरंग व परशराम यांस प्रत्यक्ष सांपत्तिक हानि होवून मनस्तापही झाला पुष्कळ. मोरोपंत व चिंतोपंत यानीं मिळून मुक्काम बेंलापुर येथें श्री. पाटणकर यांची १० खंडीवर मक्ता येणारी जमीन सुमारें रुपये ८००० या किमतीस घेण्याचें ठरवलें होतें. पैकीं पावणे सात हजार रोख हे मोरोपंत देणार होते, आणि १२००।१३०० रुपये चिंतोपंत खर्चणार होते अशी माहिती मोरोपंत यांनीं चिंतोपंत यांस लिहिलेल्या एप्रिल २१ तारखेच्या पत्रावरून स्पष्ट होते. रुपये एक हजार श्री. पाटणकर यांस देऊन साठेखत केलें होतें असें मी ऐवलें होतें. व तें खरें असावें. पुढें डिसेंबर १९१३ मध्यें त्यावेळच्या G. I. P. रेल्वे कंपनीकडून मोरोपंत निवर्तल्यामुळें त्यांचे अज्ञान मुलांच्या पालनपोषणासाठीं नुकसान भरपाई म्हणून जी रुपये वीस हजाराची रक्कम मिळाली, व जी मोरोपंत आधीं देणार होते त्या रकक्मेपैंकीं डिसेंबरपर्यंतचा आम्हा मुलांचा पोषणाचा खर्च वजा जातां जी कांहीं सुमारें६हजारांची रक्कम शिल्लक होती त्यामधून रक्कम देऊन जमीन खरेदीचा व्यवहार पूरा करावा असा आग्रह चिंतोपंत व त्यांचे चिरंजीव धरीत होते. पण सीतारामपंत यानी तो जमीन खरेदीचा व्यवहार पूरा करणें यास संपूर्ण नकार दिला. यामुळें चिंतोपंत यांचे रुपये एक हजार मात्र कायम बुडाले हें खरें. पण जर तो व्यवहार पूरा झाला असता तर कदाचित् फार मोठ्या प्रमाणांत भाऊबंदकी उभी राहून आम्ही मोरोपंतांची मुलें थोडीफार निराधार झालों असतों अशी आतां साधार भीति वाटते. याचें कारण सीतारामपंतांचे मृत्युनंतर पुण्यांतील बांधलेलें घर, रुपयें वीस हजारमधून घेतलेल्या सरकारी प्रॉमिसरी नोटा वगैरे जी एकंदर जिंदगी होती त्या सर्वांवरच चिंतोपंत हे वारसा हक्क सांगू लागले, नव्हे पुण्याच्या डिस्ट्रिक्ट कोर्टांत त्यानी किंवा त्यांचे सहीनें त्यांचे पुत्र परशरामपंत यानीं प्रत्यक्ष त्या अर्थाची कैफियत दिली होती ! त्यामुळें सीतारामपंतांनीं जे केलें तें आमच्या हिताचें झालें यांत शंका नाहीं. मात्र या भाऊबंदकीमुळें त्या काळपर्यंत म्हणजे१९२८पर्यंत नाममात्र माझ्या मालकीच्या पनवेल जवळच्या जमिनी आणि गहाण जमीनी या पुढें चिंतोपंताच्या झाल्या,आणि सीतारामपंत यांचे पुस्तकांचे कवि केशवसुत यांच्या काव्याच्या पुस्तकाचे, हक्क,सीतारामपंत यांचे पत्नीचे दागिने, त्यांचा कांहीं चांदीची भांडीं, कांहीं शेअर्स, बँकेतील किरकोळ शिल्लक वगैरे सर्व त्यांची जिंदगीही चिंतोपंताच्या मालकीची झाली! भाऊबंदकी टाळण्याकरितां जी तडजोड मी व ते त्यांचा वंश यांचेमध्ये झाली त्यांत हें असें ठरलें, आणि याप्रकारें त्यांचे जें सुमारें रुपये एक हजाराचें नुकसान झालें होतें तें त्यांस सव्याजच काय, बऱ्याच पटीनीं भरून मिळालें कसें तें पुढें पहा.

List of ornaments and other moveable Property of the late S. K. Damle died on 16-10-27.

ORNAMENTS & POTS —

१) अत्तरदाणी १
२) गुलाबदाणी १
३) ताट मोठें १
४) ताम्हन चांदीचे १
५) भांडी चांदीचीं २
(एक फुलपात्रें व एक पेला)
६) डबी चांदीची जाळीची
७) आंगठी हिऱ्याची
८) बुगडी जोड
९) नथी नग २
१०) आडकित्ता चांदीचा
११) Rs. 60 (sixty) cash.
[ Rs. 55 spent for the obsequies of the deceased ]
१२) सोन्याचे तोडे (पोकळ) जोड
१३) गुलाबाचीं फुलें २
(एक मोठे एक लहान)
१४) टीका
१५) साज

| | | |
|---|---|---|
| 1) | Pro. note from K. G. Tokekar dated 5-5-1925 | Rs. 600 |
| 2) | Shares Merchants Bank, 5 Shares of Rs. 100/ each | Rs. 500 |
| 3) | Tata Mills Ltd. one face value | Rs. 500 |
| 4) | Vulcan Insurance Co. Ltd. 25 Shares of Rs. 100/ face value each. | Rs, 2500 |
| 5) | Life Policy. Western Indian Life Insurance Co. Assigned to Ratnaprabha Damle | Rs. 2000 |
| 6) | Copy right of Books. | |
| 7) | Imperial Bank of India. Acctt. No. 000 518 | Rs. 153/10 |

Made on 17-10-27 and given in possession of D. M. Damle.

Poona (Sd.) D. M. Damle
17-10-27 (Sd.) P. C. Damle

वरील सर्व मालमत्ता एका " जन हे त्रिविध आहे " या कादंबरीचा हक्क सोडून चितोपंतांची झाली. शिवाय क्रमांक ५ ची विमा पॉलिसी रत्नप्रभास मिळाली, पण तिचे पैसे पुढें तिनें मला दिले. — द. मो. दामले

स्थावर जमीन खरेदी करण्याच्या विषयावरून तदनुषंगिक पुढच्याही गोष्टी येथेंच सांगून झाल्या, चितोपंत यांचा सर्वांत धाकटा मुलगा यशवंत हा साधारणपणानें १५ वर्षांचा झाल्यापासून मुंबईस त्याचे थोरले बंधु पांडनाना यांचेकडे राहिला, त्याचें शिक्षण मराठी ४ थी पर्यंत झालें. इंग्रजी शिक्षण उगीच थोडेसें झाले

न झालें. तो पांडुनाना यांचेकडे अगदीं सरळ असा राहत नसावा. त्यास पांडूनाना यानीं ओळखीच्या दत्तात्रय दांडेकर आणि कंपनी या शिवण कामाच्या दुकानांत शिंप्याचें काम शिकावयास ठेवलें होतें. तें काम तो थोडाफार शिकला होता. पण त्याचें त्यांचेबरोबर पटत नसे. मधून मधून तो त्याची बहीण सौ. बावी वैद्य यांचे-कडेहो जाई. १९१९-२० पासून तो पुण्यासही कधीकधी राही. बहुधा १९२० मध्यें त्यास एक सिंगर शिवण मशीन हप्तेबंदीनें, सीतारामपंत यानीं घेऊन दिलें होतें; आणि त्यानें घरीं बसूनच शिवण काम करावें, हप्ते फेडावेत व मशीन मालकीची करावी अशी त्यांची कल्पना होती. पण पुढें कंपनी मशीन घेऊन गेली! त्यानंतर घरच्या 'राजकारण' या वर्तमानपत्राच्या 'सुधारक' छापखान्यांत यशवंतानें कंपोझिंग काम शिकावें असाही प्रयत्न करण्यांत आला. तोही फसला. पुढें तो मुळशी सत्याग्रहांत दोनवेळां सत्याग्रह करून ९ महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा भोगूनही आला. १९१९ पूर्वी एक वेळ तो त्याचे ख्रिस्ती शिंपी मित्राच्या सांगण्यावरून ख्रिस्ती झाला होता; व पुढें २।४ महिन्यांत श्री. गजानन भास्कर वैद्य यांच्या हिंदु मिशनरी सोसायटीमार्फत परत हिंदुही झाला! १९२२-२३ नंतर मात्र तो पुण्यास आला नाहीं.

हेच यशवंतराव ऊर्फ बाळचा पुढें परशरामपंत यांचेंकडे किंवा अन्य कुठें-तरी राहत. १९३५ पासून पुढें दोन तीन वेळां ते माझ्यांत व चिंतोपंत यांच्यात तडजोड होवून त्यांस किती इस्टेट मिळाली याची चौकशी माझ्याजवळ करीत होते. थोरले बंधु परशरामपंतांवर फिर्याद लावून त्यांतील अर्धा वाटा मिळवण्याचा त्यांचा विचार होता, पण ती त्यांची इच्छा अतृप्तच राहिली. त्यांचे सुदैवानें त्यांचा विवाह झालेला नव्हता. ते १९३९ साली मेचे सुरुवातीस पुण्याच्या ससून इस्पितळांत टी. बी. वार्डमध्यें मरण पावले. त्यांचे मृत्युनंतर ४-५ दिवसांनीं त्यांचा देह त्यांचा भाचा श्री मुकुंद नारायण घैशास यांचे ताब्यांत मिळाला, तेव्हां त्या देहास भयंकर दुर्गंधी सुटली होती, मी देखील त्यांच्या स्मशान यात्रेस गेलो होतों. त्याचें और्ध्वदेहिक पुण्याचे ओंकारेश्वरावर झालें!

१९२४ मध्यें बहुधा त्यांची दुसरी मुलगी कमळाबाई हिचा विवाह मुंबई येथें श्री. हरीभाऊ भागवत यांचेशीं झाला, श्री. हरीभाऊ पुढें कापडाचे व्यापारी म्हणून प्रसिद्ध झाले. ही मंडळी देखील सुस्थितींत आहेत. या दोन्ही विवाहाचे वेळीं चिंतापंतांनीं सीतारामपंतांजवळ आर्थिक मदत मागितली होती. विशेषतः सुंदरा-बाईच्या विवाहाचे वेळीं त्यांनी लिहिलेलें पत्र सीतारामपंत यांस आवडलें नव्हतें. त्यानीं माझ्या आठवणीप्रमाणें दोन्हीवेळीं मदत दिली नाहीं. पहिल्या कार्याचें वेळीं ते कांहीं मदत देऊं शकले असते. पण दुसऱ्या कार्याचे वेळीं त्यांची स्वतःची आर्थिक स्थितीच बिकट होती.

१९१९ मध्यें माझ्या पाठच्या बहिणीचा विवाह सीतारामपंत यानीं पुण्याच्या प्रसिद्ध किवळेकर रानडे कॉन्ट्रक्टर्स या कुटुंबांतील श्री. शिवरामपंत यांज बरोबर ठरवला. त्यावेळीं केवळ थोरले पुरुष, कुटुंबातले, म्हणून चिंतोपंतांस सह-कुटुंब बोलावलें होतें. मला वाटतें कुंकमपत्रिका देखील त्यांचे नांवानें काढून खालचे अंगास त्यानी स्वत:ची सही घातली होती. पण याबद्दलची आठवण पक्की नाही. विवाहास ते, त्यांची पत्नी, व लहान अविवाहित मुलगी कमळी ही मंडळी आली होती. परशराम अचानकपणानें विवाहाचे आदल्या दिवशीं मद्रासकडून (नोकरीनिमित्त तिकडे गेला होता तो) आला, सीतारामपंतांच्या पत्नी दिवंगत असल्यामुळें देव प्रतिष्ठा चिंतोपंतांनीं केली; कन्यादानही त्यानींच केलें. व्याही भोजनाचे वेळीं रानडे मंडळीकडून चिंतोपंत यांस चांदीचें भांडें जरीकाटी फेटा वगैरे, सौ. सरस्वतीबाईंस लुगडे चि. कमळीस खण वगैरे भेटी आल्या आणि आश्चर्य म्हणजें त्या वस्तु त्यानीं घरी आल्यावर सीतारामपंत किंवा काशीताई ही त्यावेळीं घरांतील कर्ती मंडळी यांस या वस्तु न दाखवतां न देतां त्याच दिवशीं चिंतोपंतांनीं व सौ. सरस्वतीबाईंनीं त्यांच्या वस्तूंच्या, कपडयांच्या घडया मोडून त्या वापरल्या देखील! त्यांस धास्ती वाटली असावी, या वस्तु त्यांस मिळतील किंवा नाहीं अशी! ... मला वाटतें अशीच कांहीं शंका मोरोपंत यांस विशेषत: सौ. सरस्वती वहिनींबद्दल वाटली असेल, म्हणून त्यानीं कटाक्षाने नागपुरास त्यांचे मोठ्या मुलीच्या विवाहाचे वेळीं त्यांस बोलावलें नव्हतें,

१९२२ च्या मे मध्यें सीतारामपंत यांस मुळशीच्या घराण्याचग्रा बाबतींत सत्याग्रह केल्यानें सहा महिन्यांच्या सक्त मजूरीची शिक्षा झाली होती. १९२३ च्या फेब्रुवारीमध्यें परशराम याचा विवाह मु. पळस्पें येथें (पनवेल–कर्जत किंवा पेण या मार्गांवर पनवेल पासून ३.४ मैल अंतरावरील गांव ) झाला. बहुधा १९२० च्या आगेमागें चिंतोपंतांनीं बेलापुर गांव सोडला व ते पळस्पें येथें रहावयास गेले. श्री. परशरामपंत बी. ए. झालेले होते; एल्. एल्. बी. चा अभ्यास करीत होते. त्यांस पुण्याच्या बुधवारपेठेंतील भांग्या–मारुतीजवळ राहणाऱ्या श्री. अप्पा-साहेब भिडे यांची मुलगी केली होती. हे त्यावेळीं रेव्हेन्यू खात्यांत एक मामले-दाराच्या बरोबरीच्या हुद्याचे अधिकारी होते. हा विवाह पळस्पें येथें झाला. कारण त्यावेळीं चिंतोपंत यांची मुलगी सुंदराबाई ही बाळंतीण होती. हा विवाह थोडया-फार थाटानें साजरा झाला.

पुढें याच वर्षी जूनच्या सुरुवातीस चिंतोपंत यांचे थोरले चिरंजीव श्री. पांडुरंगपंत यांस देवाज्ञा झाली. त्यांचे मागें त्यांच्या पत्नी पार्वतीबाई व दोन मुली दुर्गा आणि कृष्णाबाई या राहिल्या. त्याच सुमारास श्री. पशरामपंत यांस

त्यांचे श्वशुरांचे कृपेमुळें रेव्हेन्यू खात्यांत अहमदनगर जिल्ह्यांत नोकरी लागली. ही नोकरी ते एल्. एल. बी. होऊन १९२९ मध्यें मुक्काम राहुरी येथें वकीली सुरू करीपर्यंत टिकली. त्या काळपर्यंत पार्वतीबाई या अधूनमधून पळस्पें किंवा मुंबईस पांडुनाना यांचे स्नेही श्री. माधवराव आपटे यांचेकडे असत, राहुरीस परशरामपंत स्थिर झाल्यावर चिंतोपंत, आणि पार्वतीबाई व मुलीही त्यांचेकडे रहावयास गेल्या.

१९२६ च्या एप्रिलमध्यें चिंतोपंत यानीं सीतारामपंतांस जे पत्र पाठविलें होतें, आर्थिक मदत मागितली होती, तें पत्र समग्रच चिंतोपंतांच्या चरित्रलेखाच्या सुरुवातीस दिलें आहे. त्या पत्रावरून त्यांचे जीवितासंबंधीं बऱ्याच गोष्टींचा पडताळा येतो. त्यांची त्यावेळीं आर्थिक हलाखी होती, शारीरिक व्याधींमुळेंही ते जीवास कंटाळलेले दिसतात त्या पत्रांत. त्यांना सीतारामपंतांच्या खालावलेल्या आर्थिक स्थितीचीही जाणीव दिसते. तरीही ते अगतिक होऊन मदत मागत आहेत त्या पत्रामध्यें.

१९२७ च्या ऑक्टोबरच्या १५ तारखेचे रात्रीं सीतारामपंतांस त्यांचे रहाते घरीं पुण्यास देवाज्ञा झाली. तेव्हां त्यांचे और्ध्वदेहिक करावयास म्हणून ते मुद्दाम पळस्प्याहून पुण्यास आले. त्यांत एक कायदेशीर मुद्दाही होता म्हणतात. जो मनुष्य मृताचें क्रिया कर्मांतर करतो, तो त्याचा वारसदार ठरतो असें मी ऐकलें आहे मागाहून. तेव्हां सीतारामपंत यांची असेल ती जिंदगी मिळावी म्हणून असेल, त्यांचे दिवस करावयाचा अधिकार त्यानीं मिळवला. मला त्यावेळीं यासंबंधी कसलीच कल्पना नव्हती. ते त्यांचे बंधु आहेत, आले आहेत क्रिया करावयास करूं द्या तो धार्मिक विधी त्यांस, अशा विचारानें मी त्यांस तें सर्व करूं दिलें. पण त्यांचे दहनाचा, क्रिया कर्माचा सर्व खर्च मात्र सीतारामपंतांच्याच पैशानें करावा लागला. याबद्दल मला वाईट वाटतें. पण चिंतोपंतांच्या स्वभावाची या प्रकारानें मला नवीनच ओळख झाली. पण यातली आणखी एक गम्मत आतां सांगतो. या क्रियेच्या वेळीं कांहीं कांहीं दानें द्यावयाचीं होतीं. तीं दानें प्रत्यक्ष पुण्यास त्यानीं माझेकडून देवविलीं नाहींत त्यासंबंधीं केवळ उदक सोडलें पुण्यास, आणि त्या निरनिराळ्या दानांच्या खर्चाची रक्कम मजकडून नेऊन तीं दानें पुढें त्यानीं कुठें कोणास केव्हां दान दिलीं तें त्यांचें त्यांस ठाऊक ! रक्कम मात्र माझेकडून मागून नेली.

सीतारामपंतांनीं मृत्युपत्र तसें केलेलें नव्हतें; पण १९२२ सालीं कॉंग्रेसच्या अधिवेशनास जातेसमयीं त्यानीं एका लहानशा कागदाच्या कपटयावर वुईलवजा कागद लिहून मजजवळ दिला होता. तो सुदैवानें माझेजवळ असल्यामुळें त्याचे

आधारावर त्यांचे नांवानें असलेली मिळकत मला वारस म्हणून त्या त्यांच्या इच्छे-प्रमाणें मिळावी असा मी पुण्याच्या डिस्ट्रिक्ट कोर्टांत अर्ज केला. त्या अर्जास चितो पंतांनीं विरोध केला ! दरम्यान सीतारामपंत यांचे विम्याचे पॉलिसीचे पैसे माझी बहीण रत्नप्रभा हिचे नावानें त्यानींच असाइन करून दिलेली असल्यामुळें विना हरकत ती रक्कम तिला मिळाली व तिनें पुढें ती मला दिली. इतर जिंदगीबद्दल भाऊबंदकी झालीच. ती काय झाली व ती अंदाजे एक वर्षाच्या अखेर कशी तड-जोडीनें मिटवली त्याची हकीगत या उत्तरार्धाचे सुरुवातीस दिलेली आहेच.

या भाऊबंदकीचे प्रकारामुळें माझें व चिंतोपंत आणि त्यांचे चिरंजीव व मुली वगैरेमध्यें वितुष्ट आलें होतें. श्री. घैसास, श्री. भागवत आदि चिंतोपंतांच्या जावयांस आणि त्यांच्या व आमच्या जवळच्या इतर नातेवाईकांस चिंतोपंत व परश-रामपंत यांच्या या वागणुकीबद्दल आश्चर्य वाटलें, रागही आला. पुढें साधारणपणानें ८।१० वर्षांनीं मीच हळुहळु त्या शाखेकडील लोकांकडे येणें जाणें सुरु करून संबंध टिकवले. १९३३ मध्येंच जूनमध्यें मी राहुरीस परशरामपंत यांचेकडे एक दिवस गेलों होतों !

माझा स्वतःचा विवाह झाला २४ मे १९३० रोजीं. त्यावेळीं ही भाऊबंदकी ताजी होती, राग, जखमा ताज्या होत्या. त्यामुळें विवाहाच्या निमंत्रण पत्रिका माझे जणू कांहीं आजोबाच (सीतारामपंत यांचे श्वशुर महाभारताचार्य चिं. वि. वैद्य) रा. ब. वैद्य यांचे नांवानें काढल्या होत्या. त्यांस केवळ पत्रिकाच पाठवली होती; आणि तीही कार्याच्या अगदीं १।२ दिवसच आधीं. त्यामुळें त्या शाखेकडील कोणी हजर राहण्याची अपेक्षा नव्हती; आणि कोणी आलेंही नाहीं. पण या कार्याचेवेळीं चिं. वि. ऊर्फ नानासाहेब यांची इच्छा अशी होती कीं त्यानीं त्यांचे मुलीस दिलेली नथ (ही आतां परशरामपंतांकडें गेली होती,) तरी त्यानीं माझे पत्नीस द्यावी. त्यादृष्टीनें ते स्वतः त्या अर्थाचें पत्र लिहून त्यांस म्हणजे परशरामपंतांस आमंत्रणही देणार होते. पण मी व माझ्या बहिणींनीं त्यांस तसें करण्यापासून परावृत्त केलें.

१९२९ पासून म्हणजे राहुरी मुक्कामीं श्री. परशुरामपंत यानीं वकिली सुरू केल्यापासून ती चांगली चालू लागल्यामुळें त्यांची आर्थिक स्थिति सुधारली. चिंतोपंत यांचे सर्व कुटुंब एकत्र झालें होतें. त्यांस नातूही झाले होते, आणि एकंद-दरींत शेवटीं कांहीं सुखाचे दिवस लाभलेही. त्यांचा अंत ऑक्टोबर-नोव्हेंबर १९३० मध्यें म्हणजे सीतारामपंत यांचे मृत्युनंतर अंदाजें ३ वर्षांनीं झाला.

चिंतोपंतांच्या चरित्राच्या सुरुवातीसच ते सर्व बंधूंमध्यें दुर्दैवी होते असें लिहिलें आहे. त्यांचे मनांत बंधूंबद्दल, बहिणींबद्दल किती प्रेम होतें, तें त्यानीं कसें व्यक्त केलें, त्यांच्या मुलांमुलींबद्दलचीं त्यांचीं कर्तव्यें ते किती व कशाप्रकारें पार पाडू शकले, आई वडील यांचेबद्दलचींही कर्तव्यें ते किती कशाप्रकारें पार पाडू शकले

या गोष्टींवर चांगलासा प्रकाश पडलेला नाहीं. कोकणच्या वातावरणात, नापीकजमीनींत त्यांचें आयुष्य, त्याचा बराच मोठा भाग गेला. त्यामुळें त्या वातावरणाचा परिणाम त्यांचे मनावर झाला असण्याचा संभव आहे. पण इतर भावंडांमध्यें असणारें प्रेम दया, स्वार्थत्यागबुद्धि, इतरांच्या उपयोगी पडण्याची इच्छा, कृतज्ञताबुद्धि वगैरे सद्गुण मला त्यांचे ठिकाणीं तेवढे आढळले नाहींत, पैसा त्यांस जन्मांत मिळालाच नाहीं. तेव्हां त्या साधनानें भोवतालच्या लोकांच्या उपयोगी पडणें त्यांस शक्य झालें नाहीं याबद्दल त्यांस कोणीच दूषण देऊं शकणार नाहीं. पण अंतःकरणाची कोमलता, सहृदयता, शारीरिक कष्ट करून का होईना, इतरांचे उपयोगीं पडण्याची बुद्धि, मनाची उदारता, सर्वांविषयीं सद्भाव, हसतमुख राहण्याची वृत्ति या गोष्टी तरी त्यांच्या स्वाधीन होत्या. पण त्याही त्यांचे ठिकाणीं आढळल्या नाहींत मला. हें मी खेदपूर्वक नमूद करतों, प्रत्येकांत त्याचें कांहीं निराळें असें व्यक्तिमत्व असतें व असणारच. पण तें व्यक्तिमत्त्व पाहून इतरांस थोडासा तरी आनंद वाटावा, आल्हाद व्हावा, अशी अपेक्षा असते. त्याप्रमाणें चिंतोपंतांबद्दल मला म्हणवत नाहीं. त्यांस कोणी जीवश्च कंठश्च स्नेही असतील म्हणावें, तर तसेंही कांहीं ऐकीवांत नव्हतें. श्री. महेश्वरपंत करंदीकर, त्यांचे समवयस्क, व मामा यांचा व माझा २।३ दिवस अगदीं निकट संबंध आला. कांहीं तास तर आम्ही दोघानीं मिळूनच एकत्र प्रवास केला. त्यावेळीं त्यांचें तोंडून चिंतोपंतांबद्दल आदराचे गौरवाचे शब्द ऐकूं आले नाहीत. पण मोरूबद्दल, माझे वडिलांबद्दल, खूपच चांगलें ऐकावयास मिळालें.

चिंतोपंतांना संस्कृतचें थोडेंफार ज्ञान असावें, व त्यांचें ठायींही थोडें कवित्व असावें अशी शंका त्यांचें जें पत्र मी समग्र दिलें आहे त्या पत्र वरून दिसून येईल. तरुणपणांतील त्यांचे मोडी व बालबोध हस्ताक्षर सुंदर होतें. तें माझ्या पाहण्यांत होतें. जमाखर्चाचीही त्यांस चांगली माहिती असावी. ते टापटिपीचे होते. त्यांचे संग्रहीं पुष्कळसा जुना कागदपत्रांचा संग्रह होता, कदाचित् त्यांचे ठिकाणचे सद्गुण मला दिसलेही नसतील. पण त्यांचा जीवनवृत्तांत जो मला माहीत होता तो सत्य सत्य असा दिला आहे, त्यांत एकही गोष्ट खोटी अशी लिहिली नाहीं किंवा मुद्दाम विस्तारून सांगितली नाहीं. या संबंधांत इंग्लंडांतील श्रेष्ठ वीर पुरुष ऑलिव्हर क्रॉम्वेल यानें त्याचे चित्रकारास "Paint me as I am" असें सांगितलें होतें, म्हणजे एका डोळयानें आंधळा असेंच त्याचे चित्र निघावें अशी त्याची इच्छा होती या वचनाची आठवण झाली. आपल्याकडील वीर मल्हारराव होळकर यांचीही अशीच आख्यायिका आहे. पण त्यांचे चित्रकारानें ते बंदुकीनें शिकार करीत आहेत असें त्यांचें चित्र काढून त्यांचा एका डोळयाचा अंधपणा एकाप्रकारें खुबीदारपणानें झाकून टाकला आहे. त्या चित्रकाराची कला, लेखनकला मजजवळ असती, तर कदाचित् चिंतोपंत यांचें कांहीं निराळेंच पण सत्य असेंच चित्र माझें हातून निघालें असतें. यापेक्षां जास्त काय लिहूं ?

# श्रीधर केशव ऊर्फ तात्या

ग्रंथाच्या सुरुवातीस दिलेल्या वंशवेलीमध्यें जरी श्रीधर केशव हे केसोपंतांचे श्रेष्ठ चिरंजीव दाखवले आहेत, तरी ते खरोखरीनें २ रें अपत्य होत. केसोपंत व अन्नपूर्णाबाई यांचें पहिलें अपत्य बाळकृष्ण म्हणून एक मुलगा होता. पण सुमारें १० वर्षांचा होवून केसोपंत कुटुंब होडींतून प्रवास करीत असतां होडी उलटून खाडींत बुडून मरण पावला. दुसरे श्रीधरपंत हेच. त्यामुळें १ लें अपत्य म्हणावयास हरकत नाहीं, तसें म्हटलें गेलें.त्यांचा जन्म सन१८५७मध्यें झाला.शेवटीं परिशिष्टांत कुंडली पहा. त्यांचे कुंडलीवरून जो काय निष्कर्ष निघेल तो निघो.पणश्रीधरपंतांबद्दल दोन गोष्टी पक्क्या आहेत. ते अत्यंत बुद्धिमान होते ही एक, व ते अल्पायुषी झाले, ही दुसरी गोष्ट. ज्योतिष शास्त्र थोडें फार खरें असल्यास या दोन्ही गोष्टी कुंडली वरून दिसाव्यात. (त्यांचा मृत्यु १८८३ त झाला. )

वर ज्या होडी उलटल्याबद्दलच्या अपघाताचा उल्लेख केला आहे तो अपघात बहुधा १८६४-६५ मधला होता. व त्यावेळीं अगदीं लहान मूल चिंतोपंत हे अन्नपूर्णाबाईचें जवळच असल्यानें वाचले. बहुतेक मंडळी वाचली; पण बाळकृष्ण हा पोहणें येत असूनही बुडाला.

श्रीधरपंत यांचें बालपण कसें कोठें गेलें असेल, त्यांचें प्राथमिक शिक्षण कसें कोठें झालें या संबंधाचे तर्क केसोपंतांच्या जीवनाची माहिती, जी आप्पांच्या चरित्रांत सुरुवाती सुरुवातीस दिली आहे. त्यांत आढळेल. एवढें खरें कीं त्यांचें हायस्कूलचें शिक्षण रत्नागिरीच्या सरकारी हायस्कूलांत झालें, आणि त्यानीं मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत प्रख्यात पहिली जगन्नाथ शंकर शेट ही संस्कृतची स्कॉलरशिप सन १८७८ त मिळवली. त्यापूर्वींच त्यांचा विवाह झाला असला पाहिजे, त्याकाळच्या रीतिरिवाजाप्रमाणें.

खेड येथील शाळेंत केसोपंत हे हेडमास्तर होते, व १८७३ मध्यें आप्पा—केशवसुत यांचें नांव त्या शाळेंत घातलें गेलें. त्याचप्रमाणें माझे वडील मोरोपंत-किंवा अण्णा यांचेंही नाहीं खेडासच प्रथम घातलें गेलें अशी माहिती मिळते.त्याचप्रमाणें केशवसुत बडोद्यास गेले तेव्हां त्यांचा १८८२ सालीं दाखला त्या खेडच्या शाळेंतून काढला गेला अशी माहिती खेडच्या शाळेंत मिळते. त्याचे आधारानें १८७३ ते १८८३ पर्यंत सलगपणानें केसोपंत खेडासच राहत होते असें अनुमान कांहीं विद्वान् काढतात. पण तें चुकीचें आहे. सरकारी नोकरींत इतका काळ एके ठिकाणीं कोणी

राहत नाहीं. शिवाय केसोपंत हे विख्यात शिक्षक होते तेव्हां माझ्या तर्काप्रमाणें १८७५ चे सुमारास त्यांची बदली रत्नागिरी झाली असेल; व बहुधा त्यांची अखेरची रु. ३०।– पगाराची नोकरी येथील असावी. निदान १८७५ ते १८७८–९ पर्यंत ते रत्नागिरींत असावेत. ∵ आणि नंतर ते चिपळूण येथें त्या टापूमध्यें येऊन तेथून सेवानिवृत्त झाले असावेत, किंवा रत्नागिरीस १८८०-१ च्या सुमारास पेन्शन घेऊन सोनगांव–वळणें येथें ते मंडलीकांच्या सेवेंत राहिले. दाखला बडोद्यास पाठवतांना सोयीस्कर म्हणून जवळच्या खेडच्या शाळेतून कुशा व मोरू यांचे दोघांचेही त्यानीं काढवून ते मुलांबरोबर तात्यांकडे–श्रीधरपंतांकडे पाठवले असतील. त्याकाळांत आजच्या सारखी दाखल्यांची एवढी पंचाईत नसावी, आणि आधींच्या शाळेचा दाखला आणला तरच नांव दाखल होण्याची शक्यता वगैरे नियमांचा काटेकोरपणा नसावा. आजच्या काळावरून नियमांवरून चालीरीतीवरून ऐतिहासिक काळांतील घटना समजणार नाहींत हें येथें वाचकांनीं लक्षांत ठेवावयास हवें.

त्या काळांत आजचा रत्नागिरीचा सड्यावरचा बंगल्यांचा भाग अस्तित्वांतच नसावा. त्या काळची इंग्रजी शाळा आजच्या S. T. स्टॅन्ड समोरच्या Basic Training College या इमारतींत भरत होती अशी माहिती कळली. पण आजची इमारत बरीच नवीन दिसते. त्याकाळची इमारतही दुसरीच असावी रत्नागिरी गांव, जुना गांव, मी पाहिला. लो. टिळकांचे जन्मस्थान, घर, पाहिलें. त्याचे मागचे बाजूस थोडी नारळी-सुपारींचीं झाडें आहेत, एका १२।१५ फूट रुंद अशा रस्त्यावर हें घर आहे. तशा प्रकारच्याच एखाद्या घरीं केसोपंत राहत असावेत. गांव आणि बंदर जवळच आहे. गाव व ब्रह्मदेशचा पदच्युत राजा "थीबा" यांचा राहता राजवाडा यांत पुष्कळच मोकळी जागा असावी. त्या चांगल्या, थोड्या सुंदर वाड्यांत आज सरकारी Poly technic संस्था आहे. आजचें गोगटे कॉलेज, त्यावेळीं नव्हतेंच. आजचे सुरेख "भागेश्वर" मंदीरही नव्हतेंच. किल्ला आजच्यापेक्षां जास्त बऱ्या स्थितींत असावा. आज मोटार रस्ता आहे; पण तेव्हां बैलगाडीचाही नसावा. पाऊल वाटा असाव्यात. आंतील भगवतीच्या देवळांत लोक क्वचित् कांहीं खास वेळींच, दिवशींच बहुधा नवरात्रांत जात असतील.

---

∵ तळटीपः- श्रीधर केशव यांचें नाव ज्या रजिस्टरांत, एल्फिन्स्टन कॉलेजांत नोंदलें आहे त्या रजिस्टरांत त्यांचें नांव २३डिसेंबर १८७८रोजीं प्रथम नोंदलें. वय १९ दाखवलें आहे. Native Town म्हणून खेडची नोंद असून वडील केशव विठ्ठल हे संगमेश्वरी शाळा मास्तर आहेत अशा नोंदी आढळतात.

त्यावेळीं समुद्र किनाऱ्याजवळ, होड्यांतून व झोपड्यांतून कोळ्यांची, होड्यांच्या नाखव्यांची वस्ती असावी. जरा वरच्या बाजूस मुख्य तीन आळ्या ( घरांच्या ओळी ) असाव्यात. कारण आज लो. टिळकांचें जन्मस्थान, मधल्या आळींत दाखवतात. तेव्हां ओघानेंच खालची, व वरची आळी आलीच !

रत्नागिरीचें हायस्कूल हें चांगलें प्रख्यात हायस्कूल होतें. १८७०–७५ च्या दरम्यान ज्या अर्थी धाकटे विष्णुशास्त्री हे त्या शाळेंत शिक्षक होते (नंतर ते पुण्यास विश्रामबाग वाड्यांत गेले व पुढें त्यानीं राजीनामा देऊन प्रख्यात न्यू इंग्लिश स्कूल काढलें. ) त्याअर्थी तेथील शिक्षक वर्ग चांगला, हुषार मंडळींचा असावा. त्यांस घरींच संस्कृत थोडें फार शिकवलें जावून पुनः शाळेंतही त्या विषयास कोणी-तरी प्रख्यात विद्वान् शिक्षक असावेत. याचा परिणाम म्हणून ते १८७८ सालीं जेव्हां मॅट्रिक पास झाले तेव्हां संस्कृतांत पहिले आले व त्यांस १ ली जगन्नाथ शंकर शेट शिष्यवृत्ति मिळाली,व रत्नागिरी हायस्कूलांतही ते१ले आले असें ऐकलेलें आहे.

त्यांचा विवाह चिपळूण जवळच्या बहुधा चितळे या घराण्यांतल्याच एका मुलीशीं झाला होता. हा विवाह त्या काळच्या पद्धतिप्रमाणें १८७५ च्या आधींच झाला असावा. त्यांची पत्नी देखणी होती असें ऐकलेलें आहे. त्यांचें नांव राधाबाई होतें त्या त्यांचे मृत्युनंतर २।३ वर्षांनींच कैलासवासी झाल्या.

१८७८ नंतर तात्या मुंबईच्या प्रख्यात एल्फिन्स्टन कॉलेजांत शिकावयास गेले. त्याकाळांत कोकण व मुंबई यांचा संबंध आजच्या काळाप्रमाणें घनिष्ट होता, पुण्यापेक्षां. अगदीं अलीकडे कोकणचा व देशावरच्या कोल्हापूर, सातारा, पुणे या शहरांशीं मोटारींच्या दळणवळणामुळें थोडा जास्त संबंध येत आहे पण पूर्वी तो एकूण कमीच होता. तेव्हां मिळालेल्या शिष्यवृत्तिच्या जोरावर जवळ जवळ स्वाव-लंबनानेंच तात्यांनीं आपलें कॉलेजचें शिक्षण पूरें केलें असावें. त्यांचे समकालीन विद्यार्थी कोणकोणते होते याची फारशी माहिती ऐकलेली नाहीं. त्या काळांत शिक्षणाचें प्रमाणही फार कमीच होतें. पण त्यांचे आगेमागें २।३ वर्षेंच अलीकडे पलीकडे लो. टिळक व गु. आगरकर हे पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत शिकत होते. त्यांचेच मागाहून एखाद-दुसरेंच वर्ष महाभारताचार्य कै. चिं. वि. वैद्य होते पण ते एल्फिन्स्टनचे विद्यार्थी होते. त्यांचें तोंडून श्रीधर केशव हे फार बुद्धिमान् होते असें ऐकलेलें आहे. चिं. वि. वैद्य यांचे सहकारी म्हणून जीं नांवें त्यांच्या अजून अप्रसिद्ध अशा आत्मचरित्रांत वाचलीं आहेत, त्यांत मिरजेचे श्री. बनहट्टी हे नांव वाचलेलें

होतें, व ते नागपूरचे (हल्ली पुण्यांत देशमुखवाडी कर्वे रोड, पुणे ४ येथें स्थायिक झालेले) प्रा. श्रीनिवासराव बनहट्टी यांचे वडील होते. प्रा. बनहट्टी यांनीं ही स्वतःच्या वडीलांकडून श्रीधर केशव व त्यांच्या हुषारीबद्दल ऐकलें होतें असें त्यांचे बोलण्यांत आलें. (मी प्रा. बनहट्टी यांस १९६५च्या जूनमध्यें भेटलों होतो.) उमरावतीस पुढें प्रख्यातीस आलेले सर मोरोपंत जोशी हे तात्यांचे सहकारी व मित्र होते. आणि त्यानीं मित्रत्व फार काळपर्यंत टिकवलेलें होतें. १९१३ मध्यें माझे चुलत बंधु कै. परशुराम चिंतामण हे त्यांस भेटलेले होते, व त्यानीं ओळख दिलेली होती.मी मात्र त्यांस कधींच भेटलों नाहीं.*बी.ए.च्या परीक्षेंत तात्यांचा एक विषय गणित होता. त्यावेळीं बी. ए ला कसकसे विषय शिकावे लागत, आवश्यक व ऐच्छिक यांचे संबंध कसे होते ही माहिती नाहीं. पण श्री. चिं. वि. वैद्य हे देखील १ ले जगन्नाथ शंकर शेट स्कॉलर असून शिवाय त्यांनींही बी. ए. ला गणित विषय घेतलेला होता अशी मला नक्की माहिती आहे. तेव्हां तात्या व नानासाहेब (चिं. वि. वैद्य) यांचे संस्कृत, गणित व आवश्यक इंग्रजी एवढे विषय असतीलच; आणि अन्य कांहीं असले तर तें न कळे ! त्याचप्रमाणें त्यांचे वेळीं मॅट्रीकनंतर बी. ए. ची परीक्षा बहुधा ३ वर्षांनीं होत होती. ते कॉलेजचे फेलोही होते असें ऐकलेलें आहे. या संबंधांत जास्त माहिती मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे; आणि ती मिळाल्यास तिचा उपयोग अवश्य करीन, पण ते एम. ए. झाले नाहींत, वकील ही झाले नाहींत. त्या काळांत १ ल्या एल. एल. बी. ची परीक्षा बी. ए. च्या पूर्वी देखील देतां येत असें; २ री परीक्षा मात्र बी. ए. नंतर द्यावी लागे.

पण १८८२ चे पूर्ण वर्ष ते बडोद्यास तेथें नवीनच निघालेल्या बडोदा कॉलेजांत प्रोफेसर म्हणून काम करीत होते. आणि बडोद्यासच ते वारले. बडोद्याचा उन्हाळा त्यांस सहन झाला नाहीं, व ते विषमज्वरानें किंवा अशाच एक दोषी तापानें मरण पावले हें कळतें. आतां त्या काळांत ऑक्टोबर नोव्हेंबरांत वार्षिक परीक्षा होत. पदवीदान समारंभ जानेवारी फेब्रुवारींत; कॉलेजांची नव्या वर्षांची सुरूवात डिसेंबर जानेवारीपासून होई. तेव्हां बडोद्यास ते बहुधा १८८२च्या

---

* तळटीप :– एल्फिन्स्टन कॉलेजच्या जनरल रजिस्टरमधील नोंदींमध्यें मला चिं. वि. वैद्यांबद्दल पुढील नोंद आढळली.प्रवेश ५जानेवारी१८७७साली घेतला पण मोरोपंत जोशी यांचें नांव मात्र मी जेवढा वेळ तें रजिस्टर चाळलें १।२ वर्षें आधींच्या व १।२ वर्षें पुढच्या नोंदी पाहिल्या, त्यांत आढळलें नाहीं.पण मोरोपंत जोशी व तात्या यांचा गाढ स्नेह होता हें मात्र नक्कीच.

सुरुवातीस गेले असावेत आणि त्यांचा मृत्यु १८८३ त मार्च ते एप्रिल अखेरचे आंत केव्हां तरी झाला असावा असा तर्क करावा लागतो. त्या शिवाय माहितीची संगति लागत नाही. त्याचा अर्थ तात्यांनीं बडोदा कॉलेजांत प्रोफेसर म्हणून तीन टर्म्स नोकरी केलेली असावी आणि याच काळांत त्यानीं बिऱ्हाड करून आपले धाकटे भाऊ कुशा व मोरू यांस शिक्षणाकरितां बडोद्यास नेलें असावें.

बडोद्याचे तात्यांचे जीवनाबद्दल थोडी संभाव्य माहिती आप्पांच्या चरित्रांत दिलेली आहे. त्यावरून त्यांचे बडोद्यांतील जीवन चांगलें, सुखी असावें, मोरोपंतांचा उज्जयिनी येथें ते नुकतेच माधव कॉलेजांत प्रोफेसर म्हणून गेले असतानांचा, ते अंदाजानें ३० वर्षांचे असतानांचा एक फोटो उपलब्ध आहे, माझे जवळ आहे. त्या फोटोमध्ये त्यानीं पार्शी फॅशनचा लाँग कोट, विजार, मोठा बूट, उपरणें व डोक्यावर पगडी घातलेली असा त्यांचा वेष आहे. ते खुर्चीवर बसलेले असून त्यांचे बाजूस माझी आई उभी असून तिचे कडेवर एक मुलगी (बहुधा प्रियंवदा) वय अंदाजे एक वर्ष सव्वा वर्ष अशी आहे. त्या अंदाजें १८९६–९७ च्या फोटोवरून तात्यांची व त्यांचे पोषाखाची कल्पना करतां येते. ते देखील अण्णाप्रमाणेंच देखणे, उंच, गोरे, होते असें ऐकलेलें आहे. तेव्हां त्यांचा पोषाख एकूण त्यांचेबद्दलची कल्पना त्या फोटोवरून यावी. मोरोपंत यांचे फोटो प्रसिद्ध झालेले आहेत; मी स्वतः या ग्रंथांत कोणताच फोटो प्रसिद्ध करूं शकत नाहीं. कारणें प्रस्तावनेंत थोडक्यांत दिलीं आहेत. त्यामुळें तात्यांचे बद्दल जास्त कांहींच कल्पना करतां येत नाहीं. पण त्यांचें व्यक्तिमत्व चांगलें देखणें परिणामकारक असेलच, त्याचे कारण पुढें येईल.

बडोद्यास श्रीमान सयाजीराव महाराज गायकवाड यांस खंडेराव महाराजांस १८७५ सालीं दत्तक देण्यांत आलें. त्यावेळीं ते १३ वर्षांचें होते आणि त्यांस राज्याधिकार १८८१ मध्यें मिळाला अशी माहिती मिळते. तेव्हां तरुण सयाजीराव यानीं संस्थानच्या ज्या निरनिराळ्या सुधारणा करण्याचा तडाखा अगदीं तरुण वयांतच सुरूं केला, त्यांतील कॉलेज काढणें हा एक भाग असावा. शिक्षणाचा प्रसार, वाचनालयांचा प्रसार, आदि गोष्टी त्यांच्या डोक्यांत सुरुवातो पासूनच असाव्यात. त्यादृष्टीनें त्यांचे धाकटे भाऊ श्रीमंत संतपराव हे १८८२ मध्यें १५-१६ वर्षांचे असावेत, त्यांस इंग्रजी भाषा व अन्य विषय शिकवून तयार करण्याचें काम तात्यांकडे सोपवलेलें होतें. बडोदा कॉलेज त्याकाळीं लहान असावें. प्रोफेसर मंडळी देखील मोजकीच असेल. पण त्यांतही तात्यांची निवड झाली म्हणून त्यांची हुषारी व व्यक्तिमत्त्व तरुण महाराजांच्या नजरेंत भरलें असावें, असा तर्क करण्यास जागा आहे.

बडोद्याचे महाराज सयाजीराव यानीं आपल्या संस्थानची अनेक दिशेनें भरभराट केली. ती करण्यास्तव ते आपल्या संस्थानांतील तरुण हुशार मंडळींस यूरोपांत स्वखर्चानें पाठवीत असत; आणि तिकडून शिक्षण व अनुभव मिळवून आलेल्या या तरुणांचे हातून संस्थानी सुधारणा घडवून आणीत. अशा तरुणांस अर्थात् अधिकार व चांगला पगार मिळत असे. बडोद्याचे जुने एक दिवाण सर मनूभाई मेहता हे मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजचेच विद्यार्थी, ते एम्.ए., एल्एल्. बी. होते. त्यांचा जन्म २२ जुलै १८६८ चा. १८९९ पासून ते सयाजीराव महाराज यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी झाले; व १९१६ पासून संस्थानचे दिवाण झाले. यावरून १८८६ नंतरच केव्हांतरी ते बडोदा संस्थानचे नोकरींत लागले. म्हणजे तात्या किंवा श्रीधर केशव हे जर चांगले जगते वाचते तर श्रीमान् सयाजीराव महाराजांच्या कृपेनें ते खात्रीनेंच पुष्कळ चमकले असते. त्यांस त्या संस्थानांत मोठीं अधिकारपदें प्राप्त झालीं असतीं, यूरोपमधील देशांचा, इंग्लंडचा प्रवास घडला असता. आणि या गोष्टी त्यांस सहज शक्य झाल्या असत्या असें समजण्यास वर भरपूर पुरावा दिलेला आहे. कै. सीतारामपंत यांचे तोंडून या गोष्टी मी ऐकलेल्या होत्या. पण वर जी ऐतिहासिक माहिती मिळवून दिली आहे ती सर्व अलीकडची माझी माहिती होय. व त्या पार्श्वभूमिवर सीतारामपंत जें म्हणत असत कीं तात्या कदाचित् सर मनुभाई-प्रमाणें बडोद्याचे दिवाणही झाले असते या त्यांच्या उद्गारांत तथ्य वाटतें. मात्र तात्यांचा स्वभाव संस्थानी वातावरणांत, उच्चपदस्थ होण्याम, अनुकूल नसता तर तें सर्व अशक्य झालें असतें ! केसोपंत, आप्पा, स्वत: सीतारामपंत यांचे स्वभाव पाहतां तें जरा अशक्यच होतें असें वाटतें. मोरोपंतही स्वतंत्र बाण्याचे होते; हांजी हांजीखोरपणा त्यांच्यांत अजीबात नव्हता, कोणाच भावांत नव्हता; पण आपलें काम बरें कीं आपण बरें, कोणाच्या अध्यांत नाहीं, मध्यांत नाहीं, असें त्यांचे एकूण धोरण होते. तेव्हां असेंच धोरण जर तात्यांचें असतें तर ते संस्थानी नोकरीत वर चढले असते, पण कितीवर ते सांगणें अवघड आहे. त्याप्रमाणें ते या संस्थानी नोकरींत कायम राहते किंवा नाहीं हेंही आज सांगणे कठीणच आहे.

बडोद्यास तात्यांची प्राप्ती दरमहा रुपये २०० च्या सुमारास होती; व त्याकाळांत ती पुष्कळच होती. त्यामुळें त्यांचें म्हणजे त्यांच्या कुटुंबाचें जीवन सुखी असेल. बहुधा बडोद्याच्या रावपुरा भागांत (जेथें महाराष्ट्रीय ब्राह्मणांची वस्ती जास्त प्रमाणांत आहे, त्या भागांत) ते राहत असावेत. आणि संस्थानची गाडीच त्यांस शिकवण्याकरितां राजवाड्यांत नेण्यास, पोचवण्यास येत असेल. क्वचित् श्रीमंत संपतराव आणि कुशा–मोरू यांची ओळख झालेली असेल. म्हणूनच तात्यांच्या मृत्युनंतरही श्रीमंत संपतरावांनीं या मुलांस थोडी आर्थिक मदत केली. बडोद्याच्या

महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या सामाजिक जीवनांत तात्यांनीं कोणता व किती भाग घेतला होता तें कळण्यास मार्ग नाहीं, किंवा सायंकाळीं ते टेनिस वगैरे कांहीं खेळत असत–नसत तेंही माहीत नाहीं. करमणुकीचीं त्यांचीं साधनें कोणतीं तें माहीत नाहीं. चहा नसावाच. पण अन्य कांहीं व्यसन,– सुपारी, तपकीर, विडी, सिगारेट, पान–तंबाखू वगैरे कांहीं होतें किंवा नाहीं याची माहिती नाहीं. मोरोपंत यांस कोणतेंच व्यसन नव्हतें. पण विडी–सिगारेटचें व्यसन अल्प स्वल्प प्रमाणांत चिंतोपंत व सीतारामपंत यांस होतें. चिंतोपंत तपकीरही थोडी ओढीत असत. आप्पांचेबद्दल मला कांहींच माहिती नाहीं, ऐकलेलेंही कांहीं नाहीं.

तात्यांस एक मुलगी झाली होती. तिचा जन्म बहुधा बडोद्यासच झाला असावा. तिचें नांव ऐकलेलें नाहीं. पण ती मोठी झाली नव्हती.

तात्यांस एकाएकींच मृत्यु आला. तो बहुधा १८८३ च्या एप्रिलांत असावा. असा माझा तर्क आहे. त्याचीं कारणें याच प्रकरणांत पूर्वीं नमूद केलीं आहेत. त्यावेळेस त्यांचे पत्नीवर राधाबाईंवर व मुलीवर आणि अर्थातच् कुशा–मोरू या जोडीवर त्याचा फार मोठा परिणाम झाला असावा. किती हुरूपानें व उत्साहानें आणि आनंदानें ही मंडळी प्रथमच आगगाडीचा प्रवास करून बडोद्यास गेली असेल! आणि आतां तेथून कोकणांत, वळण्यास, परत येतांना त्यांचीं तोंडें वशी झालीं असतील त्याची कल्पनाही करवत नाहीं. भविष्याबद्दल दारुण निराशा या सर्वच तरुण मंडळींपुढें उत्पन्न झालेली असेल. तात्यांची पत्नी विशीच्या आंत बाहेर, आणि कुशा १७ तर मोरू १५ च वर्षाचा फार तर, आणि बरोबर एक लहान वर्षभराच्या सुमाराची मुलगी. दादांना तरी या सर्वांस पाहिल्याबरोबर काय वाटलें असेल तें त्यांचे तेच जाणोत ! त्याचप्रमाणें अन्नपूर्णाबाई, माझी आजी–तिच्या मनःस्थितिचीही कल्पना करवत नाहीं. कोणी कोणाचें व कसें सांत्वन केलें असेल तें एक परमेश्वरालाच माहीत! केसोपंत मात्र एकंदरींत कमनशिबी म्हणावयास हरकत नाहीं !

त्यानीं जन्मभर कष्ट केले, १०-१२ मुलांचा चांगला सांभाळ केला; आणि आतां हाता तोंडाशी आलेला कुटुंबाचा आधारच झालेला असा मुलगा तात्या एकाएकीं स्वर्गवासी झाल्यावर त्यांची स्थिति फारच चमत्कारिक झाली असावी. त्याचवेळीं त्यानीं पेन्शनही घेतलेली होती. तरी पण ते एकंदरींत धैर्यशीलच असावेत. त्यानीं सुनस नांवें ठेवलीं नाहींत, तिला वाईट पायगुणाची ठरवली नाहीं, माहेरींही पाठवली नाहीं.

कुशा-मोरु यांचे शिक्षणाची सोय कशी तरी झाली. ती हकीगत पूर्वी येऊन गेली आहे. तात्यांची पत्नी एका प्रकारें भाग्यवान. प्रथम तिची मुलगी कांहीं लहानसा आजार होऊन वारली, आणि ती स्वत: देखील तात्यांचे मागून फार तर २-३ वर्षाच्या आंतच निधन पावली. एका प्रकारें सुटली या भोगांमधून. तिला म्हणण्यासारखें सुख जरी मिळालें नसलें आयुष्यांत, तरी विधवा या नात्याची मानखंडनाही फार काळ सहन करावी लागली नाहीं.

एका बहुमोल हिऱ्यास, चांगले कोंदणही लाभलें होतें, पण एकाएकीं त्यास कोंदणासह जळून निस्तेज कोळशाचें रूप आलें ! पण ज्यानीं ज्यांनीं त्यांस पाहिलें होतें ते ते हा एक हिरा होता असें मात्र उद्गार काढीत असत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२२२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0015222

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........

ती. केशवसुत किंवा कृष्णाजी केशव दामले यांची जन्मकुंडली. जन्मदिन रविवार, भाद्रपद वद्य १४, शके १७८८ जन्मस्थान माळगुंड, जि. रत्नागिरी.




१५ मार्च १८६६ किंवा फाल्गुन वद्य १४, शके १७८७ या दिवशींची कुंडली. वार गुरुवार.



ती. मोरो केशव दामले यांचा जन्म माळगुंड येथें शिलवाहन शके १७९०, विभवनाम संवत्सरे, दक्षिणायने, शरदृतौ, कार्तिकमासे. कृष्णपक्षे सप्तम्यांतिथौ मंदवासरे, घटि २, पळें ६, जन्मनक्षत्र आश्लेषा, चरण प्रथम, नाम डीमदेव, रास कर्क, गण राक्षस, नाडी अंत्य.




ती. श्रीधर केशव दामले यांची जन्मकुंडली शालिवाहन शके १७७९, पिंगलनाम संवत्सरे दक्षियाने, शरदृतौ आश्विनमासे, शुक्लपक्षे चतुर्थ्यां तिथौ भौम वासरे, घटि २४, पळें ४८, विशाखा नक्षत्रें, कन्या लग्ने, प्रथम चरण, तूळ राशि, तिलकेश्वर शर्मं, मासनाम यौगेश्वरः द्वितीय नाम उपेन्द्रः। राक्षसगणः। जातकसर्पः व्याघ्र योनिः। वैश्य वर्णः। अंत्य नाडी।




मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.